# धुळे महानगरपालिका,धुळे

## नगरसचिव कार्यालय

## स्थायी समिती सभा क्रमांक २ चे इतिवृत्त

---

**धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह, धुळे**
**सोमवार दिनांक २१/०२/२०२२**
**वेळ सकाळी ११-०० वाजतां**

धुळे महानगरपालिकेची ऑनलाईन स्थायी समितीची सभा आज सोमवार दिनांक २१/०२/२०२२ रोजी सकाळी ११-०० वाजतां **श्री. शितल मोहन नवले, सभापती,** स्थायी समिती,मनपा धुळे यांच्या अध्यक्षतेखाली **धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह** भरली. या ऑन लाईन सभेस खालील सन्मा.सदस्य ऑन लाईन व ऑफ लाईन हजर होते.

| अ.क्रं. | सदस्यांचे नांव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. नवले शितल मोहन | सभापती |
| २ | श्रीमती कुलेवार किरण राकेश | सदस्या |
| ३ | श्री. जाधव बन्सीलाल माणिक | सदस्य |
| ४ | श्रीमती चौधरी मंगला अर्जुन | सदस्या |
| ५ | श्री. अन्सारी फातमा नुरुल अमीन | सदस्या |
| ६ | श्री. चौधरी नरेंद्र रुपला | सदस्य |
| ७ | श्रीमती. चौधरी प्रतिभा शिवाजीराव | सदस्या |
| ८ | श्री.अहिरराव किरण हरिचंद्र | सदस्य |
| ९ | श्री. रेलन हर्षकुमार राधेश्याम | सदस्य |
| १० | श्री.अग्रवाल सारिका प्रविन | सदस्या |
| ११ | श्री. अन्सारी अब्दुल लतीफ अब्दुल हमीद | सदस्य |
| १२ | श्री. खान मोहम्मद साबीर मुहिबुल्लाह | सदस्य |
| १३ | श्रीमती पठाण नाजियाबानो नासिर खा | सदस्या |

उपस्थित अधिकारी गण

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. देविदास टेकाळे | आयुक्त |
| २ | श्री. नितीन कापडनीस | अति. आयुक्त |
| ३ | श्रीमती शिल्पा नाईक | उपायुक्त |

| | | |
|---|---|---|
| ४ | श्रीमती पल्लवी शिरसाठ | सहा. आयुक्त |
| ५ | श्री मनोज अरविंद बाघ | प्र.नगरसचिव |
| ६ | श्री. दिनकर जाधव | मुख्य लेखाधिकारी |
| ७ | श्री. के. एन. शिंदे | अभियंता |
| ८ | श्री. चंद्रकांत जाधव | सहा.आरोग्याधिकारी |
| ९ | श्री. विकास साळवे | स्वच्छता निरीक्षक मलेरिया |
| १० | श्री.संजय मोरे | प्र.कार्यालयीन अधिक्षक |
| ११ | श्री. एन.के. बागुल | विद्युत अभियंता |
| १२ | श्री. हेमंत पावटे | ओव्हरसिअर बांधकाम विभाग |
| १३ | श्री. किशोर सुडके | बाजार विभाग |
| १४ | श्री. प्रसाद जाधव | अति. विभाग |

मा. सभापती — सन्मा.सदस्य मा.आयुक्त सो. सर्व अधिकारी कर्मचारी व पत्रकार, छायाचित्रकर बांधव यांचे मी स्थायी समितीच्या बैठकीत स्वागत करतो.सभेचा कोरम पुर्ण झाला असुन नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरु करावे.

म. नगरसचिव — वंदे् मातरम् या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

म. नगरसचिव — स्थायी समिती सभापती पदी श्री. शितल मोहन नवले यांची निवड झाल्याबद्दल प्रशासनाच्या वतीने त्यांचे स्वागत करतो.

सभेच्या प्रारंभी नवनिर्वाचित सभापती श्री. शितल मोहन नवले यांची पहिलीच स्थायी समितीची सभा असल्याने प्रशासनाच्या वतीने मा. आयुक्त श्री. देविदास टेकाळे यांच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन शुभेच्छा व्यक्त करण्यांत आल्या.

म.सभापती:- माझी सभापती म्हणून ही पहिलीच बैठक आहे. मी आपल्या बऱ्याच्या सदस्यांपैकी वयाने जरी लहान असलो तरी मला सर्व जेष्ठ सदस्यांना विनंती करायची आहे आपला लहान बंधु आहे काही चुकल तर सांभाळून घ्या चांगल्या सुचना असतील तर निश्‍चित करा. आपल्या सुचनाचे नक्कीच आदर होईल. आणि प्रशासनाला आपण त्या पध्दतीने कामही करायला लावू तसेच मी आयुक्त सो. व जे अधिकारी आहेत आपल्या सर्वांना सुचित करतो की, सर्व बैठका वेळेत सुरू होतील तरी आपण सर्व स्थायीच्या बैठकीना वेळेत हजर राहावे. कारण मनपाचा प्रशासन चालविण्यामध्ये आपला हातभार असतो.आपण सर्व प्रथम आपल्या ज्याकाही ३ मुलभूत गरजा आहे पाणी, कचरा, लाईट यावर येणाऱ्या काळात काम करू.हे काम करीत असतांना आपण सर्व मला सहकार्य कराल अशी अपेक्षा व्यक्त करतो.

**सभेच्या सुरुवातीस सन्मा.सदस्यांकडून आलेल्या आलेली श्रध्दांजलीची यादी**

यादी देण्यांत येते की, भारतरत्न स्वानकोकिळा लता दिदी मंगेशकर यांचे दिनांक ६ फेब्रुवारी २०२२ शनिवार रोजी मुंबई येथे दु:खद निधन झाले. त्या एक भारतीय गायिका आणि संगीतकार होत्या. तसेच भारतीय सिने जगातील प्रसिध्द संगीतकार बप्पी लहिरी उर्फ अलोकेश लहिरी यांचे दिनांक १५/०२/२०२२ मंगळवार रोजी मुंबई येथे दु:खद निधन झाले आहे.

वरील दोघांना आजच्या सभेत भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करुन तसा ठराव पारीत करण्यांत यावा ही विनंती.

म.सभापती — सन्मा. सदस्यांच्या यादीनुसार दोन्ही मान्यवरांना आजच्या सभेत दोन मिनिटे मौन उभे राहून भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करणेत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १ दिनांक २१/०२/२०२२**

सन्मा.सदस्यांच्या यादीनुसार भारतरत्न खानकोकिळा लतादिदी मंगेशकर यांचे दिनांक ६ फेब्रुवारी २०२२ शनिवार रोजी मुंबई येथे दु:खद निधन झाले.त्या एक भारतीय गायिका आणि संगीतकार होत्या. तसेच भारतीय सिने जगातील प्रसिध्द संगीतकार बप्पी लहिरी उर्फ अलोकेश लहिरी यांचे दिनांक १५/०२/२०२२ मंगळवार रोजी मुंबई येथे दु:खद निधन झाले आहे.

दोन्ही मान्यवरांचे दु:खद निधनामुळे या सभेस आतीव दु:ख होत असून ही सभा त्यांचे कुटुंबियांचे दु:खात सहभागी आहे.दोन्ही मृतआत्म्यांस चिरशांती प्रदानार्थ दोन मिनिटे मौन उभे राहून भावपूर्ण श्रध्दांजली समर्पित करण्यांत येत असून तसा ठराव पारीत करण्यांत येत आहे.

सुचक :- श्रीमती प्रतिभाताई शिवाजीराव चौधरी

अनुमोदक:- श्री. हर्षकुमार राधेश्याम रेलन — **सर्वानुमते मंजुर,**

**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक :- ०२ — स्थायी समितीच्या साप्ताहिक सभेचा वार व वेळ निश्चित करणे.

म.नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले. अधिनियमातील तरतुदींनुसार सभापती निवडी नंतरची पहिला सभा आयुक्तांनी बोलाविणेची तरतूद आहे.त्यानुसार आजची पहिली सभा बोलाविण्यांत आली आहे. याबाबत आपले काही म्हणणे असल्यास ते सादर करावे.

म. हर्षकुमार रेलन — स्थायी समिती मध्ये यापूर्वी सभेचा वार गुरुवार निश्चित केलेला होता. मला वाटते त्यामध्ये काही बदल करु नये. दर गुरुवारी सकाळी ११-०० वाजतां सभेची वेळ निश्चित करावी.

म. किरण अहिरराव — स्थायी समितीची सभा गुरुवारी न घेता शुक्रवारी निश्चित करावी कारण शुक्रवारी बहुतेक अधिकारी बाहेरगांवी जातात. त्यामुळे शुक्रवारी सभा निश्चित करावी.

म. सभापती — सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने स्थायी समितीची साप्ताहिक सभा गुरुवारी सकाळी ११-०० वाजता घेण्यांस मान्यता देण्यांत येत आहे कारण प्रशासनाच्या दृष्टीने देखील सदर वार सोयीचा आहे. तसेच अन्य दिवशीही आवश्यकतेनुसार व तांतडीच्या प्रसंगी स्थायी समिती सभापती यांच्याआदेशाने बैठक आयोजन करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ०२ दिनांक २१/०२/२०२२**

कार्यालयीन अहवालानुसार धुळे महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभापती पदाची निवडणूक दिनांक १५/०२/२०२२ रोजी होऊन स्थायी समिती सभापती पदी श्री.शितल मोहन नवले हे निवडून आलेले आहेत.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण २ महानगरपालिका स्थायी समिती परिवहन समिती इत्यादीचे कामकाज यामध्ये खालील प्रमाणे तरतूद आहे.

**स्थायी समितीचे कामकाज**

३) स्थायी समितीच्या कामकाजाचे नियमन करण्यासंबंधी तरतुदी—

अ) स्थायी समितीची सभा आठवड्यातून एकदा आणि आवश्यक वाटेल अशा अन्य वेळी भरवण्यांत आली पाहिजे.

ब) प्रत्येक स्थायी समितीची पहिला सभा आयुक्त ठरवील अशा दिवशी व वेळी भरवण्यात आली पाहिजे आणि जर ती त्या दिवशी भरवण्यात आली नाही तर ती आयुक्त ठरवील अशा नंतरच्या एखादया दिवशी भरवण्यात आली पाहिजे आणि स्थायी समितीची त्यानंतरची प्रत्येक सभा उक्त समिती वेळोवेळी ठरवील अशा दिवशी अशा वेळी भरवण्यात आली पाहिजे अशी तरतूद आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने स्थायी समितीच्या साप्ताहिक सभेचा वार गुरुवार ठेवण्यांस व सभेची वेळ सकाळी ११-०० वाजेची ठेवण्यांस मान्यता देण्यांत येत आहे. तसेच अन्य दिवशीही आवश्यकतेनुसार व तांतडीच्या प्रसंगी स्थायी समिती सभापती यांच्याआदेशाने बैठक आयोजन करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

सुचक :- श्री. हर्षकुमार राध्येश्याम रेलन

अनुमोदकः- श्री. नरेंद्र रुपला चौधरी

**सर्वानुमते मंजुर,**

**सही/-x x x**

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

# धुळे महानगरपालिका,धुळे

## नगरसचिव कार्यालय

## स्थायी समिती सभा क्रमांक ३ चे इतिवृत्त

---

**धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह, धुळे**
**गुरुवार दिनांक २४/०२/२०२२**
**वेळ सकाळी ११-०० वाजतां**

धुळे महानगरपालिकेची ऑनलाईन स्थायी समितीची सभा क्रं.३ आज गुरुवार दिनांक २४/०२/२०२२ रोजी सकाळी ११-०० वाजतां **श्री. शितल मोहन नवले**, सभापती, स्थायी समिती,मनपा धुळे यांच्या अध्यक्षतेखाली **धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह** भरली. या ऑन लाईन सभेस खालील सन्मा.सदस्य ऑन लाईन व ऑफ लाईन हजर होते.

| अ.क्रं. | सदस्यांचे नांव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. नवले शितल मोहन | सभापती |
| २ | श्री. जाधव संजय सुधाकर | सदस्य |
| ३ | श्री. बोरसे नागसेन दामोदर | सदस्य |
| ४ | श्रीमती कुलेवार किरण राकेश | सदस्या |
| ५ | श्री. जाधव बन्सीलाल माणिक | सदस्या |
| ६ | श्रीमती चौधरी मंगला अर्जुन | सदस्या |
| ७ | श्री. अन्सारी फातमा नुरुल अमीन | सदस्या |
| ८ | श्री. चौधरी नरेंद्र रुपला | सदस्य |
| ९ | श्रीमती. चौधरी प्रतिभा शिवाजीराव | सदस्या |
| १० | श्री.अहिरराव किरण हरिचंद्र | सदस्य |
| ११ | श्री. रेलन हर्षकुमार राधेश्याम | सदस्य |
| १२ | श्री.अग्रवाल सारिका प्रविन | सदस्या |
| १३ | श्री. अन्सारी अब्दुल लतीफ अब्दुल हमीद | सदस्य |
| १४ | श्री. खान मोहम्मद साबीर मुहिबुल्लाह | सदस्य |
| १५ | श्रीमती पठाण नाजियाबानो नासिर खा | सदस्या |

उपस्थित अधिकारी गण

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. देविदास टेकाळे | आयुक्त |
| २ | श्री. नितीन कापडनीस | अति. आयुक्त |
| ३ | श्री. गणेश गिरी | उपायुक्त |
| ४ | श्रीमती शिल्पा नाईक | उपायुक्त |

| | | |
|---|---|---|
| ५ | श्रीमती पल्लवी शिरसाठ | सहा. आयुक्त |
| ६ | श्री मनोज अरविंद वाघ | प्र.नगरसचिव |
| ७ | श्री. दिनकर जाधव | मुख्य लेखाधिकारी |
| ८ | श्री. के. एन. शिंदे | अभियंता |
| ९ | श्री. पी.डी. चव्हाण | नगररचनाकार |
| १० | डॉ. श्री. जगदीश पाटील | प्र. आरोग्याधिकारी |
| ११ | श्री. चंद्रकांत जाधव | सहा.आरोग्याधिकारी |
| १२ | श्री. विकास साळवे | स्वच्छता निरीक्षक मलेरिया |
| १३ | श्री. बी.एस. रनाळकर | सहा. कर मूल्य निर्धारण अधिकारी |
| १४ | श्री. एन.के. बागुल | विद्युत अभियंता |
| १५ | श्री. सी.सी. बागुल | पा.पु. ओव्हरसिअर |
| १६ | श्री.महेंद्र सोनवणे | प्रशासन अधिकारी मनपा शि.मं. |
| १७ | श्री. राजू माईनकर | भांडारपाल |
| १८ | श्री. प्रसाद जाधव | अतिक्रमण विभाग |
| १९ | श्री. किशोर सुडके | बाजार विभाग |
| २० | श्री. सुक्राम राऊत | वाहन विभाग |

मा. सभापती — सन्मा.सदस्य मा.आयुक्त सो. सर्व अधिकारी कर्मचारी व पत्रकार, छायाचित्रकर बंधव यांचे मी स्थायी समितीच्या बैठकीत स्वागत करतो.सभेचा कोरम पुर्ण झाला असुन नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरु करावे.

म. नगरसचिव — वंदे मातरम् या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

**विषय क्रमांक:- ३** — मा.आयुक्त सो. यांनी त्यांचे आलेल्या अधिकारात रुपये ५ लाख ते २५ लाखापर्यंत बांधकाम विभागाकडील विकास कामाची दि.२८/१२/२०२१ ते दि.२/२/२०२२ अखेर निर्गमित केलेल्या कार्यादेशाची यादी अवलोकनार्थ सादर.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.किरण अहिरराव — विषय मंजूर करण्यांत यावा.

म.नागसेन बोरसे — विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती — सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालानुसार सदर प्रसतावाचे अनलोकन करण्यांत आले.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ३ दिनांक २४/०२/२०२२**

मा. आयुक्त सो. यांनी त्यांचे आलेल्या अधिकारात रुपये ५ लाख ते २५ लाखापर्यंत बांधकाम विभागाकडील विकास कामाची दि.२८/१२/२०२१ ते दि. २/२/२०२२ अखेर निर्गमित केलेल्या कार्यादेशाची यादी अवलोकनार्थ सादर.

**दिनांक :-दि.२८/१२/२०२१ ते दि.०२/०२/२०२२अखेर निर्गमित केलेल्या विकास कामांच्या कार्यादेशची यादी**

| अ. क्र | कार्यादेश क्रमांक | दिनांक | कामाचे नाव | रक्कम | निधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | ५०७ | २८/१२/२०२१ | प्र.क्र.२ मध्ये पाटकर नगर ते पूजा प्रोव्हिजन पावेतो रस्ता डांबरीकरण करणे. | १२,४५,८६२/- | महाराष्ट्र सुवर्ण जयंती जिल्हास्तरीय नागरोत्थान योजना अंतर्गत |
| २ | ५०८ | २८/१२/२०२१ | प्र.क्र.१० मध्ये गुरुदत्त कॉलनी श्री.रोकडे यांचे घरापासुन ते शुभम वडगुजर यांचे घरापर्यंत बंदिस्त पाईप गटार करणे. | २४,९९,८६३/- | महाराष्ट्र सुवर्ण जयंती जिल्हास्तरीय नागरोत्थान योजना अंतर्गत |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३ | ५०९ | २८/१२/२०२१ | प्र.क्र.१० मध्ये वरखेडी रोड येथील रस्ता व बांबू गोडावून ते बर्फ कारखाना व परिसरात बंदिस्त पाईपलाईन व गटार करणे. | २४,९९,५३७/- | महाराष्ट्र सुवर्ण जयंती जिल्हास्तरीय नागरोत्थान योजना अंतर्गत |
| ४ | ५११ | ०३/०१/२०२२ | प्र.क्र.१५ मध्ये महात्माजी नगर ,अरुण कुमार वैद्य नगर व इतर भागात रस्ता व गटार करणे. | २४,९९,२७३/- | लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत |
| ५ | ५१३ | ०३/०१/२०२२ | प्र.क्र.१०मध्ये सुपडू आप्पा कॉलनी सुनील मंडप ते पापा चारू यांच्या घरापावेतो रस्ता सिमेंट कॉंक्रीट करणे. | २४,९६,१६५/- | महाराष्ट्र सुवर्ण जयंती जिल्हास्तरीय नागरोत्थान योजना अंतर्गत |
| ६ | ५१४ | ०३/०१/२०२२ | प्र.क्र.७ काराचक्की पासून ते देवचंद दुसेजा यांचे घरापर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | १२,४६,६४४/- | महाराष्ट्र सुवर्ण जयंती जिल्हास्तरीय नागरोत्थान योजना अंतर्गत |
| ७ | ५१५ | ०४/०१/२०२२ | प्र.क्र.५ मध्ये नांद्रे यांच्या घरापासून ते श्री. एस. बी. लोहार यांच्या घरापर्यंत श्री.देवरे यांच्या घरापासून ते श्री.प्रकाश हिरवाणी यांच्या घरापर्यंत रस्ता कॉंक्रीट करणे श्री.पाटील यांच्या घरापासून ते ओपनस्पेस पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | १८,४६,२५७/- | मनपा निधी अंतर्गत (नगरसेवक निधी) |
| ८ | ५१६ | ०४/०१/२०२२ | प्र.क्र.१५ मध्ये मित्रकुंज कॉलनी श्री.ढोंबरे (सुरेंद्र डेअरी समोरील रस्ता) ते वाघ यांच्या घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | १४,७९,६९९/- | साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधार योजना २०१९-२० अंतर्गत |
| ९ | ५१७ | ०४/०१/२०२२ | प्र.क्र.१ मध्ये वलवाडी येथील विद्याधन विद्यालया पासून ते श्रीगुरु कॉलनी पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | २४,६९,९७९/- | साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधार योजना २०१९-२० अंतर्गत |
| १० | ५१८ | ०४/०१/२०२२ | प्र.क्र.१ मध्ये मनुदेवी पेट्रोल पंपा पासून ते सुनील चौधरी यांचे घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | २४,८९,९५१/- | साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधार योजना २०१९-२० अंतर्गत |
| ११ | ५१९ | ०४/०१/२०२२ | प्र.क्र.१५ मध्ये अरुण कुमार वैद्य नगर श्री.शिंदे यांच्या घरापासुन ते शिंदे ते साक्री रोड पावेतो कॉंक्रीट रस्ता करणे. | ९,९५,५१८/- | लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत |
| १२ | ५२० | ०४/०१/२०२२ | प्र.क्र.१ मध्ये नथ्थू भामरे ते सप्तश्रृंगी कॉलनी वलवाडी बोर्ड पासून ते यश ब्युटी पार्लर पर्यंत व गवळे पोलीस ते नितीन बैसाणे घरापर्यंत कॉंक्रीट रस्ता करणे. | २४,२९,८६०/- | लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत |
| १३ | ५२१ | ०४/०१/२०२२ | प्र.क्र.१८ मध्ये आकाश सुझुकी ते श्री.संदीप गावडे ते देविदास गावडे यांच्या घरापावेतो रस्ता डांबरीकरण करणे. | ११,१६,३९८/- | नागरी दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत |
| १४ | ५२२ | ११/०१/२०२२ | देवपूर भागातील विजय कॉलनी मधील श्री. राव यांचे घरापासून ते श्री.जोशी ते श्री. यथार्थ बंगल्या पावेतो रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | २४,८९,९५८/- | महाराष्ट्र सुवर्ण जयंती जिल्हास्तरीय नागरोत्थान योजना अंतर्गत |
| १५ | ५२३ | ११/०१/२०२२ | प्र.क्र.१० वरखेडी येथील रामनगर येथे ड्रेनेज लाईन व श्री.निलेश गुजर तेसंदीप पाटील यांच्या घरापावेतो रस्ता कॉंक्रीट करणे. | १२,४८,४८०/- | सुवर्ण जयंती नागरोत्थान योजना अंतर्गत |
| १६ | ५२५ | १३/०१/२०२२ | प्र.क्र.१८ मध्ये मोहाडी भागात गुलाबभाऊ नगर येथे श्री.गावडे ते नरेंद्र ठाकूर यांचे घरापर्यंत सिमेंट कॉंक्रीट रस्ता करणे. | १९,९०,३८५/- | लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत |
| १७ | ५२६ | १३/०१/२०२२ | प्र.क्र.१८ मध्ये मोहाडी भागात गुलाबभाऊ नगर येथे राजेंद्र पाटील ते पांडुरंग पाटील घरापर्यंत आर.सी.सी. रस्ता करणे. | १७,९७,३०४/- | लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १८ | ५२७ | १३/०१/२०२२ | प्र.क्र.१८ मध्ये मोहाडी भागात श्री.भावसार यांचे घरापासून ते अरुणगावडे तसेच अशोक देवमाने ते बापू यांचे घरापर्यंत जयशंकर कॉलनी आर.सी.सी. गटार करणे. | ५,९२,२२४/- | लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत |
| १९ | ५२८ | १३/०१/२०२२ | प्र.क्र.१८ मध्ये मोहाडी भागात कल्पेश गावडे ते विजय गावडे ते बापू ते गुणवंत गावडे ते प्रकाश पवार यांच्या घरापावेतो आर.सी.सी. गटार करणे. | १८,९१,२८१/- | लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत |
| २० | ५२९ | १३/०१/२०२२ | प्र.क्र.५ साईबाबा नगर येथे रस्ता कॉंक्रीटी करण व बंदिस्त गटार करणे नकाणे रोड साई बाबा मंदिर ते राजू गवळी श्री.सुतार ते लाला गवळी श्री.सुनिल मोरे ते श्री.मराठे यांचे घरा पावेतो रस्ता कॉंक्रीटीकरण व बंदिस्त गटार करणे. | १२,४९,२३३/- | महाराष्ट्र सुवर्ण जयंती जिल्हास्तरीय नागरोत्थान योजना अंतर्गत |
| २१ | ५३० | २५/०१/२०२२ | प्र.क्र.९ मध्ये ग.नं.७ येथे श्री.श्याम गवळी ते चर्मकार चौक ते श्री.हरी कांबळे यांचे घरापावेतो बंदिस्त गटार करणे. | १९,९५,३९३/- | लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत |
| २२ | ५३३ | २५/०१/२०२२ | प्र.क्र.१० मध्ये दादासाहेब गायकवाड चौक येथे नरेश दामोदर, विठ्ठल साळवे,महेश चव्हाण, संदीप खरात यांच्या घरापर्यंत ड्रेनेज लाईन व बंदिस्त गटार करणे. | २४,९४,९७५/- | साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधार योजनाअंतर्गत |
| २३ | ५३७ | २५/०१/२०२२ | प्र.क्र.१५ मध्ये मारोती मंदिर ते साक्री रोड पावेतो रस्ता डांबरीकरण करणे. | २४,९५,९७९/- | साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत |
| २४ | ५४० | २५/०१/२०२२ | प्र.क्र.१० मध्ये गायकवाड चौक येथील अंतर्गत रस्ते सिमेंट कॉंक्रीट करणे.(१.कुंदन खरात यांच्या घरापासुन ते उत्तरेस बडगुजर (चक्की) २. श्रीराम अहिरे ते गोकुळ चव्हाण ३.विठ्ठल साळवे ते अशोक करडक ४.नरेश दामोदर ते कौशल्याबाई, महेश चव्हाण ते बापू अहिरे,संदीप खरात,सुनील माळी ढाक्या ते चिंधू रणदिवे यांच्या घरापावेतो रस्ता सिमेंट कॉंक्रीट करणे.) | २४,९७,५०५/- | साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत |
| २५ | ५४१ | २८/०१/२०२२ | प्र.क्र.७ साक्री रोड ते तनेजा यांच्या घरापासून ते अमरधाम पर्यंत नाल्यावर भराव करून रस्ता डांबरीकरण करणे. | १२,४७,३२३/- | महाराष्ट्र सुवर्ण जयंती जिल्हास्तरीय नागरोत्थान योजना अंतर्गत |
| २६ | ५४२ | २८/०१/२०२२ | प्र.क्र.११ मध्ये नवनाथ नगर ते अलंकार सोसा.मधील अपुर्व सोनवणे यांचे घरापासून ते गोपाल पाटील रस्ता कॉंक्रीट करणे. | १२,४२,७४३/- | महाराष्ट्र सुवर्ण जयंती जिल्हास्तरीय नागरोत्थान योजना अंतर्गत |
| २७ | ५४३ | ०१/०२/२०२२ | प्र.क्र.१५ मध्ये पोपटानी यांचे घरापासून ते भावनानी यांच्या घरापावेतो रस्ता डांबरीकरण करणे. | ९,९५,३११/- | साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत |
| २८ | ५४७ | ०१/०२/२०२२ | वलवाडी भागातील दीपमाला सोसा.भागात श्री.दिक्षित यांचे घरापासुन ते प्लॉट नं.४ पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | १८,९३,७६५/- | साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत |
| २९ | ५४८ | ०२/०२/२०२२ | वलवाडी भागातील नेताजी कॉलनी येथे श्री .कवटळ-कर यांच्या घरापासून ते श्री.राजेंद्र पाटील यांच्या घरा पर्यंत श्री.परदेशी ते चंद्रकांत पवार यांच्या घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | १०,९८,५०५/- | महाराष्ट्र सुवर्ण जयंती जिल्हास्तरीय नागरोत्थान योजना अंतर्गत |
| ३० | ५४९ | ०२/०२/२०२२ | प्र.क्र.१ मध्ये समाधान हॉटेल पासून ते श्री.वैद्य यांच्या घरापावेतो रस्ता डांबरीकरण करणे. | १२,४७,१६१/- | महाराष्ट्र सुवर्ण जयंती जिल्हास्तरीय नागरोत्थान योजना अंतर्गत |

उक्त यादीचे वाचन करुन सभागृहास माहिती देण्यांत आली.

सही/-X X X

**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-४ नगरोत्थान योजना अंतर्गत राष्ट्रीय महामार्ग ते मातोश्री वृध्दाश्रम पावेतो रस्ता डांबरीकरण करणेचे निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.नागसेन बोरसे विषय मंजूर करण्यांत यावा.

म. हर्षकुमार रेलन विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ४ दिनांक २४/०२/२०२२**

राष्ट्रीय महामार्ग ते मातोश्री वृध्दाश्रम पावेतो रस्ता डांबरीकरण करणे कामाबाबत धुळे महानगरपालिका मे.महासभा ठराव नं.९६ दि.३१/१२/२०१९ मा.आयुक्त सो. धुळे महानगरपालिका यांनी टिपणी मंजुरीने दि. / / अन्वये उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु.२७,६२,६४३/- मात्र रक्कमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./१००५/२०२०-२१ दि.२७/०१/२०२१अन्वये रक्कम रु.२७,६२,६४३/-मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./धुमपा/पा.पु.वि./२८२/२०२१-२२ दि.१४/०७/२०२१ अन्वये दि.१५/०७/२०२१ रोजी दैनिक सकाळ/राजरंग टाईम्स या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.३०/०७/२०२१ अखेर निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदार किंवा ठेकेदाराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | श्री.ललित सूर्यवंशी | शे.२ % कमीने | |
| २ | मे.ओमशिव कन्सट्रक्शन | शे.६.३० % कमीने | |
| ३ | श्री.सौरभ संजय कदमबांडे | **शे.९.९९% कमीने** | **सर्वात कमी दर** |
| ४ | श्री.अभिषेक विजय चिचोली | शे.९ % कमीने | |
| ५ | श्री.जितेंद्र गोरख देवरे | शे.२ % जास्तीने | |
| ६ | श्री.आनंद अहिरराव | शे.३.५० %जास्तीने | |

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून श्री.सौरभ संजय कदमबांडे यांचे दर शे.९.९९% कमी आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार श्री.सौरभ संजय कदमबांडे यांची शे.९.९९% कमीने दराने आलेले निविदा दर मंजुरीस्तव सादर तसेच अन्य काम न मिळालेले ठेकेदारांना त्यांची बयाणा रक्कम परत करणे बाबत प्रस्ताव मंजुरीस्तव मे. स्थायी समिती समोर सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून श्री.सौरभ संजय कदमबांडे यांचे शे.९.९९% कमीने दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम

७३ अन्वये मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी.याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री. नागसेन दामोदर बोरसे

अनुमोदक:- श्री. हर्षकुमार राधेश्याम रेलन **सर्वानुमते मंजुर,**

सही/-X X X

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-५ जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत प्र.क्र.२ मध्ये एकता नगर मधील मोकळ्या जागेवर संरक्षण भिंत बांधणेचे निविदा दर मागविण्यांत आलेत,त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.हर्षकुमार रेलन विषय मंजूर करण्यांत यावा.

म.नरेंद्र चौधरी विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ५ दिनांक २४/०२/२०२२**

जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) २०२१-२२ अंतर्गत प्र.क्र.२ मध्ये प्रभात नगर मधील मोकळ्या जागेवर संरक्षण भिंत बांधणे कामाबाबत धुळे महानगरपालिका मे.स्थायी समिती ठराव नं.-- दि. / /२० अन्वये मंजुरी दिलेली आहे. तसेच मा.जिल्हाधिकारी सो. धुळे महानगरपालिका यांनी टिपणी मंजुरीने दि.३१/१२/२०२१ अन्वये उक्त कामाबाबत रक्कम रु.२९,९१,०००/- मात्र खर्चाचा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेत आली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./४५८ दि.१७/१२/२०२१ अन्वये रक्कम रु. २९,९१,१२६/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./धुमपा/बां.वि./१८८/२०२२ दि.०४/०१/२०२२ अन्वये रोजी देशदूत/आपल नवराज्य या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.२७/०१/२०२२ अखेर निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदार किंवा ठेकेदाराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | मे.श्रीस्वामी समर्थ कन्सट्रक्शन | शे.२.०० % जास्तीने | |
| २ | श्री.गणेश सुनील जाधव | **अंदाजपत्रकीय दराने** | **सर्वात कमी दर** |
| ३ | मे.श्रीराम कन्सट्रक्शन | शे.२.०० % जास्तीने | |

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून श्री.गणेश सुनील जाधव यांचे दर अंदाजपत्रकीयआहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे.सबब कंत्राटदार श्री.गणेश सुनील जाधव यांची अंदाजपत्रकीय दराने आलेले निविदा दर मंजुरीस्तव सादर तसेच अन्य काम न मिळालेले ठेकेदारांना त्यांची बयाणा रक्कम परत करणे बाबत मंजुरीस्तव मे. स्थायी समिती पुढे सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून श्री.गणेश सुनील जाधव यांचे अंदाजपत्रकीय दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३

अन्वये मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी.याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री. हर्षकुमार राधेश्याम रेलन
अनुमोदक:- श्री. नरेंद्र रुपला चौधरी **सर्वानुमते मंजुर,**

सही/-X X X
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- ६ जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण)२०२१-२२ अंतर्गत प्र.क्र.२ मध्ये प्रभात नगर मधील मोकळ्या जागेवर संरक्षण भिंत बांधणेचे निविदा दर मागविण्यांत आलेत,त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.किरण अहिरराव विषय मंजूर करण्यांत यावा.

म.नरेंद्र चौधरी विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ६ दिनांक २४/०२/२०२२**

जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) २०२१-२२ अंतर्गत प्र.क्र.२ मध्ये प्रभात नगर मधील मोकळ्या जागेवर संरक्षण भिंत बांधणे कामाबाबत धुळे महानगरपालिका मे.स्थायी समिती ठराव नं.-- दि. / /२० अन्वये मंजुरी दिलेली आहे. तसेच मा.जिल्हाधिकारी सो. धुळे महानगरपालिका यांनी टिपणी मंजुरीने दि.३१/१२/२०२१ अन्वये उक्त कामाबाबत रक्कम रु.२९,९१,०००/- मात्र खर्चाचा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेत आली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./४५८ दि.१७/१२/२०२१ अन्वये रक्कम रु. २९,९१,१२६/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./धुमपा/बां.वि./१८८/२०२२ दि.०४/०१/२०२२ अन्वये रोजी देशदूत/आपल नवराज्य या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.२७/०१/२०२२ अखेर निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदार किंवा ठेकेदाराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | मे.श्रीस्वामी समर्थ कन्सट्रक्शन | शे.२.०० % जास्तीने | |
| २ | श्री.गणेश सुनील जाधव | **अंदाजपत्रकीय दराने** | **सर्वात कमी दर** |
| ३ | मे.श्रीराम कन्सट्रक्शन | शे.२.०० % जास्तीने | |

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून श्री.गणेश सुनील जाधव यांचे दर अंदाजपत्रकीयआहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे.सबब कंत्राटदार श्री.गणेश सुनील जाधव यांची अंदाजपत्रकीय दराने आलेले निविदा दर मंजुरीस्तव सादर तसेच अन्य काम न मिळालेले ठेकेदारांना त्यांची बयाणा रक्कम परत करणे बाबत मंजुरीस्तव मे. स्थायी समिती पुढे सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून श्री.गणेश सुनील जाधव यांचे अंदाजपत्रकीय दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३

अन्वये मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी.याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री. किरण हरिश्चंद्र अहिरराव

अनुमोदक:- श्री. नरेंद्र रुपला चौधरी **सर्वानुमते मंजुर,**

सही/-X X X

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- ७ आण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधार योजना सन २०१९-२०२१ अंतर्गत प्र.क्र.४ मध्ये सावरकर पुतळ्या जवळचा रस्ता सिमेंट काँक्रीट करणेचे निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.नागसेन बोरसे विषय मंजूर करण्यांत यावा.

म.हर्षकुमार रेलन विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ७ दिनांक २४/०२/२०२२**

आण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधार योजना सन २०१९-२०२१ अंतर्गत प्र.क्र.४ मध्ये सावरकर पुतळ्या जवळचा रस्ता सिमेंट काँक्रीट करणे कामाबाबत धुळे महानगरपालिका मे.महासभा ठराव नं.९७ दि.३१/१२/२०१९अन्वये मंजुरी दिलेली आहे.तसेच मा.जिल्हाधिकारी सो.धुळे महानगरपालिका यांनी टिपणी मंजुरीने दि. २७/०९/२०२१ अन्वये उक्त कामाबाबत रक्कम रु.७४,,९२,७५०/- मात्र खर्चाचा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेत आली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./५२७ दि.२३/०३/२०२० अन्वये रक्कम रु. ७४,९२,७५०/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिकाजा.क्र./धुमपा/बां.वि./१६७/२०दि.२१/१०/२०२१ अन्वये रोजी देशदूत/वार्ता या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.१६/११/२०२१ अखेर निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदार किंवा ठेकेदाराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | श्री.वृषभ सतिष खिवसरा | शे.३.०० % जास्तीने | |
| २ | मे.हिंद कन्सट्रक्शन | शे.२.०० % जास्तीने | |
| ३ | मे.एकविरा कन्सट्रक्शन | **अंदाजपत्रकीय दराने** | **सर्वात कमी दर** |

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून मे.एकविरा कन्सट्रक्शन यांचे दर अंदाजपत्रकीय आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार मे.एकविराकन्सट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दराने आलेले निविदा दर मंजुरीस्तव सादर तसेच अन्य काम न मिळालेले ठेकेदारांना त्यांची बयाणा रक्कम परत करणे बाबत मंजुरीस्तव मे. स्थायी समिती पुढे सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून मे.एकविरा कन्सट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३

अन्वये मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी.याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री. नागसेन दामोदर बोरसे

अनुमोदक:- श्री. हर्षकुमार राधेश्याम रेलन **सर्वानुमते मंजुर,**

सही/-X X X

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक :-८ आण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधार योजना सन २०१९-२०२१ अंतर्गत प्र.क्र.१५मध्ये सुरेश पवार ते किसन गवळी यांच्या नाल्यावर संरक्षण भिंत बांधणेचे निविदा दर मागविण्यांत आलेत,त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.हर्षकुमार रेलन विषय मंजूर करण्यांत यावा.

म. नागसेन बोरसे विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ८ दिनांक २४/०२/२०२२**

आण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधार योजना सन २०१९-२०२१ अंतर्गत प्र.क्र.१५ मध्ये सुरेश पवार ते किसन गवळी यांच्या नाल्यावर संरक्षण भिंत बांधणे कामाबाबत धुळे महानगरपालिका मे.महासभा ठराव नं.९७ दि.३१/१२/२०१९ अन्वये मंजुरी दिलेली आहे. तसेच मा.जिल्हाधिकारी सो. धुळे महानगरपालिका यांनी टिपणी मंजुरीने दि.२७/०९/२०२१ अन्वये उक्त कामाबाबत रक्कम रु.३४,८९,००३/- मात्र खर्चाचा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेत आली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./५४७ दि.२३/०३/२०२० अन्वये रक्कम रु. ३४,८९,००३/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./ धुमपा/बां.वि./ १७२ / २० दि.२७/१०/२०२१ अन्वये रोजी लोकमत/पथदर्शी या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.१६/११/२०२१अखेर निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदार किंवा ठेकेदाराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | श्री.वृषभ सतिष खिवसरा | शे.३.०० % जास्तीने | |
| २ | मे.हिंद कन्सट्रक्शन | शे.२.०० % जास्तीने | |
| ३ | मे.एकविरा कन्सट्रक्शन | **अंदाजपत्रकीय दराने** | **सर्वात कमी दर** |

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून मे.एकविरा कन्सट्रक्शन यांचे दर अंदाजपत्रकीय आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार मे. एकविरा कन्सट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दराने आलेले निविदा दर मंजुरीस्तव सादर तसेच अन्य काम न मिळालेले ठेकेदारांना त्यांची बयाणा रक्कम परत करणे बाबत मंजुरीस्तव मे. स्थायी समिती पुढे सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून मे.एकविरा कन्सट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३

अन्वये मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी.याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री. हर्षकुमार राधेश्याम रेलन
अनुमोदक:- श्री. नागसेन दामोदर बोरसे

**सर्वानुमते मंजुर,**
सही/-X X X
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- ९ सन २०२१-२२ या वर्षातील ब्लिचिंग पावडरचा पुरवठा करणेची निविदा प्रक्रिया होईपर्यंत ब्लिचिंग पावडरचा वाढीव दर रु.२१,५००/- प्रति मे. टन या दराने १७५ मे. टनाचा पुरवठा करणेसाठी लागणारा खर्च रु. ३७,६२,५००/- मात्रला कार्योत्तर मंजुरी देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.नागसेन बोरसे विषय मंजूर करण्यांत यावा.

म.खान मोहम्मद साबीर विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ९ दिनांक २४/०२/२०२२**

धुळे महानगरपालिका जलशुद्धीकरण केंद्रावर लागणारे रसायने ब्लिचिंग पावडरचा पुरवठा करणे कामी सन २०१९-२२ या वर्षाची निविदा प्रक्रिया सुरू असून कार्यादेश, करारनामा पुरवठा आदेश देणे कामी जवळपास २ ll ते ३ महिन्याचा कालावधी लागणार असून ब्लिचिंग पावडर अभावी पाणीपुरवठा बंद होवूनये म्हणून तातडीची बाब म्हणून त्या कालावधीकरिता जवळपासब १७५ मे टन ब्लिचिंग पावडरचा पुरवठा आदेश तातडीने देणे आवश्यक असून मागील पुरवठादार मे.यश केमिकल्स नगाव यांनी त्यांचे मागील मंजूर दराने पुरवठा करणेस असमर्थ असल्याचे त्यांनी त्यांचे पत्रानुसार वाढीव दर रु.२१,५००/- प्रति मे टनाने ब्लिचिंग पावडर पुरवठा करणेच्या दरास कार्योत्तर मंजुरी देणेसाठी मे.स्थायी समितीकडे पाठविणे करिता मा.आयुक्त सो. यांनी दि.०१/०२/२०२२ नुसार वाढीव खर्चास मंजुरीसाठी मे.स्थायी समितीपुढे पाठविण्यात यावे असे आदेशित केले आहे.

तरी उक्त प्रमाणे संदर्भ क्र.१ व २ नुसार सन २०१९-२० या वर्षाकरिता ब्लिचिंग पावडरचा पुरवठा करणे कामी मे.स्थायी समिती ठराव नं.१४ दि.२८/०५/२०२० अन्वये ठराव करून पुरवठा आदेश जा.क्र./धुमपा/पा.पु.वि./१४४ दि.०३/०७/२०२० अन्वये ३०० मे. टनाचा पुरवठा आदेश रु.१५,६४९/- प्रति मेटना प्रमाणे देण्यात आलेला होता. त्यानुसार मे.यश केमिकल नगाव,धुळे यांनी संपूर्ण मालाचा पुरवठा सुरळीतपणे केलेला होता व त्याबाबत त्यांनी दि.२८/०६/२०२१ रोजी मात्र पुरवठा संपल्याबाबत व यापुढे त्यांचे मागील मंजूर दराने ब्लिचिंग पावडरचा पुरवठा करण्यास असमर्थता दर्शविली आहे. कारण लॉकडाऊन मुळे व इंधन वाढ झाल्याने सरकारी कर वाढल्यामुळे ते त्यांचे मागील दराने ब्लिचिंग पावडरचा पुरवठा करण्यास तयार नव्हते.

त्यानंतर धुळे मनपा धुळे सन २०२१-२२ या वर्षाची ब्लिचिंग पावडरची निविदा प्रक्रिया सुरू करण्यात आलेली होती व ती निविदा प्रक्रिया पूर्ण होऊन कार्यादेश व करारनामा होईपर्यंत तातडीची बाब म्हणून व ब्लिचिंग पावडर अभावी पाणीपुरवठा बंद होऊ नये म्हणून

त्या कालावधीकरिता मा. आयुक्त सो. यांनी आदेशित केल्याप्रमाणे मे.यश केमिकल्स नगाव धुळे यांना जा.क्र./धुमपा/पा.पु.वि./ ३०८ दि.२३/०७/२०२१ अन्वये ७५ मे.टनाचा कार्यादेश देवून (पुरवठा आदेश) त्यांचे मागील मंजूर दराने किंवा सन २०२१-२२ या वर्षात येणाऱ्या सर्वात कमी दराने त्यांचे देयक अदा करण्यात येईल या अटी व शर्ती नुसार पुरवठा आदेश दिलेला होता.त्यानुसार त्यांनी मालाचा पुरवठा सुरळीतपणे केलेला होता.त्यानंतर दि.१८/१०/२०२१ मध्ये मे.यश केमिकल्स यांनी पत्र देवून रु.२१,५००/- प्रति मे टनाने ब्लिचिंग पावडरचा पुरवठा करू असे कळविले आहे.त्यानुसार त्यांना पुन्हा जा.क्र./ धुमपा/ पा.पु.वि. /९८४ दि.१३/१२/२०२१ अन्वये ५० मे टन ब्लिचिंग पावडरचा पुरवठा आदेश मा. आयुक्त सो. यांच्या स्वाक्षरीने देण्यात आलेला होता व त्यानंतर त्या मालाचा पुरवठा देखील त्यांनी सुरळीतपणे केलेला आहे.

व सध्या सन २०२१-२२ ब्लिचिंग पावडरची निविदा प्रक्रियेस लागणारा कालावधी करिता अजून त्यांना ५० मे. टन ब्लिचिंग पावडरचा पुरवठा आदेश देणे अत्यावश्यक आहे. त्यानुसार त्यांना जा.क्र./धुमपा/पा.पु.वि./१३०३दि.०४/०२/२०२२ अन्वये वाढीव दरानुसार मा. आयुक्त सो. यांच्या स्वाक्षरीने आदेश केला.

त्यानुसार मे.यश केमिकल नागाव ,धुळे त्यांनी १७५ मे टनाचा ब्लिचिंग पावडरचा पुरवठा केला असून त्यांचे मागील मंजूर दर रु.१५६४९/- प्रति मे टना ऐवजी त्यांनी रु.२१,५००/- प्रति मे टन याप्रमाणे ब्लिचिंग पावडरचा पुरवठा केलेला आहे. तरी उक्त वाढीव दराबाबत मा.आयुक्त सो. यांनी दि.०१/०२/२०२२ नुसार सदरचे दर रु.२१,५००/-प्रति मे टन याप्रमाणे एकूण १७५ मे टन ब्लिचिंग पावडरचा पुरवठा करणेचे मूळखर्च व वाढीव खर्चासह एकत्रित प्रकरण मंजुरीसाठी मे.स्थायी समितीकडे पाठविण्यात यावे असे आदेशित केले आहे. तरी एकूण रुपये ३७,६२,५००/- मात्रच्या खर्चास मंजुरीसाठी मे.स्थायी समितीकडे पाठविणेस मंजुरी दिलेली आहे.

तरी उक्त कामी विना निविदा करण्यात आलेला ब्लिचिंग पावडरचा खर्च व वाढीव खर्च रु. ३७,६२,५००/- (१७५ मे.टन x रु.२१,५००/- प्रति मे.टन) मात्रच्या खर्चास मुंबई मनपा अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ (२) (२) नुसार कार्योत्तर मंजुरीकरिता मे.स्थायी समितीपुढे मंजुरीसाठी सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून मे.यश केमिकल नगाव,धुळे यांचेकडून १७५ मे टनाचा विना निविदा करण्यात आलेला ब्लिचिंग पावडरचा खर्च व वाढीव खर्च रु. ३७,६२,५००/- (१७५ मे.टन x रु.२१,५००/- प्रति मे.टन) मात्रच्या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ५ (२) (२) नुसार कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी.याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री. नागसेन दामोदर बोरसे

अनुमोदक:- श्री. खान मोहम्मद साबीर मुहिबुल्लाह **सर्वानुमते मंजुर.**

सही/-X X X

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- १० सन२०२०-२१ या वित्तीय वर्षाचे वार्षिक लेख्यास मान्यता देणेबाबत विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

| | |
|---|---|
| म.नागसेन बोरसे | माझा एक प्रश्न आहे. २०-२१ चे सुधारित व २१-२२ चे मूळ अंदाजपत्रक मंजूर आहे का ? |
| म. आयुक्त | महासभेत ठराव केला आहे. |
| म.नागसेन बोरसे | महासभेचा ठराव मंजूर आहे का? वार्षिकलेखे म्हणजे काय? |
| म.दिनकर जाधव | २०-२१ चा जो काही लेखा मंजूरीसाठी ठेवलेला आहे. तर त्या आर्थीक वर्षामध्ये येणारी सर्व जमा आणि झालेला खर्च याचा हा गोषवारा आहे. सन्मा. सदस्यांनी जो प्रश्न उपस्थित केला आहे सभा झाली किंवा नाही झाली किंवा वैधतेबाबत प्रश्न केला. |
| म.नागसेन बोरसे | मी त्याची वैधता कायदेशिर,बेकायदेशिर यात मला काही देणे घेणे नाही. |
| म.सभापती | त्यांच्याकडून टिपणीमध्ये २१-२२ चा उल्लेख करायला नको होता. माझी चर्चा झाली वाटल्यास हा विषय आपण बाजूला ठेवूया. टिपणीत गोंधळ झालेला आहे.२०-२१ चा गोषवारा आहे जेवढा जमा-खर्च झालेला आहे तेवढयाला मंजूरी दयायची आहे. |
| म. नागसेन बोरसे | विषय असा आहे की, जेव्हा अर्थ संकल्प सादर होईल मागचा बजेट लॅप्स होईल ना? |
| म.सभापती | २०-२१ चा जो जमा खर्च झालेला असतो. तो जुन २०२१ मध्ये मार्च एंड पर्यंत सादर करायचा असतो. |
| म.नागसेन | दर सहा महिन्याला लेखे मंजूर झालेले पाहिजे. हे बारा महिने लावतात. |
| म.सभापती | त्या वेळेस कोव्हीड काळ चालू होता सभा झालेल्या नाही. मंजूरी दयायला विलंब झाला. २१-२२ चा बजेटचा आणि या विषयाचा काहीही संबंध नाही. |
| म. नागसेन बोरसे | यांनी जे दर व कर दिलेले आहेत. त्यामध्ये तफावत आहे ही तफावत आली कुठुन स्थायीच्या बजेटला पण कुठलीच कार्यवाही नाही झाली स्थायीचा बजेट मंजूर होऊन ४ ते ६ महिने होऊन गेले यापूर्वी ८ व्या दिवशी टेंडर निघायचे आता ४-४ महिने निघत नाही. म्हणजे तुम्हाला आमचे काम करायचे नाही का ? सन्मा. सदस्यांची विकास कामे थांबली आहे. तुमची निविदा समीती टेंडर ओपन झाल्यावर दोन सहया करायच्या पहिले आता पाच सहया कराव्या लागतात. आता प्रत्येक अधिकारी म्हणतो माझ्याकडे आणा. |
| म.आयुक्त | निविदा समीती ही समीती आहे. त्यामध्ये अटी शर्ती मध्ये प्रॉब्लेम होतोय. त्यामध्ये काही निविदा अंमलबजावणी करायला अडचण आली आहे. |
| म.नागसेन बोरसे | अटी शर्ती हया वर्क ऑर्डर देतांना करतो आपण. वर्क ऑर्डर वर सहया कधी घेतो आपण? |
| म.आयुकत | टेंडर मध्ये असतील तर ॲग्रीमेंट मध्ये येतील टेंडर जर अपडेट असतील तर त्या ॲग्रीमेंट मध्ये येतील. |
| म.नागसेन बोरसे | एवढा उशिर का होतोय? ते सांगा आम्हाला मागचे टेंडर होते त्यांचे काय झाले सांगा? सदस्यांचे काम थांबलेले आहे. |
| म.सभापती | तुमच्या सुचना चांगल्या आहे. मी पण या सूचना वेळोवेळी मांडल्या होत्या. एकच टेबल वर निविदा मंजूर झाली पाहिजे. तो टेबलचा विषय त्याच दिवशी संपला पाहिजे ही माझी पण धारणा आहे. ही बैठक आपण दालनामध्ये त्या घेवू. |
| म.नागसेन बोरसे | आम्ही पत्र दिल्यापासून ६ व्या दिवशी टेंडर काढले. आता का नाही? ६-६ महिने का उशिर होतो. कारण प्रशासन टाईम पास करते आहे. प्रशासन वेळ मारुन नेत आहे . आणि आमची विकास कामे थांबलेले आहे. |
| म.हर्ष रेलन | माझ्या स्वत:च्या नगरसेवक निधीतून १९-२०,२०-२१,२१-२२ एकही ऑर्डर झाली नाही. शिंदे सो.ऑफिसला १०० वेळा गेलो मोजून, दरवेळेसे ते आज बागुल नाही, आज हा माणूस नाही, फाईल इकडे गेली, फाईल तिकडे गेली आहे, टाळाटाळ करतात. कुठली अडचण आहे ते पण सांगत नाही. |

म.नागसेन बोरसे — एक सूचना करतो शेवटची विषय संपवून टाकतो. दर आठवडयाला एक दिवस ठरवा मेळावा कसा भरवतो आपण तसा मेळावा भरवा. सगळया अधिकाऱ्यांना एका जागेवर बसवा, सहया करा. डि वन, डि टू ला किती दिवस झाले? महासभेला बजेट मंजूर केला आहे का नाही सांगा मला.

म.किरण अहिरराव — बजेटची महासभा होऊन ३ महिने झाले प्रत्येक नगरसेवकाला ३० लाख निधी, देवपूरला २० कोटी, हद्दवाढ ला ५ कोटी हे आपण पेपरात डिक्लेअर केलं होतं. या गोष्टीला ३ महिने झाले. लोकं विचारत आहे कुठे २० कोटी , कुठे गेले १५ कोटी आम्ही काय उत्तरे देऊ त्यांना?

म.आयुक्त — निविदा समितीने जे छाननी शिट बनवले आहे. छाननी शिट मध्ये तेच –तेच मुद्दे येत असतील ते झाल्यावर तो मूद्दा पुन्हा पुन्हा येणार नाही. निविदा समीतीच्या मुद्दयामध्ये बांधकाम त्याच प्रकारच्या आहेत. बदल कुठे होतील तुमच्या निर्बीजीकरण निविदा, दुसऱ्या बी.ओ.टी प्रकल्पाच्या निविदा आहे. निविदा समीतीला त्यामध्ये २/३ बैठका ठेवाव्या लागतील. त्यामुळे जास्त वेळ जाणार नाही.

म.सभापती — आपण आयटम चेक करतात. एकच आयटम ॲक्सेस होतो. तो टेक्निकल मुद्दा आहे. टेंडर वर कंडीशन असते. वाटल्यास सर्व अधिकारी वर्गाने वाचून घ्या. २५ टक्के पर्यंत ॲक्सेस करु शकतो. तुम्ही ५ ते ७ टकके ॲक्सेस जातात ते पण विरोध करतात. टेंडर कंडीशनमध्ये म्हटले की, जी प्रशासकीय मान्यता आहे. त्यावरती कॉस्ट जायला पाहिजे. ५ टक्के पर्यंत ॲक्सेस करु शकता हा पण क्लॉज आहे. तुम्ही स्वत: तर टेंडर कंडीशन वाचा. कुठलाही आयटम २५ टक्केवर जायला नाही पाहिजे शेरा मारल्यामुळे लेखा विभाग संभ्रमात पडतो. निविदा कमीटीमध्ये तुमची निविदा काय असते ते समजून घ्या. टेक्नीकल हेड ना पण विचारुन घ्या तुमची सर्वांची बैठक माझ्या दालनात घेऊ. पेपर वाढणार नाही. सहया वाढणार नाही याची काळजी घ्यायला लावू. राहिला विषय बजेटचा तर हा विषय महापौरांच्या आखत्यारित आहे. आपण महापौरांचया दालनात बैठक घेऊ.

म.नागसेन बोरसे — महापौर सांगता बजेटवर आयुक्तांना भेटा. आयुक्त सो. काय चर्चा करतील?

म.सभापती — आपण संयुक्त बैठक आज-उदया मध्ये घेऊ.

म.नागसेन बोरसे — हा बजेट झाला त्याचा काय निर्णय झाला. तो पण सांगा. आम्हाला प्रकरणे फिरवायला बरे.

म.आयुक्त — आमचे सुधारित अंदाजपत्रकाचे काम चालू आहे. मागचे दायीत्व, उत्पन्न, या सर्व बाबी जेवढया शक्य आहे तेवढया समाविष्ट करतोय. उत्पन्न आणि खर्चाच्या हिशोबाने.

म.नागसेन बोरसे — मार्च पर्यंत प्र.मा. नाही झाली तुम्ही स्पील ओव्हर ला घेऊ शकत नाही. त्या आगोदर ही कामे होणार आहे का? स्पील ओव्हर आणि प्र.मा. ही प्रकरणे टाकू शकत नाही. आमचे टेंडर नाही झाले प्रशासकीय मान्यता झाली नाही कामांना मग तुम्ही ते बजेट मध्ये कसे आणणार?

म.सभापती — सदस्यांना विनंती करतो हा विषय महासभेचा आहे. ४ सदस्य मिळून महासभा लावू. पहिल्या सदस्य म्हणून मी सही करायला तयार आहे. महापौरांना विनंती करु. हा स्थायीचा विषय नाही.

म.नागसेन बोरसे — तो पर्यंत हा बजेट स्वीकारु नये अशी विनंती करतो. यावर काय निर्णय घ्याल ते पण सांगा. तुम्ही कसं काय म्हणतात हा स्थायीचा विषय नाही? कलम ९४ मध्ये काय आहे २८ नमुना काय आहे एवढे सांगा? कलम ९४ प्रमाणे लेखे सादर करण्याचा अधिकार आहे बरोबर. नमुना २८ हा नगरपालिकेचा होता. मनपाचा कुठला नियम आपण तयार केला आहे, हे तयार करण्याचे अधिकार स्थायी समीतीचे आहे. स्थायी समीतीने नियम तयार करावे एवढी विनंती करतो.

म.सभापती — ठीक आहे. त्यांनी फक्त् लेखा जोखा सादर केला यात बजेटचा काही संबंध नाही. आपल्याला मंजूरी दयावी लागेल.

| | |
|---|---|
| म.नागसेन बोरसे | जमा खर्च अर्थ असा होतो जमा खर्च करा पण अर्थ संकल्पात होणार आहे का? तिथे नोंद होत नाही. |
| म.हर्ष रेलन | प्रशासन दिशाभूल करण्याचा प्रयत्न करते. आमचे मुद्दे गांभिर्याने घ्या. आमचे कामे होत नाही. दोन-तिन वर्ष होत नाही. |
| म.सभापती | सन्मा. सदस्यांनी प्रश्न उपस्थित केला होता. त्यांचे १९-२०,२०-२१,२१-२२ जे नगरसेवक निधीचे प्रस्ताव ते त्वरीत प्रशासनाने करावे. पहिल्या सभेत ही बोललो होतो. दफतर दिरंगाई कमी करा. अन्यथा मला माझे सगळे अधिकार वापरुन तुमच्यावर कार्यवाही करावी लागेल. यापुढे २०-२५ दिवस निविदा ओपनिंगला व टेंडर प्रोसेसिंगला लागणार असेल ती बाब अजिबात चालणार नाही. निविदेचा आठवडा भरात निर्णय झाला पाहिजे. |
| म.हर्ष रेलन | बागुल साहेबांना प्रश्न आहे साक्री रोड भागाचे टेंडर किती दिवसापासून ओपन करुन ठेवले आहे दर मंजुरीकरीता का पाठवले नाही? |
| म. विद्युत अभियंता | श्री.गिरी सो. रजेवर असल्याने डी.एस.सी. उपलब्ध नव्हती.ते हजर झालेनंतर कालच डी.एस.सी. मिळाली असून निविदा उघडण्यांत आली असून निविदा समितीकडे सादर करणार आहे. सदर मंजुरी झालेनंतर पुढील बैठकीत सादर करणेत येईल. |
| म.सभापती | मी तुम्हाला फक्त ७ दिवसांची मुदत देतोय. ७ व्या दिवशी स्थायी समितीकडे मंजुरीसाठी आले पाहिजे. दप्तर दिरंगाई करायची नाही. पुढच्या स्थायीत तो विषय आला पाहिजे. |
| म.नागसेन बोरसे | हया विषयाचे काय करायचे. |
| म.सभापती | मंजुरी दयायची आहे. मी माहिती घेतो. |
| म.दिनकर जाधव | मी याची माहिती काढतो व आपल्याला देतो. |
| म.सभापती | हा विषय पुन्हा चर्चेला घेऊ मी जाधव सो. माझ्या दालनात बोलावतो आपण चर्चा करु. आपल्याला जी-जी माहिती अपेक्षित आहे ती त्यांना सांगा.पुढच्या सभेत ती माहिती घेऊन येतील. तोपावेतो सदर विषय तहकूब ठेवण्यात येत आहे. |

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १० दिनांक २४/०२/२०२२**

मा.महासभा यांच्या सन २०२१-२२ चे मुळ अंदाजपत्रकास ठराव क्रं.२३ दिनांक १/११/२०२१ नुसार मान्यता प्राप्त झालेली आहे. सदर अंदाजपत्रकास उपरोक्त ठरावान्वये अंतिम रुप प्राप्त झाल्यानंतर तात्काळ सदर लेखे अंतिम करुन सन २०२०- २१ या वित्तीय वर्षाचे लेखे मुंबई प्रातिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९४ अ नुसार व लेखासंहिता १९७१ नियम ६० नमुना २८ नुसार तयार केलेले आहे. तरी स्वाक्षरीसाठी सादर तसेच सदर लेखा मे.स्थायी समितीपुढे मान्यतेसाठी सादर करणेबाबत निरणयार्थ सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांनी उपस्थित केलेली चर्चा लक्षांत घेता याबाबत आवश्यक ती माहिती विभागाकडून घेण्यांत येईल तो पावेतो सदर प्रस्ताव तहकूब ठेवण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**

सही/-X X X

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

# धुळे महानगरपालिका,धुळे

## नगरसचिव कार्यालय

### स्थायी समिती सभा क्रमांक ४ चे इतिवृत्त

---

**धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह, धुळे**
**सोमवार दिनांक २८/०२/२०२२**
**वेळ सकाळी ११-०० वाजतां**

धुळे महानगरपालिकेची ऑनलाईन अर्थसंकल्पीय विशेष स्थायी समितीची सभा क्रं. ४ आज सोमवार दिनांक २८/०२/२०२२ रोजी सकाळी ११-०० वाजतां **श्री. शितल मोहन नवले, सभापती,** स्थायी समिती, मनपा धुळे यांच्या अध्यक्षतेखाली **धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह** भरली. या ऑन लाईन सभेस खालील सन्मा.सदस्य ऑन लाईन व ऑफ लाईन हजर होते.

| अ.क्रं. | सदस्यांचे नांव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. नवले शितल मोहन | सभापती |
| २ | श्री. जाधव संजय सुधाकर | सदस्य |
| ३ | श्री. बोरसे नागसेन दामोदर | सदस्य |
| ४ | श्रीमती कुलेवार किरण राकेश | सदस्या |
| ५ | श्रीमती चौधरी मंगला अर्जुन | सदस्या |
| ६ | श्री. अन्सारी फातमा नुरुल अमीन | सदस्या |
| ७ | श्री. चौधरी नरेंद्र रुपला | सदस्य |
| ८ | श्रीमती. चौधरी प्रतिभा शिवाजीराव | सदस्या |
| ९ | श्री.अहिरराव किरण हरिचंद्र | सदस्य |
| १० | श्री. रेलन हर्षकुमार राधेश्याम | सदस्य |
| ११ | श्री.अग्रवाल सारिका प्रविन | सदस्या |
| १२ | श्री.अन्सारी अब्दुल लतीफ अब्दुल हमीद | सदस्य |
| १३ | श्री. खान मोहम्मद साबीर मुहिबुल्लाह | सदस्य |
| १४ | श्रीमती पठाण नाजियाबानो नासिर खा | सदस्या |

उपस्थित अधिकारी गण

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. देविदास टेकाळे | आयुक्त |
| २ | श्री. नितीन कापडनीस | अति. आयुक्त |
| ३ | श्री. गणेश गिरी | उपायुक्त |
| ४ | श्रीमती शिल्पा नाईक | उपायुक्त |

| | | |
|---|---|---|
| ५ | श्री. एन.पी. सोनार | सहा. आयुक्त |
| ६ | श्री मनोज अरविंद वाघ | नगरसचिव |
| ७ | श्री. दिनकर जाधव | मुख्य लेखाधिकारी |
| ८ | श्री. के. एन. शिंदे | अभियंता |
| ९ | श्री. पी.डी. चव्हाण | नगररचनाकार |
| १० | श्री. चंद्रकांत जाधव | सहा.आरोग्याधिकारी |
| ११ | श्री. विकास साळवे | स्वच्छता निरीक्षक मलेरिया |
| १२ | श्री. बी.एस. रनाळकर | सहा. कर मूल्य निर्धारण अधिकारी |
| १३ | श्री. एन.के. बागुल | विद्युत अभियंता |
| १४ | श्री. सी.सी. बागुल | पा.पु. ओव्हरसिअर |
| १५ | श्री.महेंद्र सोनवणे | प्रशासन अधिकारी मनपा शि.मं. |
| १६ | श्री. राजू माईनकर | भांडारपाल |
| १७ | श्रीमती कल्पना जाधव | अभिलेखापाल |
| १८ | श्री. किशोर सुडके | बाजार विभाग |
| १९ | श्री. सुक्राम राऊत | वाहन विभाग |

मा. सभापती — सन्मा.सदस्य मा.आयुक्त सो. सर्व अधिकारी कर्मचारी व पत्रकार, छायाचित्रकर बांधव यांचे मी स्थायी समितीच्या बैठकीत स्वागत करतो.सभेचा कोरम पुर्ण झाला असुन नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरु करावे.

म. नगरसचिव — वंदे् मातरम् या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

विषय क्रमांक:-११ — मा.आयुक्त सो. धुळे महानगरपालिका धुळे यांचे कडील जा.क्रं.धुमपा/लेखा/२५३ दि. २५/२/२०२२रोजीच्या पत्रानुसार सन २०२१-२२ चे सुधारीत व सन २०२२-२३ चे मुळ अंदाजपत्रक सादर करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.तसेच लेखा विभागाने सन्मा.सदस्यांना अंदाजपत्रकाच्या प्रती वितरीत करण्यांची सूचना केली.

म.आयुक्त सो. — मा.सभापती / सन्मा. सदस्य स्थायी समिती, महानगरपालिका, धुळे

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०३ व १०४ नुसार सन २०२१-२२ चे सुधारित व कलम ९५ नुसार सन२०२२-२३ चे मूळअंदाजपत्रक आज मी मा. स्थायी समिती समोर सादर करीत आहे.

महानगरपालिकेच्या निर्मिती नंतर ही महापालिकेच्या कारभारात अनेक स्थितंतरे होत गेलेली आहेत. हददवाढ पुर्वी मनपाचे क्षेत्र ४६.४६चौ.कि.मी.होते .दि.५जानेवारी२०१८ रोजी हददवाढीनंतर मनपाचे क्षेत्र ५४.६२चौ.कि.मी.ने वाढले असून त्यानुसार धुळे महापालिकेचे एकुण क्षेत्र १०१.०८चौ. कि.मी.झाले आहे.सन २०११ च्या जनगणनेनुसार शहराची एकुण लोकसंख्या ४,४६,०९४ इतकी आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये कार्यरत अधिका-यांनी प्रशासकीय शिस्त,पारदर्शकता आणि व्यापक जनहित विचारात घेऊन काम करणे आवश्यक आहे त्यादृष्टीने महानगरपालिकेची वाटचाल सुरु आहे. स्थानिक स्वराज्य संस्था हया लोकशाहीच्या पाठशाळा असुन याठिकाणी समतोल न्याय व जन सामान्यांचे समाधान केंद्रस्थानी ठेवुन व्यापक जनहितासाठी कामकरत राहणे हे आद्य कर्तव्य आहे.जनता व लोक प्रतिनिधी यांच्यात सुसंवाद निर्माण झाल्यास विकासात्मक कामांना निश्‍चितपणे गती मिळते.त्यादृष्टीकोनातून प्रशासनाने

शहराच्या सर्वांगीण विकासासाठी विविध विकास कामे व उपक्रमांना केलेली सुरुवात आशादायी ठरत आहे.

आपण कोरोना सारख्या आपत्तीत सर्वांच्या सहकार्याने शहरास सुस्थितीत ठेवण्याचा प्रयत्न केला व त्यात आपणास यश ही प्राप्त झाले.दुर्दवाने शहराती लब-याच व्यक्तींचे निधन सुध्दा झाले. परंतू या आपत्तीच्या परिस्थितीत शहराच्या एकूणच अर्थव्यवस्थेवर झालेल्या परिणामाची झळ शहरातील नागरीकां बरोबरच धुळे महानगरपालिकेस ही सोसावी लागलेली आहे.तरी ही या परिस्थितीतून मार्गक्रमण करण्याचा आपला प्रयत्न राहिलेला आहे.

मनपाचे उत्पन्नाचे स्त्रोत मर्यादीत आहेत म्हणून खर्चासाठी मोठया प्रमाणात निधी उपलब्ध होत नाही. त्यामुळे शासनांच्या योजनांचा पुरेपुर लाभ घेवुन जास्तीत जास्त नागरी सुविधा पुरविण्याचा महानगरपालिकेचा प्रयत्न राहीलेला आहे.सन्माननिय नगरसेवक व पदाधिकारी यांच्या सहकार्यामुळे नियोजन बध्द विकास कामे मार्गी लागतआहेत.

महानगरपालिकेतील वरिष्ठ पातळीवरील महत्वाची पदेरिक्त असुन अत्यल्प तांत्रिक कर्मचारी व इतर मोठया प्रमाणात रिक्त पदे, आर्थिक स्थिती यासर्वबाबींवर मात करुन मालमत्ताकराच्या वसुलीसाठी होणारे यशस्वी प्रयत्न,मनपा निधी व शासन निधी यामधुन होणारी शहरातील सर्वांगीण विकास कामे याबाबत धुळे महानगरपालिका आश्वासक भुमिका नोंदवित आहे.

महानगरपालिका कामकाजात भविष्यात अशा प्रकारे नियोजन बध्द विकासासाठी पदाधिकारी व अधिकारी कर्मचारी यांची पारदर्शक व कार्यक्षम व्यवस्था निर्माण करुन सामान्य धुळेकर नागरिकांच्या अपेक्षापुर्तीसाठी आपण सारे सज्ज होवु या.

सन२०२१-२२चे सुधारीत अंदापत्रक व सन२०२२-२३चे मूळ अंदाजपत्रक सादर करतांना समाजातील व तळागाळातील सर्वघटकांचा विचार करून सर्वसमावेशक अंदाजपत्रक तयार करण्याचा प्रयत्न केला आहे.जमा व खर्चाचा अंदाज प्रथम मे.स्थायीसमिती समोर व मे. स्थायीसमिती मार्फत नंतर मे.महासभा मध्ये सादर करून मंजूर केलाजातो. अर्थसंकल्पीय अंदाज हा वस्तुनिष्ठ असावा व त्यानुसार शाश्वत विकास साधला जावायासाठी काटेकोर आर्थिक नियोजन करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केलेला आहे.

## अर्थसंकल्पातील ठळक तरतुदी

### १) सन २०२२-२३ या वित्तीय वर्षात प्राप्त होणारे संभाव्य उत्पन्नाच्या बाबी

सन २०२२-२३ चे मूळ अंदाजपत्रकामध्ये सुरवातीची शिल्लक मनपा निधी व शासकीय अनुदाने यासह रूपये १०३.४७ कोटी आहे.

- धुळे मनपामार्फत GIS प्रणालीव्दारे शहरातील व वाढीव हददीतील मालमत्ता पुर्नमुल्यांकनचे काम हाती घेण्यात आले असून हद्दवाढ झालेले ११ गावांचा संपुर्णपणे पुर्नमुल्यांकन झालेले आहे. तसेच शहरातील मालमत्तांचे पुर्नमुल्यांकनाचे काम ४०% झालेले आहे. त्यामुळे ११ गावांचा मालमत्ता करात व इतर करात वाढ होणार असुन त्यामुळे सन २०२२-२३ च्या मूळ अंदाजपत्रका मध्ये मुख्य: मालमत्ता कर व इतर करांव्दारे रूपये ५८.३९ कोटी व GST अनुदानाव्दारे रूपये १२७.३८ कोटी असे एकूण रूपये १८५.७७ कोटी प्राप्त होण्याची शक्यता आहे. त्यानुसार सन २०२२-२३ च्या मूळ अंदाजपत्रकात तरतूद केलेली आहे.
- विशेष अधिनियमाव्दारे प्राप्त होणा-या रकमा जसे विकास शुल्क , झोन दाखले , अनधिकृत टॉवर दंड अनाधिकृत बांधकामे यावरील दंड अशा स्वरूपाच्या बाबींवर ६.१९ कोटी सन

२०२२-२३ मध्ये प्राप्त होण्याची शक्यता आहे. त्यानुसार सन २०२२-२३ च्या मूळ अंदाजपत्रकात तरतूद केलेली आहे.

- महानगरपालिकेच्या मालमत्ता व सेवांपासून प्राप्त होणा-या रकमा जसे बाजार फी , दुकान भाडे , BOT प्रकल्प इ. पासून रूपये ३८.६३ कोटी उत्पन्न प्राप्त होण्याची शक्यता आहे. त्यानुसार सन २०२२-२३ च्या मूळ अंदाजपत्रकात तरतूद केलेली आहे.
- शासकीय महसुली अनुदानापोटी जसे मुद्रांक शुल्क , हिवताप योजना , महाराष्ट्र शिक्षण कर रिबेट इत्यादीव्दारे रूपये ५.२१ कोटी प्राप्त होण्याची शक्यता आहे. त्यानुसार सन २०२२-२३ च्या मूळ अंदाजपत्रकात तरतूद केलेली आहे.
- इतर जमा रकमा पोटी जसे व्याज , प्रतिलिपी , निविदा फॉर्म विक्री इ. व्दारे रूपये ३.७६ कोटी उत्पन्न प्राप्त होण्याची शक्यता आहे. त्यानुसार सन २०२२-२३ च्या मूळ अंदाजपत्रकात तरतूद केलेली आहे.
- पाणीपुरवठा यासबबीखाली जसे पाणीपटटी व पाणीविक्री इ. व्दारे रूपये ३०.०५ कोटी उत्पन्न प्राप्त होण्याची शक्यता आहे. त्यानुसार सन २०२२-२३ च्या मूळ अंदाजपत्रकात तरतूद केलेली आहे.
- शासकीय योजना (भांडवली कामांसाठी ) जसे नगरोत्थान, अक्कलपाडा , मल:निसारण , लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधार योजना, रमाई आवास योजना , मुलभूत सोई सुविधा , पंतप्रधान मंत्री आवास योजना अशा इ. योजनांव्दारे २१३.३२ कोटी रूपये प्राप्त होण्याची शक्यता आहे.त्यानुसार सन २०२२-२३ च्या मूळ अंदाजपत्रकात तरतुदी करण्यात आलेल्या आहेत.

असे एकंदर सुरवातीची शिल्लक व उपरोक्त प्रमाणे दर्शविलेल्या उत्पन्नाच्या व अर्थसंकल्पात समाविष्ट इतर बाबीव्दारे एकूण ५८६.९९ कोटी प्राप्त होण्याची शक्यता आहे.

**२) सन २०२२-२३ या वित्तीय वर्षातील खर्चाच्या संभाव्य बाबी**

सन २०२२-२३ या वित्तीय वर्षामध्ये महानगरपालिकेमार्फत होणा-या खर्चाच्या संभाव्य बाबी या पुढीलप्रमाणे आहेत.

- महानगरपालिकेच्या कायम व रोजंदारी कर्मचारी यांचे वेतनासाठी रूपये ६०.५४ कोटी खर्च अपेक्षित आहे. त्यानुसार सन २०२२-२३ च्या मूळ अंदाजपत्रकात तरतुदी करण्यात आलेल्या आहेत.
- सामान्य प्रशासन विभागांतर्गत सभासदांचे मानधन, कार्यालयीन खर्च , निवृत्तीवेतन , जी.आय.एस. व्दारे मालमत्तांचे मुल्यांकन फी इ. साठी रूपये ५४.७० कोटी खर्च अपेक्षित आहे. त्यानुसार सन २०२२-२३ च्या मूळ अंदाजपत्रकात तरतुदी करण्यात आलेल्या आहेत.
- सार्वजनिक सुरक्षितता ,अग्निशमण सेवा , रस्त्यावरील दिवाबत्ती , विद्युत देयके , एल.ई.डी. बसविणे इ. साठी रूपये १४.७२ कोटी खर्च अपेक्षित आहे. त्यानुसार सन २०२२-२३ च्या मूळ अंदाजपत्रकात तरतुदी करण्यात आलेल्या आहेत.
- आरोग्य विभाग व बांधकाम विभाग यांचे अंतर्गत जसे शौचालय निगा व दुरूस्ती , सर्जिकल साहित्य , औषध खरेदी , त्रयस्थ संस्था तपासणी शुल्क, पी.एम.सी. नियुक्ती इ बाबींसाठी रूपये ११.८८ कोटी खर्च अपेक्षित आहे. त्यानुसार सन २०२२-२३ च्या मूळ अंदाजपत्रकात तरतुदी करण्यात आलेल्या आहेत.

- मनपा शिक्षण मंडळास महानगरपालिकेचा ५०% हिस्सा व निवृत्तीवेतनासाठी तसेच इतर बार्बीसाठी रूपये १४.८९ कोटी खर्च अपेक्षित आहे. त्यानुसार सन २०२२-२३ च्या मूळ अंदाजपत्रकात तरतुदी करण्यात आलेल्या आहेत.
- राज्य व जिल्हास्तर नगरोत्थान योजना मनपा हिस्सा , मल:निसारण व अक्कलपाडा योजनेचा तथा इतर योजनांचा मनपा हिस्सा महाराष्ट्र शिक्षण कर, रोजगार हमी कर, इ. साठी एकूण रूपये ५८.३४ कोटी खर्च अपेक्षित आहे. त्यानुसार सन २०२२-२३ च्या मूळ अंदाजपत्रकात तरतुदी करण्यात आलेल्या आहेत.
- मागासवर्गीय दुर्बल घटक , महिला व बालकल्याण , दिव्याग , वृक्ष निधी इत्यादीसाठी शासन निकषानुसार एकूण रूपये १.३५ कोटी देय आहे.त्यानुसार सन २०२२-२३ च्या मूळ अंदाजपत्रकात तरतुदी करण्यात आलेल्या आहेत.
- पाणीपुरवठा विभागांतर्गत उच्चदाब विद्युत देयक ,रसायने खरेदी , पाणी खरेदी , पंपिग स्टेशन निगा व दुरूस्ती इ साठी रूपये १५.०८ कोटी खर्च अपेक्षित आहे. त्यानुसार सन २०२२-२३ च्या मूळ अंदाजपत्रकात तरतुदी करण्यात आलेल्या आहेत.
- महानगरपालिकेचे विकास कामांचे स्पील ओव्हर अंतर्गत सन २०२१-२२ चे सुधारीत अंदाजपत्रकात रूपये २२.९२ कोटी व सन २०२२-२३ चे मूळ अंदाजपत्रकात रूपये २७.५६ कोटी ची तरतूद केलेली आहे. तसेच २०२२-२३ च्या मूळ अंदाजपत्रकात महानगरपालिकेचे विकास कामे साठी रूपये ७.१२ कोटी व शासकीय योजनांतून रूपये ३०८.८० कोटी असे एकूण रूपये ३४३.४८ कोटी खर्च अपेक्षित आहे. त्यानुसार सन २०२२-२३ च्या मूळ अंदाजपत्रकात तरतुदी करण्यात आलेल्या आहेत.
- मनपा कायम कर्मचा-यांना व निवृत्तीवेतनधारकांना माहे जानेवारी २०२१ पासून ७ वा वेतन आयोग लागू केला असून सप्टेंबर २०१९ ते डिसेंबर २०२० असे एकूण १६ महिन्यांच्या कर्मचा-यांना वेतन फरकापोटी रूपये १२ कोटी देणे प्रलंबित आहे त्यासाठी सन २०२२-२३ च्या मूळ अंदाजपत्रकात रूपये १० कोटीची तरतूद केली असून सदर रकमा पुढील आर्थिक वर्षात कर्मचा-यांना रोखीने देण्याचे नियोजित आहे. उर्वरीत फरकाच्या रकमा प्राप्त उत्पन्नाच्या आधारे वितरीत करण्यात येतील.

## अर्थसंकल्पातील महत्वपुर्ण योजना

**१) अमृत मिशन**

**अ)अमृत अभियान अंतर्गत वाढीव धुळे शहर पाणीपुरवठा योजना (अक्कलपाडा धरण उद्भव) :-** सदर योजनेचे काम हे सन२०२०-२१ या आर्थिक वर्षापासून सुरू करण्यात आलेले आहे.सदर योजनेस रूपये १६९.१३ कोटीला अमृत योजने अंतर्गत शासनाकडून प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.धुळे शहरातील हद्दवाढ अंतर्गत११ गावे,सन २०५०-५१ या वर्षापर्यंत वाढणा-या लोकसंख्या तसेच नागरीकांना प्रतिदिन प्रतिव्यक्ती १३५ लिटर पाणी उपलब्ध करुनदेणे यासर्वाचा विचार करुन सदर योजनेचे काम सुरु आहे. अक्कलपाडा पाणीपुरवठा योजनाही धुळे महानगरपालिकेसाठी जिवनदायी ठरणार आहे. सदर योजनेच्या पुर्णत्वास गेल्यानंतर पुढील ३० वर्षापर्यंत नागरीकांना पिण्याच्या पाण्याचा प्रश्नभेड सावणार नाही.सदरहू योजना सद्यस्थितीत ८२% पुर्ण झाली असून ऑगस्ट२०२२ पावेतो सदर योजना पुर्ण होवू शकेल.सदर योजनेस मनपा हिस्सा एकूण रक्कम रूपये ४२.२८कोटी देय असून आजपावेतो रूपये२६.२३ कोटी प्रदान केले आहे.

**ब) अमृत अभियान अंतर्गत धुळे मलनिस्सारण योजना टप्पा क्र १ (भूमिगत गटार ) योजना:-केंद्र** पुरस्कृत अमृत योजने अंतर्गत प्रथम टप्प्यात देवपूर भागात मलनिस्सारण योजने

अंतर्गतरूपये१३१.५४ कोटीला प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.सदर योजने अंतर्गत केंद्र शासन ५०% व राज्य शासन २५% तसेच मनपा हिस्सा २५% नुसार योजनेचा आराखडा निश्चीत करण्यात आलेला आहे.त्यानुसार शासनाकडुन ९८.६६ कोटी निधी येणे अपेक्षित असून रूपये ९०.६५ कोटी निधी प्राप्त झाला आहे. उर्वरीत रूपये ८.०१ कोटी निधी सन २०२२-२३ मध्ये प्राप्त होण्याची शक्यता आहे.तशी तरतुद मुळ अंदाजपत्रकात केलेली आहे.सदर योजनेसाठी मनपा हिस्सा ३२.८८ कोटी देणे अपेक्षित आहे.त्यापैकी १२.०६ कोटी निधी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाकडे वर्ग केलेला आहे.

उपरोक्त दोन्ही योजनांसाठी मनपा हिस्सा रुपये २५ कोटीची सन २०२२-२३ च्या मुळ अंदाजपत्रकात तरतुद केलेली आहे.

२)मनपा जागा विकसीत करणे (BOT / **BOLT तत्वावर) :-**

धुळे मनपा अंतर्गत मनपाच्या मालकीच्या जागेवर सनं १५३ दसेरा मैदान,गटक्र ३४७८ मनपा प्रशासकीय इमारतीसमोर गुजराथीशाळेच्या आवारात,सनं ७४ भाजी मंडई तसेच नवरंग पाण्याच्या टाकीसमोर इत्यादी ठिकाणी BOT/BOLT तत्वावर व्यापारी संकुल बांधणे प्रस्तावित आहे.त्यामध्येनागरीकांना मोठया प्रमाणावर व्यवसाय /व्यापारासाठी दुकान गाळे उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.सदर प्रकल्प पुर्ण झाल्यास मेगा सिटीमध्ये मिळणा-या सर्व सुविधा स्थानिक पातळीवर उपलब्ध होणार आहेत. सदर प्रकल्पाच्या कार्यान्वयानंतर सन२०२२-२३ मध्ये महानगरपालिकेस साधारणत: ३५ कोटी उत्पन्न प्राप्त होण्याची शक्यता आहे. त्याप्रमाणे तरतुद केलेली आहे.

**३) महाराष्ट्र सुवर्णजयंतीनगरोत्थान योजना**

**अ) महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजना ( राज्यस्तर ) :-**

**या योजने अंतर्गत शहरातील मुख्य २० रस्त्यांच्या कामासाठी शासनाकडून रूपये १०१.२९ कोटीस सन२०१९-२०** मध्ये प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. सदर योजनेची कार्यान्वयीन यंत्रणा म्हणून सार्वजनिक बांधकाम विभाग निश्चीत केलेला आहे.सदर योजनेचा मनपा हिस्सारूपये ३०.३८कोटी देणेआहे त्यापैकी रूपये५ कोटीबांधकाम विभागास वर्ग केलेले आहे.

तसेच याच लेखाशिर्षातील योजनेअंतर्गत याव्यतिरीक्त सन २०२१-२२ मध्ये रूपये ३० कोटीची योजना प्रस्तावित असून त्यासाठी आवश्यक ती पुर्तता करण्यात येत आहे.

**ब) महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजना (जिल्हास्तर): -**

**सन२०२१-२२मध्ये सदर योजने अंतर्गत कामांचे नियोजन केलेले आहे.तसेच** धुळे शहरातील वाढती लोकसंख्या व वाढती औद्योगिक वसाहत लक्षात घेता धुळे शहरातील नागरीकांच्या अग्नि सुरक्षीततेकामी (सार्वजनिकसुरक्षा) नविन अद्यावत साहित्य सामुग्री खरेदी करणे तसेच नविन अग्निशमन वाहन खरेदी करणेकरीता सन २०२१-२२ च्या सुधारीत अंदाजपत्रकामध्ये रुपये १.३५ कोटी व सन २०२२-२३ च्या मुळ अंदाजपत्रकात रुपये ३.७० कोटी असे एकुण रुपये ५.०५ कोटीची तरतुद केलेली आहे.

उपरोक्त वरिल (अ) व (ब) मधील योजनांसाठीचा मनपा हिस्सा रुपये २० कोटीची तरतुद सन २०२२-२३ च्या मुळ अंदापत्रकात केलेली आहे.

४) **साहित्य रत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठेनागरी वस्ती सुधार योजना:-**

**अनुसुचित जाती व नव बौध्द घटकांच्या वस्तीचा विकास करणे कामी सन २०२१-२२ अतर्गत एकुण ४२ कामांचे प्रस्ताव म.जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयाकडे सादर केलेला असुन** याबाबत सन २०२१-२२ च्या सुधारीत अंदाजपत्रकात रूपये १२.१८ कोटी व

सन २०२२-२३ च्या मूळ अंदाजपत्रकात रूपये ७ कोटी ची तरतूद केलेली आहे. त्या प्रमाणे निधी प्राप्त होईल अशी अपेक्षा आहे.

**५) प्रधान मंत्री आवास योजना (PMAY Urban) :-**

धुळे महापालिका हद्यीतील शहर वासीयांसाठी प्रधानमंत्री आवास योजनेची अंमलबजावणी सुरु करण्यात आलेली आहे.DPR-१ लाभार्थ्यांची संख्या ५१० व DPR-२ लाभार्थ्यांची संख्या ३४० एकुण ८५० लाभार्थ्यांसाठी २ प्रस्ताव मंजुर करण्यात आलेले आहेत.प्रत्येकी लाभार्थ्यास कामाची प्रगती पाहुन निधी वितरीत करण्यात येतआहे.

तथापी नव्याने मंजुर करण्यात आलेलाDPR-३ लाभार्थ्यांची संख्या२५० व DPR-४ लाभार्थ्यांची संख्या २५० असे एकुण ५०० लाभार्थ्यांचे प्रस्ताव मंजुर करण्यात आले आहे. त्यांचे निधी वितरणसन२०२२-२३ या आर्थिक वर्षात प्राप्त होणार आहे. त्या अनुषंगाने सन २०२१-२२ चे सुधारीत अंदाजपत्रकात रूपये ५.१० कोटी व सन २०२२-२३ च्या मूळ अंदाजपत्रकात रूपये १७.७५ कोटी अनुदान अपेक्षीत असून तशी तरतूद केलेली आहे.

**६)रमाई आवास योजना :**-सामाजिक न्याय विभाग अंतर्गत रमाई आवास घरकुल योजना राबविण्यात येत असुन सन २०१९-२० या वर्षी ७५५ लाभार्थ्यांना मान्यता देण्यात आलेली आहे. ७००लाभार्थ्यां पैकी प्राप्त अनुदानानुसार ४३० लाभार्थ्यांना प्रथम हफ्याचे अनुदान वाटप करण्यात आलेले आहेत. तसेच ४३० लाभार्थ्यांना व्दितीय व तृतीय हफत्याच्या अनुदानाची रक्कम प्राप्त आहे. सन २०२१-२२ च्या सुधारीत अंदापत्रकात रुपये १.२४ कोटी व सन २०२२-२३ चे मूळ अंदाजपत्रकात रूपये १ कोटीची तरतूद करण्यात आलेली आहे.

**७)धुळे शहरात एल.ई.डी पथदिवे लावणे:**-धुळे मनपा क्षेत्रात जुने पथदिवे काढून नवीन LEDपथदिवे लावणेबाबत कार्यवाही सुरू आहे.प्रत्यक्ष काम सुरू झाल्यापासून आजपावेतो मनपा क्षेत्रामध्ये १४ हजार नवीन LEDपथदिवे बसविण्यात आलेले आहे.तसेच बहुतांश हायमास्टचे देखील जुनेपथदिवे काढून नविनLED लावणेत आले आहेत. मनपा क्षेत्रातील पथदिव्यांचे वीजबिल प्रतिमाह सुमारे ४० लक्ष इतके आहे. आजपर्यंत नवीन LEDबसविल्याने साधारणत: वीजबिलांमध्ये प्रतिमहा ६-७ लक्षने बचत झाली आहे. मनपा हद्दीमध्ये उर्वरीत नवीनLED पथदिवे बसविणेचे प्रस्तावित आहे.सदर कामपुर्ण झाल्यावर पथदिव्यांच्या वीजबिलांमध्ये बचत होणेअपेक्षीतआहे.यामुळेमनपाच्या आर्थिक फायदा होणार आहे.सदर कामासाठी सन २०२२-२३ चे मूळ अंदाजपत्रकात रूपये ६कोटी मात्रची तरतूद करणेत आलेली आहे.

**८)ई- व्हेईकल:**-शासनाने पर्यावरणाची हानी रोखण्यासाठी टप्प्याटप्प्याने सद्यस्थितीत इंधनावर चालणारी वाहनांचे उत्पादन बंद करून ई-व्हेईकल वापर करण्याचे धोरण अवलंबले आहे. धुळे महानगरपालिका पदाधिकारी व अधिकारी यांच्या वापरासाठी शासनाच्या धोरणानुसार ईव्हेईकल खरेदीसाठी सन २०२२-२३च्या अंदाजपत्रकास वाहन खरेदीसाठी१ कोटीरुपयेची तरतुद करण्यात आली आहे.

**९)बायोगॅसप्रकल्प:-**

स्वच्छ भारत अभियान नागरी अंतर्गत धुळे महानगरपालिकेस ३०TPD क्षमतेचा बायोगॅस प्रकल्प उभारण्यासाठी शासन निर्णय दि.२८जानेवारी२०२०अन्वये प्रशासकीय मंजुरी देण्यात आली आहे.

उक्त प्रकल्पासाठीसन२०२१-२२ अंतर्गत निविदा मागविण्यात आली असुन निविदा प्रक्रिया सुरु आहे. सन २०२२-२३ चे मूळ अंदाजपत्रकात ३.६३ कोटीची तरतूद करणेत आलेली आहे.

**१०) घनकचरा व्यवस्थापन :-**

घनकचरा व्यवस्थापनासाठी यंत्रणेची नियुक्ती करणेत आलेली असून त्यामध्ये कच-याचेसंकलनकरूनप्रक्रियाकेंद्रापर्यंतवाहतूककरणेइ.बाबत कार्यवाही करण्यात येणार आहे तसेच स्वच्छतेबाबत तक्रारनिवारणकक्षाचीस्थापनाकरण्यातआलीआहे.

सदरचे काम१५ वा वित्त आयोगातुन प्रस्तावीत करण्यात आले असुन त्यासाठी अंदाजपत्रकात तरतुद करण्यात आली आहे.

**११ ) कुत्रे निर्बिजीकरण व डॉग व्हॅन :-** धुळे महानगरपालिका हादीतील मोकाट कुत्राच्या नियंत्रणसाठी सन २०२१-२२ च्या सुधारीत अंदाजपत्रकात डॉग व्हॅन खरेदी करण्यासाठी २५ लक्ष ची तरतुद करण्यात आली असुन सन २०२२-२३ च्या अंदाजपत्रकात मोकाट कुत्र्यांच्या निर्बिजीकरणासाठी रुपये ४० लक्षची तरतुद करण्यात आलेली आहे. जेणे करुन शहरातील मोकाट कुत्र्यांच्या संख्येवर नियंत्रण ठेवण्यात यश मिळेल.

**१२)कार्डीयाकॲम्बुलन्स:-**

धुळे महानगरपालिका करीता जिल्हा नगरोत्थान योजना अंतर्गत२ कार्डीयाक ॲम्बुलन्स घेण्यास जिल्हा नियोजन समितीकडे रूपये १.३५ कोटीचा प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.

त्यानुसार शहरातील रुग्णांना तातडीने उपचार घेण्यास बाहेगावी पुणे,मुंबई इ.ठिकाणी पोहचविण्यास मदत होईल.त्यानुसार सन२०२२-२३ चे मूळ अंदाजपत्रकात उक्त योजने अंतर्गत एकत्रीत पणे तरतूद करण्यात आलेली आहे.

**१३)ई-गर्व्हनन्स:**-नागरीकाना सर्व सुविधा ई - गर्व्हनन्सच्या माध्यमातून विहित काळात मिळवून देण्यासाठी मनपाने निर्णय घेतलेला आहे.सदर प्रकल्पांची प्रभावी व अत्याधुनिक पध्दतीनुसार संगणकीय प्रणालीव्दारा अंमलबजावणी करण्यासाठी सन २०२२-२३ च्या मूळ अर्थसंकल्पात रुपये १.०० कोटीची तरतूद करण्यात आलेली आहे.

**१४) मलनिस्सारण टप्पा क्र.२:-**

सदर योजना पुढील वर्षासाठी प्रस्तावित आहे. सदर योजनेसाठी अर्थसंकल्पात स्वतंत्र बजेट हेड निर्माण केले असुन किमान रुपये २५ कोटीची तरतुद गृहित धरलेली आहे. याबाबतचा परिपुर्ण प्रकल्प अहवाल शासनास सादर करण्यात येईल.

**१५) पांझरा नदी सुधार प्रकल्प :-**

सदर योजना पुढील वर्षासाठी प्रस्तावित आहे. DPR व तत्सम बाबी पुढील वर्षात पुर्ण होतील.सदर योजनेसाठी अर्थसंकल्पात स्वतंत्र बजेट हेड निर्माण केले असुन किमान रुपये १० कोटीची तरतुद गृहित धरलेली आहे. याबाबतचा परिपुर्ण प्रकल्प अहवाल शासनास सादर करण्यात येईल.

**१६) कोविड हॉस्पिटल :-**

सदर हॉस्पिटल साठी रुपये १५ कोटी रुपयाची मागणी केलेली आहे. सदर योजनेसाठी अर्थसंकल्पात स्वतंत्र बजेट हेड निर्माण केले असुन किमान रुपये ५ कोटी तरतुद गृहित धरलेली आहे. याबाबतचा परिपुर्ण प्रकल्प अहवाल शासनास सादर करण्यात येईल.

सदर योजनांच्या अंमलबजावणीसाठी केद्र व राज्यशासनाकडुन महापालिकेला वेळोवेळी आवश्यक निधी मिळत आहे. तसेच भविष्यातही मिळणार आहे.

तसेच बाबनिहाय सविस्तर तरतुदी सन २०२१-२२ च्या सुधारीत व सन २०२२-२३ च्या मुळ अंदाजपत्रकात दर्शविलेल्या आहेत. त्यांचे कृपया अवलोकन व्हावे.

धुळे महानगरपालिकेचा सुधारीत अर्थसंकल्प सन२०२१-२२मध्ये सुरवातीच्या शिल्लकेसह रूपये ५१६.९८ कोटीचा असून त्यामधून महसुली तथा भांडवली खर्च रुपये ४१३.५१ कोटी अपेक्षित आहे. त्यानुसार रूपये १०३.४७ कोटी शिलकीचा अर्थसंकल्प सादर करीत आहे.

तसेच सन २०२२-२३ चे मूळ अर्थसंकल्पात सुरवातीच्या शिल्लकेसह रूपये ५८६.९९ कोटी असून त्यामधून महसुली तथा भांडवली खर्च ५८१.३९ कोटी अपेक्षित आहे. त्यानुसार सन २०२२-२३ चे रूपये ५.६१ कोटी शिलकीचेमुळ अर्थसंकल्प सादर करीत आहोत.

धुळे महानगरपालिकेच्या कार्यप्रणालीत धुळे जिल्हयाचे पालक मंत्री मा.ना. श्री.अब्दुल सत्तार अब्दुल नबी, मा. खासदार डॉ. श्री. सुभाषजी भामरे,मा.आमदार श्री. अमरीषभाई पटेल , मा.आमदारडॉ.श्री.सुधीरजी तांबे, मा.आ.श्री किशोर दराडे ,मा. आमदार श्री कुणाल पाटील,मा. आमदार श्री.फारूख शाह,भाजप महानगरअध्यक्ष श्री.अनुप अग्रवाल, विविध पक्षांचे पदाधिकारी व प्रतिनिधी तसेच जिल्हा प्रशासन, पोलीस प्रशासन व इतर सर्वशासकीय विभागाचे बहुमोल सहकार्य लाभत आहे. ही सर्व कामे मार्गी लावतांना मा.महापौर श्री.प्रदीप बाळासाहेब कर्पे, मा.उपमहापौर श्री.भगवान शंकर गवळी, मा.सभापती स्थायी समिती श्री.शितलभाऊ नवले, सभागृहनेते मा.श्री.राजेश पवार, विरोधी पक्षनेते मा. श्री.कमलेश देवरे, महिला बालकल्याण समिती सभापती मा.सौ. योगिता बागुल, महिला बालकल्याण समिती उपसभापती मा.सौ. आरती पवार, विविध पक्षांचे गटनेते, सर्व सन्मा. सदस्य / सदस्या त्याच बरोबर शहरातील सर्व सामाजिक व सांस्कृतिक संस्था, जेष्ठ नागरीक, शहरातील मान्यवर व सर्वप्रसार माध्यमे व नागरीक यांचे सहकार्य व योगदान अतिशय महत्वपुर्ण ठरतआहे.त्यांचा मी आभारी व ऋणी आहे.

महानगरपालिका कामकाजात भविष्यात अशा प्रकारे नियोजनबध्द विकासासाठी पदाधिकारी व अधिकारी कर्मचारी यांची पारदर्शक व कार्यक्षम व्यवस्था निर्माण करून सामान्य धुळेकर नागरिकांच्या अपेक्षापुर्तीसाठी आपण सारे सज्ज होऊ या.

सदर अर्थसंकल्प तयार करतांना सन्मा.पदाधिकारी, सर्व. सन्मा. सदस्य व सदस्या अति. आयुक्त, उपायुक्त, सहा.आयुक्त, तसेच मुख्यलेखाधिकारी व लेखाविभाग,सर्व विभाग प्रमुख व कर्मचारी तसेच पत्रकार बांधव व नागरीक यांनी वेळोवेळी सूचना केल्या या सर्वांचा मी आभारी आहे.

म. नागसेन बोरसे — मा.आयुक्त महोदयांनी सादर केलेल्या अंदाजपत्रकाचा अभ्यास करण्यासाठी १०दिवसांचा वेळ मिळावा.त्यासाठी ही सभा१०दिवसासाठी तहकूब करावी अशी मी सभापती यांना विनंती करतो..

म. सभापती — आज मा.आयुक्त महोदयांनी अंदाजपत्रक स्थायी समितीपुढे सादर केले आहे. या अंदाजपत्रकाचे अवलोकन करणे आवश्यक आहे त्यामुळे सद्यस्थितीत सदर सभा तहकूब करण्यांस सर्व सदस्यांच्या सहमतीने मान्यता देण्यांत येत आहे. लवकरच तहकूब सभेचे आयोजन करण्यांत येईल.

**सही/-x x x**
**(शितल मोहन नवले)**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

**धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह, धुळे**
**बुधवार दिनांक २३/०३/२०२२**
**वेळ सकाळी ११-०० वाजतां**

धुळे महानगरपालिकेची ऑनलाईन अर्थसंकल्पीय विशेष स्थायी समितीची सभा क्रं. ४ तहकूब करण्यांत आलेली सभा आज बुधवार दिनांक २३/०३/२०२२ रोजी सकाळी ११-०० वाजतां श्री. शितल मोहन नवले, सभापती, स्थायी समिती , मनपा धुळे यांच्या अध्यक्षतेखाली **धुळे मनपा भारतरत्नअटलबिहारी वाजपेयी सभागृह** भरली. या ऑन लाईन सभेस खालील सन्मा.सदस्य हजर होते.

| अ.क्रं. | सदस्यांचे नांव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. नवले शितल मोहन | सभापती |
| २ | श्री. जाधव संजय सुधाकर | सदस्य |
| ३ | श्री. बोरसे नागसेन दामोदर | सदस्य |
| ४ | श्री. जाधव बान्सीलाल माणिक | सदस्या |
| ५ | श्रीमती चौधरी मंगल अर्जुन | सदस्या |
| ६ | श्री. अन्सारी फातमा नुरुल अमीन | सदस्या |
| ७ | श्री. चौधरी नरेंद्र रुपला | सदस्य |
| ८ | श्रीमती चौधरी प्रतिभा शिवाजीराव | सदस्या |
| ९ | श्री.अहिरराव किरण हरिचंद्र | सदस्य |
| १० | श्री. रेलन हर्षकुमार राधेश्याम | सदस्य |
| ११ | श्रीमती अग्रवाल सारिका प्रवीन | सदस्या |
| १२ | श्री. अन्सारी अब्दुल लतीफ अब्दुल हमीद | सदस्य |
| १३ | श्रीमती पठाण नाजियाबानो नासिर खा | सदस्या |

उपस्थित अधिकारी गण

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. देविदास टेकाळे | आयुक्त |
| २ | श्री. नितीन कापडनीस | अति. आयुक्त |
| ३ | श्रीमती पल्लवी शिरसाठ | सहा. आयुक्त |
| ४ | श्री. एन.प. सोनार | सहा. आयुक्त |
| ५ | श्री मनोज अरविंद वाघ | नगरसचिव |
| ६ | श्री. के. एन. शिंदे | अभियंता |
| ७ | श्री. बी.एस. रनाळकर | प्र.मुख्य लेखाधिकारी तथासहा. कर मूल्य निर्धारण अधिकारी |
| ८ | श्री. चंद्रकांत जाधव | सहा.आरोग्याधिकारी |
| ९ | श्री. विकास साळवे | स्वच्छता निरीक्षक मलेरिया |
| १० | श्री. चंद्रकांत मोरे | लेखापाल |
| ११ | श्री. किशोर सुडके | परवाना अधिक्षक तथा बाजार विभाग प्रमुख |
| १२ | श्री. एन.के. बागुल | विद्युत अभियंता |

| | | |
|---|---|---|
| १३ | श्री.राजेश गायकवाड | व.लि. मनपा शि.मं. |
| १४ | श्री. पी.डी. चव्हाण | ओव्हरसिअर बां.वि. |
| १५ | श्री.हेमंत पावटे | ओव्हरसिअर बां.वि. |
| १६ | श्री. राजू माईनकर | भांडारपाल |
| १७ | श्रीमती कल्पना जाधव | अभिलेखापाल |
| १८ | श्री.प्रसाद जाधव | अतिक्रमण विभाग |
| १९ | श्री.तुषार ढाके | सहा. अग्नीशमन अधिकारी |
| २० | श्री. सुक्राम राऊत | वाहन विभाग |

मा. सभापती — सन्मा.सदस्य मा.आयुक्त सो. सर्व अधिकारी कर्मचारी व पत्रकार, छायाचित्रकर बांधव यांचे मी स्थायी समितीच्या बैठकीत स्वागत करतो. सभेचा कोरम पुर्ण झाला असुन नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरु करावे.

म.नगरसचिव — वंदे मारतमसाठी सर्वानी उभे रहावे .

विषय क्रमांक:-११ — मा.आयुक्त सो. धुळे महानगरपालिका धुळे यांचे कडील जा.क्रं.धुमपा/लेखा/२५३ दि. २५/२/२०२२ रोजीच्या पत्रानुसार सन २०२१-२२ चे सुधारीत व सन २०२२-२३ चे मुळ अंदाजपत्रक सादर करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. सभापती सो. — महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ९६ नुसार सन २०२२-२३ चे मुळ अंदाजपत्रक आज मी सादर करीत आहे.

आदिमाया आदिशक्ती खान्देश कुलस्वामिनी श्री. आई एकविरा मातेचे मंदिर पांझरा नदीच्या किनाऱ्यावर वसलेले आहे. साडेतीन शक्तीपीठांपैकी एक असलेल्या आदिशक्तीची ही भुमी अनेक धार्मिक स्थळांमुळे पावन भुमी मानली जात असुन या शहराचा इतिहासही खुप मोठा आहे. जयपुर व चंदिगड प्रमाणे कॅप्टन ब्रिग्ज या जिल्हाधिकाऱ्यांनी रचनाबध्द शहर म्हणुन विकसीत केलेले आहे. तथापि शहर जरी रचनाबध्द असले तरी शहरातील नागरी सुविधांचा अभाव पाहता विकासाची दिशा योग्य रितीने राखण्यासाठी शहर कमी पडले आहे ही वस्तुस्थिती आहे. त्यातच शहरालगतची व विकास अत्यंत मर्यादित असलेली १० गावे ५ जानेवारी २०१८ रोजी शहरात समाविष्ट होवुन हदद् वाढ झाल्याने शहराच्या विकासाला आणखी मर्यादा आलेल्या आहेत. मुलत: हे ४६.४६ चौरस किलामिटर असलेले शहर १०१.०८ चौरस किलोमिटर झालेले आहे.

शहरातील बेरोजगारी, महानगरपालिकेकडे मर्यादित उत्पन्नाचे स्त्रोत आणि उत्पन्न वाढीस पडणाऱ्या मर्यादा मनपाकडेस असलेले अपुरे मनुष्यबळ,तांत्रिक कर्मचाऱ्यांची कमतरता यामुळे अनेक विकास कामे करण्यासाठी अडचणी निर्माण होतात. तरी सुयोग्य नियोजन करुन सर्व शासकीय योजना मार्गी लावण्यासाठी व लोकांना नागरी सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी या वर्षी खास करुन प्रयत्न करण्यात येणार आहे.

दरवर्षी महानगरपालिकेचा जमा व खर्चाचा अंदाज प्रथम आयुक्तांमार्फत स्थायी समितीसमोर व नंतर महानगरपालिका सभेपुढे सादर करुन मंजर केला जातो. अर्थसंकल्पीय अंदाज हा वस्तुनिष्ठ असावा व त्यानुसार शाश्वत विकास साधला जावा ही प्रामाणिक अपेक्षा असणे अभिप्रेत आहे.

वास्तवीक पाहता महानगरपालिकेकडे अनेक ठेकेदारांची देयके प्रलंबीत असुन आर्थिक दुरावस्थेमुळे या रक्कम वेळच्या वेळी देण्यात महानगरपालिकेला अपयश आलेले

आहे. त्यामुळे गैरवाजवी तरतुदी होवु नये किंवा गैरवाजवी खर्चाचा अंदाजही अंदाजपत्रकात असु नये यासाठी वस्तुनिष्ठ अंदाजपत्रक तयार करणे ही काळाची गरज आहे.

महानगरपालिकेच्या उत्पन्नासाठी एकत्रित मालमत्ता कर, दुकानभाडे, विकासशुल्क, पाणीपटटी इ. महत्वाची उत्पन्नाची साधने आहेत. वास्तविक पाहता यात वाढ करुन उत्पन्न वाढविण्यासाठी उपाय योजना करणे प्रस्तावित केले जाते. तथापी कोरोनाची परिस्थिती या शहराची आर्थिक स्थिती व जीवनमान याचा विचार करुन या वर्षीही आपण धुळेकर नागरीकांवर कोणतीही करवाढ लादलेली नाही.

मात्र उत्पन्न वाढीसाठी आकारणी न झालेल्या मिळकतींना संकलीत कराची आकारणी करणे, दुकान गाळे भाडे पटटयामध्ये सुसुत्रीकरण करणे व वसुलीची प्रक्रिया सुलभ करणे याबाबींकडे आगामी वर्षात लक्ष केंद्रीत करणे गरजेचे आहे.

धुळेकर नागरीकांना सद्यस्थितीत मोठया विकासाची अपेक्षा नाही. परंतु पथदिवे, स्वच्छता, पाणी पुरवठा, रस्ते व गटारी यासारख्या मुलभुत सेवा सुविधा सक्षमतेने पुरविणे हे प्रथम महानगरपालिकेचे प्राथमिक कर्तव्य आहे. आणि यासाठीच आम्ही खालील योजनांवर पदभार घेतल्यापासुन लक्ष केंद्रीत केलेले आहे.

१)अक्कलपाडा पाणी पुरवठा योजना

२)भुमिगत गटार योजना

३)घनकचरा व्यवस्थापन

४)राज्य स्तरीय नगरोत्थान रु. १०० कोटी प्रस्ताव

५)सोलर प्रकल्प

तसेच प्रभागातील नागरीकांना व नगरसेवकांना मुलभुत सेवा सुविधांच्या अडचणींना सामोरे जावे लागते. यासाठी मनपाची आर्थिक स्थिती लक्षात घेता सद्यस्थितीत प्रत्येकी रु.१५ लक्ष नगरसेवक निधी प्रस्तावित करण्यात आलेला आहे.

शहराच्या विकासाच्या दृष्टीने खालील तरतुदी स्थायी समितीमार्फत सुचविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | रक्कम |
|---|---|---|
| १ | धुळे शहर पाणी पुरवठा योजनेचा हॅड्रोलिक मॉडेल तयार करणे व वितरण झोनचे काम करणे | ५ लक्ष |
| २ | सुकवद पा. पु. केंद्र येथील सब स्टेशन नुतनीकरण व दुरुस्ती करणे | २ कोटी |
| ३ | बाभळे पा. पु. केंद्र येथील सब स्टेशन नुतनीकरण व दुरुस्ती करणे | २ कोटी |
| ४ | वलवाडी जलशुध्दीकरण केंद्र येथील पंपसेट बदलुन २० व्ही. टी. पंप बसविणे | २० लक्ष |
| ५ | पांझरा वॉटर वर्क्स व बडगुजर जलकुंभाकरीता स्टँडबाय ट्रान्सफार्मर २५० के. व्ही. ए नविन घेणे | ५ लक्ष |
| ६ | डेडरगाव जलशुध्दीकरण केंद्र येथील वॉश वॉटर पंप नविन बसविणे व पॅनल बदलणे | १ लक्ष |
| ७ | सुकवद पा. पु. केंद्र येथील पंपसेट क्र. २,३,४ चे स्वी व्हॉल्व बसविणे | ५ लक्ष |
| ८ | बाभळे पा.पु. केंद्र सम टैंकचे गनेटीगकरण करणे व लिकेजेस बंद करणे | १० लक्ष |
| ९ | कुमारनगर, रामनगर येथील ६० एचपी दोन पंपसेट नविन घेणे | २५ लक्ष |
| १० | नविन वसाहतींसाठी पाईपलाईन टाकणे | २ कोटी |
| ११ | नगरसेवक निधी (प्रत्येकी) | १५ लक्ष |

| | | |
|---|---|---|
| १२ | देवपुर भागातील रस्ते दुरुस्ती व नुतनीकरणासाठी | १० कोटी |
| १३ | नवीन शहर हदद् वाढ गावांसाठी | ५ कोटी |
| १४ | नविन दवाखाने तयार करणे | १ कोटी |
| १५ | ज्येष्ठ नागरीकांसाठी सभागृह बांधणे | १ कोटी |
| १६ | नाना नानी पार्क तयार करणे | २ कोटी |
| १७ | छत्रपती शिवाजी महाराज पूर्णाकृती पुतळा चबुतरा सुशोभिकरणासाठी | १ कोटी |
| १८ | रमाबाई आंबेडकर चबुतरा व सुशोभिकरण करणे | २० लाख |
| १९ | छत्रपती शाहु महाराज चबुतरा व सुशोभिकरण करणे | ३५ लाख |
| २० | वीर एकलव्य चबुतरा व सुशोभिकरण करणे | २० लाख |
| २१ | जेलरोड येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा दुरुस्ती व सुशोभिकरण करणे | २० लाख |
| २२ | देवपुर वगळता इतर शहरी भागातील सोयी सुविधांसाठी | ८ कोटी |
| २३ | क्रिडा व कला सांस्कृतिक कार्यक्रम | ५० लाख |
| २४ | स्वागत कमान तयार करणे | ७५ लाख |
| | **एकुण** | **४८.९१** |

त्याप्रमाणे सुमारे रक्कम रु. ४८.९१ कोटीच्या तरतुदी सुचविण्यात येत आहे.

**उत्पन्नाच्या बाबी**

धुळे महानगरपालिकेची आर्थिक स्थिती लक्षात घेता उत्पन्नाचे स्त्रोतही बळकट व सक्षम बनविणे आवश्यक आहे. यामध्ये खालील बाबींवर प्रभावीपणे अंमलबजावणी केल्यास महानगरपालिकेच्या उत्पन्नात भरीव वाढ होवु शकते.

१) धुळे मनपा हद्दीतील मालमत्तांचे जीएसआय मॅपिंग करुन कर आकारणी करणे यामध्ये शासनाने मनपा स्तरावर जीएसआय मॅपिंग करण्यासंदर्भात आवश्यक ती कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे. याची अंमलबजावणी व कार्यवाही तातडीने झाल्यास या आर्थिक वर्षाच्या अखेरपर्यंत मनपाच्या उत्पन्नात भरीव वाढ होणार आहे. तसेच मनपाकडे उपलब्ध असलेल्या माहिती व सर्वेक्षणाच्या आधारे नविन व वाढीव बांधकाम झालेल्या मालमत्तांना तातडीने कर आकारणी प्रक्रियेमुळे उत्पन्नात वाढ होवु शकते.

२) महानगरपालिकेमार्फत धुळे शहरातील मनपा मालकीच्या व्यापारी संकुलांना अवास्तव भाडे आकारणी व अनामत निश्चीत केल्यामुळे सद्यस्थितीत सदर उत्पन्नावर फार मोठया प्रमाणावर विपरीत परिणाम झालेला आहे. तसेच सदर व्यापारी संकुलातील ४० ते ५० टक्के व्यापारी गाळे परस्पर हस्तांतरण करण्यात आलेले आहेत. त्यापासुन मिळणारे हस्तांतरण फीचे उत्पन्नही महानगरपालिकेस प्राप्त झालेले नाही. यामध्ये समन्वयाने निर्णय होवुन भाडे व अनामत तसेच हस्तांतरण फी निश्चीत झाल्यास यामधुनही मोठया प्रमाणावर उत्पन्न महानगरपालिकेस प्राप्त होणार आहे.

३) मनपामार्फत शहरात कायमस्वरुपी व तात्पुरत्या स्वरुपात लावण्यात येणाऱ्या जाहिरात होर्डीग व बॅनर वरील कर आकारणीची वसुली सक्षमतेने होत नसल्याने या उत्पन्नावरही मोठया प्रमाणावर परिणाम होत आहे. तसेच मनपा मालकीच्या इमारतीवर असलेल्या मोकळया जागेत इलेक्ट्रानिक होल्डींग्स व डिजीटल जाहिराती बसवून त्यावर कर आकारणी केल्यास मोठया प्रमाणावर फायदा होणार आहे. यासाठी खाजगी ठेकेदार निश्चीत करुन कर वसुलीची कार्यवाही देखील सुरु आहे. यामुळे उत्पन्नातही मोठया प्रमाणात वाढ होणार आहे.

४)बीओटी तत्वावरील व्यापारी संकुल बांधकाम करणे :- मनपाच्या मोकळया जागेवर बीओटी तत्वावर व्यापारी संकुल उभारणीतुन मोठया प्रमाणावर उत्पन्नात वाढ होवु शकते.

५) मनपा मालकीचे टॉवर उभारणे सुरत व इतर मोठया शहराच्या धर्तीवर शहरात मनपा मालकीचे मोबाईल टॉवर उभारुन ते भाडेपट्टयावर दिल्यास उत्पन्नात वाढ होणार आहे.

**सिर्फ हंगामा खडा करना**
**मेरा मकसद नही,**
**मेरी कोशिश है कि ये**
**सुरत बदलनी चाहिए**

या सर्व बाबींसाठी नगरसेवक व पदाधिकारी यांचे सहकार्य तसेच अधिकारी कर्मचाऱ्यांची मानसिकता गरजेची आहे. या शहराला विकासाकडे नेण्यासाठी यापुर्वीही शहरातील नागरीकांनी सहकार्य केलेले आहे. त्याचबरोबर शहरातील सामाजिक, सांस्कृतिक सेवाभावी संस्थांचेही योगदान राहिलेले आहे. तसेच मनपाच्या विधायक कामांना नागरीकांसमोर नेण्याचे काम सर्व प्रसारमाध्यमांनी करुन आमचा उत्साह वाढवलेला आहे. या सर्वांचे मी यानिमीत्ताने आभार व्यक्त करतो.

म.संजय जाधव — आपण जी मांडणी केली मनाला बरे वाटले. चांगले उद्दीष्ट दर्शविले आहे. परमेश्वर त्या उदिष्टांना बळ देवो. २० वर्षातून ५ वेळा अर्थसंकल्प माझ्या हातून गेला आहे. ७००-८०० कोटीचे बजेट सादर करतो. आज आपण ५८६ कोटीचा बजेट सादर केला आहे. गेल्या ८ वर्षापासून धुळे मनपाच्या हजारो कोटीच्या मालमत्ता आहे. ज्या इतर संस्था व व्यक्तीच्या ताब्यात गेल्या आहे. या जागांतून धुळे मनपाला करोडो रुपयांचे उत्पन्न प्राप्त होणार आहे. या विषयावर गांभिर्याने लक्ष घालावे. मी सभापती असतांना बऱ्याचशा संस्थाना नोटीसा बजावल्या होत्या. काही लोकांनी नोटीसा घेतल्या काही लोकांनी नोटीसा स्विकारल्या नाही. प्रशासन त्या जागेवर थांबून गेले. आपण त्या जागा ताब्यात कधी घेणार? दुसरा विषय आहे, हद्दवाढ गावातील भूखंडांबाबत समतीती स्थापन केली. आयुक्त सो. ना बोललो होतो यावर गांभिर्याने लक्ष देण्याची गरज आहे. लवकरात लवकर भूखंडांचा पर्दाफाश करावा. भूखंडासाठी लॅण्ड ऑडीट करण्यात यावे. यासाठी स्वतंत्र तरतूद आपण मंजूर करावी. लॅण्ड ऑडीट झाले तर एक-एक भूखंड शोधून काढता येणार आहे. इतकी लाचार परिस्थिती आहे की, निधी नसतो पण आपण कामे मंजूर करुन घेतो. ठेकेदार बिलांसाठी ताटकळतात. दुसऱ्यांदा कामाचा ठेका निघाला तर ठेकेदार टेंडर भरत नाही. नियोजन होणे गरजेचे आहे.या महापालिकेला श्रीमंत महानगरपालिका बनवू शकतो. ज्या नोटीसा बजावल्या आता धुळे मनपाच्या मालमत्ता त्या जागा ताब्यात घेणार आहोत इस्टेट मॅनेजर नारायण सोनार यांनी याबद्दल सभागृहाला माहिती दयावी.

म.सभापती — तो विषय खूप मोठा आहे त्या विषयावर स्वतंत्र बैठक लावू. मागच्या आठवडयात टाऊन प्लॅनींगची पण बैठक घेतली आपल्याला ॲमिनिटीज प्लेस ज्या असतात लेआऊट करतांना त्या ताब्यात घेता येणार आहे. हा अधिकार आपल्याकडे आहे. तुम्ही जे सांगता आहे ते ॲमिनिटीज प्लेस मध्ये बसते. ते निश्चीत आपण करु. नारायण सोनारांना सांगातो नोटीसा किती बजावल्या तेवढे सांगा.

म.नारायण सोनार — १७४ लोकांना नोटीसा काढल्या होत्या. त्यापैकी १०० लोकांनी नोटीसा घेतल्या ७४ लोकांनी स्विकारल्या नाहीत.

म.सभापती ७४ लोकांनी नोटीसा घेतल्या नसतील तर कायदेशिररित्या त्यांच्या घरांवर चिकटवून या. स्वतंत्र बैठक लावतोय तुमचा डाटा तयार ठेवा. तुमचे अभिनंदन करतो तुम्ही डॉग व्हॅनसाठी प्रयत्न केले ते सफल झाले.

म.संजय जाधव धुळे मनपाच्या जागा आहेत त्या धुळे मनपाला सुध्दा माहित नाही. स्वतंत्र बैठक नक्की लावा. जागांचा शोध घेणे हे सुध्दा अपेक्षित आहे.

म.सभापती याची नोंद घेण्यात आली आहे. जे हद्दवाढचे भूखंड आहेत त्याचा सर्वे होऊन गेला आहे.

म.हर्षकुमार रेलन आज मी धुळे शहरात झालेल्या दु:खद घटनेबद्दल बोलणार आहे. पाचकंदील च्या शंकर मार्केट भागात काल ११.३० च्या सुमारास आग लागली होती. आग लागली ही दुर्घटना असू शकते. मात्र त्याच्याशी दोन हात करतांना दूर्घटनेवर फायर फायटर यंत्रणा होती त्यांची दयनीय अवस्था होती.अगोदर म.जिल्हाधिकारी,म.आयुक्त,हे स्वत:तेथे थांबून होते.सभापती, म.महापौर , उपमहापौर त्यानंतर आपले पुष्कळसे नगरसेवक काम करत होते. ज्यांनी ज्यांनी मदतकार्य केले त्या सर्वांचे बहावलपूरी समाजातर्फे अभिनंदन करतो. ही घटना घडली म. महापौर सो. नी शिरपूर,दोंडाईचा, साक्री, मालेगांव सर्व ठिकाणी फोन करुन बंब बोलवले. ते बंब आले दीड वाजता व आग लागली होती याआधी आपले बंब वेळेवर येऊन गेले होते. मात्र मला फार दु:खाने सांगावे लागते की, जी दुर्घटना घडली आपण साक्षीदार आहोत या गोष्टीचे. आपण फक्त बाहेरुन पाणी मारत होतो.आपल्या कर्मचाऱ्यांकडे पर्सनल इक्वीपमेंट नव्हते. त्यांच्याकडे गणवेश नव्हता.गर्दीत हे सुध्दा शोधता येत नव्हते की, नागरीक कोण व कर्मचारी कोण? त्यांच्याकडे हेलमेट नव्हते, फायरप्रुफ हॅण्डग्लोज नव्हते, बुट नव्हते त्यांच्याकडे साधे कटरसुध्दा नव्हते. कुठल्याही साहित्याशिवाय ही यंत्रणा काम करत होती. आपले अग्निशमन अधिकारी ढाके सो. होते ते आग लागली तेव्हा थरथर कापत होते. फायर फायटर अधिकाऱ्यांचे मनोबल कसे असायला हवे त्यावेळेला? ९ महिन्यापूर्वी तेथे आग लागली होती तेव्हापण असे कळले सेफटी साहित्या त्यांच्याकडे नव्हते. आज बजेट मीटींग आहे. १८-१९,१९-२०,२०-२१,२१-२२ या चारही वर्षांच्या बजेटमध्ये सेफटी इक्वीपमेंटची तरतूद नाही. ते आग विझवतील कसे ? आग लागली हे दुर्दैव असेल एक समाज पूर्णपणे बेचिराख झालेला आहे. ७० परिवार यांचे नुकसान झाले आहे. आज त्यांच्याकडे भांडवल नाही आहे. पण आपण एक चूक वारंवार करतो आहोत. एक रुपयांची इक्वीपमेंट ची मागणी केली नाही आग कुठेही लागू शकते. बाहेरचे बंब आले त्यांच्याकडे संपूर्ण साहित्य होते. फायर ऑफिसर आले त्यांचे मनोबल स्ट्रॉंग होते. माझ्या दोन तीन मागण्या आहेत. आपल्याकडे एक मागणी अशी की, मार्केट चा करारनामा संपला आहे. लोकं कोर्टात गेले आहे. त्यांना १० वर्षाकरीता मुदतवाढ दयावी. दुसरे असे की, २५ लाखाची बजेटमध्ये तरतूद करावी. फायर सिस्टीम बसवावी. मनपाच्या मालकीची जागा आहे तेथे ओटे व रस्ते बनवून घ्यावे. लाईट व्यवस्था करुन दयावी. आपण शास्तीच्या नोटीसा दिल्या आहे. कोरोनाचे दोन वर्ष गेले. व्यापार ठप्प झाला. त्यात आग लागली सर्व पैसे संपले. स्टॉक जळाला. त्यानंतर परत आग लागली स्टॉक जळाला. रमजान चा महिना असतो गर्दी असते. लोकांनी स्टॉक भरला होता स्टॉक काढता सुध्दा आला नाही. त्यांना शास्ती व घरपट्रटीच्या नोटीसा दिलेल्या त्यांची घरपट्टी २०२२-२३ पर्यंत संपूर्णपणे माफ करावी. या तीन मागण्या माणुकीच्या दृष्टीकोनातून मान्य कराव्या अशी अपेक्षा आहे.

म.सभापती सन्मा. सदस्यांना सांगू इच्छितो मागची महासभा झाली. त्यात आपत्ती व्यवस्थापनाचे साहित्य जिल्हा नियोजन मधून शासनाकडून मिळणार आहे.अग्निशामनचे साहित्य शासनाकडून आपल्याला मिळणार आहेत. कालच त्यातला एक भाग म्हणून नविन अग्निशामक बंब काल मिळाला.काल तो ओपनिंग साठी आलेला होता तोच बंब आपण तिकडे पाठवला. आपण सर्व

तिथेच होतो. परंतु दाट वस्ती होती. आपण जे जे.सी.बी. देखील मागवला होता. कोणीतरी तिथे आत घुसले पाहिजे म्हणून. आता या बजेटमध्ये १ कोटी ३५ लाखाची तरतूद केली आहे . महासभेत मंजूर झाल्यानंतर फायर फायटींग तज्ञां बरोबर मिटींग घेऊन जे काही आवश्यक आहेत त्याचया खरेदी ऑर्डर दिल्या जातील. आपण ज्या ३-४ गोष्टी सांगीतल्या व आपण त्यांच्या दु:खात सहभागी आहोत. आपण एक संयुक्त बैठक घेऊ. त्यातून मार्ग काढू.

म.नागसेन बोरसे आयुक्त सो. गेल्या बजेटच्या वेळेस पण विरोध केला होता.२१-२२ चा अर्थसंकल्प मंजूर आहे का? याअर्थसंकल्पात तफावत होती. माझ्याकडे पुरावे आले या सभागृहाचे जेवढे सी. सी. टी.व्ही. कॅमेरे यांचे पुरावे माझ्याकडे आहे. त्यामुळे जे पण उत्तर दयाल ते व्यवस्थीत कायदयात बसवून दया ही विनंती करतो. मनपाची प्रलंबीत देयके किती कोटीची आहे? प्रलंबीत देयकाची विगतवारी झाली का विभागानुसार? या अर्थसंकल्पात दायीत्व आपण स्विकारणार आहे का ? विकासशुल्क अंतर्गत घेण्यात आलेल्या कामांचे क्र. ९ प्रशासकीय मंजूरी ची ताळमेळ सुरु आहे क्र. ८ प्रस्तावित कामे स्पील ओव्हरला घेता येता का? जर २१-२२ चा अर्थ संकल्प मंजूर नाही मग हया कामांची प्रशासनाने काय कार्यवाही केली ? स्पील ओव्हरची यादी ए,बी,सी,डी, डी१ ची देयकं किती ? २०१६ ते मार्च २०२० पर्यंत एकूण देयके किती याची माहिती दयावी. यानंतर मी एक पत्र देतो आहे. इतिवृत्तात नोंद घ्यावी.

मा. स्थायी समितीचे दि.२८/२/२०२२ चे सभेत प्रशासनाकडुन २०२२-२३ चा मुळ अर्थसंकल्प व सन २०२१-२२ चा सुधारीत अर्थसंकल्प सादर करण्यात आलेला होता. सदर विषय तहकुब झाल्याने त्यावर पुढील कार्यवाही दि.२३/३/२०२२ रोजी प्रशासनाने प्रस्तावित केलेले आहे. याविषयी मी खालील प्रमाणे काही प्रश्न प्रशासनाला विचारुन त्यांचे लक्ष माझे संपुर्ण अभ्यासाअंती वेधत असुन आपण त्याकडे गांभीर्याने पहावे ही विनंती करतो.

सदर अर्थसंकल्प हा विधीग्राहय प्रध्दतीने सभेपुढे आलेला नाही असे माझे स्पष्ट मत खालील प्रमाणे नोंदवित आहे.

१)सन २०२१-२२ चा मुळ अर्थसंकल्प आज अखेरीस मा. महासभेच्या मान्यतेशिवाय प्रलंबीत असतांना व तो विधीग्राहय झालेला नसतांना सुधारीत अर्थसंकल्प प्रशासनाने कोणत्या विधीवत कलम कायद्याने व नियमाने प्रशासनाने सभेपुढे ठेवलेला आहे, हे समजुन येत नाही. ही कार्यवाही पुर्णपणे बेकायदेशीर असल्याचे माझे पुर्णपणे ठाम मत झाले असुन याची सखोल चौकशी शासनाकडील वित्त विभागातील तज्ञ अधिकारीव कर्मचारी जे या जिल्हयात विविध विभागांमध्ये अधिकारी म्हणुन कार्यरत आहेत. अशा कोणत्याही अधिकारी अथवा कर्मचारी यांचयाकडुन तपासुन कायदेशीर मान्यता निश्चीत करणे आवश्यक आहे.

२) सन २०२२-२३ करीता उत्पन्न व खर्चाचा नमुद केलेला लेखाशिर्षक निहाय आकडेवारी ही त्या त्या विभागाच्या विभागप्रमुखांनी विशिष्ट नमुन्यात लेखी मान्यता घेवुन लेखा विभागात संकलीत करुन घेतलेली दिसुन येत नाही. वास्तविक पाहता अर्थसंकल्प तयार करण्याची कार्यपध्दती शासनाने निश्चित केलेली आहे. त्याकडे प्रशासनाने जाणिवपुर्वक हेतुपुरस्कर पुर्णपणे दुर्लक्ष केले असुन यामुळे नमुद आकडेवारी ही कोणत्याही प्रकारची शाश्वत किंवा विश्वासार्ह वाटत नाही.

३) सन २०२१-२२ चा अर्थसंकल्प अस्तित्वात आलेला नसतांना किंवा महासभेने तो मंजुर केलेला नसतांना अशावेळी प्रशासनाने सदर कालावधी फक्त प्रशासनाने मंजुर केलेला अर्थसंकल्पातील लेखाशिर्ष व रक्कमेच्या मर्यादेतच त्या आर्थिक वर्षात खर्च करणे अपेक्षीत होते मात्र तसे न करता कोणतेही नियम अधिनियम यांची संपुर्ण खात्री न करता प्रत्यक्ष त्याची पायमल्ली करुन विधि व संविधानाच्या विपरीत सदर कालावधीत कार्यवाही केल्याचे दिसुन

आले आहे. या संपुर्ण कार्यवाहीची सखोल फौजदारी चौकशीची कार्यवाही करुन सत्यता समोर आणणे आवश्यक झालेले आहे. कारण जादा खर्च किंवा वाढीव खर्चाचा अर्थसंकल्प महासभा मंजुर करेल असा अति विश्वास प्रशासनाने गृहीत धरुन आपली मनमानी करुन जनतेच्या पैशाचे सरळ सरळ उधळण करुन गैरवापर हा स्वत:च्या हितासाठी केल्याचे स्पष्ट दिसत आहे.

४)सुधारीत व मुळ अर्थसंकल्प सन २०२१-२२ मंजुर नसतांना प्रशसनाने स्थायी समितीच्या सभेपुढे या कालावधीचे वार्शिक लेखे व पुर्ननियोजन याची कार्यवाही मान्यतेसाठी बेकायदेशीरपणे स्थायी समितीपुढे ठेवुन जाणीवपुर्वक हेतुपुरस्कर सगळीकडुन त्यास मंजुर करुन घेतले आहे. जर अर्थसंकल्प वैधानिकदृष्टया अस्तित्वातच आलेला नाही तर त्या कालावधीचा वार्षिक लेखा व पुर्ननियोजन लेखी स्थायी समिती कसे मंजुर करु शकते. याला कोणताही वैधानिक आधार आहे हे तज्ञ व्यक्तींकडुन तपासुन जनतेपुढे येणे आवश्यक आहे.

५)प्रशासनाने अर्थसंकल्पात स्पिल ओव्हरचा अर्थही स्वत:च्या फायद्यासाठी अधोरेखीत केल्याचे आपल्या निदर्शनास आणुन देत आहे. कायद्याने स्पिल ओव्हर म्हणजे फक्त ज्या कामांना वैधानिक मान्यता झालेली होती परंतु अशी कामे त्या आर्थिक वर्षात तरतुद असतांनाही पुर्ण करण्यात आलेली नाही. ज्या कामांचे कार्यादेश झालेले आहेत अशीच कामे व त्यांच्या तरतुदी या पुढील अर्थसंकल्पात स्पिल ओव्हर म्हणुन प्रशासनाकडुन अधोरेखीत करणे आवश्यक आहे. मात्र तशी कार्यवाही न करता प्रशसनाने स्पिल ओव्हरमध्ये अशी कामे नमुद केलेली आहेत की जी फक्त प्रस्तावित झालेली आहेत. (कृपया अर्थसंकल्पातील अभियंता यांचे पत्र क्र. ५१७ दि.२७/१०/२०२१ मधील अनुक्रमांक ९ ते १८ वर नमुद केलेली कामे पहावी ही कामे फक्त प्रस्तावित आहेत.)

हिच कामे सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पाकरीता स्पिल ओव्हर कशी ठरविण्यात आलेली आहेत. याउपर जर त्या कालावधीचा अर्थसंकल्प अस्तित्वात नाहीत तर ही कामे अस्तीत्वात कायम कशी झाली हे गौडबंगाल आहे की ठरवुन केलेली गुन्हेगारी हे तपासणे आवश्यक असेल. त्याप्रमाणे अर्थसंकल्पातील ABCD प्रमाणे नमुद केलेल्या यादीतील कामांची स्पिल ओव्हरची यादी जवळपास ७५ ते ८० कोटीची दर्शविण्यात आलेली आहेत. वास्तविक ही कामे ज्या ज्या आर्थिक वर्षात मंजुर झाली तेव्हा त्याची तरतुद उपलब्ध होती. असे असतांना त्या त्या आर्थिक वर्षात या कामांच्या तरतुदीतुन प्रत्यक्षात खर्च करतांना इतर कामांसाठी वापरले गेले आहेत.हे १०० टक्के सत्य प्रशासनाने स्विकारावे व आपली जबाबदारी स्विकारुन किंवा त्याची सखोल चौकशी करुन सभेला लेखी पुरव्यानिशी अवगत करावे.असे माझे खुले आव्हान असुन स्पिल ओव्हरमध्ये कोणती कामे येतात हे प्रशासनाला पुर्णपणे ठाऊक असुनही आता ही कामे नियमबाहयपणे स्पिल ओव्हरमध्ये दर्शवुन भ्रष्टाचाराचा कळस केल्याचे स्पष्ट झालेले आहे.

तरी सदरचा अर्थसंकल्प व त्यात नमुद तरतुदी विशेषत: सन २०२१-२२ च्या अर्थसंकल्प प्रथम महासभेत मंजुर झाला याची खात्री सभेला करुन द्यावी आणि तो जर मंजुर झाला नसेल तर सुधारीत अर्थसंकल्प मंजुर करणे योग्य व वैधानिक ठरत नाही. त्याचप्रमाणे ते वास्तवाशी मेळ घेणारे होणार नाही.

यामुळे अर्थसंकल्प हा वित्त किंवा त्यातील तज्ञ शासकीय यंत्रणेकडुन प्रशासनाने तपासुन तो विधिवत असल्याची प्रथम स्वत: खात्री करावी त्यानंतर त्याला वैधानिक मान्यता घेणे योग्य होईल असे माझे स्पष्ट मत असुन प्रशासनाने सादर केलेला अर्थसंकल्प व त्यातील नमुद आकडेवारी दर्शविण्यात आलेली कामे भ्रष्टाचाराची नांदी असल्याने त्याला माझा वैयक्तिक विरोध असुन माझे याविषयी प्रतिकुल असल्याचे आजच्या सभेच्या इतिवृत्तात

स्पष्टपणे नमुद करुन घेवुन माझा मान्यतेला विरोध असुन प्रशसनाकडुन या विषयी भविष्यात होणारी कोणतीही मनमानी किंवा कार्यवाही याबाबत मी योग्य त्या यंत्रणेपुढे न्याय मागणी व फौजदारी कारवाई करणार असल्याचे याव्दारे आपणास स्पष्ट निर्दशनास आणुन देत आहे. या विषयास माझा विरोध नोंदवून घ्यावा.

| | |
|---|---|
| म.सभापती | मी. सन्मा. सदस्यांचे अभिनंदन करतो. खूप अभ्यासपूर्ण मुद्दे उपस्थित केले. ज्या कळकळीने मुद्दे उपस्थित केले याची देखील विभागाला नोंद घ्यायला सांगतो. संबंधीत विभागाने नोंद घेवून त्याचे उत्तर सन्मा. सदस्यांना पाठवून दयावे. |
| म.नागसेन बोरसे | तो पर्यंत हा विषय मंजूर करु नये अशी माझी मागणी आहे. |
| म.सभापती | आपण मागणी केली आहे मी त्यावर रुर्लीग दिले आहे. तुमचा विरोध नोंदवला आहे. |
| म.नाजियाबानो पठान | २१-२२ चे तरतूद केली आहे त्यामध्ये नगरसेवकांना मिळालेली रक्कम खूप कमी आहे. स्वच्छते बाबतीत चांगले काम केले त्याबद्दल धन्यवाद.नगरसेवक निधी २० लाखा पर्यंत करावा. नगरोत्थान योजने अंतर्गत आमच्या वार्डात विकासकामे झाली पाहिजे.सगळयांना समान न्याय दयावा. |
| म.सभापती | आपली नोंद घेण्यात आली आहे. |
| म. प्रतिभा चौधरी | बजेटमध्ये दुरुस्तया व सूचना मांडणार आहे. बजेटमध्ये फक्त शासकीय योजनांची माहिती दिली आहे व स्पील ओव्हरमध्ये कामांची माहिती बजेटमध्ये दिलेली आहे. शहराच्या विकासाच्या दृष्टीकोनातून जी विकासकामे कुठेच घेतलेली दिसून येत नाही. प्रस्तावनेत बोललात १० कोटी रुपये याची नोंद केली हे १० कोटी वापरणार आहात शासनाचा जो निधी असतो त्यात नागरीकांची मागणी व गरज या दृष्टीकोनातून वितरीत केला जात असतो. देवपूर भागातल्या नगरसेवकांची मिटींग बोलवा. एक एजन्सी नेमूण कामांचा सर्व्हे करा. कामांनुसार तो निधी वितरित करावा. आणि कामांची जी यादी आहे स्थायी समीतीच्या मिटींगमध्ये सर्व सदस्यांच्या समोर ठेवली जावी. मगच ते कामे पुढे नेण्यात यावे. अशी विनंती आहे. पान नं २३ वर बागबगीचे दुरुस्ती साठी ५ लाखांची तरतूद केली आहे. माझे असे म्हणने आहे की, आज शहरात आधिची अकरा उदयाने आहे आणि अमृत योजनेत १९ झाले आहे. असे एकून ३० उदयाने आहे. जे आहेत ते नागरिकांच्या कर रुपी पैशातून विकसीत केले आहे. तर एकही उदयानाला बागमाळी नाही. २६० कर्मचाऱ्यांची यादी दयावी ते फक्त कागदोपत्री दाखवले आहे. ते प्रत्यक्षात नाही. |
| म.सभापती | अंदाजपत्रकाबद्दल बोला. आपला आकृती बंध मंजूर आहे. जो पर्यंत आपल्या उत्पन्नात वाढ होत नाही तो पर्यंत आपण कोणतेही कर्मचारी नियुक्त करु शकत नाही. |
| म.प्रतिभा चौधरी | बजेट मध्ये तरतूद करा बागमाळींची. दुसरे असे संडास दुरुस्तीसाठी पान नं २४ वर ती रक्कम वाढवण्यात यावी. |
| म. प्रतिभा चौधरी | तसेच पान नं. २९ इंधन विहिर दुरुस्तीसाठी तरतूद केली वाढवण्यात यावी. तसेच नवीन पाईपलाईन टाकण्यासाठी तरतूदीत वाढ करण्यात यावी. बजेट मध्ये दिले आहे. खालील योजने अंतर्गत जी कामाची यादी जोडलेली आहे त्यात असे म्हटले आहे, मागासवर्ग आर्थिक दुर्बल घटक वर्गणी मध्ये घेण्यात आले आहे. दुसरे असे नगर रचना विभागाकडे विकासशुल्क यात कामे घेण्यात आली आहे. प्रि बजेट मध्ये निधी मध्ये काम दिलेले आहे. ते पण समजवून सांगा. सहाय्यक अनुदान मध्ये किती लाखाची तरतूद केली आहे? |
| म.आयुक्त | ५ लाखाची. |

| | |
|---|---|
| म.प्रतिभा चौधरी | पण यात कामे कोटीने दिले आहे. तरतूद लाखांत तर कामे कोटीत. नंतर १४ व्या वित्त आयोगा अंतर्गत कोण कोणती कामे घेण्यात आली? हे सगळे मी लेखी देत आहे. आपण याचे उत्तर दयावे. |
| म.सभापती | संबंधीत विभागाने नोंद घ्यावी व लेखी उत्तर दयावे. |
| म.प्रतिभा चौधरी | नगरोत्थानचा निधी शासनाकडून मिळालेला असतो. त्यामध्ये मनपा फंडातून ३० टक्के नोंद केली जाते. ७० टक्के शासनाकडून आलेला निधी असतो. तो समान वाटप करण्यात यावा. पंचसुत्री विकास करण्यात यावा. |
| म.सभापती | महासभेच्या विषय येथे बोलू नये. ज्यावेळेस महासभेतून ठराव करुन देतो. त्यात कुठले कामे समाविष्ट करायचे, त्यात किती रकमा आहे त्या आपण करुन देतो. त्यानंतर आयुक्त बांधकाम विभागाला इस्टीमेट करायला लावतात. ते इस्टीमेट तयार केलेले प्रस्ताव तिकडे पाठवतात. कामे कुठली घ्यायची किती पैसे दयायचे हा सर्व महासभेचा विषय आहे. |
| म.अभियंता | सदर बैठकीत अमृत योजने अंतर्गत असलेल्याभूमीगत गटार योजनेच्या वाढीव अंदाज पत्रकाबाबत माहिती सादर करावयाची आहे. सदरची योजना आपण म.जि.प्रा.कडे दिलेली आहे. सदर कामाची वर्क ऑर्डर ८ मार्च २०१९ रोजी झाली होती. ६.९९ % जास्त दराने निविदा दिली होती. त्याची कॉस्ट येते १३३.३८ करोड प्रत्यक्ष काम करतांना योजने मध्ये इस्टीमेटला चेंबर, खोदकाम व इतर अनुषांगीक बाबी घेतल्या गेल्या नसल्याने म.जी.प्रा ने रिवाईज अंदाजपत्रक केलेली आहे. योजनेची किंमत १५५.९७ करोड आलेली आहे. त्याप्रमाणे नविन प्रस्तावात सुधारणा करुन सदर योजना शासनाच्या एस.एल.टी.सी. कमीटीकडे मंजूरीच्या अंतिम टप्प्यावर आहे. त्यामुळे सदर योजनेत २४.४३ करोडची वाढ होणार आहे. वाढीचा संपूर्ण खर्च मनपाने करावा.जे काम आपण ६.९९ % जास्त दराने दिले आहे. त्याचा खर्च महापालिकेने करावा असे शासनाने सूचविले आहे. त्यात आपण मनपा तर्फे शासनाला विनंती केली होती की, मनपाची आर्थीक स्थिती लक्षात घेता सध्या अशा प्रकारचा खर्च मनपा मार्फत करणे शक्य नसल्याने शासनाकडून अनुदान मिळावे. अनुदान जरी मिळाले तरी २५% हिस्सा आपल्याला टाकावा लागेल. अनुदान नाही मिळाले तर पूर्ण पैसे टाकावे लागतील त्या शिवाय सदर योजना पूर्ण करता येणार नाही. |
| म.सभापती | हया योजनेला आपण ८ मार्च २०१९ ला वर्क ऑर्डर दिली. आता चालू आहे मार्च २०२२. तीन वर्ष झाले. आपली प्रोजेक्ट कॉस्ट होती १३१ कोटी. आपले कुठलेही टेंडर कॉस्ट ५% पेक्षा जास्त जायला नको. हे आपल्या टेंडरमधले नियम व अटी आहेत. कॉस्ट वाईज व आयटम वाईज २५ % जाऊ शकतो. परंतु कॉस्ट ५% च्या वर जायला नको. हा सगळया टेंडरचा नियम आहे. मूळात कधी या टेंडर ची कॉस्ट वाढणार होती. तर याचे रिवाइज इस्टीमेट त्याच वेळेस का नाही केले? रिवाइज इस्टीमेट त्याच वेळेस सादर न केल्यामुळे आपल्याला या गोष्टींची नोंद करावी. पहीले म.जी.प्रा चे इंजिनिअर,चिफ इंजिनिअर,एक्झिक्युटीव्ह इंजिनिअर यांच्यावर कार्यवाही करावे असे मी प्रशासनाला आदेशित करतो. पैसे आपले होते. योजना आपली होती. मी जे सांगतोय ते कुठेही टेंडर नियमाच्या बाहेर सांगत नाही आहे. यांनी १५ कोटीचे काम आजच एक्सेस करुन ठेवले. तर कुठल्या आधारावर काम करुन घेतले? त्यामुळे याला सर्वस्वी जबाबदार म.जी.प्रा आहे. आणि आयुक्त महोदय, आपण त्या गोष्टी व्हि.सी. वर मांडत नाही. माझी देखील खंत आहे. आपण तांत्रिक गोष्टी वरती कळवायला पाहिजे होत्या. मी म्हणतो यांच्या सर्वांच्या चौकश्या लावल्या पाहिजे. हे ठामपणे व्हि.सी. मध्ये मांडा ठामपणे लेखी कळवून टाका. आमची आर्थीक परीस्थिती नाही. यांच्या चुकीमुळे ही कॉस्ट वाढते आहे. यांच्या विभागामार्फत वसूल करा आमचे प्रोजेक्ट पूर्ण करण्यासाठी. |

| | |
|---|---|
| म.नागसेन बोरसे | ही योजना ही शासनाकडे काय नावाने पाठवली? मल नि:सारण योजना का भूयारी गटार? त्या डी.पी.आर मध्ये त्याच्या नावाची नोंद काय आहे? |
| म.सभापती | तो विषय येईलच पुढे. त्यांनी कॉस्ट वाढवून मागवली ती आपण नामंजूर करतोय. |
| म.किरण अहिरराव | धुळे शहराला रोज १/२ दिवसाआड पाणी पुरवठा व्हावा त्या करीता तुम्ही जो प्रयत्न करत आहात त्या बद्दल अभिनंदन. मागच्या २ ते ३ मिटींगा मध्ये विषय मांडला होता. माझ्या प्रभागात १८ कॉलनी आहे पाईपलाईन नाही तुम्ही त्यांना पाणी कसे देणार? अर्थसंकल्पात २ कोटी तरतूद केली त्याबद्दल आभार मानतो. तुम्ही देवपूर ला १० कोटी दिले. शहरासाठी ८ कोटी दिले. हद्दवाढ गावांना तुटपुंजे ५ कोटी . माझी विनंती तेवढे ही देऊ नका. तुम्ही त्या प्रभागात माझ्यासोबत फिरा. तेव्हा समजेल ३ कोटी दयावे की १५ कोटी दयावे. फक्त बसुन आकडे कमी-जास्त करु नका. ही विनंती. |
| म. हर्षकुमार रेलन | धुळे महानगरपालिकेचे क्षेत्र म्हणून काही निधीची तरतूद करतायेत. शहराकरीता ८ कोटी, देवपूर करीता १० कोटी, हद्दवाढ करीता ५ कोटी माझी अशी विनंती की, साक्री रोडला एक भाग करुन टाका. हे एकत्रित शहर आहे पण वेगवेगळे झोन केलेले आहे. तसेच साक्री रोड विभागाकरीता वेगळी तरतूद करुन घ्या. माझ्या कामांची वर्क ऑर्डर दया. |
| म.सभापती | हा आपण महासभेत विषय घेऊ. सर्व सदस्यांची संमीतीने व त्यांनी केलेल्या सूचनांनूसार मनपाच्या आर्थिक स्थितीचा अंदाज घेवून व प्रशासनाची चर्चा करुन सन २०२२-२३ चे अंदाजपत्रक व २०२२-२३ चे वृक्ष प्राधिकरणाचे अंदाजपत्रक अंतिम करण्यास मान्यता देण्यात येत आहे.सदर अंदाजपत्रका बाबत सन्मा. सदस्य श्री नागसेन बोरसे यांनी लेखी पत्र सादर केले आहे याबाबत लेखा विभागाने पत्रातील संबंधीत मुद्दयांबाबत कायदेशिर अभिप्राय संबंधीतांना अवगत करावे व श्री नागसेन बोरसे यांनी दिलेल्या लेखी पत्रानुसार त्यांचा विरोध नोंदवून सदर अंदाजपत्रकास बहुमताने मान्यता देण्यात येत आहे. |

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ३६ दिनांक २३/०३/२०२२**

धुळे महानगरपालिका प्रशासनाने स्थायी समितीस रु. ५८६ कोटी ९९ लक्ष ४६ हजार चा अर्थसंकल्प सादर केला होता. त्यात स्थायी समितीने उत्पन्नात रु.६३ कोटी ५५ लक्ष वाढ सुचविली आहे व रु.५३ कोटी ७६ लक्षच्या तरतूदी सुचविल्या आहेत. व त्या अनुषंगाने महिला व बालकल्याण, अपंग कल्याण व मागासवर्गीय आर्थिक दुर्बल घटक याबाबी मध्ये नियमाप्रमाणे होणारी वाढ समाविष्ट करण्यांत येत आहे.

यापमाणे उत्पन्न व खर्चाचा ताळमेळ घेवून मे. स्थायी समिती मार्फत खालील प्रमाणे तरतूदी तथा उत्पन्नाच्या बाबी प्रस्तावित करण्यांत येत आहे.

| अ.क्र. | लेखाशिर्षक | प्रशासनाने केलेल्या तरतूदी | मे.स्थायी समितीने सुचविलेल्या शिफारशी | वाढ | घट |
|---|---|---|---|---|---|
| | **जमा बाजू** | | | | |
| १ | बी.ओ.टी. प्रकल्पाचे उत्पन्न | ३५.०० | ५५.०० | २०.०० | |
| २ | विकासशुल्क | ०६.०० | ११.०० | ५.०० | |
| ३ | मनपा मालकीचे टॉवर उभारणे | ०.०० | २.०० | २.०० | |
| ४ | नविन मालमत्ता कर आकारणी व हद्दवाढ गावातील नविन दर आकारणी | ०.०० | ३०.०० | ३०.०० | |
| ५ | जाहिरात कर(एल.ई.डी स्क्रीन होर्डीग वर कर आकारणी) | ०.२० | २.०० | १.८० | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ६ | शॉपिंग सेंटर लिलाव व हस्तांतरण फी | ०.२५ | ५.०० | ४.७५ | |

| अ.क्र. | लेखाशिर्षक | मे.आयुक्त सो यांनी केलेल्या तरतूदी | मे. स्थायी समितीने सुचविलेल्या शिफारशी | वाढ | घट |
|---|---|---|---|---|---|

**खर्च बाजू**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | धुळे शहर पाणी पुरवठा योजनेचा हॅड्रोलिक मॉडेल तयार करणे व वितरण झोनचे काम करणे | ०.०० | ०.०५ | ०.०५ | |
| २ | सुकवद पा. पु. केंद्र येथील सब स्टेशन नुतनीकरण व दुरुस्ती करणे | ०.०० | २.०० | २.०० | |
| ३ | बाभळे पा. पु. केंद्र येथील सब स्टेशन नुतनीकरण व दुरुस्ती करणे | ०.०० | २.०० | २.०० | |
| ४ | वलवाडी जलशुध्दीकरण केंद्र येथील पंपसेट बदलुन २० व्ही. टी. पंप बसविणे | ०.०० | ०.२० | ०.२० | |
| ५ | पांझरा वॉटर वर्क्स व बडगुजर जलकुंभा करीता स्टँडबाय ट्रान्सफार्मर २५० के. व्ही. ए नविन घेणे | ०.०० | ०.०५ | ०.०५ | |
| ६ | डेडरगाव जलशुध्दीकरण केंद्र येथील वॉश वॉटर पंप नविन बसविणे व पॅनल बदलणे | ०.०० | ०.०१ | ०.०१ | |
| ७ | सुकवद पा. पु. केंद्र येथील पंपसेट क्र. २,३,४ चे स्वी व्हॉल्व बसविणे | ०.०० | ०.०५ | ०.०५ | |
| ८ | बाभळे पा.पु. केंद्र सम टैंकचे गनेटीग करण करणे व लिकेजेस बंद करणे | ०.०० | ०.१० | ०.१० | |
| ९ | कुमारनगर, रामनगर येथील ६० एचपी दोन पंपसेट नविन घेणे | ०.०० | ०.२५ | ०.२५ | |
| १० | नविन वसाहतींसाठी पाईपलाईन टाकणे | ०.०५ | २.०० | १.९५ | ० |
| ११ | नगरसेवक निधी (प्रत्येकी १५ लक्ष) | ०.०० | १२.०० | १२.०० | ० |
| १२ | देवपुर भागातील रस्ते दुरुस्ती व नुतनीकरणासाठी | ०.०० | १०.०० | १०.०० | |
| १३ | नवीन शहर हदद् वाढ गावांसाठी | ०.०० | ०५.०० | ०५.०० | |
| १४ | नविन दवाखाने तयार करणे | ०.०० | १.०० | १.०० | |
| १५ | ज्येष्ठ नागरीकांसाठी सभागृह बांधणे | ०.०० | १.०० | १.०० | |
| १६ | नाना नानी पार्क तयार करणे | ०.०० | २.०० | २.०० | |
| १७ | छत्रपती शिवाजी महाराज पूर्णाकृती पुतळा चबुतरा सुशोभिकरणासाठी | ०.०० | १.०० | १.०० | |
| १८ | रमाबाई आंबेडकर चबुतरा व | ०.०० | ०.२० | ०.२० | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | सुशोभिकरण करणे | | | | |
| १९ | छत्रपती शाहु महाराज चबुतरा व सुशोभिकरण करणे | ०.०० | ०.३५ | ०.३५ | |
| २० | वीर एकलव्य चबुतरा व सुशोभिकरण करणे | ०.०० | ०.२० | ०.२० | |
| २१ | जेलरोड येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा दुरुस्ती व सुशोभिकरण करणे | ०.०० | ०.२० | ०.२० | |
| २२ | देवपुर वगळता इतर शहरी भागातील सोयी सुविधांसाठी | ०.५० | ८.५० | ८.०० | |
| २३ | कला सांस्कृतिक कार्यक्रम | .२५ | ०.३० | ०.०५ | |
| २४ | स्वागत कमान तयार करणे | ०.०० | ०.७५ | ०.७५ | |
| २५ | मोहाडी येथे छत्रपती शिवाजी महाराज चबुतरा सुशोभिकरण | ०.०० | ०.३५ | ०.३५ | |
| २६ | विकास शुल्क अंतर्गत विकास कामे | ०.०० | ५.०० | ५.०० | |

सर्व सन्मा.सदस्यांनी केलेल्या सुचना लक्षांत घेवून तसेच उत्पन्न व खर्चाचा ताळमेळ करुन सन २०२१- २०२२चे सुधारीत व सन २०२२-२३ चे अंदाजपत्रक योग्य त्या फेरबदलासह अंतिम करुन मे. महासभेपुढे सादर करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे. तसेच सन २०२२-२३ चे वृक्ष प्राधिकरण समिती अंदाजपत्रक महासभेपुढे सादर करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे. तसेच सन्मा. सदस्य श्री. नागसेन बोरसे यांनी दिलेल्या लेखी पत्रानुसार त्यांचा विरोध नोंदवून सदर अंदाजपत्रकास बहुमताने मान्यता देण्यात येत आहे.

सुचक :- श्री. हर्षकुमार राधेश्याम रेलन

अनुमोदक :- श्री. अन्सारी अब्दुल लतीफ अब्दुल हमीद

**बहुमताने मंजुर,**

**सही/-x x x**

**(शितल मोहन नवले)**

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

# धुळे महानगरपालिका,धुळे
## नगरसचिव कार्यालय
### स्थायी समिती सभा क्रमांक ५ चे इतिवृत्त

---

**धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह, धुळे**
**गुरुवार दिनांक ०३/०३/२०२२**
**वेळ सकाळी ११-०० वाजतां**

धुळे महानगरपालिकेची ऑनलाईन स्थायी समितीची सभा क्रं.५ आज गुरुवार दिनांक ०३/०३/२०२२ रोजी सकाळी ११-०० वाजतां **श्री. शितल मोहन नवले, सभापती**, स्थायी समिती, मनपा धुळे यांच्या अध्यक्षतेखाली **धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह** भरली. या ऑन लाईन सभेस खालील सन्मा.सदस्य ऑन लाईन व ऑफ लाईन हजर होते.

| अ.क्रं. | सदस्यांचे नांव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. नवले शितल मोहन | सभापती |
| २ | श्री. जाधव संजय सुधाकर | सदस्य |
| ३ | श्री. बोरसे नागसेन दामोदर | सदस्य |
| ४ | श्रीमती कुलेवार किरण राकेश | सदस्या |
| ५ | श्रीमती वराडे वैशाली भिकन | सदस्या |
| ६ | श्री. जाधव बन्सीलाल माणिक | सदस्या |
| ७ | श्रीमती चौधरी मंगला अर्जुन | सदस्या |
| ८ | श्री. अन्सारी फातमा नुरुल अमीन | सदस्या |
| ९ | श्री. चौधरी नरेंद्र रुपला | सदस्य |
| १० | श्रीमती. चौधरी प्रतिभा शिवाजीराव | सदस्या |
| ११ | श्री.अहिरराव किरण हरिचंद्र | सदस्य |
| १२ | श्री. रेलन हर्षकुमार राधेश्याम | सदस्य |
| १३ | श्री.अग्रवाल सारिका प्रविन | सदस्या |
| १४ | श्री. अन्सारी अब्दुल लतीफ अब्दुल हमीद | सदस्य |
| १५ | श्री. खान मोहम्मद साबीर मुहिबुल्लाह | सदस्य |
| १६ | श्रीमती पठाण नाजियाबानो नासिर खा | सदस्या |

उपस्थित अधिकारी गण

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. नितीन कापडनीस | अति. आयुक्त |
| २ | श्रीमती शिल्पा नाईक | उपायुक्त |
| ३ | श्री. एन.पी. सोनार | सहा. आयुक्त |

| | | |
|---|---|---|
| ४ | श्री मनोज अरविंद वाघ | नगरसचिव |
| ५ | श्री. दिनकर जाधव | मुख्य लेखाधिकारी |
| ६ | श्री. के. एन. शिंदे | अभियंता |
| ७ | श्री. पी.डी. चव्हाण | नगररचनाकार |
| ८ | श्री. चंद्रकांत जाधव | सहा.आरोग्याधिकारी |
| ९ | श्री. विकास साळवे | स्वच्छता निरीक्षक मलेरिया |
| १० | श्री. बी.एस. रनाळकर | सहा. कर मूल्य निर्धारण अधिकारी |
| ११ | श्री. एन.के. बागुल | विद्युत अभियंता |
| १२ | श्री. सी.सी. बागुल | पा.पु. ओव्हरसिअर |
| १३ | श्री. हेमंत पावटे | बांधकाम ओव्हरसिअर |
| १४ | श्री.महेंद्र सोनवणे | प्रशासन अधिकारी मनपा शि.मं. |
| १५ | श्री. राजू माईनकर | भांडारपाल |
| १६ | श्री. किशोर सुडके | बाजार विभाग तथा परवाना विभाग |
| १७ | श्री. सुक्राम राऊत | वाहन विभाग |
| १८ | श्री. तुषार ढाके | अग्नीशमन विभाग |

मा. सभापती — सन्मा.सदस्य मा.आयुक्त सो. सर्व अधिकारी कर्मचारी व पत्रकार, छायाचित्रकर बांधव यांचे मी स्थायी समितीच्या बैठकीत स्वागत करतो.सभेचा कोरम पुर्ण झाला असुन नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरु करावे.

म. नगरसचिव — वंदे मातरम् या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

विषय क्रमांक:- १२ — मागील स्थायी समिती सभांचे इतिवृत्त क्रमश: वाचून कायम करणे.
(दि.२४/१/२०२२, ३१/१/०२०२२, २१/२/२०२२)

म.नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म.नागसेन बोरसे — इतिवृत्त वाचून कायम करण्यांत यावे.

**म.खान मोहम्मद साबीर** — इतिवृत्त वाचून कायम करण्यांत यावे.

म. सभापती — सन्मा. सदस्यांच्या सहमतीने मागील स्थायी समिती सभांचे इतिवृत्त क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ११ दिनांक ०३/०३/२०२२**

मागील स्थायी समिती सभा दिनांक२४/०१/२०२२ च्या सभेतील ठराव नंबर २०४ ते२०९ तसेच मे. स्थायी समिती सभेतील झालेली चर्चा व त्यावरील निर्णय क्रमश: वाचून इतिवृत्त कायम करण्यांत येत आहे.

तसेच स्थायी समिती सभा दि.३१/१/२०२२च्या सभेतील ठराव नंबर २१० ते२१६ तसेच मे. स्थायी समिती सभेतील झालेली चर्चा व त्यावरील निर्णय क्रमश: वाचून इतिवृत्त कायम करण्यांत येत आहे.

तसेच स्थायी समिती सभा दि.२१/२/२०२२ च्या सभेतील ठराव नंबर १ ते २ अखेर क्रमश: वाचून इतिवृत्त कायम करण्यांत येत आहे.

सही/-x x x
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक:- १३ | दिग्विजय एंटरप्राईजेस यांनी शहरातील एकात्मिक डास निर्मुलनचे काम बंद केल्याने मनपा मार्फत पर्यायी व्यवस्था करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे. |
| म. नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले. |
| म.सभापती | आपण दिग्विजय एन्टरप्राईजेसचे काम पूर्णपणे थांबवत आहोत आणि मला सांगायला आनंद वाटेल जो खर्च प्रशासनाने काढला होता ४० लाख प्रति माह तो आता आपण १८ लाखावर आणतो. म्हणजे निम्म्या पेक्षा कमी आहे. त्यात सुध्दा १८ लाख रु हे पूर्ण वर्षभर लागत नाही. मलेरिया प्रादुर्भाव साधारणत: डिसेंबर पासून ते जुलै पर्यंत असतो. म्हणजे ६ ते ७ महिने हा खर्च लागेल. नंतरचा खर्च अल्प असतो. मलेरिया डिपार्टमेंटकडून आज जवळ जवळ २ कोटी ९६ लाख रुपये जे मनपाला प्राप्त होणार आहे यात औषधे मिळतील. मनुष्य बळासाठी देखील अनुदान प्राप्त होणार आहे. त्यामुळे वर्षाकाठी ४कोटी ८० लाख खर्च होणार होते. तर हा खर्च १ कोटी ६० लाखावर आला आहे. सर्व सदस्यांचे अभिनंदन करतो. कारण आपण सर्वांनी हा प्रश्न सभागृहात उचलला होता. अगदी माजी सभापतींनी पण शेवटच्या सभेत रुलिंग केले होते. काम थांबवण्यात यावे. नैसर्गिक दर वाढीचा विषय काढण्यात आला. मी प्रशासनाचे देखील अभिनंदन करतो. हा खर्च कमी केला आहे. आपल्याकडे निधी कमी आहे कोविड काळात कर संकलन झाले नाही. त्यामुळे हया छोटया रकमा वाचल्या तर निश्चीतच मदत होईल. |
| म.संजय जाधव | आपल्याकडे ठेका देत असतांना ठेका तर दिला जातो. परंतु काम होत आहे का नाही मला या ठिकाणी एकच प्रश्न विचारावासा वाटतो. दिग्विजय असो वा वॉटर ग्रेस असो. प्रशासनाने हे जे लोकं काम करत असतील प्रशासनाची जबाबदारी थांबते यालाच जोडून विषय येतो. आस्था स्वयंरोजगार संस्था ६ महिन्यापासून ॲन्टी करप्शनला तक्रार केली तर दिग्विजय असो,आस्था असो, वॉटरग्रेस असो हया लोकांना आपण बिले मंजूर करतो या मध्ये ई.पी.एफ आपण पूर्ण लोकांचे देत आहोत का? याची माहिती दयावी या नंतर शासकीय विमा १ % कपात झाली पाहिजे ती दिग्विजय व आस्थाच्या केसेसमध्ये झाली आहे का? याची माहिती मला महत्वाची वाटते जे कामगार आहेत त्यांचे बँकेत पेमेंट होत आहे का? आपण हया लोकांचे लाखो करोडो चे बिल अदा करत आहात या ठिकाणी माहिती दयावी. या तिन प्रश्नांची उत्तरे अपेक्षित आहे. |
| म. सभापती | ते इंन्सुरन्सचा विषय असा असतो. जेथे मॅन वर्क आहे रोजंदारी आहे किंवा हमाली काम असेल जिथे लेबर वर्क आहे फक्त लेबर वर्कला इन्सुरन्स नसतो. |
| म.संजय जाधव | मग यांनी करारनाम्यावर तशाअटी टाकू नये . |
| म. सभापती | प्रशासनाने टेंडर काढतांना थोडी काळजी घ्या. कायदा समजून घ्या. |
| म.संजय जाधव | शितलभाऊ सांगता ते बरोबर आहे का? |
| म.दिनकर जाधव | मी बघून सांगतो. |
| म. संजय जाधव | हा जनरल विषय आहे. लेबर वर्कला लागणार नाही आणि जिथे कंन्सट्रक्शन वर्क जिथे तिथे लागेल. याचे सभागृहाला मार्गदर्शन करा. |
| म.सभापती | दुसरा प्रश्न होता त्यांचा पी.एफ. चा |
| म.दिनकर जाधव | पी.एफ. चे चलने जोडलेले आहे. मी तपासणी करुन सांगतो. |
| म.संजय जाधव | याचे उत्तर पुढच्या सभेत मिळाले तरी चालेल पण पुढच्या सभेत मी बघतो, पाहतो, करतो हे यायला नको. कारण हया गोष्टीत सगळे जण दोषी होतील. यात १००% न्यायालयीन प्रकीया होणारच जे अधिकारी बिलांवर सहया करत आहेत त्या अधिकाऱ्यांवर ही कार्यवाही होईल. दिग्विजय असो आस्था असो यांचे कोणतेही बिले अदा करु नये आस्था ची १०-१० लोकांची |

ओळख परेड होऊन जाऊ दया. बोला आहे का मान्य? कळेल शहरात २००-२५० लोकं काम करत आहे का नाही? कामगारच नाहीत.

म.दिनकर जाधव मी याची माहिती देतो.

म.संजय जाधव आरोग्याशी निगडीत विषय आहे. आरोग्य खाते कसे चालते हे मला वीस वर्षापासून चांगले माहिती आहे. कापडणीस सो. कडे चौकशी अहवाल बाकी आहे. म्हणून मी या ठिकाणी शांत बसलो आहे. तो अहवाल बाहेर येत नाही याचे कारणं काय आस्थाची तक्रार केली मुंबईला त्यांना दोन पत्रे आले आहे. चौकशी करुन तातडीने पाठवा म्हणून.

म.अति. आयुक्त मी याबाबत संबंधित कागदपत्रे मागवलेली आहे. लवकरच यावर अहवाल सादर करण्यांत येईल.

म.संजय जाधव कोणालाही पाठीशी घालू नका. तुम्ही पाठीशी घातलं तर तुम्ही आरोपी व्हाल.

म.सभापती जाधव सो. वॉटरग्रेस,आस्था, दिग्विजय यांचे पी.एफ. आणि इंन्सुरन्सचे क्लिअर होत नाही. तो पर्यंत यांचे कुठलेही बिल अदा करु नये. पुढच्या सभेत सदस्यांची उत्तरे दयावी.

म.नागसेन बोरसे आस्था हया विषयांवर खूप चर्चा झाली. सुरवातीला या विषयावर बोललो होतो. आणि चौकशीची मागणी केली होती. बिलाच्या विषयावर बोलून मोकळे पुढच्या वेळेस सादर करु पी.एफ.हा सादर होतो का? त्यांचे पगार बँकेत झाले पाहिजे, कर्मचाऱ्यांची यादी दया , कर्मचाऱ्यांचे कागदपत्रे दया.आपण क्रिमीनल रिपोर्ट मागवतो. आज आस्थाला कामं देऊन किती दिवस झाले? यांचा एकही कागद तुम्हाला पोहचला नाही. अटी शर्ती टाकतात कशाला तुम्ही? आस्था या संस्थेचे काम चालू आहे. तो पी. एफ. भरतांना काय करतो? संबंध्रित संस्थेचे अनेक शहरात काम सुरु आहे तो तेथील आस्था संस्थेचे पी.एफ. सादर करतो. हया कर्मचाऱ्यांचे नावे दया. हया कर्मचाऱ्यांचे नावे त्याने पेमेंट केले की नाही याची कुठलीच माहिती घेतली जात नाही. यापूर्वी मी अदित्य महीला बचत गटाची माहिती मागवली होती. आयुक्त सो. यांनी प्रकरणावर आजपर्यंत सही केली नाही. कोणाच्या सांगण्यावरुन केली नाही ते माहित नाही. माहीती अजून पर्यंत मिळाली नाही मला. त्या संस्थेला पत्र दयायचे अशी – अशी तक्रार झालेली आहे. तुमचे कागदं दया. सन्मा. सदस्य पोटतिडकीने विषय आणतात. अनमोल पुस्तकालय वाल्याला मी बोलवले तुमच्यावर काय अन्याय होतोय. वर्तमान पत्रात छापून आले. कुणी माहिती लीक केली माहित नाही. सन्मा. नगरसेविकेचा पतीने त्याला कान फटयात लगावली. चंदानीना मुदवाढ दिली का ? त्यांचे मुदत संपली का? त्याला सांगीतले होते एक वर्षात सर्व कागदपत्रे क्लीअर करुन दयायचे. टपरी धारक आहे त्यांनी शॉप ॲक्टचे लायसन्स घेतले या सगळया लोकांचे एल.बी.टी. चे क्लीअर झाले. का झाले? त्यांना माहिती त्यांच्याकडून काही मिळणार नाही. जे मोठे व्यापारी आहे त्यांना कागदपत्रे मागीतले तर त्रास होईल त्याला त्रास झाला म्हणजे आपला फायदा होईल. दिपक ज्वेलर्स कडून ८ लाखाची तोडी केली. चंदानीला येथे हिअरींग घेण्याचे अधिकार आहे का? चंदानीला तिथे बसण्याचा अधिकार आहे का? त्याला मुदतवाढ दिली का ? तो हिअरींग घेतो कसं काय? सदस्य आपल्या संस्थेचे ट्रस्टी आहे. आपण कुठल्याही विषयाला बगल देऊ नये. खुलासा दयावा.

म.शिल्पा नाईक स्थानिक संस्था करासाठी ४१५८ व्यापाऱ्यांनी रजिस्ट्रेशन केले त्यांपैकी निकाली लागलेली प्रकरणे ७२२ आहे.

म. हर्षकुमार रेलन किती वर्षात केली?

म.शिल्पा नाईक आपण त्यांना काम २०१६चे दिले आहे.त्यांना एका वर्षात पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या होत्या.

म. हर्षकुमार रेलन सूचना नाही तो कॉन्ट्रॅक्ट होता. ३१/३/२०१७ पर्यंत ते काम संपावायचे आहे.

| | |
|---|---|
| म.शिल्पा नाईक | आपण त्यांच्या सोबत कारारनामा ही केला होता. त्या करारनाम्यात अटी शर्ती ही होत्या. त्यांनी मुदतीत ते काम केले नाही प्रति दिवस १०० रु दंड या प्रमाणे आकारणी करण्यात येईल. ती सुरु झाली आहे. आता पर्यंत ७२२ प्रकरणे निकाली काढली. त्या आधी हे काम संबंधीत सहा. आयुक्त पाहत होते. माझ्याकडे काम आले तेव्हा १४८ प्रकरणे मी स्वत: निकाली लावली. हया फाईलस पूर्णपणे बंद केलेल्या आहे. त्यात सॉर्टींग केले आहे १ लाखाच्या आतील प्रकरणे १ ते १० , १० ते ५० लाख तसेच ५०- १ कोटी आणि १ कोटीच्या पुढे ज्यांनी नील म्हटले आहे त्यांचे देखील सॉर्टींग केले आहे. कामाचा व्याप लक्षात घेता दोन भाग केले आहे. १ लाखाच्या आतील प्रकरणे त्यांच्या सुनावण्या माझ्याकडे आहे. १ लाखाच्या वरील प्रकरणे आहे ते अति. आयुक्त यांच्याकडे सुनावण्या होणार आहे. जेणेकरुन कामाचा निपटारा लवकर होईल. दुसरा विषय असा नागरिकांकडून व व्यापाऱ्यांकडून प्रतिसाद मिळत नाही. अतिशय कमी कागदपत्रे त्यांच्याकडून मागणार आहोत. खरेदी वहया, नफा आणि तोटा पत्रक, २०१७ पासून नोटीसेस दिलेल्या आहे. व्हॅट रजिस्ट्रेशन असेल आय.टी.आर. रिर्टन असेल जेणे करुन सिध्द होईल त्यांचा टर्न ओव्हर १ लाखा आतिल किंवा वरील आहे. हया गोष्टीसाठी डॉक्युमेंट गरजेचे आहे. यात काही वावगं आहे असे मला वाटत नाही. त्यांना त्रास होतोय असा त्यांनी समज करुन घेऊ नये. असेही मला आजच्या बैठकीत सांगावेसे वाटतं. |
| म.नागसेन बोरसे | २०१७ पासून मुदत संपल्यानंतर तो करतो काय? त्यांना अधिकार आहे का? त्यांना अधिकार आहे का? हे विचारतो मी. मी असे प्रश्न उपस्थित केले ज्यांचे विषय क्लोज केले ते टपरीधारक आहे. जे मोठे व्यापारी त्यांचे का नाही? ६वर्ष होऊन गेले ना? |
| म.हर्षकुमार रेलन | चेन्नानी चे करंट स्टेटस काय आहे? त्याने मुदतवाढ मागीतली का? आज ६ वर्षा नंतर फक्त ७२२ असेसमेंट कंम्प्लीट केल्या असतील. व्यापारी का येत नाही? त्यांना नकोय का असेसमेंट? आपण त्यांना इतका त्रास देतात. आता दुध डेअरी आहे. दुधडेअरीला एल.बी.टी. नाही कॅन्सल करा ते केलेच जात नाही. १४ वर्षा पूर्वी ते दुकान बंद झालेले आहे. फक्त त्याची पाटी बघून तुम्ही त्याचे रजिस्ट्रेशेन केले आहे. त्यावर तुमचे कर्मचारी गेले मी तेथे होतो. ते दुकान बंद झालेले आहे. फक्त त्याची पाटी बघून तुम्ही त्याचे रजिस्ट्रेशन केले आहे. त्याचे टर्न ओव्हर २० लाखा पेक्षा जास्त त्याचे १ टक्कयाने २०००० होतात. तुम्ही त्यांना ३ कोटीची नोटीस पाठवली. काही पण कागदे मागीतले चहाचे बिलं दया वगैरे वगैरे. मला पण त्रास झाला होता. व्यापारी लोकांना इतका त्रास दिला आहे. की ते यायला तयार नाही. त्यांना दिवसभर बसवता. आपल्याला माहिती दिवसभरात ४ असेसमेंट करु शकतो. तर ४० लोकांना कशाला बोलावतात. त्रास फार आहे पण नागसेन भाऊंचा प्रश्न होता आजचे चंदानी चे स्टेटस काय आहे? एक तर तुम्ही त्याला बिगर निविदा काम दिले. आज तो ठेकेदार आहे किंवा नाही. त्याने मुदतवाढ मागीतली नाही. आपण ३-३ महिन्याकरीता दिले आहे त्याला तो सप्टेंबर २०१७ पर्यंतच रहायला पाहिजे होता. त्यानंतर मुदतवाढ दिली नाही, स्थायीत विषय नाही. |
| म.नागसेन | कुठल्याही प्रकारची मुदतवाढ दिली नाही स्थायी मध्ये. |
| म.सभापती | त्याचे स्टेटस समजून घेऊया. |
| म.शिल्पा नाईक | या पूर्वीच सांगीतल्याप्रमाणे २०१६ मध्ये एक वर्ष त्यांची मुदत होती. त्यानंतर ५ ऑगस्ट २०१६ रोजी कार्यालयीन टिपनी नुसार २ महिन्यांची मुदत वाढवून दिली होती. ही मुदत देखील संपुष्टात आली आहे. आपल्याकडे कॉमर्स बॅकग्राउंड असलेला स्टाफ नाही त्यामुळे आपण त्यांच्याकडून काम करुन घेत आहोत. |
| म. हर्षकुमार रेलन | मंजूरी न घेता अनधिकृत पणे करता हे काय? |
| म.शिल्पा नाईक | पण आपण त्यांची दंडाची आकारणी सुरु केली आहे. |

म. हर्षकुमार रेलन — तो ठेकेदारच नाही तर दंडाची आकारणी कशासाठी? त्याला आपण मुदतवाढ दिली नाही त्याने मागीतली नाही.

म.नागसेन बोरसे — आपल्याकडे जर कॉमर्स बॅकग्राउंड वाले लोकं नव्हते तर आऊटसोर्सिंग द्वारे का भरली नाही? इतर कामासाठी भरतोच ना टायपीस्ट, ओव्हरसिअर, व्हॉल्वमन इ. भरतो. मग ते का नाही भरले जात? आपल्याला उत्पन्न भेटते तिथुन. चंदानीला हाकला दुसरे लोकं कामाला लावा.

म.शिल्पा नाईक — त्यामध्ये असा विषय आहे जे सी.ए. घ्यायचे आहे ते शहराच्या बाहेर चे घ्यायचे आहे. आपण ही प्रक्रीया निविदा राबवून केली होती. २०१६ मध्ये जाहिरात देवून करार नामा करुन रितसर कार्यादेश देवून केले आहे.

म. सभापती — पुढच्या बैठकीत विषय घेऊ आपण.

म. हर्षकुमार रेलन — हा जो आपण एकात्मिक डास निर्मूलनाचा ठेका दिला आहे. हा ठेका देतांना आपण ३९ लाख प्रति माह च्या हिशोबाने दिला आहे. आणि आज आपल्या असे लक्षात आले की हा ठेका ४-५ लाखांत होऊ शकतो. प्रशासन तर हेच होते ना ३९ लाख बोलणारे आणि १८ लाखाची टिपणी देणारे. दोन्ही प्रशासन एकच आहे ना? आणि मला असे विचारायचे आहे. दिग्विजय वाला डिफॉल्टर आहे का? त्याने कुठे अटी शर्तीचा भंग केला आहे का? काही रिपोर्टिंगमध्ये आहे का?

म.सभापती — साळवे काही आहे का तुमचयाकडे लेखी स्वरुपात अटी शर्तीचा भंग झाला असे?

म.प्रतिभा चौधरी — यावर टिपनी दिलेली आहे. यात असे म्हटले आहे. ३१ जानेवारी २०२२ च्या स्थायी सभेत कोणत्या व कशा तक्रारी प्राप्त झालेल्या आहे. याची पण माहिती दयावी. आणि पारेषण काळ म्हणजे जून ते जाने.-फेब्रुवारी मध्ये उन्हाची तिव्रता वाढली असल्याने असतो. दिग्विजयने फक्त आठ महिने काम केले आहे. त्यांचे कर्मचारी कुठल्या भागात काम करत होते. फक्त सुरवातीला कर्मचारी आमच्याकडून सहया घेत होते.

म.सभापती — आम्हीच ती तक्रार केली होती. की याने अजून सॉफटवेअर अपडेट केले नाही. त्याचे माणसे कुठे फिरतात हे कोणालाही माहिती नसायचे. त्याचे हजेरी सिस्टीम अपडेट नव्हते अशा तक्रारी होत्या. साळवे तुम्ही पुढील वेळेस ३१ तारखेचे इतिवृत्त असेल त्यात सगळया तक्रारी असतील त्या एका कागदावर लिहून घेवुन या व सभागृहाला अवगत करा.

म. हर्षकुमार रेलन — आपण ठेका रद्द केला. त्याने अटी शर्तीचा भंग केला म्हणून केला. तो काम बरोबर करत नव्हता. आपण त्याला ॲक्सेस पेमेंट केले का? ३९ लाख प्रति माह देत होतो.त्याला १ कोटी १८ लाख दिले गेले आहे. १ कोटी ८० लाख बाकी आहे. आपण याला याचे बाकीचे १ कोटी ८० लाख देऊ नये ही विनंती आहे याचे हे पैसे घेण्याचे काहीही अधिकार होत नाही. त्या कंपनीला ब्लॅकलिस्ट करा. हा ठेका दिलाच का गेला? हे २० लाख प्रति महिना कुठे जात होते. हाच प्रशासन ६ महिन्यात ३९ लाखचे ८ लाख सांगतोय.

म.सभापती — मी प्रशासनाला आदेशित करतो. त्याला ३९ लाख प्रति माह ठरवले होते. त्याने काही बाबी केल्या काही बाबी केल्या नाही. तोपर्यंत पेमेंट देऊ नये. जो पर्यंत स्थायी समोर मलेरिया ला ठेक्याचा लेखा जोखा येत नाही. तो पर्यंत त्याला कुठलेही बिल अदा करु नये. त्याने कर्मचाऱ्यांचे पी.एफ भरले की नाही. ४० लाखात काय काय काम होत आहे. जर त्याचे बिले अदा केलेले आढळले तर तुमच्यावर कार्यवाही करावी लागेल.

म.साबिर खान — अटी शर्ती होते त्याला वर्क ऑर्डर दिले कसं काय ? सगळया गोष्टींची चर्चा झाल्या तरीही त्याला वर्क ऑर्डर दिले कसं काय?

म.सभापती — त्यांना सविस्तर अहवाल सादर करु दया. जेव्हा काम चालू झाले तेव्हा लक्षात आले. त्याला ज्यादा रक्कम अदा करतोय. त्यात मी तुम्हा सगळयांचे अभिनंदन करतोय. तुम्ही लक्षात

आणून दिले हे कमी खर्चात होऊ शकते. आपण पालीकेचेच पैसे वाचवले. जो पर्यंत मी इथे बसलोय एक रुपया पण पालिकेचा जास्त अदा होऊ देणार नाही.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १२ दिनांक ०३/०३/२०२२**

धुळे मनपा क्षेत्रात मलेरिया विभाग अंतर्गत शहरात डासांवर नियंत्रणासाठी व डेंग्यु / मलेरिरया आजारावर अळा बसविण्याकामी धुळे महानगरपालिका ठराव न.98 दि.31/12/2019 अन्वये व मे.स्थायी समिती ठराव नं.44 दि.21/4/2021 च्या मंजुरी अन्वये दग्विजय एंटरप्रायजेस नाशिक या एजंसीला मासीक खर्च रु.39,60,825/- व वाषिक खर्च रु. 4,75,29,900/- व तीन वर्षाकरीता रु.14,25,89,700/- ने तीन वर्षासाठी ठेका देण्यात आला होता.

उक्त नुसार सदर एजंसीने दि.21/6/2021 पासुन कामाची सुरुवात केली होती. सदरचे काम एजंसीने 9 फेब्रुवारी 2022 पर्यंत केले. सदर कामाच्या व्यव्हर्यतेबाबत संदर्भीय क.3 नुसार मे.स्थायी समितीत दि.31/1/2022 रोजी प्रश्न उपस्थित झाल्याने करारानाम्यातील अटीशती क.44 नुसार सदंर्भीय क.4 नुसार एजंसीकडुन पत्राव्दारे अधिप्राय मागविण्यात आला असता सदर एजंसीने संदर्भ क.5 नुसार दि.10/2/2022 पासुन काम बंद केले आहे.

एजंसीचे काम बंद झाल्याने मनपामाफत शहरात मलेरिया अंतर्गत कामे नागरी हिवताप योजनेच्या कर्मचा-यांमाफत करण्यात येत आहे. सदयास्थितो पारेषणकाळ नसल्याने इकडील कार्यालयात उपलब्ध असेलेले 33 कर्मचा-या माफत कार्यवाही करण्यात येत आहे. सदर कार्यवाहीसाठी शासनाचे निकषाप्रमाणे 1 SFW व 3 फिल्ड वकर अपेक्षीत आहे. त्याअनुषंगाने धुळे शहरात 19 प्रभागासाठी खालील नुसार कर्मचारी अपेक्षीत आहे.

- किटक समाहरक- 02
- SFW - 19
- फिल्ड वर्कर - 56
- फॉगींगसाठी- 15
- गप्पी मासो साठी- 04
- खाजगी दवाखान्याकडे 02

  रुग्ण सर्वेक्षण -----------

  एकुण- 98 कर्मचारी

वरील नुसार 98 कर्मचारी अपेक्षीत आहे. परंतु इकडील नागरी हिवताप योजनेच्या आस्थापनेवर खालील कर्मचारी उपलब्ध आहे.

- आरोग्य पर्यवेक्षक- रिक्त (प्र.स्व.निरिक्षक)
- किटक समाहरक- रिक्त (प्र.SFW)-01 कर्मचारी
- SFW - 03
- फिल्ड वर्कर - 26
- वाहन चालक- 01

एकुण- 31- कर्मचारी

वरील नमुद 31 कर्मचा-यांचे वेतनावर होणारा खर्च शासनाकडुन सहाय्य अनुदानाचे स्वरुपात मनपाला प्राप्त होतो.

परंतु इकडील नागरी हिवताप योजनेकडेकर्मचारी वर्ग पुरेसा नसल्याने पारेषण काळात मानधनावर मनुष्यबळ घेणे योग्य राहील.मनपाचे क्षेत्रानुसार शहरात डासांवर नियंत्रण ठेवण्यासाठी व डेंग्यु/मलेरिया सारखे आजारावर अळा बसविण्याकामी खालील नुसार मानधनावर मनुष्यबळ व साहित्यसामुग्री , इंधन इ. मासीक खर्च अपेक्षीत आहे.

1)मनुष्यबळ40कामगार प्रति दिवस प्रति कामगार रु . 40x10,000 =रु.4,00,000/-
2)औषध साठा (अळीनाशक फ वारणी, अबेटींग, धुरफवारणी) = रु.10,48,320/-
3)धुरफवारणीसाठी इंधन = रु.14,79,660/-
= रु.29,27,980/-

प्रति महिन्याला मनुष्यबळ,अळीनाशक व इंधन इ. खर्च एकुण वरील प्रमाणे लागु शकतो.

सदरचा खर्च पारेषण काळ (माहेजुन ते जानेवारी ) साठी अपेक्षीत आहे. तसेच माहे फेब्रुवारी पासुन उन्हाळयाचे दिवस असल्याने उन्हाचा तितर्वतामुळे डासोत्पत्ततीस्थाने कमी होतात व डासांचा प्रमाणही कमी असते त्यामुळे वरील दर्शविण्यात आलेला खर्चापेक्षा कमी होऊ शकतो.

तसेच सदरची कार्यवाहीसाठी लागणारा औषधसाठा शासनकडुन मागणी करण्यात आला आहे. शासनकडुन वर्षासाठी औषधसाठा प्राप्त झाल्यास वरील दर्शविण्यात आलेली रक्कम **रु.10,48,320/-**खर्च होणार नाही व फक्त मनुष्यबळ व इंधनसाठी **रु. 18,79,660/-** मात्र दर महा खर्च होऊ शकतो. परंतु जो पर्यंत शासनाकडुन औषध प्राप्त होत नाही तो पर्यंत मनपा माफत खरेदी करणे अपेक्षीत आहे.

उपरोक्त परिस्थिती अवलोकन होवुन दिग्विजय एंटरप्रायजेस नाशिक यांनी काम बंद केल्याने मनपा अंतर्गत नागरी हिवताप योजनेच्या कर्मचा-यांकडुन व मानधनवर मनुष्यबळ लावुन काम केल्यावर वरील नमुद खर्च येवु शकतो. असा प्रस्ताव मे. स्थायी समिती पुढे सादर झालेला आहे.

उक्त प्रस्ताव व सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने मनपाच्या आर्थिक हिताच्या दृष्टीने मे.व्दिविजय एंटरप्राईजेस यांचे काम बंद करुन मनपा अंतर्गत नागरी हिवताप योजनेच्या कर्मचा-यांकडुन व आवश्यकतेनुसार मानधनवर मनुष्यबळ उपलब्ध करुन शहरातील एकात्मिक डास निर्मुलनचे काम करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

तसेच मनपा मार्फत नियुक्त काही संस्थाबाबत तक्रारी आहेत. यात १ टक्का शासकीय विमा कपात करणे, संबंधित संस्थेतील नियुक्त कर्मचा-यांचे पी.एफ अदा करणे व संबंधित संस्थेतील नियुक्त कर्मचा-यांचे पगार बॅकेत अदा होतात किंवा कसे याबाबत संपूर्ण चौकशी करण्यांत यावी. तसेच व्दिविजय एंटरप्राईजेस या संस्थेचे तोपावेतो कोणतेही देयके अदा करण्यांत येवू नये.

एल.बी.टी तपासणी करण्यासाठी नियुक्त ठेकेदाराला कशा पध्दतीने कार्यादेश दिलेले आहे याची माहिती संबंधितांना देण्यांत यावी.तसेच याबाबत स्वतंत्र बैठक घेण्यांची कार्यवाही करावी.

सूचक:- सौ. वराडे वैशाली भिकन
अनुमोदक :- श्री. चौधरी नरेंद्र रुपला

**सर्वानुमते मंजुर,**
सही/-x x x
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक:- १४ | तापी पाणी पुरवठा योजनेच्या बाभळे पाणी पुरवठा केंद्र येथील सबस्टेशन मधील एल.टी. ट्रांसफार्मरची दुरूस्ती करणेचे काम तांतडीने करुन घेण्यांत आलेत,सदर बाब महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) क नुसार आदेश पारित केलेले आहेत.सदरच्या अधिनियामान्वये केलेली कार्यवाहीचे प्रतीवृत्त स्थायी समितीपुढे अवलोकनार्थ सादर. |
| म.नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले. |
| म.खान मोहम्मद साबीर | इतिवृत्त वाचून कायम करण्यांत यावे. |
| म. सभापती | सन्मा.सदस्यांच्या सहमतीने सदर विषय अवलोकनार्थ सादर झाला आहे. |

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १३ दिनांक ०३/०३/२०२२**

म.न.पा तापी पाणीपुरवठा योजनेच्या बाभळे पाणी पुरवठा केंद्रावरील ६३० के.व्ही.ए ट्रांसफार्मरमध्ये दि.०८/०१/२०२२ रोजी संध्याकाळी आकस्मीक स्पार्क होवुन विदयुत पुरवठा बंद पडला यावेळी सबस्टेशन यार्ड मधील बसवरील जंप ही तुटले. दि.०७/०१/२०२२ व ०८/०१/२०२२ रोजी झालेल्या पावसात ट्रांनफार्मरच्या एच.टी.साईडच्या बुशिंग मध्ये क्रॅक झाल्याने पाण्याच्या संपर्कामुळे मोठा स्पार्क होवुन बुशिंग फुटली व एच.टी.साईड चे स्ट्रड तुटले. बाबत दिनांक ०९/०१/२०२२ रोजी सकाळी श्री.एन.के.बागुल, क. अभियंता यांनी समक्ष पाहणी करुन कळविले.

दि.०९/०१/२०२२ रोजी सदर ट्रांसफार्मर ते ३३ केव्ही /41 होल्ट/ ६३० के.व्ही.ए ची तपासणी करण्यात आली. ट्रांसफार्मरचे टॉप कव्हर ओपन केले असता ऑइल लेव्हल ही कमी झाल्याचे आढळून आले. सदर ट्रान्सफार्मर बंद पडल्याने फिल्टरेशन मोटर्स क्लोरीनेशन सिस्टीम बंद पडली होती. याबाबत म.आयुक्त,सो.अति.आयुक्त सो यांनी तातडीने २४ तासात काम करून घेण्याचे आदेश दिल्याने सब स्टेशन मध्ये कंत्राटदार मे. रेडियन्स इलेक्ट्रिकल्स यांना स्पेअर्स सह बोलवुन त्यांचेकडुन दुरुस्ती काम तात्काळ पूर्ण करवुन दि.०९/०१/२०२२ रोजी रात्री ७:३० वा वीज पुरवठा पूर्ववत सुरू करण्यात आला आहे. सदर काम अत्यंत आवश्यक्र असल्याने मे.रिडियन्स इलेक्ट्रिकल यांचे कडुन करून घेण्यात आले आहे सदर काम करणे करीता ४८,५२६/- मात्र १२ % जी.एस.टी सह आहे.

सदरच्या कामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ (३) क नुसार आदेश पारित केलेले आहेत.सदरच्याअधिनियामान्वये केलेली कार्यवाहीचे प्रतीवृत्त स्थायी समिती कडे पाठविण्याचे निर्देश आहेत.

उक्त नुसार झालेले कार्यवाही बाबत प्रतीवृत मे.स्थायी समितीकडे अवलोकनार्थ सादर झाला आहे. सदर प्रस्तावाची माहिती स्थायी समितीस देण्यांत आली.

सही/-x x x
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक:- १५ | अण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत प्र.क्र.०१ मध्ये प्रबुद्ध कॉलनी / इंदिरानगर या ठिकाणी सामाजिक सभागृह बांधकाम करणेचे निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे. |
| म.नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले. |
| म.नागसेन बोरसे | विषय मंजूर करण्यांत यावा. |
| म. किरण अहिरराव | विषय मंजूर करण्यांत यावा. |

म. सभापती

सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १४ दिनांक ०३/०३/२०२२**

अण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत प्र.क्र. ०१ मध्ये प्रबुद्ध कॉलनी /इंदिरा नगर या ठिकाणी सामाजिक सभागृह बांधकाम करणे बाबतच्या कामास धुळे महानगरपालिका महासभा ठराव नं. १४०अ दि.३०/१२/२०२० म. जिल्हाधिकारी यांचे कडील प्रशासकीय मान्यता, मा.आयुक्त सो. धुळे महानगरपालिका यांनी टिपणी मंजुरीने दि. २६/०३/२०२१ अन्वये उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु.५०,००,०००/-मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./१२५७ /२०-२०२१ दिनांक ०९/०३/२०२१अन्वये रक्कम रु.५०,००,०००/-मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत या धुळे महानगरपालिका जा.क्र./धुमपा/बांवि/ ९१ /२०२०-२१ दि.१८/०६/०२०२१ अन्वये दैनिक देशोन्नती / पथदर्शी या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.०७/०६/२०२१ रोजी निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे /ठेकेदराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | ऋषभ सतोष खिवसरा | शे.२.००% जास्तीने | |
| २ | सचिन नानाभाऊ आखाडे | शे.४.००% कमीने | |
| ३ | हिंद कन्सट्रक्शन | शे.९.९९% कमीने | सर्वात कमी |
| ४ | एकविरा कन्सट्रक्शन | शे.३.०० जास्तीने | |

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **श्री./ मे .हिंद कन्सट्रक्शन** यांचे दर अंदाजपत्रकीय **शे.९.९९% कमीने** आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब सदर काम **शे.९.९९% कमी दराने** आलेले असल्याने यांच्या दरास मान्यतेसाठी मे.स्थायी समिती पुढे मंजुरीस्तव सादर झाला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी **मे.हिंद कन्सट्रक्शन** यांचे दर अंदाजपत्रकीय **शे.९.९९% कमीने** आलेल्या दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी.याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री. नागसेन दामोदर बोरसे
अनुमोदक:- श्री. किरण हरिश्चंद्र अहिरराव

**सर्वानुमते मंजुर,**
सही/-x x x
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- १६ महाराष्ट्र अग्नी सुरक्षा अभियान ( जिल्हास्तर) अंतर्गत धुळे शहरात पांझरा वॉटर या ठिकाणी अग्नीसुरक्षा कर्मचारी करिता निवासस्थान बांधकामाचे निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म.हर्षकुमार रेलन विषय मंजूर करण्यांत यावा.

म. नरेद्र चौधरी विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १५ दिनांक ०३/०३/२०२२**

महाराष्ट्र अग्नी सुरक्षा अभियान (जिल्हास्तर) अंतर्गत धुळे शहरात पांझरा वॉटर या ठिकाणी अग्नीसुरक्षा कर्मचारी करीता निवासस्थान बांधकाम करणे बाबतच्या कामास धुळे महानगरपालिका स्थायी समिती ठराव नं.१५२ दि.३१/०१/२०२० मा. आयुक्त सो. धुळे महानगरपालिका यांनी टिपणी मंजुरीने दि १२/०४/२०२१अन्वये उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु. १,४९,७५,०२३/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./१२२५/२०-२०२१ दिनांक ०८/०३/२०२१ अन्वये रक्कम रु १,४९,७५,०२३/-मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./धुमपा/पा.पु.वि/११२/२०२०-२१ दि १२/०५/२०२१ अन्वये दि. १३/०५/२०२१ रोजी दैनिक पुण्यनगरी या वृत्तपत्रात जाहिर निविदा प्रसिध्द करणेत येऊन दि.०७/०६/२०२१ रोजी निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पध्दतीने बयाण रक्कम भरुन निविदा दर सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे /ठेकेदाराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | समर्थ कन्स्ट्रक्शन | शे.६.११% कमीने | सर्वात कमी |
| २ | राधेय कन्स्ट्रक्शन | शे.५.५० % कमीने | |
| ३ | आशिश एम. पटवारी | शे. ०.९९% कमीने | |
| ४ | श्री स्वामी समर्थ कन्स्ट्रक्शन व | अंदाजपत्रकीय दराने% | |
| ५ | री ओम शिव कन्सट्रक्शन | शे. १.०८% कमीने | |

ल प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून श्री/मे समर्थ कन्सट्रक्शन यांचे दर अंदाजपत्रकीय **शे ६.११% कमीने** आहे व त्यांनी नियमाप्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार श्री /मे. समर्थ कन्स्ट्रक्शन यांनी Performance Security Deposite चा डी.डी. नं ५८४३५९ रु १,४९,८००/- रक्कमेचा दि ०८/०९/२०२१ रोजी बांधकाम विभागाकडे जमा करणेत आलेला असून जा.क्र. /धुमपा/ बां.वि.२३२१ दि १६/०९/२०२१ अन्वये अनामत लिपिक यांचेकडे जमा करण्यात आलेला आहे. सबब सदर

काम **शे.६.११% कमी दराने** आलेले असल्याने यांच्या दरास मंजुरीस्तव मे. स्थायी समिती पुढे मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी **मे समर्थ कन्सट्रक्शन** यांचे दर अंदाजपत्रकीय **शे ६.११% कमीने** आलेल्या दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी.याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री. हर्षकुमार राधेश्याम रेलन

अनुमोदक:- श्री. नरेंद्र रुपला चौधरी **सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- १७ **मोतीनाला साक्रीरोड ते मनोहर हॉस्पीटल पर्यत रस्त्यावर सार्वजनिक बांधकाम विभागाकडील प्राप्त निधीअंतर्गत पोलसह पथदिवे सूविधा करणेचे निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.**

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म.नाजिया पठाण या कामासाठी शहराचे आमदार मा. फारुक शाह यांनी शासन स्तरावर प्रयत्न करुन निधी मंजूर केलेला आहे यासाठी त्यांचे अभिनंदन या निमित्ताने करण्यांत यावे

म.हर्षकुमार रेलन सदर रस्त्याच्या कामासाठी शहराचे आमदार मा. फारुक शाह यांनी निधी मंजूर केलेला होता. व त्याबद्दल मी व्यक्तीश: त्यांचे आभार व धन्यवाद व्यक्त केलेले आहे. तथापि सदरचा प्रस्ताव हा रस्त्यावर पथदिवे सुविधा करण्यांचा आहे. या कामासाठी मी स्वत: सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पाठपुरावा करुन प्रयत्न केलेले आहे. सदर विभागाकडे पथदिवे कामासाठी एजन्सी नसल्याने त्यांनी या कामासाठी असणारा निधी महानगरपालिकेकडे वर्ग केला मी स्वत: त्याठिकाणी जावून निधी आणलेला आहे.व त्यानंतर मनपा मार्फत निविदा प्रक्रिया होवून दर मंजुरीसाठी सदर प्रस्ताव मे. स्थायी समिती समोर सादर झालेला आहे. सदर विषय मंजूर करण्यांत यावा.

म.नागसेन बोरसे विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती **सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.**

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १६ दिनांक ०३/०३/२०२२**

सार्वजनिक बांधकाम विभागाकडील निधी अंतर्गत मोती नाला ते मनोहर हॉस्पिटल, साक्रीरोड येथे नवीन पोलसह पथदिवे व्यवस्था करणे कामाबाबत सार्वजनिक बांधकाम विभाग पत्र क्र.१५७८ दि.२०/१०/२०२१ नुईसार रक्कम रु.३७,२६,८८१ /- मात्र चा निधी धनादेश क्र ८८८८५० दि.१९/१०/२०२१ नुसार प्राप्त झाला आहे.

मा.आयुक्त/ महानगरपालिका यांचे टिप्पणी / प्रशासकीय मान्यता/ दि.२६/१०/२०२२ रोजी अन्वये उक्त कामाबाबत रक्कम **रु.३७,२६,८८१/-** मात्र खर्चास आर्थिक व **प्रशासकीय मंजुरी** देणेत आली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका **जा.क्र./विवी/१२७ दि.२०/०१/२०२२** अन्वये व **दि.२०/०१/२०२२** च्या **दै.दिव्यामराठी / नवराज्य** किंवा धुळे महानगपालिका / महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर खुल्या फेर - ई-निविदा ( दुसरी वेळ) /कोटेशन प्रसिद्ध करणेत येवून **दि.०३/०२/२०२२** रोजी निविदा मागविणेत आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत रोखीने बयाणा रक्कम भरून/लेटर प्याड वर निविदा दर सादर केलेले आहेत.

| **अ.क्र.** | **कंत्राटदाराचे नाव** | **दिलेले निविदा दर** | **शेरा** |
|---|---|---|---|
| १ | **मे,ओम श्री मंगलमुर्ती इलेक्ट्रिकल्स,& contractor,नाशिक** | -९.९९ % Below | **L1** |
| २ | मे.अलसन इलेक्ट्रिकल्स,नाशिक | -५.५५ % Below | |

करिता ठेकेदार **मे,ओम श्री मंगलमुर्ती इलेक्ट्रिकल्स,& contractor,नाशिक** यांचे दर तुलनेत सर्वात कमी असून त्यांनी नियमाप्रमाणे रोखीने बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार **मे,ओम श्री मंगलमुर्ती इलेक्ट्रिकल्स,& contractor,नाशिक** यांनी सर्वात कमी म्हणजेच **<u>अंदाजपत्रकीय दराच्या ९.९९% कमी दराने</u>** आलेले निविदा दर मंजुरीस्तव सादर.तसेच अन्य काम न मिळालेल्या ठेकेदार यांची बयाणा रक्कम परताव्यास मंजुरीस्तव मे. स्थायी समिती पुढे सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून **मे,ओम श्री.मंगलमुर्ती इलेक्ट्रिकल्स & contractor, नाशिक** यांनी सर्वात कमी म्हणजेच **<u>अंदाजपत्रकीय दराच्या ९.९९% कमी दराने</u>** आलेल्या दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री. हर्षकुमार राधेश्याम रेलन
अनुमोदक:- श्री. नागसेन दामोदर बोरसे

**सर्वानुमते मंजुर,**
सही/-x x x
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- १८ — सन २०२०-२१ या वित्तीय वर्षाचे सुधारीत वार्षिक लेखे व पुर्नविनियोजन विवरण पत्रास मान्यता देणेबाबत फेर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.सारिका अग्रवाल — हा विषय आम्हाला समजत नाही. प्रिंट अस्पष्ट आलेली आहे.

म. नागसेन बोरसे — जी प्रत दाखल आहे ती अस्पष्ट आहे. मी मागच्या वेळेस पण आरोप केले होते. बजेटचे आकडे आणि जो लेखा सादर केला आहे यात तफावत होती. त्यात त्यांनी काय केले तर पुर्नविनियोजन मध्ये भरपूर डिपार्टमेंटचे आकडे सोडून दिलेले आहे. प्रत्येक डिपार्टमेंटने लेखी दिले का ? एवढी तरतूद होती. एवढी आवश्यकता आहे. एवढा खर्च झाला यास मंजूरी घेतली का ? याची माहिती दयावी त्या शिवाय हा विषय मंजूर करु नये. विषय नामंजूर करण्यात यावा, याचे कारण असे जर तुमचा बजेट मंजूर नाही. तर सुधारित पण मंजूर होऊ शकत नाही. तर हे लेखे आणले कुठून बजेट आणि सुधारित हे सांगावे. जेणे करुन याला मंजूरी दयावी की नाही हे ठरवू. स्टॅन्डीगची १५ कोटीची तरतूद देवपूरसाठी केली होती. त्यावर अदयाप कुठलीच

कार्यवाही केली नाही. स्टॅण्डींगचे बजेट मान्य आहे तर त्या सहया का होत नाही ? आमचा या विषयाला विरोध आहे.

म.दिनकर जाधव — यापूर्वीच्या सभेत जे स्टेटमेंट सादर केले होते. ते नजरचूकीने आणि अनावधानाने झालेले होते आमच्या कर्मचाऱ्याकडून सन १९-२० चे अंदाजपत्रकातील रकमा त्यात नमूद करण्यात आल्या होत्या. यात आकडयात रिसिप्ट व एक्सपेंडीचर मध्ये एकही रुपयाची तफावत नाही. जेवढी जमा तेवढीच आहे. एक एक रुपयाचा हिशोब आपल्या जवळ आहे.मी सविस्तर अहवाल सर्व सदस्यांना देऊ शकतो त्यात काही अडचण नाही.

म.सभापती — हा विषय सारीका ताईंना समजावून सांगा. का आला ? कशासाठी आला? आणि काय विषय आहे ?

म.दिनकर जाधव — वार्षीक लेखे आपण दर वर्षाला मंजूर करतो. पूर्ण वर्षभरात जेवढी जमा झाली आणि खर्च झाला त्या जमा खर्चाला आपण मंजूरी देतो. प्रत्येक वर्षाला आपण मूळ अंदाजपत्रक करतो. त्या अंदाजपत्रक मध्ये त्या हेड खाली किती खर्च लागणार आहे. त्याची तरतूद करतो. तरतूद केल्यानंतर आठ महिने प्रत्यक्ष खर्च व पुढील ४ महिने अंदाजित खर्च यांचा ताळमेळ करतो. बऱ्याच वेळी वेळोवेळी महत्वाच्या हेडवर अधिकचा खर्च होतो. हा खर्च वर्ष संपल्यानंतर पुढच्या वर्षात जुलै महिन्यात जमा खर्चाचा अंदाज स्टॅण्डींग पुढे सादर करतो सर्व मांडल्यानंतर आपण मंजूरी घेतो.

म.नागसेन बोरसे — तुम्ही ८ महिन्यापूर्वी सादर करायला पाहिजे होता. २१-२२ चा बजेट मंजूर नसेल तर सुधारित मंजूर होऊ शकत नाही. कारण ज्या अर्थसंकल्पात सुधारित आणि मूळ अंदाजपत्रकात एकाच वेळेस येते.

म.सभापती — स्थायी समीती ने २०-२१ सुधारित आणि २१-२२ चा बजेट हा मागच्या सभापतींनी मंजूर केलेला आहे.

म. नागसेन बोरसे — सुधारित कसा येऊ शकतो ? महासभेला आलेला तो स्थायीने मंजूर केला.

म.सभापती — मग महासभेचा प्रश्न तुम्ही कसे उपस्थित करता आहात ?

म. नागसेन बोरसे — यांनी मंजूर केले का? जर मंजूर नसेल तर याला मंजूरीचा अधिकार नाही. आमचा या विषयाला विरोधआहे.

म.सभापती — सन्मा. सदस्यांचा विरोध नोंदवून घ्या.

म. हर्षकुमार रेलन — या विषयावर अति. आयुक्तांना प्रश्न केला होता. तुम्ही स्पष्टता दया. हया बजेटचा कोरम बरोबर होता का ? २१-२२ चा अर्थसंकल्प मंजूर झालेला आहे का?

म.सभापती — आपल्या कडून मंजूर झालेला आहे. सदस्यांकडून इतिृत्तात वाचन झाले.

म. नागसेन बोरसे — कोणती तरतूद घेतली महासभेची? मंजूर कसं काय म्हणताय तुम्ही?

म.सभापती — आपण इतिवृत्ताचे वाचन केले होते.. बजेट संबंधी नगरसचिव यांनी खुलासा करावा.

म.नगरसचिव — महासभेची जी मिटींग झाली इतिवृत्त मंजूरीची बजेटचा विषय सुध्दा त्या महासभेत होता. वाचन होऊन त्या महासभेत इतिवृत्त कायम करण्यात आले आहे.

म.नागसेन बोरसे — ऑनलाईनच्या माध्यमातून आमची फसवणूक झाली आहे इतिवृत्तात वाचून कायम करणे इतिवृत्त वाचले जात नाही.

म. नगरसचिव — इतिवृत्त आपल्या घरापर्यंत पोहचवले जाते. याचा अर्थ असा की इतिवृत्त वाचले गेले. प्रत्येक वेळेला पूर्ण इतिवृत्ताचे वाचन होत नाही. जेव्हा इतिवृत्त घरपोच दिले असते इतिवृत्त वाचून झाले आहे असे समजून कायम केले जाते.

| | |
|---|---|
| म. नागसेन बोरसे | ज्या वेळेला इतिवृत्त आले आमची प्रकृती बरोबर नव्हती.आम्हाला वेळ नव्हता आम्ही अचानक सभेत आलो. इतिवृत्त वाचन झाले असेल. महासभा कायम झाली असेल. महासभेच्या अर्थ संकल्पात तरतूद केली ती तरतूद करण्यात आली याचा अर्थ काय होतो ? |
| म.सभापती | असे आपल्याला कोणाकडून ही लेखी आले नाही. |
| म. नागसेन बोरसे | आले आहे. आताचे बजेट वाचा तुम्हाला सादर केलेले. |
| म.सभापती | त्यावर चर्चा बाकी आहे. आपण ज्या वेळेस बजेटची येईल त्या वेळेस बोलू. |
| म. नागसेन बोरसे | लेखे मंजूर होते बजेटचे पूर्नविनियोजन मंजूर होते बजेटचे. त्यालाच मंजूरी दिली नाही तर पुढचा विषय येणार नाही. आमचा २१-२२ चा बजेट मंजूर नाही. २२-२३ चा विषय येत नाही. आम्ही याला विरोध करतोय. विरोध नोंदवलेला आहे विषय संपलेला आहे. |
| म. हर्षकुमार रेलन | मला यावर उत्तर अपेक्षित आहे. |
| म.अति. आयुक्त | महासभेत मंजूर केला आहे. |
| म.हर्षकुमार रेलन | आमची जी कामे होती.३० लाखाप्रमाणे तरतूद होती असे मला वाटते. माझी जी कामे आहे मला डी यादी मध्ये टाकले आहे.माझे कामे ए.बी,सी मध्ये नाही. त्यावबद्दल का बरं असा व्यवहार करता. आपण त्यांना ३ दिवसांची वेळ दिली होती. माझी १९-२०,२०-२१,२१-२२ कामांची यादी कुठे आहे? मी शिपाई आहे का? प्रत्येक टेबलावर फाईल घेऊन जाणार ही कोणाची जबाबदारी आहे? प्रत्येक टेबलावर मी जायचे का ? |
| म.कैलास शिंदे | यांचा प्रभाग सी.सी. बागुल यांच्याकडे सोपवण्यात आला आहे. मिटींग संपल्यावर सन्मा. सदस्यांचा आयुक्त सो. दालनात त्यांच्या समक्ष सगळया गोष्टी सांगीतल्या त्यांचे प्रकरण लेखा विभागाकडे पोहचले. त्यांनी नोंद करुन पाठवले होते. नगररचनाला गेल्यानंतर अभिप्राय मध्ये क्लीअर होऊन आले. तोपर्यंत वेळ निघून गेली होती. बागुल सो.नी अति.आयुक्तांना समक्ष पाठवले आवश्यक अभिप्राय नोंदवून पाठवलेले आहे ते प्रकरण पण सापडले आहे.राहिली गोष्ट मागचया वर्षाची ती तरतूद नसल्यामुळे करु शकलो नाही. त्याला पण विलंब झाला होता. त्यांच्याकडून पत्रक घेऊन ते चालू वर्षात सो. नी मंजूरी पण घेण्यात आली आहे. पुढची कार्यवाही तातडीने करु. |
| म.हर्षकुमार रेलन | आपण मला सांगीतले बजेट मंजूर होणार नाही. कामे होणार नाही. म्हणून तुम्ही पत्र दया. हे पुढच्या वर्षात करा. माझ्याकडून पत्र घेतले ते याच अनुषंगाने घेतले.माझे बाकीचे पत्र दिले ते पत्र पण सापडत नाही आहे. बागुल सो. बोलले तुमचा फॉलोअप कमी आहे. मग तुम्हाला काय अपेक्षित आहे? माझे एकही कामे त्यांनी केलेले नाही. आता ते म्हणतात ती लॅप्स झाली. मी प्रकरणे उशिरा दिली का? मी माझ्या प्रस्तावित कामांची यादी वेळेतच दिली. |
| म.सभापती | मी स्थायीत आजच आदेशित करतोय. ज्यांच्यामुळे हा विलंब झाला आहे. त्यांना नोटीस आजच गेल्या पाहिजे. शासकीय कामे वेळेत न करण्यात जी कार्यवाही आपल्या नियमाप्रमाणे केली पाहिजे. ती देखील झाली पाहिजे. माझी विनंती आहे.तुम्ही जी कार्यवाही कराल त्याची कॉपी माझ्याकडे आली पाहिजे. |
| म.हर्षकुमार रेलन | साहेब कामाची यादी डी मध्ये टाकली ती ए मध्ये का आली नाही? ए मध्ये कोणाला टाकायचे डी मध्ये कोणाला टाकायचे हे कोण ठरवणार? माझेच कामे टाकले नाही डी मध्ये आयुक्तांचे कामे काय आहे? त्यांचे कर्तव्य काय आहे? आयुक्तांचे हे कामच नाही की, एखादया नगरसेवकाचे काम घ्यायचे नाही आणि एखादया नगरसेवकाचे २०-२० कामे घ्यायचे. आयुक्तांची सर्वांना समान न्याय दिला पाहिजे. माझ्या कामांना मुद्दाम डी यादीत टाकले मग ही आयुक्तांची चुक नाही का? हे काम आयुक्तांचे आहे त्यांनी न्याय दिला पाहिजे. |
| म. सभापती | आपल्या जेवढा बजेट मंजूर आहे. त्याच्या बाहेर तर होणार नाही. |

म.हर्षकुमार रेलन — बजेट मूळे माझेच कामे पेंडीग ठेवणार का? एका नगरसेवकाचे ७० कामे घेतली आहे. आम्ही मालमत्ता करत भरत नाही का? आमच्या वार्डातले सर्व टॅक्स भरतात.

म.सभापती — शिंदे साहेब हे चुकीचे आहे. तुमचे लोकं सांगूनपण कामे करत नाही. आजच त्यांना कारणे दाखवा नोटीस गेल्या पाहिजे. त्यांचयाकडून कामे होत नसतील तर अभियंता बदला. त्यांच्यावर कार्यवाही झाली पाहिजे.

म.अति.अयुक्त — ही जी यादया दिले आहे.याचे कारण सन २०-२१ चा वर्ष संपले आहे. कायदयाने अनुज्ञेय नव्हते. प्रोसेस करायची होती. काम कॅन्सल न करता आम्ही यादया बनवल्या,ज्याची वर्क ऑर्डर ३१ मार्च आधी झालेली आहे. काही प्रशासकीय मान्यता झालेल्या आहेत, कोणाची निविदा प्रक्रीया बाकी आहे.

म.हर्षकुमार रेलन — कोणाची प्रशासकीय मान्यता झाली कोणाची नाही झाली हे कोणाचे काम आहे?

म. प्रतिभा चौधरी — एखादया व्यक्तीची ४ कामांचे प्रकरण प्रशासकीय मान्यता मिळाली असेल, तुम्ही A मध्ये टाकाल का? दुसऱ्यांचे नसेल झालेले त्याचे काम पेंडींग राहील का ? १८ नंबर विषयाला विरोध आहे.

म. खान मोहम्मद साबीर — विषय मंजूर करण्यांत यावा.

म.सभापती — आपण महापौरांच्या दालनात बैठक घेऊ.बजेट मंजूर करायचा अधिकार आपल्याकडे आहे. सर्व सन्मा. सदस्य एकत्र बसून निर्णय घेऊ. सदर सादर झालेल्या लेख्यास सन्मा.सदस्यांचा विरोध नोंदवून बहुमताने मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १७ दिनांक ०३/०३/२०२२**

सन २०२०-२१ या वित्तीय वर्षाचे लेखे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९४ अ नुसार व लेखासंहिता १९७१ नियम ६० व नमुना क्रं. २८ नुसार सुधारीत तयार केलेले असून सोबत नमुना नं. १० पुनर्विनियोजन विवरणपत्र लेख्यांचा सारांश मे. स्थायी समितीपुढे फेर मान्यतेस्तव सादर करण्यांत आलेला आहे.

सन्मा.सदस्यांनी केलेल्या चर्चेनुसार व लेखा विभागामार्फत सन २०२०-२१ या वित्तीय वर्षाचे लेखे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९४ अ नुसार व लेखासंहिता १९७१ नियम ६० व नमुना क्रं. २८ नुसार सादर झालेल्या सुधारीत लेख्यास व पुनर्विनियोजन विवरणपत्र लेख्यांचा सारांश यास बहुमताने मान्यता देण्यांत येत आहे.

सदर प्रस्तावास सन्मा.सदस्य श्री.नागसेन बोरसे सौ.प्रतिभाताई चौधरी,सौ. सारिकाताई अग्रवाल सौ.किरणताई कुलेवार यांनी विरोध दर्शविलेला असून सदर विरोधाची नोंद घेण्यांत येत आहे. सुचक :- श्री. खान मोहम्मद साबीर मुहिबुल्लाह

अनुमोदक:- श्री.जाधव बन्सीलाल माणिक

**बहुमताने मंजुर,**
सही/-x x x
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

## धुळे महानगरपालिका , धुळे

**नमुना १० नियम - ३० पहा पुर्नविनियोजनाचे विवरणपत्र (सन २०२०-२१)**

(रूपये लाखात)

| अ. क्र. | या शिर्षातून | | | | | हया शिर्षात | | | | | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | प्रधान गौण व तपशिलवार शिर्ष | गौण व तपशिलवार शिर्ष | मूळ अनुदान | आजपर्यंत झालेला खर्च | उपलब्ध निधी | प्रधान गौण व तपशिलवार शिर्ष | गौण व तपशिलवार शिर्ष | मूळ अनुदान | आजपर्यंत झालेला खर्च | प्रस्तावित वाढीची रक्कम | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| १ | आरोग्य सुखसोई | पाणीपुरवठा | २८१८.३१ | २४१९.०७ | ३९९.२४ | सामान्य प्रशासन | जकात | ३५९.७३ | ३८१.८८ | २२.१५ | |
| | | | | | | सामान्य प्रशासन | परतावे | ४१.०० | ४४.३३ | ३.३३ | |
| | | | | | | सामान्य प्रशासन | डीसीपीएस | १७०.०० | १७२.६२ | २.६२ | |
| | | | | | | सार्वजनीक सुरक्षीततात | रस्त्यावरील दिवाबत्ती | ९७७.०० | १०१८.०४ | ४१.०४ | |
| | | | | | | आरोग्य सुखसोई | स्टेडीयम | ०.०० | ५.९० | ५.९० | |
| | | | | | | संकिर्ण | शेतीचाबी शेतसारा | ४०.०० | ७६.८१ | ३६.८१ | |
| | | | | | | संकिर्ण | बर्गवारी | १६.०० | ९५.६३ | ७९.६३ | |
| | | | | | | संकिर्ण | अमत मिशन हिस्सा | ०.०० | १०.१५ | १०.१५ | |
| | | एकू | २८१८.३१ | २४१९.०७ | ३९९.२४ | | एकूण | १६०३.७३ | १८०५.३६ | २०१.६३ | |

***सदर शासन निधी अंतर्गत प्राप्त निधीच्या शिल्लकेतुन १२७६५.८२ ची गुंतवणुक करण्यात आली आहे.**

**बहुमताने मंजुर,**
सही/-x x x
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

# धुळे महानगरपालिका,धुळे

## नगरसचिव कार्यालय

### स्थायी समिती सभा क्रमांक ६ चे इतिवृत्त

---

**धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह, धुळे**
**बुधवार दिनांक १६/०३/२०२२**
**वेळ सकाळी ११-०० वाजतां**

धुळे महानगरपालिकेची ऑनलाईन स्थायी समितीची सभा क्रं.६ आज बुधवार दिनांक १६/०३/२०२२ रोजी सकाळी ११-०० वाजतां **श्री. शितल मोहन नवले, सभापती,** स्थायी समिती,मनपा धुळे यांच्या अध्यक्षतेखाली **धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह** भरली. या ऑन लाईन सभेस खालील सन्मा.सदस्य ऑन लाईन व ऑफ लाईन हजर होते.

| अ.क्रं. | सदस्यांचे नांव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. नवले शितल मोहन | सभापती |
| २ | श्री. बोरसे नागसेन दामोदर | सदस्य |
| ३ | श्री. जाधव बन्सीलाल माणिक | सदस्या |
| ४ | श्री. अन्सारी फातमा नुरुल अमीन | सदस्या |
| ५ | श्री. चौधरी नरेंद्र रुपला | सदस्य |
| ६ | श्री.अहिरराव किरण हरिचंद्र | सदस्य |
| ७ | श्री. रेलन हर्षकुमार राधेश्याम | सदस्य |
| ८ | श्री. अन्सारी अब्दुल लतीफ अब्दुल हमीद | सदस्य |
| ९ | श्री. खान मोहम्मद साबीर मुहिबुल्लाह | सदस्य |
| १० | श्रीमती पठाण नाजियाबानो नासिर खा | सदस्या |

उपस्थित अधिकारी गण

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. नितीन कापडनीस | अति. आयुक्त |
| २ | श्रीमती शिल्पा नाईक | उपायुक्त |
| ३ | श्रीमती पल्लवी शिरसाठ | सहा. आयुक्त |
| ४ | श्री. एन.प. सोनार | सहा. आयुक्त |
| ५ | श्री मनोज अरविंद वाघ | नगरसचिव |
| ६ | श्री. के. एन. शिंदे | अभियंता |
| ७ | श्री. बी.एस. रनाळकर | प्र.मुख्य लेखाधिकारी तथासहा. कर मूल्य निर्धारण अधिकारी |
| ८ | श्री. चंद्रकांत जाधव | सहा.आरोग्याधिकारी |
| ९ | श्री. विकास साळवे | स्वच्छता निरीक्षक मलेरिया |

| | | |
|---|---|---|
| १० | श्री. प्रकाश सोनवणे | नगररचना ओव्हरसिअर |
| ११ | श्री. संजय मोरे | प्र. कार्यालय अधिक्षक |
| १२ | श्री. एन.के. बागल | विद्युत अभियंता |
| १३ | श्री. सी.सी. बागुल | पा.पु. ओव्हरसिअर |
| १४ | श्री.श्री. हेमंत पावटे | ओव्हरसिअर बां.वि. |
| १५ | श्री.राजेश् गायकवाड | ब.लि. मनपा शि.मं. |
| १६ | श्री. राजू माईनकर | भांडारपाल |
| १७ | श्री. किशोर सुडके | बाजार विभाग |
| १८ | श्री. सुक्राम राऊत | वाहन विभाग |

मा. सभापती — सन्मा.सदस्य मा.आयुक्त सो. सर्व अधिकारी कर्मचारी व पत्रकार, छायाचित्रकर बांधव यांचे मी स्थायी समितीच्या बैठकीत स्वागत करतो.सभेचा कोरम पुर्ण झाला असुन नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरु करावे.

म. नगरसचिव — वंदे् मातरम् या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

म. नगरसचिव — आज महाराष्ट्रसह तीन राज्यामध्ये बी.एस.एन.एल.नेटवर्क इंटरनेटला तांत्रिक अडचणी आल्यामुळे इंटरनेट सुविधा पूर्णपणे बंद झालेली आहे. त्यामुळे आजची बैठक ऑफ लाईन पध्दतीने सुरु करण्यांत येत आहे.

**सभेच्या सुरुवाती सन्मा. सदस्यांचे आलेला रजेचा अर्ज.**

सन्मा. सदस्या श्रीमती प्रतिभाताई शिवाजीराव चौधरी यांनी आजच्या सभेस खाजगी कारणामुळे उपस्थित राहू शकत नसल्याने रजा मिळणेबाबत विनंती केली आहे.

म. सभापती — सन्मा. सदस्यांच्या विनंतीनुसार रजा मंजूर करण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १८दिनांक१६/०३/२०२२**

सन्मा. सदस्या श्रीमती प्रतिभाताई शिवाजीराव चौधरी यांनी आजच्या सभेस खाजगी कारणामुळे उपस्थित राहू शकत नसल्याने रजा मिळणेबाबत विनंती केली आहे.

सन्मा. सदस्यांच्या विनंतीनुसार रजा मंजूर करण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**
सही/-x x x
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक :- १९ — मागील स्थायी समिती सभांचे इतिवृत्त क्रमश: वाचून कायम करणे. (दि.२४/२/२०२२, ३/३/२०२२)

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.हर्षकुमार रेलन — इतिवृत्त वाचून कायम करण्यांत यावे.

म.सभापती — सन्मा. सदस्यांच्या सहमतीने मागील स्थायी समिती सभांचे इतिवृत्त क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १९ दिनांक १६/०३/२०२२**

मागील स्थायी समिती सभा दिनांक २४/०२/२०२२ चे धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ३ ते १० अखेर तसेच सभेत सन्मा. सदस्यांनी उपस्थितकेलेली चर्चा व त्यावरील निर्णय क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

तसेच स्थायी समिती दिनांक ०३/०३/२०२२ चे धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ११ ते १७ अखेर तसेच सभेत सन्मा. सदस्यांनी उपस्थितकेलेली चर्चा व त्यावरील निर्णय क्रमशः वाचून कायम करण्यांत येत आहे. सही/-x x x

**सभापती ,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक :- २० मा.आयुक्त सो. यांनी त्यांचे आलेल्या अधिकारात रुपये ५ लाख ते २५ लाखापर्यंत बांधकाम विभागाकडील विकास कामाची दि.११/२/२०२२ ते दि.२५/२/२०२२ अखेर निर्गमित केलेल्या कार्यादेशाची यादी अवलोकनार्थ सादर.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.सभापती सदर विषयांची माहिती स्थायी समितीस देण्यांत आली.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २० दिनांक १६/०३/२०२२**

मा.आयुक्त सो. यांनी त्यांचे आलेल्या अधिकारात रुपये ५ लाख ते २५ लाखापर्यंत बांधकाम विभागाकडील विकास कामाची दि.११/२/२०२२ ते दि.२५/२/२०२२ अखेर निर्गमित केलेल्या कार्यादेशाची यादी अवलोकनार्थ सादर.

| अ. क्र | कार्यादेश क्रमांक | दिनांक | कामाचे नाव | रक्कम | निधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | ५५१ | ११/०२/२०२२ | विद्यानगर भागात श्रीकृष्ण मंदिराजवळ कॉंक्रीट गटार करणे. | ७,९९,२५७/- | आमदार निधी अंतर्गत |
| २ | ५५२ | १७/०२/२०२२ | प्रभाग क्र १६ . सत्य साईबाबा सो. मध्ये उषा कुलकर्णी यांच्या घरापासुन ते भूषण तवर पर्यंत व संजय वैसाणे ते रॉय घरापर्यंत रस्ता करणे | ९,८७,९७६/- | दलित वस्ती सुधार योजना |
| ३ | ५५३ | १७/०२/२०२२ | प्रभाग क्र १६ . सत्य साईबाबा सो. मध्ये विजय पाटील घरापासून ते परदेशी यांच्या घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | ९,८३,५६६/- | -----" ------- |
| ४ | ५५४ | १७/०२/२०२२ | प्रभाग क्र १६ . सत्य साईबाबा सो. मध्ये उत्कर्ष क्लास ते सुर्यवंशी घरापर्यंत व खैरनार घरापासून ते मोरे घरापर्यंत व महेंद्र पाटील ते स्वामी समर्थ केंद्र व विजय पाटील घरापर्यंत रस्ता कॉंक्रीट करणे. | २४,८५,१३७/- | -----" ------- |
| ५ | ५५५ | १७/०२/२०२२ | प्रभाग क्र १६. देवचंद नगर बोर्डपासुन ते नारायण घालवले रस्ता डांबरी करणे. | १४,९८,९४५/- | -----" ------- |
| ६ | ५५६ | १७/०२/२०२२ | प्रभाग क्र १६ . देवचंद नगर मध्ये श्री चागरे ते राजेंद्र पवार यांच्या घरापर्यंत रस्ता डांबरी व गटार करणे. | १४,९०,०७५/- | -----" ------- |
| ७ | ५५७ | १७/०२/२०२२ | प्रभाग क्र १६ . सत्य साईबाबा सो. मध्ये उत्कर्ष क्लास ते सुर्यवंशी घरापर्यंत व खैरनार घरापासून ते मोरे घरापर्यंत व महेंद्र पाटील ते स्वामी समर्थ केंद्र व विजय पाटील घरापासुन ते परदेशी यांच्या घरापर्यंत गटार करणे. | २४,९३,३४०/- | -----" ------- |
| ८ | ५५८ | २२/०२/२०२२ | प्र.क्र.१९ मध्ये हातिम पठाण यांच्या घरापासून ते आलमगीर ठेकेदार यांच्या घरापावेतो रस्ता कॉंक्रीट करणे. | ७,४६,१३३/- | रस्ता दुरुस्तीअंतर्गत सन २०२१-२२ |
| ९ | ५६१ | २२/०२/२०२२ | प्र. क्र.१३ मध्ये मनोहर टॉकीज मागील भागातील आंबेडकर चौकापासून ते भंगार बाजार पर्यंत रस्ता करणे.(सिमेंट कॉंक्रीट रस्ता) | १९,९५,६०१/- | साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत |
| १० | ५६२ | २२/०२/२०२२ | निळा चौक भागात किरण जोंधळी यांच्या घरापासुन ते आण्णा साळवे यांचे घरापर्यंत नाल्या किनारी रस्ता डांबरीकरण करणे. | १८,९४,५६४/- | -----" ------- |
| ११ | ५६३ | २२/०२/२०२२ | प्र.क्र.१८ मध्ये अवधान गावात सुकलाल आबा यांचे घरा जवळील मनपाचा जागेतील सार्व.विहिरीचे खोदकाम करणे व जाळी बसविणे. | ६,९८,१४७/- | पंपिंग स्टेशन निगा व दुरुस्ती |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १२ | ५६४ | २५/०२/२०२२ | प्र.क्र.७ मध्ये जामा मस्जिद ते साहीद शाह यांच्या घरापावेतो रस्ता कॉक्रीट करणे. | ९,९९,०१५/- | साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत |
| १३ | ५६५ | २५/०२/२०२२ | प्र.क्र.१३ मध्ये मनोहर टॉकीज पाठी मागील भागातील आंबेडकर चौकात धम्मदीप बौध्द विहाराच्या तिन्ही बाजूचे रस्ते कॉक्रीटीकरण करणे. | १४,९१,३७४/- | -----" ------- |
| १४ | ५६६ | २५/०२/२०२२ | प्र.क्र.७ मध्ये श्री.प्रविण विसपुते यांच्या घरापासून ते सुरेश माणिक चव्हाण यांच्या घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | ५,९७,७९६/- | -----" ------- |
| १५ | ५६७ | २५/०२/२०२२ | प्र.क्र.१८ मध्ये जयश्री हौसिंग सो. ते श्रीमती लताबाई यांच्या पर्यंत रस्ता कॉक्रीट करणे. | १०,९६,१२६/- | -----" ------- |
| १६ | ५६८ | २५/०२/२०२२ | प्र.क्र.७ मध्ये यशवंत जोशी ते आबा वाणी यांच्या घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | ५,९७,७९६/- | -----" ------- |
| १७ | ५६९ | २५/०२/२०२२ | प्र.क्र.१८ मध्ये सहजीवन नगर ते लक्ष्मी नगर ला जोडणारा रस्ता करणे. | ६,९९,१८२/- | -----" ------- |
| १८ | ५७० | २५/०२/२०२२ | प्र.क्र.७ मध्ये विद्या विकास प्राथमिक शाळा ते मयूर भाऊ कोळे राकेश कुलेवार घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | ८,९०,८३२/- | -----" ------- |
| १९ | ५७१ | २५/०२/२०२२ | प्र.क्र.७ मध्ये श्री.दतात्रय भिल यांच्या घरापासून ते पंजाबी यांच्या घरा पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | ६,९७,२७७/- | -----" ------- |
| २० | ५७२ | २५/०२/२०२२ | प्र.क्र.१८ मध्ये नायर मॅडम यांच्या घरापासून ते संतोष अग्रवाल घरापावेतो पाईप कलव्हर्ट करणे. | ९,९६,०४४/- | -----" ------- |
| २१ | ५७५ | २५/०२/२०२२ | प्र.क्र.७ मध्ये लालखान किरणा दुकानापासून ते दिंगवर सुकलाल यांच्या घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | ६,९४,१२९/- | -----" ------- |
| २२ | ५७६ | २५/०२/२०२२ | प्र.क्र.७ मध्ये डॉ.अहिरराव ते अशोक टेलर दुकान पावेतो रस्ता डांबरीकरण करणे. | ६,९४,१२९/- | -----" ------- |
| २३ | ५७७ | २५/०२/२०२२ | प्र.क्र.७ मध्ये मोगलाई जाळीवाला पुलास संरक्षण भिंत बांधणे. | १७,५८,०३१/- | -----" ------- |
| २४ | ५७८ | २५/०२/२०२२ | प्र.क्र.१५ मध्ये एल.आय.सी.कॉलनी व बाळाप्पा कॉलनी भागातील रस्ते डांबरीकरण करणे. | १९,९४,२४३/- | -----" ------- |
| २५ | ५७९ | २५/०२/२०२२ | प्र.क्र.१५ मध्ये अशोक नगर भागात रस्ते डांबरीकरण करणे. | १४,८७,२३७/- | -----" ------- |
| २६ | ५८० | २५/०२/२०२२ | वलवाडी येथील गौतम नगर भागात श्री.थोरात यांचे घरापासून ते तायडे यांचे घरापर्यंत रस्ता कॉक्रीट करणे. | १९,९७,५५४/- | -----" ------- |
| २७ | ५८१ | २५/०२/२०२२ | प्र.क्र.११ मध्ये बाळापुर येथे एकता नगर पारोळा रोड हायवे ते किसन भिल ते चंदू दगा मोरे ते आत्माराम चौधरी यांचे घरापर्यंत ४" HDPE पाईपलाईन टाकणे. | ५,४६,४७६/- | मनपा निधी( नगरसेवक निधी) |

उक्त यादीचे वाचन करुन सभागृहास अवगत करण्यांत आले.

सही/-x x x

**सभापती ,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक :- २१ अमृत अभियाणाअंतर्गत धुळे मलनि:स्सारण योजना ता. व जि.धुळे योजनेतील पंपींग मशिनरीचा पुरवठा, उभारणी, कार्यान्वयन करणे व यशस्वी चाचणी करणे याकामास धुळे महानगरपालिकेच्या मान्यतेचाठराव मिळणे बाबत महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग जळगाव यांनी पत्र सादर केलेले आहे. त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.नाजिया पठान या योजने अंतर्गत पाईप लाईन टाकण्याचे जे काम केले होते त्या त्यांनी अर्धवट कामे केलेली आहे. याला मंजूरी देणे गरजेचे आहे काय? या विषयाला मंजूरी देऊ नये.

| | |
|---|---|
| म. नरेश चौधरी | सर्व अधिकारी व मनपाला माहिती आहे देवपूर भागाची परिस्थिती कशी आहे. जेथे जेथे ही योजना राबवली गेली तिथे खड्डे पडलेले आहे. निकृष्ट दर्जाचे काम या परिसरात झाले आहे. सर्व काम अपूर्ण आहे. असे असतांना हा विषय विषयपटलावर यायला नको होता. हा विषय नामंजूर करण्यात यावा. |
| म.हर्षकुमार रेलन | या विषयावर २०१७ पासून काम सुरु आहे. मागे पण शहरात या विषयाची चर्चा होती. किती आणि कुठे काम झाले याबाबत मनपाला माहित असण्याची गरज नाही. कारण हे काम एम.जी.पी. करते आहे. पण आपण २५% हिस्सा त्यांना दिला आहे. म्हणून आपल्याला जाणून घेण्याचा हक्क आहे. हे काम आजपर्यंत किती झालेले आहे? २०१७ पासून काम सुरु आज २०२२ चालू आहे. ही योजना अजूनही अपूर्णच आहे. पण हे नेमके काय सुरु आहे? कुठे झालेले आहे? आजपर्यंत ५ वर्षानंतर गल्ली मध्ये पाईप पडलेले दिसतात. २०१७ चा ठराव बघीतला हा विषय एम.जी.पी. ला देण्यास विरोध होता की, ही योजना मनपाने करायला हवी. पण शासनाने त्यांना दिली. मनपाच्या मंजूरीची आवश्यकता नाही असे तेच लिहून देत आहेत. ते कामच आपल्याला माहीत नाही. किती काम बाकी? किती काम होणार आहे? ते माहित नाही कुठपर्यंत होणार आहे माहिती नाही. मग हा विषय का विषयपटलावर आला याचा खुलासा करावा. |
| म.नागसेन बोरसे | हा प्रस्ताव स्थायी समोर कशासाठी आला आहे? यातली कुठली मान्यता त्यांना पाहिजे आहे? या विषयावर खुलासा करावा. एम.जे.पी. च्या कार्यकारी अभियंत्याने खुलासा करायचा आहे. ते का आले नाही? आपल्याकडून काय अपेक्षित आहे यावर खुलासा करावा. |
| म.सभापती | महाराष्ट्र जिवन प्राधिकरण कडून कोण आले आहे? |
| म.बहादुरे (एम.जे.पी) | मेकॅनिकलचा जो पार्ट आहे त्यासाठी स्थायीची मंजूरी आवश्यक आहे. पंपींग मशिनरीची स्वतंत्र निविदा आहे. त्याची कॉस्ट २.७७ लाख इतकी आहे. याची स्वतंत्र निविदा काढतोय. स्वतंत्र निविदा असल्यामुळे निविदेची प्रकीया चालू आहे. प्रस्ताव जो आहे तो एस.एल.टी.सी. समोर आहे. एस.एल.टी.ला मनपाचा ठराव हवा आहे. अभियंता सो. पत्र दिले आहे ठराव जोडणे आवश्यक आहे. |
| म.सभापती | या योजनेत मेकॅनिकल पार्ट किती व सिव्हील चा पार्ट किती होता? |
| म.बहादुरे (एम.जे.पी) | एस.टी.पी. जो आहे त्यात सिव्हील व मेकॅनिकल कामे दोन्ही एकत्र असतात. पंपींग मशिनरीचे छोटे टेंडर आहे. ते सेपरेट आहे. हा जो विषय आलेला आहे. त्यात मॅकेनिकल मशिनरी चा पंपींग पार्ट आहे त्या विषयीचा आहे. |
| म.सभापती | महापालिकेवर दोषारोप होतो. खड्डे पडलेले आहे ही योजना राज्य शासनाच्या आखत्यारित आहे. हीची कन्सलटन्सी पण राज्य शासन आहे. हीची एक्झीबिशन टीम पण राज्य शासन आहे. पण काही करण नसतांना यात मनपाला बदनाम केले जाते. यांचे वर्कींग बरोबर नाही. यांची सिस्टीम बरोबर नाही. यांची काम करण्याची पद्धत चुकते आहे. तुम्हाला आमच्या दिलेल्या पत्राची किंमत नाही का? मी दोन्ही एक्झीक्युटीव्ह इंजिनिअरला बोलवले होते? |
| म.बहादुरे (एम.जे.पी) | अधिक्षक अभियंता टेंडर ओपनिंग प्रोसेस करता नाशिकला आहे. त्या समितीत असल्यामुळे त्यांना वैयक्तीक हजर रहावे लागते. |
| म.सभापती | मला कमीटया माहीती आहे. जेवढी तुम्हाला कमीटी महत्वाची तितकीच आम्हाला स्थायी महत्वाची आहे. |
| म.बहादुरे (एम.जे.पी | हे टेंडर मेकॅनिकलचे आहे. त्याचा एक्झीक्युटिव्ह इंजिनिअर मी आहे म्हणून मी स्वत: हजर आहे. |
| म.सभापती | हो पण आम्ही पत्र दोघांना दिले आहे.आम्हाला दोघांमध्ये प्रॉब्लेम आहे. |

म.नागसेन — यांनी जे कामे केले याची मनपाकडून परवानगी घेतली नाही. आज का त्यांना आवश्यकता वाटली? हा विषय स्थगित करा. चर्चा करुन विषय पुढे नेऊ. जोपर्यंत आमचे समाधान होत नाही.

म.साबिर खान — यांचा एक अधिकारी येथे तर दुसरा नाशिकला आहे. समजत नाही काय करत आहे? कुठे काम करत आहे? आणि हे फक्त मंजूरीसाठी आले आहे. यांचे काम काय? किती काम आहे? यांच्या अधिकाऱ्यांची माहिती तर झाली पाहिजे.

म.नागसेन बोरसे — ३-४ वर्षात यांना कामे देऊन बदनाम झालोय. पहिले यांचे कडून बांधून घ्यावे. मग मंजूरी दया. एकही योजना यांनी यशस्वी केली नाही. सत्ताधारी पक्ष बदनाम होतो आहे. याचे उत्तर आपल्याला दयावे लागते. मंजूरी देतांना विचार व्हावा. जनतेने निवडून दिले आहे. त्यांचा हिताचा विचार व्हावा.

म.नरेश चौधरी — देवपूर भागात प्रत्येक गल्लीत खड्डे पडले आहे. चेंबर २-२ फूट वरती आहे. लोकं खड्ड्यांमध्ये पडतात.अपघात होता आहे. सगळे रस्ते दुरुस्ती झाल्यानंतर,समाधान झाल्यानंतर पुढची मंजूरी दयावी.

म.हर्षकुमार रेलन — आता आम्हाला समजले हा एस.टी.पी चा विषय आहे. शहरासाठी एस.टी.पी. प्लांट ची गरज आहे. आज आपल्याकडे शिरपूर,दोंडाईचा,मालेगांव लांब-लांब गावात एस.टी.पी. प्लांट कार्यान्वित आहे. मात्र धुळे शहरात नाही. हा जो विषय २ दिवस आगोदर समजवून सांगीतला असता, विरोध पण केला नसता. कारण एस.टी.पी. ची जास्त गरज आहे. आपण गांभिर्याने विचार करावा. शहराची गरज म्हणून सदस्यांना विश्वासात घेऊन समजवून सांगावा.

म.सभापती — आपण काम व्यवसथीत करत नाही अहात या संदर्भात आमच्या शहर अभियंत्यांनी २३ पत्रे दिले. आपण २३ पत्रांपैकी एकाही पत्राची दखल घेवून उत्तर पाठवले नाही. अतिशय गंभिर बाब आहे. २५ % हिस्सा आमचा आहे. आपण आम्हाला काही न कळवता प्रोजेक्ट कॉस्ट वाढवली शहर अभियंत्यानी सांगीतले आपण बिल त्याचे रेकॉर्ड करता आहेत. ते मेजरमेंट आमच्याकडे पाठवा, लाईन डायग्राम पाठवा,नकाशे पाठवा आपण कुठल्याही प्रकारची माहिती मनपाला कळवत नाही. आम्ही पूर्वी १३० कोटीची मान्यता दिली आहे. निविदेला त्याच निविदे बाबतीत आम्ही समाधानी नाही आहोत. जो पर्यंत ही सर्व माहीती कळवत नाही, संयुक्त बैठक होऊन समाधान होत नाही. तो पर्यंत हा विषय तहकूब ठेवतो.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २१ दिनांक १६/०३/२०२२**

अमृत अभियाणाअंतर्गत धुळे मलनि:स्सारण योजना ता. व जि.धुळे योजनेतील पंपींग मशिनरींचा पुरवठा, उभारणी, कार्यान्वयन करणे व यशस्वी चाचणी करणे याकामास धुळे महानगरपालिकेच्या मान्यतेचा ठराव मिळणे बाबत महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग जळगाव यांनी पत्र सादर केलेले आहे. त्यानुसार सदर प्रस्ताव मे. स्थायी समिती समोर मान्यतेसाठी सादर झाला असता या प्रस्तावाबाबत आवश्यक ती परिपूर्ण माहिती नाही. व संबंधित विभागाचे सक्षम अधिकारी बैठकीस पत्र देऊनही उपस्थित नाहीत. तसेच यापूर्वी महाराष्ट्र जिवन प्राधिकरण मंडळामार्फत सुरु असलेल्या भूमिगत गटार योजनेच्या कामांबाबत अनेक तक्रारी असल्याने व काम समाधानकारक नसल्याने सदर प्रस्ताव सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने तहकूब ठेवण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

सुचक :- श्री. नरेश रुपला चौधरी

अनुमोदक :- श्रीमती नाजिया बानो नासिर खा पठाण

**सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक :- २२ | आण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधार योजना सन 2019-2021 अंतर्गत प्र.क्र. १८ मध्ये जयश्री सोसा.समता नगर मागील दुध डेअरी पावेतो आर.सी.सी.पाईप गटार करणे कामाबाबत निविदा दर मागविण्यांत आलेत,त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे. |
| म. नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले. |
| म. नागसेन बोरसे | विषय मंजूर करण्यांत यावा. |
| म. किरण अहिरराव | विषय मंजूर करण्यांत यावा. |
| म. सभापती | सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे. |

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २२ दिनांक १६/०३/२०२२**

आण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधार योजना सन २०१९-२०२१ अंतर्गत प्र.क्र.१८ मध्ये जयश्री सोसा.समता नगर मागील दुध डेअरी पावेतो आर.सी.सी.पाईप गटार करणे कामाबाबत धुळे महानगरपालिका मे.महासभा ठराव नं.९७ दि.३१/१२/२०१९ अन्वये मंजुरी दिलेली आहे. तसेच मा.जिल्हाधिकारी सो. धुळे महानगरपालिका यांनी टिपणी मंजुरीने दि.२७/०९/२०२१ अन्वये उक्त कामाबाबत रक्कम रु.२९,९६,७४०/- मात्र खर्चाचा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेत आली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./५५५ दि. २३/०३/२०२० अन्वये रक्कम रु.२९,९६,७४०/-मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./धुमपा/बां.वि./ १७३ / २० दि. ०१/११/२०२१अन्वये रोजी पुण्यनगरी/सा.खान्देश या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.२३/११/२०२१ अखेर निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदार किंवा ठेकेदाराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | श्री.रोहित दिलीप अग्रवाल | **अंदाजपत्रकीय दराने** | **सर्वात कमी दर** |
| २ | मे.श्रीस्वामी समर्थ कन्सट्रक्शन | शे.५.०० % जास्त | |
| ३ | श्री.आशिष एम.पटवारी | शे.३.०० % जास्त | |

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **श्री.रोहित दिलीप अग्रवाल** यांचे दर **अंदाजपत्रकीय** आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे.सबब कंत्राटदार **श्री.रोहित दिलीप अग्रवाल** यांची **अंदाजपत्रकीय**दराने आलेले निविदा दर मंजुरी करीता मे.स्थायी समिती समोर करण्यास मजुरीस्तव सादर तसेच काम न मिळालेले ठेकेदारांना त्यांची अनामत बयाणा रक्कम परत करणे बाबत मे.स्थायी समिती पुढे मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी **श्री.रोहित दिलीप अग्रवाल** यांचे **अंदाजपत्रकीय** दराने आलेले निविदा दरास महाराष्ट्र

महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री. नागसेन दामोदर बोरसे
अनुमोदक:- श्री. किरण हरिचंद्र अहिरराव

**सर्वानुमते मंजुर,**
सही/-x x x
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- २३ — अल्पसंख्याक क्षेत्र विकास कार्यक्रम सन 2021-22 अंतर्गत देवपूर भागातील मोमीन कब्रस्थान येथे पेव्हर ब्लॉक बसविणेचे निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.साबीर शेठ — विषय मंजूर करण्यांत यावा.

म.नाजियाबानो पठाण — विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती — सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २३ दिनांक १६/०३/२०२२**

अल्पसंख्यांक क्षेत्र विकास कार्यक्रम सन २०२१-२२ अंतर्गत धुळे शहरातील देवपूर भागातील मोमीन कब्रस्थान येथे पेव्हर ब्लॉकचे बसविणेचे कामास धुळे मनपा महासभ ठराव नं. ९४ दि. ३१/१२/२०१९ अन्वसे मान्यता देऊन मा.ज्लिहाधिकारी सो. यांचे प्रशासकीय मान्यता दि. ५/१/२०२२ अन्वये उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु.२९,५२,०५२/- मात्र रक्कमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत् क्रं.३१४/२० दि. १६/११/२०२१ अन्वये रक्कम रु.२९,५२,०५२/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत या धुळे महानगरपालिका जा.क्रं.धुमपा/बांवि/१९५/२० अन्वये दि.३/१/२०२२ रोजी दै. सकाळ / पोलीस शोध या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिध्द करणेत येवून दि.१/२/२०२२ पर्यत निविदा दर मागविण्यांत आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदे बाबत ऑनलाईन पध्दतीने बयाना रक्कम भरुन निविदा दर सादर केलेली आहेत.

या कामाची ई-निविदा सूचना क्र.१२१ दि.१३/०१/२०२२ नुसार मागविली असता सदर निविदेत खालीलप्रमाणे निविदाधारकांनी भाग घेतला आहे.

| **अ.क्र.** | **निविदाधारकांचे नाव** | **दिलेले निविदा दर** | **शेरा** |
|---|---|---|---|
| १) | सौरभ संजय कदमबांडे | शे-१२.०० कमीने | **सर्वात कमी दर** |
| २) | अभिषेक विजय चिंचोले | शे-७.०० कमीने | |
| ३) | आदर्श कन्सट्रक्शन | शे-३.०० कमीने | |

त्यानुसार ठेकेदार सौरभ संजय कदमबांडे यांची अंदाजपत्रकीय रक्कमेच्या शे-१२.०० कमी दराने निविदा सादर केली आहे.सदर कामाची दर मंजुरी चे अधिकार मे.स्थायी समिती ला असल्याने सदरचा विषय मे.स्थायी सामिती पुढे मंजुरीस्तव सादर झाला आहे.

सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी सौरभ संजय कदमबांडे यांची अंदाजपत्रकीय रक्कमेच्या शे. १२.०० कमी दराने आलेल्या निविदा दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री. खान मोहम्मद साबीर मुहिबुल्लाह
अनुमोदक:- श्रीमती पठाण नाजियाबानो नासिर खा

**सर्वानुमते मंजुर,**
सही/-x x x
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- २४ — म.उपायुकत सो यांचे सेवेतील वाहन क्र.एम.एच.18 बी.सी.3364 एक्सेंट वाहनांचे अधिकृत वितरक-नवकार व्हील्स-ह्युन्दाई मोटर्स यांचे कडील दुरूस्ती खर्च ₹.1,29,391/- मात्र झालेला आहे.व प्रति दिवस आजपर्यंतचे पार्कींग चार्जेस ₹.41600/-असे एकुण ₹.1,70,991/- मात्रची बिलाची बाकी रक्कम मागणी केलेली आहे. त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर फेर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.हर्षकुमार रेलन — विषय मंजूर करण्यांत यावा.परंतु जे पार्किंग चार्जेस रु.४१६००/- लावले आहे ते कमी करण्यांत यावे.

म. सभापती — सदरचे चार्जेस यापूर्वीच कमी करण्यांत आलेले आहे. तरी सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २४ दिनांक १६/०३/२०२२**

म.उपायुक्त् सो यांचे सेवेतील वाहन क्र.एम.एच.१८ बी.सी.३३६४ एक्सेंट वाहनांचे अधिकृत वितरक- नवकार व्हील्स- ह्युन्दाई मोटर्स यांचे कडील दुरूस्ती खर्च ₹.१,२९,३९१/- मात्र खर्च झालेला आहे. व प्रति दिवस आजपर्यंतचे पार्कींग चार्जेस ₹.४१६००/- असे एकुण ₹.१,७०,९९१/- मात्रची बिलाची बाकी रक्कम मागणी केलेली आहे. व आपले वाहन ताब्यात घेऊन जावे. असे कळविले आहे.

तरी म.उपायुक्त् सो यांना मनपाचे वाहन उपलब्ध नसल्याने मनपाचे वाहन दुरूस्ती खर्चास मंजुरी मिळणेकामी मे. स्थायी समिती ठराव नंबर १७९ दिनांक:२०/१२/२०२१ विषय क्रमांक १६४ मंजुरी कामी ठेवण्यात आला असता सदरील विषय तहकुब करण्यात आला होता. सदरील तहकुब विषय फेर मंजुरीसाठी ठेवणेस मान्यता दिला आहे. त्यानुसार मंजुरीस्तव सविनय सादर झालेला आहे..

सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर वाहन दुरुस्तीसाठीचा खर्च रु.१,२९,३९३/- ला मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व

कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबावदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री हर्षकुमार राधेश्याम रेलन

अनुमोदक:- श्री. अन्सारी अब्दुल लतीफ अब्दुल हमीद

**सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक:- २५ | म.न.पा हददीतील देवपुर भागातील प्रभाग क्र.४ मधील क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले पुतळा येथे इलेक्ट्रीक मशाल व अनुषगिक विदयुत व्यवस्था करणेचे काम तातडीने मे. पंडीत इंलेक्ट्रीकल्स यांचे करुन घेण्यांत आले. त्यासाठी खर्च रु.१,०१,५३२/- मात्रला मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (क) नुसार कार्योत्तर मंजुरी देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे. |
| म. नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले. |
| म. नागसेन बोरसे | विषय मंजूर करण्यांत यावा. |
| म. किरण अहिरराव | विषय मंजूर करण्यांत यावा. |
| म. सभापती | सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रसतावास कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे. |

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २५ दिनांक १६/०३/२०२२**

म.स्थायी समिती सदस्य मा.श्री.नागसेन बोरसे यांच्या पत्रानुसार 3 जानेवारी रोजी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती निमित्त म.न.पा हद्दीतील देवपूर भागातील प्रभाग क्र 4 मधील क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले पुतळा येथे इलेक्ट्रिक मशाल व अनुषंगिक विद्युत व्यवस्था करणे.बाबत मागणी केलेली आहे.

त्यानुसार म.स्थायी समिती सदस्य मा.श्री.नागसेन बोरसे यांच्या मागणीनुसार म.न.पा हद्दीतील देवपूर भागातील प्रभाग क्र 4 मधील क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले पुतळा येथे इलेक्ट्रिक मशाल व अनुषंगिक विद्युत व्यवस्था, सुशोभित एल.ई.डी पथदिवेंसह बसविणे आवश्यक आहे.

म.न.पा हद्दीतील देवपूर भागातील प्रभाग क्र 4 मधील क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले पुतळा येथे इलेक्ट्रिक मशाल व अनुषंगिक विद्युत व्यवस्था, सुशोभित एल.ई.डी पथदिवेंसह बसविणे **मे ,पंडित इलेक्ट्रिकल्स ठेकेदार यांचेकडून विनानिविदा करणे करून घेण्यात आलेले आहे.**

तरी सदरच्या कामास **शासन दरसूची/सा.बा./विद्युत/**2021-22 **नुसार** अंदाज पत्रकीय खर्च **रु.1,01,532/-** मात्रच्या खर्चास म.आयुक्त सो. यांनी सदरील कामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ६७ (३) (क) नुसार प्रशासकिय मान्यता दिली आहे.

सदरील आदेशाचे प्रतिवृत्त म. स्थायी समितीकडे सादर करणेत आलेला आहे.

सदर कामी प्रभाग क्र.४ मधील क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले पुतळा येथे इलेक्ट्रीक मशाल व अनुषगिक विदयुत व्यवस्था करणेचे काम तातडीने मे. पंडीत इंलेक्ट्रीकल्स यांचे करुन घेण्यांत आले. त्यासाठी खर्च रु.१,०१,५३२/- मात्रला मुंबई प्रांतिक महानगरपालिका

अधिनियम कलम ६७ (क) नुसार सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री. नागसेन दामोदर बोरसे
अनुमोदक:- श्री. किरण हरिचंद्र अहिरराव

**सर्वानुमते मंजुर,**
सही/-x x x
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- २६ — धुळे मनपा हद्दीतील देवपूर भागांतील प्रभाग क्र.4 मधील अंडाकृती बगीचा व क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले पुतळा सुशोभिकरण करणेचे काम तांतडीने विना निविदा मे. एकविरा कन्स्ट्रक्शन धुळे यांचेकडून करुन घेण्यांत आले त्यासाठी झालेला खर्च रु.4,21,671/- मात्रला खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (क) नुसार कार्योत्तर मंजुरी देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. नागसेन बोरसे — विषय मंजूर करण्यांत यावा.

म. नरेश चौधरी — विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती — सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रसतावास कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २६ दिनांक १६/०३/२०२२**

धुळे मनपा हद्दीतील देवपूर भागांतील प्रभाग क्र.४ मधील अंडाकृती बगीचा व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले पुतळा सुशोभिकरण करणे बाबत संदर्भीय पत्रानुसार मागणी करण्यात आली आहे.उक्तबाबत समक्ष पाहणी केली असता सदर ठिकाणी यापूर्वी पुतळ्याच्या मागील बाजूस भिंत बांधून त्यावर टाईल्स लावण्यात आली आहे.तसेच सदर बगिच्याच्या संरक्षण भिंतीवरील कठड्यांची उंची कमी असल्याने त्याठिकाणी परिसरातील नागरिक कपडे वाळविण्यासाठी टाकत असल्याने संरक्षण भिंतीवरील कठड्यांची उंची वाढविणे गरजेचे होते.तसेच दि.०३/०१/२०२२ रोजी सावित्रीबाई फुले जयंती असल्याने पुतळ्याला कलर काम करणे आवश्यक होते. सदर बगिच्याच्या भिंतीचे व ग्रेनाईडचे नुकसान झाले असल्याने सदरचे सुशोभिकरणाचे काम करणे आवश्यक होते.

सदरचे काम तात्काळ करणे गरजेचे असल्याने मा.आयुक्त सो. यांच्याकडील आदेश जाक्र/ धुमपा/५०६/दि.०८/०३/२०२२ नुसार ठेकेदार मे.एकविरा कन्सट्रक्शन, धुळे यांना आदेशित केल्यानुसार त्यांनी सदरचे काम पूर्ण करून दिले आहे.सदर कामास शासकीय दरसूची सन २०२१-२२ नुसार रु.४,२१,६७१/-मात्र खर्च अपेक्षित असून सदर कामाचे देयक मिळणेबाबत संबधित ठेकेदार यांनी विनंती केली आहे.

तरी उक्त काम हे तातडीने करणे गरजेचे असल्याने सदरचे काम विना निविदा मे.एकविरा कन्सट्रक्शन, धुळे ठेकेदार यांच्या कडून करून घेण्यात आलेले असून सदरचे काम मुंबई प्रांतिक अधिनियम ६७(क) अन्वये विना निविदा करण्यास मंजुरीसाठी व खर्चास कार्योत्तर मंजुरीसाठी मे.स्थायी समिती सादर करण्यांत आलेला आहे.

उक्त प्रस्तावानुसार देवपूर भागांतील प्रभाग क्र.4 मधील अंडाकृती बगीचा व क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले पुतळा सुशोभिकरण करणेचे काम तांतडीने विना निविदा मे. एकविरा कन्स्ट्रक्शन धुळे यांचेकडून करुन घेण्यांत आले त्यासाठी झालेला खर्च रु.4,21,671/- मात्रला खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (क) नुसार सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री. नागसेन दामोदर बोरसे
अनुमोदक:- श्री. नरेश रुपला चौधरी

**सर्वानुमते मंजुर,**
सही/-x x x
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- २७ — धुळे मनपा हद्दीतील देवपूर भागांतील प्रभाग क्र.४ मधील विष्णूनगर भागांत श्री.वानखेडे यांच्या घरापासून ते श्री.वाघ यांच्या घरापावेतो पाईपलाईन टाकणेचे काम तांतडीने विना निविदा मे. एकविरा कन्स्ट्रक्शन धुळे यांचेकडून करुन घेण्यांत आले त्यासाठी झालेला खर्च रु. १,८६,९३८/- मात्रला झालेल्या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (क) नुसार कार्योत्तर मंजुरी देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. नागसेन बोरसे — विषय मंजूर करण्यांत यावा.

म. बन्सीलाल जाधव — विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती — सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रसतावास कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २७ दिनांक १६/०३/२०२२**

धुळे मनपा हद्दीतील देवपूर भागांतील प्रभाग क्र. ४ मधील विष्णू नगर भागांत श्री.वानखेडे यांच्या घरापासून ते श्री.वाघ यांच्या घरापावेतो पाईपलाईन टाकणे बाबत संदर्भीय पत्रानुसार मागणी करण्यात आली आहे.उक्त बाबत समक्ष पाहणी केली असता सदर ठिकाणी पाईपलाईन नसल्याने नागरिकांना पाण्यासाठी मोठ्या प्रमाणात अडचणी येत असून उक्त ठिकाणी पाईपलाईन टाकणे गरजेचे आहे.

त्यानुसार सदर कामाचे अंदाजपत्रक तयार केले असून सदर कामास शासकीय दरसूची सन २०२०-२१ नुसार रु.१,८६,९३८/-मात्र खर्च अपेक्षित असून सदरचे काम करणे अत्यंत आवश्यक असल्याने मा.आयुक्त सो. यांच्याकडील आदेश जाक्र/ धुमपा/५०७/ दि.०८/०३/२०२२ नुसार उक्त काम ठेकेदार एकविरा कन्सट्रक्शन,धुळे यांच्या मार्फत विना निविदा करून घेण्यासाठी सदरचे काम मुंबई प्रांतिक अधिनियम नियम ६७ (क) अन्वये विना निविदा करण्यास मंजुरीसाठी व अंदाजपत्रकीय खर्च रु.१,८६,९३८/-मात्र खर्चास कार्योत्तर मंजुरीसाठी मे.स्थायी समिती पुढे सादर झालेला आहे.

उक्त प्रस्तावानुसार धुळे मनपा हद्दीतील देवपूर भागांतील प्रभाग क्र.४ मधील विष्णूनगर भागांत श्री. वानखेडे यांच्या घरापासून ते श्री.वाघ यांच्या घरापावेतो पाईपलाईन टाकणेचे काम तांतडीने विना निविदा मे. एकविरा कन्स्ट्रक्शन धुळे यांचेकडून करुन घेण्यांत आले त्यासाठी झालेला खर्च रु. १,८६,९३८/- मात्रला झालेल्या खर्चास महाराष्ट्र

महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (क) नुसार सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री. नागसेन दामोदर बोरसे
अनुमोदक:- श्री. बन्सीलाल माणिक जाधव

**सर्वानुमते मंजुर,**
सही/-x x x
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-२८ देवपूर भागांतील शिवाजी नगर भागांत पाईपलाईन टाकणेचे काम तांतडीने विना निविदा श्री. हेमंत राजाराम बागुल यांचेकडून करुन घेण्यांत आले त्यासाठी झालेला खर्च रु.१,४३,९३७/- मात्रला खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७(क) नुसार कार्योत्तर मंजुरी देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. नागसेन बोरसे विषय मंजूर करण्यांत यावा.

म.अन्सारी अब्दुल लतीफ विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रसतावास कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २८ दिनांक १६/०३/२०२२**

देवपूर भागांतील शिवाजी नगर भागांत पाईपलाईन जीर्ण झाली असल्याने बऱ्याच ठिकाणी लिकेज झाली असल्याने दुर्गंधीयुक्त पाणीपुरवठा होत असल्याबाबत सदर भागांतील नागरिक व सन्मा.सदस्य यांनी तक्रारी केल्या होत्या.सदरचे काम तात्काळ करणे गरजेचे असल्याने व नागरिकांच्या आरोग्याशी निगडीत असल्याने उक्त काम तातडीने करणे आवश्यक आहे.त्यानुसार सदर कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून सदर कामास मजिप्रा विभागाकडील शासकीय दरसूची सन २०२१-२२ नुसार रु.१,४३,९६७/-मात्र खर्च अपेक्षित आहे.

तरी उक्त काम हे तातडीने करणे गरजेचे असल्याने मा.आयुक्त सो. यांच्याकडील आदेश जाक्र/ धुमपा/४८५/दि.२३/०२/२०२२ नुसार सदरचे काम विना निविदा श्री.हेमंत राजाराम बागुल ठेकेदार यांच्या कडुन करून घेण्यासाठी सदरचे काम मुंबई प्रांतिक अधिनियम ६७ (क) अन्वये विना निविदा करण्यास मंजुरीसाठी व खर्चास कार्योत्तर

उक्त प्रस्तावानुसार देवपूर भागांतील शिवाजी नगर भागांत पाईपलाईन टाकणेचे काम तांतडीने विना निविदा श्री. हेमंत राजाराम बागुल यांचेकडून करुन घेण्यांत आले त्यासाठी झालेला खर्च रु.१,४३,९३७/- मात्रला खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७(क) नुसार व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून कार्योत्तर

मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री. नागसेन दामोदर बोरसे

अनुमोदक:- श्री. अब्दुल लतीफ अब्दुल हमीद अन्सारी

**सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- २९ — देवपूर भागांतील किरण सोसायटी भागांत ॲड.सोनार यांच्या घरापासून ते श्री.बागुल यांच्या घरापावेतो पाईपलाईन टाकणे व प्रमोद नगर येथे नकाणे रोड पासून ते श्री.बेडसे यांच्या घरापावेतो पाईपलाईन टाकणेचे काम तांतडीने विना निविदा श्री. हेमंत राजाराम बागुल यांचेकडून करुन घेण्यांत आले त्यासाठी झालेला खर्च रु.२,७०,१०८/- मात्रला खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (क) नुसार कार्योत्तर मंजुरी देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. नागसेन बोरसे — विषय मंजूर करण्यांत यावा.

म.साबीर शेठ — विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती — सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रसतावास कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २९ दिनांक १६/०३/२०२२**

देवपूर भागांतील किरण सोसायटी व प्रमोद नगर भागांत खराब पाणी येत असल्याबाबत सदर भागांतील नागरिक व सन्मा.सदस्य यांनी तक्रारी केल्या होत्या. त्यानुसार सदर पाईपलाईन वॉशआउट करून,ब्रेक करून तपासणी करण्यात आली.तथापि सदर भागांत अशुद्ध पाणीपुरवठा बंद झाला नव्हता.त्यामुळे त्या भागांत नागरिकांमध्ये मोठ्या प्रमाणात रोष होता.सदर ठिकाणी मा.महापौर व मा.उपमहापौर यांनी पाहणी करून सदर ठिकाणी नवीन पाईपलाईन टाकणे बाबत आदेशित केले होते.

सदरचे काम तात्काळ करणे गरजेचे असल्याने व नागरिकांच्या आरोग्याशी निगडीत असल्याने उक्त काम तातडीने करणे आवश्यक होते.त्यानुसार ठेकेदार श्री.हेमंत राजाराम बागुल, धुळे यांना आदेशित केल्यानुसार त्यांनी सदरचे काम पूर्ण करून दिले आहे.सदर कामास मजिप्रा विभागाकडील शासकीय दरसूची सन २०२१-२२ नुसार रु.२,७०,१०८/-मात्र खर्च अपेक्षित असून सदर कामाचे देयक मिळणेबाबत संबधित ठेकेदार यांनी विनंती केली आहे.

तरी उक्त काम हे तातडीने करणे गरजेचे असल्याने मा.आयुक्त सो. यांच्याकडील आदेश जाक्र/ धुमपा/४८४/दि.२३/०२/२०२२ नुसार सदरचे काम विना निविदा श्री.हेमंत राजाराम बागुल ठेकेदार यांच्या कडून करून घेण्यात आलेले असून सदरचे काम मुंबई प्रांतिक अधिनियम ६७ (क) अन्वये विना निविदा करण्यास मंजुरीसाठी व खर्चास कार्योत्तर मंजुरीसाठी मे.स्थायी समिती पुढे सादर झालेला आहे.

उक्त प्रस्तावानुसार देवपूर भागांतील किरण सोसायटी भागांत ॲड.सोनार यांच्या घरापासून ते श्री.बागुल यांच्या घरापावेतो पाईपलाईन टाकणे व प्रमोद नगर येथे नकाणे रोड पासून ते श्री.बेडसे यांच्या घरापावेतो पाईपलाईन टाकणेचे काम तांतडीने विना निविदा श्री. हेमंत राजाराम बागुल यांचेकडून करुन घेण्यांत आले त्यासाठी झालेला खर्च रु.२,७०,१०८/- मात्रला खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (क) नुसार व सन्मा. सदस्यांच्या व कार्यालयीन अहवालास अधिन राहून कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री. नागसेन दामोदर बोरसे
अनुमोदक:- श्री. खान मोहम्मद साबीर मुहिबुल्लाह

**सर्वानुमते मंजुर,**
सही/-x x x
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- ३० — धुळे शहरामध्ये ऑप्टीकल फायबर केबल टाकणाऱ्या कंपन्याकडुन धुळे महानगरपालिकेकडेस उचित नुकसान भरपाई रक्कम व डी.आय.टी. चार्जेस न भरल्यामुळे झालेल्या सभांव्य नुकसानीची वसुली करणेकामी EO(एक्सप्रेशन ऑफ इन्टेस्ट)निविदा काढणेस्तव कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.सभापती — या विषयावर खुलासा करतो. रिलायंन्स व जिओ यांनी फायबर ऑप्टीकल केबल धुळे शहरात टाकली. डी.आय.टी. चार्जेस भरायचे होते. घेतलेली मंजूरी व टाकलेली केबल लाईन यामध्ये ३ कोटीचा फरक आहे. हा आपल्या शहराच्या दृष्टीने महत्वाचा विषय आहे. आपल्याला किमान ८ ते ९ कोटी रुपये रिकव्हरी करता येणार आहे. याच्यामुळे तिजोरित भर पडणार आहे. म्हणून हा प्रस्ताव सादर केल्याबद्दल मी प्रशासनाचे अभिनंदन करतो.

म.नागसेन बोरसे — या विषयावर आपण परवानगी दिली पण रस्ता खराब होणार नाही. याची काळजी घेणे गरजेचे होते. परंतु त्यांनी जे जे पोल टाकले ते सगळे रस्त्यावर टाकले. यांचे पोल १०-१० फुट पुढे आले आहे. त्यांनी परवानगी घेतांना म्हटले होते की, रस्तयावर कुठलीही बाधा येणार नाहीअशा पध्दतीने पोल लावू. त्यांच्यावर कार्यवाही करावी.यानंतर जी पण परवानगी देणार ती फक्त अंडर ग्राउंड केबल टाकण्यांची दयावी. कारण यामुळे शहराचे विदुपीकरण होत आहे.

म.साबिर शेठ — ज्या पण एरियात पोल टाकणार त्या भागातल्या नगरसेवकांना कळवण्यास सांगावे.

म.सभापती — मी प्रशासनाला आदेशित करतो की, फक्त केबल नाही जी ऑप्टीकल फायबर रोड वरुन गेली आहे, हे पण समाविष्ट करा. इतर कंपन्या उदा. एअरटेल,आयडीया, बी एस एन एल यांनी असे केले असेल तर सर्वांच्या संदर्भात ही प्रक्रीया राबवण्यात यावी. त्यानुसार सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ३० दिनांक १६/०३/२०२२**

धुळे शहरामध्ये सन२०१२ पासुन रिलायन्स कंपनी (जिओ इन्फोटेक कंपनी ) तसेच अन्य कंपन्यानी भुमिगत केबल टाकण्याची कामे केलेली आहे. सदरच्या कामाच्या बाबतीमध्ये सबधीत कंपन्यानी सन २०१२ते २०१९ दरम्यान धुळे शहरामध्ये टाकण्यात येणाऱ्या केबलच्या प्रस्तावीत लांबी प्रमाणे प्रस्ताव सादर करून महानगरपालिकेकडुन मान्यतेची मागणी केली

आहे.याकालावधीत महानगरपालिकेकडुन संबधीत कंपनीकडुन नुकसान भरपाई चार्जेस व डी.आय.टी चार्जेस भरण्याबाबत कळविण्यात आले असुन या कंपन्यानी महानगरपालिकेस सदरच्या रक्कमेचा भरणा केलेलाआहे.

श्री. हितेंद्र खैरनार यांनी धुळे महानगरपालिकेस वेळोवेळी पत्र देवुन रिलायन्स इन्फोटेक/जिओ कंपनीने धुळे महानगरपालिकेचे संभाव्य डी.आय.टी चार्जेस व संभाव्य नुकसान भरपाई रक्कम आवश्यक व उचित न भरण्याबाबत तसेच याकंपनीने धुळे शहरात जास्तीचे कामे केले असुन धुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झाल्याचे कळविलेलेआहे. उक्त बाबत सन२०१२ पासुन२०१९ पर्यत जिओइन्फोटेक कंपनीने धुळे महानगरपालिकेस जमा केलेल्या रक्कमेचा व दर्शविलेल्या कामाचा तपशील खालील प्रमाणे सादरआहे.

| Sr.no | Amount | DD no | Date | Remark |
|---|---|---|---|---|
| १ | ४७,४६,९९७/- | ००५११० | १२-३-२०१२ | For१०.४००Kms Restoration charged by DMC |
| २ | ११,२५,०००/- | ००५२४३ | २१-३-२०१२ | Submitted JIO as DIT. |
| ३ | २,३४,६२,९७०/- | ८९८६९१ | २६-९-२०१३ | Restoration charged for ६९.१०० Kms |
| ४ | १,५०,००,०००/- | ०२८०४२ | ४-७-२०१५ | Revised Restoration charged by DMC |
| ५ | ७५,२०,५०१/- | ६४४११८ | ९-७-२०१९ | Restoration charged for ९.२९० Kms |

श्री हितेंद्र खैरनार यांचे उक्त प्रमाणे पत्रानुसार धुळे शहरात करण्यात आलेल्या ऑप्टीकल फायबर केबलच्या कामामध्ये याकंपन्यानी उचित मोबदला महापालिकेस अदा न केल्याने महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झाल्याचे प्रथम दर्शनी निर्देशन येतअसल्याने म. अति. आयुक्त सो.यांनी आदेश क्रं.धुमपा/ आस्था/१०८२दि.३०/१२/२०२१रोजीच्याआदेशानुसार याविषयान्वये चर्चा करण्यासाठी सर्व अधिकाऱ्यांची बैठक दि.०४/०१/२०२२रोजी बोलविलेली होती.याबैठकीत झालेल्या चर्चेअंती प्रस्तुत प्रकरण हे प्रथमदर्शनी बुडीत महसुलाचे दिसत असल्याचे सर्वांचे एकमत झाले. सबब खरंच महसूल बुडाला आहे किंवा कसे हे शोधणेआधी महत्त्वाचे आहे. त्याशिवाय आपल्याला कंपनीवर क्लेम टाकता येणार नाही. सबब खालील प्रमाणे कामाची तपासणी करण्यासाठी एखादी संस्था अथवा व्यक्ती यांची नियुक्ती करणे योग्य राहील व त्यासाठी EOI (एक्स्प्रेशनऑफइन्ट्रेन्स) निविदा मागविणेबाबत सर्वांचे एकमत झाले.

याकामात खालील प्रमाणे कामाची निश्चिती करण्यात आली.

१.धुळे मनपा क्षेत्रामध्ये विविध नेटवर्क कंपन्या मार्फत करण्यात आलेली भुमिगत केबलच्या केलेल्या कामांची प्रत्यक्ष तपासणी करणे. याअनुषंगाने बुडीत वसुल शोधणे व वसुल करणे.

२. धुळे मनपा क्षेत्रामध्ये जी.टी.पी. एल सारख्या कंपनी कडुन टि.व्ही नेटवर्क वायर टाकणे, पोल उभारून चालवण्यात येते व ग्राहकाकडून या सर्विस कंपन्या काही रक्कम वसूल करतात तथा महानगपालिकेस कुठलाही कर किंवा भाडे रक्कम जमा होत नाही. त्याबाबत तपासणी करून वसूल रक्कम निश्चित करणे.

वरील प्रमाणे कामासाठी EOI (एक्स्प्रेशनऑफइन्ट्रेस्ट) साठी मक्तेदाराची निविदा पात्रताही प्राधान्यानेअशा स्वरूपाच्या कामाचा अनुभव असलेली व्यक्ती अथवा संस्था असेल तसे ठेवणे योग्य होईल. असेही ठरले.

बैठकीत झालेल्या चर्चा व विचार विनिमयाच्या अनुषंगाने धुळे महानगरपालिकेचे भुमिगत केबल टाकण्याच्या कामामध्ये झालेले संभाव्य नुकसान शोधण्यासाठी व त्यांची

वसूली करणेसाठी EOI (एक्प्रेशन ऑफ इन्ट्रेस्ट) निविदा काढण्यासाठी म.स्थायी समितीची मानयता घेण्यासाठी आवश्यक असुन याबाबत बांधकाम विभागाने कारवाई करावी. असे आदेश अति.आयुक्त सो. यांनी दिले आहेत.

उक्त प्रमाणे धुळे महानगरपालिकेचे भुमिगत केबल टाकण्याच्या कामामध्ये झालेले संभाव्यनुकसान शोधण्यासाठी व त्यांची वसूली करणे साठी EOI (एक्प्रेशनऑफइन्ट्रेस्ट) निविदा काढण्यासाठी म.स्थायी समितीकडेस मान्यतेस सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून धुळे महानगरपालिकेचे भुमिगत केबल टाकण्याच्या कामामध्ये झालेले संभाव्य नुकसान शोधण्यासाठी व त्यांची वसूली करणे साठी EOI (एक्प्रेशनऑफइन्ट्रेस्ट) निविदा काढण्यासाठी मान्यता देण्यांत येत आहे. तसेच इतर कंपन्या उदा. एअरटेल,आयडीया, बी एस एन एल. यांच्या संदर्भातही सदर प्रक्रिया राबविण्यात यावी व ऑपटीकल फायबर केबल भूमिगत करणे तसेच रहदारीस अडथळा होणार नाही अशा पध्दतीने पोल उभारणे याबाबत संबंधित कंपनीस कळविण्यांत यावे.

सुचक :- श्री. नागसेन दामोदर बोरसे
अनुमोदक:- श्री. खान मोहम्मद साबीर मुहिबुल्लाह

**सर्वानुमते मंजुर,**
सही/-x x x
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- ३१ — धुळे मनपातील मानधन वरील एकुण ८ पंप ऑपरेटर, ७ विजतंत्री, ३ गाळणी निरीक्षक, व ७ गाळणी चालक यांना ६ महिने मुदतवाढ देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. किरण अहिरराव — विषय मंजुर करण्यांत यावा.

म. नाजिया पठाण — विषय मंजुर करण्यांत यावा.

म.सभापती — मी पाणीपुरवठा विभागाला सूचीत करतो की, आपल्याकडे पंप ऑपरेटर संख्या कमी आहे. आस्थापनाने उर्वरित जागा भरुन घ्या. जेणे करुन पाणी पुरवठयात अडचण येणार नाही. सर्व सनमा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ३१ दिनांक १६/०३/२०२२**

जा क्र /धुमपा/आस्था/ ४८६ दि २३/७/२०२१ अन्वये **पंप ऑपरेटर** अन्व्येच्या आदेशानुसार १ ते ८ कर्मचारी यांना पंपऑपरेटर या पदावर ०६ महिने करीता मानधन तत्वावर पुर्ननियुक्ती देणेत आलेली होती.

जा क्र /धुमपा/आस्था/ ४८४ दि २३/७/२०२१ अन्वये **विजतंत्री** अन्वयेंच्या आदेशानुसार १ ते ७ कर्मचारी यांना विजतंत्री या पदावर ०६ महिने करीता मानधन तत्वावर पुर्ननियुक्ती देणेत आलेली होती.

तसेच १ ते ३ कर्मचारी यांना गाळणी निरीक्षक या पदावर ०६ महिने करीता मानधन तत्वावर पुर्ननियुक्ती देणेत आलेली होती.

तसेच १ ते ७ कर्मचारी यांना गाळणी चालक या पदावर ०६ महिने करीता मानधन तत्वावर पुर्ननियुक्ती देणेत आलेली होती.

तसेच पंप ऑपरेटर , विजतंत्री , गाळणी निरीक्षक , गाळणी चालक, या मानधनावरील कर्मचा-यांची ०६ महिनेची मुदत दि १७/१/२०२२ रोजी संपुष्ठात आलेली आहे.

त्याअनुषंगाने पाणीपुरवठा विभागाकडील कनिष्ठ अभियंता यांनी उक्त १ ते ५ मानधनावरील कर्मचा-यांचे काम समाधानकारक असल्याचे अहवाला नमुद केलेले आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ (३) नमुद केले आहे की, या अधिनियमात अन्यथा तरतूद केली असेल त्या व्यतिरिक्त, नगरपालिका अधिकारी व कर्मचारी मग ते कायम असोत किंवा तात्पुरते असोत त्यांची नेमणुक करण्याचा अधिकार आयुक्तांकडे निहित असेल. परंतु कायम नेमणुकांच्या बाबतीत असा अधिकारी कलम ५१ अन्वये तयार केलेल्या व मंजुर केलेल्या त्या वेळी अंमलात असलेल्या विवरणपत्राच्या अधीन असेल. आणखी असे की, आयुक्तास स्थायी समितीच्या पुर्व मंजुरी वाचून कोणतीही तात्पुरती नेमणुक सहा महिन्यांहून अधिक असेल अशा कोणत्याही कालावधीसाठी करता येणार नाही आणि (लिपीक या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदाच्या वेतनाएवढे अथवा त्याहून अधिक वेतन असलेल्या) कोणत्याही नेमणुकीचे उक्त सहा महिन्यांचा कालावधी संपल्यांनतर नवीकरण करता येणार नाही. असे अधिनियमात नमुद आहे

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचे नांव | पद | मुदत संपल्याची तारीख | मानधन रुपये |
|---|---|---|---|---|
| १. | कल्पतरु स. वाघ | पंप ऑपरेटर | १८/१/२०२२ | ८०००/- |
| २. | अमित अनिल पोतदार | पंप ऑपरेटर | १८/१/२०२२ | ८०००/ |
| ३. | योगेश साहेबराव देवरे | पंप ऑपरेटर | १८/१/२०२२ | ८०००/ |
| ४. | चेतन भानुदास सुडके | पंप ऑपरेटर | १८/१/२०२२ | ८०००/ |
| ५. | दिपक वसंत माळी | पंप ऑपरेटर | १८/१/२०२२ | ८०००/ |
| ६. | अमोल नरेंद्र अंपळकर | पंप ऑपरेटर | १८/१/२०२२ | ८०००/ |
| ७. | इश्वर विठ्ठल बडगुजर | पंप ऑपरेटर | १८/१/२०२२ | ८०००/ |
| ८. | रुपेश महेंद्र खैरनार | पंप ऑपरेटर | १८/१/२०२२ | ८०००/ |
| ९. | रोहित रंजन मराठे | विजतंत्री | १८/१/२०२२ | ८०००/ |
| १०. | पवार परेश गुलाबराव | विजतंत्री | १८/१/२०२२ | ८०००/ |
| ११. | देवेंद्र नामदेव सोनवणे | विजतंत्री | १८/१/२०२२ | ८०००/- |
| १२. | रमन भिकु पाटील | विजतंत्री | १८/१/२०२२ | ८०००/ |
| १३. | केशव मधुकर महाजन | विजतंत्री | १८/१/२०२२ | ८०००/ |
| १४. | विश्वजीत विजय गुर्जर | विजतंत्री | १८/१/२०२२ | ८०००/ |
| १५. | वराडे अक्षय राजेंद्र | विजतंत्री | १८/१/२०२२ | ८०००/ |
| १६. | अमोल मधुकर पाटील | गाळणी निरीक्षक | १८/१/२०२२ | ८०००/ |
| १७. | गणेश दिगंबर शेलार | गाळणी निरीक्षक | १८/१/२०२२ | ८०००/ |
| १८. | खैरनार अरुण राजाराम | गाळणी निरीक्षक | १८/१/२०२२ | ८०००/ |
| १९. | रमेश वेडु बोरसे | गाळणी चालक | १८/१/२०२२ | ८०००/ |
| २०. | साळुंखे विनायक जगन | गाळणी चालक | १८/१/२०२२ | ८०००/ |
| २१. | बडगुजर राहुल अंबादास | गाळणी चालक | १८/१/२०२२ | ८०००/ |
| २२. | महाजन उमेश रविंद्र | गाळणी चालक | १८/१/२०२२ | ८०००/ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २३. | निलेश पंढरीनाथ करनाळे | गाळणी चालक | १८/१/२०२२ | ८०००/ |
| २४. | किरण गोविंदा चव्हाण | गाळणी चालक | १८/१/२०२२ | ८०००/ |
| २५. | राहुल नथ्थुसिंग जाधव | गाळणी चालक | १८/१/२०२२ | ८०००/ |

पाणीपुरवठा विभागाकडील अहवालानुसार उक्त कर्मचारी यांच्या कामाची निकड पाहता व पाणीपुरवठा व्यवस्था सुरळीत ठेवणेकरीता वरील कर्मचा-यांना ०६ महिनेकरीता मुदतवाढ देणेबाबत पत्र सादर करण्यात आलेले आहे.

तरी उक्त कर्मचा-यांना मुदत संपल्याच्या दिनांकापासून ५ दिवसाचा तांत्रिक सेवा खंड देऊन०६महिने कालावधीकरीता फेर नियुक्ती देणेबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम५३ नुसार मे.स्थायी समिती पुढे ठेवण्यासाठी मा.आयुक्त सो यांनी संदर्भीय क्र६अन्वयेच्या टिपणीनुसार मान्यता दिलेली आहे. त्यानुसार सदर मानधनावरील कर्मचा-यांच्या फेर नियुक्ती देण्याबाबतचा विषय मे स्थायी समितीपुढे सादर करण्यांत आलेला आहे. सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून धुळे मनपातील मानधन वरील एकुण ८ पंप ऑपरेटर, ७ विजतंत्री, ३ गाळणी निरीक्षक, व ७ गाळणी चालक यांना ६ महिने मुदतवाढ देण्यांस मुदत संपल्याच्या दिनांकापासून ५ दिवसाचा तांत्रिक सेवा खंड देऊन०६महिने कालावधीकरीता एकत्रित मानधन रु. ८०००/- यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम५३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री. किरण हरिचंद्र अहिरराव
अनुमोदक:- श्री. नाजियाबानो नासीर खा पठाण

**सर्वानुमते मंजुर,**
सही/-x x x
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- ३२ — धुळे मनपातील मानधनावरील १ जेसीबी चालक यांना ६ महिने मुदतवाढ देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. हर्षकुमार रेलन — विषय मंजुर करण्यांत यावा.

म. नरेश चौधरी — विषय मंजुर करण्यांत यावा.

म.सभापती — सर्व सनमा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ३२ दिनांक १६/०३/२०२२**

धुळे मनपा आरोग्य विभागाकडे जेसीबी वाहन चालक म्हणुन ०६ महिनेकरीता एकत्रित मानधन रु १२०००/- मात्र एकत्रित मानधनावर ६ महिने कालावधीकरीता श्री राहुल नाना देसले यांना मुदतवाढ देण्यात आली होती.

श्री. राहुल नाना देसले यांच्या विनंती अर्जानुसार व प्रमुख्य स्वच्छता निरीक्षक यांच्या अहवालानुसार त्यांना पुढील ०६ महिने करीता एकत्रित मानधनावर रु १२०००/- मात्र वर मुदतवाढ देणेबाबत अहवाल सादर केलेला आहे.

| अ क्र | उमेदवाराचे नाव | पदाचे नाव | एकत्रित मानधन रु |
|---|---|---|---|
| १ | श्री राहुल नाना देसले | जेसीबी वाहन चालक | १२०००/- |

उक्त मानधनावरील कर्मचारी यांच्या दि १३/६/२०२१ पासून ते १२/१२/२०२१ पर्यंत ६ महिने कालावधीचा सेवा कालावधी पूर्ण झालेला आहेतसेच सदर कर्मचा-यांची दि. १२/०२/२०२१ रोजी मुदत संपुष्ठात आलेली आहे.उपरोक्त कर्मचा-याची कामाची निकड पाहता पुढील ६ महिने करीता मुदतवाढ देणेबाबत आरोग्य विभागाने अहवाल सादर केलेला आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ (३) नमुद केले आहे की, या अधिनियमात अन्यथा तरतूद केली असेल त्या व्यतिरिक्त, नगरपालिका अधिकारी व कर्मचारी मग ते कायम असोत किंवा तात्पुरते असोत त्यांची नेमणुक करण्याचा अधिकार आयुक्तांकडे निहित असेल. परंतु कायम नेमणुकांच्या बाबतीत असा अधिकारी कलम ५१ अन्वये तयार केलेल्या व मंजुर केलेल्या त्या वेळी अंमलात असलेल्या विवरणपत्राच्या अधीन असेल. आणखी असे की, आयुक्तास स्थायी समितीच्या पुर्व मंजुरी वाचून कोणतीही तात्पुरती नेमणुक सहा महिन्यांहून अधिक असेल अशा-कोणत्याही कालावधीसाठी करता येणार नाही आणि (लिपीक या पदाशी समतुल्य,असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदाच्या वेतनाएवढे अथवा त्याहून अधिक वेतन असलेल्या) कोणत्याही नेमणुकीचे उक्त सहा महिन्यांचा कालावधी संपल्यांनतर नवीकरण करता येणार नाही. असे अधिनियमात नमुद आहे

उपरोक्त तरतुदीनुसार आरोग्य विभागाच्या अहवालानुसार जेसीबी वाहन चालकाच्या कामाची निकड पाहता मुदत संपुष्ठात आल्याच्या दिनांकापासून ५ दिवसाचा खंड देवून पुढील ६महिने कालावधीकरीता श्री. राहुल नाना देसले यांना मुदतवाढ देणेबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५३ नुसार मे. स्थायी समिती पुढे ठेवण्यासाठी मा. आयुक्त सो यांनी संदर्भीय क्र ४अन्वयेच्या टिपणीनुसार मान्यता दिलेली आहे. त्यानुसार सदर मानधनावरील कर्मचा-यांच्या फेर नियुक्ती देण्याबाबतचा विषय मे स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून मानधनावरील १ जेसीबी चालक यांना ६ महिने मुदतवाढ देण्यांस मुदत संपल्याच्या दिनांकापासून ५ दिवसाचा खंड देऊन ०६ महिने कालावधीकरीता एकत्रित मानधन रु. १२०००/- यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री. हर्षकुमार राधेश्याम रेलन
अनुमोदक:- श्री. नरेश रुपला चौधरी

**सर्वानुमते मंजुर,**
सही/-x x x
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-३३ — धुळे मनपातील मानधनावरील ३ डाटा एंन्टी ऑपरेटर कर्मचारी यांना ६ महिने मुदतवाढ देणे बाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. हर्षकुमार रेलन विषय मंजुर करण्यांत यावा.

म. नरेश चौधरी विषय मंजुर करण्यांत यावा.

म.सभापती सर्व सनमा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ३३ दिनांक १६/०३/२०२२**

जा क्र धुमपा/आस्था/८४६ दि२६/१०/२०२१ आदेशानुसार डाटा एंट्री ऑपरेटर मानधनावरील यांना पुन नियुक्ती देण्यात आली होती सदर मानधनावरील डाटा ऐंट्री ऑपरेटर खालील कर्मचा-यांची दि ६/२/२०२२ रोजी मुदत संपुष्ठात आलेली आहे.

| अ क्र | उमेदवाराचे नाव | पदाचे नाव |
|---|---|---|
| १ | श्री. पवन किशोर कानडे | डाटा ऐन्ट्री ऑपरेटर |
| २ | श्री. मिलींद रविन्द्र नगराळे | |
| ३ | श्री. भाग्यश्री प्रकाश मोरे | |

आरोगयाधीकारी,एलबीटी विभाग प्रमुख व लेखा परिक्षक विभाग यांच्या अहवालानुसार उक्त कर्मचा-यांची कामाची निकड पाहता आवश्यकता आहे. तसेच त्यांचे काम समाधानकारक असून त्यांना मुदतवाढ देणेबाबत शिफारस केलेली आहे.

विभाग प्रमुख यांच्या अहवालानुसार उक्त १ ते ३ डाटा ऐंट्री ऑपरेटर यांना मुदत संपल्याच्या दिनांकापासून ०५ दिवसाचा सेवा खंड देवून पुढील ०६ महिने कालावधीकरीता रु १०,०००/- मात्र मानधनावर पुर्ननियुक्तीने मुदतवाढ देणेबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५३ नुसार मे. स्थायी समिती पुढे ठेवण्यासाठी मा. आयुक्त सो यांनी संदर्भीय क्र ५ अन्वयेच्या टिपणीनुसार मान्यता दिलेली आहे.त्यानुसार सदर मानधनावरील कर्मचा-यांच्या फेर नियुक्ती देण्याबाबतचा विषय मे स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून मानधनावरील ३ डाटा एंन्टी ऑपरेटर कर्मचारी यांना ६ महिने मुदतवाढ देण्यांस मुदत संपल्याच्या दिनांकापासून ५ दिवसाचा खंड देऊन ०६ महिने कालावधीकरीता एकत्रित मानधन रु. १००००/- यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी, याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री. हर्षकुमार राधेश्याम रेलन
अनुमोदक:- श्री. नरेश रुपला चौधरी

**सर्वानुमते मंजुर,**
सही/-x x x
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-३४ धुळे मनपा कार्यक्षेत्रातील कबीरगंज मनपा दवाखान्यातील १ औषध निर्माता ६ महिने मुदतवाढ देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. नागसेन बोरसे विषय मंजुर करण्यांत यावा.

म. बन्सीलाल जाधव विषय मंजुर करण्यांत यावा.

| | |
|---|---|
| म.सभापती | सर्व सनमा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे. |

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ३४ दिनांक १६/०३/२०२२**

महानगरपालिका कबीगंज दवाखाना येथे औषध निर्माता श्री संकेत जैतपुरे यांची एकत्रित मानधन रु १२२००/- मात्र नुसार ०६ महिने कालावधी करीता नियुक्ती करण्यात आली होती.त्यांची नियुक्ती दि.९/२/२०२२ रोजी संपुष्ठात आलेली आहे.

त्याअनुषंगाने संदर्भीय क्र २ अन्वये श्री संकेत जैतपुरे, औषध निर्माता मानधन यांनी पुर्ननियुक्ती मिळणेबाबत विनंती केलेली आहे. तसेच संदर्भीय क्र ३ व ४ अन्वये अनुक्रमे वैदयकीय अधिकारी कबीरगंज दवाखाना व आरोग्याधीकारी यांनी श्री जैतपुरे यांना मुदतवाढ देणेबाबत शिफारस केलेली आहे.

| अ क्र | उमेदवाराचे नाव | पदाचे नाव | एकत्रित मानधन रु |
|---|---|---|---|
| १ | श्री संकेत जैतपुरे | औषध निर्माता | १२२००/- |

आरोग्याधीकारी व वैदयकीय अधिकारी यांनी केलेल्या शिफारशीनुसार श्री संकेत जैतपुरे यांना मुदत संपल्याच्या दिनांकापासून ०५ दिवसाचा सेवा खंड देवून पुढील ०६ महिने कालावधीकरीता रु.१२,२००/- मात्र मानधनावर पुर्ननियुक्तीने मुदतवाढ देणेबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५३ नुसार मे.स्थायी समिती पुढे ठेवण्यासाठी मा.आयुक्त सो यांनी संदर्भीय क्र ५अन्वयेच्या टिपणीनुसार मान्यता दिलेली आहे.त्यानुसार सदर मानधनावरील कर्मचा-यांच्या फेर नियुक्ती देण्याबाबतचा विषय मे स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून मानधनावरील कबीरगंज मनपा दवाखान्यातील १ औषध निर्माता यांना ६ महिने मुदतवाढ देण्यांस मुदत संपल्याच्या दिनांकापासून ५ दिवसाचा खंड देऊन ०६ महिने कालावधीकरीता एकत्रित मानधन रु. १२२००/- यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री. नागसेन दामोदर बोरसे
अनुमोदक:- श्री. बन्सीलाल माणिक जाधव

**सर्वानुमते मंजुर,**
सही/-x x x
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक:- ३५ | कोरोनाच्या संभाव्य तिस-या लाटेची शक्यता लक्षात घेता रुग्णासाठी भोजन व्यवस्था करणे कामी दर निश्चित करणे तसेच यापूर्वी मागविण्यांत आलेल्या ई निविदेतील निविदा धारकांना अनामत रक्कम परत करणे बाबतआलेल्या कार्यालयीनअहवालावर विचार करणे. |
| म. नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले. |
| म. हर्षकुमार रेलन | विषय मंजुर करण्यांत यावा. |
| म.साबीर शेठ | विषय मंजुर करण्यांत यावा. |
| म.सभापती | सर्व सनमा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे. |

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ३५ दिनांक १६/०३/२०२२**

धुळे महानगरपालिका कोविड-१९ च्या पार्श्वभुमीवर धुळे शहरातील कोरोना ग्रस्त रूग्णांना भोजन व्यवस्था करणेस धुळे महानगरपालिके मार्फत हॉटेल कान्हा यांना शासन निर्णय 1 डिसेंबर 2016 च्या निर्देशानुसार 3.3.1 प्रमाणे अति तात्काळ व्यवस्था करण्यात आली होती. तसेच सदरची सेवा पुर्वरत चालु ठेवुन भोजन व्यवस्थेस जाहिर ई निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. त्यामध्ये मे. वैभव सर्व्हिसेस, धुळे यांचे दर कमीत कमी चे असल्यामुळे त्यांना पुरवठा आदेश देण्यात आलेला होता. त्याप्रमाणे त्याची सेवा सुरळीत चालु असतांना सदरचे प्रोप्रायटर नरेंद्र पुरूषोत्तम कापडणीस यांची कोरोना ग्रस्तांमुळे त्यांचा मृत्यु झाला. त्यामुळे सदरची सेवा पुढे सुरळीत चालु ठेवण्यासाठी L2पुरवठा धारक धनलक्ष्मी मंडप डेकोरेटर्स यांना तात्काळ सेवा पुरविण्यास मा.आयुक्त सो. यांच्या मंजुरीने पुरवठा आदेश देण्यात आलेला होता. तरी त्यांनी पुढे सेवा सुरळीत व चांगल्या प्रकारची दिलेली होती. तरी दुसरी लाट संपल्या नंतर सदरचे भोजन व्यवस्थेचे काम बंद करण्यात आलेले होते.

त्याप्रमाणे सदरची अनामत रक्कमेस 1 वर्षे कालावधी पुर्ण झालेला असुन त्यांनी अनामत रक्कम परत मिळणेस विनंती अर्ज सादर केलेला आहे.

तरी देशात कोरोना च्या तिसऱ्या लाटेची शक्यता असल्याने उपायोजना म्हणुन भोजन व्यवस्था करण्यासाठी सेवा धारक यांना पुरवठा आदेश देण्यास विभागामार्फत कार्यवाही करण्याकरीता सदरचा प्रस्ताव सादर करण्यात आला असता मा.अतिआयुक्त सो. यांच्या निर्देशानुसार धुळे जिल्हा रूग्णालय यांच्या दराबाबत तपासणी करून फेर सादर करण्यास सुचविले असता त्या प्रमाणे त्याच्या कडुन प्राप्त दर रू. १५४/- रू प्रति व्यक्ती असल्याने त्या दरांमध्ये मे. हॉटेल कान्हा धुळे हे काम करण्यास तयार असल्याने त्यांनी मनपास विनंती अर्ज सादर केलेला आहे.

त्याचप्रमाणे ई निविदा मधील भरलेली अनामत रक्कम परत करणेस तसेच ३ ऱ्या लाटेची संभावना लक्षात घेता मे. हॉटेल कान्हा यांना भोजन पुरवठा आदेश देण्यास मंजुरी मिळणेस स्थायी समिती पुढे सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून हॉटेल कान्हा यांचे निगोसिएशन अंती आलेले दर रु.१५४/- प्रति व्यक्ती या दरास मान्यता देण्यांत येत आहे.व ई निविदेतील इतर निविदा धारकांना त्यांची अनामत रक्कम परत करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री. हर्षकुमार राधेश्याम रेलन
अनुमोदक:- श्री. खान मोहम्मद साबीर मुहिबुल्लाह

**सर्वानुमते मंजुर,**
सही/-x x x
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

# धुळे महानगरपालिका,धुळे

## नगरसचिव कार्यालय

### स्थायी समिती सभा क्रमांक ७ चे इतिवृत्त

---

**धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह, धुळे**
**बुधवार दिनांक २३/०३/२०२२**
**वेळ दुपारी १२-३० वाजतां**

धुळे महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा क्रं.७ आज बुधवार दिनांक २३/०३/२०२२ रोजी दुपारी १२-३० वाजतां **श्री. शितल मोहन नवले, सभापती,** स्थायी समिती, मनपा धुळे यांच्या अध्यक्षतेखाली **धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह** भरली. या ऑन लाईन सभेस खालील सन्मा.सदस्य हजर होते.

| अ.क्रं. | सदस्यांचे नांव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. नवले शितल मोहन | सभापती |
| २ | श्री. जाधव संजय सुधाकर | सदस्य |
| ३ | श्री. बोरसे नागसेन दामोदर | सदस्य |
| ४ | श्री. जाधव वान्सीलाल माणिक | सदस्या |
| ५ | श्रीमती चौधरी मंगल अर्जुन | सदस्या |
| ६ | श्री. अन्सारी फातमा नुरुल अमीन | सदस्या |
| ७ | श्री. चौधरी नरेंद्र रुपला | सदस्य |
| ८ | श्रीमती चौधरी प्रतिभा शिवाजीराव | सदस्या |
| ९ | श्री.अहिरराव किरण हरिचंद्र | सदस्य |
| १० | श्री. रेलन हर्षकुमार राधेश्याम | सदस्य |
| ११ | श्रीमती अग्रवाल सारिका प्रवीन | सदस्या |
| १२ | श्री. अन्सारी अब्दुल लतीफ अब्दुल हमीद | सदस्य |
| १३ | श्रीमती पठाण नाजियाबानो नासिर खा | सदस्या |

उपस्थित अधिकारी गण

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. देविदास टेकाळे | आयुक्त |
| २ | श्री. नितीन कापडनीस | अति. आयुक्त |
| ३ | श्रीमती पल्लवी शिरसाठ | सहा. आयुक्त |
| ४ | श्री. एन.प. सोनार | सहा. आयुक्त |
| ५ | श्री मनोज अरविंद वाघ | नगरसचिव |
| ६ | श्री. के. एन. शिंदे | अभियंता |
| ७ | श्री. बी.एस. रनाळकर | प्र.मुख्य लेखाधिकारी तथासहा. कर मूल्य निर्धारण अधिकारी |
| ८ | श्री. चंद्रकांत जाधव | सहा.आरोग्याधिकारी |

| | | |
|---|---|---|
| ९ | श्री. विकास साळवे | स्वच्छता निरीक्षक मलेरिया |
| १० | श्री. चंद्रकांत मोरे | लेखापाल |
| ११ | श्री. किशोर सुडके | परवाना अधिक्षक तथा बाजार विभाग प्रमुख |
| १२ | श्री. एन.के. बागुल | विद्युत अभियंता |
| १३ | श्री.राजेश गायकवाड | व.लि. मनपा शि.मं. |
| १४ | श्री. पी.डी. चव्हाण | ओव्हरसिअर बां.वि. |
| १५ | श्री.हेमंत पावटे | ओव्हरसिअर बां.वि. |
| १६ | श्री. राजू माईनकर | भांडारपाल |
| १७ | श्रीमती कल्पना जाधव | अभिलेखापाल |
| १८ | श्री.प्रसाद जाधव | अतिक्रमण विभाग |
| १९ | श्री. तुषार ढाके | सहा अग्नीशमन अधिकारी |
| २० | श्री. सुक्राम राऊत | वाहन विभाग |

मा. सभापती — सन्मा.सदस्य मा.आयुक्त सो. सर्व अधिकारी कर्मचारी व पत्रकार, छायाचित्रकर बांधव यांचे मी स्थायी समितीच्या बैठकीत स्वागत करतो. सभेचा कोरम पुर्ण झाला असुन नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरु करावे.

विषय क्रमांक :- ३६ — अमृत अभियाणाअंतर्गत धुळे मलनि:स्सारण योजना ता. व जि.धुळे योजनेतील पंपींग मशिनरीचा पुरवठा, उभारणी, कार्यान्वयन करणे व यशस्वी चाचणी करणे याकामास धुळे महानगरपालिकेच्या मान्यतेचा ठराव मिळणे बाबत महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग जळगाव यांनी पत्र सादर केलेले आहे. सदर तहकूब प्रस्तावावर फेर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.नागसेन बोरसे — महाराष्ट्र जिवन प्राधिकरण च्या अधिकाऱ्यांना प्रश्न आहे या योजनेला शासन दरबारी काय नाव आहे ?

म.अभियंता — सदर योजनेच्या संदर्भात महाराष्ट्र जिवन प्राधिकरणामार्फत वेळोवेळी अहवाल सादर होतात. योजनेचे नाव अमृत अभियाना अंतर्गत मलनि:सारण योजना असे नाव आहे.

म.नागसेन बोरसे — ज्या वेळेस डी.पी.आर. सादर केला शासनाच्या मंजूरीसाठी त्यावेळेस नाव काय होते?

म.अभियंता — डी.पी.आर. मध्ये हेच नाव आहे. भूयारी गटार हे प्रचलित नाव आहे. शहर मलनि:सारण योजना हे तांत्रिक नाव आहे.

म.नागसेन बोरसे — मला त्याची इस्टीमेटची कॉपी पाहिजे. आपण जागाचे भूसंपादन केले, त्यांना पैसे दिलेले आहेत आपण ज्या जागाचे भूसंपादन केले त्या जागाबाबत व मालकाबाबत माहिती द्यावी व त्यांना किती मोबदला अदा केला यांची माहिती द्यावी.

म.अभियंता — 40 एम.एल.डी. प्लॅटसाठी जागा स्वत: ची होती 17 एम.एल.डी प्लॅटची जागा भूसंपादीत केली आहे. सदर जागा शासनाची होती आपण शासनास मोबदला अदा केलेला आहे. यानंतर कुठलीही जागा भूसंपादीत केली नाही. कुठलीही खाजगी जागा आदयापावेतो भूसंपादीत केली नाही.

म.नागसेन बोरसे — आमच्या प्रभागात चारी बुजवण्याचे इस्टीमेट बनवणार होतो त्या इस्टीमेटमध्ये मा. अति. आयुक्त यांनी असा शेरा मारला आहे की, भूयारी गटारीचे कामात चारी बुजविण्यांचे काम समाविष्ट आहे ती संबंधीत ठेकेदाराची जबाबदारी आहे ते काम म.जी.प्रा. मार्फत करुन देण्यात यावे. काम आपण करायचे व तेवढे पैसे त्या ठेकेदाराच्या बिलातून कपात करण्यात येईल असे करारनाम्यात अट आहे का? याबाबत खुलासा करावा

म.अभियंता — संबंधीत सदस्यानी जो प्रश्न विचारला आहे सदर बाब मला तपासून पहावी लागेल

| | |
|---|---|
| म.नागसेन बोरसे | माझ्या माहिती प्रमाणे करारनामा केला आहे त्यात असे म्हटले काम आपण करायचे व पैसे त्याच्या बिलातून कट करण्यात येईल. |
| म.सभापती | हाच प्रश्न मी सदस्य असतांना उपस्थित केला होता. त्यात मी यांना सूचवले होते संबंधीत ठेकेदार करत नसेल तर आपण करुन टाका. मी इस्टीमेट पण चेक केले. त्यात त्यांनीच काम करायचे तुम्हाला ही माहिती आहे तो कसा आहे त्याच्यावर आपण काय कार्यवाही करतो आहोत. म.जी.प्रा. स्तरावरती जिकडे कुठे काही शिल्लक असेल त्यातून ते करायला सुचित केले आहे. |
| म.प्रतिभा चौधरी | यात एकच सांगायचे आहे. त्याने अनेक ठिकाणी चेंबर केलेले नाही व अनेक ठिकाणी चाऱ्या देखील बुजवल्या नाही. आमच्या प्रभागात अपूर्ण कामे राहिले चेंबरचे व चारी बुजवण्याचे ते कामे म.जी.प्रा. मार्फत करण्यात यावी. अशी विनंती आहे. |
| म.हर्षकुमार रेलन | एल.बी.टी. संदर्भात बोलायचे आहे नाईक मॅडमांना बोलवा. |
| म.सभापती | आयत्या वेळचे विषय घेऊ नका नाईक मॅडम माझी परवानगी घेऊन रजेवर आहे. |
| म.किरण अहिरराव | या भूयारी गटारीमूळे देवपूर च्या नागरीकांचे हाल होत आहे. महिंदळे गावात अशी कोणत्याही योजनेची गरज नाही. याची नोंद घ्यावी. |
| म.सभापती | सदर प्रस्ताव यापूर्वी झालेल्या बैठकीत आवश्यक ती माहिती संबंधित विभागामार्फत सादर न झाल्याने तहकूब ठेवण्यांत आलेला होता. या प्रस्तावासंदर्भात मजिप्राचे कार्यकारी अभियंता श्री. निकम साहेब यांनी समक्ष सोमवारी भेट घेवून प्रस्तावाची संपूर्ण पार्श्वभूमी व आवश्यकता विषद केली. धुळे शहरात यापूर्वी देवपूर विभागासाठी भूमिगत गटार योजना कार्यान्वीत झालेली आहे. यासाठी केंद्र शासन व महाराष्ट्र शासन तसेच धुळे महानगरपालिका यांचा आवश्यक तो निधी उपलब्ध झालेला आहे. सदर योजना शहरासाठी अत्यंत महत्पूर्ण आहे. या योजनेचा पहिला टप्पा पूर्ण त्यांच्या मार्गावर असून पाईप लाईन टाकण्यात आलेली आहे. तथापि पंपींग स्टेशन अभावी सदर योजना अपूर्ण अवस्थेत राहणार आहे. त्यामुळे पंपींग स्टेशन उभारणी करुन योजना कार्यान्वीत होणे आवश्यक आहे. त्यासाठी सदर प्रस्ताव मजिप्रामार्फत मान्यतेसाठी सादर झालेला आहे. सदर योजनेची अंमलबजावणी व कार्यान्वय यंत्रणा मजिप्रा असणार आहे. त्यामुळे ही महत्वपूर्ण योजना शहरासाठी आवश्यक असल्याने महाराष्ट्र जिवन प्राधिकरण विभाग जळगांव यांनी सादर केलेल्या पत्रास अधिन राहून सदर प्रस्तावित कामास व दरास मान्यता देण्यांत येत आहे. |

सदरचे पंपींग मशिनरी बसविण्याचे काम तांत्रिक स्वरुपाचे असल्याने या कामाच्या त्रयस्थ तपासणीच्या वेळी महानगरपालिकेच्या समक्ष अधिका-यांस बोलविण्याची दक्षता मजिप्रा यांनी घ्यावी.सदरची मशिनरीची कार्यान्वय तपासणी धुळे महानगरपालिकेच्या अधिका-या समक्ष करण्यांत यावी व तसा अहवाल सदर कामाची देयके अदा करण्यापूर्वी मजिप्रा यांनी महानगरपालिकेस सादर करावा.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ३७ दिनांक २३/०३/२०२२**

अमृत अभियाणांतर्गत धुळे मलनिस्सारण योजनेची कामे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग,जळगांव अंतर्गत पुर्ण ठेव तत्वावर सुरु आहेत.सदर कामाचे निवीदा कामाची अंदाजपत्रकीय रक्कम खालीप्रमाणे

| | | |
|---|---|---|
| १ | पम्पिंग स्टेशन नं १येथील पम्पिंग मशिनरीचा पुरवठा उभारणी ,कार्यान्वयन व यशस्वी चाचणी करणे. | **रु.१,००,३९,७४६/-** |
| २ | पम्पिंग स्टेशन नं २ येथील पम्पिंग मशिनरीचा पुरवठा ,उभारणी कार्यान्वयन व यशस्वी चाचणी करणे . | **रु.१,७७,४५,२९४/-** |

| | | |
|---|---|---|
| ३ | निविदेतील कामांची एकूण अंदाजित किमंत | **रु.२,७७,८५,०४०/-** |

सदर योजनेच्या उपांगामध्ये उपरोक्त विषयांकित कामाचा समावेश आहे. सदरच्या कामासाठी ई-निविदेच कार्यवाही सुरु आहे.त्यानुसार ई-निविदेच्या व्दितीय मागणी दरम्यान 3 ठेकेदारांनी सहभाग नोंदवला. सदर ठेकेदारांच्या तांत्रिक व वित्तीय लिफाल्यांच्या छाननी नंतर मे सुवास इलेक्ट्रीकल्स यांचा न्युनतम देकार 1.10% कमी इतक्या दराचा प्राप्त झाला आहे. सदर देकाराची चालु दरसुचीशी तुलणा करता तो 6.64% कमी इतक्या दराचा येत आहे. त्याप्रमाणे ई निविदेचा मुल्यांकन प्रस्ताव तयार करण्यात येऊन तो मा.मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, नाशिक व मा. सदस्य सचिव महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मुंबई यांचे मार्फत नगरविकास विभाग, मंत्रालय मुंबई यांचे कडे पाठविण्यात आला आहे.

सदरच्या कामास धुळे महानगरपालिकेच्या मान्यतेचा ठराव मिळणेस बाबत महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग जळगाव यांनी संदर्भ पत्रानुसार कळविले आहे.

उपरोक्त विषयानुसार म.जी.प्रा कडील पत्र क्र.४१०/ दि.१७/२/२०२२ च्या पत्रानुसार पंपिंग मशिनरी कामाच्या निविदाच्या दर मंजुरीच्या प्रस्तावास धुळे महानगरपालिकेचा ठराव मिळणेची विनंती कार्यकारी अभियंता, मजीप्रा यांनी केली आहे.सदरच्या प्रकल्पीय कामाबाबतचा तपशील खालीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे.

१) महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.- अमृत २०१७/ प्र.क्र.४२९/ नवि-३३ दि.२५/९/२०१७ नुसार केंद्रशासन पुरस्कृत अमृत अभियान अंतर्गत धुळे शहराच्या मलनि:स्सारण प्रकल्पास प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे.
२) या प्रशासकीय मान्यतेनुसार या कामाची प्रकल्पीय किमंत रु.१३१.५४ कोटी मात्र आहे
३) सदरचे यांत्रिकी कामाचा समावेश यामध्ये अंतर्भूत आहे.
४) सदरच्या योजनेचा वित्तीय आकृतिबंध खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचे नाव | योजनेची किमंत (डीपीआर नुसार ) | केंद्रशासनामार्फत अनुज्ञेय अनुदान (प्रकल्प किमंतीच्या ५०%) | राज्य शासना मार्फत अनुज्ञेय अनुदान (प्रकल्प किमंतीच्या२५%) | नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचा सहभागी(प्रकल्प किमंतीच्या २५%) |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | धुळे महानगरपालिका | रु.१३१.५४ कोटी | रु.६५.७७ कोटी | रु.३२.८८५ कोटी | रु.३२.८८५ कोटी |

सदर प्रस्ताव मे.स्थायी समिती समोर सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्ताव यापूर्वी झालेल्या बैठकीत आवश्यक ती माहिती संबंधित विभागामार्फत सादर न झाल्याने तहकूब ठेवण्यांत आलेला होता.या प्रस्तावासंदर्भात मजिप्राचे कार्यकारी अभियंता श्री.निकम साहेब यांनी समक्ष सोमवारी भेट घेवून प्रस्तावाची संपूर्ण पार्श्वभूमी व आवश्यकता विषद केली. धुळे शहरात यापूर्वी देवपूर विभागासाठी भूमिगत गटार योजना कार्यान्वीत झालेली आहे. यासाठी केंद्र शासन व महाराष्ट्र शासन तसेच धुळे महानगरपालिका यांचा आवश्यक तो निधी उपलब्ध झालेला आहे. सदर योजना शहरासाठी अत्यंत महत्पूर्ण आहे. या योजनेचा पहिला टप्पा पूर्ण त्यांच्या मार्गावर असून पाईप लाईन टाकण्यात आलेली आहे. तथापि पंपींग स्टेशन अभावी सदर योजना अपूर्ण अवस्थेत राहणार आहे. त्यामुळे पंपींग स्टेशन उभारणी करुन योजना कार्यान्वीत होणे आवश्यक आहे.त्यासाठी सदर प्रस्ताव मजिप्रामार्फत मान्यतेसाठी सादर झालेला आहे. सदर योजनेची अंमलबजावणी व कार्यान्वय यंत्रणा मजिप्रा

असणार आहे.त्यामुळे ही महत्त्वपूर्ण योजना शहरासाठी आवश्यक असल्याने महाराष्ट्र जिवन प्राधिकरण विभाग जळगांव यांनी सादर केलेल्या पत्रास अधिन राहून सदर प्रस्तावित कामास व दरास मान्यता देण्यांत येत आहे.

सदरचे पंपींग मशिनरी बसविण्याचे काम तांत्रिक स्वरुपाचे असल्याने या कामाच्या त्रयस्थ तपासणीच्या वेळी महानगरपालिकेच्या समक्ष अधिका-यांस बोलविण्याची दक्षता मजिप्रा यांनी घ्यावी. सदरची मशिनरीची कार्यान्वय तपासणी धुळे महानगरपालिकेच्या अधिका-या समक्ष करण्यांत यावी व तसा अहवाल सदर कामाची देयके अदा करण्यापूर्वी मजिप्रा यांनी महानगरपालिकेस सादर करावा.

सुचक :- श्री. हर्षकुमार राधेश्याम रेलन

अनुमोदक :- श्री. नरेश रुपला चौधरी

**सर्वानुमते मंजुर,**

**सही:-x x x**

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक :- ३७ | प्रभाग क्रं. १८ मध्ये जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत स.नं.५१०/ अ/ २ मधील ओपनस्पेस जागेस संरक्षण भिंत बांधणेचे निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे. |
| म. नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले. |
| म.किरण अहिरराव | सदर विषयांच्या कार्यालयीन टिपणी मध्ये हिंद कन्सट्रक्शन यांचे शेकडा ३.०० टक्के कमीने सर्वात कमी दर आलेले असतांना मे.एकविरा कन्सट्रक्शन यांचे अंदाजपत्रकीय दराची शिफारस नजरचूकी झालेली आहे तरी कार्यालयीन टिपणीमध्ये दुरुस्ती करुन सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत यावी. |
| म. नगरसचिव | यांत बांधकाम विभागाकडून टिपणी सादर झालेली आहे.सदर टिपणीत ३% कमीने दर नजरचूकीने नमूद केलेले आहेत. तथापि यांत एकविरा कन्स्ट्रक्शन यांचे अंदाजपत्रकीय दराची निविदा सर्वात कमीने आलेली आहे. |
| म. सारिका अग्रवाल | विषय मंजूर करण्यांत यावा. |
| म.सभापती | सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने कार्यालयीन टिपणी दुरुस्ती करुन सर्वात कमी असलेल्या निविदा धारकांचे दरास मान्यता देण्यांत येत आहे. |

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ३८ दिनांक २३/०३/२०२२**

प्र.क्र. १८ मध्ये जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत स.नं. ५१०/अ / २ मधील ओपनस्पेस जागेस संरक्षण भिंत बांधणे बाबतच्या कामास धुळे महानगरपालिका म. जिल्हाधिकारी यांचे कडील प्रशासकीय मान्यता दि.१०/०१/२०२२ रोजीच्या प्रशासकीय मान्यता उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु. २९,८२,०००/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./३१२ /२०-२०२१ दिनांक १२/११/२०२१अन्वये रक्कम रु.२९,८२,८२६/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत या धुळे महानगरपालिका जा.क्र./धुमपा/पापुवि/ १२४० /२०२०-२१ दि.२०/०१/२०२२ अन्वये दि. २१/०१/२०२२ अन्वये दैनिक लोकमत / पथदर्शी या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे /ठेकेदराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | ऋषभ संतोष खिवसरा | शे.२.००% जास्तीने | |
| २. | हिंद कन्सट्रक्शन | शे.३.००% जास्तीने | |
| ३. | एकविरा कन्सट्रक्शन | अंदाजपत्रकीय दराने | सर्वात कमी दर |

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **श्री / मे.** एकविरा कन्सट्रक्शन यांचे दर **अंदाजपत्रकीय दराने आले** आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब सदर काम **अंदाजपत्रकीय दराने** आलेले असल्याने यांच्या दरास मान्यतेसाठी मे.स्थायी समिती पुढे मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी **एकविरा कन्सट्रक्शन यांचे अंदाजपत्रकीय दराने आलेल्या दरांस** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री. किरण हरिचंद्र अहिरराव
अनुमोदक:- श्रीमती सारिका प्रवीण अग्रवाल

**सर्वानुमते मंजुर,**
सही/-x x x
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक - ३८ प्रभाग क्रं.१८ मध्ये जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत स.नं. ४८९/ २ / १ पार्वतीनगर ओपनस्पेस जागेस संरक्षण भिंत बांधणेचे निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.किरण अहिरराव — सदर विषयांच्या कार्यालयीन टिपणी मध्ये हिंद कन्सट्रक्शन यांचे शेकडा ३.०० टक्के कमीने सर्वात कमी दर आलेले असतांना मे.एकविरा कन्सट्रक्शन यांचे अंदाजपत्रकीय दराची शिफारस नजरचूकी झालेली आहे तरी कार्यालयीन टिपणीमध्ये दुरुस्ती करुन सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत यावी.

म. नगरसचिव — यांत बांधकाम विभागाकडून टिपणी सादर झालेली आहे. सदर टिपणीत ३% कमीने दर नजरचूकीने नमूद केलेले आहेत. तथापि यांत एकविरा कन्स्ट्रक्शन यांचे अंदाजपत्रकीय दराची निविदा सर्वात कमीने आलेली आहे.

म. सारिका अग्रवाल — विषय मंजूर करण्यांत यावा.

म.सभापती — सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने कार्यालयीन टिपणी दुरुस्ती करुन सर्वात कमी असलेल्या निविदा धारकांचे दरास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ३९ दिनांक २३/०३/२०२२**

प्र.क्र. १८ मध्ये जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत स.नं. ४८९/ २/ १ पार्वती नगर ओपनस्पेस जागेस संरक्षण भिंत बांधणे बाबतच्या कामास धुळे महानगरपालिका म. जिल्हाधिकारी यांचे कडील प्रशासकीय मान्यता दि.१०/०१/२०२२ रोजीच्या प्रशासकीय मान्यता उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु. ३१,२५,०००/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./३११ /२०-२०२१ दिनांक १२/११/२०२१ अन्वये रक्कम रु.३१,३५,२५५/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत या धुळे महानगरपालिका जा.क्र./धुमपा/पापुवि/१२४०/२०२०-२१ दि. २०/०१/२०२२ अन्वये दि. २१/०१/२०२२ अन्वये दैनिक लोकमत / पथदर्शी या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे /ठेकेदराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | ऋषभ सतीष खिवसरा | शे.२.००% जास्तीने | |
| २. | हिंद कन्सट्रक्शन | शे.३.००% जास्तीने | |
| ३. | एकविरा कन्सट्रक्शन | अंदाजपत्रकीय दराने | सर्वात कमी |

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **श्री/मे.एकविरा कन्सट्रक्शन यांचे दर अंदाजपत्रकीय दराने आले** आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब सदर काम **अंदाजपत्रकीय दराने** आलेले असल्याने यांच्या दरास मान्यतेसाठी मे.स्थायी समिती पुढे मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी **एकविराकन्सट्रक्शन यांचे अंदाजपत्रकीय दरानेआलेल्या दरांस** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे.सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी.याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री. किरण हरिचंद्र अहिरराव
अनुमोदक:- श्रीमती सारिका प्रविण अग्रवाल

**सर्वानुमते मंजुर,**
सही/-x x x
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- ३९ — मनपा कार्यालयीन कामासाठी श्री. मनोज अरविंद वाघ -उपनगरसचिव मनपा धुळे यांना माहे १ एप्रिल २०२२ खाजगी वाहन वापरणेस व त्यापोटी खाजगी वाहन प्रतिपुर्ती भत्ता / भाडे **रु.१३८७५/-** मासिक भाडे लागु करणेस प्रशासकीय व आर्थिक मंजुरी मिळणे व येणाऱ्या खर्चास व वाहन प्रतिपुर्ती भत्ता लागु करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.
म. नागसेन बोरसे — विषय मंजुर करण्यांत यावा.
म. प्रतिभा चौधरी — विषय मंजूर करण्यांत यावा.
म. सभापती — सर्वसन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ४० दिनांक २३/०३/२०२२**

महानगरपालिका कार्यालयीन कामासाठी श्री.मनोजअरविंद वाघ उपनगर सचिव मनपा धुळे यांना माहे ०१ एप्रिल२०२२ पासुन खाजगी वाहन धुळे महानगरपालिका कार्यालयीन कामकाजासाठी महानगरपालिकेचे वाहन उपलब्ध नसल्याने खाजगी वाहन वापर करण्यास व

त्यापोटी खाजगी वाहन प्रतिपुर्ती भत्ता मिळणेस श्री.मनोज अरविंद वाघ -उपनगरसचिव मनपा धुळे यांनी संदर्भ क्र.५ मे.स्थायी समिती ठराव क्र. ४८ दिनांक: ०६/०५/२०२१ मधील सुचनेनुसार पत्र सादर केलेले आहे.

संदर्भ क्र.१ शासन निर्णय क्रमांक—वाहन१०.०५/प्र.क्र.१३/२००५/ विनियम मंत्रालय मुंबई दि.२५ मे २००५ नुसार स्थायी समिती ठरांव क्र.१० दि.२१/१२/२००६ चे नुसार पदाधिकारी व आयुक्त व त्या पेक्षा उच्च दर्जा वरील उपायुक्त व इतर प्रति नियुक्तीने वर्ग १ व वर्ग २ च्या अधिकाऱ्यांना वाहन वापराच्या दर महा खर्चाची प्रतिपुती डिझेल वाहनासाठी ₹.१४,८७५/- मधुन ₹.१०००/- वजावट करुन ₹.१३,८७५/- मात्र मंजुरी देण्यात आली आहे.

संदर्भक्र.३नुसार धुळे महानगरपालिककेतील अधिकारी/पदधिकारी यांना धुळे महानगरपालिका ठरांव क्र.२०१ दि.१३/१/२०१६ अन्वये कार्यालयीन अहवालास अधिन राहुन वाहन प्रतिपुर्ती भत्ता अदा करणेस मान्यता देण्यात आली आहे व या संदर्भात शासनाकडील आदेश तपासुन त्यानुसार उचित निर्णय प्रशासनाने घ्यावा असे नमुद आहे.त्याअन्वये तात्कालीन म.आयुक्त सो यांनी मनपातील पदाधिकारी/अधिकारी यांना वाहन प्रतिपुर्ती भत्ता अदा करणेचा निर्णय मनपाचा आर्थिक हिताचे असल्याने मनपातील पदाधिकारी/ अधिकारी यांना खाजगी वाहन प्रतिपुर्ती भत्ता अदा करणेस मंजुरी दिलेली आहे.

मे.स्थायी समिती ठराव नं ८९ दि.१०/०८/२०१२ अन्वये वाहन भत्ता बंद करुन भाडे तत्वावर वाहन लावणे बाबत निर्णय होऊन दि. ०९/०१/२०१३ रोजी वाहन भाडे तत्वावर पुरविणे बाबत फेर निविदा (टेंडर) नोटीस प्रसिध्द करणेत आली होती. तरी प्राप्त निविदा दर मधील दरा नुसार ₹.२९०००/- मात्र प्रति माहे भाडे येणार असुन शासन निर्णय २५.५.२००५ नुसार दर रक्कम मासिक भाडे ₹.१३८७५/-मात्र आहे.तरी यामध्ये धुळे महानगरपालिकेचे रक्कम₹.१५१२५/- मात्रचा आर्थिक हिताचे आहे.

त्यानुसार निविदेत प्राप्त दर जास्त आहेत व शासन निर्णयात नमुद मासिक वाहन प्रतिपुर्ती भत्ता (दर)कमी आहेत.त्यामुळे संदर्भ क्र.१ शासन निर्णय दि.२५.५.२००५नुसारच व शा.नि. दि. ३१/१२/२००७ शासकीय व इतर कार्यालयांमध्ये वाहनांच्या वापरासंबंधी धारेण नुसार शासन निर्णय निर्गमित होण्याच्या दिनांकास या योजनेनुसार स्वत:चे वाहन शासकीय कामाकाजासाठी वापरत आहेत त्यांच्याकरिता सदर योजनेचा लाभ ते त्या पदावर कार्यरत असेपर्यंत कायम ठेवण्यात येत आहे. त्यानुषंगाने मनपाचे हित लक्षात घेता तत्कालीन पदाधिकारी/अधिकारी यांना म.आयुक्त सो यांनी वाहन प्रतिपुर्ती भत्ता दि.२८/०१/२०१३ने मंजुरी दिलेली आहे.तत्कालीन पदाधिकारी/अधिकारी यांना मा.आयुक्त सो.यांनी दि.१०/१०/२०१९ नुसार डिझेल वाहनांसाठी मासीक ₹.१३८७५/- मात्र वाहन प्रतिपुर्ती भत्ता लागू करून अदायगीस मंजुरी दिलेली आहे. तसेच सर्वसाधारण सभा ठराव नं २०१ दि. १३/०१/२०१६ अन्वये वरील प्रमाणे प्रस्तावास मंजुरी देणेत आलेली आहे.

शासन निर्णय क्र.वाहन -१००७/प्र.क्र४८/२००७/विनिमय मंत्रालय मुंबई दि.३१ डिसेंबर २००७ अन्वये शासनाने खाजगी वाहन शासकीय कामाकाजासाठी वापरणेसाठीची योजनेस मिळालेला अल्प प्रतिसाद पाहुन योजना बंद करणेचा निर्णय घेण्यात आला. सदरील शासन निर्णया अन्वये जे अधिकारी सदर शासन निर्णय निर्गमित होण्याच्या दिनकांस या योजने नुसार स्वत:चे खाजगी वाहन शासकीय कामाकाजासाठी वापरत आहेत त्याच्या करिता सदर योजनेचा लाभ ते त्या पदावर कार्यरत असे पर्यंत कायम ठेवण्यात येत आहे असे नमुद आहे.

**मासिक वाहन प्रतिपुर्ती भत्ता**

**दि. ०१/४/२०२२ पासुन प्रतिमाह (एक (१) महिना) ₹. १३८७५/-**

श्री.मनोज अरविंद वाघ -उपनगरसचिव मनपा धुळे सो. यांना एक (१) महिन्याच्या खाजगी वाहन प्रतिपुर्ती भत्ता रक्कम ₹.१३,८७५/- मात्र लागु करता येईल व सदर खर्च सन २०२२-२३ या अंदाजपत्रकीय अधिकारी/पदाधिकारी वाहन भाडे बजेट तरतुद रक्कम ₹.३०,०००००/- मात्र मधुन करता येईल.

सर्वसाधारण सभा ठराव नं २०१ दि.१३/०१/२०१६ अन्वये पदाधिकारी/आधिकारी खाजगी वाहन भत्ता लागू करूनअदा करणेस मंजुरी देणेत आलेली आहे. सदरील ठरावात नगरसचिव पदाचा उल्लेख नाही. परंतु शासन निर्णय, क्रमाक धुमपा-१०१०/प्र.क्र.१०३/नवि-२५, दिनांक:०४मार्च,२०१६ चे विवरण पत्र क्र.१० मंजुर आकृती बंधानुसार नगरसचिव कार्यालयासाठी मंजुर पदांचा तपशिलामध्ये वाहन चालक पद मंजुर आहे. येणेप्रमाणे श्री.मनोज अरविंद वाघ –उपनगरसचिव तथा प्र.नगरसचिव महानगरपालिका धुळे यांना माहे १ एप्रिल २०२२ पासून खाजगी वाहन प्रतिपुर्ती भत्ता/भाडे मासिक ₹.१३,८७५/-(अक्षरी-तेरा हजार आठशे पंच्याहत्तर रुपये) मात्र लागू करणेस प्रशासकीय व आर्थिक मंजुरी तसेच मे.स्थायी समितीकडेस मान्यतेसाठी ठेवणेस मंजुरी दिलेली आहे. त्यानुसार श्री.मनोज अरविंद वाघ– उपनगरसचिव तथा प्र.नगरसचिव महानगरपालिका धुळे यांना माहे १ एप्रिल-२०२२ पासून खाजगी वाहन वापरणेस व त्यापोटी खाजगी वाहन प्रतिपुर्ती भत्ता/भाडे मासिक ₹.१३,८७५/- (अक्षरी-तेरा हजार आठशे पंच्याहत्तर रुपये) मात्र लागू करणेस मे.स्थायी समितीकडेस मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून मनपा कार्यालयीन कामासाठी श्री.मनोज अरविंद वाघ - उपनगरसचिव मनपा धुळे यांना माहे १ एप्रिल २०२२ खाजगी वाहन वापरणेस व त्यापोटी खाजगी वाहन प्रतिपुर्ती भत्ता / भाडे **₹.१३८७५/-** मासिक भाडे लागु करणेस प्रशासकीय व आर्थिक मंजुरी देण्यांत येत असून येणाऱ्या खर्चास व वाहन प्रतिपुर्ती भत्ता लागु करणेस मान्यता देण्यांत येत आहे.

सुचक :- श्री.नागसेन दामोदर बोरसे

अनुमोदक:- श्रीमती प्रतिभाताई शिवाजीराव चौधरी

**सर्वानुमते मंजुर,**

**सही/- x x x**

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

# धुळे महानगरपालिका,धुळे
## नगरसचिव कार्यालय
## स्थायी समिती सभा क्रमांक ८ चे इतिवृत्त

---

**धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह, धुळे**
**गुरुवार दिनांक ३१ /०३/ २०२२**
**वेळ सकाळी ११-०० वाजतां**

धुळे महानगरपालिकेची ऑनलाईन स्थायी समितीची सभा क्रं. ८ आज गुरुवार दिनांक ३१/०३/२०२२ रोजी सकाळी ११-०० वाजतां **श्री. शितल मोहन नवले, सभापती,** स्थायी समिती, मनपा धुळे यांच्या अध्यक्षतेखाली **धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह** भरली. या ऑन लाईन सभेस खालील सन्मा.सदस्य ऑन लाईन व ऑफ लाईन हजर होते.

| अ.क्रं. | सदस्यांचे नांव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. नवले शितल मोहन | सभापती |
| २ | श्री. जाधव संजय सुधाकर | सदस्य |
| ३ | श्री. बोरसे नागसेन दामोदर | सदस्य |
| ४ | श्रीमती कुलेवार किरण राकेश | सदस्या |
| ५ | श्रीमती वराडे वैशाली भिकन | सदस्या |
| ६ | श्री. जाधव बन्सीलाल माणिक | सदस्या |
| ७ | श्रीमती चौधरी मंगला अर्जुन | सदस्या |
| ८ | श्री. अन्सारी फातमा नुरुल अमीन | सदस्या |
| ९ | श्री. चौधरी नरेंद्र रुपला | सदस्य |
| १० | श्रीमती. चौधरी प्रतिभा शिवाजीराव | सदस्या |
| ११ | श्री.अहिरराव किरण हरिचंद्र | सदस्य |
| १२ | श्री. रेलन हर्षकुमार राधेश्याम | सदस्य |
| १३ | श्री.अग्रवाल सारिका प्रविन | सदस्या |
| १४ | श्री. अन्सारी अब्दुल लतीफ अब्दुल हमीद | सदस्य |
| १५ | श्री. खान मोहम्मद साबीर मुहिबुल्लाह | सदस्य |
| १६ | श्रीमती पठाण नाजियाबानो नासिर खा | सदस्या |

उपस्थित अधिकारी गण

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. नितीन कापडनीस | अति. आयुक्त |
| २ | श्रीमती शिल्पा नाईक | उपायुक्त |
| ३ | श्रीमती पल्लवी शिरसाठ | सहा. आयुक्त |
| ४ | श्री. मनोज अरविंद वाघ | नगरसचिव |
| ५ | श्री. के. एन. शिंदे | अभियंता |
| ६ | श्री. बी.एस. रनाळकर | प्र.मुख्य लेखाधिकारी तथा सहा. कर मूल्य निर्धारण अधिकारी |
| ७ | डॉ.एम.आर. शेख | प्र.आरोग्याधिकारी |
| ८ | श्री. चंद्रकांत जाधव | सहा. आरोग्याधिकारी |
| ९ | श्री. विकास साळवे | स्वच्छता निरीक्षक मलेरिया |

| | | |
|---|---|---|
| १० | श्री. प्रकाश सोनवणे | नगररचना ओव्हरसिअर |
| ११ | श्री. संजय मोरे | प्र.कार्यालय अधिक्षक |
| १२ | श्री. एन.के. बागुल | विद्युत अभियंता |
| १३ | श्री.राजेश गायकवाड | व. लि. मनपा शि.मं. |
| १४ | श्री. राजू माईनकर | भांडारपाल |
| १५ | श्रीमती कल्पना जाधव | अभिलेखापाल |
| १६ | श्री. प्रसाद जाधव | अतिक्रमण विभाग |
| १७ | श्री. तुषार ढाके | सहा.अग्नीशमन अधिकारी |
| १८ | श्री. सुक्राम राऊत | वाहन विभाग |

मा. सभापती — सन्मा.सदस्य मा.आयुक्त सो.सर्व अधिकारी कर्मचारी व पत्रकार, छायाचित्रकर बांधव यांचे मी स्थायी समितीच्या बैठकीत स्वागत करतो.सभेचा कोरम पुर्ण झाला असुन नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरु करावे.

म. नगरसचिव — वंदे मातरम् या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

विषय क्रमांक :- ४० — मागील स्थायी समिती सभांचे इतिवृत्त क्रमश:वाचून कायम करणे. (दि.१६/०३/२०२२)

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.हर्षकुमार रेलन — इतिवृत्त वाचून कायम करण्यांत यावे.

म.सभापती — सन्मा.सदस्यांच्या सहमतीने मागील स्थायी समिती सभांचे इतिवृत्त क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ४१ दिनांक ३१/०३/२०२२**

मागील स्थायी समिती सभा दिनांक १६/०३/ २०२२चे धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २८ ते ३५अखेर तसेच सभेत सन्मा. सदस्यांनी उपस्थित केलेली चर्चा व त्यावरील निर्णय क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजूर**

सही/-X X X

**सभापती ,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक :-४१ — मा.आयुक्त सो. यांनी त्यांचे आलेल्या अधिकारात रुपये 5 लाख ते 25 लाखापर्यंत बांधकाम विभागाकडील विकास कामाची दि.11/2/2022 ते दि.25/2/2022 अखेर निर्गमित केलेल्या कार्यादेशाची यादी अवलोकनार्थ सादर.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.सभापती — सदर विषयांची माहिती स्थायी समितीस देण्यांत आली.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ४२ दिनांक ३१/०३/२०२२**

मा.आयुक्त सो. यांनी त्यांचे आलेल्या अधिकारात रुपये ५ लाख ते २५ लाखापर्यंत बांधकाम विभागाकडील विकास कामाची दि.११/२/२०२२ तेदि.२५/२/२०२२अखेर निर्गमित केलेल्या कार्यादेशाची यादी अवलोकनार्थ सादर. **(बांधकाम विभाग)**

**दिनांक :- दि.** १४/०३/२०२२ ते दि.१६/०३/२०२२ **अखेर निर्गमित केलेल्या विकास कामांच्या कार्यादेशची यादी**

| अ. क्र | कार्यादेश क्रमांक | दिनांक | कामाचे नाव | रक्कम | निधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | ५९४ | १४/०३/२०२२ | अंबिका नगर येथे मदनी किराणा दुकान पासून ते चांद रिक्षावाला घरापर्यंत कॉंक्रीट गटार करणे. | ९,९७,४७८/- | आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत |
| २ | ५९५ | १४/०३/२०२२ | धुळे महानगरपालिका क्षेत्रात वृद्ध नागरिकांच्या सोईसाठीविविध भागात सिमेंट बाक बसविणे. | ५,९९,६७६/- | आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत |
| ३ | ६१५ | १६/०३/२०२२ | प्र.क्र.१२ मध्ये भोईवाडा भागात परवेज भाई यांच्या घरापासुन ते अल्लाउद्दीन भैय्या यांचे घरापर्यंत रस्ता कॉंक्रीट करणे. | ७,९३,२७०/- | नगरसेवक निधी २०२१-२२ अंतर्गत |

उक्त यादीचे वाचन करुन सभागृहास अवगत करण्यांत आले.

सही/-X X X

**सभापती ,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- ४२ श्री.फारूक अन्वर शाह, आमदार धुळे शहर यांचे निधीतून कमलाबाई शाळा ते क्युमाईन क्लब पावेतो पादचारी पूल तयार करणेचे निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. नाजिया बानो पठाण विषय मंजूर करण्यांत यावा.

म. किरण अहिरराव विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ४३ दिनांक ३१/०३/२०२२**

श्री.फारूक अन्वर शाह, आमदार धुळे शहर यांचे निधीतून कमलाबाई शाळा ते क्युमाईन क्लब पावेतो पादचारी पूल तयार करणे कामाबाबत मा.जिल्हाधिकारी सो. धुळे यांनी टिपणी मंजुरीने दि.२०/१२/२०२१ अन्वये उक्त कामाबाबत रक्कम रु.६१,४३,६३४/- मात्र खर्चाचा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेत आली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./१९५ दि.२२/०७/२०२१ अन्वये रक्कम रु. ६१,४३,६३४/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./धुमपा/पा.पु.वि./१२२०/२०२२ दि. १३/०१/२०२२ अन्वये दि.१४/०१/२०२२ रोजी देशदूत/आपले नवराज्य या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.०७/०२/२०२२ अखेर निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत रोखीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदार किंवा ठेकेदाराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | श्री.सौरभ संजय कदमबांडे | शे.४.०० % जास्त | |
| २ | मे.प्रियदर्शनी कन्स्ट्रक्शन | **अंदाजपत्रकीय दराने** | **सर्वात कमी दर** |
| ३ | मे.राजप्रभा कन्स्ट्रक्शन | शे.२.०० % जास्त | |

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **मे.प्रियदर्शनी कन्स्ट्रक्शन** यांचे दर **अंदाजपत्रकीय** आहे व त्यांनी नियमा प्रमाणे रोखीने बयाणा रक्कम भरलेली आहे.सबब कंत्राटदार **मे.प्रियदर्शनी कन्स्ट्रक्शन** यांची **अंदाजपत्रकीय** दराने आलेले निविदा दर मंजुरी करीता मे.स्थायी समिती समोर मं जुरीस्तव सादर तसेच काम न मिळालेले ठेकेदारांना त्यांची बयाणा रक्कम परत करणे बाबत मंजुरीस्तव मे. स्थायी समिती समोर सादर झालेला आहे.

सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी **मे. प्रियदर्शनी कन्स्ट्रक्शन** यांचे **अंदाजपत्रकीय** दराने आलेले निविदा दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्रीमती नाजीया बानो पठाण

अनुमोदक:- श्री. किरण हरिचंद्र अहिरराव **सर्वानुमते मंजुर,**

सही/-X X X

**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक:- ४३ | पाणीपुरवठा विभागाकडील **रसायन तज्ञ (केमिस्ट)** या संवर्गातील पदे मानधन तत्वावर भरणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे. |
| म. नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले. |
| म.किरण कुलेवार | या विषयावर माझा आक्षेप आहे. प्रत्येक वेळेस पाण्याची गुणवत्ता वेगवेगळी असते. हे केमीस्ट लोकं पाण्याची व्यवस्थीत चाचणी करत नाही. क्लोरिन व ब्लीचींग पावडर याची अनियमिता असते. माझ्या प्रभागात पाणी पुरवठा होतो त्याची गुणवत्ता वेगवेगळी असते. क्लोरिन हे घातक आहे त्याचे प्रमाण जास्त असते यामुळे कॅन्सरसारखे घातक आजार उदभवू शकतात. |
| म.हर्षकुमार रेलन | या विषयावर आपण ६ जानेवारीला सभेमध्ये हा विषय तहकूब ठेवण्यात आला होता. तो तहकूब ठेवण्याची कारणे काय ? आपण त्यांची नव्याने जाहिरात काढायची होती. |
| म.सभापती | प्रशासनाने खुलासा करुन प्रस्ताव पुश्न:च सादर केला आहे. त्यावेळचे स्थायीचे सदस्य आज येथे उपस्थित नाही. त्या सदस्यांनी हा मुद्दा उपस्थित केला होता. |
| म.हर्ष कुमार रेलन | आपण त्यांची शैक्षणिक अर्हता योग्य नसल्यामुळे हा प्रस्ताव तहकूब केला होता. |
| म.सभापती | त्यांची शैक्षणिक अर्हताबाबत प्रशासनाने तपासणी केली.त्यानंतर हा विषय स्थायी समितीसमोर आलेला आहे. |
| म.प्रतिभा चौधरी | धुळे शहरात एकूण चार फिल्टर प्लांट आहेत. धुळे शहराचा पिण्याचा पाण्याचा गंभीर प्रश्न आहे.अशा ठिकाणी केमिस्ट असणे आवश्यक आहे. वलवाडी येथे फिल्टर प्लांटवर हर्षदा गवळे नावाची मुलगी आहेती आजपण काम करत आहे.तीला देखील या मानधन तत्वावर समाविष्ट करुन घ्यावे. मानधनाचे कर्मचारी ठेवण्यापेक्षा शासनाला प्रस्ताव पाठवावा. कायम कर्मचारी लावावे. |
| म.सभापती | आपण राज्य शासनाकडे तो प्रस्ताव सादर केला त्यात काही त्रुटी होत्या. आस्थापनाचे मोरे व बर्गे यांना मुंबईला पाठवले होते. त्यातील त्रुटी पूर्ण झाल्या आहेत लवकरच १५ ते २० दिवसांत ग्रामीणच्या कर्मचाऱ्यांचा कायमची ऑर्डर येणार आहेत. रोजंदारीचे एकूण ६३ कर्मचारी आहेत १९९३ च्या आधीचे व नंतरचे त्याचा देखील प्रस्ताव दाखल करतोय. लवकरच यांना देखील मान्यता मिळले. कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावातील कर्मचाऱ्यांना मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात येत आहे. |

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ४४ दिनांक ३१/०३/२०२२**

पाणीपुरवठा विभागाकडील **रसायन तज्ञ (केमिस्ट** हे पद मानधन तत्वावर भरणेत आले होते. सदर पदांवर एकुण ०२ उमेदवार कार्यरत होते तरी त्यांच्या कामाची मुदत दि ११/१२/२०२१ रोजी संपुष्ठात आली होती.

| अ क्र | उमेदवाराचे नाव | पदाचे नाव | सेवा प्रवेश नियमावलीनुसार विहित शैक्षणिक अर्हता | धारण केलेली शैक्षणिक अर्हता | कामाचा अनुभव |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री.गोसावी विशाल अशोक | रसायन तज्ञ | मान्यता प्राप्त विदयापीठाची रसायन शास्त्र (केमिस्ट्री) किंवा सुक्ष्म जीवशास्त्र (मायक्रो बायोलॉजी) किंवा पर्यावरण शास्त्र (एन्व्हॉयरमेंट सायन्स)विषयातील पदव्युत्तर पदवी (एमएससी) | एमएससी ऑर्गेनिक केमिस्ट्री | ५ वर्ष |
| २ | श्रध्दामधुकर पाटील | रसायन तज्ञ | | एमएससी | ५वर्ष |

पाणी पुरवठा विभागाकडील दि १८/११/२०२१ रोजीच्या अहवालानुसार श्री विशाल अशोक गोसावी व श्रध्दा मधुकर पाटील. यांना रसायन तज्ञ (केमिस्ट) या पदावर मानधनावर फेर नियुक्ती देणेबाबत अहवाल सादर करण्यात आला होता.

त्याअनुषंगाने मे. स्थायी समिती ठराव क्रमांक १८६ दि ६/१/२०२२रोजीच्या ठरावानुसार पाणीपुरवठा विभागाकडील मानधनावरील रसायन तज्ञ कर्मचा-यांची पुढील ६ महिने कालावधीसाठी मुदतवाढ देणेचे प्रस्ताव सभागृहात चर्चेअंती नामंजूर करण्यात आलेअसून याबाबत प्रशासनाने तातडीने नवीन जाहिरात काढून उमेदवार नियुक्त करणेबाबत कार्यवाही करावी असे सूचित केले आहे.

त्या अनुषंगाने धुळे महानगरपालिकेतील मंजूर आकृतीबंध नुसार पाणीपुरवठा विभागा कडील **रसायन तज्ञ** हया पदाची ०२ जागा मंजूर असून प्रवर्गानुसार अनुसुचित जमाती —०१ पद व खुला प्रवर्गातील ०१ पद मंजूर आहे. पाणीपुरवठा विभागाकडील सदर पद हे अत्यावश्यक असल्याने रसायन तज्ञ हे पद भरणेकामी जाहिरात प्रसिध्द करण्याबाबत अहवाल सादर करण्यात आलेला आहे तथापी सदर अहवालावर निर्णय झालेला नसल्याने जाहिरात प्रसिध्द करणेत आलेली नाही.

याबाबत अभियंता यांनी खालीलप्रमाणे अहवाल सादर केलेला आहे.

श्री विशाल अशोक गोसावी व श्रध्दा मधुकर पाटील,यांना **रसायन तज्ञ** या पदावर मानधनावर जा क्र धुमपा आस्था/४०२ दि २९/६/२०२१ अन्वये नियुक्ती झालेली होती. नियुक्ती दिलयानंतर त्यांची मुदत दिनांक 12/12/2021 रोजी संपुष्टात आली आहे.

सदरचे मानधन तत्त्वावरील रसायन तज्ञ ( केमिस्ट) हे पाणीपुरवठा विभागात कार्यरत असून सदर रसायन तज्ञ (केमिस्ट) यांच्याकडून खालील प्रमाणे कामे करून घेण्यात येत आहे. त्यात covid-१९ लागण सिद्ध झाल्याने शासनाच्याContaintment planमार्गदर्शन सूचनांनुसारतातडीने करावयाच्या उपाययोजना मध्ये पाणीपुरवठा बाबत प्रत्येक जल कुंभावरील नियोजन सांभाळणे, पाणीपुरवठा सुरळीत करणे बाबत कार्यवाही करणे तसेच पाणी शुद्धीकरणासाठी रसायने क्लोरीन टर्नर, ब्लिचिंग पावडर, ॲलम, मीठ चा पुरवठा मुबलक उपलब्ध करणे कामी कार्यवाही करणे तसेच पाण्याचे शुद्धीकरण करून तपासणी अहवाल बाबत कार्यवाही करणे अशी महत्त्वाची कामे या कर्मचाऱ्यांकडून करण्यात येत आहे.

धुळे मनपा आस्थापना विभागामार्फत नवीन मानधनावरील **रसायन तज्ञ (केमिस्ट)** यांची भरती प्रक्रिया सुरू असून या प्रक्रियेस विलंब लागू शकतो तसेच उक्त आदेशात नमूद अटी शर्ती क्रमांक 9 नुसार कंत्राटी पद्धतीची **रसायन तज्ञ (केमिस्ट )** पदाची भरती प्रक्रिया पूर्ण होई पावेतो नेमणूक करणेत यावी पुढील भरती प्रक्रिया पूर्ण होई पावेतो किंवा 6 महिने मुदतवाढ देण्याबाबत अभियंता यांनी शिफारस केलेली आहे.

तरी अभियंता यांनी केलेल्या शिफारशीनुसार श्री विशाल अशोक गोसावी व श्रध्दा मधुकर पाटील यांना **रसायन तज्ञ (केमिस्ट )** या पदावर ६ महिने करीता एकत्रित मानधन रु २००००/- मात्र अनुसार मुदतवाढ देणेबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ (३) नुसार मान्यता मिळणेसाठी सदरचा विषय मे. स्थायी समिती पुढे ठेवण्याबाबत अहवाल सादर करण्यात आलेला होता सदर अहवालावर मा.अति.आयुक्त सो. यांनी सदर श्री गोसावी यांची शैक्षणिक पात्रतेबाबत आक्षेप असल्यास त्यांचे जागेवर नव्याने भरती करावी लागेल असे निर्देश दिलेले आहे. या अटीवर सदरचा प्रस्ताव मे.स्थायी समिती पुढे ठेवणेबाबत मा. आयुक्त सो.यांनी मान्यता दिलेली आहे व त्यानुसार सदर प्रस्ताव मे.स्थायी समिती समोर सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल व सन्मा.सदस्यांनी केलेल्या चर्चानुसार अभियंता यांनी केलेल्या शिफारशीनुसार कार्यालयीन अहवालास अधिन राहून श्री विशाल अशोक गोसावी व श्रध्दा मधुकर पाटील यांना **रसायन तज्ञ(केमिस्ट)**या पदावर ६ महिने करीता एकत्रित मानधन रु २००००/- मात्र अनुसार मुदतवाढ देणेबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३(३) नुसार मान्यता देण्यात येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखाआक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी.याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- सौ. प्रतिभाताई शिवाजीराव चौधरी

अनुमोदक:- श्री. बन्सीलाल माणिक जाधव

**सर्वानुमते मंजुर,**

सही/-X X X

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- ४४ धुळे महानगरपालिकेतील रोजंदारी कामागारांना सुधारीत दरानुसार दरवाढ लागू करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म.नागसेन बोरसे — ग्रामीणच्या कर्मचाऱ्यांचा कायम होण्यासाठीचा प्रस्ताव शासनाकडे पाठवला आहे. शासनाकडून त्रुटी आलेल्या त्या त्रुटीबाबत अद्याप पुर्तता झालेली नाही. रोजंदारी कर्मचारीचाही प्रस्ताव शासनाकडेस सादर करावयाचा आहे. याबाबत ही तातडीने कार्यवाही करावी.

म.सभापती — त्यांचा प्रस्ताव अगोदरच दाखल झाला होता. तो १५ / २० दिवसांत राज्य शासनाकडून मंजूर होणार आहे. रोजंदारी कर्मचाऱ्यांचा ६३ लोकांचा प्रस्ताव देखील तयार आहे. मार्च अखेर झाल्यावर पुढच्या आठवडयात प्रशासनामार्फत प्रस्ताव दाखल होणार आहे.आपल्या कार्यकाळात ग्रामिण व रोजंदारीच्या कर्मचाऱ्यांना कायम करण्यासाठी सकारात्मक कार्यवाही सुरू आहे. सदर प्रसावास कार्यालयीन अहवालास अधिन राहून मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ४५ दिनांक ३१/०३/२०२२**

उपरोक्त विषयान्वये अहवाल सादर करण्यात येतो की, रोजंदारी वाढ करणेबाबत रोजंदारी कर्मचारी यांनी विनंती केलेली आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे अहवाल प्रस्तावित करण्यात येत आहे.

धुळे महानगरपालिकेतील रोजंदारी कमागरांना महाराष्ट्र शासनाने किमान वेतन अधिनियम १९४८ अंतर्गत दि २४ फेब्रुवारी २०१५ रोजीच्या उदयोग ऊर्जा व कामगार विभागाचे अधि सूचनेनुसार स्थानिक स्वराज्य संस्था ( ग्रामपंचायत वगळून ) या अनुसुचित रोजगाराचे किमान वेतन पुनर्निधारीत केलेले आहेत स्थानिक सवराज्य संस्था या उदयोगातील किमान वेतन दर दि १ जुलै २०२१ ते दि ३१ डिसेंबर २०२१ या कालवधीचे दर खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत

**स्थानिक स्वराज्य संस्था (ग्रामपचांयत वगळून) -**

| अ क्र | वर्गवारी | महागाई भत्ता दर कालावधी | | | महागाई भत्ता दर कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| | | परिमंडळ १ | परिमंडळ २ | परिमंडळ ३ | दि ०१/०७/२०२१ ते दि ३१/१२/२०२१ |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | कुशल | १४००० | १२००० | ११००० | ६१६०/- |
| २ | अर्धकुशल | १३००० | ११००० | १०००० | ६१६०/- |
| ३ | अकुशल | ११५०० | १०००० | ८५०० | ६१६०/- |

परिमंडळ १ — अ ब क व ड वर्ग महानगरपालिका कार्यक्षेत्र तसेच महानगरपालिका क्षेत्रापासुन २० किलो मीटर औदयोगिक क्षेत्र

परिमंडळ — २ सर्व महानगरपालिका क्षेत्रापासून २० किलोमीटरच्या पुढील औदयोगीक क्षेत्र अ व ब वर्ग नगरपरिषद क्षेत्रापासून २०किलो मीटरच्या पर्यतचे औदयोगीक क्षेत्र परिमंडळ — ३ परिमंडळ -१ व परिमंडळ -२ वगळुन समोर दर्शविलेले क्षेत्र वगळुन उर्वरीत सर्व क्षेत्र

**टिप:**—मुळ वेतन + महागाई भत्ता = एकुण वेतन, एकुण वेतनास २६ ने भाग दिल्यावर १ दिवसाचा पगार मिळतो, तसेच महागाई भत्त्याचे दर ( जानेवारी ते जुन व जुलै ते डिसेंबर ) हे दर, दर सहा - सहा महिन्यंनी बदल होत आहेत असे नमुद केलेले आहे

१. कुशल —मुळ वेतन रु.१४०००/- + म. भत्ता ६१६०/- = २०१६० भागीले २६ दिवस = ७७५ रु. एक दिवसाचा रो. दर

२. अकुशल - मुळ वेतन रु. ११५००/- + म. भत्ता ६१६०/- = १७६६० भागीले २६दिवस = ६७९ रु. एक दिवसाचा रो. दर

धुळे महानगरपालीकेमध्ये वर्ग ३ रोजंदारी कर्मचारी (कुशल आणि) वर्ग ४ रोजंदारी (अकुशल ) यांना सदयस्थितीत खालीलप्रमाणे रोजंदारी दर देण्यात येतो.

१) कुशल — रु ७५०/- मात्र प्रमाणे २) अकुशल — रु. ६५४/- मात्र प्रमाणे

तसेच यापूर्वीचा धुळे महानगरपालिका स्थायी समिती ठराव नं ५३ दि ६/५/२०२१ अन्वये धुळे महानगरपालिकेतील १७६ बदली कामगारांना कोणतीही दरवाढ लागू न करता आरोग्य विभागामार्फत आहे त्या स्थीतीत काम सुरु ठेवणे तसेच बदली कामगारांसंदर्भात आरोग्य विभागने नवीन संस्था / ठेकेदार यांच्यामार्फत बाह्य यंत्रणेव्दारे कामगार घेण्याची कार्यवाही करण्याबाबत ठरावात नमुद केले

आहे. त्याअनुषंगाने सदर अहवालामध्ये बदली कामगार यांना वगळण्यात आले आहे व धुळे महानगरपालीकेमध्ये रोजंदारी कर्मचारी खालीलप्रमाणे विभागात कार्यरत आहेत.

| अ क्र | पदनाम | वर्ग | कर्मचारी संख्या |
|---|---|---|---|
| १ | लिपीक , फीटर , वाहन, चालक इ. | वर्ग ३ | १० |
| २ | बिगारी , मुकादम , शिपाई , सफाई कामगार, दाई इ . | वर्ग ४ | ५५ |
|  | एकुण |  | ६५ |

वर्ग ३ रोजंदारी कर्मचारी यांना कुशल वर्गवारीनुसार वेतन अदा केले जाते व रोजंदारी वर्ग ४ कर्मचारी यांना अकुशल वर्गवारीनुसार वेतन अदा केले जाते. त्याअनुषंगाने वरील तक्त्यात नमुद नुसार रोजंदारी कर्मचारी वर्ग ३ हे कुशल व वर्ग ४ कर्मचारी अकुशल मध्ये येतात.

म सरकारी कामगार अधिकारी यांच्या संदर्भीय पत्रानुसार महानगरपालीकेमध्ये कुशल कर्मचारी,अकुशल कर्मचारी यांना नवीन रोजंदारी दर लागू केल्यास एका कर्मचा-याला एका दिवसाला खालीलप्रमाणे वेतनात वाढ होणार आहे.

१ कुशल रु७७५ नवीन रोजंदारी दर-रु ७५०/-जुना रोजंदारी दर = २५ रु.एक दिवसाच्या वेतनात वाढ
२अकुशलरु६७९ नवीन रोजंदारी दर -रु६५४/-जुना रोजंदारी दर = २५ रु.एक दिवसाच्या वेतनात वाढ

सद्यास्थितीत आरोग्य विभाग व इतर विभागांमध्ये कुशल / अकुशल ( वग्र ३ व वर्ग ४ ) खालीलप्रमाणे राजेंदारी कर्मचारी कार्यरत आहेत. त्यानुसार त्यांच्या मासिक व वार्षिक रोजंदारी दरात वाढ होणाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

१ कुशल (वर्ग ३ ) एकुण कर्मचारी संख्या — १० x २५ = २५० (१ दिवसाचा रोजंदारी दरवाढ) x २६ दिवस = ६५००/- दरमहा वाढ x १२ महिने = ७८०००/- रु. १२ महिनेची वाढ

२ अकुशल (वर्ग ३ )एकुण कर्मचारी संख्या —५५ x२५ = १३७५(१ दिवसाचा रोजंदारी दरवाढ) x२६ दिवस = ३५७५०/- दरमहावाढ x १२ महिने = ४२९०००/- रु. १२ महिनेची वाढ

वरील प्रमाणे राजेंदारी दरवाढीत खर्चाचा तपशीलामध्ये सरासरी २६ दिवस गृहित धरुन वार्षीक एकुण खर्च रु ५०७०००/- मात्र रु खर्चात वाढ होणार आहे.

तरी म. सरकारी कामगार अधिकारी यांच्या पत्रानुसार रोजंदारी कर्मचारी यांना दि १/७/२०२१ पासून कुशल वर्ग ३ कर्मचारी यांना ७५०/- रु वरुन ७७५ रु रोजंदारी दरवाढ व अकुशल वर्ग ४ कर्मचारी यांना ६५४ वरुन ६७९ रु. रोजंदारीवाढ लागू करण्याबाबत मुख्य लेखाधीकारी व उपमुख्य लेखापरिक्षक यांचा अभिप्राय घेवून रोजंदारी दरवाढीचा विषय मे. स्थायी समितीपुढे ठेवण्याबाबत अहवाल सादर करण्यात आलेला होता.

तरी धुळे महानगरपालीकेतील रोजंदारी कर्मचारी यांना दि १/७/२०२१ पासून रोजंदारी दरवाढ लागु करणेबाबतचा विषय मे स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन प्रस्ताव व सन्मा. सदस्यांनी केलेल्या चर्चानुसार धुळे महानगरपालिकेतील रोजंदारी कर्मचाऱ्यांना दिनांक ०१/०७/२०२१ पासून कुशल वर्ग ३ कर्मचारी यांना ७५०/- रु वरुन ७७५ रु रोजंदारी दरवाढ व अकुशल वर्ग ४ कर्मचारी यांना ६५४ वरुन ६७९ रु. रोजंदारी वाढ लागू करण्यास कार्यालयीन अहवालास अधिन राहून मान्यता देण्यात येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री.नागसेन दामोदर बोरसे
अनुमोदक:- श्री.खान मो.साबीर महीबुल्लाह

**सर्वानुमते मंजुर,**

सही/-X X X

**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- ४५ प्रभाग क्रं. ७ मध्ये नगरसेवक निधीतून मोगलाई नेहरु चौकात साक्रीरोड येथे प्रवेशव्दार बांधणेचे एस्टीमेट रु.२९,९९,६६६/-मात्रला प्रशासकीय मान्यता देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म. किरण कुलेवार विषय मंजूर करण्यांत यावा.

म. बन्सीलाल जाधव विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ४६ दिनांक ३१/०३/२०२२**

धुळे मनपा अंतर्गत प्रभाग क्रं.७ मध्ये नगरसेवक निधीतून नेहरु चौक येथील मोगलाई साक्रीरोड येथे प्रवेशव्दार बांधणेचे काम प्रस्तावित करण्यांत आलेले आहे.

सदर कामास मा.आयुक्त सो.यांनी मंजुरी दिलेली असून सदरचे काम हे धुळे मनपाच्या सन२०२२-२३या वर्षातील अर्थसंकल्पात प्रवेशव्दार बांधणे या लेखाशिर्षातून प्रशासकीय मान्यता मिळणेस मे.स्थायी समितीपुढे मंजूरीसाठी सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन प्रस्ताव वसन्मा.सदस्यांच्या सहमतीने प्रभाग क्रं.७ मध्ये नगरसेवक निधीतून नेहरु चौक येथील मोगलाई साक्रीरोड येथे प्रवेशव्दार बांधणेचे कामास मनपाच्या सन २०२२-२३ या वर्षातील अर्थसंकल्पात प्रवेशव्दार बांधणे या लेखाशिर्षातून प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

सुचक :- सौ.किरण राकेश कुलेवार

अनुमोदक:- श्री.बन्सीलाल माणिक जाधव **सर्वानुमते मंजुर,**

सही/-X X X

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- ४६ धुळे महानगरपालिका सार्वजनिक सुरक्षितता (अग्निशामक) विभागाकडील वाहन क्र..एच.18 बी.जी. १८२८ अग्निशामक वाहन दुरूस्ती दरपत्रक मागविणे व खर्च ₹.२,९८,५००/- मात्रला मान्यता देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म. हर्षकुमार रेलन विषय मंजूर करण्यांत यावा.

म. नरेश रूपला चौधरी विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ४७ दिनांक ३१/०३/२०२२**

धुळे महानगरपालिका अग्निशामक विभागा कडील अत्यावश्यक सेवेतील अग्निशामक वाहन एम.एच.१८बी.जी.१८२८वाहनांचे वाहन चालक, मेकॅनिक व सहा. अग्निशमन अधिकारी यांचे अहवालानुसार वाहनांचे वॉटर टॅकरची ठिकटठिकाणी प्लेट क्रॅक झाले असल्याने मोठया प्रमाणत पाणी गळती होत आहे त्यामुळे आग विजवितांना फार अडचीणचे होत आहे तरी सदर वॉटर टॅक दुरूस्त करणे आवश्यक आहेत्याशिवाय वाहन योग्य् रित्या कार्यरत होऊ शकत नाही.त्यामुळे निधी इन्टर पाईजेस बॉडी वर्क, मुंबई यांच्याकडुन सदरील अग्निशमन वाहन बॉडी वर्क करणेत आलेले

असल्यामुळे त्यांच्याशी संपर्क करून व वाहनांची तपासणी करुन रिपेरिंग कामाचे इस्टीमेट देण्यात आले आहे.तरी निधी इन्टरपाईजेस,मुंबई यांचे कडुन तपासणीअंती खालील दूरूस्ती कामे करणे आवश्यक आहे. सदर करण्यात येणारी दुरूस्ती कामे खालीलप्रमाणे इस्टिमेट देण्यात आले आहे.

| अ.क्र. | साहित्य/स्पेअर पार्ट | नग | रक्कम सर्व करासहित |
|---|---|---|---|
| १ | कंपलिट वॉटर टॅक डिशमाउटींग फार्म चेसीस लिकेज चेकींग रिप्लेसिंग डॅमेज रस्टेड पार्टेशन, न्यु MS सिट मिंग वेल्डींग,न्यु टॅक माउटींग कॅन्वस पेलट नट बोल्ट , ॲन्टी क्रॉसिव पेंन्ट इ. कंपलिट जोब मटेरियल ॲन्ड लेबर कोस्ट.वॉटर टॅक कोर्टींग. | ०१ | **₹.२,६५,०००/-** |
| २ | कंपलिट डिलीवरी वॉल्वा ओपनिंग रिपेरिंग रिक्व्हइड मटेरियल ॲन्ड लेबर कोस्ट. | ०१ | **₹.२०,०००/-** |
| | कंपलिट वायरींग,हांनस चेंकींग डॅमेज वायर,वायरींग क्लिप,वायरींग सिल्हवीस रिपलेसिगं रिक्वॉयड मटेरियल लेबर कोस्ट. | ०१ | **₹.१३,५००/-** |
| **सर्वकरासहित एकुण रक्कम रूपये** | | | ₹. २,९८,५००/- |

**(अक्षरी- दोन लक्ष अठ्ठाण्णव हजार पाचशे रूपये मात्र)**

शासकीय खरेदी नियम पुस्तिका शा. नि. ०१/१२/२०१६ नुसार ३.२.३ दरपत्रकाच्या आधारे खरेदी जेव्हा खरेदीची किंमत रक्कम पाच हजार ₹.५०००/-) पेक्षा जास्त व रक्कम तीन लाख ₹.३,०००००/-) पर्यंत असेल तेंव्हा खरेदी दरपत्रक मागवून (खुली स्पर्धात्मक निविदा न मागवता) करता येईल.अशी तरतुद आहे.

शासन निर्णय ३० सप्टेंबर २०११ महसूल व वन विभाग वित्तीय अधिकार नियम पुसतिका १९७८,भाग-एक उप विभाग दोन नियम ६९,पृष्ठ क्र.३० नुसार जड डिझेल वाहन ट्रक या वाहनास ₹.१,२०,०००/- पर्यंत दुरूस्ती खर्चास वार्षीक मर्यादा आहे. अशी तरतुद आहे. परंतु सदरील अग्निशमन वाहन हे अत्यावश्यक सेवेतील वाहन असल्यामुळे व सध्या मनपा अग्निशमक विभागाकडेस तीन वाहने कार्यरत असल्याने वाहन दुरूस्ती तातडीने करणे आवश्यक आहे .

| आर्थिक वर्ष | खर्च रक्कम | आर्थिक वर्ष | खर्च रक्कम |
|---|---|---|---|
| २०१७-१८ | निरंक | २०१९-२० | ₹.३५,३६७/- |
| २०१८-१९ | ₹.४,९०८/- | २०२०-२१ आजपावेतो दूरूस्ती खर्च | ₹.२,४७८/- |

सन २०२०-२१या चालु आर्थीक वर्षात खर्च ₹.२,४७८/- आहे व या बिलातील खर्च ₹.२,९८,५००/- मात्र होत आहे.

सदरील ईस्टीमेंटमधील खरेदी/दुरूस्ती वाहन खरेदीकेल्यापासुन आजपावेतो करण्यात आलेली नाही. दुरूस्ती कामे पुर्व मान्यतेसाठीच व दरपत्रके मागविण्यासाठी आहे. म.न.पा. मेकॅनिक यांनी दुरूस्ती तांत्रिक अहवाल दिलेला आहे. दुरूस्ती कामाचे दर बाजार भावाप्रमाणे योग्य आहेत. असे मॅकनिक यांनी तपासले आहे.

सार्वजनिकसुरक्षिततता(अग्निशामक) विभाग वाहन दुरूस्ती तरतुद १) ₹.६०,०००००/- २) पुर्वीचा खर्च ₹.४५,००२/-३) या बिलातील खर्च ₹.२,९८,५००/- आहे . आजपावेतो खर्च २ व ३ ची बेरीज ₹.३,४३,५०२/-या बिलातील वाहन दुरूस्ती खर्च वजा जाता आजपावेतो उपलब्ध शिल्लक ₹.५६,५६,४९८/-आहे.(तरतुद नोंदवही पा.क्र.३९,४० चे कृपया अवलोकन व्हावे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम नुसार सदर खर्च रक्कम ₹.२,९८,५००/- मात्रला मा.आयुक्त सो. यांना मंजुरीचे अधिकार आहेत त्यानुसार म.आयुक्त सो. यांनी महाराष्ट्र मनपा अधिनियम कलम ६९ व ८४ नुसार रक्कम ₹.५,०००००/-(पाच लक्ष) पर्यंत खर्चाचे अधिकार जा.क्र./धुमपा/ आस्था/ ७२४/

दि.२०/९/२०१९ अन्वये म.उपायुक्त सो यांना परावर्तीत केलेले आहे.तरी सदर अग्निशामक वाहन दुरूस्ती खर्च ₹.२,९८,५००/- मात्रस प्रशासकीय, आर्थीक मंजुरी तसेच दुरूस्ती खर्चास वार्षीक मर्यादा वाढ होत असल्याने प्रशासकीय व आर्थिक मान्यता दिल्यानुसार दरपत्रक मागविणेत आले आहे व त्यानुसार सदर प्रस्ताव मे.स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

उक्त प्रस्ताव व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने धुळे महानगरपालिका सार्वजनिक सुरक्षितता (अग्निशामक) विभागाकडील वाहन क्र..एच.18 बी.जी.१८२८ अग्निशामक वाहन दुरूस्ती दरपत्रक मागविणे व खर्च ₹.२,९८,५००/- मात्रला कार्यालयीन अहवालास अधिन राहून आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री.हर्षकुमार राधेश्याम रेलन

अनुमोदक:- श्री.नरेश रूपला चौधरी

**सर्वानुमते मंजुर,**

सही/-X X X

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

# धुळे महानगरपालिका,धुळे

## नगरसचिव कार्यालय

### स्थायी समिती सभा क्रमांक ९ चे इतिवृत्त

---

**धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह, धुळे**
**गुरुवार दिनांक ३१ /०३/ २०२२**
**वेळ दुपारी १२-३० वाजतां**

धुळे महानगरपालिकेची ऑनलाईन स्थायी समितीची विशेष सभा क्रं.९ आज गुरुवार दिनांक ३१/०३/२०२२ रोजी दुपारी १२-३०वाजतां **श्री. शितल मोहन नवले,सभापती**,स्थायी समिती,मनपा धुळे यांच्या अध्यक्षतेखाली **धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह** भरली. या ऑन लाईन सभेस खालील सन्मा.सदस्य ऑन लाईन व ऑफ लाईन हजर होते.

| अ.क्रं. | सदस्यांचे नांव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. नवले शितल मोहन | सभापती |
| २ | श्री. जाधव संजय सुधाकर | सदस्य |
| ३ | श्री. बोरसे नागसेन दामोदर | सदस्य |
| ४ | श्रीमती कुलेवार किरण राकेश | सदस्या |
| ५ | श्रीमती वराडे वैशाली भिकन | सदस्या |
| ६ | श्री. जाधव बन्सीलाल माणिक | सदस्या |
| ७ | श्रीमती चौधरी मंगला अर्जुन | सदस्या |
| ८ | श्री. अन्सारी फातमा नुरुल अमीन | सदस्या |
| ९ | श्री. चौधरी नरेंद्र रुपला | सदस्य |
| १० | श्रीमती. चौधरी प्रतिभा शिवाजीराव | सदस्या |
| ११ | श्री.अहिरराव किरण हरिचंद्र | सदस्य |
| १२ | श्री. रेलन हर्षकुमार राधेश्याम | सदस्य |
| १३ | श्री.अग्रवाल सारिका प्रविन | सदस्या |
| १४ | श्री. अन्सारी अब्दुल लतीफ अब्दुल हमीद | सदस्य |
| १५ | श्री. खान मोहम्मद साबीर मुहिबुल्लाह | सदस्य |
| १६ | श्रीमती पठाण नाजियाबानो नासिर खा | सदस्या |

उपस्थित अधिकारी गण

| अ.क्र. | अधिका-यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. नितीन कापडनीस | अति. आयुक्त |
| २ | श्रीमती शिल्पा नाईक | उपायुक्त |
| ३ | श्रीमती पल्लवी शिरसाठ | सहा. आयुक्त |
| ४ | श्री. मनोज अरविंद वाघ | नगरसचिव |
| ५ | श्री. के. एन. शिंदे | अभियंता |
| ६ | श्री. बी.एस. रनाळकर | प्र.मुख्य लेखाधिकारी तथा सहा. कर मूल्य निर्धारण अधिकारी |

| | | |
|---|---|---|
| ७ | डॉ.एम.आर. शेख | प्र.आरोग्याधिकारी |
| ८ | श्री. चंद्रकांत जाधव | सहा. आरोग्याधिकारी |
| ९ | श्री. विकास साळवे | स्वच्छता निरीक्षक मलेरिया |
| १० | श्री. प्रकाश सोनवणे | नगररचना ओव्हरसिअर |
| ११ | श्री. संजय मोरे | प्र.कार्यालय अधिक्षक |
| १२ | श्री. एन.के. बागुल | विद्युत अभियंता |
| १३ | श्री.राजेश गायकवाड | व. लि. मनपा शि.मं. |
| १४ | श्री. राजू माईनकर | भांडारपाल |
| १५ | श्रीमती कल्पना जाधव | अभिलेखापाल |
| १६ | श्री. प्रसाद जाधव | अतिक्रमण विभाग |
| १७ | श्री. तुषार ढाके | सहा.अग्नीशमन अधिकारी |
| १८ | श्री. सुक्राम राऊत | वाहन विभाग |

विषय क्रमांक:-४७ केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान अंतर्गत धुळे पाणीपुरवठा योजना तापी उदभव अक्कलपाडा धरण उदभव येथे व्हर्टिकल टर्बेईन पंप स्काडा ऑटोमेशन व फ्लोमीटर पुरवठा, व उभारणी करणे तसेच समाधानकारक चाचणी देणे कामी प्राप्त निविदा दर मागविण्यात आलेत त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म. सभापती या संदर्भात मी सभागृहाला माहिती देतो. आपण अक्कलपाडा व जुनी तापी योजना त्यावरचे काही पंपसेट बदलायचे आहेत व काही ३० वर्षे जुने पंप बदलणार आहोत. पाणी पुरवठयाचा काही थोडा काळ कमी करु शकू हे पंप बदलल्या नंतर त्या अनुषंगाने २ दिवसांपूर्वी म.जी.प्रा. कडून आपल्याकडे प्रस्ताव मंजूर होऊन व तो स्थायीत आला. प्रस्ताव तातडीचा होता व शहराच्या हिताचा व जिव्हाळयाचा होता म्हणून २४ तासाच्या आत. परत त्याची मिटींग कॉल केली. त्या अनुषंगाने मंजूरीसाठी आलेला आहे. या प्रस्तावाने बरेचशे प्रॉब्लेम सॉल्व होणार आहे.

म. हर्षकुमार रेलन हा जो विषय आलेला आहे हा धुळे शहरासाठी फार चांगला व महत्वाचा आहे. सत्ताधारी पक्षातर्फे धुळे शहराच्या नागरिकांना वचन दिले होते की, दररोज पाणी देऊ. त्या अनुषंगाने योजनेचे काम करत गेलो. अक्कलपाडा पाणीपुरवठा योजना पाईपलाईन काळजीने मंजूर करुन आणली राज्य शासनाचे काम होते ते सर्व केले.ही योजना ग्राउंडलेव्हलवर झालेली आहे. पाईपलाईन व जॅकवेल चे काम सुरु आहे. सत्ताधारी पक्षातील नेत्यांचे व म.सभापती शितल नवले यांचे अभिनंदन करतो. सत्ताधारी पक्षाने केलेल्या अश्वासनानुसार धुळे शहराचा पाणी प्रश्न सोडवणार आहोत. सर्व सदस्य आपल्याला पाठिंबा देतो. आपण हे काम लवकरात लवकर पूर्ण करावे. हे काम वेळेवर होणे अपेक्षित आहे.यात सदर कामी दर जास्तीने आलेले आहेत याबाबत आपण तांत्रीक दृष्टया खात्री करावी.

म.सभापती ही जी निविदा प्रसिध्द झाली होती सन २०१८-१९ च्या डी.एस.आर ने झाली होती. तर आजचा विचार केला ती ७.५% खाली आहे. जरी तो ९% दर जास्त असला आजचा विचार केला तर ७.५% कमी दराने देणार आहे. मला टेक्नीकल बाबी माहिती असल्यामुळे ठामपणे सांगतो आपले जास्त पैसे जाणार नाही.

म.प्रतिभाताई चौधरी या कामामध्ये अक्कलपाडा व सुकवद येथील पंप बदलण्याचा समावेश आहे माझे असे म्हणने आहे तापी नदीवरील ६पंप आहेत हे सगळे बदलण्यात यावे. तापी पाणी पुरवठा लाईन ही वारंवार लिकेज होते त्याबाबतीतही कार्यवाही करावी.

म.सभापती आपले ६ नसून १२ पंप आहेत.

म.प्रतिभा चौधरी — १९९०साली शालीनीताई बोरसे आमदार होत्या त्यावेळेस त्यांनी पाणी पूरवठा आणली होती. ती जुनी झाली आहे.या कामासाठी ठेकेदार टाळाटाळ करत आहे.ते त्याच्या कडून करुन घ्यावे. एवढीच विनंती.

म.सभापती — उक्त कार्यालयीन प्रस्ताव व सन्मा.सदस्यांनी केलेल्या चर्चानुसार सदर प्रस्ताव हा धुळे शहर पाणी पुरवठाच्या दृष्टीने अत्यंत महत्वपुर्ण आहे. तसेच सदर प्रस्ताव प्राप्त दरांची चालू दरसुची सन २०२१-२२ ची तुलना केली असता७.८५%कमी दराने येत असल्याचे मा.मुख्य अभियंता मजिप्रा.नाशिक यांनी कळविलेआहे. या कामी ई निविदा प्रक्रियामध्ये प्राप्त निविदा कार मे.बडगुजर ॲण्ड कंपीन , नाशिक यांचे आलेले न्युनतम दर अंदाजपत्रकीय दराच्या ९.५०% जास्तीने या दरास कार्यालयीन अहवालास अधिन राहून मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ४८ दिनांक ३१/०३/२०२२**

कार्यकारी अभियंता,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,जळगांव यांचे कडील पत्र क्र.१५१५ दि.११/०६/२०२१ च्या पत्रानुसार उपरोक्तत विषयान्कींत कामीअंदाजपत्रकीयरक्कम ७,४२,८३,६२३ /- करीता निविदा मागविण्यास कळविलेले होते. सदरच्या प्रथम निविदे मध्ये पात्र निविदा २असल्याने या कामी फेरनिविदा करण्याबाबत पत्र क्र.210 दि.14/10/2021च्या पत्रानुसार केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान अंतर्गत धुळे पाणी पुरवठा योजना ता.जि धुळे या योजनेची फेर-ई निविदा प्रसिद्ध करणे बाबत कळविण्यात आल्यानंतर फेर-ई निविदा सूचना प्रसिद्ध करण्यात आली आहे.

उक्त कामाबाबत फेर निविदा धुळे महानगरपालिका जा.क्र./ विवी/185 .दि. 25/10/2021 अन्वये व दि. 26/10/2021च्या दे दिव्यमराठी (राज्यस्तरीय), आपला नवराज्य (जिल्हास्तरीय), हिंदुस्थान timesकिंवा धुळे महानगपालिका/महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईट www.mahatender. gov.in वर खुल्या फेर ई-निविदा/कोटेशन प्रसिद्ध करणेत येवून दि. 17/12/2021 रोजी निविदा मागविणेत आले होते.

उक्त प्रमाणे कामांकरिता सूचना क्र102.2021-22दि.25/10/2021नुसार फेर ई.निविदा प्रसिद्ध करण्यात आली होती.त्या कामी दि.20/12/2021 रोजी तांत्रिक लिफाफा (tech.bid) उघडण्यात आल्या.सदर केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान अंर्तगत धुळे पाणीपुरवठा योजना ( तापी उदभव व अक्कलपाडा धरण उदभव ) ता.जि. धुळे व्हर्टिकल टर्बेइन पंप स्काडा ऑटोमेशन व पलोमीटर पुरवठा, उभारणी व समाधानकारक चाचणी देणे कामाबाबतची निविदे करिता एकूण चार(4) निविदा धारकांची निविदा प्राप्त होत्या.सदर निविदांची छानंनी व पात्रता पडताळणी करिता म.जि.प्रा कडे सादर करणेत आले.

अधीक्षक अभियंता म. जि प्रा जळगाव यांच्या पत्र जा.क्र अअ/धुळे मल / लेखा / या /83 दि. 31/01/2022 मा.अधीक्षक अभियंता म.जि.प्रा यांचे पत्र नुसार एकुण चार निविदा धारका पैकी खालील दोन निविदाधारक वित्तीय लिफाफा (Financial Bid) उघडण्यात पात्र ठरत असणेबाबत कळविण्यात आले.

1) मे. बडगुजर ॲन्ड कंपनी नाशिक

2) मे. सुवास इलेक्ट्रीकल्स ठाणे

वरिल दोन निविदाधारकांचे तांत्रिक लिफाप्यातील निकष व सादर केलेल्या दस्ताऐवजानुसार वित्तीय लिफाफा Envelope ll ( Commercial Bid) व्यापारी लिफाफा उघडण्यात आला.पात्र कंत्राटदार यांनी निविदेतील दर खालीलप्रमाणे.

| अ.क्र | कंत्राटदाराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| 1 | मे. बडगुजर &कंपनी, नाशिक. | अंदाजपत्रकीय दराच्या 9.96% जास्तीने | सर्वात कमी L१ |

| | | | |
|---|---|---|---|
| 2 | मे.सुहास इलेक्ट्रिकल्स,धुळे. | अंदाजपत्रकीय दराच्या 13.85 % जास्तीने | |

मक्तेदार श्री बडगुजर & कंपनी ,नाशिक यांना दि.- 17/02/2022 वेळ- 4.00 वाजता म.अति.आयुक्त सो यांच्या दालनात निगोशियन (वाटाघाटी) करीता बोलविण्यात आले होते.दि17/02/2022रोजी मक्तेदार यांचे प्रतिनिधी श्री योगेश शंभूराव हे समक्ष उपस्थित होते. या बैठकीत बडगुजर कंपनी,नाशिक यांच्या वतीने उपस्थित प्रतिनिधी यांनी त्यांचे दर बाबत खुलासा केला कि,मागील 6 महिन्यात कॉपर तसेच M.S. च्या दरात मोठी वाढ झाल्याने पंप व मोटर साठी लागणाऱ्या कच्च्या मालाच्या दरात मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. तशेच सेमिकंडक्टर च्या कमतरतेमुळे SCADA Panel व ऑटोमेशन साठी लागणाऱ्या कच्च्या मालाच्या किमतीत मोठी वाढ झाली आहे. तसेच देखभाल दुरुस्ती साठी बऱ्याच प्रमाणात खर्च अपेक्षित आहे.वरील सर्व बाबींचा विचार करून आम्ही निविदेतील दर भरले आहेत याबाबतचे पत्र समक्ष सादर केले आहे.

मत्तेदार मे. बडगुजर & कंपनी, नाशिक. यांनी निविदा दरामध्ये 9.96 % चे दर कमी करून 0.46 % कपात करून 9.5% जास्त असे सुधारित दर दिले आहेत.

मक्तेदारास सदर दर कमी करणे बाबत पुनश्च विचारणा केली असता कंत्राटदाराने सदरचे दर कायम ठेवले आहेत.त्याअनुषंगाने निविदेत प्राप्त अंदाजपत्रकीय दरापेक्षा 9.5 % जास्त दरांबाबत दर विश्लेषणासह अभिप्राय देण्यासाठी धुळे मनपा पत्र क्र. ३३० दि.०३/०३/२०२२ च्या पत्रानुसार कार्यकारी अभियंता महाराष्ट्र जिवन प्राधिकरण,जळगांव यांना कळविण्यात आले आहे.

उक्त बाबत महाराष्ट्र जिवन प्राधिकरणविभाग यांचे कडुन दराची पडताळणी बाबत कार्यवाही करण्यात आलेली आहे.अधिक्षक अभियंता,म.जी.प्रा,जळगांव यांच्याकडील पत्र क्र. १८९ दि.१४/०३/२०२२ च्या पत्रानुसार विषयान्कींत कामी न्युनतम देकार असलेले निविदाकार मे.बडगुजर ॲण्ड कंपनी,नाशिक यांनी धुळे महानगरपालिके सोबत वाटाघाटी करून ९.९६ % जास्तीच्या दारात कपात करून ९.५०% जास्त असा सुधारित देकार सादर केला आहे.सदर निविदाकाराच्या देकाराचा मुल्यांकन प्रस्ताव उपविभागामार्फत मध्यवर्ती कार्यालयाचेपरिपत्रक क्र.१४९नुसार तयार करण्यात आला आहे. त्यानुसार ठेकेदाराच्या देकारा सोबत म.जी.प्रा व सार्व.बांध (विदयुतविभाग) च्या चालु दरसुची सन २०२१-२२ ची तुलना केली असता ठेकेदाराचा देकार७.८५% कमी दराचा येत आहे असे अधिक्षक अभियंता (यांत्रिकी) महाराष्ट्र जिवन प्राधिकरण,नवी मुंबई यांचेकडेस सादर करण्यात आले आहे.

विषयांकित कामाच्या ई-निविदा प्रक्रियेमध्ये न्युनतम देकार प्राप्त झालेले निविदाकार मे. बडगुजर ॲन्ड कंपनी, नाशिक यांचे देकाराचा मुल्यांकन प्रस्ताव म.जी.प्रा. उपविभाग, धुळे यांचे मार्फत तयार करण्यात आला. सदर प्रस्तावाची म.जी.प्रा.विभाग.जळगांव.म.जी.प्रा.मंडळ जळगांव, अधिक्षक अभियंता (यां), नवी मुंबई व मा.मुख्य अभियंता मजीप्रा प्रादेशिक विभाग, नाशिक यांचे स्तरावर तपासणी पुर्ण झालेला आहे. तपासणी अंती निविदाकाराच्या 9.50% जादा दराची चालू दरसुचीशी तुलना करता देकार 7.85% कमी दराचा येत आहे असे मा. मुख्य अभियंता, नाशिक यांनी त्यांच्या कडील पत्र क्र. 1347 दि. 24/03/2022 च्या पत्रानुसार कळविले आहे.

म.जि.प्रा. कडील शिफारशीप्रमाणे सदर दर चालू दरसूचीपेक्षा कामी असल्याने स्वीकारण्यास हरकत नसावी असे मनपा प्रशासनाचे मत आहे.सदर दरास स्थायी समितीची मानुरी शासनाने अपेक्षिलेली होती व नंतर शासनाने सदर निविदेस स्थायी समितीची त्वरित मंजुरी घेऊन प्रस्ताव शासनास सादर करणेबाबत VC मध्ये सूचनाहि देण्यात आलेल्या

आहेत.तसेच त्याबाबत वारंवार विचारणा होत आहे.प्रस्तुत निविदेस SLTC मध्ये मंजुरीसाठी ठेवायचे असल्याने याबाबत त्वरित विषय स्थायी समिती मध्ये ठेवणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील प्रकरण 2च्या 3 क प्रमाणे स्थायी समितीस अति तात्काळ परिस्थितीत असे मंजुरीचे अधिकार आहेत.त्यानुसार सदर प्रस्ताव मे.स्थायी समितीसमोर सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन प्रस्ताव व सन्मा.सदस्यांनी केलेल्या चर्चानुसार सदर प्रस्ताव हा धुळे शहर पाणी पुरवठाच्या दृष्टीने अत्यंत महत्वपुर्ण आहे. तसेच सदर प्रस्ताव प्राप्त दरांची चालू दरसुची सन २०२१-२२ ची तुलना केली असता ७.८५% कमी दराने येत असल्याचे मा.मुख्य अभियंता मजिप्रा,नाशिक यांनी कळविलेआहे. या कामी ई निविदा प्रक्रियामध्ये प्राप्त निविदा कार मे.बडगुजर ॲण्ड कंपीन ,नाशिक यांचे आलेले न्युनतम दर अंदाजपत्रकीय दराच्या ९.५०% जास्तीने या दरास कार्यालयीन अहवालास अधिन राहून मान्यता देण्यात येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- सौ. प्रतिभाताई शिवाजीराव चौधरी

अनुमोदक:- श्री.नागसेन दामोदर बोरसे

**सर्वानुमते मंजुर,**

सही/-X X X

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

# धुळे महानगरपालिका,धुळे

## नगरसचिव कार्यालय

### स्थायी समिती सभा क्रमांक १० चे इतिवृत्त

---

**धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह, धुळे**
**गुरुवार दिनांक ०७/०४/२०२२**
**वेळ सकाळी ११-०० वाजतां**

धुळे महानगरपालिकेची स्थायी समितीची साप्ताहिक सभा क्रं. १० आज गुरुवार दिनांक ०७/०४/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजतां श्री.**शितल मोहन नवले,सभापती**,स्थायी समिती,मनपा धुळे यांच्या अध्यक्षतेखाली **धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह** भरली. या ऑन लाईन सभेस खालील सन्मा.सदस्य ऑन लाईन व ऑफ लाईन हजर होते.

| अ.क्रं. | सदस्यांचे नांव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. नवले शितल मोहन | सभापती |
| २ | श्री. जाधव संजय सुधाकर | सदस्य |
| ३ | श्री. बोरसे नागसेन दामोदर | सदस्य |
| ४ | श्रीमती कुलेवार किरण राकेश | सदस्या |
| ५ | श्री. जाधव बन्सीलाल माणिक | सदस्या |
| ६ | श्रीमती चौधरी मंगला अर्जुन | सदस्या |
| ७ | श्री. अन्सारी फातमा नुरुल अमीन | सदस्या |
| ८ | श्रीमती. चौधरी प्रतिभा शिवाजीराव | सदस्या |
| ९ | श्री.अहिरराव किरण हरिचंद्र | सदस्य |
| १० | श्री. रेलन हर्षकुमार राधेश्याम | सदस्य |
| ११ | श्री.अग्रवाल सारिका प्रविन | सदस्या |
| १२ | श्री. अन्सारी अब्दुल लतीफ अब्दुल हमीद | सदस्य |
| १३ | श्री. खान मोहम्मद साबीर मुहिबुल्लाह | सदस्य |
| १४ | श्रीमती पठाण नाजियाबानो नासिर खा | सदस्या |

उपस्थित अधिकारी गण

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. नितीन कापडणीस | अति. आयुक्त |
| २ | श्रीमती पल्लवी शिरसाठ | सहा. आयुक्त |
| ३ | श्री. मनोज अरविंद वाघ | नगरसचिव |
| ४ | श्री. के. एन. शिंदे | अभियंता |
| ५ | श्री. बी.एस. रनाळकर | प्र.मुख्य लेखाधिकारी तथा सहा. कर मूल्य निर्धारण अधिकारी |
| ६ | श्री. चंद्रकांत जाधव | सहा. आरोग्याधिकारी |
| ७ | श्री. विकास साळवे | स्वच्छता निरिक्षक मलेरिया |
| ८ | श्री. प्रकाश सोनवणे | नगररचना ओव्हरसिअर |
| ९ | श्री. हेमंत पावटे | ओव्हरसिअर बांधकाम विभाग |

| | | |
|---|---|---|
| १० | श्री. किशोर सुडके | प्र. परवाना अधिक्षक तथा बाजार विभाग प्रमुख |
| ११ | श्री. एन.के. बागुल | विद्युत अभियंता |
| १२ | श्री.एस.एन. देसले | लिपीक . मनपा शि.मंडळ |
| १३ | श्री. प्रसाद जाधव | अतिक्रमण विभाग |
| १४ | श्री. सुक्राम राऊत | वाहन विभाग |

मा. सभापती — सन्मा.सदस्य मा.आयुक्त सो.सर्व अधिकारी कर्मचारी व पत्रकार, छायाचित्रकर बांधव यांचे मी स्थायी समितीच्या

बैठकीत स्वागत करतो.सभेचा कोरम पुर्ण झाला असुन नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरु करावे.

म. नगरसचिव — वंदे् मातरम् या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

**विषय क्रमांक :- ४९** — **मागील स्थायी समिती सभांचे इतिवृत्त क्रमश: वाचून कायम करणे. (दि.२३/०३/२०२२)**

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.हर्षकुमार रेलन — इतिवृत्त वाचून कायम करण्यांत यावे.

म.सभापती — सन्मा. सदस्यांच्या सहमतीने मागील स्थायी समिती सभांचे इतिवृत्त क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ४९ दिनांक ०७/०४/२०२२**

मागील स्थायी समिती सभा दिनांक २३/०३/ २०२२ चे धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर३७ ते ४० अखेर तसेच सभेत सन्मा. सदस्यांनी उपस्थित केलेली चर्चा व त्यावरील निर्णय क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे. **सर्वानुमते मंजुर.**

सही/- x x x

**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- ५० — प्र.क्र. १७ मध्ये महिला बालकल्याण निधी अंतर्गत धुळे मनपा शाळा क्र.२८ येथे प्रसुतीगृह बांधणेचे निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

**म.नगरसचिव** — **नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.**

म. प्रतिभाताई चौधरी — सदर जागा हि कुठल्या भागातील आहे कृपया याचा खुलासा व्हावा.

म. सभापती — सदर जागा चितोड रोड शाळा नंबर २८ येथील आहे व सदर प्रस्ताव महिला व बालकल्याण समितीमार्फत सादर झालेला आहे.

म.किरण कुलेवार — सदर विषय मंजूर करण्यात यावा.

म.शाबीर शेठ — विषय मंजूर करण्यात यावा.

म. सभापती — सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ५० दिनांक ०७/०४/२०२२**

प्र.क्र.१७ मध्ये महिला बालकल्याण निधी अंतर्गत धुळे मनपा शाळा क्र.२८ येथे प्रसुतीगृह बांधणे बाबतच्या कामास म.आयुक्त सो. धुळे महानगरपालिका यांनी टिपणी मंजुरीने दि. १८/०२/२०२१ अन्वये उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु.४९,६९,७६०/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./७२३/२०२१-२२ दि. २३/०२/२०२२ अन्वये रक्कम रु.४९,६९,७६०/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./धुमपा/बा.वि./२३८/२०२१-२२ दि. २५/०२/२०२२ अन्वये दि.२६/०२/२०२२ रोजी दैनिक दिव्य मराठी/वार्ता या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.२२/०३/२०२२ अखेर निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत रोखीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदार किंवा ठेकेदाराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | श्री.ऋषभ सतीष खिवसरा | शे.३.०० % जास्तीने | |
| २ | श्री.कुणाल जयकर पवार | **अंदाजपत्रकीय दराने** | **सर्वात कमी दर** |
| ३ | मे.एकविरा कन्सट्रक्शन | शे.२.०० % जास्तीने | |

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **श्री.कुणाल जयकर पवार** यांचे दर **अंदाजपत्रकीय** दराने आहे व त्यांनी नियमा प्रमाणे रोखीने बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार **श्री.कुणाल जयकर पवार** यांची **अंदाजपत्रकीय** दराने आलेले निविदा दर मंजुरी करीता मे.स्थायी समिती समोर मजुरीस्तव सादर तसेच काम न मिळालेले ठेकेदारांना त्यांची बयाणा रक्कम परत करणे बाबत मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी **मे. कुणाल जयकर पवार** यांचे **अंदाजपत्रकीय** दराने आलेले निविदा दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबावत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जवाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- सौ.किरण राकेश कुलेवार

अनुमोदक:- श्री.मो.साब्बीर महिबुल्लाह

**सर्वानुमते मंजुर,**

सही/- x x x

**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- ५१ जिल्हा वार्षिक योजना (सर्व साधारण) सन २०२१-२२ अंतर्गत प्रभाग क्र.१३ मध्ये धुळे मनपा हद्दीतील शाळा क्र.२० आवारात संरक्षण भिंत बांधणेचे निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

**म.नगरसचिव** **नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.**

म.मो.साब्बीर महिबुल्लाह विषय मंजूर करण्यांत यावा.

म. अब्दुल लतीफ विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

## धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ५१ दिनांक ०७/०४/२०२२

जिल्हा वार्षिक योजना (सर्व साधारण) सन २०२१-२२ अंतर्गत प्रभाग क्र.१३ मध्ये धुळे मनपा हद्दीतील शाळा क्र.२० आवारात संरक्षण भिंत बांधणे बाबतच्या कामास धुळे महानगरपालिका स्थायी समिती ठराव व म.आयुक्त सो. धुळे महानगरपालिका यांनी टिपणी मंजुरीने दि.२७/०१/२०२२ अन्वये उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु.६९,९३,८८६/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./५२९/२दि. ०४/०१/२०२२ अन्वये रक्कम रु.६९,९३,८८६/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./धुमपा/ बा.वि./ २१७ /२० दि.०८/०२/२०२२ रोजी दैनिक सकाळ / मर्डर या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.०८/०३/२०२२ पर्यंत निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेली आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदार किंवा ठेकेदाराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | अे.के.सैफी | **अंदाजपत्रकीय दराने** | **सर्वात कमी दर** |
| २ | श्री.अक्षय धनराज माखिजा | श.५ % जास्त | |
| ३ | मे.गायत्री कन्सट्रक्शन | श.३ % जास्त | |

सदर तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता **अे. के. सैफी** यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे ६९,९३,८८६/- इतक्या रक्कमेचे असून **अंदाजपत्रक** दराने आहे.

सदर निविदा धारकांचे निविदा दर हे **अंदाजपत्रक** दराने असल्याने सर्व निविदा समिती सदस्यांनी सदर निविदा धारकांचे दर स्वीकारण्यास मा.आयुक्त सो. यांना शिफारस करण्यावर एकमत झाले.

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **अे. के. सैफी** यांचे दर **अंदाजपत्रकीय**आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार **अे.के.सैफी** यांची **अंदाजपत्रकीय** दराने आलेले निविदा दर मंजुरीस्तव सादर तसेच अन्य काम न मिळालेले ठेकेदारांना त्यांची बयाणा रक्कम परत करणे बाबत मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी **मे. अे.के.सैफी**यांचे**अंदाजपत्रकीय** दराने आलेले निविदादरास महाराष्ट्र महानगरपालिका अधि नियम कलम ७३नुसार मान्यता देण्यांत येत आहे.सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री. खान मो. साबीर मुहिबुल्लाह

अनुमोदक:- श्री. अन्सारी अ. लतीफ अ. हमीद **सर्वानुमते मंजुर,**

सही/- x x x

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- ५२ १४व्या वित्त आयोगा अंतर्गत देवपूर बसस्थानक मागील सुशीनाल्या वर स्लॅब कलव्हर्ट चे (लहान पूल) बांधकाम करणेचे निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म.पठाण नाजीयाबानो विषय मंजूर करण्यांत यावा.

म. अन्सारी फातमाबी विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ५२ दिनांक ०७/०४/२०२२**

१४ व्या वित्त आयोगा अंतर्गत देवपूर बस स्थानक मागील सुशीनाल्यावर स्लॅब कलव्हर्टचे (लहान पूल) बांधकाम करणे बाबतच्या कामास धुळे महानगरपालिका स्थायी समिती ठराव क्र.१३९ दि.३१/१२/२०२०मा.आयुक्त सो. धुळे महानगरपालिका यांनी टिपणी मंजुरीने दि. १५/०७/२०२१ अन्वये उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु.८९,०१,३९०/-मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत अभियंता सार्व.बांधकाम विभाग धुळे यांचे पत्र क्र./ २७४२/२० दि. १६/०६/२०२१ अन्वये रक्कम रु.८९,०१,३९०/-मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./ धुमपा / पा.पु.वि. / ३९४ / २०२१ दि.०१/०९/२०२१ अन्वये दि.०२/०९/२०२१ रोजी सकाळ/पोलीस शोध या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.२८/०९/२०२१ रोजी निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदार किंवा ठेकेदाराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | शाहीद अंजुमन शकील अहमद | शे.२% जास्तीने | |
| २ | मे.ओमशिव कन्सट्रक्शन | **शे.१०.०८० % कमीने** | **सर्वात कमी दर** |
| ३ | मे.राजप्रभा कन्सट्रक्शन | शे.४ % जास्तीने | |
| ४ | वृषभ इंटरप्राईजेस | शे.१.९९०% कमीने | |
| ५ | मे.प्रियदर्शनी कन्सट्रक्शन | अंदाजपत्रकीय दराने | |

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **मे.ओमशिव कन्सट्रक्शन** यांचे दर **शे.१०.०८० % कमी** दराने आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार **मे.ओमशिव कन्सट्रक्शन** यांची **शे.१०.०८०% कमी** दराने आलेले निविदा दर मंजुरी करीता मे.स्थायी समिती समोर मजुरीस्तव सादर तसेच अन्य काम न मिळालेले ठेकेदारांना त्यांची बयाणा रक्कम परत करणे बाबत मंजुरीस्तव सादर

सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी **मे. ओमशिव कन्सट्रक्शन** यांचे **शे.१०.०८०% कमी** दराने आलेले निविदा दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्रीमती पठाण नाजीयाबानो नासीरखा

अनुमोदक:- श्रीमती फातमा नुरूल अमीन

**सर्वानुमते मंजुर,**

सही/- x x x

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- ५३ — नगररचना विभागाकडील विकास शुल्क अंतर्गत प्र.क्र.२ मध्ये आग्रारोड जी.टी.पी. स्टॉप ते श्री.एन.डी.सूर्यवंशी यांच्या घरापावेतो रस्ता डांबरीकरण करणेचे निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म.किरण अहिरराव — विषय मंजूर करण्यांत यावा. परंतू हद्दवाढ गावातून विकास शुल्क हे बऱ्याच मोठया प्रमाणावर जमा होते. मनपाचे जास्तीत जास्त उत्पन्न हया गावातून मिळते. आमच्या गावातून मिळणारे विकास शुल्क आमच्याच गावातील विकास कामांवर खर्च करावेत.

म.हर्षकुमार रेलन — विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती — सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ५३ दिनांक ०७/०४/२०२२**

नगररचना विभागाकडील विकास शुल्क अंतर्गत प्र.क्र.२ मध्ये आग्रारोड जी.टी.पी. स्टॉप ते श्री.एन.डी.सूर्यवंशी यांच्या घरापावेतो रस्ता डांबरीकरण करणे बाबतच्या कामास धुळे महानगरपालिका मे.महासभा ठराव क्र.१४० (क) दि.३०/१२/२०२० मा.आयुक्त सो. धुळे महानगरपालिका यांनी टिपणी मंजुरीने उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु. ६५,३०,९५५/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./११२७/२०दि. २२/०२/२०२१ अन्वये रक्कम रु.६५,३०,९५५/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्तकामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./धुमपा/बां.वि./२१३/२०दि. ०४/०३/२०२१ अन्वये दि.०४/०३/२०२१रोजी दैनिक दिव्य मराठी/आपला महाराष्ट्र या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.२४/०३/२०२१ रोजी निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदार किंवा ठेकेदाराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | मे.राधेय कन्सट्रक्शन | अंदाजपत्रकीय दराने | |
| २ | श्री.आशिष एम.पटवारी | शे.५.०० % जास्त | |
| ३ | श्री.ऋषिकेश बी.महाजन | **शे.-१.११ % कमीने** | |
| ४ | मे.श्रीस्वामी समर्थ कन्सट्रक्शन | शे.७% जास्त | |

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **श्री.ऋषिकेश बी.महाजन** यांचे दर **शे.-१.११%कमी** दराने आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार **श्री.ऋषिकेश बी.महाजन** यांची **शे.-१.११% कमी** दराने आलेले निविदा दर मंजुरी करीता मे.स्थायी समिती समोर मजुरीस्तव सादर तसेच अन्य काम न मिळालेले ठेकेदारांना त्यांची बयाणा रक्कम परत करणे बाबत मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी **मे. श्री.ऋषिकेश बी.महाजन** यांचे **शे.-१.११ % कमी** दराने आलेले निविदा दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री.किरण अहिरराव

अनुमोदक:- श्री.हर्षकुमार राधेश्याम रेलन

**सर्वानुमते मंजुर,**

सही/- x x x

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांकः- ५४ प्रभाग क्र.५ब च्या पोट निवडणूक २०२१ अंतर्गत शालीग्राम पिंगळे (कानोश्री) हायस्कूल व दिनबंधू हायस्कूल येथे रॅम्प तयार करणे कामासाठी झालेला खर्च रु.८९,६७३/- मात्रला कार्योत्तर मंजुरी देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म.साब्बीर महिबुल्लाह विषय मंजूर करण्यांत यावा.

म.बन्सीलाल जाधव विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ५४ दिनांक ०७/०४/२०२२**

प्रभाग क्र. ५ ब च्या पोट निवडणूक २०२१ जाहीर झालेली असून त्याकरिता मतदान केंद्राची पाहणी करून सदर ठिकाणी मतदान केंद्रांना रॅम्प नसल्यास रॅम्पची व्यवस्था करणे बाबत संदर्भीय आदेशानुसार कळविले आहे.

तरी सदर ठिकाणी पाहणी केली असता शाळीग्राम पिंगळे ( कानोश्री ) हायस्कूल व दिनबंधू हायस्कूल ठिकाणी रॅम्पची व्यवस्था नसल्याने सदर ठिकाणी रॅम्प करणे कामी अंदाजपत्रकीय खर्च रु.८९,६७३/- मात्र येणार आहे.

तरी उक्त काम हे विना निविदा मे.हेमंत राजाराम बागुल,ठेकेदार, धुळे यांचे कडून करून घेण्यात आलेले असून सदरचे काम मुंबई प्रांतिक अधिनियम नियम ६७ (क) अन्वये विना निविदा करण्यास मंजुरीसाठी व अंदाजपत्रकीय खर्च रु.८९,६७३/-मात्रस कार्योत्तर मंजुरीस्तव मे. स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन प्रस्ताव व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने मुंबई प्रांतिक अधिनियम नियम ६७ (क) अन्वये प्रस्तावित अंदाजपत्रकीय खर्च रु.८९,६७३/-मात्रला कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री.साब्बीर महिबुल्लाह

अनुमोदकः- श्री.बन्सीलाल माणिक जाधव **सर्वानुमते मंजुर,**

सही/- x x x

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांकः- ५५ आराध्य दैवत कुलस्वामिनी आई एकविरा देवी यात्रोत्सव कालावधीत लावण्यांत येणारे पाळणे,स्टॉल,रसवंती व इतर दुकाने यांचेकडील बाजार फी वसुली जाहिर लिलाव काढणेकामी सरकारी अंक रू.5,74,044/-मात्र निश्चित होऊन मिळणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म.किरण कुलेवार हा विषय मनपाचे उत्पन्न वाढीचा विषय आहे. गेल्या दोन वर्षापासून एकविरा देवी यात्रोत्सव झालेला नव्हता. या वेळेस ही निविदा काढलेली आहे. या वेळेस भाविक मोठया प्रमाणावर यात्रेचा आनंद घेतील निविदेतील रक्कम कमी घेतली आहे असे मला वाटते सदर सरकारी रक्कम दहा लाखाच्यापुढे करण्यात यावी ही विनंती.

म.नागसेन बोरसे यात्रोत्सव हा धार्मिक उत्सव असल्याने यात जर वाढ केली तर जे येणारे स्टॉल धारक आहे ते येणार नाही कारण ४-५ वर्षापूर्वी अशी समस्या उद्भ्वली होती त्यामुळे यात्रा मोठया प्रमाणात

भरली गेली नव्हती यात्रेचा उत्सव मोठया प्रमाणात साजरा झाला पाहिजे. आपल्याला विनंती या निविदेतील रकमेत कमी करता आले तर कमी करा, यात पैसे कमावणे ही गौण बाब आहे. जे स्टॉल धारक आहे त्यांनी व्यवसाय करुन पैसा कमवावा हा हेतू नाही आहे. कमी झाले तरी चालतील पण वाढ करू नये ही विनंती करतो.

म.हर्षकुमार रेलन — हा जो विषय आहे रस्त्यावर व्यवसाय करणाऱ्या कष्टकरी वर्गाचा विषय आहे. या विषयांत वाढ करणे योग्य नाही. २ वर्षापासून जी परिस्थिती आहे ती खराब झाली आहे माझे म्हणने आहे या व्यवसायीकांना कुठल्याही प्रकारची कर वाढ न करता त्यांना कसे सहाय्य करता येईल, जास्तीत जास्त लोकं आले पाहिजे कष्टकरी बांधवाना दिलासा देण्यात यावा.

म.किरण अहिरराव — आपण हे जे पाळणे,स्टॉल, रसवंती वैगरे यांना फि आकारतो हे नदी पात्रात असतात हे नदी पात्र मनपाच्या मालकीचे आहे का पाटबंधारे विभागाच्या मालकीचे ? पाटबंधारे च्या मालकीचे असेल तर ही फि आपण आकारु नये. हे काम त्यांचे आहे.

म.अति. आयुक्त — यावर व्यवसाय फि आकारण्याचा अधिकार मनपाला आहे.

म.प्रतिभा चौधरी — बाजार फि चा विषय जो आलेला आहे, यात्रा उत्सवाच्या निमित्ताने एकच सूचना मांडू इच्छिते कोरोना महामारीमुळे ही यात्रा झालेली नव्हती यात जे स्टॉल धारक आहे हे गरीब ,कष्टकरी, श्रमीक लोकं आहे. आपण जो लिलाव काढणार आहोत हा अवधी देखील कमी मिळाला आहे. यात कुठलीही वाढ करण्यात येऊ नये. शासकीय दरापेक्षा जास्त बोली लावणारा ठेकेदार मिळाला तर ती आपण स्वीकारु शकतो. याची जाहिरात काढल्यावर बोली लावतांना सदस्यांना बोलवावे एवढीच विनंती करते.

म.सभापती — सर्वांच्या सूचनांची नोंद घेतली आहे. सरकारी अंक निश्चित करून लिलाव काढण्यात येईल त्यानुसार लिलावात येणा:या रक्कमेनुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल. सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ५५ दिनांक ०७/०४/२०२२**

सालाबादाप्रमाणे यावर्षी धुळे जिल्हयाचे आराध्यदैवत आई एकविरा देवी यात्रानिमित्त एकविरा देवी लगत मंदिराजवळील परिसरात चैत्र शुध्द पौर्णिमेपासुन दि. १६ एप्रिल ते २७ एप्रिल २०२२ एप्रिल या काळात सदर उत्सवानिमित्त विविध प्रकारचे दुकाने, स्टॉल, पाळणे व मनोरंजनाचे कार्यक्रम इ. लागत असतात.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव क्र. ३० दि. २४-३-२०१५ नुसार १० X १० च्या जागेस जागाभाडे रू. १४०/- मात्र प्रति दिवस व दै. बाजार फी स्थायी समिती ठराव क्र. १४८ दि. ९-१-२० नुसार (४ X ६फुट साठी) रू. १५/- व त्यापेक्षा जास्त क्षेत्रास रू. ३०/- मात्र प्रमाणे करण्यांस सर्वानुमते मंजुरी मिळालेली आहे.

सन २०१८-१९ यावर्षी चैत्र पौर्णिमा यात्रेत आचारसंहितेमुळे कर्मचारी मार्फत एकुण रू. ४,४१,५७३/- मात्र वसुली करण्यांत आली व सन २०१९-२० व २०-२१ यावर्षी कोरोना काळात शासन निर्बधामुळे यात्रा होऊ शकली नाही. सध्या शासकीय निर्देशानुसार यात्रा सुरू होण्याची शक्यता आहे. सन २०१८-१९ यावर्षाची एकुण वसुल रक्कम ४,४१,५७३ मात्र ३ वर्षाची नैसर्गिक वाढ ३० % रू. १,३२,४७१ = ५,७४,०४४/- अशी येत आहे.

तरी देवपुर मोठया पुलापासुन ते आई एकविरा देवी मंदिर परिसरापर्यंत स्टॉलधारक, पाळणाधारक, रसवंतीधारक व इतर दुकानदार तसेच रस्त्याच्या मध्यभागी उभे राहुन किंवा रस्त्याच्या कडेला किरकोळ माल विक्री करणारे व्यावसायिक यांचेकडुन जागाभाडे व दै. बाजार फी वसुली मक्ता रू. ५,७४,०४४/- मात्र सरकारी अंक ठरवुन मिळणेस व त्या रकमेचा अल्प कालावधी करिता जाहिर लिलाव काढुन वर्तमानपत्रातुन जाहिरात प्रसिध्द

करणेस म. अति. आयुक्त सो. यांनी मंजुरी दिली आहे. म.न.पा. अधिनियम १९४९ चे कलम ३३२ अन्वये सदरचा विषय मंजुरीस्तवस मे. स्थायी समिती पुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल व सन्मा.सदस्यांनी केलेल्या चर्चानुसार कार्यालयीन अहवालास अधीन राहून म.न.पा. अधिनियम १९४९ चे कलम ३३२ अन्वये देवपुर मोठया पुला पासुन ते आई एकविरा देवी मंदिर परिसरापर्यंत स्टॉलधारक, पाळणाधारक, रसवंतीधारक व इतर दुकानदार तसेच रस्त्याच्या मध्यभागी उभे राहुन किंवा रस्त्याच्या कडेला किरकोळ माल विक्री करणारे व्यावसायिक यांचेकडुन जागाभाडे व दै. बाजार फी वसुली मक्ता रू. ५,७४,०४४/- मात्र सरकारी अंक निश्चित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.तसेच त्या रकमेचा अल्प कालावधी करिता जाहिर लिलाव काढुन वर्तमानपत्रातुन जाहिरात प्रसिध्द करण्यासाठी प्रशासनाने तातडीने कार्यवाही करावी.

सुचक :- श्री.नागसेन दामोदर बोरसे

अनुमोदक:- सौ.प्रतिभाताई शिवाजीराव चौधरी **सर्वानुमते मंजुर,**

सही/- x x x

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

# धुळे महानगरपालिका,धुळे
## नगरसचिव कार्यालय
## स्थायी समिती सभा क्रमांक ११ चे इतिवृत्त

---

**धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह, धुळे**
**सोमवार दिनांक ०२/०५/२०२२**
**वेळ सकाळी ११-०० वाजतां**

धुळे महानगरपालिकेची स्थायी समितीची साप्ताहिक सभा क्रं. ११ आज सारेमवार दिनांक ०२/०५/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजतां श्री.शितल मोहन नवले,सभापती,स्थायी समिती,मनपा धुळे यांच्या अध्यक्षतेखाली **धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह** भरली. या ऑन लाईन सभेस खालील सन्मा.सदस्य ऑन लाईन व ऑफ लाईन हजर होते.

| अ.क्रं. | सदस्यांचे नांव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. नवले शितल मोहन | सभापती |
| २ | श्री. बोरसे नागसेन दामोदर | सदस्य |
| ३ | श्रीमती कुलेवार किरण राकेश | सदस्या |
| ४ | श्री. जाधव बन्सीलाल माणिक | सदस्या |
| ५ | श्रीमती चौधरी मंगला अर्जुन | सदस्या |
| ६ | श्री. अन्सारी फातमा नुरुल अमीन | सदस्या |
| ७ | श्री. चौधरी नरेंद्र रुपला | सदस्य |
| ८ | श्रीमती. चौधरी प्रतिभा शिवाजीराव | सदस्या |
| ९ | श्री.अहिरराव किरण हरिचंद्र | सदस्य |
| १० | श्री.अग्रवाल सारिका प्रविन | सदस्या |
| ११ | श्री. अन्सारी अब्दुल लतीफ अब्दुल हमीद | सदस्य |
| १२ | श्री. खान मोहम्मद साबीर मुहिबुल्लाह | सदस्य |
| १३ | श्रीमती पठाण नाजियाबानो नासिर खा | सदस्या |

उपस्थित अधिकारी गण

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. नितीन कापडनीस | अति. आयुक्त |
| २ | श्रीमती शिल्पा नाईक | उपायुक्त |
| ३ | श्री. मनोज अरविंद वाघ | नगरसचिव |
| ४ | श्री. के. एन. शिंदे | अभियंता |
| ५ | श्री. बी.एस. रनाळकर | प्र.मुख्य लेखाधिकारी तथा सहा. कर मुल्य निर्धारण अधिकारी |
| ६ | डॉ. एम.आर. शेख | प्र. आरोग्याधिकारी |
| ७ | श्री. चंद्रकांत जाधव | सहा. आरोग्याधिकारी |
| ८ | श्री. विकास साळवे | मलेरिया पर्यवेक्षक |

| | | |
|---|---|---|
| ९ | श्री. चंद्रकांत मोरे | लेखापाल |
| १० | श्री. सुनिल बर्गे | व.स. आस्थापना विभाग |
| ११ | श्री. पी.डी. चव्हाण | ओव्हरसिअर बांधकाम विभाग |
| १२ | श्री. किशोर सुडके | प्र. परवाना अधिक्षक तथा बाजार विभाग प्रमुख |
| १३ | श्री. एन.के. बागुल | विद्युत अभियंता |
| १४ | श्री. सी.सी. बागुल | ओव्हरसिअर पा.पु. विभाग |
| १५ | श्री. राजेश गायकवाड | व.सहा. मनपा शि.मंडळ |
| १६ | श्री. प्रसाद जाधव | अतिक्रमण विभाग |
| १७ | श्री. सुक्राम राऊत | वाहन विभाग |

म.सभापती — सर्व सन्मा. सदस्यांना,पत्रकार ,अधिकारी ,पदाधिकारी यांना उदयाच्या अक्षय तृतीयेच्या व ईदच्या खूप-खूप शुभेच्छा .सण नेहमीच प्रेरणा देत असतात. हा योगायोग खूप वर्षानंतर आलेला आहे की अक्षयतृतीया व ईद एकाच दिवशी येणार आहे. सर्वांना मन: पूर्वक शुभेच्छा. नगरसचिवांनी विषयांना सुरवात करावी.

म.नगरसचिव — वंदे मातरम् या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

**सन्मा. सदस्यांकडून आलेली श्रध्दांजलीची यादी**

यादी देण्यांत येते की, तत्कालीनधुळे नगरपालिकेच्या बांधकाम सभापती श्रीमती सरस्वतीबाई गणपत पवार यांचे नुकतेच अल्पशा आजाराने निधन झाले आहे. आज रोजीच्या स्थायी समिती च्या सभेत कै. सरस्वतीबाई गणपत पवार यांना भावपूर्ण श्रध्दांजली वाहून तसा ठराव पारीत करण्यांत यावा ही विनंती.

सुचक :- श्री. बन्सीलाल माणिक जाधव

अनुमोदक:- श्री. नरेंद्रअप्पा रुपला चौधरी

म. सभापती — सन्मा. सदस्यांच्या यादीनुसार श्रध्दांजलीचा ठराव पारीत करण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ५६ दिनांक ०२/०५/२०२२**

सन्मा. सदस्यांच्या यादीनुसार तत्कालीनधुळे नगरपालिकेच्या बांधकाम सभापती श्रीमती सरस्वतीबाई गणपत पवार यांचे नुकतेच अल्पशा आजाराने निधन झाले आहे.

वरील मान्यवरांचे दु:खद निधनामुळे या सभेस आतीव दु:ख होत ही सभा त्यांचे कुटुंबियांचे दु:खात सहभागी असून मृतआत्म्यांस चिरशांती प्रदानार्थ दोन मिनिटे मौन उभेराहून भावपूर्ण श्रध्दांजली समर्पित करण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- ५६ — मागील स्थायी समिती सभांचे इतिवृत्त क्रमश: वाचून कायम करणे. (दि.३१/३/२०२२)

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. प्रतिभाताई चौधरी — मागच्या वेळेला विषय झालेला होता, हद्दवाढीतील ग्रामीणचे जे कर्मचारी कायम करण्यासाठी महाराष्ट्र शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात आलेला होता. आपण उत्तर दिले होते की, श्री. मोरे

सो. व श्री बर्गे सो. हे प्रस्ताव घेऊन महाराष्ट्र शासनाला सादर करण्यासाठी मुंबईला गेले होते. त्यात काही त्रुटी होत्या. १५ दिवसांत त्यांचा कामाचा प्रस्ताव तिकडून येणार होता. त्या विषयी जाणून घ्यायचे होते. ग्रामीणचे हद्दवाढचे जे कर्मचारी व रोजंदारी चे ६३ कर्मचारी यांच्या बद्दल काही माहिती आली का ? त्याचा पाठपुरावा चालू आहे का?

म. सभापती — सदर प्रस्ताव शासनाकडेस अंतिम टप्प्यात आहे. या कामाचा शुक्रवारी आढावा घेण्यात आला आहे.लवकरच मान्यता प्राप्त होईल.मागील सभेचे इतिवृत्त क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ५७ दिनांक ०२/०५/२०२२**

मागील स्थायी समिती दिनांक ३१/०३/२०२२ रोजीच्या स्थायी समिती ठराव नंबर ४१ ते ४८ तसेच सभेत सन्मा.सदस्यांनी उपस्थित केलेली चर्चा व त्यावरील निर्णय क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

सही/-x x x

**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- ५७ — बांधकाम / पाणीपुरवठा विभागातील मानधन तत्वावरील १ ते ११ कनिष्ठ अभियंता या संवर्गातील कर्मचा-यांना ६ महिने कालावधीकरीता मुदतवाढ देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म.साब्बीर महिबुल्लाह — विषय मंजूर करण्यांत यावा.

म.बन्सीलाल जाधव — विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती — सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे. तसेच सदर कर्मचा-यांना कामगार कायदयानुसार किमान वेतन दर देण्यात यावे त्याप्रमाणे प्रशासनाने प्रस्ताव सादर करावा.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ५८ दिनांक ०२/०५/२०२२**

श्री निखील टकले यांना व १० कनिष्ठ अभियंता या पदावर ०६ महिने कालावधी करीता एकत्रित मानधन रुपये २०,०००/- मात्रने मुदत वाढ देणेत आली होती.

सदर आदेशामधील १ ते १० कनिष्ठ अभियंता यांची मुदत दि २१/३/२०२२ रोजी संपुष्ठात आलेली आहे. तसेच संदर्भीय क्रमांक २ च्या आदेशान्वये श्री निखील टकले यांची मुदत दि २५/२/२०२२ रोजी संपुष्ठात आलेली आहे.

उक्त क.अभियंता यांची मानधनावरील नियुक्तीची मुदत संपुष्ठात आल्यानंतर अभियंता यांनी अहवाल सादरकरुन उक्त १ ते ११ कनिष्ठ अभियंता यांच्याकडून बांधकाम व पाणीपुरवठा विभगातील शासकीय योजना तसेच मनपा निधी अंतर्गत होणा-या कामांचे प्रस्ताव सादर करणे, जागेची पाहणी करुन अंदाजपत्रक तयार करणे, साईट सुपर व्हिजन करणे , धुळे शहरातील पाणीपुरवठा वितरणावर देखरेख करणे,ई निविदा प्रणाली अंतर्गत होणा-या निविदा प्रसिध्दीची संपुर्ण कार्यवाही करणे तसेच विदयुत विभागातील अंदाजपत्रक तयार करणे अशी महत्वाची कामे संबंधीत क अभियंता यांच्याकडून करण्यात येत असल्याबाबत अभियंता यांनी अहवाल सादर करुन उक्त १ ते ११ कनिष्ठ अभियंता यांना कामाच्या सोयीसाठी मुदतवाढ देणेबाबत नमुद केले आहे.

| अ क्र | उमेदवाराचे नाव | पदाचे नाव | नेमुणदिलेल्या विभागाचे नाव | मुदतसंपल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | पाटील वर्षा गंगाधर | कनिष्ठ अभियंता | बांधकाम / पा पु विभाग | २१/०३/२०२२ |
| २ | कु चंदाबी शेख जाफर शेख | कनिष्ठ अभियंता | बांधकाम / पा पु विभाग | २१/०३/२०२२ |
| ३ | शिंदे प्रणव किशोर | कनिष्ठ अभियंता | बांधकाम / पा पु विभाग | २१/०३/२०२२ |
| ४ | मयुर राजेंद्र निकम | कनिष्ठ अभियंता | बांधकाम / पा पु विभाग | २१/०३/२०२२ |
| ५ | भुषण मनोज ढवळे | कनिष्ठ अभियंता | बांधकाम / पा पु विभाग | २१/०३/२०२२ |
| ६ | मोहनीश दिलीप पाटील | कनिष्ठ अभियंता | बांधकाम / पा पु विभाग | २१/०३/२०२२ |
| ७ | स्वप्नील सुनिल थोरात | कनिष्ठ अभियंता | बांधकाम / पा पु विभाग | २१/०३/२०२२ |
| ८ | पाटील अक्षय राजेंद्र | कनिष्ठ अभियंता | बांधकाम / पा पु विभाग | २१/०३/२०२२ |
| ९ | ठाकरे पराग प्रदिप | कनिष्ठ अभियंता | विदयुत विभाग | २१/०३/२०२२ |
| १० | गितेश दिलीप सोनार | कनिष्ठ अभियंता | विदयुत विभाग | २१/०३/२०२२ |
| ११ | श्री निखील टकले | कनिष्ठ अभियंता | बांधकाम / पा पु विभाग | २५/०२/२०२२ |

उक्त १ ते ११ कनिष्ठ अभियंता यांना नवीन भरती प्रक्रिया राबविणे किंवा बाहय स्त्रोताप्रमाणे मनुष्यबळ मिळेपर्यंत या अटीवर मानधनावरील कनिष्ठ अभियंता यांना त्यांच्या नियुक्तीच्या मुदत संपल्याच्या दिनांकापासून ०५ दिवसाचा खंड देवून एकत्रित मानधन तत्वावर रु २०,०००/- मात्र नुसार पुढील ६ महिने कालावधीकरीता मुदतवाढ देणेबाबत चा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ (३) नुसार मे. स्थायी समितीपुढे सादर करणेबाबत मा. आयुक्त सो यांनी मंजुरी दिलेली आहे त्यानुसार उक्त १ ते ११ मानधनावरील क निष्ठ अभियंता यांना पुढील भरती प्रक्रिया पूर्ण होईपावेतो किंवा ६ महिने कालावधीकरीता मानधनावर नियुक्ती देणेबाबतचा विषय मे. स्थायी समितीपुढे मान्यतेस्तव सादर झालेला होता.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कायार्लयीन अहवालाच्या अधिन राहून उक्त १ ते ११ कनिष्ठ अभियंता यांना नवीन भरती प्रक्रिया राबविणे किंवा बाहय स्त्रोताप्रमाणे मनुष्यबळ मिळेपर्यंत या अटीवर मानधनावरील कनिष्ठ अभियंता यांना त्यांच्या नियुक्तीच्या मुदत संपल्याच्या दिनांकापासून ०५ दिवसाचा खंड देवून एकत्रित मानधन तत्वावर रु २०,०००/- मात्र नुसार पुढील ६ महिने कालावधीकरीता मुदतवाढ देणेबाबत चा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३(३) नुसार कार्यालयीन अहवालास अधिन राहून मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यांत येत आहे. तसेच सदर कर्मचाऱ्यांना कामगार कायदयानुसार किमान वेतन दर देण्यात यावे त्याप्रमाणे प्रशासनाने प्रस्ताव सादर करावा. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री.किरण अहिरराव
अनुमोदक:- श्री.साबीरशेठ मुहिबुल्लाह

**सर्वानुमते मंजुर,**
सही/-x x x
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक:- ५८ | महानगरपालिका नंदीरोड दवाखाना येथे मॅटर्निटी होम करीता एकत्रित करार पध्दतीने मानधन तत्वावर स्त्री रोग तज्ञ वैदयकीय अधिकारी यांना ०६ महिने कालावधीकरीता पुर्ननियुक्ती देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे. |
| म.नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले. |
| म.नागसेन बोरसे | विषय मंजूर करण्यांत यावा. |
| म.बन्सीलाल जाधव | विषय मंजूर करण्यांत यावा. |
| म. सभापती | सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे. |

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ५९ दिनांक ०२/०५/२०२२**

महानगरपालिकेचे नंदीरोड दवाखाना येथे मॅटर्निटी होमची सुविधा सुरु करण्यात आलेली असून सदर दवाखान्यात स्त्री रोग तज्ञ वैदयकीय अधिकारी यांची आवश्यकता असल्याने मा.आयुक्त सो.यांच्या निर्देशाप्रमाणे सदर दवाखान्यासाठी स्त्री रोग तज्ञ वैदयकीय अधिकारी यांची नेमणुक करीता जाहिरात प्रसिध्द करणेत आली होती.

जाहिरातीनुसार प्राप्त झालेल्या अर्जांच्या छानणी अंती आरोग्याधिकारी यांच्या कडील पत्र जा क्र /धुमपा/आस्था/ ८९ दि १९/७/२०२१ नुसार **स्त्री रोग तज्ञ वैदयकीय अधिकारी** पदाकरीता आवश्यक शैक्षणिक अर्हतासह पात्र व अपात्र उमेदवारांची सोबत जोडलेली यादी नुसार एकुण ३ अर्ज प्राप्त झाले असून शैक्षणिक अर्हतेनुसार फक्त डॉ. श्रीमती पिंगला देसाई (रवंदळे) हया पात्र असल्याने त्यांना रु. ६००००/- एकत्रित मानधनावर ६ महिने कालावधीकरीता खालील वैदयकीय अधिकारी यांची मानधनावर नियुक्ती करण्यात आली होती.

| अ क्र | वैदयकीय अधिकारी यांचे नाव | पदनाम | मानधन रुपये |
|---|---|---|---|
| १ | डॉ. श्रीमती पिंगला देसाई (रवंदळे) | वैदयकीय अधिकारी मानधन | ६००००/- |

डॉ. श्रीमती पिंगला देसाई (रवंदळे) मानधनावरील वैदयकीय अधिकारी यांची सेवा दि ९/२/२०२२ रोजी संपुष्ठात आलेली आहे.

डॉ. श्रीमती पिंगला देसाई(रवंदळे) यांनी विनंती अर्ज सादर करुन पुर्ननियुक्ती मिळणेबाबत अर्जात नमुद केले आहे. सदयास्थितीत डॉ. श्रीमती पिंगला देसाई (रवंदळे) हया नंदीरोड दवाखाना येथे कार्यरत आहेत.

तसेच वैदयकीय आरोग्याधिकारी यांनी डॉ. श्रीमती पिंगला देसाई (रवंदळे) यांना पुर्ननियुक्ती देण्याबाबत अहवाल सादर केलेला आहे.

प्र.वैदयकीय आरोग्याधीकारी यांच्या अहवालानुसार डॉ.श्रीमती पिंगला देसाई (रवंदळे) यांना मुदत संपल्याच्या दिनांकापासून ०५ दिवसाचा सेवा खंड देवून पुढील ०६ महिने कालावधीकरीता एकत्रित मानधन रु ६०,०००/- मात्र मानधनावर पुर्ननियुक्ती ने मुदतवाढ देणेकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३ (३) नुसार मे. स्थायी समितीपुढे सादर करणेबाबत मा. आयुक्त सो यांनी मंजुरी दिलेली आहे त्यानुसार उक्त मानधनावरील वैदयकीय अधिकारी यांना पुढील भरती प्रक्रिया पूर्ण होईपावेतो किंवा ६ महिने कालावधीकरीता मानधनावर नियुक्ती देणेबाबतचा विषय मे. स्थायी समितीपुढे मान्यतेस्तव करण्यात आला होता.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कायाŕलयीन अहवालाच्या अधिन राहून प्र. वैदयकीय आरोग्याधीकारी यांच्या अहवालानुसार डॉ.श्रीमती पिंगला देसाई (रवंदळे) यांना

मुदत संपल्याच्या दिनांकापासून ०५ दिवसाचा सेवा खंड देवून पुढील ०६ महिने कालावधीकरीता एकत्रित मानधन रु ६०,०००/- मात्र मानधनावर पुर्ननियुक्ती ने मुदतवाढ देणेकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३(३) नुसार कार्यालयीन अहवालास अधिन राहून मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यांत येत आहे. तसेच सदर कार्यवाही मे.महासभेस अवगत करावी. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री.नागसेन दामोदर बोरसे
अनुमोदक:- श्री.बन्सीलाल माणिक जाधव

**सर्वानुमते मंजुर,**
सही/-x x x
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- ५९ — धुळे मनपातील मानधनावरील फीटर कर्मचारी यांना ६ महिने कालावधीकरीता मुदतवाढ बाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म.किरण अहिरराव — विषय मंजूर करण्यांत यावा.

म.बन्सीलाल जाधव — विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती — सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ६० दिनांक ०२/०५/२०२२**

इम्रान शेख इब्राहीम यांची फीटर पदावर मे. स्थायी समिती ठराव क्र १४१ दि. ३०/९/२०२१ रोजीच्या ठरावानुसार सदर कर्मचा-याला फेर नियुक्तीदेणेत आलेली आली होती. पाणीपुरवठा विभागातील अहवालानुसार इम्रान शेख इब्राहिम यांची नियुक्तीची मुदतदि.१८/०१/२०२२ रोजी संपुष्टात आलेली आहे. .

| **अ.क्र.** | **कर्मचाऱ्यांचे नांव** | **पदाचे नाव** |
|---|---|---|
| १ | इम्रान शेख इब्राहीम | फीटर |

पाणीपुरवठा विभागाकडील अहवालानुसार उक्त कर्मचारी यांच्या कामाची निकड पाहता व पाणीपुरवठा व्यवस्था सुरळीत ठेवणेकरीता वरील कर्मचा-यास ०६ महिनेकरीता मुदतवाढ देणेबाबत अहवाल सादर केलेला आहे.

उक्त कर्मचाऱ्यास नवीन भरती प्रक्रिय किंवा बाहय स्त्रोताप्रमाणे मनुष्यबळ मिळेपर्यत मुदत संपल्याच्या दिनांकापासून ५ दिवसाचा खंड देवून एकत्रित करार पध्दतीने मानधन रूपये ८०००/- मात्र नुसार पुढील ६ महिने कालावधीकरीता मुदतवाढ देणेबाबतचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ (३) अन्वये मे.स्थायी समितीपुढे सादर करणेबाबत मा.आयुक्त सो.यांनी मंजूरी दिलेली आहे.

त्यानुसार उक्त मानधनावरील फीटर कर्मचारी यांना पुढील भरती प्रक्रिया पूर्ण होईपावेतो किंवा ६ महिने कालावधीकरीता मानधनावर नियुक्ती देणेबाबतचा विषय मे.स्थायी समितीपुढे मान्यतेस्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कायार्लयीन अहवालाच्या अधिन राहून उक्त कर्मचाऱ्यास नवीन भरती प्रक्रिय किंवा बाहय स्त्रोताप्रमाणे मनुष्यबळ मिळेपर्यंत मुदत संपल्याच्या दिनांकापासून५दिवसाचा खंड देवून एकत्रित करार पध्दतीने मानधन रूपये ८०००/- मात्र नुसार पुढील ६ महिने कालावधीकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३(३) अन्वये फीटर कर्मचारी यांना मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री.किरण अहिरराव

अनुमोदक:- श्री.बन्सीलाल माणिक जाधव

**सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- ६० — धुळे मनपातील मानधनावरील अ.नं. १ ते २० लिपीक / टंकलेखक (संगणक ऑपरेटर) यांना ६ महिने कालावधीकरीता मुदतवाढ देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म.प्रतिभाताई चौधरी — विषय मंजूर करण्यांत यावा.

म.किरण अहिरराव — विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती — सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे. तसेच सदर कर्मचाऱ्यांना कामगार कायदयानुसार किमान वेतन दर देण्यात यावे त्याप्रमाणे प्रशासनाने प्रस्ताव सादर करावा.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ६१ दिनांक ०२/०५/२०२२**

धुळे महानगरपालिकेमध्ये कामाच्या सोयीसाठी खालील अ.क्र.१ ते १५ लिपिक / टंकलेखक (संगणक ऑपरेटर) यांची मानधनावर ६ महिने कालावधीकरीता नियुक्ती करण्यात आली होती.त्यानुसार त्यांची ०६महिने कालावधीची नियुक्ती दि.१२/०४/२०२२ रोजी संपुष्ठात येत आहे .

तसेच अ क्र १६ ते २० या मानधनावरील संगणक ऑपरेटर यांची नियुक्ती दि २१/४/२०२२ रोजी संपुष्ठात येत आहे

तरी खालील मानधनावरील संगणक ऑपरेटर यांनी पुढील ०६ महिने कालावधी करीता मुदतवाढ मिळणे बाबत विनंती अर्ज सादर केलेला आहे व त्याबाबत संबंधीत विभाग प्रमुखांनी त्यांना मुदतवाढ देणेबाबत शिफारस केलेली आहे .

| अ.क्र. | संगणक ऑपरेटरचे नाव | कार्यरत विभाग | अ.क्र | संगणक ऑपरेटरचे नाव | कार्यरत विभाग |
|---|---|---|---|---|---|
| १ | नितीन ज्ञानेश्वर महाले | महापौर कार्यालय | ११ | सरिता गंभिरराव चव्हाण | मालमत्ता कर |
| २ | लतेश सुरेश चौधरी | कंपोस्ट डेपो | १२ | सुनिता दत्तात्रय आव्हाड | मालमत्ता कर |
| ३ | राहुल सुभाष भावसार | आस्थापना | १३ | शरद दामु मोहिते | मालमत्ता कर |
| ४ | शोऐब रजा आदिल शेख | आरोग्य | १४ | जितेंद्र सुभाष शिंदे. | बाजार विभाग |
| ५ | कुणाल संजय दरगुडे | उपायुक्त कार्यालय | १५ | दिलीप खुशाल शिवदे | उपमहापौर कार्या. |
| ६ | पुजा विठ्ठलसिंग परदेशी | विरोधी पक्ष नेता | १६ | उमाकांत दगडु बारी | आरोग्य विभाग |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ७ | अंजनाप्रल्हाद गायकवाड | बांधकाम | १७ | निलेश भिला सोनवणे | आरोग्य विभाग |
| ८ | पल्लवीजयराम सावरकर | लाईट विभाग | १८ | कैलास सत्तु गलांडे | नगरसचिव कार्या |
| ९ | सचिन विनायक शिंदे | कंपोस्ट डेपो | १९ | विकास संतोष खलाणे | आरोग्य विभाग |
| १० | निखिल रविंद्र देशमुख | मालमत्ता कर | २० | ज्योती मोहन पुकळे | आरोग्य विभाग |

तसेच खालील अ. क्र.१६ ते२० संगणक लिपीक यांची १०,०००/- मात्र एकत्रित मानधनावर ६महिने कालावधीकरीता नियुक्ती करण्यात आलेली होती. तसेच संगणक लिपीक यांना मुदतवाढ देणेबाबत वैद्यकिय आरोग्य अधिकारी यांनी अहवाल सादर केलेला आहे.

उक्त वरील १ते२०लिपीक/टंकलेखक (संगणक ऑपरेटर) यांना नवीन भरती प्रक्रिया राबविणे किंवा बाहय स्त्रोताप्रमाणे मनुष्यबळ मिळेपर्यंत मानधन तत्वावर लिपीक /टंकलेखक (संगणक ऑपरेटर)यांना त्यांच्या नियुक्तीच्या मुदत संपल्याच्या दिनांकापासून ०५ दिवसाचा खंड देवून एकत्रित मानधन तत्वावर रु१०,०००/-मात्र नुसार पुढील ६ महिने कालावधी करीता मुदतवाढ देणेबाबतचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३(३) नुसार मे.स्थायी समितीपुढे सादर करणेबाबत मा.आयुक्त सो यांनी मंजुरी दिलेली आहे.

त्यानुसार उक्त मानधनावरील लिपीक/टंकलेखक (संगणक ऑपरेटर) यांना पुढील भरती प्रक्रिया पूर्ण होईपावेतो किंवा ६ महिने मानधनावर नियुक्ती देणेबाबतचा विषय मे. स्थायी समितीपुढे मान्यतेस्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून उक्त वरील १ ते २० लिपीक / टंकलेखक (संगणक ऑपरेटर) यांना नवीन भरती प्रक्रिया राबविणे किंवा बाहय स्त्रोताप्रमाणे मनुष्यबळ मिळेपर्यंत मानधन तत्वावर लिपीक /टंकलेखक (संगणक ऑपरेटर)यांना त्यांच्या नियुक्तीच्या मुदत संपल्याच्या दिनांकापासून ०५ दिवसाचा खंड देवून एकत्रित मानधन तत्वावर रु १०,०००/- मात्र नुसार पुढील ६ महिने कालावधी करीता मुदतवाढ देणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ (३) नुसार मान्यता देण्यांत येत आहे. तसेच सदर कर्मचाऱ्यांना कामगार कायदयानुसार किमान वेतन दर देण्यात यावे त्याप्रमाणे प्रशासनाने प्रस्ताव सादर करावा. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- सौ.प्रतिभाताई शिवाजीराव चौधरी

अनुमोदक:- श्री.नागसेन दामोदर बोरसे

**सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक :- ६१ — देवपूर चुडामणी बंगलयापासून ते जयहिंद कॉलनी पर्यंत रस्ता डांबरीकरण करण्याचे काम मे. गायत्री कंन्स्ट्रक्शन धुळे यांच्याकडून विना निविदा करण्यात आले या कामी झालेला खर्च रु १७,९७,६३५/ - मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७ (३) क व ५ (२) (२) अन्वये कार्योत्तर मान्यता देणे बाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म.किरण अहिरराव — भारताचे केंद्रीय कॅबिनेट मंत्री श्री नितीनजी गडकरी धुळयात आल्यामुळे रस्तयाचे काम करणे जरुरी होते.त्यामुळे याकामास माझा विरोध नाही. परंतू माझ्या प्रभागात साक्री रोडला रस्ता

रुंदीकरणाचे काम सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत चालू आहे.याकामात दिड महिन्यात बऱ्याच जलवाहिन्या लिकेज झालेल्या आहे.त्यामुळे आमच्या महिंदळयांतील 8 ते 10 कॉलन्यांना पाणीपुरवठा होत नाही १० दिवसांपासून त्या भागात पाणी पुरवठा होत नाही. ते काम मार्गी लावा.व सदर पाईप लाईनचे काम तांतडीने करण्यांत यावे.

म.प्रतिभाताई चौधरी — मा.केंद्रीय कॅबिनेट मंत्री गडकरी सो. येणार होते म्हणून रस्त्याचे काम करणे गरजेचे होते. रस्त्याची अवस्था बिकट होती. हे अतिशय चांगले काम केले. आपल्या राष्ट्रपती सौ.प्रतिभाताई पाटील शहरात आल्या होत्या. त्यावेळचे माजी महापौर मोहन नवले यांनी सुध्दा असे अर्जंट रस्ते केले होते. माझी विनंती आहे अॅक्च्युअल रस्ता ९ मीटरचा होता. या कामात ५.५ मिटरचा रस्ता केलेला आहे. जो उर्वरित भाग आहे त्यासाठी निधी उपलबध करुन दयावा. आणि हया रस्तयाचे इस्टीमेट पाहण्यास मिळावे ही विनंती.

म. सभापती — आपण सुचविलेल्या कामासाठी निधी उपलब्ध करुन देण्यांत येईल.सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ६२ दिनांक ०२/०५/२०२२**

मा. श्री. नितीनजी गडकरी, कॅबिनेट मंत्री, रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालय, महाराष्ट्र शासन यांचे दि.22/04/2022 रोजी श्री. हेमंत मराठे रा. जयहिंद कॉलनी , देवपूर, धुळे यांचे घरी आगमन होणार आहे. सदर ठिकाणी मंत्री महोदयांना जाण्यासाठी रस्ता भुयारी गटारीमुळे पूर्ण ना-दुरुस्त झालेला आहे. त्यामुळे चूडामणी बंगल्यापासून ते जयहिंद कॉलनी पावेतो रस्ता डांबरीकरण करणे बाबत संदर्भीय पत्रान्वये मागणी केलेली आहे. उक्त ठिकाणी समक्ष पाहणी केली असता रस्ता डांबरीकरण करणे कामी अंदाजपत्रकीय खर्च रु.17,97,635/- मात्र येणार आहे.

तरी उक्त काम हे विना निविदा मे.गायत्री कन्सट्रक्शन, ठेकेदार, धुळे यांचे कडून करून घेण्यात आलेले असून सदरचे काम मुंबई प्रांतिक अधिनियम नियम 67(3) (क) अन्वयेत्वरित काम करण्यास व 5 (2) (2) अन्वये विना निविदा मंजुरीसाठी व अंदाजपत्रकीय खर्च रु.17,97,635/- मात्रस कार्योत्तर मंजुरीस्तव मे. स्थायी समितीपुढे मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कायाालयीन अहवालाच्या अधिन राहून सदर प्रस्तावास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७ (३) क व ५(२) (२)अन्वये कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री. किरण हरीश्चंद्र अहिरराव
अनुमोदक:- सौ.प्रतिभाताई शिवाजीराव चौधरी

**सर्वानुमते मंजुर,**
सही/-x x x
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक :- ६२ — धुळे मनपा नविन प्रशासकीय इमारतीतील अंतर्गत व बाहय विद्युत व्यवस्था करण्यासाठी येणारा खर्च रू.६०६३२/- (१८% जी.एस.टी.सह) मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६४ (३) अन्वये प्रशायकीय मान्यता देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म.प्रतिभाताई चौधरी — विषयाची माहिती देण्यात यावी.

म.विद्युत अभियंता — नविन प्रशासकिय इमारतीत जो १०० kv जो यु.पी.एस. साठी हा विषय आलेला आहे. माझी विनंती की, कंपनीला आपल्याला ॲडव्हान्स पेमेंट करावे लागेल त्या अनुषंगाने मंजूरी दयावी. तसेच सदरचे काम वारवांर उद्धवत असल्याने याकामी रेट कॉन्टक्ट करणे गरजेचे आहे.

म.किरण अहिरराव — विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती — सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.तसेच याकामी विद्युत अभियंता यांनी केलेल्या निवेदनानुसार प्रशासनाने त्याप्रमाणे कार्यवाही करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ६३ दिनांक ०२/०५/२०२२**

धुळे महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारत येथील १०० KVA चे UPS दि.29/03/2022 रोजी नादुरुस्त झाले असून.म.न.पा धुळे महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारत अंतर्गत व बाह्य विद्युत व्यवस्था अंतर्गत3 फेज १०० KVA चे UPS कामी दि.06/07/2017 नुसार कार्यादेश प्रमाणे 2 वर्ष निगा दुरुस्ती कार्यकाळ संपण्यात आला आहे.

सदर१००KVA चे UPS सविसिंग करण्यासाठी Novateur Electrical & Digital Systems Private Limited,नागपूर कंपनीकडून कोटेशन मागविण्यात आले होते. दि.29/03/2022 रोजीच्या कंपनीच्या कोटेशन तपशील प्रमाणे सदर Novateur Electrical & Digital Systems Private Limited,नागपूर कंपनी कोटेशन नुसार १०० KVA KEORT मॉडेल UPS आहेत जे वॉरंटी/AMC अंतर्गत नाहीत. आता समस्या UPS मध्ये आहे. भेटीच्या उद्देशाने आमचा अभियंता विनम्रपणे व्यवस्थापित करणार आहोत, तरी भेटीचे शुल्क आगाऊ भरण्यास यावे याबाबत कळविणे होते.त्यानुसार दि.07/04/2022 रोजी रक्कम 11,800 /- मात्र RTGS व्दारे सदर कंपनीस भरण्यात आले.

त्यानुसार दि.12/04/2022 रोजी सदर कंपनी च्या अभिंयता यांनी १०० KVA चे UPS ची पाहणी केली असता,सदर ups पूर्णपणे नादुरस्त झाले असून,त्याबाबतचे spares charges/ rectification charges चे कोटेशन म.न.पा दि.12/04/2022 email द्वारे कळविले आहे.

सदरचे काम म.न.पा धुळे महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारत अंतर्गत व बाह्य विद्युत व्यवस्था अंतर्गत3 फेज १०० KVA चे UPS अत्यंत तातडीचे असल्याने सदर बाबतीत पर्यायी व्यवस्था नसल्यानेNovateur Electrical & Digital Systems Private Limited, नागपूर कंपनी कडून दि.12/04/2022 च्या कोटेशन नुसार करून घेण्यात येणार आहे.कोटेशन नुसार खर्च60,632/- (18%GST सह)असून सदरचे कामासाठी व खर्चासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे प्रकरण 67 (3) प्रमाणे म.स्थायी समितीपुढे मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदरचे कामासाठी व खर्चासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे प्रकरण 67 ( 3 ) प्रमाणे कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे. तसेच आगावू देयके देणे व याबाबत कंपनीशी रेट कॉन्ट्रक्ट करणे यासाठी प्रशासनाने उचित कार्यवाही करावी. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत

लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- सौ. प्रतिभाताई शिवाजीराव चौधरी
अनुमोदक:- श्री. किरण हरीश्चंद अहिरराव

**सर्वानुमते मंजुर,**
सही/-x x x
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-६३ मुलभूत सेवा सुविधाचा विकास अंतर्गत प्र.क्र.१२ गजानन कॉलनी येथे कॉक्रीट रस्ता व गटार तसेच पथदिवे करणेकामी निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म.पठाण नाजियाबानो विषय मंजूर करण्यांत यावा.

म.किरण अहिरराव विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ६४ दिनांक ०२/०५/२०२२**

मुलभूत सोईसुविधांचा विकास अंतर्गतसन २०२०-२१ प्रभाग क्र.१२ मध्ये गजानन कॉलनी येथे कॉंक्रीट रस्ता व गटार करणे तसेच पथदिवे बसविणे बाबतच्या कामास धुळे महानगरपालिका मे.स्थायी समिती ठराव अन्वये मंजुरी दिलेली आहे. तसेच मा. जिल्हाधिकारी सो. धुळे महानगरपालिका यांनी टिपणी मंजुरीने दि.१०/०३/२०२२ अन्वये उक्त कामाबाबत रक्कम रु.५९,७०,९६०/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अधियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./सुधारित ७३९ / २० दि.२८/०२/२०२२ अन्वये रक्कम रु.५९,७०,९६०/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./धुमपा/पा.पु.वि./१४८०/२० दि. १४/०३/२०२२ रोजी दैनिक पुण्य नगरी /समाज सारथी या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.०१/०४/२०२२ पर्यंत निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेली आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदार किंवा ठेकेदाराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | फयाद मिर्झा | **अंदाजपत्रकीय दराने** | **सर्वात कमी दर** |
| २ | मे.प्रियदर्शनी कन्सट्रक्शन | शे.३ % जास्त | |
| ३ | यासीन अब्दुल जब्बार शेख | शे.५ % जास्त | |

सदर तक्त्याचे अवलोकन करता **फयाद मिर्झा** यांची निविदा सर्वात न्यूनतम दराची ५९,७०,९६०/-इतक्या रक्कमेचे असून **अंदाजपत्रक** दराने आहे.

सदर निविदा धारकांचे निविदा दर हे **अंदाजपत्रक** दराने असल्याने सर्व निविदा समिती सदस्यांनी सदर निविदा धारकांचे दर स्वीकारण्यास मा.आयुक्त सो. यांना शिफारस करण्यावर एकमत झाले.

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **फयाद मिर्झा** यांचे दर **अंदाजपत्रकीय** आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार **फयाद मिर्झा** यांची **अंदाजपत्रकीय** दराने आलेले निविदा दर मंजुरीस्तव सादर तसेच अन्य काम न मिळालेले ठेकेदारांना त्यांची बयाणा रक्कम परत करणे बाबत मंजुरीस्तव मे.स्थायी समिती समोर सादर करणे.तसेच अन्य काम न मिळालेले ठेकेदारांना त्यांची बयाना रक्कम परत करणे बाबत मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

म.नागसेन बोरसे हा जो विषय विषय पटलावर आलेला आहे. जिल्हा वार्षीक योजने अंतर्गतआहे की, विकास शुल्क निधी अंतर्गत मला हे समजत नाही जिल्हा वार्षीक योजना म्हणजे काय? जिल्हा वार्षीक योजनेचा आणि विकास शुल्काचा काय संबंध आहे. जिल्हा वार्षीक योजने अंतर्गत प्र.क्र. ११ मधील विकास शुल्क निधी अंतर्गत२०२१-२०२२ विविध भागात रस्ता कॉंक्रीटी करण करणे अशी टिपनी ची सुरवात आहे, माझी अशी विनंती आहे, सभापती महोदय आपल्याला ७७ नं च्या विषयामध्येकोणता सर्वे नं. आला कोणत्या कॉलनीत आहे ते आले. पण प्रभाग क्र. ११ मध्ये कोणत्या कोणत्या भागामध्ये हे कामे होणार आहे. त्याचे काही देण्यात आले नाही. दुसरी गोष्ट ४.३६ लाखाचे जे टेंडर आहे ते एकत्र का वेगवेगळे मंजूर झालेले आहे?

म.सभापती रुपये ४.३६ मात्रला एकत्रित तांत्रीक मान्यता आहे व त्याची निविदा किंमत ३.८३ आहे.

म.नागसेन बोरसे तर ३.८३ ची कामे एकच प्रभागात आहे का? दुसरी गोष्ट २१-२२ विकासशुल्क चे काही नियम आहे. नगररचना विभागाचे नियम क्र. १२४ जो विकास निधी म्हणून संबोधन्यात येईल व त्यासाठी स्वतंत्र खाते उघडण्यात येईल. कोणत्याही जमीनीचे संपादन करणे व तिचा स्वतंत्र विकास करणे या करीता तो निधी राखीव आहे. विकासशुल्क हे त्यासाठी वापरला जातो. परंतु काय होते, जेवढा निधी अपेक्षित आहे. तेवढया वर्षाच्या निधीचे टेंडर काढून टाकतो. म्हणजे विकासशुल्क एकाच कामासाठी वापरायचे का? दुसरी गोष्ट २१-२२ चा अर्थ संकल्प मंजूर नाही मी विरोध केला होता त्या सभेमध्ये सचिव महोदयांनी खुलासा केला होता की, कोरम संपलेला आहे ३ वेळा ही बाब लक्षात आणून दिली होती. याचा अर्थ कोरम नसतांना सभा बेकायदेशिर आहे. हे कामे घेणे हे चुकीचे आहे. दुसरी गोष्ट २१-२२ चा अर्थ संकल्प तुम्ही मंजूर केला तर मग देवपूर साठी २० कोटी दिले होते त्यात का कार्यवाही करण्यात आली नाही.

म.सभापती सन्मा सदस्यांना सूचित करतो आपण फक्त हया विषयाच्या अनुषंगाने बोलावे.

म.नागसेन बोरसे २१-२२ च्या अर्थ संकल्पाची अंमलबजावणी केली नाही? पदाचा दुरुपयोग करुन हा विषय घेतलेला आहे. बेकायदेशिरपणे हा विषय मंजूर केला आहे. आयुक्त सो. नी महापौरांनी त्यांच्या अधिकारात विषय मंजूर करुन घेतला आहे. त्याच्या दरमंजूरीला आपल्या माथी मारले आहे. आपलयाला विनंती भविषयात या विषयीची माहीती आपल्याकडे मागू शकतात. हा विषय बेकायदेशिरपणे आलेला आहे. मंजूर नसतांना केलेल्या अर्थसंकल्पाची ही तरतूद आहे. ती बेकायदेशिर आहे.

म. नरेंद्र चौधरी प्रभाग क्र.१ मोठा प्रभाग आहे. धुळे शहराचे विकास शुल्क हे ८० ते ९० टक्के वलवाडी भागातून येते आमच्या प्रभागात विकास शुल्काची कामे व्हायला पाहिजे. आपल्याकडे याचा विचार न करता पदाचा दुरुपयोग करुन आपल्या आपल्या प्रभागात करत आहे. रस्तयांची दूर्दशा होत आहे. कुठेही रस्तयाचे काम होत नाही.

म.नाजियाबानो पठान विकास शुल्क निधी हे एकाच प्रभागासाठीच आहे का ? आमच्या प्रभागात पण भरपूर कामे आहे. आमच्या प्रभागात नाल्याचे काम करणे खूप आवश्यक आहे. गरिब वस्ती आहे. समान निधीचे वाटप झाले पाहिजे. नाल्याचे संरक्षक भिंतीचे काम होत नाही ते व्हावे हि विनंती.

म.प्रतिभाताई चौधरी विकासशुल्क चा प्रभाग क्र.११ चा ३.८३ चा जो निधी देण्यात येत आहे मला एकच सांगायचे आहे आमच्या हक्काचा निधी असतो जिल्हा नगरोत्थान मध्ये १२.५ जो निधी देण्यात येतो तो सुध्दा आम्हाला मिळाला नाही. मागच्या वेळेस असेच झाले होते,विकास शुल्क अंतर्गत ठराविकच प्रभागात कामे करण्यात येत असतात. हा जो विकासशुल्काचा निधी आहे यामध्ये आमच्या प्रभागासाठी मिळाला तर बरे होईल.माझ्या घरासमोर जो रस्ता आहे. त्याची वाईट अवस्था आहे. आपणांस विनंती करते ठराविक सदस्यांना न मिळता सर्व सदस्यांना थोडा थोडा निधी देण्यात यावा अशी आपणांस विनंती आहे.

म.सभापती आपण माहिती घ्यायला हवी तुम्ही सांगता विकासशुल्काचे कामे तुमच्या प्रभागात घेतली गेली पाहिजे, आपल्या प्रभागात सुध्दा हे विकासशुल्कचे काम झाले आहे. आपल्याला ७० ते ७५ लाख विकास शुल्कातून मिळालेले आहे.

म.प्रतिभाताई चौधरी एकच निधी दुसऱ्याला दयायचा नाही असा नियम आहे का ३ वर्षापूर्वीचे काम आहे.मी आता चालू वर्षासाठी सांगते आहे.

म.सभापती आपल्याला येऊन ३.५वर्ष झाले टेंडर प्रोसेस कोविड काळानंतर झाली आहे२०२१ चे टेंडर आहे.

म.हर्षकुमार रेलन आपल्याकडे विकासशुल्क १ वर्षात अंदाजे किती येत असतो. आतापर्यंत विकासशुल्क अंतर्गत आता पर्यंत किती रुपयांची कामे केली आहे.

मा.सभापती आपण असे आज सांगू शकत नाही की हया वर्षात किती ले आऊट मंजुर होतील, किती घरे मंजूर होतील, किती निधी मंजूर होईल. मागच्या ३ वर्षाचे सरासरी करुन बजेट मध्ये घेतो. तुमच प्रश्न आहे किती रुपयांची कामे झाली याची माहिती आता सभागृहात उपलब्ध होणार नाही. मागच्या वेळेस ६ कोटी उत्पन्न मिळाले होते. कोविड काळ होता निश्चीत हया वेळेस वाढणार आहे.

मा.हर्षकुमार रेलन विकासशुल्क हा जो विषय आहे. शासनाचे स्पष्ट निर्देश आहे हा कसा जमा करावा, कसे बँकेत अकाउंट असावे, कोणत्या बँकेत खाते असावे ते पण स्पष्ट लिहले आहे. आयुक्तांना महापौरांना अधिकार आहे का?कुठल्या अधिकाराखाली हा विषय घेतला?

मा.सभापती महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ अन्वये कलम २ प्रमाणे सुखसोयी म्हणजे मार्ग, रस्ते , मोकळी जागा,मोकळे मैदाने,क्रिडा संकुलने,कवायती मैदाने,बाजरपेठा, पार्कींग लॉट,प्राथमिक व माध्यमिक शाळा, तंत्रनिकेतने, चिकीत्सालये, दवाखाने, रुग्णालये, पाणीपुरवठा, विजपुरवठा, दिवाबत्ती, गटार, सार्वजनिक बांधकामे रस्ते व उपयुक्त युटीलिटी मध्ये सगळं येते. सेवा व सुखसोयी साठी हा निधी आपण वापरु शकतो. परंतु याला महासभेची मान्यता लागते. महासभेत तो विषय मंजूर झाला असला पाहिजे. आणि मला खेद वाटतो जे प्रशन महासभेत विचारले गेले पाहिजे कारण तो धोरणात्मक निर्णय होता आपण येथे कुठलेही धोरणात्मक निर्णय घेत नाही. आर्थिक बाबीवरती स्थायी समिती असते. आर्थिक बाबी असल्यावर आपण धोरणात्मक विषय उपस्थित करतो जे की मी उत्तर देणं बेकायदेशिर आहे.

म.हर्षकुमार रेलन — हे जे ३.५ लाख आले याच्यामध्ये कामाची विभागणी केली आपण देणे आहे का? कुठली कुठली कामे आहे.

म.सभापती — सन्मा.सदस्यांना सूचीत करतो धुळे महानगरपालिका महासभा ठराव क्र.२७/०१/२०२२ अन्वये प्रभाग क्र.११ जितेंद्र शिंपी ते विर शिवाजी चौक रस्ता कॉंक्रीटीकरण करणे-३५ लक्ष, नटराज टॉकीज वाणीसर ते पसारी रस्ता कॉंक्रीटीकरण करणे व पेव्हर ब्लॉक बसविणे १ कोटी ७४ लक्ष, नटराज टॉकीज परिसरात भैया चौधरी ते सतीष अग्रवाल रस्ता कॉक्रीटीकरण करणे-१ कोटी ५०लक्ष, धुळे मनपा हद्दीतील वडजई रोड ते अरिहंत मंगल कार्यालय रस्ता तयार करणे व रुंदीकरण -२९ लक्ष, असे एकत्रीत करुन ३ कोटी ८३ लाखाची ही निविदा आहे.

म.नाजियाबानो पठाण — याचा सर्वे झाला आहे का?

म.सभापती — जिल्हा विकास निधी मध्ये कुठलेही काम येतं, त्याचे इंजिनियर चे सर्टीफिकेट असते, सर्वे असतो, इस्टीमेट असतो, त्यावर सगळया अधिकाऱ्यांच्या सहया असतात. हे प्रशासना तर्फे येते आपल्याकडे महासभेने कुठले ठराव मंजूर करणे हा महासभेचा अधिकार आहे ठराव क्र. ३७ आहे त्यामध्ये फक्त प्रभाग क्र. ११ ची कामे नसून, १०० फूटी रस्ता प्रभाग प्रभाग क्र.१५ नंतर अलंकार सोसायटी हो देखील आहे. त्यानंतर सर्वे क्र. ५३७ आहे २७ आहे. प्रभाग क्र. ७ मधले नंतर साई दर्शन कॉलनी हा देखील विषय आहे. असे विविध कामे विकासशुल्काच्या अंतर्गत आहे. शासन निर्णय सार्वजनिक बांधकाम विभाग २०१६ क्र.१०५ दिनांक १७/१२/२०१६ या अंतर्गत शासन निर्णय असे म्हणतो एखादया रस्त्यावर ८-१० कामे असतील तर त्या कामांची गुणवत्ता राखण्यासाठी त्याचे तुकडे करु नये.एकत्रित टेंडर केल्यास त्यात चांगली स्पर्धा निर्माण होते.मोठे ठेकेदार सहभागी होतात. काम चांगलया दर्जाचे करण्यात येते. हा शासन निर्णय माझ्याकडे उपलब्ध आहे. फक्त रस्तयांसाठी नाही. एखादया तालुक्यात जेवढया शासन इमारती आहे.१०इमारती असतील तर त्याचे१० तुकडे करण्यापेक्षा एकत्रीकरण करुन ते करावे. काम सोपे होते.आणि ही निविदा १३% कमीने गेली आहे.त्या४०लाखापर्यंत सेव्हींग होणार आहे.

म.नागसेन बोरसे — रस्ते प्राधान्य क्रमाने शेवटी येतात.आजपर्यंत विकास शुल्कामध्ये किती ओपन प्लेस केल्या ? किती दवाखाने केले ? फक्त रस्तयांवरती खर्च करणार का?

म.सभापती — हा महासभेचा विषय आहे.

म.नागसेन बोरसे — २०२१-२०२२ चा अर्थ संकल्प मंजूर करतांना पदाचा दुरुपयोग केला ही बाब दर मंजूरी करता आल्याने आपल्या लक्षात आणून देत आहे.

म.खान मोहम्मद साबीर — एकच विषयावर वारंवार चर्चा होते विकास कामाला विरोध नाही. दिवाबत्ती चे कामे झाले नाही. वारंवार लिकेज होत राहतात याला सीमा नाही.

म.किरण अहिरराव — ५जानेवारी २०१८ला शहराची हद्दवाढ झाली.आज रोजी ४.५ वर्षे झाले आहे. आधिच्या वर्षामध्ये एवढा विकासनिधी जमा झाला का?हे जे आकडे दिसता आहे,४ कोटी ५ कोटी हे फक्त हद्दवाढीतील गावांच्या विकासशुल्कामुळे १०० रपये जमा होत असतील तर ७० रुपये ११ गावांचे या गावांना ३०० कॉलन्या आहे. हा पैसा फक्त धुळे शहरातच वापरला जातोय. या ११ गावांमध्ये विकासाची गाडी येऊ दया.

म.सभापती — मी तुमच्या मताशी सहमत आहे.हा विषय महासभेशी संबंधीत आहे. हया विषयांत जिल्हा वार्षीक योजने ऐवजी विकास शुल्क असे टाईप करायला हवे होते. टाईपिंग मिस्टेक आहे. सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ८१ दिनांक १९/०५/२०२२**

प्र.क्र.११ मधील विकास शुल्क निधी अंतर्गत २०२१-२२ विविध भागात रस्ता कॉंक्रीटकरण करणे बाबतच्या कामास धुळे महानगरपालिका ठराव क्र. दि.२७/०१/२०२२ अन्वये उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु.३,८३,१३,४१८/- (GST व इतर कर वगळून ) मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./१०२४, १०२३ , १०२५, १०२६दि.१६/०३/२०२२अन्वये रक्कम रु.४,३६,६७,५२६/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत या धुळे महानगरपालिका जा.क्र./धुमपा/बांवि/ २७६ /२०२१-२२ दि.२२/०३/२०२२रोजी हिंदुस्तान टाईम्स /देशोन्नती / समाज सारथी या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येवून दि.११/०४/२०२२ पर्यंत निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे /ठेकेदाराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | मे.हिंद कन्सट्रक्शन | शे.१३% कमीने | सर्वात कमी दर |
| २ | मे. गायत्री कन्सट्रक्शन | शे.३% जास्तीने | |
| ३ | मे. एकविरा कन्सट्रक्शन | शे.२% जास्तीने | |

सदर तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता मे. हिंद कन्सट्रक्शन यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे ३,८३,१३,४१८/- इतक्या रक्कमेचे असून शे.१३% कमी दराने आहे.सदर निविदा धारकांचे निविदा दर हे शे. १३% कमी दराने असल्याने सर्व निविदा समिती सदस्यांनी सदर निविदा धारकांचे दर स्विकारण्यास मे.स्थायी समिती पुढे ठेवणेस एकमत झाले.

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **मे.हिंद कन्सट्रक्शन** यांचे दर **शे.१३% कमीने** आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार **मे.हिंद कन्सट्रक्शन** यांची **शे.१३% कमीने** आलेले निविदा दरास मे.स्थायी समिती पुढे ठेवणेस मंजुरीस्तव तसेच अन्य काम न मिळालेले ठेकेदार त्यांची बयाना रक्कम परत करणे बाबत मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी **मे. हिंद कन्स्ट्रक्शन** यांचे **शे. १३ % कमीने** दराने आलेले निविदा दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री. खान मोहम्मद साबीर मुहिबुल्लाह

अनुमोदक :- श्री. अन्सारी अब्दुल लतीफ **सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- ७९ पाणीपुरवठा विभागाकडेस जलशुध्दीकरण केंद्र व जलकुंभावर आवश्यक कर्मचारी यापूर्वी असलेल्या मंजूर दराप्रमाणे नियुक्त संस्थेकडून घेणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.खान मोहम्मद साबीर विषय मंजूर करण्यात यावा.

म.बन्सीलाल जाधव सदरचा विषय मंजूर करण्यात यावा.

म.सभापती सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ८२ दिनांक १९/०५/२०२२**

पाणी पुरवठा विभागाकडे कार्यरत कर्मचारी ठेकेदार आस्था स्वयं रोजगार संस्थेमार्फत पुरविणेत येत होते.दि.१०/०५/२०२२रोजी झालेल्या चर्चेत पाणीपुरवठा विभागात कार्यरत असलेले कर्मचारी यांची स्वतंत्र निविदा मागविणेत यावी असे सुचविणेत आले.

ठेकेदार यांचे मार्फत वलवाडी Filtration Plant + अवधान येथील कर्मचारी सोडून खालील कनिष्ठ अभियंता यांचेकडे असलेले व्हॉलमन , सुकवड , बाभळे , मालेगाव रोड टाकी , पांझरा वॉटर वर्क्स या अठीकानी कार्यरत असलेले कर्मचारी खालील प्रमाणे आहे.

१) एन.के. बागुल :- १६
२) सी.एम. उगले :- १८
३) सी.सी. बागुल :- ०२
४) हेमंत पी. पावटे :- ०६
५) पी.डी. चव्हाण :- ०८

------------------------------

एकूण :- ५०

वरील प्रमाणे ५० कर्मचारी यांची निविदा मार्गाविणेसाठी वार्षिक खर्च मंजूर दर रु.५०७.११२ प्रमाणे रु. ९२,५४,९४०/- मात्रचा खर्च येणार आहे. तसेच पाणीपुरवठा विभागातील कर्मचारी जसे सेवानिवृत्त होतील त्याप्रमाणे वरील कर्मचारी मध्ये वाढ होणार आहे. त्याप्रमाणे निविदेत नमूद करणे आवश्यक राहील.

तसेच ठेकेदार यांनी फेब- २०२२ पासून पाणीपुरवठा विभागाकडील ३७ कर्मचारी यांना वेतन दिले आहे. एका महिनासाठी रु.५,६२,९०३/- मात्र खर्च येणार आहे.

माहे- फेब्रुवारी , मार्च एप्रिल या तीन महिन्या करीता खर्च रु. १६,८८,७०९/- मात्र ठेकेदाराने पाणीपुरवठा कर्मचारी यांना वेतन दिलेले आहे. पाणीपुरवठा विभागासाठी कुशल कर्मचारी आवश्यक असल्याने आजपावेतो मे. आस्था स्वयं रोजगार सेवा संस्था यांचा मार्फत कुशल कर्मचारी पुरविणेत येत आहे. पाणीपुरवठा विभागा करीता नवीन निविदा मागविणेस वरील दरापेक्षा जास्त दर येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

मे.महासभेचा ठराव नं. ८४ दि. २७/०१/२०२२ व मे. स्थायी समिती ने ठेकेदार मे.आस्था स्वयं रोजगार सेवा संस्था यांचा दरास मंजुरी दिलेली आहे. तसेच ठेकेदार यांना आदेश क्र. ४१० दि. २३/०३/२०२२ अन्वये २२३ कर्मचारी यांना आदेश दिलेला आहे. त्यापैकी २१० कर्मचारी आरोग्य विभाग व १३ कर्मचारी वलवाडी फिल्टरेशन प्लांट व अवधान या ठिकाणचे साफ सफाईसाठी आहेत. उर्वरित ५० पाणीपुरवठा कर्मचारीसाठी नवीन काढणेसाठी

लागणारा कालावधी तसेच जास्तीचा दर आल्यास येणारा खर्च लक्षात घेता व सध्यस्थितीत उन्हाळ्याचे दिवस लक्षात घेता पाणी पुरवठासाठी ५० कर्मचारी मे. आस्था स्वयं रोजगार सेवा संस्था कडून घेण्यास मे.स्थायी समितीकडे पाठविणे बाबत पाणीपुरवठा विभागा मार्फत टिपणी ठेवणेत आलेली आहे.

म.अति. आयुक्त सो., यांच्या कडील अभिप्राय नुसार , फेब्रुवारी – २०२२ पासून ३७ कर्मचारी आस्था स्वयं रोजगार संस्थेकडून पाणीपुरवठा ही अत्यावश्यक सेवा असल्याने स्थायी समिती सभापती व इतर लोकप्रतिनिधी यांच्याशी झालेल्या चर्चेप्रमाणे , पाणीपुरवठ्याची कुशल कामासाठी उपयोगात आणले जात होते. तथापि काही तांत्रिक अडचणीमुळे प्रस्तुत कामाची प्रशासकीय प्रक्रिया होऊ शकलेली नाही. त्यामुळे देयक अदा करणे शक्य होवू शकत नाही.

पाणीपुरवठा विभागासाठी कुशल कर्मचार्यांची आवश्यकता आहेच हे पाणीपुरवठा विभागाने स्पष्ट मांडलेले आहे. कारण २०१८ साली शहराची हद्दवाढ झाली व त्याप्रमाणात आकृती बंधात वाढीव बदल झालेला नाही. आणि पाणीपुरवठा मधील जे कर्मचारी सेवानिवृत्त झाले त्यांच्या जागेवर आस्थापना खर्चामुळे नवीन कर्मचारी भरता आलेले नाही.

उक्त दुहेरी अडचणीमुळे आस्था संस्थेकडून घेतलेले सेवा आवश्यक होती हे स्पष्ट आहे. तथापि आता सदर काम विना निविदा झालेले असल्याने मनपा अधिनियम १९४९ चे प्रकरण ५.२.२ प्रमाणे स्थायी समितीची प्रस्तुत कामासाठी २ +१२ अशी १४ महिन्यांची मंजुरी घेऊनच पुढील कार्यवाही करणे शक्य होईल.दर मुळातच निविदेद्वारे निश्चित आहेतच. पाणीपुरवठा विभागाची मागणी ५० कर्मचा-याची आहे. तथापि मनपा आर्थिक स्थिती पाहता असलेले ३७ कर्मचाऱ्यांच्या संख्येची सेवा घेणे योग्य होईल असे मत आहे. तरतूद पाणीपुरवठा विभागाच्या लेखाशिर्षातून करावी असा अभिप्राय देण्यात आलेला आहे. सदरचा खर्च पाणीपट्टीच्या उत्पनातूनच करणे योग्य राहील.

म.आयुक्त यांच्या अभिप्राया नुसार,पाणीपुरवठा अत्यावश्यक काम आहे. पाणीपुरवठा विभागाने निविदा प्रक्रिया वेळीच राबवली नाही त्यामुळे मे.स्थायी समितीकडे मान्यतेसाठी पाठविण बाबत अभिप्राय देण्यात आलेला आहे.

उक्त बाबत म.आयुक्त यांच्या मंजुरीनुसार मे.स्थायी समिती पुढे ठेवणेस मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सदर कामाची आवश्यकता व पाणी पुरवठयाची अत्यावश्यक सेवा लक्षात घेता यापुर्वी निविदेव्दारे आस्था स्वंय रोजगार सेवा संस्था, धुळे यांचे दर निश्चित असल्याने कार्यालयीन अहवालास अधिन राहून यापुर्वी असलेले आरोग्य विभाग व अन्य विभागातील संस्थेमार्फत नियुक्त २२३ कर्मचारी यांच्या व्यतिरिक्त पाणी पुरवठा विभागाच्या मागणीनुसार अतिरिक्त ५० कर्मचारी संबंधित संस्थेकडुन यापुर्वी मंजूर केलेल्या दराप्रमाणे नियुक्त करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच पाणीपुरवठा विभागाकडील बहुंतांशी कर्मचारी विहीत वयोमानामुळे सेवानिवृत्त होत आहेत. त्यामुळे शहराच्या पाणीपुरवठयाची अत्यावश्यक बाब लक्षांत घेता पाणी वितरणासाठी वेळोवेळी आवश्यकतेप्रमाणे सदर संस्थेकडुन कर्मचारी

नियुक्त करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री. खान मोहम्मद साबीर माहेबुल्ला

अनुमोदक :- श्री. जाधव बन्सीलाल माणिक **सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- ८० सन२०२२-२३ या वर्षाकरिता धुळे म.न.पा. दै. बाजार फी वसुली मक्ता काढणे कामी सरकारी रक्कम निश्चित होऊन मिळणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.किरण अहिरराव विषय मंजूर करण्यात यावा.

म. किरण कुलेवार सदरचा विषय मंजूर करण्यात यावा.

म.सभापती सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ८३ दिनांक १९/०५/२०२२**

धुळे म.न.पा. बाजार विभागाकडे दै. बाजार फी वसुलीकरीता पुरेसे कर्मचारी नसल्याने दि. ११ जुन २०२१ पासुन वसुली मक्ता मार्केट मुव्हर्स, धुळे यांना एक वर्ष कालावधीसाठी देण्यांत आलेला आहे. २४ समान हप्ते मध्ये पैसे देण्यांचे निश्चित केले आहे. हप्ता रक्कम रू. ११२५०० + २०२५० (GST कर) असे एकुण रू. १,३२,७५०/- मात्र आहे.

करारनामा अटी शर्तीचे पालन करून म.न.पा. धुळे ने पुर्ण सहकार्य केले आहे मात्र मार्केट मुव्हर्स, धुळे तर्फे वेगवेगळी करणे सांगुन थकीत रक्कम न भरल्यामुळे ५ हप्ते थकीत आहेत ते खालीलप्रमाणे (दि. १० मे २०२२ पर्यंत)

दै. बाजार फी GST एकुण भरलेले हप्ते थकीत हप्ते १,१२,५०० २०,२५०

१,३२,७५० १५,७५,००० ५,६२,५००

X १९ हप्ते X १९ हप्ते ३,८४,७५० २,८३,५०० १,०१,२५०

---

**२१,३७,५०० ३,८४,७५० २५,२२,२५० १८,५८,५०० ६,६३,७५०**

**+ शास्ती** ३०३६५

---

**थकबाकी ६,९४,११५**

थकीत रक्कम भरणेकामी वारंवार तोंडी लेखी सुचीत केले आहे दि.१-४-२०२२ रोजी म.उपायुक्त सो.समवेत थकीत हप्ते भरणे बाबत प्रत्यक्ष सुनावणी घेतली त्यावेळी देखील मक्तेदार यांनी पुर्ण रक्क्म भरण्याचे आश्वासित केले. मार्केट मुव्हर्स,धुळे यांनी म.न.पा.कडे रू.५,००,०००/-मात्र डिपॉझिट जमा ठेवलेली आहे. तसेच प्रकल्प विभागामार्फत DMA मार्फत् अनुदानितOnlineफेरीवाला सर्व्हेक्षणाचे देखील काम घेतले असुन तुर्त तांत्रिक अडचणी मुळे सुरू नाही असे समजते. मात्र कामाचे थकीत बिल मिळणेबाबत मागणी केलेली आहे.

दै.बाजार फी मार्केट मुव्हर्स, धुळे यांचा १ वर्ष कालावधी करीता दिलेला मक्ता दि. १० जुन २०२२ संपणार आहे. तरी उक्तबाबत मार्केट मुव्हर्स यांचेकडुन थकीत रक्कम वसुल करणे व पुनश्च दै. बाजार फी वसुली मक्ता पुढील १ वर्षाकरीता १०% नैसर्गिक वाढ (अधिक १८ % GST वेगळा) करून जाहिर लिलाव काढणेबाबत मे. स्थायी समिती पुढे सादर झालेला आहे.

उक्त प्रस्ताव व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने मे. मार्केट मुव्हर्स यांचेकडुन थकीत रक्कम वसुल करणे व पुनश्च दै. बाजार फी वसुली मक्ता पुढील १ वर्षाकरीता १०% नैसर्गिक वाढ (अधिक १८ % GST वेगळा) करून जाहिर लिलाव काढणेस कार्यालयीनअहवालास अधिन राहून मान्यता देण्यांत येत आहे.

सुचक :- श्री. किरण हरीश्चंद्र अहिरराव

अनुमोदक :- श्रीमती किरण राकेश कुलेवार **सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक:- ८१ | धुळे महानगरपालिका कडील चतुर्थ श्रेणी कर्मचारी यांना गणवेश कापड पुरविणेसाठी शासन नियमानुसार महाराष्ट्र यंत्रमाग महामंडळ नागपूर यांचेकडून थेट खरेदी करणेकामी आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे. |
| म. नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले. |
| म. प्रतिभाताई चौधरी | सदर विषय अनेक वर्षापासून सुरु आहे. यापूर्वी पायगुडे सो. असतांना कर्मचा-यांना गणवेश देण्यांत आलेले होते. त्यानंतर गणवेश वाटप झालेले नाही. आता विषय आला आहे तो मंजूर करावा. त्यामुळे कर्मचा-यांना गणेवश घातल्यानंतर ओळखता येईल. |
| म. किरण अहिरराव | विषय मंजूर करण्यांत यावा. |
| म. किरण कुलेवार | सदरचा विषय मंजूर करण्यात यावा. |
| म.सभापती | सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे. |

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ८४ दिनांक १९/०५/२०२२**

धुळे महानगरपालिका कडील चतुर्थ श्रेणी कर्मचारी यांना गणवेश कापड पुरविणे करीता मा.आयुक्त सो यांनी सुचित केले नुसार धुळे मनपा भांडार जा.क्र. १३१ दि. १२/०७/२०२१ ने महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ नागपूर यांना पुरवठा आदेश देण्यात आलेला होता तरी सदरचे आदेशानुसार गणवेश कापड पुरवठा सदर संस्थेने केलेला नाही.

तसेच सदर संस्थेशी फोन वरून संपर्क साधला असता त्यांच्या कडून काहीही प्रतिसाद मिळत नसल्यामुळे सदर संस्थेचे धुळे मनपा भांडार विभाग जा.क्र.६० दि.१४/१०/२०२१ रोजी भारतीय डाक (पोस्टाने) EM.No.४२१६७२५८६ IN दि.१८/१०/२०२१ ने ३ दिवस मुदत पत्र देण्यात आलेली होती.

तरी सदर संस्थे मार्फत कुठल्याही प्रकारचा पत्र व्यवहार प्राप्त झालेला नाही. तरी सदरचे पुरवठा आदेश देऊन आद्यापर्यंत १०० दिवस झालेले आहेत. तरी सुद्धा गणवेश कापड मिळालेले नाही. तरी सदर गणवेश कापड मिळणेस कर्मचारी व त्याचे युनियन प्रतिनिधी मार्फत मागणी होत आहे.

तरी सदर संस्थेचा पुरवठा आदेश रद्द करून धुळे महानगरपालिका कडेस प्राप्त पत्रानुसार महाराष्ट्र यंत्रमाग महामंडळ नागपूर यांचे त्याच कापडाचे दर कमी असुन ते हे गणवेश कापड पुरविणेस तयार आहेत त्या नुसार खालील प्रमाणे खर्च येणार आहे.

धुळे महानगरपालिकेतील कर्मचाऱ्यांना गणवेश घेण्यासाठी एकूण रक्कम रु. जीएसटी करासह १०,६७,६१७/- खर्च करावी लागणार आहे.

उद्योग संचनालय महाराष्ट्र शासन यांच्या कडील आदेश क्रमांक भां.ख.स-२०१४/ प्र.क्र.८२/भाग III उद्योग -४ दि.१/१२/२०१६ च्या परिशिष्ट २० मध्ये शासकीय महामंडळे/ उपक्रमामार्फत खरेदी करावयाच्या वस्तूंची यादी दिलेली आहे. मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेच्या भांडार खरेदी समितीच्या बैठकीत शासकीय कार्यालयांना लागणाऱ्या यंत्रमाग कापडाचे सन २०२१-२२ करिता परिशिष्ट – अ मध्ये दर्शविल्याप्रमाणे निश्चित केलेले आहे. महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ नागपूर यांनी त्यांच्याकडील जा.क्र./यंत्रमाग/ विपनन/ १७५६/१८दि.०७/०३/२०१८अन्वये गणवेश कापड खरेदीचे दर इकडील कार्यालयास सादर केलेले आहे.त्या अन्वये उक्त परिच्छेद २ व ३ मध्ये नमुद केल्याप्रमाणे गणवेश खरेदीचा प्रस्ताव तयार केला असून महाराष्ट्र यंत्रमाग महामंडळ नागपूर यांच्या कडून रक्कम रु.१०,६७,६१७/- खरेदी करण्यास प्रशासकीय मान्यता मिळून संबंधिताना मंजूर दर सुची नुसार कार्यादेश देणे बाबत मान्यता मिळणेस प्रस्ताव सादर करण्यात आला असता म.उपमुलेप सो. यांनी महाराष्ट्र यंत्रमाग महामंडळ यांच्या कडून कापड खरेदी करणेस आदेश निर्गमित करण्यास हरकत नाही असे सुचविल्यानुसार सदर प्रस्ताव अति.आयुक्त सो. यांच्या कडे दाखल करण्यात आला होता. त्यामध्ये त्यांनी भांडारपाल यांना चर्चा करणेस सुचविले असता सदर चे चर्चे नुसार त्यांनी ५.२.२ मध्ये स्थायी समितीच्या मान्यतेसाठी पाठविणे योग्य राहील असे नमुद केल्या नानात्र सदरचा प्रस्ताव मा.आयुक्त सो. यांच्या कडे सादर करण्यात आलेला होता. त्यानुसार मा.आयुक्त सो. यांनी थेट खरेदी करणेकरिता मा.स्थायी समिती कडे प्रस्ताव सादर करण्यास मान्यता दिलेली आहे.त्यानुसार सदर प्रस्ताव मे. स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

उक्त प्रस्ताव व सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून धुळे महानगरपालिका कडील चतुर्थ श्रेणी कर्मचारी यांना गणवेश कापड पुरविणेसाठी शासन नियमानुसार महाराष्ट्र यंत्रमाग महामंडळ नागपूर यांचेकडुन थेट खरेदी करणेस मान्यता देण्यांत येत आहे.

सुचक :- श्री. किरण हरीश्चंद्र अहिरराव
अनुमोदक :- श्रीमती किरण राकेश कुलेवार

**सर्वानुमते मंजुर,**
सही/-x x x
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

# धुळे महानगरपालिका,धुळे

## नगरसचिव कार्यालय

## स्थायी समिती सभा क्रमांक १४ चे इतिवृत्त

---

**धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह, धुळे**
**गुरुवार दिनांक २६/०५/२०२२**
**वेळ सकाळी ११-०० वाजतां**

धुळे महानगरपालिकेची स्थायी समितीची साप्ताहिक सभा क्रं.१४ आज गुरुवार दिनांक **२६/०५/२०२२**रोजी सकाळी ११.०० वाजतां **श्री.शितल मोहन नवले,सभापती,** स्थायी समिती,मनपा धुळे यांच्या अध्यक्षतेखाली **धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह** भरली. या ऑन लाईन सभेस खालील सन्मा.सदस्य हजर होते.

| अ.क्रं. | सदस्यांचे नांव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री.नवले शितल मोहन | सभापती |
| २ | श्रीमती कुलेवार किरण राकेश | सदस्या |
| ३ | श्री.जाधव बन्सीलाल माणिक | सदस्या |
| ४ | श्रीमती बराडे वैशाली भिकन | सदस्या |
| ५ | श्री. जाधव बन्सीलाल माणिक | सदस्य |
| ६ | श्रीमती चौधरी मंगला अर्जुन | सदस्या |
| ७ | श्री.अन्सारी फातमा नुरुल अमीन | सदस्या |
| ८ | श्री.चौधरी नरेंद्र रुपला | सदस्य |
| ९ | श्रीमती.चौधरी प्रतिभा शिवाजीराव | सदस्या |
| १० | श्री. रेलन हर्षकुमार राधेश्याम | सदस्य |
| ११ | श्रीमती अग्रवाल सारिका प्रविन | सदस्या |
| १२ | श्री.अन्सारी अब्दुल लतीफ अब्दुल हमीद | सदस्य |
| १३ | श्री.खान मोहम्मद साबीर मुहिबुल्लाह | सदस्य |
| १४ | श्रीमती पठाण नाजियाबानो नासिर खा | सदस्या |

उपस्थित अधिकारी गण

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. नितीन कापडणीस | अति. आयुक्त |
| २ | श्रीमती शिल्पा नाईक | उपायुक्त |
| ३ | श्रीमती पल्लवी शिरसाठ | कर मूल्य निर्धारण अधिकारी |
| ४ | श्री. मनोज अरविंद वाघ | नगरसचिव |
| ५ | श्री. गजानन पाटील | मुख्य लेखाधिकारी |
| ६ | श्री. के. एन. शिंदे | अभियंता |
| ७ | डॉ. एम.आर शेख | प्र. आरोग्याधिकारी |
| ८ | श्री. चंद्रकांत जाधव | सहा.आरोग्याधिकारी |

| | | |
|---|---|---|
| ९ | श्री. विकास साळवे | मलेरिया पर्यवेक्षक |
| १० | श्री. चंद्रकांत मोरे | लेखापाल |
| ११ | श्री. एन.के. बागुल | विद्युत अभियंता |
| १२ | श्री. सी. एम. उगले | पा.पु. ओव्हरसिअर |
| १३ | श्री. हेमंत पावटे | ओव्हरसिअर बांधकाम विभाग |
| १४ | श्री. संजय गुजर | औषध भांडारपाल |
| १५ | श्री. राजू माईनकर | भांडारपाल |
| १६ | श्री. महेंद्र सोनवणे | प्रशासन अधिकारी मनपा शि.मंडळ |
| १७ | श्री. प्रसाद जाधव | अतिक्रमण विभाग |
| १८ | श्री. सुक्राम राऊत | वाहन विभाग |

मा. सभापती — सन्मा.सदस्य मा. अति.आयुक्त सो. सर्व अधिकारी कर्मचारी व पत्रकार, छायाचित्रकर बांधव यांचे मी स्थायी समितीच्या बैठकीत स्वागत करतो.सभेचा कोरम पुर्ण झाला असुन नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरु करावे.

म. नगरसचिव — वंदे मातरम् या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

विषय क्रमांक :- ८२ — मागील स्थायी समिती सभांचे इतिवृत्त क्रमश: वाचून कायम करणे. (दि.५/५/२०२२ )

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. किरण अहिरराव — इतिवृत्त वाचून कायम करण्यांत यावे.

म. सभापती — सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने मागील स्थायी समिती सभेचे इतिवृत्त क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ८५ दिनांक २६/०५/२०२२**

मागील स्थायी समिती सभा दिनांक ५/५/२०२२ च्या सभेतील स्थायी समिती ठराव नंबर ६७ ते ७१ अखेर तसेच सभेत झालेली चर्चा व त्यावरील निर्णय क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक :- ८३ — जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२१-२२ अंतर्गत धुळे मनपा क्षेत्रातील नगर भूमापन क्रमांक 12721 स.नं.444/1 अ येथील शासकीय जमिनीवर संरक्षण भिंत बांधणेच्या कामाचे निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे..

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.प्रतिभा चौधरी — सभापती महोदय ज्या सर्वे नंबरची जी जागा आहे जागे संदर्भात नगररचना विभागाचा अभिप्राय घेतला आहे का ? आजच्या घडीला जागेची स्थिती कशी आहे ? ती मोकळी आहे का त्यावर अतिक्रमण आहे ? तसेच कार्यालयीन टिपणी संदर्भात सदस्यांना देण्यात आली नाही. तसेच काहीच उल्लेख केलेला नाही. विषय मंजूर करण्यात आमचा कुठलाही विरोध नाही. हा शासनाचा निधी आहे. परंतू सर्व सदस्यांना माहिती अवगत व्हायला पाहिजे. या अधिपण सभेमध्ये सांगीतले होते कार्यालयीन टिपणीत सविस्तर उललेख नसतो. त्यामुळे आम्हाला

माहिती विचारावी लागते. यासंदर्भात सव्वीस्तर माहीती हवी. आम्हाला माहिती दिल्यावर पुढच्या मिटींगमध्ये हा विषय घेऊ शकतो. ही नम्र विनंती.

म.सभापती — नगररचनाकार उपस्थित नाही. तसेच अभियंता शिंदे देखील उपस्थित नाही. सबब हा विषय तहकूब ठेवण्यांत येत आहे..पुढच्या वेळेस सविस्तर आढावा घेऊन विभागाने प्रस्ताव सादर करावा.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ८६ दिनांक २६/०५/२०२२**

जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२१-२२ अंतर्गत धुळे मनपा क्षेत्रातील नगर भूमापन क्रमांक 12721 स.नं.444/1 अ येथील शासकीय जमिनीवर संरक्षण भिंत बांधणेच्या प्रस्ताव मे.स्थायी समिती समोर मंजुरीसाठी सादर झाला असता सन्मा. सदस्यांनी केलेली चर्चा लक्षांत घेवून सदर प्रस्ताव तूर्त तहकूब ठेवण्यांत येत असून प्रशासनाने याबाबत सविस्तर परिपूर्ण प्रस्ताव पुनश्च सादर करावा.

**सर्वानुमते मंजुर**
**सही/- x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- ८४ — जिल्हा नियोजन अंतर्गत जिल्हा वार्षिक योजना अंतर्गत गट नं. 554 विशाल इस्टेट , 542 विशाल इस्टेट,543 विशाल इस्टेट व सर्वे नं. 35हनुमान मंदिर भागात मोकळ्या जागेवर अतिक्रमण रोखण्यासाठी संरक्षण भिंत बांधणेचे निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. हर्षकुमार रेलन — विषय मंजूर करण्यांत यावा.

म.नरेंद्र चौधरी — विषय मंजूर करण्यांत यावा

म. सभापती — सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ८७ दिनांक २६/०५/२०२२**

जिल्हा नियोजन अंतर्गत जिल्हा वार्षिक योजना अंतर्गत गट नं. ५५४ विशाल इस्टेट , ५४२ विशाल इस्टेट,५४३ विशाल इस्टेट व सर्वे नं.३५ हनुमान मंदिर भागात मोकळ्या जागेवर अतिक्रमण रोखण्यासाठी संरक्षण भिंत बांधणे कामास मा.जिल्हाधिकारी, धुळे यांनी उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु.१,१५,७७,०००/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./५५६ , ५४८ , ५४७,५४९/२०२१-२२ दि.०७/०१/२०२२ अन्वये रक्कम रु.१,१५,७७,०००/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत या धुळे महानगरपालिका जा.क्र./धुमपा/पापुवि/ १५६१ /२०२१-२२ दि.२३/०३/२०२२ अन्वये दि.२४/०३/२०२२ रोजी पुण्यनगरी / मर्डर या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.१९/०४/२०२२ रोजी निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे /ठेकेदराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| १ | व्ही.आर. पवार | अंदाजपत्रकीय दराने | सर्वात कमी दर |
| २ | एकविरा कन्सट्रक्शन | शे.३.००% जास्तीने | |
| ३ | हिंद कन्सट्रक्शन | शे.२.००% जास्तीने | |

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **मे.व्ही.आर. पवार** यांचे दर **अंदाजपत्रकिय दराने** आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार **मे.व्ही.आर.पवार** यांची अंदाजपत्रकीय दराने आलेले निविदा दरास मे.स्थायी समिती पुढे ठेवणेस मंजुरीस्तव तसेच अन्य काम न मिळालेले ठेकेदार त्यांची बयाना रक्कम परत करणे बाबत मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी कंत्राटदार **मे. व्ही.आर. पवार** यांची अंदाजपत्रकीय दराने आलेले निविदा दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री. हर्षकुमार राध्येशाम रेलन
अनुमोदक :- श्री. नरेंद्र रुपला चौधरी

**सर्वानुमते मंजुर**
**सही/- x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- ८५ जिल्हा नियोजन अंतर्गत जिल्हा वार्षिक योजना अंतर्गत गट नं.3/1ब/3/1ब,6/2/1अ,15/1/अ, 15/1 / ब ,15/2/अ,15/2/ ब ,523/3 अजळकर नगर मध्ये मोकळ्या जागेवर संरक्षण भिंत बांधणेचे निविदा दर मागविण्यांत आलेत,त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. नरेंद्र चौधरी — विषय मंजूर करण्यांत यावा.

म.किरण अहिरराव — विषय मंजूर करण्यांत यावा

म. सभापती — सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ८८ दिनांक २६/०५/२०२२**

जिल्हा नियोजन अंतर्गत जिल्हा वार्षिक योजना अंतर्गत गट नं. ३/१ब /३/१ब , ६/२/१ अ , १५/१/अ , १५/१ / ब , १५/२/अ , १५/२/ ब , ५२३/३ अजळकर नगर मध्ये मोकळ्या जागेवर संरक्षण भिंत बांधणे कामास मा.जिल्हाधिकारी , धुळे यांनी उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु.२,८७,४५,०००/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./५५२,५५३,५५४,५५५, ५४६, ५५३ /२०२१-२२ दि.०७/०१/२०२२ अन्वये रक्कम रु.२,८७,४५,०००/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत या धुळे महानगरपालिका जा.क्र./धुमपा/पापुवि/ १५६१ /२०२१-२२ दि.२३/०३/२०२२ अन्वये दि.२४/०३/२०२२ रोजी पुण्यनगरी / मर्डर या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.१९/०४/२०२२ रोजी निविदा दर मागविण्यात आले आहेत.

पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे /ठेकेदराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | गायत्री कन्सट्रक्शन | अंदाजपत्रकीय दराने | सर्वात कमी दर |
| २ | एकविरा कन्सट्रक्शन | शे.३.००% जास्तीने | |
| ३ | ढुंढ कन्सट्रक्शन | शे.२.००% जास्तीने | |

रील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **गायत्री कन्सट्रक्शन** यांचे दर **अंदाजपत्रकिय दराने** आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार **मे. गायत्री कन्सट्रक्शन** यांची अंदाजपत्रकीय दराने आलेले निविदा दरास मे.स्थायी समिती पुढे ठेवणेस मंजुरीस्तव तसेच अन्य काम न मिळालेले ठेकेदार त्यांची बयाना रक्कम परत करणे बाबत मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी कंत्राटदार **मे.गायत्री कन्सट्रक्शन** यांची अंदाजपत्रकीय दराने आलेले निविदा दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री. नरेंद्र रुपला चौधरी

अनुमोदक :- श्री. किरण हरिश्चंद्र अहिरराव

**सर्वानुमते मंजुर**
**सही/- x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- ८६ — धुळे मनपा चे 11 अॅलोपॅथी दवाखाने, 3 सुतिकागृह, 1 कुटुंब कल्याण केंद्र, 1 नागरी आरोग्यकेंद्रासाठी सन 2022-23 या वर्षासाठी लागणारी औषध खरेदीसाठी "शेवटची खरेदी किंमत" दरांप्रमाणे अंदाजीत खर्च रु.29,94,302/- मात्र खर्चास आर्थीक व प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत तसेच स्पर्धात्मक दरांचा फायदा मिळण्यासाठी ई-निविदा प्रसिध्द करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे

म.नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.किरणताई कुलेवार — सभापती महोदय हा विषय महत्वपूरण असून चांगला विषय आहे. सर्व सामान्य नागरिकांना उत्कृष्ट व चांगल्या दर्जाची औषधे मिळणार आहे पण माझा प्रश्न असा की, मनपाचे दवाखाने मध्ये डॉक्टर उपलब्ध नसतात. ड्रेसर,टेक्नीशिअन उपलब्ध नसतात. मी दोन तिन दिवसापासून पाठपूरावा करत तिथे फक्त आशावर्कर व नर्सेस उपलब्ध असतात. आपण जर चांगलया प्रतिचे औषधे उपलब्ध करुन देणार असू पण तिथे डॉक्टरच उपलब्ध नसतील तर नागरिकांची गैरसोय होणारच आहे. आपण त्यांना तसा आदेश दयावा.

म.सभापती — डॉक्टर सो. तिथे काय स्टाफची काय कमी आहे ते पाहून घ्या व तसा अहवाल सादर करावा.

म.नाजियाबानो पठाण — हा जो विषय आला आहे. मनपा दवाखान्याचा पण देवपूर भागातल्या दवाखान्यात स्वच्छता दिसून येत नाही.

| | |
|---|---|
| म.सभापती | मी तुमच्या प्रभागात येऊन गेलो तिथे स्वच्छता आहे तेवढी माझ्या प्रभागात सुध्दा नाही. याचे श्रेय तुम्हालाचा जाते आपण आपल्या प्रभागाबद्दल दक्ष आहात. ठिक आहे. पाहून घेतो. |
| म.नाजियाबानो पठाण | तसेच तिथे खोकल्याचे औषधे पण उपलब्ध नसतात. तसेच तेथे डिलेव्हरी केली जात नाही तेथील डॉक्टर रुग्णांना सिव्हील हॉस्पिटल मध्ये पाठवतात. |
| म.सभापती | ७० लाखाची बजेट मध्ये तरतूद केली आहे तिथे मेडीकल स्टाफ कमी असल्यामुळे क्रिटीकल परिस्थिती न व्हावी म्हणून तिकडे पाठवत असतील. |
| म.प्रतिभाताई चौधरी | मला एक सूचना दयायची आहे औषधे ही चांगल्या दर्जाची असावी. |
| म.सभापती | नक्कीच आपण त्याची गुणवत्ता चांगली राहिल याची काळजी घेऊ. सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने सदर प्रस्तावास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यांत येत असून तसेच स्पर्धात्मक दरांचा फायदा मिळण्यासाठी ई-निविदा प्रसिध्द करणेस मान्यता देण्यांत येत आहे. |

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ८९ दिनांक २६/०५/२०२२**

धुळे महानगरपालिका आरोग्य विभागाकडील 11 ॲलोपॅथी दवाखाने,३ सुतिकागृह व 1 कुटुंब कल्याण केंद्र, 1 नागरी आरोग्यकेंद्रासाठी सन 20२२-2३ या वर्षासाठी लागणारी औषध भांडार विभागातुन पुरवठा होणेबाबत संबधीत दवाखान्यांचे वैद्यकिय अधिकारी यांनी मा. आरोग्य अधिकारी यांचे मार्फत भांडार विभागात रिपोर्ट सादर केला आहे. सदर औषधांची यादी शासन निर्णयाप्रमाने Generic आहे.

सन २०२०-२१ या वर्षामध्ये धुळे मनपास प्राप्त ई-निविदा दरांना ३ वर्षासाठी मंजुरी देण्यात आली आहे. प्रत्येक वर्षी औषधांचे दरांमध्ये कमी-जास्त दर होत असतात तसेच सदर कालावधी हा कोविड-१९ संक्रमाचा होता. त्यामुळे त्यावेळेच्या दरांमध्ये व सध्याचे दरांमध्ये तफावत असु शकते. रुग्णांचे उपचारासाठी वेळेवर व वाजवी दरांमध्ये औषधे उपलब्ध होण्यासाठी खरेदीची पारदर्शकता राहण्यासाठी सन २०२२-२३ या वर्षासाठी ई-निविदा प्रसिध्द करणे आवश्यक आहे.

शासनाकडुन राष्ट्रीय आरोग्य अभीयान (NUHM) अंर्तगत सदर औषधी पुरवठा होण्याची शक्यता विचारात घेऊन रुग्णांची गैरसोय होऊ नये यास्तव **दरांना मंजुरी घेऊन कार्यादेश आवशक्तेनुसार विभागुन देण्याची दक्षता घेण्यात येईल.** सन २०2२-२3 या वर्षात जर शासनाकडून मागणीप्रमाने औषधांचा पुरवठा झाला नाही तर रुग्णांची गैरसोय होऊ नये यास्तव ई-निविदा प्रणालीव्दारे प्राप्त झालेल्या तुलनात्मक कमी दरांप्रमाने आवश्यक औषध खरेदी करने सोयीचे होणार आहे. यासाठी आर्थीक व प्रशासकीय मंजुरी व ई-निविदा प्रसीध्द करणे आवश्यक आहे.

सन २०२२-२३ या वर्षाचे खरेदीसाठी अंदाजपत्रक तयार करतांना महाराष्ट्र शासन, उदयोग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक: भांखस-२०१४/प्र.क्र.८२ भाग-III/उदयोग-४ मंत्रालय, मुंबई दि. ०१/१२/२०१६ चे शासन निर्णयानुसार (3.1.2.2) (P-115) किंमतीचा आधार "शेवटची खरेदी किंमत" सन २०२०-२१ या वर्षाचे ई-निविदा दरांप्रमाणे धुळे मनपा चे १६ दवाखान्यांचे सन २०२२-२३ या वर्षाचे मागणी रिपोर्ट प्रमाणे ९२ प्रकारचे ॲलोपॅथी औषध खरेदीसाठी एकुण खर्च रु. २९,९४,३०२/-मात्र येणार आहे.तांत्रीक मान्यता घेण्यांत आलेली आहे.

सन २०२२-२३ या वर्षासाठी स्पर्धात्मक दरांचा फायदा मिळण्यासाठी ई-निविदा प्रसिध्द करुन दर माघविल्यास ई-निविदा प्रनालीव्दारे प्राप्त झालेल्या तुलनात्मक सर्वात कमी दरांप्रमाणे खरेदी केल्यास बाबवार गुणवत्ता व दर यानुसार अनुक्रमे उत्कृष्ट व कमी असलेल्या

दरांप्रमाणे ॲलोपॅथी औषध खरेदी होतील व मनपाचा आर्थीक फायदा होईल व रुग्णांसाठी चांगल्या प्रतिची औषधी उपलब्ध होतील.

सन २०२२-२३ या वर्षात आरोग्य व सुखसोई या मुख्य लेखाशिर्षात,औषध खरेदी या उपलेखाशिर्षात रु.७०,००,०००/- बजेट तरतुद प्रशासनाने सुचवली आहे. त्यापैकी आयुर्वेद पंचकर्म रुग्णालयासाठी लागणारी आर्युर्वेद औषधी खरेदीसाठी रु.८८,१६५/- मात्रचा प्रस्ताव सादर केलेला आहे. ॲलोपॅथी औषध खरेदी साठी रु.६९,११,८३५/- शिल्लक राहात आहेत.

सबब,सन २०२२-२३ या वर्षासाठी लागणारी ९२ प्रकारचे ॲलोपॅथी औषध खरेदीसाठी दि.०१/१२/२०१६ चे शासन निर्णयाप्रमाने शेवटची खरेदी किंमतीनुसार तयार करण्यात आलेल्या अंदाजीत रु. २९,९४,३०२/- मात्र खर्चास आर्थीक व प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत तसेच स्पर्धात्मक दरांचा फायदा मिळण्यासाठी ई-निविदा प्रसिध्द करण्यास विषय मे. स्थायी समिती पुढे सादर झालेला आहे.

सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सन २०२२-२०२३ या वर्षासाठी लागणारी ॲलोपॅथीक औषधे खरेदी करण्यासाठी अंदाजित खर्च रुपये २९,९४,३०२/- मात्र खर्चास आर्थीक व प्रशासकीय मंजुरी देण्यांत येत आहे. तसेच स्पर्धात्मक दरांचा फायदा मिळण्यासाठी ई-निविदा प्रसिध्द करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

सुचक :- श्रीमती किरण राकेश कुलेवार
अनुमोदक :- श्रीमती नाजियाबानो नासीर खॉ पठाण

**सर्वानुमते मंजुर**
**सही/- x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-८७ — एकत्रित मानधनावरील स्वच्छता निरीक्षक यांना ६ महिने मुदतवाढ देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. साबीर मुहिबुल्लाह — विषय मंजूर करण्यांत यावा.

म. नरेंद्र चौधरी — विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती — सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ९० दिनांक २६/०५/२०२२**

खालील मानधनावरील स्वच्छता निरीक्षक यांना पुढील ६ महिनेकरीता एकत्रित मानधनावर मुदतवाढ देणेबाबत ठरावानुसार मान्यता दिलेली आहे.

त्या अनुषंगाने संदर्भीय क्र. २अन्वयेच्या आदेशानुसार खालील स्वच्छता निरीक्षक यांना मुदत संपुष्ठात आल्याच्या दिनांकानंतर ०५ दिवसाचा खंड देवून ०६ महिनेकरीता मुदतवाढ देण्यात आलेली होती. त्यांची मुदत त्यांच्या नावासमोर नमुद केलेल्या दिनांकास संपुष्ठात आलेली आहे.

| अ क्र | उमेदवारचे नाव | पदाचे नाव | मानधन रुपये | मुदत संपुष्ठात आल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | श्री गौरव अशोक माळी | स्वच्छता निरीक्षक | १२,०००/- | दि १६/०४/२०२२ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २ | श्री मनिष अशोक आघाव | स्वच्छता निरीक्षक | १२,०००/- | |

उक्त मानधनावरील कर्मचारी यांनी पुढील ६ महिनेकरीता मुदतवाढ मिळणेबाबत विनंती अर्ज सादर केलेला आहे.

सदर प्रकरणी सहा. सार्व. आरोग्याधीकारी यांनी आरोग्य विभागात स्वच्छता निरीक्षक यांच्या कामाची निकड पाहता उक्त दोन्ही स्वच्छता निरीक्षक यांना पुढील ६ महिनेकरीता मुदतवाढ देणेबाबत अहवाल सादर केलेला आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ (३) नुसार उक्त दोन्ही स्वच्छता निरीक्षक यांना पुनश्च: ६ महिने कालावधीची मुदत वाढ देणेबाबतचा विषय निर्णयास्तव मे.स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून उक्त मानधनावरील २ स्वच्छता निरीक्षक यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ (३) नुसार पुनश्च: ६ महिने कालावधीची मुदत वाढ देण्यांस मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री. नरेंद्र रुपला चौधरी

अनुमोदक :- श्री. खान मोहम्मद साबीर मुहिबुल्लाह

**सर्वानुमते मंजुर**
**सही/- x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमां :-८८ राष्टीय शहरी अभियाना अंतर्गत वरखेडी येथे नविन अरोग्य केंद्र बांधणेचे निविदा दर मागविण्यांत आलेत,त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. साबीर मुहिबुल्लाह विषय मंजूर करण्यांत यावा.

म. नरेंद्र चौधरी विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालासअधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ९१ दिनांक २६/०५/२०२२**

राष्ट्रीय शहरी अभियान अंतर्गत साक्री रोड जोरावर अली सोसा., येथे नवीन आरोग्य केंद्र बांधणे कामास म.सह संचालक , नागरी आरोग्य अभियान , मुंबई यांनी टिपणी मंजुरीने दि.११/०८/२०२१ अन्वये कामाच्या खर्चास रक्कम रु. ७९,९६,३५०/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./६३५/२०२१-२२ दि. २८/०१/२०२२अन्वये रक्कम रु.७९,९६,३५०/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत या धुळे महानगरपालिका जा.क्र./धुमपा/पापुवि/ १३७७ /२०२१-२२ दि.१६/०२/२०२२ अन्वये दि.१७/०२/२०२२ रोजी दैनिक देशदूत / समाज सारथी या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.०८/०३/२०२२ रोजी निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे /ठेकेदाराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| १ | ऋषभ सतिष खिवसरा | शे.२% जास्तीने | |
| २ | अक्षय धनराज माखीजा | शे.६% कमीने | |
| ३ | एकविरा कॅन्सट्रक्शन | शे.३% जास्तीने | |
| ४. | हिंद कन्सट्रक्शन<br>ल | शे.११% कमीने | सर्वात कमी दर |

प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **मे.हिंद कन्सट्रक्शन** यांचे दर **शे.११% कमीने** आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम धरलेली आहे. सबब कंत्राटदार **मे. हिंद कन्सट्रक्शन** यांची **शे.११% कमीने** दराने आलेले निविदा दरास मे.स्थायी समिती पुढे ठेवणेस मंजुरीस्तव तसेच अन्य काम न मिळालेले ठेकेदार त्यांची बयाना रक्कम परत करणे बाबत मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी कंत्राटदार **मे. हिंद कन्सट्रक्शन** यांची **शे.११% कमीने** आलेले निविदा दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबावदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री. नरेंद्र रुपला चौधरी

अनुमोदक :- श्री. खान मोहम्मद साबीर मुहिबुल्लाह

**सर्वानुमते मंजुर**

**सही/- x x x**

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक :-८९ — राष्टीय शहरी अभियाना अंतर्गत साक्री रोड जोरावर अली सोसायटी येथे नविन अरोग्य केंद्र बांधणेचे निविदा दर मागविण्यांत आलेत,त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. नरेंद्र चौधरी — विषय मंजूर करण्यांत यावा.

म.किरण अहिरराव — विषय मंजूर करण्यांत यावा

म. सभापती — सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ९२ दिनांक २६/०५/२०२२**

धुळे शहरात राष्ट्रीय शहरी अभियान अंतर्गत वरखेडी गाव येथे नवीन आरोग्य केंद्र बांधणे कामास म.सह संचालक, नागरी आरोग्य अभियान, मुंबई यांनी टिपणी मंजुरीने दि. ११/०८/२०२१ अन्वये कामाच्या खर्चास रक्कम रु. ७९,९६,३५०/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./६३४/२०२१-२२ दि. २८/०१/२०२२ अन्वये रक्कम रु.७९,९६,३५०/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत या धुळे महानगरपालिका जा.क्र./धुमपा/पापुवि/ १३७७/२०२१-२२ दि.१६/०२/२०२२अन्वये दि.१७/०२/२०२२रोजी दैनिक देशदूत / समाज सारथी या वृत्तपत्रात

जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.०८/०३/२०२२ रोजी निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे /ठेकेदराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | ऋषभ सतिष खिवसरा | शे.३% जास्तीने | |
| २. | एकविरा कन्सट्रक्शन | शे.२% जास्तीने | |
| ३. | हिंद कन्सट्रक्शन | शे.५% कमीने | सर्वात कमी दर |

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **मे.हिंद कन्सट्रक्शन** यांचे दर **शे.५%कमीने** आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार **मे. हिंद कन्सट्रक्शन** यांची **शे.५%कमीने** दराने आलेले निविदा दरास मे.स्थायी समिती पुढे ठेवणेस मंजुरीस्तव तसेच अन्य काम न मिळालेले ठेकेदार त्यांची बयाना रक्कम परत करणे बाबत मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी कंत्राटदार **मे. हिंद कन्सट्रक्शन** यांची **शे.५% कमीने** आलेले निविदा दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जवाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री. नरेंद्र रुपला चौधरी

अनुमोदक :- श्री. किरण हरिश्चंद्र अहिरराव

**सर्वानुमते मंजुर**

**सही/- x x x**

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

# धुळे महानगरपालिका,धुळे
## नगरसचिव कार्यालय
## स्थायी समिती सभा क्रमांक १५ चे इतिवृत्त

---

**धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह, धुळे**
**गुरुवार दिनांक ०२/०६/२०२२**
**वेळ सकाळी ११-०० वाजतां**

धुळे महानगरपालिकेची स्थायी समितीची साप्ताहिक सभा क्रं.१५ आज गुरुवार दिनांक०**२/०६/२०२२**रोजी सकाळी ११.०० वाजतां **श्री.शितल मोहन नवले,सभापती,** स्थायी समिती,मनपा धुळे यांच्या अध्यक्षतेखाली **धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह** भरली. या ऑन लाईन सभेस खालील सन्मा.सदस्य हजर होते.

| अ.क्रं. | सदस्यांचे नांव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री.नवले शितल मोहन | सभापती |
| २ | श्री. बोरसे नागसेन दामोदर | सदस्य |
| ३ | श्रीमती कुलेवार किरण राकेश | सदस्या |
| ४ | श्री.जाधव बन्सीलाल माणिक | सदस्या |
| ५ | श्री. जाधव बन्सीलाल माणिक | सदस्य |
| ६ | श्रीमती चौधरी मंगला अर्जुन | सदस्या |
| ७ | श्री.अन्सारी फातमा नुरुल अमीन | सदस्या |
| ८ | श्री.चौधरी नरेंद्र रुपला | सदस्य |
| ९ | श्रीमती.चौधरी प्रतिभा शिवाजीराव | सदस्या |
| १० | श्री. रेलन हर्षकुमार राधेश्याम | सदस्य |
| ११ | श्रीमती अग्रवाल सारिका प्रविन | सदस्या |
| १२ | श्री.अन्सारी अब्दुल लतीफ अब्दुल हमीद | सदस्य |
| १३ | श्री.खान मोहम्मद साबीर मुहिबुल्लाह | सदस्य |
| १४ | श्रीमती पठाण नाजियाबानो नासिर खा | सदस्या |

उपस्थित अधिकारी गण

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. नितीन कापडणीस | अति. आयुक्त |
| २ | डॉ. श्रीमती संगिता नांदुरकर | उपायुक्त |
| ३ | श्री. मनोज अरविंद वाघ | नगरसचिव |
| ४ | श्री. गजानन पाटील | मुख्य लेखाधिकारी |
| ५ | श्री. के. एन. शिंदे | अभियंता |
| ६ | डॉ. एम.आर शेख | प्र.आरोग्याधिकारी |

| | | |
|---|---|---|
| ७ | श्रीबी.एस. रनाळकर | सहा. कर मूल्य निर्धारण अधिकारी |
| ८ | श्री. कमलेश सोनवणे | ओव्हरसिअर नगररचना विभाग |
| ९ | श्री.पी. डी. चव्हाण | ओव्हरसिअर बांधकाम विभाग |
| १० | श्री. संजय मोरे | कार्यालय अधिक्षक |
| ११ | श्री. एन.के. बागुल | विद्युत अभियंता |
| १२ | श्री.विशाल निंबाळकर | लिपीक , उप मुख्य ले.प. |
| १३ | श्री. किशोर सुडके | प्र. परवाना अधिक्षक तथा बाजार विभाग प्रमुख |
| १४ | श्री. राजू माईनकर | भांडारपाल |
| १५ | श्री. महेंद्र सोनवणे | प्रशासन अधिकारी मनपा शि.मंडळ |
| १६ | श्री. सुक्राम राऊत | वाहन विभाग |

मा. सभापती सन्मा.सदस्य मा.अति.आयुक्त सो. सर्व अधिकारी कर्मचारी व पत्रकार, छायाचित्रकर बांधव यांचे मी स्थायी समितीच्या बैठकीत स्वागत करतो.सभेचा कोरम पुर्ण झाला असुन नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरु करावे.

म. नगरसचिव वंदे् मातरम् या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

म. नगरसचिव आज आपले सभापती श्री.शितलभाऊ नवले यांचा वाढदिवस आहे.प्रशासानाच्या वतीने व सर्व सन्मा. सदस्यांच्या वतीने शितल भाऊ यांचे बुके देऊन सत्कार करण्यांत आला व त्यांच्या पुढील वाटचालीस हार्दीक शुभेच्छा देण्यांत आल्या. तसेच सन्मा.सदस्य श्री.नरेंद्र रुपला चौधरी यांचा देखील काल वाढदिवस होता.त्याचा देखील सर्व सन्मा.सदस्यांच्या वतीने बुके देऊन सत्कार करण्यांत आला.

तसेच धुळे महानगरपालिकेत नव्याने बदली होऊन आलेल्या उपायुक्त मॅडम श्रीमती संगिता नांदुरकर यांचा स्थायी समितीच्या वतीने सभापती श्री.शितलभाऊ नवले व उपस्थित सदस्यांनी बुके देऊन त्यांचे स्वागत केले. व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

श्रीमती संगिता नांदुरकर मॅडम यांनी आपल्या अल्पसा परिचय सभागृहास करुन दिला.

सन्मा. सदस्यांचे आलेले रजेचे अर्ज

सन्मा.सदस्य श्री. संजय सुधाकर जाधव यांनी आजच्या सभेस तब्येत बरी नसल्याने उपस्थित राहू शकत नसल्याने रजा मंजूर करणेबाबत विनंती केली आहे.

म. सभापती सन्मा. सदस्यांच्या विनंती नुसार आजच्या सभेस त्यांची रजा मंजूर करण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ९३ दिनांक ०२/०६/२०२२**

सन्मा. सदस्य श्री. संजय सुधाकर जाधव यांनी आजच्या सभेस तब्येत बरी नसल्याने उपस्थित राहू शकत नसल्याने रजा मंजूर करणेबाबत विनंती केली आहे. सन्मा. सदस्यांच्या विनंती नुसार आजच्या सभेस त्यांची रजा मंजूर करण्यांत येत आहे. **सर्वानुमते मंजुर,**

सही/-X X X

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- ९० मागील स्थायी समिती सभांचे इतिवृत्त क्रमशः वाचून कायम करणे. (दि. १९/५/२०२२ )

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

| | |
|---|---|
| म. किरण अहिरराव | इतिवृत्त वाचून कायम करण्यांत यावे. |
| म. सभापती | सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने मागील स्थायी समिती सभेचे इतिवृत्त क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे. |

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ९४ दिनांक ०२/०६/२०२२**

मागील स्थायी समिती सभा दिनांक १९/५/२०२२ च्या सभेतील स्थायी समिती ठराव नंबर ७२ ते ८४ अखेर तसेच सभेत झालेली चर्चा व त्यावरील निर्णय क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

सही/-X X X

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक:- ९१ | जिल्हा नगरोत्थान योजना सन २०२१-२२ अंतर्गत धुळे महानगरपालिका करीता १ नग कार्डियाक (ALS) रूग्ण वाहिका खरेदी करणे करीता जी. एम. पोर्टलव्दारा निविदा दर मागविण्यांत आलेत. त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे. |
| म.नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले. |
| म.प्रतिभाताई चौधरी | अति आवश्यक सेवेसाठी रुग्णवाहीका खरेदी केली जाणार आहे.त्यामध्ये ७०% निधी शासनाचा आहे व ३०% मनपाचा निधी आहे. यामध्ये कोणकोणत्या कंपन्यांचे टेंडर आले आहे. व जे टेंडर आहे ते ऑटोमोबाईल क्षेत्राशी निगडीत आहे का? रुग्णवाहीका ही अति आवश्यक सेवेमध्ये आहे. केव्हाही काही होऊ शकते रस्त्यावर रुग्णवाहीका नादुरुस्त झाली तर अडचण येणार आहे. यांत ३०% हीस्सा मनपाचा असलयाने मनपावर जबाबदारी येणार आहे. या बाबतीत विसंगती दिसून येत आहे. सदर प्रस्ताव तहकूब करावा. |
| म.भांडारपाल | सदरचे टेंडर हे जीईम पोर्टलवर आले आहे. तीन निविदा प्राप्त झालेल्या आहे. देवाशिष एन्टरप्राईजेस, साईसुंदर मेडीकल एजन्सी,प्रथमेश एन्टरप्राईजेस अशा तीन निविदा आहे. |
| म.हर्षकुमार रेलन | फक्त जीईम पोर्टलवर आले म्हणून ठेका देणार आहात का? कोणाचीही निविदा उघडतांना तो त्या कंपनीचा किंवा ऑटोमोबाईल एजन्सीचा डिलर आहे , का भाजीपालावाला आहे? सदर निविदेत आलेले निविदाधारक मेडीकल क्षेत्राशी निगडीत आहे म्हणून तो सर्वीस देणार आहे का? मग त्या निविदा पात्र कशा झाल्या? आपल्याला रुग्णवाहीका घ्यायची आहे आपण थोडे तरी संशोधन केले पाहिजे काहीतरी विचार केला पाहिजे. तीनही निविदाधारकांपैकी एकही ऑटोमोबाईलवाला नाही. हे फार चुकीचे आहे. सदर निविदा रद्द करा.यासाठी स्वत:चे शोरुम असणे आवश्यक आहे. हा विषय तहकूब करा. पात्र व योग्य व्यक्तीकडूनच निविदा घ्याव्या. |
| म.सभापती | सन्मा. सदस्यांनी जे प्रश्न उपस्थित केले ते बरोबर आहे. आपण एखादे वाहन खरेदी करायचे डिलर कडून खरेदी करावे. हे निविदाधारक मेडीकल फिल्डशी संबंधीत आहे. याबाबतीत शहानिशा करण्यांत यावी तोपावेतो सदर प्रस्ताव तहकूब ठेवण्यांस मान्यता देण्यांत येत आहे. |

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ९५ दिनांक ०२/०६/२०२२**

जिल्हा नगरोत्थान योजना सन २०२१-२२ अंतर्गत धुळे महानगरपालिका करीता १ नग कार्डियाक (ALS) रूग्ण वाहिका खरेदी करणे करीता जी. एम. पोर्टलव्दारा निविदा दर मागविण्यांत आलेत व त्यानुसार सदरचा प्रस्ताव निविदा दर मंजुरीसाठी मे. स्थायी समितीपुढे सादर झाला असता सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने सदर निविदेत सहभागी झालेले निविदाधारक हे ॲटोमोबाईल क्षेत्राशी संबंधित आहे किंवा नाहीत याबाबत शहानिशा करण्यांत यावी तोपावेतो सदर प्रस्ताव तहकूब ठेवण्यांस मान्यता देण्यांत मान्यता देण्यांत येत आहे.

सुचक :- श्री. हर्षकुमार राधेशाम रेलन

अनुमोदक :- श्रीमती. चौधरी प्रतिभाताई शिवाजीराव

**सर्वानुमते मंजुर,**

सही/-X X X

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- ९२ धुळे प्र. क्र. १७ मध्ये नगरोत्थान योजने अंतर्गत रासकर नगर महेश थोरात ते मारोती मंदिर तसेच अशोक बाविस्कर ते मुन्ना सोनवणे घरापावेतो रस्ता कॉक्रीट करणेचे निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. हर्षकुमार रेलन — विषय मंजूर करण्यांतयावा.

म. नरेंद्र चौधरी — विषय मंजूर करण्यांतयावा.

म.सभापती — **सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.**

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ९६ दिनांक ०२/०६/२०२२**

धुळे प्र. क्र. १७ मध्ये नगरोत्थान योजने अंतर्गत रासकर नगर महेश थोरात ते मारोती मंदिर तसेच अशोक बाविस्कर ते मुन्ना सोनवणे घरापावेतो रस्ता कॉक्रीट करणे कामास धुळे महानगर पालिका ठराव नं. ७३ दि.२७/०१/२०२२ अन्वये म. जिल्हाधिकारी , धुळे यांनी दि. २३/०३/२०२२ अन्वये उक कामाच्या खर्चास रक्कम रु.५९,६८,१९३/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./८९५ दि.१४/०३/२०२२ अन्वये रक्कम रु.५९,६८,१९३/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत या धुळे महानगरपालिका जा.क्र./धुमपा/पापुवि/ ०८/२०२२-२३ दि.०६/०४/२०२२ अन्वये दि.०७/०४/२०२२ रोजी दैनिक लोकमत / पथदर्शी या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.२९/०४/२०२२ रोजी निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे /ठेकेदराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| १ | एकविरा कन्सट्रक्शन | शे.२%जास्तीने | |
| २. | ऋषभ सतीष खिवसरा | शे.३% जास्तीने | |
| ३. | हिंद कन्सट्रक्शन | शे.२% कमीने | सर्वात कमी दर |

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **मे.हिंद कन्सट्रक्शन** यांचे दर **शे.२% कमीने** आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम धरलेली आहे. सबब कंत्राटदार **मे. हिंद कन्सट्रक्शन** यांची **शे.२% कमीने** दराने आलेले निविदा दरास मे.स्थायी समिती पुढे ठेवणेस मंजुरीस्तव तसेच अन्य काम न मिळालेले ठेकेदार त्यांची बयाना रक्कम परत करणे बाबत मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी कंत्राटदार **मे. हिंद कन्सट्रक्शन** यांची **शे.२% कमीने** आलेले निविदा दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री. हर्षकुमार राधेशाम रेलन

अनुमोदक :- श्री. नरेंद्र रुपला चौधरी **सर्वानुमते मंजुर,**

सही/-X X X

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- ९३ — धुळे मनपा हद्दीत नगरोत्थान योजने अंतर्गत जय मल्हार नगर डॉ. मोरे ते हारपे ते सोनवणे घर ते वाणी शेठ घरापावेतो रस्ता कॉंक्रीट करणेचे निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. किरण अहिरराव — विषय मंजूर करण्यांतयावा.

म. बन्सीलाल जाधव — विषय मंजूर करण्यांतयावा.

म.सभापती — **सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.**

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ९७ दिनांक ०२/०६/२०२२**

धुळे मनपा हद्दीत नगरोत्थान योजने अंतर्गत जय मल्हार नगर डॉ. मोरे ते हारपे ते सोनवणे घर ते वाणी शेठ घरापावेतो रस्ता कॉंक्रीट करणे कामास धुळे महानगर पालिका ठराव नं. ७३ दि.२७/०१/२०२२ अन्वये म. जिल्हाधिकारी , धुळे यांनी दि. २३/०३/२०२२ अन्वये उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु.३९,७८,९३२/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./८९६ दि.१४/०३/२०२२ अन्वये रक्कम रु.३९,७८,९३२/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत या धुळे महानगरपालिका जा.क्र./धुमपा/पापुवि/ ०८/२०२२-२३ दि.०६/०४/२०२२ अन्वये दि.०७/०४/२०२२ रोजी दैनिक लोकमत / पथदर्शी या वृत्तपत्रात

जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.२९/०४/२०२२ रोजी निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे /ठेकेदराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | एकविरा कन्सट्रक्शन | शे.२%जास्तीने | |
| २. | ऋषभ सतीष खिवसरा | शे.३% जास्तीने | |
| ३. | हिंद कन्सट्रक्शन | शे.९% कमीने | सर्वात कमी दर |

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **मे.हिंद कन्सट्रक्शन** यांचे दर **शे.९% कमीने** आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार **मे. हिंद कन्सट्रक्शन** यांची **शे.९% कमीने** दराने आलेले निविदा दरास मे.स्थायी समिती पुढे ठेवणेस मंजुरीस्तव तसेच अन्य काम न मिळालेले ठेकेदार त्यांची बयाना रक्कम परत करणे बाबत मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी कंत्राटदार **मे. हिंद कन्सट्रक्शन** यांची **शे. ९ % कमीने** आलेले निविदा दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री. अहिरराव किरण हरिश्चंद्र

अनुमोदक :- श्री. जाधव बन्सीलाल माणिक **सर्वानुमते मंजुर,**

सही/-X X X

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- ९४ — धुळे मनपा हद्दीत नगरोत्थान योजने अंतर्गत शर्मा नगर ते प्लॉट नं. १०१ ते वाघ ते जे.बी. मोरे ते प्लॉट नं. १४९ ते कैलास नगर बोर्ड ते राजेंद्र पाटील घरापावेतो रस्ता डांबरीकरण करणेचे निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. किरण कुलेवार — विषय मंजूर करण्यांतयावा.

म. प्रतिभाताई चौधरी — विषय मंजूर करण्यांतयावा.

म.सभापती — **सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.**

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ९८ दिनांक ०२/०६/२०२२**

धुळे मनपा हद्दीत नगरोत्थान योजने अंतर्गत शर्मा नगर ते प्लॉट नं. १०१ ते वाघ ते जे.बी. मोरे ते प्लॉट नं. १४९ ते कैलास नगर बोर्ड ते राजेंद्र पाटील घरापावेतो रस्ता डांबरीकरण करणे कामास धुळे महानगर पालिका ठराव नं. ७३ दि.२७/०१/२०२२ अन्वये म. जिल्हाधिकारी , धुळे यांनी दि.२३/०३/२०२२ अन्वये उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु.३९,४९,२७२/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबावत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./८९८ दि.१४/०३/२०२२ अन्वये रक्कम रु.३९,४९,२७२/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत या धुळे महानगरपालिका जा.क्र./धुमपा/पापुवि/ ०८/२०२२-२३ दि.०६/०४/२०२२ अन्वये दि.०७/०४/२०२२ रोजी दैनिक लोकमत / पथदर्शी या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.२९/०४/२०२२ रोजी निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे /ठेकेदराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | राधेय कन्सट्रक्शन | शे.१% कमीने | सर्वात कमी दर |
| २. | श्री स्वामी समर्थ कन्सट्रक्शन | शे.२% जास्तीने | |
| ३. | आशिष एम. पटवारी | शे.४% जास्तीने | |

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **मे.राधेय कन्सट्रक्शन** यांचे दर **शे.१% कमीने** आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार **मे. राधेय कन्सट्रक्शन** यांची **शे.१% कमीने** दराने आलेले निविदा दरास मे.स्थायी समिती पुढे ठेवणेस मंजुरीस्तव तसेच अन्य काम न मिळालेले ठेकेदार त्यांची बयाना रक्कम परत करणे बाबत मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी कंत्राटदार **मे.राधेय कन्सट्रक्शन** यांची **शे.१% कमीने** आलेले निविदा दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्रीमती कुलेवार किरण राकेश

अनुमोदक :- श्रीमती. चौधरी प्रतिभाताई शिवाजीराव **सर्वानुमते मंजुर,**

सही/-X X X

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांकः-९५ मुलभूत सोईसुविधांचा विकास कार्यक्रम अंतर्गत सन २०२०-२१ प्र.क्र.३ मध्ये विटाभट्टी व लाला सरदार नगर भागात रस्ता कॉंक्रीट व गटार करणे तसेच पथदिवे बसविणे(एल.ई.डी. दिवे वगळून) बाबत निविदा दर मागविण्यांत आलेत,त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. किरण अहिरराव — विषय मंजूर करण्यांतयावा.

म. प्रतिभाताई चौधरी — विषय मंजूर करण्यांतयावा.

म.सभापती — **सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.**

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ९९ दिनांक ०२/०६/२०२२**

मुलभूत सोईसुविधांचा विकास कार्यक्रम अंतर्गत सन २०२०-२१ प्र.क्र.३ मध्ये विटाभट्टी व लाला सरदार नगर भागात रस्ता कॉंक्रीट व गटार करणे तसेच पथदिवे बसविणे (एल.ई.डी. दिवे वगळून) बाबतच्या कामास धुळे महानगरपालिका मे.स्थायी समिती ठराव नं.- दि. / /२० अन्वये मंजुरी दिलेली आहे. तसेच मा.जिल्हाधिकारी सो. धुळे महानगरपालिका

यांनी टिपणी मंजुरीने दि.१०/०३/२०२२ अन्वये उक्त कामाबाबत रक्कम रु.३९,५६,३१४/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे सुधारित पत्र क्र./ ७४४/२० दि. २८/०२/२०२२ अन्वये रक्कम रु. ३९,५६,३१४/-मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./धुमपा/पा.पु.वि./१४८०/२० दि. १४/०३/२०२२ रोजी दैनिक पुण्य नगरी या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.०१/०४/२०२२ पर्यंत निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेली आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदार किंवा ठेकेदाराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | श्री.अक्षय धनराज माखिजा | शे.-१.३००% कमीने | |
| २ | अ.के.सैफी | शे.१.०० % जास्त | |
| ३ | **शेख मोईनोद्दीन अजीमोद्दिन** | **शे.-२.२१० % कमी** | **सर्वात कमी दर** |
| ४ | मे.गायत्री कन्सट्रक्शन | शे.२.०० % जास्त | |

सदर तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता **शेख मोईनोद्दीन अजीमोद्दिन** यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे ३९,५६,३१४/-इतक्या रक्कमेचे असून **शे.-२.२१० % कमी** दराने आहे.

सदर निविदा धारकांचे निविदा दर हे **शे.-२.२१०%कमी** दराने असल्याने सर्व निविदा समिती सदस्यांनी सदर निविदा धारकांचे दर स्वीकारण्यास मा.आयुक्त सो.यांना शिफारस करण्यावर एकमत झाले.

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **शेख मोईनोद्दीन अजीमोद्दिन** यांचे दर **शे.-२.२१०% कमी** आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे.सबब कंत्राटदार **शेख मोईनोद्दीन अजीमोद्दिन** यांची **शे.-२.२१०%कमी** दराने आलेले निविदा दर मंजुरीस्तव सादर. तसेच अन्य काम न मिळालेले ठेकेदारांना त्यांची बयाणा रक्कम परत करणे बाबत मंजुरीस्तव मे.स्थायी समिती समोर सादर झालेला आहे.

सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी कंत्राटदार **शेख मोईनोद्दीन अजीमोद्दिन** यांची **शे. -२.२१० % कमीने** आलेले निविदा दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री. अहिरराव किरण हरिश्चंद्र

अनुमोदक :- श्रीमती. चौधरी प्रतिभाताई शिवाजीराव

**सर्वानुमते मंजुर,**

सही/-X X X

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

# धुळे महानगरपालिका,धुळे

## नगरसचिव कार्यालय

## स्थायी समिती सभा क्रमांक १६ चे इतिवृत्त

---

**धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह, धुळे**
**शुक्रवार दिनांक १०/०६/२०२२**
**वेळ दुपारी ४-०० वाजतां**

धुळे महानगरपालिकेची स्थायी समितीची साप्ताहिक सभा क्रं.१६ आज शुक्रवार दिनांक१०/**०६/२०२२**रोजी दुपारी ४.०० वाजतां **श्री.शितल मोहन नवले,सभापती,** स्थायी समिती,मनपा धुळे यांच्याअध्यक्षतेखाली **धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह** भरली. या ऑन लाईन सभेस खालील सन्मा.सदस्य हजर होते.

| अ.क्रं. | सदस्यांचे नांव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री.नवले शितल मोहन | सभापती |
| २ | श्री. जाधव संजय सुधाकर | सदस्य |
| ३ | श्री. बोरसे नागसेन दामोदर | सदस्य |
| ४ | श्रीमती कुलेवार किरण राकेश | सदस्या |
| ५ | श्री.जाधव बन्सीलाल माणिक | सदस्या |
| ६ | श्रीमती चौधरी मंगला अर्जुन | सदस्या |
| ७ | श्री.अन्सारी फातमा नुरुल अमीन | सदस्या |
| ८ | श्री.चौधरी नरेंद्र रुपला | सदस्य |
| ९ | श्रीमती.चौधरी प्रतिभा शिवाजीराव | सदस्या |
| १० | श्री. अहिरराव किरण हरिश्चंद्र | सदस्य |
| ११ | श्री. रेलन हर्षकुमार राधेश्याम | सदस्य |
| १२ | श्री.अन्सारी अब्दुल लतीफ अब्दुल हमीद | सदस्य |
| १३ | श्री.खान मोहम्मद साबीर मुहिबुल्लाह | सदस्य |
| १४ | श्रीमती पठाण नाजियाबानो नासिर खा | सदस्या |

उपस्थित अधिकारी गण

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्रीमती शिल्पा नाईक | उपायुक्त |
| २ | डॉ. श्रीमती संगिता नांदुरकर | उपायुक्त |
| ३ | श्रीमती पल्लवी शिरसाठ | कर मूल्य निर्धारण अधिकारी |
| ४ | श्री. मनोज अरविंद वाघ | नगरसचिव |
| ५ | श्री. गजानन पाटील | मुख्य लेखाधिकारी |
| ६ | श्री. के. एन. शिंदे | अभियंता |
| ७ | डॉ. एम.आर शेख | प्र.आरोग्याधिकारी |
| ८ | श्री. चंद्रकांत जाधव | सहा. आरोग्याधिकारी |
| ९ | श्री. विकास साळवे | मलेरिया पर्यवेक्षक |

| | | |
|---|---|---|
| १० | श्री. चंद्रकांत मोरे | लेखापाल |
| ११ | श्रीबी.एस. रनाळकर | सहा. कर मूल्य निर्धारण अधिकारी |
| १२ | श्री. कमलेश सोनवणे | ओव्हरसिअर नगररचना विभाग |
| १३ | श्री.पी. डी. चव्हाण | ओव्हरसिअर बांधकाम विभाग |
| १४ | श्री. हेमंत पावटे | ओव्हरसिअर बांधकाम विभाग |
| १५ | श्री प्रकाश पवार | लिपीक आस्थापना विभाग |
| १६ | श्री. एन.के. बागुल | विद्युत अभियंता |
| १७ | श्री. किशोर सुडके | प्र.परवाना अधिक्षक तथा बाजार विभाग प्रमुख |
| १८ | श्री. महेंद्र सोनवणे | प्रशासन अधिकारी मनपा शि.मंडळ |
| १९ | श्री. प्रसाद जाधव | अतिक्रमण विभाग प्रमुख |
| २० | श्री. सुक्राम राऊत | वाहन विभाग |

मा. सभापती सन्मा.सदस्य मा.अति.आयुक्त सो. सर्व अधिकारी कर्मचारी व पत्रकार, छायाचित्रकर बांधव यांचे मी स्थायी समितीच्या बैठकीत स्वागत करतो.सभेचा कोरम पुर्ण झाला असुन नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरु करावे.

म. नगरसचिव वंदे् मातरम् या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

सन्मा.सदस्यांकडुन आलेली श्रध्दांजलीची यादी

**१**) स्थायी समिती सदस्य श्री. नागसेन दामोदर बोरसे यांच्या मातोश्री व माजी नगरसेविका इंदुबाई दामोदर बोरसे यांचे नुकतेच वृध्दापकाळाने दु:खद निधन झाले आहे. त्यांना आजच्या बैठकीत भावपूर्ण श्रध्दांजली समर्पित करण्यांत येवून तसा ठराव पारीत करण्यांत यावा.

सुचक :- श्री. शितल मोहन नवले, सभापती स्थायी समिती, मनपा धुळे

२) धुळे मनपाचे भारतीय जाता पार्टीचे विद्यमान नगरसेवक श्री नागसेनभाऊ बोरसे यांच्या मातोश्री माजी नगरसेविका मनपा धुळे बौध्दवासी श्रीमती इंदुबाई दामोदर बोरसे यांचे दि. ४/०६/२०२२ रोजी सकाळी ११.३०वाजतां अल्पशा आजाराने दु:खद निधन झाले आहे.बौध्दवासी श्रीमती इंदुबाई दामोदर बोरसे त्यांच्या नगरसेवक कार्यकाळात अनेक लोकपयोगी व सामाजिक कार्यात सहभागी झाल्या होत्या.

३) ज्येष्ठ वृत्त निवेदक प्रदीप बिडे यांचे ७ जून २०२२ रोजी मुंबईत वयाच्या ६८ व्या वर्षी दीर्घ आजाराने निधन झाले. प्रदीप भिडे हे एक प्रसिध्द मराठी वृत्तनिवेदक होते. मुंबई दूरदर्शनवर त्यांनी १९७४ पासून कृष्णधवल काळापासून सुमारे ३५ वर्षांहून अधिक काळ वृत्त निवेदन केले. सुरुवातीला त्यांनी दूरदर्शनच्या मुंबई केंद्रावरुन प्रसारीत होणा-या मराठी बातम्यांसाठी वृत्त निवेदक म्हणून काम केले. पुढे सहयाद्री वाहिनीच्या निर्मितीनंतर त्यांनी सहयाद्री वाहिनीसाठी वृत्तनिवेदनाचे काम केले. दूरदर्शनच्या बातम्यांचा चेहरा अशी अमीट ओळख असलेले भिडे आपला भारदस्त आवाज, सुस्पष्ट उच्चार आणि प्रसन्न व्यक्तीमहत्वामुळे लोकप्रिय होते. नमस्कार आजच्या ठळक बातम्या असा सर्वपरिचीत आवाज असणारे प्रदीप भिडे आज आपल्यात नाहीत.

वरील नावांचा श्रध्दांजलीठराव पारीत करण्यांत यावा ही नम्र विनंती.

सुचक :- **सौ. प्रतिभाताई शिवाजीराव चौधरी**

म. सभापती सन्मा. सदस्यांच्या यादीनुसार मान्यवरांना आजच्या बैठकीत भावपूर्ण श्रध्दांजली समर्पित करणेसाठी दोन मिनिटे मौन उभे रहावे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १०० दिनांक १०/०६/२०२२**

स्थायी समिती सदस्य श्री. नागसेन दामोदर बोरसे यांच्या मातोश्री व माजी नगरसेविका इंदुबाई दामोदर बोरसे यांचे नुकतेच वृध्दापकाळाने दु:खद निधन झाले आहे.

तसेच ज्येष्ठ वृत्त निवेदक प्रदीप बिडे यांचे ७ जून २०२२ रोजी मुंबईत वयाच्या ६८ व्या वर्षी दीर्घ आजाराने निधन झाले. प्रदीप भिडे हे एक प्रसिध्द मराठी वृत्तनिवेदक होते.

वरील मान्यवरांचे दु:खद निधनामुळे या सभेस अतीव दु:ख होत ही सभा त्यांचे कुटुंबियांचे दु:खात सहभागी असून मृत आत्म्यांस चिरशांती प्रदानार्थ दोन मिनिटे मौन उभे राहून भावपूर्ण श्रध्दाजली समर्पित करण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

**सन्मा.सदस्यांकडून आलेली अभिनंदनाची यादी**

श्री.अग्रवाल समाज धुळे तर्फे आयोजित महाराष्ट्र राज्य अग्रवाल संमेलन अग्र महाकुंभ २०२२ यात धुळे भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ नेते आमचे मार्गदर्शक, उद्योगपती दादासाहेब श्री. ओमप्रकाश पुरणमलजी अग्रवाल यांना दिनांक ५/६/२०२२ रोजी अग्रविभुषण पुरस्कार देऊन सन्मानीत करण्यात आले. सदर पुरस्कार हा दादासाहेब श्री.ओमप्रकाश पुरणमलजी अग्रवाल यांच्या सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, सहकार, धार्मिक क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल देण्यांत आला.दादासाहेब श्री. ओमप्रकाश पुरमलजी अग्रवाल हे धुळे महानगर भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष भैय्यासो श्री. अनुपजी अग्रवाल यांचे वडील आहेत.

वरील नावांचा अभिनंदन ठराव पारीत करण्यांत यावा ही विनंती.

सुचक:- सौ. प्रतिभाताई शिवाजीराव चौधरी

म. सभापती सन्मा. सदस्यांच्या यादीनुसार अभिनंदनाचा ठराव पारीत करण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १०१ दिनांक १०/०६/२०२२**

सन्मा.सदस्यांच्या यादीनुसार श्री. अग्रवाल समाज धुळे तर्फे आयोजित महाराष्ट्र राज्य अग्रवाल संमेलन अग्र महाकुंभ २०२२ यात धुळे भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ नेते आमचे मार्गदर्शक, उद्योगपती दादासाहेब श्री.ओमप्रकाश पुरणमलजी अग्रवाल यांना दिनांक ५/६/२०२२ रोजी अग्रविभुषण पुरस्कार देऊन सन्मानीत करण्यात आले. सदर पुरस्कार हा दादासाहेब श्री. ओमप्रकाश पुरणमलजी अग्रवाल यांच्या सामाजिक,शैक्षणिक, राजकीय, सहकार,धार्मिक क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल देण्यांत आला. दादासाहेब श्री.ओमप्रकाश पुरमलजी अग्रवाल हे धुळे महानगर भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष भैय्यासो श्री.अनुपजी अग्रवाल यांचे वडील आहेत.

वरील प्रमाणे उद्योगपती दादासाहेब श्री.ओमप्रकाश पुरणमलजी अग्रवाल यांना अग्रविभुषण पुरस्काराने सन्मानित केल्यानुसार त्यांचा धुळे महानगरपालिकेच्या वतीने अभिनंदनाचा ठराव पारीत करण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक :- ९६ मागील स्थायी समिती सभांचे इतिवृत्त क्रमश: वाचून कायम करणे. (दि.२६/५/२०२२)

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.हर्षकुमार रेलन इतिवृत्त वाचून कायम करण्यांत यावे.

म. बन्सी जाधव इतिवृत्त वाचून कायम करण्यांत यावे.

म. सभापती — सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने मागील स्थायी समिती सभेचे इतिवृत्त क्रमश:वाचून कायम करण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १०२ दिनांक १०/०६/२०२२**

मागील स्थायी समिती सभा दिनांक २६/५/२०२२ च्या सभेतील स्थायी समिती ठराव नंबर ८५ ते ९२ अखेर तसेच सभेत झालेली चर्चा व त्यावरील निर्णय क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक :- ९७ — महानगरपालिका नंदीरोड दवाखाना येथे कार्यरत वैदयकीय कर्मचा-यांना ६ महिने मुदतवाढ देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.खान मोहम्मद साबीर — विषय मंजूर करण्यांत यावा.

म.बन्सीलाल जाधव — विषय मंजूर करण्यांत यावा.

म.सभापती — सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कायार्लयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १०३ दिनांक १०/०६/२०२२**

धुळे महानगरपालिका धुळे नंदीरोड दवाखाना सुरु करणेकामी औषध निर्माता २, स्टॉफ नर्स ३, एएनएम ८,दाई २अशी पदे एकत्रित मानधनावरील कर्मचा-यांना ०६ महिने कालावधीसाठी मुदतवाढ देण्याबाबत ठराव पारित झालेला आहे.

त्याअनुषंगाने खालील ०१ ते १५ मानधनावरील कर्मचारी यांना ०६ महिनेकरीता एकत्रित मानधनावर नियुक्ती देण्यात आलेली होती. सदर मानधनावरील कर्मचारी यांची दि १६/४/२०२२ रोजी नियुक्तीची मुदत संपुष्ठात आलेली आहे.

| अ क्र | कर्मचा-याचे नाव | हुददा | मुदत संपुष्ठातआल्याचा दिनांक | मानधन रुपये |
|---|---|---|---|---|
| १ | श्री अन्सरी अन्वरुल फारकान हुसैन | औषध निर्माता | १६/०४/२०२२ | १२२०० |
| २ | प्रियंका वैभवकुमार जगताप | औषधनिर्माता | १६/०४/२०२२ | १२२०० |
| ३ | रिबीका गोविंद वळवी | स्टाफ नर्स | १६/०४/२०२२ | १५७५० |
| ४ | कृनिका संजय वाघमारे | स्टाफ नर्स | १६/०४/२०२२ | १५७५० |
| ५ | दिपाली हिलाल गर्दे | स्टाफ नर्स | १६/०४/२०२२ | १५७५० |
| ७ | मिरा माकल्या राहसे | ए एन एन | १६/०४/२०२२ | १२००० |
| ८ | वंदना पुरुषोत्त्म निकम | ए एन एन | १६/०४/२०२२ | १२००० |
| ९ | प्रतिभा किशोर सोनवणे | ए एन एन | १६/०४/२०२२ | १२००० |
| १० | शारदा दिपक वाघ | ए एन एन | १६/०४/२०२२ | १२००० |
| ११ | कविता युवराज भोई | ए एन एन | १६/०४/२०२२ | १२००० |
| १२ | सोनिया अशोक तपासे | ए एन एन | १६/०४/२०२२ | १२००० |
| १३ | मनिषा दिलीप गायकवाढ | ए एन एन | १६/०४/२०२२ | १२००० |
| १४ | लता किसन गवळी | दाई | १६/०४/२०२२ | ८००० |
| १५ | सुरेखा रविंद्र वाडेकर | दाई | १६/०४/२०२२ | ८००० |

उक्त ०१ ते १५ मानधनावरील कर्मचारी यांनी ०६ महिनेकरीता पुन:श्च मुदतवाढ मिळणेबाबत विनंती केलेली आहे.त्याअनुषंगाने संदर्भीय क्र.४अन्वये संबंधीत दवाखान्यातील वैदयकीय अधिकारी यांनी उक्त कर्मचारी यांच्या कामाबाबतचा अहवाल सादर केला आहे. त्यानुसार त्यांचे काम समाधानकारक आहे.

तरी संबंधीत दवाखान्यातील वैदयकीय अधिकारी यांच्या अहवालानुसार व नंदीरोड दवाखान्यामध्ये कर्मचा-यांच्या कामाची निकड पाहता मुदत संपल्याच्या दिनांकापासून ०५ दिवसाची सेवा खंडीत करून करार पध्दतीने एकत्रित मासिक मानधनानुसार पुढील ०६ महिने कालावधीकरीता मुदतवाढ देणेबाबतचा विषय महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३ (३) नुसार मे. स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून नंदीरोड दवाखान्यामधील १ ते १५ कर्मचा-यांच्या कामाची निकड पाहता मुदत संपल्याच्या दिनांकापासून ०५ दिवसाची सेवा खंडीत करून करार पध्दतीने एकत्रित मासिक मानधनानुसार पुढील ०६ महिने कालावधीकरीता मुदतवाढ देणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३ (३) नुसार मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री.खान मोहम्मद साबीर मुहिबुल्लाह

अनुमोदक :- सौ. चौधरी प्रतिभाताई शिवाजीराव

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक :- ९८ — धुळे मनपा हद्दीतील नाले सफाईचे काम अत्यावश्यक व तांतडीचे असल्याने मनपा मार्फत विना निविदा कोटेशन पध्दतीने दर मागवून करण्यांत येत असून त्याकामी होणा-या खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबत विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.प्रतिभाताई चौधरी — नाले साफसफाई झाली पण त्याचे गाळ,कचरा तसाच ठेवला आहे. पावसाळयात परत तो गाळ नाल्यात जाईल.

म.सभापती — श्री जाधव तातडीने गाळ उचलण्याची व्यवस्था करावी.

म. हर्षकुमार रेलन — विना निविदा दरमंजूरी करता हा विषय आला आहे. दरवर्षी आपल्याला नाले सफाईचे काम करावे लागते. मग वेळेवर निविदा का काढली जात नाही? तातडीचा विषय म्हणून का समोर आणण्यात आला? मागच्या दोन वर्षी पण हा विषय तातडीचा होता. ३ वर्षापासून हा विषय तातडीचा का होतोय? हा नियमित विषय आहे हे अगोदर का होत नाही? वेळेवर का निविदा काढल्या जात नाही?

म.सभापती — यात आपण निविदा काढल्या होत्या, एकही निविदा धारकाने टेंडर भरले नाही. पावसाळा तोंडावर होता त्यामुळे आपण दर मागवून काम चालू केले. निविदा मागवल्या पण एकही स्पर्धकाने त्या निविदेत भाग नाही घेतला.

म.हर्षकुमार रेलन — त्या निविदेचा दर योग्य आहे का?

म.सभापती — योग्य आहे.

म.हर्षकुमार रेलन — मी पत्र दिले होते. आमच्या भागात शितल कॉलनी,गणेश कॉलनी मध्ये नाला दरवर्षी भरुन जातो आणि लोकांच्या घरात पाणी शिरते. मी त्यांना सांगीतले होते वेळेपूर्वी याची साफसफाई करुन घ्या पण ती साफ सफाई झालेली नाही. माझी विनंती आहे. ती सफाई वेळेच्या पूर्वी करुन घ्यावी.

म. प्रतिभाताई चौधरी — आमच्या प्रभागात नाला आहे. चिरंतन हॉस्पीटल पासून ते उत्तरमुखी मारुती मंदीरा पर्यंत तो वाहत सुशी नाल्याकडे जातो. मी सकाळी पाहणी केली चिरंतन हॉस्पिटल जवळ साफ झाला आहे. पूर्ण नाल्याची सफाई का करण्यात आली नाही? अशी विचारणा केलयावर सांगण्यात आले की, जे.सी.बी. उपलब्ध होत नाही आहे. जे.सी.बी मिळाल्यावर पूर्ण नाल्याची सफाई करु. मागच्या वर्षी उत्तरमुखी मंदीराजवळ नाल्याला पुर आला तिथे हिंदु-मुस्लीम समाजाचे बांधव राहतात त्यांच्या घरात पाणी शिरले होते. आता सुध्दा नाल्याची सफाई झाल्यावर गाळ उचलण्यात येत नाही. गाळ हा वेळेवर उचलला गेला पाहिजे साफसफाई पूर्ण झाली पाहिजे. काम हे पूर्ण झालेले पाहिजे. प्रशासनाचा हा हलगर्जीपणा आहे. यांच्यावर कार्यवाही का होत नाही?

म.सभापती — तो काम करत नसेल तर पत्र द्या आपण त्यावर कार्यवाही करु.सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कायार्लयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १०४ दिनांक १०/०६/२०२२**

धुळे महानगरपालिका हद्दीतील नैसर्गिक नाले सफाई करणे बाबत व त्यातुन निघणारा गाळ, कचरा व राडारोडा इ. वाहतुक करण्याकामी ई-निविदा सुचना क्र.१९ प्रसिध्द करण्यात आली होती. सदर निविदेत कोणीही सहभाग न घेतल्यामुळे पावसाळ्यापुर्वी शहरातील नाले सफाई करणे गरजेचे असल्याने व पावसाळ्याचे दिवस जवळ आल्याने नाले सफाई करणे आवश्यक असल्यामुळे व फेर ई-निविदा करण्यास उशिर होणार असल्यामुळे मा.आयुक्त सो. यांनी दिलेल्या निर्देशानुसार शहरातील सर्व नैसर्गिक नाल्यांची जेसीबी व पोकलेन मशिनद्वारे सफाई करणेकामी तातडीने विना निविदा उक्त संदर्भ क्र.१ अन्वये प्रति तासाचे दर सादर करणे बाबत जाहिर कोटेशन प्रसिध्द करण्यात आले होते.

त्याअनुषंगाने सदर जाहिर कोटेशन नुसार श्री.पवन नंदलाल अजळकर यांचे खालील प्रमाणे प्रति तासाचे दर सादर केले होते.

१) १ जेसीबी मशिन प्रती तास:- रु.११००/-

२) १ पोकलेन मशिन प्रती तास :- रु.२२००/-

तरी श्री. अजळकर यांना मा.अति.आयुक्तसो.यांच्या दालनात वाटाघाटी करीता समक्ष बोलविले असता त्यांनी सादर केलेल्या दरानुसार रु.२०/-कमी केल्याने खालील प्रमाणे दर देण्यात आले आहेत.

१) १ जेसीबी मशिन प्रती तास :- रु.१०८०/-

२) १ पोकलेन मशिन प्रती तास:- रु.२१८०/-

त्याअनुषंगाने श्री.पवन नंदलाल अजळकर यांना दि.२७/५/२०२२ पासुन १ महिन्याकरीता २ जेसीबी मशिन व १ पोकलॅन्ड मशिन लावणे बाबत उक्त संदर्भ क्र.२ नुसार कार्यादेश देण्यात आला आहे. त्यानुसार खालील प्रमाणे खर्च अपेक्षीत आहे.

| अ.क्र. | तपशिल | एकुण संख्या | एकुण कामाचे तास प्रती दिवस प्रमाणे | दर प्रती मशिन प्रती तास | एका दिवसाचा खर्च | ३० दिवसांचा एकुण खर्च |
|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | जेसीबी मशिन | २ | १४ | १०८० | १५१२० | ४५३६०० |
| २ | पोकलेन मशिन | १ | ७ | २१८० | १५२६० | ४५७८०० |
| **एकुण खर्च :-** | | | | | | **९११४००** |

तरी उक्त कामाकरीता १ महिन्यासाठी रु.९,११,४००/- खर्च होणार असुन सदरचे काम हे तातडीचे व अत्यावश्यक असल्यामुळे विना निविदा कोटेशन पध्दतीने दर सादर करण्यात आले असुन त्याकामी होणाऱ्या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ६७(क) अन्वये मे.स्थायी समितीपुढे कार्योत्तर मान्यतेकरीता निर्णयार्थ सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी नाले सफाईकामी लावण्यांत आलेले जे.सी.बी. मशिन व पोकलॅन्ड मशिन भाडे तत्वावर लावण्यांस व त्यासाठी १ महिन्यासाठी झालेला खर्च रु.९,११,४००/-मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७(क) अन्वये कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबावतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री.किरण हरिश्चंद्र अहिरराव
अनुमोदक :- श्री. नरेंद्र रुपला चौधरी

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक :- ९९ — जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२१-२२ अंतर्गत धुळे मनपा क्षेत्रातील नगर भूमापन क्रमांक 12721 स.नं.444/1 अ येथील शासकीय जमिनीवर संरक्षण भिंत बांधणेच्या कामाचे निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर फेर विचार करणे..

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.
म.किरण अहिरराव — विषय मंजुर करण्यांत यावा.
म.नरेंद्र चौधरी — विषय मंजुर करण्यांत यावा.
म.सभापती — सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कायार्लयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १०५ दिनांक १०/०६/२०२२**

जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२१-२२ अंतर्गत धुळे मनपा क्षेत्रातील नगर भूमापन क्रमांक १२७२१ स.नं.४४४/१ अ येथील शासकीय जमिनीवर संरक्षण भिंत बांधणे बाबतच्या कामास धुळे महानगरपालिका मे.स्थायी समिती ठराव नं.----दि. / /२० अन्वये मंजुरी दिलेली आहे. तसेच मा.जिल्हाधिकारी सो. धुळे महानगरपालिका यांनी टिपणी मंजुरीने दि.३०/०३/२०२२ अन्वये उक्त कामाबाबत रक्कम रु.५९,९९,९४४/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे सुधारित पत्र क्र./ १०५२/२० दि२२/०३/२०२२अन्वये रक्कम रु.५९,९९,९४४/-मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./धुमपा/पा.पु.वि./०१/२० दि. ०१/०४/२०२२ रोजी दैनिक समाज सारथी/सकाळ या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत

येऊन दि.२५/०४/२०२२ पर्यंत निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेली आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदार किंवा ठेकेदाराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | यासीन अब्दुल जुबेर शेख | **अंदाजपत्रकीय दराने** | **सर्वात कमी दर** |
| २ | मे.रामेश्वर ट्रेडर्स | शे.२.००% जास्त | |
| ३ | मे.एकविरा कन्सट्रक्शन | शे.३.०० % जास्त | |

सदर तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता **यासीन अब्दुल जुबेर शेख** यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे ५९,९९,९४४/-इतक्या रक्कमेचे असून **अंदाजपत्रक** दराने आहे.

सदर निविदा धारकांचे निविदा दर हे **अंदाजपत्रक** दराने असल्याने सर्व निविदा समिती सदस्यांनी सदर निविदा धारकांचे दर स्वीकारण्यास मा.आयुक्त सो. यांना शिफारस करण्यावर एकमत झाले.

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **यासीन अब्दुल जुबेर शेख** यांचे दर **अंदाजपत्रकीय** आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार **यासीन अब्दुल जुबेर शेख** यांची **अंदाजपत्रकीय** दराने आलेले निविदा दर मंजुरीस्तव सादर. तसेच अन्य काम न मिळालेले ठेकेदारांना त्यांची बयाणा रक्कम परत करणे बाबत मंजुरीस्तव मे.स्थायी समिती समोर फेर सादर झालेला आहे.

**सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी** कंत्राटदार **यासीन अब्दुल जुबेर शेख** यांचे **अंदाजपत्रकीय** दराने आलेले निविदा दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री. किरण हरिश्चंद्र अहिरराव
अनुमोदक :- श्री. नरेंद्र रुपला चौधरी

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

**विषय क्रमांक:-१००** मुलभुत सोई सुविधांचा विकास कार्यक्रम अंतर्गत सन २०२०-२१ मेहबूब सुभानी दर्गा येथे पिण्याची पाण्याची सोय करणे, नागरिकांसाठी पायऱ्या करणे तसेच पथदिवे लावणे तसेच अंजन शाह दर्गा येथे पटांगणात रस्ते कॉंक्रीट करणे व वॉल कंपाऊंड करणेबाबत निविदा दर मतागविण्यांत आलेत, त्याबावत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.नाजियाबानो पठाण — विषय मंजूर करण्यांत यावा.

म.फातमाबी अन्सारी — विषय मंजूर करण्यांत यावा.

म.सभापती — सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कायालर्यीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १०६ दिनांक १०/०६/२०२२**

मुलभूत सोईसुविधांचा विकास कार्यक्रम अंतर्गत सन २०२०-२१ मेहबूब सुभानी दर्गा येथे पिण्याची पाण्याची सोय करणे,नागरिकांसाठी पायऱ्या करणे तसेच पथदिवे लावणे तसेच

अंजन शाह दर्गा येथे पटांगणात रस्ते कॉंक्रीट करणे व वॉल कंपाऊंड करणे बाबतच्या कामास धुळे महानगरपालिका मे.स्थायी समिती ठराव नं.-- दि. / /२० अन्वये मंजुरी दिलेली आहे. तसेच म.अव्वर सचिव,महाराष्ट्र शासन यांचे दि.२३फेब्रुवारी२०२२अन्वये उक्त कामाबाबत रक्कम रु.१,८०,००,०००/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे सुधारित पत्र क्र./ ७०३/२० दि.१४/०२/२०२२ अन्वये रक्कम रु. १,७९,९३,८१६/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./धुमपा/बा.वि./२६९/२० दि. १६/०३/२०२२ रोजी दैनिक दिव्य मराठी/मर्डर या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.१८/०४/२०२२ पर्यंत निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेली आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदार किंवा ठेकेदाराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | श्री.मिलिंद मुडावदकर | शे.२ % जास्त | |
| २ | **श्री.एस.बी.देशमुख** | **अंदाजपत्रकीय दराने** | **सर्वात कमी दर** |
| ३ | श्री.जयप्रकाश महाले | शे.३.०० %जास्त | |

सदर तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता **श्री. एस. बी. देशमुख** यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे १,७९,९३,८१६/- इतक्या रक्कमेचे असून **अंदाजपत्रक** दराने आहे.

सदर निविदा धारकांचे निविदा दर हे**अंदाजपत्रक**दराने असल्याने सर्व निविदा समिती सदस्यांनी सदर निविदा धारकांचे दर स्वीकारण्यास मा.आयुक्त सो. यांना शिफारस करण्यावर एकमत झाले.

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **श्री. एस. बी. देशमुख** यांचे दर **अंदाजपत्रक** आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार **श्री.एस.बी.देशमुख** यांची **अंदाजपत्रक** दराने आलेले निविदा दर मंजुरीस्तव सादर. तसेच अन्य काम न मिळालेले ठेकेदारांना त्यांची बयाणा रक्कम परत करणे बाबत तसेच सदर प्रकरण दर मंजुरीकरीता मे.स्थायी समिती समोर सादर करणे मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी कंत्राटदार **श्री. एस. बी. देशमुख** यांची **अंदाजपत्रक** दराने आलेले निविदा दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्रीमती पठाण नाजियाबानो नासिरखॉं
अनुमोदक :- श्रीमती अन्सारी फातमाबी नुरुल अमीन

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-१०१ स्वच्छ भारत अभियान नागरी अंतर्गत धुळे महानगरपालिका हद्दीतील वरखेडी रोड येथे ३० TPD क्षमतेचा बायोगॅस प्रकल्प उभारणे, १ वर्षापर्यंत चालविणे व तदनंतर ५ वर्षापर्यंत

देखभाल व दुरुस्ती करणे कामासाठी शासनाच्या दि. ०४/०६/२०१८ च्या मार्गदर्शक सूचनांनुसार सदर प्रकल्पासाठी प्रकल्प सल्लागार म्हणून ऑल इंडिया इन्स्टिटयूट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्न्मेंट ,पुणे यांची नियुक्ती कायम ठेवणेबाबत फेर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.हर्षकुमार रेलन — हा फार महत्वपूर्ण विषय आहे. आपल्याला विनंती आहे की, या विषयाची माहिती द्यावी.

म. अभियंता — महाराष्ट्र शासनाने धुळे शहराचा घनकचरा आराखडा मंजूर केलेला आहे. ऑल इंडीया इंस्टीटयुट यांना नेमणे बाबत निर्देश होते. या कामासाठी इस्टीमेट सुध्दा तयार केले होते. त्याप्रमाणे निविदा प्रसिध्द झाली होती. त्या निविदेत कोणीच क्वालीफाय झाले नव्हते सुधारित निविदा करण्याबाबत कळवले होते. या विषयाला मंजूरी देणे आवश्यक आहे.

म.हर्षकुमार रेलन — हे काम काय आहे ते सांगावे.

म.अभियंता — शहरातील ओला कचरा तो प्लँट होणार आहे त्या ठिकाणी आणून त्यापासून विजनिर्मिती होणार आहे.

म.संजय जाधव — विषय शहराच्या विकासाशी निगडीत आहे.परंतु ऑल इंडीया इंस्टीटयुट या संस्थेच्या बाबतीत आक्षेप आहे. मागच्या स्थायीच्या मिटींग मध्ये याच्यावर कार्यवाही करणे बाबत निर्णय झालेला होता काम असमाधान कारक होते आपण त्यांना महिन्याला २.५लाख रुपये व वर्षाकाठी ३० लाख रुपये देतो. त्या ठिकाणी रद्द करण्याचा ठराच आपण केलेला आहे.धुळे मनपा एवढी अकार्यक्षम नाही.ही योजना आपण स्वत:राबवू शकतो.शिंदे सो.सांगीतले शासन निर्देश आहे परंतु तो निर्णय आपल्याला घ्यायचा आहे. करावे की करु नये. सदर विषयाला माझा विरोध नोंदवून घ्यावा.या विषयाला वर्क ऑर्डर देऊ नये.

म.सभापती — आपला विरोध नोंदविण्यांत येत आहे. सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कायालर्यीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास बहुमताने मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १०७ दिनांक १०/०६/२०२२**

स्वच्छ भारत अभियान नागरी अंतर्गत धुळे महानगरपालिका हद्दीतील बरखेडी रोड येथे ३० TPD क्षमतेचा बायोगॅस प्रकल्प उभारणे,१ वर्षापर्यंत चालविणे व तदनंतर ५ वर्षापर्यंत देखभाल व दुरुस्ती करणे कामासाठी शासनाच्या दि.०४/०६/२०१८ च्या मार्गदर्शक सूचनांनुसार सदर प्रकल्पासाठी प्रकल्प सल्लागार म्हणून ऑल इंडिया इन्स्टिटयूट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्न्मेंट,पुणे यांची नेमणूक करण्यात आली होती.त्यानुसार उपरोक्त कामाची निविदा संच सदर संस्थेमार्फत तयार करण्यात आला होता.सध्यस्थितीत सदर कामाची ई-निविदा प्रक्रिया सुरु आहे.तथापि मे.स्थायी समिती ठराव नंबर २१६ दि.३१/०१/२०२२ नुसार सदर प्रकल्पाचे प्रकल्प सल्लागार ऑल इंडिया इन्स्टिटयूट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्न्मेंट,पुणे यांना धुळे मनपा मार्फत देण्यात आलेले कार्यादेश रद्द करावे व संस्थे कडुन काम काढून घेण्यात यावे.सदर संस्थेला कोणतेही देयक अदा करू नये असा ठराव पारीत करण्यात आला आहे.

सध्यस्थितीत मनपात तांत्रिक मनुष्यबळ कमी असून सदरचा प्रकल्प वेळेत पूर्ण करणे बाबत शासनाने आदेशित केले आहे. मनपात तांत्रिक मनुष्यबळ कमी असल्याने सदरचा प्रकल्प वेळेत पूर्ण करणे शक्य नाही.त्यामुळे प्रकल्प सल्लागार ऑल इंडिया इन्स्टिटयूट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्न्मेंट,पुणे यांच्या मार्फतच सदरचा प्रकल्प पूर्ण करणे आवश्यक आहे.त्यानुसार सदरचा विषय मे.स्थायी समिती समोर निर्णयार्थ सादर.

बायोगॅस प्लॉटसाठी pmc म्हणूनऑल इंडिया इन्स्टिटयुट ऑप लोकल सेल्फ गव्हमेंट यांची नेमणूक केली आहे. हा एक स्वतंत्र भाग आहे.

तसेच आरोग्य विभागातंर्गत स्वच्छ सर्व्हेक्षणGFC,Star Rating या कामामध्ये पोर्टल वर विविध माहिती भरणे city co ordinator यांना मदत करणे, सर्व्हेक्षणाचे वेळी मनपा वतीने Third paaaarty ला योग्य ती माहिती पुरवणे यासाठी सल्लागार म्हणून AIITLSG यांची नेमणूक करण्यांत आली होती. संस्थेचे वतीने २ प्रतिनिधी या कार्यालयात हजर राहून कामकाज करत होते. या संस्थेला १४ व्या वित्त आयोगातून मानधन अदा केले जात होते. परंतु स्थायी समिती ठराव नंबर २१६ दि. ३१/१/२०२२ नुसार सदर संस्थेकडून हे काम काढून घेण्यांत आले व त्याच दरम्यान १४ व्या वित्त आयोगाचा निधी देखील संपुष्टात आलेला आहे हा दुसरा भाग आहे.

प्रस्तावित टिपणीमध्ये तांत्रिक मनुष्यबळ कमी असल्याने या संस्थेमार्फत प्रकल्प पूर्ण करणे आवश्यक आहे असे नमूद केले आहे. परंतु बायोगॅस साठी pmc ही AIILSG आहेच व ते काम करतच आहे,पुन्हा ठराव घेणेबाबत प्रयोजन विभागाने स्पष्ट नमूद करणे आवश्यक होते. आरोग्य विभागास SS२०२२ साठीAIILSG ची आवश्यकता असल्यास त्यास निधीची तरतूद करावी लागेल व विहीत निविदा प्रक्रिया राबवावी लागेल. **यानुसार सदर प्रस्ताव मे. स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.**

**उक्त प्रस्ताव व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने** स्वच्छ भारत अभियान नागरी अंतर्गत धुळे महानगरपालिका हद्दीतील वरखेडी रोड येथे ३०TPD क्षमतेचा बायोगॅस प्रकल्प उभारणे, १ वर्षापर्यंत चालविणे व तदनंतर ५ वर्षापर्यंत देखभाल व दुरुस्ती करणे कामासाठी शासनाच्या दि. ०४/०६/२०१८ च्या मार्गदर्शक सूचनांनुसार सदर प्रकल्पासाठी प्रकल्प सल्लागार म्हणून ऑल इंडिया इन्स्टिटयूट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंट ,पुणे यांची नियुक्ती कायम ठेवणेस मान्यता देण्यात येत आहे. या प्रस्तावास सन्मा. सदस्य श्री. संजय सुधाकर जाधव यांनी विरोध नोंदविलेला असून सदर विरोधाची नोंद घेवून प्रस्तावास बहुमताने मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सूचक :- श्री. रेलन हर्षकुमार राध्येशाम

अनुमोदक:- श्री. अहिरराव किरण हरिश्चंद्र        बहुमताने मंजुर,

**सही/-x x x**

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-१०२ **स्वच्छ भारत योजनेअंतर्गत एम. एस. डब्ल्यू नियम २०१६ च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी यापूर्वी नियुक्त ऑल इंडिया इन्स्टयुटयूट ऑफ लोकल सेल्फ गव्हे.यांनी केलेल्या कामाचे देयके अदा करणे व यापूर्वी झालेल्या ठरावाबाबत पुर्नविचार करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.**

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.खान मोहम्मद साबीर — विषय मंजूर करण्यांत यावा.

म.नरेंद्र चौधरी — विषय मंजूर करण्यांत यावा.

म.संजय जाधव — या विषयासही माझा विरोध आहे. त्यांची नोंद घ्यावी.

म.सभापती — सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कायार्लयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास बहुमताने मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १०८ दिनांक १०/०६/२०२२**

स्वच्छ भारत अभियान अंतर्गत MSW नियम २०१६ च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सल्लागार नियुक्ती करुन मदत घेण्यात आली आहे.८ महिन्यासाठी अखिल भारतीय स्थानीक स्वराज्य संस्था यांना रु.२,५०,०००/-प्रती महिना उक्त कामासाठी ८ महिने कालावधी करीता कार्यादेश देण्या बाबत प्रस्तावास मान्यता देण्यात आली आहे.

धुळे मनपा स्थायी समिती ठराव क्र.७१ दि.२४/९/२०२० नुसार सदरचा खर्चास २५ लक्ष पेक्षा जास्त नसल्याने स्थायी समिती समोर अवलोकनार्थ सादर करण्यात आला असता त्यास उक्त ठरावानुसार मान्यता देण्यात आली आहे. जा.क्र./धुमपा/आरोग्य/३६३/२०-२१ दि.५/११/२०२० नुसार १ जुन ते ३१ जानेवारी २०२१ करीता प्रशासकीय मान्यता आदेश प्रदान करण्यात आला आहे.

अखिल भारतीय स्थानीक स्वराज्य संस्था नवी दिल्ली यांनी दि.१४/१/२०२१ रोजी ८ महिने (१ फेब्रुवारी ते ३० सप्टे.२०२१) करीता मुदतवाढ मिळणेसाठी प्रस्ताव सादर केला आहे. धुळे मनपा स्थायी समिती ठराव क्र.१४ दि. २५/३/२०२१ अन्वये अखिल भारतीय स्थानीक स्वराज्य संस्था यांना माहे फेब्रुवारी २०२१ ते सप्टेंबर २०२१ या कालावधीसाठी मुदतवाढ व येणाऱ्या संभाव्य खर्चास मान्यता देण्यात आली आहे. उक्त ठरावाच्या अनुषंगाने जा.क्र./धुमपा/आरोग्य/ ५९२/ २०-२१ दि.१०/३/२०२१ अन्वये (दि.२ फेब्रुवारी २०२१ ते ३१ सप्टेंबर २०२१) पर्यंत कार्यादेश देण्यात आला आहे.

जा.क्र./धुमपा/आरोग्य/५९३/२०-२१दि.१०/३/२०२१ अन्वये८ महिन्याकरीता रु.२०,००,०००/- (वीस लक्ष) मात्र १४ व्या वित्त आयोगाच्या प्राप्त निधीतुन प्रशासकीय मान्यता आदेश प्रदान करण्यात आलेला आहे.

स्थायी समिती सभा ठराव क्र. २१६ दिनांक ३१/१/२०२२ रोजी झालेल्या स्थायी समिती सभा विषय क्रमांक १९८ मा.सभापती सो. स्थायी समिती यांचे पत्रानुसार ऑल इंडीया इन्स्टीट्युट ऑफ लोकल सेल्फ गर्व्ह. या संस्थेकडील मनपा संदर्भातील कामकाज काढुन घेण्याबाबत सुचित केले आहे. त्याअनुषंगाने धुळे मनपा स्थायी समिती ठराव क्र.२१६ दिनांक दि.३१/१/२०२२ अन्वये ऑल इंडीया इन्स्टीट्युट ऑफ लोकल सेल्फ गर्व्ह. या संस्थेकडुन धुळे महानगरपालिकेचे कामकाज काढुन घेणे बाबत व देयक थांबविणे बाबत सदर विषय मे.स्थायी समिती समोर सादर झाला असता सदर संस्थेचा कार्यादेश रद्द करावे व संस्थेकडुन काम काढुन घ्यावे सदर संस्थेला देयक अदा करु नये असा ठराव पारीत करण्यात आला आहे.

विभागीय संचालक ऑल इंडीया इन्स्टीट्युट ऑफ लोकल सेल्फ गर्व्ह. नाशिक केंद्र यांनी दि.१५/५/२०२२ रोजी देयक मिळणे बाबत तसेच उक्त कामाचे कार्यादेश प्रमाणे धुळे महानगरपालिकेसाठी स्वच्छ सर्व्हेक्षण, ओ.डी.एफ., ओ.डी.एफ.++,जि.एफ.सी. या अभियानांमध्ये तांत्रिक सहाय्य पुरवुन पत्रात उल्लेख केल्याप्रमाणे उल्लेखनीय कामगीरी केलेली आहे. तसेच सदर संस्थेला मुदतवाढ देऊन कार्यादेश देण्यात आलेला नाही. मार्च २०२२ पासुन काम बंद आहे. ऑल इंडीया इन्स्टीट्युट ऑफ लोकल सेल्फ गर्व्ह. यांनी केलेल्या कामाचे माहे जुन,जुलै,ऑगस्ट व सप्टेंबर महिन्याचे देयक देणे बाकी आहे ते मिळावेत तसेच मुदत संपल्यापासुन पुढे २०२१-२२ व सन २०२२-२३ मध्ये काम करण्याची संधी देण्यात यावी असा प्रस्ताव सादर केलेला आहे.

तसेच ऑल इंडिया इन्सटीट्युट ऑफ लोकल सेल्फ गर्व्ह.यांच्या मुदतवाढीचा प्रस्तावानुसार दिनांक२५/११/२०२१ रोजी कार्यालयीन टिपणी सादर करण्यात आली आहे. उक्त प्रस्तावीत अहवालात दिलेल्या निर्देशानुसार स्वच्छ सर्व्हेक्षण २०२१ साठी काम करुन

घेणे आवश्यक असल्याने सदर संस्थेचे काम सुरुच ठेवण्यात आले होते. माहे ऑक्टों-२०२१ ते फेब्रुवारी-२०२२ पर्यंत सदर संस्था काम करीत होते.

सन २०२१-२०२२ च्या अर्थसंकल्पात घनकचरा निर्मुलन / तांत्रिक सल्लागार ह्या लेखा शिर्षाखाली रु.१० लक्ष मुळ अंदाज पत्रकात तरतुद करण्यात आली आहे. त्यातुन सदरचा खर्च स्पील ओव्हर मध्ये जाईल.

प्रस्तुत प्रकरणी ऑल इंडीया इंस्टीट्युट लोकल सेल्फ गर्व्ह. यांनी सन २०२१-२२ मध्ये माहे फेब्रुवारी -२०२१ ते ऑक्टोंबर-२०२१ पर्यंत कार्यादेशाप्रमाणे काम केले आहे. त्यापैकी जुन,जुलै, ऑग, सप्टें.-२०२१ या कालावधीचे देयक देणे बाकी आहे. सदर देयकासाठी १४ वा वित्त आयोगातुन प्रशासकीय मान्यता घेण्यात आली आहे.सदर विभागाने ऑक्टोंबर-२०२१ ते फेब्रुवारी - २०२२ पावेतो सदर संस्थेने काम केले असल्याबाबत विभागाने नमुद केले आहे. परंतु सदर कामाची प्रशासकीय मान्यता घेण्यात आलेली नाही. विभागाने सदर कालावधीत मुदतवाढ घेणे बाबत प्रस्तावीत केले असुन त्यासाठी प्र.मा.घेणे आवश्यक आहे. त्यानुसार सदर प्रस्ताव मे. स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

उक्त प्रस्ताव व सन्मा. सदस्यांनी केलेल्या चर्चेनुसार कार्यालयीन अहवालास अधिन राहून यापूर्वी झालेला स्थायी समिती ठराव क्रं २१६. दिनांक ३१/१/२०२२ ठराव रद्द करण्यांत येत असून ऑल इंडिया इटियुटयुट ऑफ लोकल सेल्फ गर्व्हे. यांच्या कामाची आवश्यकता पाहता संस्थेने यापूर्वी केलेल्या कामाची खातर जमा करुन काम समाधानकारक असल्यास कामाचे देयके अदा करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे. तसेच झालेल्या उर्वरीत कामाबाबत कार्यादेश देण्यांस तसेच संस्थेने स्वच्छ सर्व्हेक्षण व पीएमयु मध्ये चांगल्या प्रकारे काम केल्याने त्यांना सन २०२२-२३ साठी कार्यादेश देण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

या प्रस्तावास सन्मा. सदस्य श्री. संजय सुधाकर जाधव यांनी विरोध नोंदविलेला असून सदर विरोधाची नोंद घेवून प्रस्तावास बहुमताने मान्यता देण्यांत येत आहे.

सूचक :- श्री. खान मोहम्मद साबीर मुहिबुल्लाह
अनुमोदक:- श्री. चौधरी नरेंद्र रुपला बहुमताने मंजुर,

**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- १०३ — जिल्हा नगरोत्थान योजना सन २०२१-२२ अंतर्गत धुळे महानगरपालिका करीता १ नग कार्डियाक (ALS)रूग्ण वाहिका खरेदी करणे करीता जी.एम.पोर्टलव्दारा निविदा दर मागविण्यांत आलेत. त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर फेर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.हर्षकुमार रेलन — हा तहकूब झालेला विषय होता. मागच्या मिटींगमध्ये काही माहितीच्या अभावाने मीच त्याला विरोध केला होता. धुळे शहराकरता मनपामार्फत चांगली सुविधा गरीब लोकांना मिळत असेल, विरोध करण्याचे कारण एवढेच की, आपण खात्री करुन घ्यावी त्याच्याकडून ॲफिडेव्हीट करुन घ्यावे, स्पेअर्स पार्ट,सर्व्हीसींग ते सक्षम आहेत देण्यासाठी जे काही योग्य ते कागदपत्रे घेतले आहे. या विषयाला जो विरोध होता तो काढून हा विषय मंजूर करावा.

म.नागसेन बोरसे — गेल्या वेळेस वर्तमान पत्रात छापून आले होते. फेरनिविदा काढण्याची रुलींग आपण दिली होती. सर्व वर्तमान पत्रांतून ती बातमी छापून आली होती. अल्प मुदतीची फेरनिविदा करावी

असे वर्तमान पत्रांतून छापून आले होते. ती बातमी खरी होती की तहकूब विषय बरोबर होता. याचा खुलासा व्हावा. आपण या विषयाचा ठराव केला होता की नव्हता केला?

| | |
|---|---|
| म.सभापती | केला होता तहकूब ठराव केला आहे. |
| म.नागसेन बोरसे | माझ्याजवळ एक ठराव आहे. आपल्या सहीचा व अति.आयुक्तांच्या सहीचा त्यात स्पष्ट म्हटले आहे, की अल्प मुदतीची फेरनिविदा काढणे. मग हा ठराव खोटा आहे. की तुमच्या जवळचा खोटा आहे. |
| म.सभापती | मी जो ठराव केला तो तहकूबचा आहे तुम्ही कोणता कागद घेऊन फिरत आहात त्याबद्दल मला माहित नाही. |
| म.नागसेन बोरसे | हया ठरावाच्या कागदावर सही खोटी असेल तर चौकशी करावी. |
| म.सभापती | ठीक आहे हरकत नाही. |
| म.नागसेन बोरसे | तुम्ही ठराव का बदलला? |
| म.सभापती | कोणी बदलला मी एकच ठराव व एकच सही केली आहे. |
| म.नागसेन बोरसे | सभापती महोदय माझ्याजवळ अधिकाऱ्यांचे रेकॉर्डीग आहे. मी त्यांना ही गोष्ट विचारली असता त्यांनी स्पष्टपणे सर्वांचे नावे सांगितले आणि हे पण सांगितले की आपण हा ठराव बदण्यास सांगीतले यात पालकमंत्री यांनी आदेश दिले आहे असे कळते. |
| म.सभापती | पालकमंत्रयांचा विषय नाही. धुळे मनपाला एक रुग्णवाहीका पाहिजे आहे.सर्वसामान्य नागरिकांची त्यामुळे सोय होणार आहे. |
| म.नागसेन बोरसे | माझ्याकडे रेकॉर्डीग आहे ठराव बदलले आहे. |
| म.सभापती | जिथे तुम्हाला कार्यवाही करायची असेल ज्यावर आक्षेप घ्यायचा असेल आपण नोंदवू शकतात. |
| म.नागसेन बोरसे | त्यावेळेस येथे पत्रकार बांधव उपस्थित होते त्यांनी वर्तमान पत्रांतून छापून आणले की हा विषय फेर निविदेसाठी ठेवला आहे. |
| म.सभापती | मी तहकूबचा ठराव केला आहे रुलिंगमध्ये पण तहकुब शब्द आहे. |
| म.सभापती | सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कायार्लयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे. |

## धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १०९ दिनांक १०/०६/२०२२

महाराष्ट्र सुवर्ण जंयती नगरोत्थान महाआभियान (जिल्हास्तर)२०२१-२२ लेखाशीर्षक २२१७८३७१ (यंत्रणा म.आयुक्त धुळे महानगरपालिका) महाराष्ट्र शासन जिल्हाधिकारी कार्यालय नगरविकास शाखा नविन प्रशासकीय इमारत धुळे जा.क्र.१२/क्र/कक्ष-५/नपाप्र/बांध/४०६/२०२२ दिनांक३०/०३/२०२२ अन्वये धुळे महानगरपालिकेस खालील प्रमाणे निधीस मंजुरी प्राप्त झालेली आहे.

एकूण रक्कम रु.६७,५०,०००/- अक्षरी (सदुसष्ट लक्ष पत्रास हजार मात्र)

सदर प्रस्तावाच्या मंजूर किमती पैकी सुधारित वित्तीय आकृतीबंधानुसार ७०% हिस्सा रक्कम रु.४७२५०००/-मात्र इकडील कार्यालयामार्फत वितरीत करण्यात येईल.तरी महानगरपालिकेचा ३०%स्वहिस्सा रक्कम रु.२०,२५,०००/- मात्र महानगरपालिकेने भरण्याच्या अटी/शर्तीबर प्रशासकीय मान्यता देण्यांत आलेली आहे.

आरोग्य सेवा आयुक्तालय (महाराष्ट्र राज्य)आरोग्य भवन ६ मजला सेंट जॉर्जेस रुग्णालय, आवार,पी-डिमेला रोड, मुबंई ४००००१ मार्फत आरोग्य सेवा क्र.आसेआ/कक्ष३-३/जिवायो -११३/२१/८०२८४/धुळे/मनपा/रुवा/तांमा/४४०२-४०५/२२दिनांक.२४/०३/२०२२ने जिल्हा नगरोत्थान योजना सन २०२१-२२ अंतर्गत धुळे महानगपालिका धुळे करीता ०२

कार्डियाक (ALS) रुग्णवाहिका खरेदी करण्याचे पत्रा नुसार त्यांच्या अटी शर्तीच्या आधीन राहुन तांत्रिक मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. व सदर विभागाने याबाबत आवश्यक ते स्पेसिफीकेशन नमूद करुन त्याप्रमाणे खरेदी करणे आवश्यक असल्याचे कळविलेले आहे.

नगरविकास विभाग उक्त शासन निर्णय १० नोव्हे २०१७ मध्ये परिच्छेद क्रं. ४.७ मध्ये नमुद केल्याप्रमाणे घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाच्या सविस्तर प्रकल्प अहवालात नमुद उपकरणे/मशीन/यंत्रे इत्यादीची खरेदी गव्हरमेंट ई-मार्केटप्लेस (जी.ई.एम) पोर्टल वरुनच करणे बंधनकारक राहील. याशिवाय इतर पध्दतीचा अवलंब करुन खरेदी केल्यास,तीआर्थिक अनियमितता समजून शासनामार्फत पुढील उचित कार्यवाही करण्यात येईल असे नमुद केलेले आहे.

महाराष्ट्र शासन उद्योग उर्जा व कामगार विभाग मंत्रालय यांच्याकडील शा.नि.क्रं. संकिर्ण २०१६/प्र.२१५/उद्योग-४ दि. २४ ऑगस्ट २०१७ अन्वये शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दती धोरणामध्ये सुधारणा करुन केंद्र शासनाने विकसित केलेल्या गव्हरमेंट ई-मार्केटप्लेस (GeM) पोर्टलवर नमुद केलेली कार्यपध्दती राज्य शासनास वस्तु व सेवा खरेदी करण्यासाठी स्विकृत केलेली आहे. सदरच्या शासन निर्णयाचे परिच्छेद ११ अन्वये महानगरपालिका यांना ई-मार्केटप्लेसवर (GeM) खरेदी करणेबाबत निर्देश दिलेले आहे.

महाराष्ट्र शासन उद्योग उर्जा व कामगार विभाग यांच्या खरेदीची सुधारीत नियमपुस्तीका दि. १/१२/२०१६ मधील परिच्छेद क्रं. ३.२.२ व ३.२.३ मध्ये उक्त शासन निर्णय दि.२४ ऑगस्ट २०१७ नुसार खरेदीदार विभागास गव्हमेंट ई-मार्केटप्लेस पोर्टलवर उपलब्ध असलेली वस्तु व सेवांची रु. ३ लाख व त्यावरील खरेदी सदर पोर्टलवरील पुरवठा धारकांकडून वस्तु व सेवांची गुणवत्ता निर्देश आणि पुरवठा कालावधी इत्यादी आवश्यक बाबी तपासून स्पर्धात्मक ऑनलाईन निविदेव्दारे (OnlineBidding) किंवा रिव्हर्स ऑक्शन पध्दतीने खरेदी करण्या बाबत निर्देश दिलेले आहेत.

धुळे महानगरपालिका भांडार विभाग मार्फत जिल्हा नगरोथान योजना सन २०२१-२२ अंतर्गत धुळे महानगरपालिका करीता १ नग कार्डियाक (ALS) रूग्ण वाहिका खरेदी करणे करीता दिनांक ०४/०४/२०२२ ने कार्यालयीन टिपणी मजुरीस सादर केली असता दिनांक ०८/०४/२०२२ रोजी मा. आयुक्त सो यांच्या मान्यतेने GEM/२०२२/B/२०९९५५७ दिनांक :- ०८/०४/२०२२ अन्वये निविदा प्रसिध्द आली होती. त्यामध्ये निविदा आंतिम दिनांक १८/०४/२०२२ असुन मुदतीच्या आत (३) निविदा धारक प्राप्त झालेले आहेत.

भांडार विभागामार्फत GEM/२०२२/B/२०९९५५७ दिनांक :- ०८/०४/२०२२ नुसार ३ निविदा QUALIFIED झालेल्या आहेत त्यांचे FINANCIAL BID उघडण्यात येऊन खालीलप्रमाणे कार्डीयाक अॅम्बुलेन्स करीता दर प्राप्त झालेले आहेत.

| Sr.No. | Seller Name | Offered Item | Participated on | Status | TOTAL PRICE |
|---|---|---|---|---|---|
| १ | DEVASHISH ENTERPRISES | Make : Force (Traveller) Model : 3358WB | 16/04/2022 | Qualified | 67,48,000 |
| २ | SAI SUNDAR MEDICAL ACENCY | Make : Force Model : 3350WB | 12/04/2022 | Qualified | 69,00,000 |
| ३ | M/s.PRATHMESH | Make : Force | 11/04/2022 | Qualified | 71,00,000 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | ENTERPRISES | Model : 3350WB | | | |

उक्त निविदा मध्ये मे. देवशीष इंन्टरप्रायझेस यांची सर्वात कमी दराची व धुळे महानगरपालिकेच्या हिताची आहे. तरी रक्कम रू.६७,४८,०००/- (सदुसष्ट लाख अठ्ठेचाळीस हजार) मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३ अन्वये मे. स्थायी समिती कडेस कमी दरांच्या निवेदेस मान्यता घेणे आवश्यक असल्यामुळे सदरचा विषय मे.स्थायी समिती पुढे मंजुरी घेणे करीता सादर झाला असता सदर निविदा धारकाबाबत शहानिशा करण्याबाबत निर्णय झालेला असून तोपावेतो सदर प्रस्ताव तहकूब ठेवण्यांत आलेला होता.

याबाबत संबंधित निविदा धारक देवशीष इंन्टरप्रायझेस यांनी पत्र सादर केलेले असून विक्रीनंतर देखभाल दुरुस्ती बाबत लेखी हमी सादर केलेली आहे.त्यानुसार सदर प्रस्ताव फेर निर्णयार्थ मे. स्थायी समितीपुढे सादर करण्यांत आलेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल लक्षांत घेता सदर निविदा शासन मान्य जीएम पोर्टलव्दारा नियमानुसार मागविण्यांत आलेली होती. त्यात संबंधित संस्थानी सहभाग घेतला असता प्रशासनाने संपूर्ण शहानिशा करुनच सदर प्रसताव स्थायी समितीसमोर निविदा दर मंजुरीसाठी सादर केलेला आहे.सदर ॲब्युलन्सही शहरातील नागरीकांसाठी अत्यंत आवश्यक बाब आहे.सर्वात कमी दराचे निविदा धारक मे. देवशीष इंन्टरप्रायझेस यांनी विक्री पश्चात आवश्यक ती देखभाल दुरुस्ती करण्याबाबत हमी पत्र सादर केलेले आहे. तसेच सदर निधी मुदतीत खर्च न झाल्यास परत जाण्याची शक्यता आहे. या सर्व बाबींचा विचार करुन नागरीकांच्या हितासाठी व आरोग्यासाठी याकामी मे. देवशीष इंन्टरप्रायझेस यांची सर्वात कमी दराची रक्कम रू.६७,४८,०००/- (सदुसष्ट लाख अठ्ठेचाळीस हजार) मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३अन्वये मान्यता देण्यात येत आहे. सदर ॲब्युलन्ससाठी आरोग्य सेवा आयुक्तालय (महाराष्ट्र राज्य) मुबंई यांनी आवश्यक त्या अटी शर्तीसह फक्त स्पेसिफिकेशनला तांत्रिक मान्यता दिलेली आहे. त्यानुसार असलेल्या अटी शर्ती व स्पेसिफिकेशन बाबत तसेच प्राप्त निविदा दराबाबत प्रशासनाने खातरजमा करावी.व मनपा हिताच्या दृष्टीने उचित निर्णय घ्यावा. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी.याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री. हर्षकुमार राध्येशाम रेलन
अनुमोदक :- श्री.खान मोहम्मद साबीर मुहिबुल्लाह **सर्वानुमते मंजुर,**

**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

# धुळे महानगरपालिका,धुळे

## नगरसचिव कार्यालय

## स्थायी समिती सभा क्रमांक १७ चे इतिवृत्त

---

**धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह, धुळे**
**गुरुवार दिनांक ३०/०६/२०२२**
**वेळ दुपारी ४-०० वाजतां**

धुळे महानगरपालिकेची स्थायी समितीची साप्ताहिक सभा क्रं.१७ आज गुरुवार दिनांक ३०/**०६/२०२२** रोजी दुपारी ४.०० वाजतां **श्री.शितल मोहन नवले, सभापती**,स्थायी समिती, मनपा धुळे यांच्याअध्यक्षतेखाली **धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह** भरली. या ऑन लाईन सभेस खालील सन्मा.सदस्य  हजर होते.

| अ.क्रं. | सदस्यांचे नांव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री.नवले शितल मोहन | सभापती |
| २ | श्री. जाधव संजय सुधाकर | सदस्य |
| ३ | श्री. बोरसे नागसेन दामोदर | सदस्य |
| ४ | श्रीमती कुलेवार किरण राकेश | सदस्या |
| ५ | श्री.जाधव बन्सीलाल माणिक | सदस्या |
| ६ | श्रीमती चौधरी मंगला अर्जुन | सदस्या |
| ७ | श्री.अन्सारी  फातमा नुरुल अमीन | सदस्या |
| ८ | श्री.चौधरी नरेंद्र रुपला | सदस्य |
| ९ | श्रीमती.चौधरी प्रतिभा शिवाजीराव | सदस्या |
| १० | श्री. अहिरराव किरण हरिश्चंद्र | सदस्य |
| ११ | श्री. रेलन  हर्षकुमार  राधेश्याम | सदस्य |
| १२ | श्री.अन्सारी अब्दुल लतीफ अब्दुल हमीद | सदस्य |
| १३ | श्री.खान मोहम्मद साबीर मुहिबुल्लाह | सदस्य |
| १४ | श्रीमती पठाण नाजियाबानो नासिर खा | सदस्या |

उपस्थित अधिकारी गण

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. नितीन कापडणीस | अति. आयुक्त |
| २ | श्री.अतुल अंबादास गावडे | मुख्य लेखापरीक्षक |
| ३ | श्री. मनोज अरविंद वाघ | नगरसचिव |
| ४ | श्री. गजानन पाटील | मुख्य लेखाधिकारी |
| ५ | श्री.सी.एम. उगले | ओव्हरसिअर |
| ६ | डॉ. जे.सी. पाटील | प्र.आरोग्याधिकारी |
| ७ | श्री. चंद्रकांत जाधव | सहा. आरोग्याधिकारी |
| ८ | श्री.  विकास  साळवे | मलेरिया पर्यवेक्षक |
| ९ | श्री.पी. डी. चव्हाण | ओव्हरसिअर बांधकाम विभाग |
| १० | श्री. सुनिल बर्गे | लिपीक आस्थापना विभाग |

| | | |
|---|---|---|
| ११ | श्री. किशोर सुडके | प्र.परवाना अधिक्षक तथा बाजार विभाग प्रमुख |
| १२ | श्री. गितेश सोनार | ओव्हरसिअर विद्युत विभाग |
| १३ | श्री. महेंद्र सोनवणे | प्रशासन अधिकारी मनपा शि.मंडळ |
| १४ | श्री. राजू माईनकर | भांडारपाल |
| १५ | श्री. प्रसाद जाधव | अतिक्रमण विभाग प्रमुख |
| १६ | श्री. सुक्राम राऊत | वाहन विभाग |

मा. सभापती — सन्मा.सदस्य मा.अति.आयुक्त सो.सर्व अधिकारी कर्मचारी व पत्रकार, छायाचित्रकर बांधव यांचे मी स्थायी समितीच्या बैठकीत स्वागत करतो.सभेचा कोरम पुर्ण झाला असुन नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरु करावे.

म. नगरसचिव — वंदे मातरम् या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

म.नगरसचिव — सभेच्या प्रारंभी आपल्या महानगरपालिकेत मुख्य लेखा परिक्षक नव्याने नियुक्त झालेले अतुल अंबादास गावडे या ठिकाणी स्थायीच्या बैठकीस उपस्थित आहे.यापूर्वीच मनपात रुजू झाले होते परंतु प्रशिक्षणासाठी रजेवर असल्याने ते आज बैठकीस प्रथमच हजर आहे. मी या ठिकाणी त्यांचे सभापती , अधिकारी, व सर्वांच्या वतीने स्वागत करतो. सभापतींना विनंती त्यांना पुष्पगुच्छ देऊन स्वागत आणि सत्कार करावा. तदनंतर मा. अतुल गावडे सो. यांनी आपला परिचय सभागृहाला करुन द्यावा.

म.अतुल गावडे — मी अतुल अंबादास गावडे रा.जुन्नर जि. पुणे यापूर्वी हिंगोलीला ४ वर्ष काम केले. त्यानंतर कृषी आयुक्तालय पुणे मध्ये ४ वर्ष होतो, विभागीय आयुक्त कार्यालय पुणे मध्ये १ वर्ष होतो. प्रमोशनने धुळयात जॉईंट झालो. १३ मे ला जॉईंट झालो होतो परंतु १ महिना प्रशिक्षण होते. धुळे शहर मला नविन नाही, कारण २००४ ते २००८ याकालावधीत मी ॲग्रीकल्चर कॉलेज येथे शिक्षण घेतले आहे. त्यामुळे परत एकदा धुळयांत सेवेची संधी मिळाली ही अभिमानाची गोष्ट आहे. यापुढे आपल्या सर्वांच्या सहकार्याने योग्य ते काम करत राहील.धन्यवाद.

म.सभापती — आज ३० जुन आहे आज च्या दिवशी २००३ ला धुळे मनपाची स्थापना झाली होती. स्थापना दिवसाच्या मी सर्व अधिकारी वर्ग, नगरसेवक यांना शुभेच्छा देतो.

सही/-x x x
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक :-१०४ — मागील स्थायी समिती सभांचे इतिवृत्त क्रमशः वाचून कायम करणे. (दि.२/ ६/ २०२२)

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. किरण अहिरराव — इतिवृत्त वाचून कायम करण्यांत यावे.

म. खान मो.साबीर — इतिवृत्त वाचून कायम करण्यांत यावे.

म.सभापती — सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने इतिवृत्त क्रमशः वाचून कायम करण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ११० दिनांक ३०/०६/२०२२**

मागील स्थायी समिती सभा दिनांक २/६/२०२२ रोजीच्या सभेतील ठराव नंबर ९३ ते ९९ अखेर तसेच सभेत झालेली चर्चा व त्यावरील निर्णय क्रमशः वाचून कायम करण्यांत येत आहे.

सही/-x x x
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- १०५ — मा.आयुक्त सो.यांनी त्यांचे आलेल्या अधिकारात रुपये ५ लाख ते २५ लाखापर्यंत बांधकाम विभागाकडील विकास कामाची दि.२२/०३/२०२२ ते दि. १७/०५/२०२२अखेर निर्गमित केलेल्या कार्यादेशाची यादी अवलोकनार्थ सादर.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.किरण अहिरराव — यादी तुमच्या कडे आहे अ.क्र.९ पहा प्रभाग क्र. १ मध्ये रु २४९१७२९/- ची ही वर्क ऑर्डर झाली तसेच अ.क्र. ४१ बघा रु २२९९२९६/- ची वर्क ऑर्डर झाली आहे अ.क्र. ८० रु २४५०२९५/- चे काम आहे. मनपा निधी नगरसेवक निधी नाही. अ.क्र. ८२ पहा रु २३८३३०६/- मनपा निधी हे सगळे कामे झाले वर्क ऑर्डर झाली ३१/०३/२०२२ ला हे सगळे कामे होते स्पील ओव्हरचे. एकाच दिवशी ळया वर्क ऑर्डर झाल्या कशा? आमच्या वर्क ऑर्डर थांबलेल्या आहे. त्याच वर्षात आम्हाला असे सांगतात बजेट मंजूर नाही स्थायीत मंजूरी दिली महासभेत मंजूरी दिली मग तुम्ही हया वर्क ऑर्डर कसे काय देतात? हया कुठेही बजेट मध्ये नव्हत्या. बजेट एप्रिल महिन्यात आणि हया ३१/०३/२०२२ च्या वर्क ऑर्डर आहे.

म.अति आयुक्त — ज्यांच्या निविदा प्रक्रिया झालेल्या नाही ते फक्त हया वर्षात आले.

म.किरण अहिरराव — निविदा प्रक्रीया झालेले कामे तुम्हाला घ्यायचे नव्हते.

म.अति.आयुक्त — हया वर्षीच्या बजेटमध्ये घेतले आपण त्यांची वर्क ऑर्डर आता होते आहे.३१/०३/२०२२ पर्यंत जेवढे पण असतील सगळयांना वर्क ऑर्डर दिलेली आहे.

म.किरण अहिरराव — माझी फाईल का नाही झाली? १० महिन्यापूर्वी वर्क ऑर्डर झाली आहे. दरमंजूरी झाली आहे. उपायुक्त मॅडम माझ्या फाईलवर सही करत नाही. विषय गंभीर आहे. आमच्या नगरसेवक निधीच्या वर्क ऑर्डर होत नाही.

म.सभापती — वर्क ऑर्डर का नाही झाली यांची?

म.ओव्हरसिअर पा.पु. — सदरचा प्रभाग हा सी.सी. बागुल यांच्याकडून आताच माझ्याकडे आला आहे. मी पाहून घेतो. सही बाकी आहे.

म.सभाती — बजेटमध्ये आहे तर सही झाली पाहिजे रावसाहेब तुम्ही कुठल्याही परिस्थिती ती फाईलचे काम पूर्ण करा. तुमच्या खालच्या अधिकाऱ्यांना समजवून सांगा. आम्हाला कार्यवाही करण्यात भाग पाडू नका.

म. आयुक्त सो. यांनी त्यांचे आलेल्या अधिकारात रुपये ५ लाख ते २५ लाखापर्यंत बांधकाम विभागाकडील विकास कामाची दि.२२/०३/२०२२ते दि.१७/०५/२०२२ अखेर निर्गमित केलेल्या कार्यादेश अवलोकन करण्यांत आले.

## धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १११ दिनांक ३०/०६/२०२२

मा.आयुक्त सो. यांनी त्यांचे आलेल्या अधिकारात रुपये ५ लाख ते २५ लाखापर्यंत बांधकाम विभागाकडील विकास कामाची यादी प्रकरण ७ (ड) अन्वये दि.२२/०३/२०२२ ते दि.३१/३/२०२२ अ.क्रं.१ ते ८८ व दि.६/४/२०२२ ते दि. १७/०५/२०२२ अ.नं. १ ते १७ अखेर निर्गमित केलेल्या कार्यादेशाची यादीचे अवलोकन करण्यांत आले.

(बांधकाम विभाग)

दिनांक :- दि.२२/०३/२०२२ ते दि.१७/५/२०२२ अखेर निर्गमित केलेल्या विकास कामांच्या कार्यादेशची यादी

| अ .क्र. | कार्या.क्रं. | दिनांक | कामाचे नाव | रक्कम | निधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | ६२१ | २२/०३/२०२२ | प्र.क्र.१७मध्ये विशाल इस्टेट येथील ओपन स्पेसला वॉल कंपाऊंड करणे. | २४,५१,३२०/- | मनपानिधी (शहरातीलओपन स्पेस विकसित करणे) |
| २ | ६२२ | २२/०३/२०२२ | प्र.क्र.१३मध्येअन्सारनगर भागात गनी मास्टर यांचे घराजवळील नाल्यावर पुल बांधणे. | ५,७२,०३२/- | नगरसेवक निधी सन २०२१-२२ अंतर्गत |
| ३ | ६२८ | २४/०३/२०२२ | प्र.क्र.१७मध्ये एफ.सी.आय.गोडावून मुंबई सुरत बाय पास हायवे च्या बाजूस १० सीट सार्व.शौचालय बांधणे. | १९,७४,८३२/- | महिला बालकल्याण निधी ५ % राखीव |
| ४ | ६३१ | २५/०३/२०२२ | धुळे मनपा हद्दीतील मौजे वलवाडी ता.जि.धुळे येथील विनोद नगर सर्व्हेनं.८०/१+२ओपनस्पेसला चे नलिक कंपाऊंड करणे. | ९,९८,९८८/- | आमदार स्थानिक विकास कार्यक्रम सन २०२१-२२ अंतर्गत |
| ५ | ६३२ | २५/०३/२०२२ | प्र.क्र.१२ मध्ये मस्जिद शेठ, आयेशा शेठ जावेद बिल्डर सायजीन पावेतो गटार करणे व रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | २४,९१,७५१/- | जिल्हास्तरीय नगरोत्थान योजने सन २०२०-२१ अंतर्गत |
| ६ | ६३५ | २५/०३/२०२२ | प्र.क्र.७मध्ये गुरुनानक सोसा. मध्ये प्लॉट नं.१ श्री.टेकचंद रेलन ते अमरधाम पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | १९,९९,४१८/- | नगरसेवक निधी २०२१-२२ अंतर्गत |
| ७ | ६३६ | २५/०३/२०२२ | प्र.क्र.१ मध्ये वलवाडी भागात श्री.सुभाष पाटील यांच्या घरापासुन ते पोलीस कॉलनी पावेतो रस्ता डांबरीकरण करणे. | १९,९०,८७८/- | मनपा निधी अंतर्गत (हद्दवाढ महसुल वलवाडीसन२०२१-२२ निधी अंतर्गत) |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ८ | ६३७ | २५/०३/२०२२ | प्र.क्र.१६ मध्येआदिवासी वस्ती ते सोनवणे घर ते भीमसिंग घर ते ग.नं.१,२,३ पावेतो रस्ता डांबरीकरण करणे. | १३,९३,७४६/- | जिल्हास्तरीय नगरोत्थान योजने सन २०२०-२१ अंतर्गत |
| ९ | ६३८ | २५/०३/२०२२ | प्र.क्र.१मध्ये गुलमोहर कॉलनी ते ॲड.देवरे नाना यांच्या घरापावेतो रस्ता डांबरीकरण करणे. | २४,९१,७२९/- | मनपा निधी अंतर्गत (हद्दवाढ महसुल वलवाडीसन२०२१-२२ निधी अंतर्गत) |
| १० | ६३९ | २५/०३/२०२२ | प्र.क्र.१५ मध्ये आखाडे यांच्या घरापासुन ते देशमुख यांच्या घरापर्यंत डांबरीकरण करणे व गटार करणे. | २४,७२,३४६/- | मनपा निधी अंतर्गत (रस्ता अनुदान निधी सन २०२१-२२ अंतर्गत ) |
| ११ | ६४७ | २५/०३/२०२२ | प्र.क्र.३ मध्ये विटाभट्टी परिसरातील श्री.राजेंद्र पाटील यांचे घरापासुन ते जरराक पेंटरयांचे घरापर्यंत कॉक्रीटरस्ता करणे. | १४,९८,१२३/- | आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत सन २०२१-२२ |
| १२ | ६४८ | २५/०३/२०२२ | प्र.क्र.१३मध्ये ८० सिटी हॉटेल पासुन ते शमशाद मशिद पर्यंत रस्ता कॉक्रीट करणे | १५,०२,३५८/- | नगरसेवकनिधी सन २०२१-२२ अंतर्गत |
| १३ | ६५७ | ३०/०३/२०२२ | प्र.क्र.१७मध्ये कोरे नगर मधील खत्री बिल्डींग ते रवी बाविस्कर घरापावेतो रस्ता कॉक्रीट करणे. | १९,९३,७२१/- | नगरसेवक निधी सन २०२१-२२ अंतर्गत |
| १४ | ६५८ | ३०/०३/२०२२ | प्र.क्र.१७ मध्ये सुरतवाला बिल्डींग येथील शर्मा घर ते रेल्वे स्टेशन पावेतो आर.सी.सी. गटार करणे. | ९,९९,८५३/- | नगरसेवक निधी सन २०२१-२२ अंतर्गत |
| १५ | ६५९ | ३०/०३/२०२२ | प्र.क्र.१७ मध्ये सोन्या मारोती मंदिर येथील ओपनस्पेसला वॉल कंपाऊंड करणे. | ९,७७,१८७/- | नगरसेवक निधी सन २०२१-२२ अंतर्गत |
| १६ | ६६४ | ३०/०३/२०२२ | प्र.क्र.३मध्ये शिवपार्वती कॉलनी भागात आग्रारोड डॉ.पंकज देवरे यांचे हॉस्पिटल पासून ते अमीन प्रोव्हिजन पर्यंत श्री. चौधरी यांचे घरापासुन तेश्रीहरी अपार्टमेंट पावेतो रस्ता डांबरीकरण करणे. | ८,५९,२१२/- | नगरसेवकनिधीसन२०२१-२२ अंतर्गत |
| १७ | ६७२ | ३०/०३/२०२२ | प्र.क्र.११ मध्ये रामचंद्र नगर मध्ये गणेश यादव ते सुरेश चौधरी यांचे घरापर्यंत रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | ९,८७,६५३/- | नगरसेवकनिधीसन२०२१-२२ अंतर्गत |
| १८ | ६७३ | ३०/०३/२०२२ | प्र.क्र.२ मध्ये सुदर्शन कॉलनी मधील श्री.मधुकर पवार यांचे घरापासुन ते ड्रीम प्लाझा अपार्टमेंट पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | १९,९८,८९०/- | नगरसेवकनिधीसन२०२१-२२ अंतर्गत |
| १९ | ६७४ | ३०/०३/२०२२ | देवपूर भागातील जयहिंद कॉलनी सर्व्हे नं.१४/१ मधील बगिच्या मध्ये स्वयंचलीत रेल्वे गाडी बॅटरी सह (इंजिन व बोगी सह) ३ वर्ष चालविण्या करीता देणे बाबत. | दरवर्षी मनपास १०,०००/- रु.भरणे | मनपा निधी अंतर्गत मनपा क्षेत्रातील मुलभूत सोई सुविधांचा विकास कार्यक्रम सन २०१८-१९) |
| २० | ६७६ | ३१/०३/२०२२ | प्र.क्र.४ मध्ये आंनद नगर भागात १)श्री.धर्मेन्द्र बेहेरे ते नकाणे रोड,२)आनंद प्रोव्हिजन ते समृद्धी अपार्टमेंट पावेतो रस्ता डांबरीकरण करणे. | १५,७०,२४२/- | नगरसेवकनिधीसन२०२१-२२ अंतर्गत |
| २१ | ६७७ | ३१/०३/२०२२ | प्र.क्र.१० मध्ये म्हसोबा मंदिर ते आकाश परदेशी यांचे घरापर्यंत आर.सी.सी. बंदिस्त पाईप गटार करणे. | ६,२९,८९२/- | नगरसेवकनिधीसन२०२१-२२ अंतर्गत |
| २२ | ६७८ | ३१/०३/२०२२ | प्र.क्र.११ मध्ये मधुकर फाळके ते रिलायन्स ऑफिस पर्यंत आर.सी.सी. गटार करणे. | ९,००,०९१/- | नगरसेवकनिधीसन२०२१-२२ अंतर्गत |
| २३ | ६७९ | ३१/०३/२०२२ | प्र.क्र.११ मध्ये साई प्रसाद सोसायटी येथे भूषण साळुंखे ते चोपडे पाटील यांचे घरापर्यंत आर.सी.सी. गटार करणे. | १०,९९,३५६/- | नगरसेवकनिधीसन२०२१-२२ अंतर्गत |
| २४ | ६८० | ३१/०३/२०२२ | प्र.क्र.१०मध्ये वरखेडी येथे रवी माळी यांचे घरापासुन ते सार्व. शौचालय साईबाबा मंदिरा जवळ इंदिरा नगर येथे कॉक्रीट रस्ता तयार करणे. | १४,८६,१९१/- | नगरसेवकनिधीसन२०२१-२२ अंतर्गत |
| २५ | ६८१ | ३१/०३/२०२२ | प्र.क्र.२ मध्ये जे.बी. बडगुजर कॉलनी भागात प्लॉट नं.७९ ते प्लॉट नं.८८ पर्यंत प्लॉट नं.५९ ते प्लॉट नं.६२ पावेतो रस्ता डांबरीकरण करणे. | १४,९८,७७२/- | नगरसेवकनिधीसन२०२१-२२ अंतर्गत |
| २६ | ६८२ | ३१/०३/२०२२ | प्र.क्र.२ मध्ये जिल्हा परिषद कॉलनी भागात श्री.प्रशांत परदेशी यांचे घरापासुन ते ध्रुव अपार्टमेंट पावेतो रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | १९,९६,६४३/- | नगरसेवकनिधीसन२०२१-२२ अंतर्गत |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २७ | ६८३ | ३१/०३/२०२२ | प्र.क्र.५मध्ये संभाजीनगर पारिजात कॉलनी येथील शाहु गार्डनची दुरुस्ती करणे व विविध भागात स्ट्रीट लाईट बसविणे. | १९,३१,५६९/- | मनपा निधी अंतर्गत (बाग बगीचे दुरुस्ती २०२१-२२) |
| २८ | ६८४ | ३१/०३/२०२२ | प्र.क्र.१७ मध्ये गोकुळ नगर मध्ये श्री.हाडपे ते दर्गा पावेतो व इशी ते जाधव घरापावेतो रस्ता कॉंक्रीट करणे. | १९,९५,६५४/- | नगरसेवकनिधीसन२०२१-२२ अंतर्गत |
| २९ | ६८५ | ३१/०३/२०२२ | प्र.क्र.११मध्ये नाटेश्वर सिसा.येथे श्री.संजय बोरसे ते नाल्या पावेतो पाण्याची पाईपलाईन टाकणे. | ११,२१,७५८/- | नगरसेवकनिधीसन२०२१-२२ अंतर्गत |
| ३० | ६८६ | ३१/०३/२०२२ | प्र.क्र.४मध्ये वाडी भोकर रोड पाण्याची टाकी पासून संजय निकम यांच्या घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | १९,९६,२९६/- | नगरसेवकनिधीसन२०२१-२२ अंतर्गत |
| ३१ | ६८७ | ३१/०३/२०२२ | प्र.क्र.११मध्ये रामचंद्र नगर ३३२ मध्ये प्लॉट नं.८ ते १४ व १५ ते २१ पर्यंत गटार व कॉंक्रीट रस्ता करणे. | १९,७५,७६५/- | नगरसेवकनिधीसन२०२१-२२ अंतर्गत |
| ३२ | ६८८ | ३१/०३/२०२२ | धुळे मनपा हद्दीतील देवपूर भागातील मयूर गार्डन येथे जॉगिंग ट्रॅक करणे. | ८,३९,६७१/- | मनपा निधी अंतर्गत |
| ३३ | ६८९ | ३१/०३/२०२२ | प्र.क्र.१७मध्ये रंगारी चाळ भागात रस्ता कॉंक्रीट करणे व गटार करणे. | १८,९३,८७२/- | नगरसेवकनिधीसन२०२१-२२ अंतर्गत |
| ३४ | ६९० | ३१/०३/२०२२ | प्र.क्र.८मध्ये खाटिकवाडा भागात लकी हाई बेअर पासून ते इब्राहीम भाई यांचे घरापावेतो रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | ९,५०,९९८/- | नगरसेवकनिधीसन२०२१-२२ अंतर्गत |
| ३५ | ६९२ | ३१/०३/२०२२ | प्र.क्र.३ मध्ये इस्लामपुरा भागात लेडीज शौचालयपासून ते सुशी नाल्या पावेतो रस्ता कॉंक्रीट करणे. | ९,८८,४८९/- | नगरसेवकनिधीसन२०२१-२२ अंतर्गत |
| ३६ | ६९४ | ३१/०३/२०२२ | प्र.क्र.३मध्ये इंदिरा कॉलनी भागात BSNL टॉवर ते श्री.नांद्रे यांच्या घरापावेतो रस्ता डांबरीकरण करणे. | १४,९८,९७७/- | नगरसेवकनिधीसन२०२१-२२ अंतर्गत |
| ३७ | ६९६ | ३१/०३/२०२२ | प्र.क्र.१२मध्ये रेहमत पार्क गल्ली भागात रस्ता कॉंक्रीट करणे. | ९,९६,६४४/- | नगरसेवकनिधीसन२०२१-२२ अंतर्गत |
| ३८ | ६९८ | ३१/०३/२०२२ | प्र.क्र.५ मध्ये साईबाबा नगर मध्ये सभा मंडप बांधणे. | ९,९७,१९४/- | नगरसेवकनिधीसन२०२१-२२ अंतर्गत |
| ३९ | ७०० | ३१/०३/२०२२ | प्र.क्र.३मध्ये विटा भट्टी भागातील स.नं.२९/अ मधील खुल्या जागेत सभागृह बांधणे. | १९,९५,९११/- | नगरसेवकनिधीसन२०२१-२२ अंतर्गत |
| ४० | ७०१ | ३१/०३/२०२२ | प्र.क्र.१९मध्येखडीपट्टी भागात शकील अहमद यांच्या घरापासुन ते रुही मेडिकल पावेतो रस्ता कॉंक्रीट करणे. | ९,९९,३७७/- | नगरसेवकनिधीसन२०२१-२२ अंतर्गत |
| ४१ | ७१२ | ३१/०३/२०२२ | प्र.क्र.१मध्ये शिवनेरी कॉलनी बोरसे नगर,इंद्रप्रस्थ कॉलनी, जिभाऊ नगर, बालाजी नगर, आदर्श कॉलनी येथे नविन पाईप लाईन टाकणे. | २२,९९,२९६/- | मनपा निधी अंतर्गत (हद्दवाढ निधी पाईपलाईन अंतर्गत ) |
| ४२ | ७१३ | ३१/०३/२०२२ | प्र.क्र.१० मध्ये देविदास कॉलनी परिसरात सूर्य मुखी मारोती मंदिर ते मनिष शर्मा ते कैलास सोनार यांचे घरापर्यंत रस्ता कॉंक्रीट करणे. | ९,९५,०६१/- | नगरसेवकनिधीसन२०२१-२२ अंतर्गत |
| ४३ | ७१७ | ३१/०३/२०२२ | प्र.क्र.६ मध्ये निलेश पाटील यांचे घरापासून ते बापू पवार यांचे घरापर्यंत कॉंक्रीट करणे. | ११,३५,९९३/- | नगरसेवकनिधीसन२०२१-२२ अंतर्गत |
| ४४ | ७१८ | ३१/०३/२०२२ | प्र.क्र.९ मध्ये ग.नं.७ चर्मकार चौकात नवीन टाकी बांधणे. | ५,९७,३५६/- | नगरसेवकनिधीसन२०२१-२२ अंतर्गत |
| ४५ | ७१९ | ३१/०३/२०२२ | प्र.क्र.९ मध्ये ग.नं.७ हनुमान मित्र मंडळ येथे नवीन टाकी बांधणे. | ५,४१,९८६/- | नगरसेवकनिधीसन२०२१-२२ अंतर्गत |
| ४६ | ७२० | ३१/०३/२०२२ | प्र.क्र.१ मध्ये वलवाडी भागातील किर्ती अपार्टमेंट ते ड्रीम बंगलोज पावेतो रस्ता कॉंक्रीट करणे. | ९,९६,६८१/- | नगरसेवकनिधीसन२०२१-२२ अंतर्गत |
| ४७ | ७२१ | ३१/०३/२०२२ | प्र.क्र.१९ मध्ये जामचा मळा व मुल्ला कॉलनीला लागून असलेल्या कादरीया अशरफया मस्जिद भागात येणाऱ्या जाणाऱ्यांसाठी नाल्यावर पूल बांधणे. | ९,९९,४४२/- | नगरसेवकनिधीसन२०२१-२२ अंतर्गत |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४८ | ७२२ | ३१/०३/२०२२ | प्र.क्र.१९ मध्ये जामचा मळा भागात इस्माईल भाई यांचे घरा पासून ते जे.के.पेंटर यांच्या घरापावेतो रस्ता कॉंक्रीट करणे. | ८,००,१५८/- | नगरसेवक निधी सन २०२१-२२ अंतर्गत |
| ४९ | ७२३ | ३१/०३/२०२२ | प्र.क्र.६ मध्ये नकाणे येथे रावसाहेब भाऊसाहेब यांचे घर ते शांताराम आबा घर रजनी बाई ते सुनील पाटील नानाजी खैरनार ते पावरा व गाव दरवाजा ते भटू यशवंत यांचे घरापर्यंत विविध ठिकाणी कॉंक्रीट रस्ता करणे. | १९,९८,०८०/- | नगरसेवकनिधीसन२०२१-२२ अंतर्गत |
| ५० | ७२४ | ३१/०३/२०२२ | प्र.क्र.११ मध्ये विजय नगर योगेश मोरे घर ते वडजाई पावेतो रस्ता कॉंक्रीट करणे. | १४,१८,७३१/- | नगरसेवकनिधीसन२०२१-२२ अंतर्गत |
| ५१ | ७२५ | ३१/०३/२०२२ | प्र.क्र.१ मध्ये वलवाडी भागातील देवमोगरा कॉलनी भागात श्री.संग्राम पाडवी यांचे घरापासुन ते पाडवी यांचे घरापर्यंत रस्ता कॉंक्रीट करणे. | ९,९५,३०१/- | नगरसेवकनिधीसन२०२१-२२ अंतर्गत |
| ५२ | ७२६ | ३१/०३/२०२२ | प्र.क्र.१मध्ये मोकर भागातील राजाराम नगर भागात श्री.दत्तु पाटील यांचे घरापासुन ते श्री.पाटील यांचे घरापर्यंत रस्ता कॉंक्रीट करणे | १४,८४,७६४/- | नगरसेवकनिधीसन२०२१-२२ अंतर्गत |
| ५३ | ७२९ | ३१/०३/२०२२ | प्र.क्र.६मध्ये महिंदळे येथे जीवन मोरे ते कोनलाडे पाठ किनार पर्यंत आर.सी.सी. पाईप गटार करणे. | १०,०४,२२३/- | नगरसेवकनिधीसन२०२१-२२ अंतर्गत |
| ५४ | ७३० | ३१/०३/२०२२ | प्र.क्र.१मध्ये वलवाडी भागातील गायत्री नगर भागात श्री.गुलाब चौधरी यांच्या घरापासुन ते श्री.संजय देवरे यांचे घरापर्यंत रस्ता कॉंक्रीट करणे. | ११,९८,८४१/- | नगरसेवकनिधीसन२०२१-२२ अंतर्गत |
| ५५ | ७३२ | ३१/०३/२०२२ | प्र.क्र.१५मध्ये सर्व्हे नं.५७९/३+५ मधील मोकळ्या जागेस संरक्षण भिंत बांधणे. | २४,४७,६१४/- | नगरसेवकनिधीसन२०२१-२२ अंतर्गत |
| ५६ | ७३३ | ३१/०३/२०२२ | धुळे मनपा हद्दीतील मुख्य रस्त्यावरील खड्डे बुजविणे | २४,८७,९३४/- | नगरसेवकनिधीसन२०२१-२२ अंतर्गत |
| ५७ | ७३४ | ३१/०३/२०२२ | प्र.क्र.१५मध्ये अशोक नगर भागात डॉ.सलील पाटील ते जयस्वालते ठाणगे घरापावेतो आर.सी.सी.बंदिस्त गटार करणे. | ९,९९,४०३/- | नगरसेवकनिधीसन२०२१-२२ अंतर्गत |
| ५८ | ७३५ | ३१/०३/२०२२ | प्र.क्र.११ मध्ये रामदेव बाबा नगर मध्ये महिलांसाठी शौचालय बांधणे. | १९,९९,४६४/- | नगरसेवकनिधीसन२०२१-२२ अंतर्गत |
| ५९ | ७३६ | ३१/०३/२०२२ | प्र.क्र.८ मध्ये शहजाद मास्टर इद्रीस पेहलवान यांचे घरापर्यंत आर.सी.सी.बंदिस्त गटार करणे. | १९,९८,०५९/- | नगरसेवकनिधीसन२०२१-२२ अंतर्गत |
| ६० | ७३७ | ३१/०३/२०२२ | प्र.क्र.४मध्ये जयहिंद कॉलनी भागात श्री.विकास पवार यांचे घरापासुन ते संजय मोरे यांचे घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | १९,९४,२७८/- | नगरसेवकनिधीसन२०२१-२२ अंतर्गत |
| ६१ | ७३८ | ३१/०३/२०२२ | प्र.क्र.५ मध्ये एस.आर.पी.कॉलनी भागातील समाज मंदिर दुरुस्त करणे व पेव्हिंग ब्लॉक बसविणे. | १३,५०,३१६/- | नगरसेवकनिधीसन२०२१-२२ अंतर्गत |
| ६२ | ७४० | ३१/०३/२०२२ | प्र.क्र.६मोराणे शाही गारुडी ते किरण कोळी आनंद नगर ठाकरे ते सुधाकर पाटील दिलीप काळू ते मलिंद पाटील हिराजी नगर येथे आर.सी.सी.पाईप टाकणे. | १९,९४,४१२/- | नगरसेवकनिधीसन२०२१-२२ अंतर्गत |
| ६३ | ७४१ | ३१/०३/२०२२ | प्र.क्र.१८ मध्ये शर्मा इंजिनिअरिंग ते मालेगाव रोड ते दीपक शर्मा यांचे घरापावेतो रस्ता डांबरीकरण करणे. | ९,९८,४३८/- | नगरसेवकनिधीसन२०२१-२२ अंतर्गत |
| ६४ | ७४२ | ३१/०३/२०२२ | प्र.क्र.१८कोळवले नगर भागात महादेव मंदिर ओपनस्पेस येथे रस्ता कॉंक्रीटकरण करणे. | ९,९५,९४०/- | नगरसेवकनिधीसन२०२१-२२ अंतर्गत |
| ६५ | ७४३ | ३१/०३/२०२२ | प्र.क्र.१८ मध्ये पार्वती नगर डी.पी. रोड ते लोकरे नगर श्री. चेतन गवळी यांच्या घरापावेतो रस्ता डांबरीकरण करणे. | ९,९४,८४७/- | नगरसेवकनिधीसन२०२१-२२ अंतर्गत |
| ६६ | ७४४ | ३१/०३/२०२२ | प्र.क्र.१८ मध्ये भोले बाबा नगर ओपनस्पेस पावेतो रस्ता कॉंक्रीट करणे. | ९,९७,८२२/- | नगरसेवकनिधीसन२०२१-२२ अंतर्गत |
| ६७ | ७४५ | ३१/०३/२०२२ | प्र.क्र.८ मध्ये जे.बी.रोड चंद्रकांत साडी सेंटर ते तलवारे यांचे कापड दुकान पर्यंत आर.सी.सी. बंदिस्त गटार करणे. | ९,९८,९३०/- | नगरसेवकनिधीसन२०२१-२२ अंतर्गत |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ६८ | ७४६ | ३१/०३/२०२२ | प्र.क्र.८मध्ये ग.नं.७मच्छी बाजार पोलीस चौकी ते श्री.चौधरी यांचे रेशन दुकाना पर्यंत आर.सी.सी. बंदिस्त गटार करणे. | १९,९५,०६६/- | नगरसेवकनिधीसन२०२१-२२ अंतर्गत |
| ६९ | ७४७ | ३१/०३/२०२२ | प्र.क्र.८ मध्ये लकी मेडिकल ते जीनकर गल्ली पर्यंत आर.सी.सी. बंदिस्त गटार करणे. | १४,७१,७०२/- | नगरसेवकनिधीसन२०२१-२२ अंतर्गत |
| ७० | ७४८ | ३१/०३/२०२२ | प्र.क्र.८ मध्ये चक्की पासून ते निसार रिक्षा यांच्या घरापर्यंत मच्छी बाजार रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | ५,४८,३६८/- | नगरसेवकनिधीसन२०२१-२२ अंतर्गत |
| ७१ | ७४९ | ३१/०३/२०२२ | प्र.क्र.१० मध्ये दुर्गा माता मंदिर ते खुनी मशीद पर्यंत HDPE पाईपलाईन टाकणे. | ५,९७,१००/- | नगरसेवकनिधीसन२०२१-२२ अंतर्गत |
| ७२ | ७५० | ३१/०३/२०२२ | प्र.क्र.१०मध्ये रविंद्र डेअरी ते साहेबराव महाले वरखेडी येथे HDPE पाईपलाईन टाकणे. | ९,८७,८८७/- | नगरसेवकनिधीसन२०२१-२२ अंतर्गत |
| ७३ | ७५१ | ३१/०३/२०२२ | प्र.क्र.१०मध्ये वरखेडी येथे गाव दरवाजा ते अनिल विक्रम ते बहिरम बाबा पावेतो पाईपलाईन टाकणे. | ८,७७,९८९/- | नगरसेवकनिधीसन२०२१-२२ अंतर्गत |
| ७४ | ७५३ | ३१/०३/२०२२ | प्र.क्र.१८मध्ये धर्मा सोहळे दुकान ते जयेश पाटील घर ते आधार ठाकरे घरापावेतो रस्ता कॉंक्रीट करणे. | ९,९५,८०५/- | नगरसेवकनिधीसन२०२१-२२ अंतर्गत |
| ७५ | ७५४ | ३१/०३/२०२२ | प्र.क्र.१८मध्ये सेन्ट्रल स्कूल ते उचाळे वस्ती पावेतो रस्ता कॉंक्रीट करणे. | ९,९९,४९२/- | नगरसेवकनिधीसन२०२१-२२ अंतर्गत |
| ७६ | ७५५ | ३१/०३/२०२२ | प्र.क्र.१८मध्ये मोहाडी गटनं.६/२,६/३,६/४येथील मोकळ्या जागेस वॉल कंपाऊंड करणे. | १९,६८,०२२/- | नगरसेवकनिधीसन२०२१-२२ अंतर्गत |
| ७७ | ७५६ | ३१/०३/२०२२ | धुळे मनपा हद्दीत हाग्रा नाल्यावरील कचरा डेपो जवळ नाल्यावर स्लब कलव्हर्ट करणे. | १९,९९,५८८/- | नगरसेवकनिधीसन२०२१-२२ अंतर्गत |
| ७८ | ७५७ | ३१/०३/२०२२ | धुळेमनपा हद्दीतील शाळा क्र.१७परिसरात शौचालय बांधणे. | ५,७१,९५४/- | मनपानिधी अंतर्गत (शाळा दुरुस्ती) |
| ७९ | ७६३ | ३१/०३/२०२२ | हद्दवाढ निधी पाईप लाईन अंतर्गत प्र.क्र.६ नकाणे गावात बेघर वस्ती आदिवासी वस्ती ते भीमा नाना घर ते आंबेडकर चौक ते गणेश टेलर्स ऋषिकेश नाना घरापावेतो HDPE पाईप लाईन टाकणे. | २२,७७,६४४/- | मनपा निधी (हद्दवाढ निधी पाईप लाईन अंतर्गत) |
| ८० | ७६४ | ३१/०३/२०२२ | प्र.क्र.१ गायत्री नगर मध्ये साळुंखे सर ते प्रभाकर मिस्तरी ते सुनील चौधरी घरापावेतो बंदिस्त गटार करणे. | २४,५०,२९५/- | मनपा निधी सन २०२१-२२ अंतर्गत |
| ८१ | ७६५ | ३१/०३/२०२२ | प्र.क्र.१बोरसेसर ते राहुल चौधरी घरापावेतोरस्ता डांबरीकरण करणे. | २४,१५,११३/- | अल्पसंख्याक निधी अंतर्गत |
| ८२ | ७६६ | ३१/०३/२०२२ | प्र.क्र.६ मध्ये नकाणे गावात किसन दादा ते भगवान बागुल ते नदी किनार आदिवासी वस्ती किशोर आप्पा फॉर्म फिल्टर वॉटर टॅंक ते रेखा गवळे ते आदर्श कॉलेज व शिक्षक कॅं.ते चंद्रवेल व पर्यंत व नैनाश्री पाईपलाईन टाकणे. | २३,८३,३०६/- | मनपा निधी (हद्दवाढ निधी पाईप लाईन अंतर्गत) |
| ८३ | ७६७ | ३१/०३/२०२२ | प्र.क्र.१ मध्ये जयतोबा नगर व राजाराम नगर येथे HDPE पाईपलाईन टाकणे. | १४,९०,१४७/- | मनपा निधी (हद्दवाढ निधी पाईप लाईन अंतर्गत) |
| ८४ | ७६८ | ३१/०३/२०२२ | प्र.क्र.१वलवाडी भागात आदिवासी वस्ती पावेतो HDPE पाईपलाईन टाकणे. | २२,८७,७०५/- | मनपा निधी सन २०२१-२२ अंतर्गत |
| ८५ | ७६९ | ३१/०३/२०२२ | प्र.क्र.१मध्ये वलवाडी हावातील अमरधाम येथे ओटे व बैठक व्यवस्था पेव्हर ब्लॉक वॉल कंपाऊंड व रंगकाम करणे. | ९,९८,४१७/- | मनपा निधी अंतर्गत(अमरधाम दुरुस्ती) |
| ८६ | ७७० | ३१/०३/२०२२ | प्र.क्र.५मध्ये गणेशनगर,भामरे नगर,रामकृष्ण नगर,केले नगर, इंद्रप्रस्थ नगर भागात कॉंक्रीट गटार करणे. | १९,८४,०५२/- | आर्थिकदुर्बल घटकयोजने अंतर्गत |
| ८७ | ७७१ | ३१/०३/२०२२ | प्र.क्र.१ मध्ये श्रमसाफल्य कॉलनी मध्ये काळु पानपाटील ते कमलाकर रावसाहेब यांचे घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | १९,९४,१७०/- | मनपा निधी सन२०२१-२२ अंतर्गत |
| ८८ | ७७२ | ३१/०३/२०२२ | प्र.क्र.१मध्ये जय मल्हार नगर मधील ओपनस्पेस सुशोभिकरण करणे. | ११,२९,४४२/- | मनपा निधी सन २०२१-२२ अंतर्गत |
| **अ.क्र.** | **कार्या.क्रं.** | **दिनांक** | **कामाचे नाव** | **रक्कम** | **निधी** |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | १ | ०६/०४/२०२२ | प्र.क्र.१९ अंबिका नगर येथे अग्रवाल यांचे घरापासून आणि सलीम अन्सारी खलील बिहिन यांचे घरापावेतो रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | १४,९२,०८८/- | आमदार स्थानिक विकास कार्यक्रम सन २०२१-२२ अंतर्गत |
| २ | २ | ०६/०४/२०२२ | प्र.क्र.१३मध्ये ४० गाव रोड फ्रुट दुकाना पासून ते मेकनिकल शॉप पर्यंत रस्ता कॉंक्रीट करणे. | ११,९९,८३५/- | आमदार स्थानिक विकास कार्यक्रम सन २०२१-२२ अंतर्गत |
| ३ | ४ | २६/०४/२०२२ | प्र.क्र.१८मध्ये श्री.फारूक अन्वर शाह आमदार धुळे शहर यांचे निधीतून समतानगर येथे अमर मोरे घर ते किरण खेडकर यांच्या घरापावेतो रस्ता डांबरीकरण करणे. | १९,९४,१७०/- | आमदार स्थानिक विकास कार्यक्रम सन २०२१-२२ अंतर्गत |
| ४ | ५ | २६/०४/२०२२ | श्री.फारूक अन्वर शाह आमदार धुळे शहर यांचे निधीतून प्र.क्र.१८समता नगर पत्रकार बाबा पाटील घरा समोरील मोकळ्या जागेला संरक्षण भिंत बांधणे. | ९,९९,७२६/- | आमदार स्थानिक विकास कार्यक्रम सन २०२१-२२ अंतर्गत |
| ५ | ९ | २७/०४/२०२२ | प्र.क्र.१८ मध्ये श्री.फारूक अन्वर शाह आमदार धुळे शहर यांचे निधीतून मोहाडी श्री.कैलास गर्दे यांच्या घरापासुन ते सौभाग्य ब्युटीपार्लर पावेतो रस्ता कॉंक्रीट करणे | १४,९७,११२/- | आमदार स्थानिक विकास कार्यक्रम सन २०२१-२२ अंतर्गत |
| ६ | ११ | ०२/०५/२०२२ | प्र.क्र.११ मध्ये माणिक नगर येथे मुश्ताक अन्सारी यांचे घरापासून ते फुलाबाई यांचे घरापर्यंत रस्ता कॉंक्रीट करणे. | १४,९६,५०१/- | आमदार स्थानिक विकास कार्यक्रम सन २०२१-२२ अंतर्गत |
| ७ | १३ | ०५/०५/२०२२ | शेलारवाडी भागात १० सीट सार्व.शौचालय बांधणे. | १९,७४,८३२/- | १४ व्या वित्त आयोगा अंतर्गत सन २०२०-२१ |
| ८ | १४ | ०६/०५/२०२२ | कबीरगंज सोसायटी भागात १० सीट सार्व.शौचालय बांधणे. | १९,७४,८३२/- | १४ व्या वित्त आयोगा अंतर्गत सन २०२०-२१ |
| ९ | १५ | ०६/०५/२०२२ | आदिवासी वस्ती येथे १० सीट सार्व.शौचालय बांधणे. | १९,७४,८३२/- | १४ व्या वित्त आयोगा अंतर्गत सन २०२०-२१ |
| १० | १६ | ०६/०५/२०२२ | देवपूर दैठणकर नगर भागात१० सीट सार्व.शौचालय बांधणे. | १९,७४,८३२/- | १४ व्या वित्त आयोगा अंतर्गत सन २०२०-२१ |
| ११ | १८ | ०६/०५/२०२२ | स्लॉटर हाउस मागील भागात १० सीट सार्व.शौचालय बांधणे | १९,७४,८३२/- | १४ व्या वित्त आयोग अंतर्गत सन २०२०-२१ |
| १२ | १९ | ०६/०५/२०२२ | आझाद नगर भोईवाडा येथे १०सीट सार्व.शौचालय बांधणे. | १९,७४,८३२/- | १४ व्या वित्त आयोगा अंतर्गत सन २०२०-२१ |
| १३ | २० | १०/०५/२०२२ | प्र.क्र.१५ मध्ये यशवंत नगर गोविंद बारकर घर ते संतोष देवकर घरापावेतो रस्ता कॉंक्रीट करणे. | १९,९५,२३६/- | भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजना सन २०२१-२२ अंतर्गत |
| १४ | २३ | १७/०५/२०२२ | वलवाडी शिवार इंद्रप्रस्थ कॉलनी गोंदूर रोड ते देविदास बोरसे घरापावेतो कॉंक्रीट रस्ता करणे. | १५००६६२ | भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजना सन २०२१-२२ अंतर्गत |
| १५ | २४ | १७/०५/२०२२ | प्र.क्र.५ मध्ये मयूर हायस्कुल जवळील सर्व्हे नं.५६/२ व ५९/१ मधील ओपनस्पेसलाकंपाऊंड वॉल बांधणे.. | १९९९७५६ | जिल्हा वार्षिक योजना अंतर्गत (सर्वसाधारण) सन २०२१-२२ |
| १६ | २५ | १७/०५/२०२२ | प्र.क्र.५ मध्ये अनमोल नगर भागातील स.नं.७५/४ मधील शासकीय मोकळ्या जागेला कंपाऊंड वॉल बांधणे.. | १९९८५५५ | जिल्हा वार्षिक योजना अंतर्गत (सर्वसाधारण) सन २०२१-२२ |
| १७ | २६ | १७/०५/२०२२ | प्र.क्र.५ मध्ये विजय पोलीस कॉलनी भागातीलस.नं.४०/२ शासकीय मोकळ्या जागेला कंपाऊंड वॉल बांधणे.. | १९९९२८२ | जिल्हा वार्षिक योजना अंतर्गत (सर्वसाधारण) सन २०२१-२२ |

सही/-x x x

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक: :-१०६ पाणीपुरवठा केंद्र निगा व दुरुस्ती अंतर्गत धुळे मनपा हद्दीतील प्र.क्र. 12 मध्ये जनता सोसायटी भागात IHDPE पाईप लाईन टाकणेचे काम तांतडीने विना निविदा करुन घेण्यांत आले

त्यासाठी झालेला खर्च 1,46,794/- मात्र खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

| | |
|---|---|
| म.नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले. |
| म. बन्सीलाल जाधव | विषय मंजूर करण्यांत यावा. |
| म.खान मो. साबीर | विषय मंजूर करण्यांत यावा. |
| म. सभापती | सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे. |

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ११२ दिनांक ३०/०६/२०२२**

पाणीपुरवठा केंद्र निगा व दुरुस्ती अंतर्गत धुळे मनपा हद्दीतील प्र.क्र. १२ मध्ये जनता सोसायटी भागात IHDPE पाईपलाईन टाकणे असे काम सन्मा सदस्य अमीन अब्दुल करीम पटेल यांनी सुचविले असून स्थायी समिती समेत त्यांच्या प्रभागात पाणीपुरवठा विस्कळीत झाल्याची तक्रार केली होती. त्यानुसार उक्त कामाची प्रत्यक्ष पाहणी केली असता पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी नविन HDPI पाईपलाईन टाकणे अत्यंत गरजेचे असल्याने सदर भागात समक्ष पाहणी करून अंदाजपत्रक तयार केले असता उक्तकामी अंदाजपत्रकीय खर्च रु.१,४६,७९४/- मात्र येणार आहे.

तरी उक्त काम हे नागरिकांचा पिण्याचा पाणीचा प्रश्नाशी निगडीत असल्याने सदरचे काम विनानिविदा श्री. गौरव विजय बुरकुले ,ठेकेदार धुळे यांचे कडून करून घेण्यात आले असून या कामास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 67 (3) (क)नुसार धुळे महानगरपालिकेच्या सन २०२१-२२ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात पाणी पुरवठा केंद्र निगा व दुरुस्ती या लेखाशिर्षातून येणारा खर्च रु.१,४६,७९४/- मात्र खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री. बन्सीलाल माणिक जाधव
अनुमोदक :- श्री. खान मोहम्मद साबीर मुहिबुल्लाह

**सर्वानुमते मंजुर,**
सही/-x x x
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक:-१०७ | धुळे मनपा आर्कीटैक्ट पॅनलवर श्री.भुपेश पाटील ॲण्ड असोसिएटस,आर्किटेक्ट ॲण्ड इंटेरिअर डिझाईनस, धुळे यांची विना निविदा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण 5 (2) (2) अन्वये नियुक्ती करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे. |
| म. नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले. |
| म.संजय जाधव | टिपणीचे वाचन करण्यांत यावे. |
| म. नगरसचिव | नगरसचिव यांनी टिपणीचे वाचन केले. |
| म.नरेंद्र चौधरी | विषय मंजूर करण्यांत यावा. |
| म.हर्षकुमार रेलन | यासाठी निविदा मागवून काम करता आले असते. |
| म. सभापती | अधिनियमातील तरतूदनुसार विना निविदा प्रस्ताव सादर झालेला आहे. |
| म. किरण अहिरराव | विषय मंजूर करण्यांत यावा. |
| म. सभापती | सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे. |

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ११३ दिनांक ३०/०६/२०२२**

श्री.भुपेश पाटील ॲण्ड असोसिएटस् आर्कीटेक्ट ॲण्ड इंटेरिअर डिझाईनर्स, धुळे ही फर्म आर्कीटेक्ट व्यवसायात कार्यरत आहे ही फर्म शास कीय निमशासकीय स्थानिक स्वराज्य संस्थासाठी / असल्याने धुळे मनपा कामे करीत मालकीच्या देवपूर स.नं.१११/११२ या जागेवर मंजूर अभिन्यासातील ८०९३.६४ चौ.मी.पैकी जागेवर कोविड हॉस्पिटल बांधकामा साठी आर्कीटेक्ट व प्रकल्प सल्लागार म्हणून काम करणेसाठी वाटाघाटी अंती ०.६०% दराने काम करण्यास तयार असल्याने त्यांना धुळे मनपा आर्कीटेक्ट पॅनलवर आर्कीटेक्ट म्हणून नियुक्त करणे बाबत कळविले आहे.

सदर कामाबाबत धुळे मनपा ठराव नं.८१दि.२७/१/२०२२ नुसार मे. महासभेच्या ठराव झालेला आहे.सदरचे काम जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत करणेत येणार आहे.

याबाबत मा.अति.आयुक्त सो.यांनी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे प्रकरण ५ (२) (२) अन्वये विना निविदा श्री.भुपेश पाटील यांना आर्किटेक्ट पॅनलवर नियुक्ती करणेसाठी स्थायी समितीपुढे प्रकरण सादर केला असता मान्यतेस्तव सादर असा अभिप्राय नोंदविलेला आहे.

तसेच यावर म.आयुक्त यांनी मान्यता दिलेली असून धुळे मनपा आकिटेक्ट पॅनलवर श्री.भुपेश पाटील आकिटेक्ट,धुळे यांची नेमणूक करणे कामी सदरचा विषय मे. स्थायी समितीची मंजुरी घेणे आवश्यक असल्याने मे.स्थायी समितीपुढे मंजुरीस्तव सादर झाला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून आकिटेक्ट श्री. भुपेश पाटील यांना आर्किटेक्ट पॅनलवर नियुक्ती देणेस तसेच वाटाघाटी अंती निश्चित झालेले दर ०.६० टक्के मात्रला कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

सुचक :- श्री. नरेश रुपला चौधरी
अनुमोदक :- श्री. किरण हरिश्चंद्र अहिरराव

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक:-१०८ | धुळे महानगरपालिकेतील मानधनावरील अ.नं. १ ते १३ वाहन चालक यांना ६ महिने मुदतवाढ देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे. |
| म. नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले. |
| म.खान मो. साबीर | विषय मंजूर करण्यांत यावा. |
| म. बन्सीलाल जाधव | विषय मंजूर करण्यांत यावा. |
| म.सभापती | सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे. |

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ११४ दिनांक ३०/०६/२०२२**

धुळे महानगरपालिकेतील मानधनावरील १ ते १३ वाहन चालक यांना मुदतवाढ देणे बाबत फेर नियुक्ती देणेबाबत मंजुरी देणेत आलेली होती.

त्यानुसार खालील वाहन चालक यांना ०५ दिवसाचा सेवा खंड देवून ६ महिने कालावधी करीता एकत्रित मानधनावर नियुक्ती देणेत आलेली होती.

खालील १ ते १३ वाहन चालक यांनी ६ महिने करीता फेर नियुक्ती मिळणेबाबत विनंती अर्ज सादर केलेला आहे. त्यानुसार खालील वाहन चालक यांची मुदत त्यांच्या नावासमोर नमुद केलेल्या दिनांकास संपुष्ठात आलेली आहे.

| अ क्र. | कर्मचारीचे नाव | पद | मानधन रु | मुदत संपुष्ठात आल्याची दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | प्रशांत नामदेव मुर्तडक | वाहन चालक | १२०००/- | २१/५/२०२२ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २ | प्रशांत राजेंद्र बाबर | वाहन चालक | १२०००/- | २१/५/२०२२ |
| ३ | शाम भटू खंदरकर | वाहन चालक | १२०००/- | २१/५/२०२२ |
| ४ | प्रदिप श्री किसन कांबळे | वाहन चालक | १२०००/- | २१/५/२०२२ |
| ५ | गोपाल सिताराम माळी | वाहन चालक | १२०००/- | २१/५/२०२२ |
| ६ | सिध्दार्थ महेशराव खैरनार | वाहन चालक | १२०००/- | २१/५/२०२२ |
| ७ | आबासाहेब रमेश नेरकर | वाहन चालक | १२०००/- | २१/५/२०२२ |
| ८ | निलेश रामभाऊ सोनवणे | वाहन चालक | १२०००/- | ११/५/२०२२ |
| ९ | विजय दिलीप माळी | वाहन चालक | १२०००/- | ११/५/२०२२ |
| १० | राहुल जिजाबराव पाटील | वाहन चालक | १२०००/- | ११/५/२०२२ |
| ११ | विनोद प्रल्हाद थोरात | वाहन चालक | १२०००/- | ११/५/२०२२ |
| १२ | चित्ते ईश्वर राजेश | वाहन चालक | १२०००/- | ११/५/२०२२ |
| १३ | अविनाश दाजी कुवर | वाहन चालक | १२०००/- | ११/५/२०२२ |

उक्त वाहन चालक ज्या विभागात काम करीत आहे त्या विभाग प्रमुखांनी सादर केलेल्या अभिप्रायानुसार वाहन चालकांची आवश्यकता व निकड पाहता वरील प्रमाणे १ ते १३ वाहन चालकांना बाहय स्त्रोत प्रणाली मनुष्यबळ मिळेपर्यंत मुदत संपल्याच्या दिनांकापासून ५ दिवसाचा सेवा खंड करुन एकत्रित मानधनावर नियुक्ती देणेबाबतचा विषय महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ (३) नुसार उक्त १ ते १३ मानधनावरील वाहन यांना पुनश्च: ६ महिने कालावधीची मुदत वाढ देणेबाबतचा विषय मे. स्थायी समितीपुढे सादर करणेबाबत अहवाल सादर करणेत आलेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून अ.नं. १ ते १३ मानधनावरील वाहन यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ (३) नुसार ६ महिने कालावधीसाठी एकत्रित मानधन रु १२०००/-मात्र पुनश्च: मुदतवाढ देण्यांस मान्यता देण्यात येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी.याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री. खान मोहम्मद साबीर मुहिबुल्लाह
अनुमोदक:- श्री. बन्सीलाल माणिक जाधव

**सर्वानुमते मंजुर,**
सही/-x x x
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-१०९ — मुलभूत सोई सुविधांचा विकास अंतर्गत सन 2020-21 प्र.क्र.7 मध्ये हमारा मेडिकल ते शाहीद शाह यांचे घरापावेतो व मोगलाई क्लिनिक ते गवळी वाडा पर्यंत जमील शाह यांचे घरापासून ते गवळी आप्पा यांचे घरापर्यंत गटार व रस्ता करणे व पथदिवे व पोल बसविणे बाबत निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. प्रतिभाताई चौधरी — विषय मंजूर करण्यांत यावा.

म.किरण कुलेवार — विषय मंजूर करण्यांत यावा.

म.सभापती — सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ११५ दिनांक ३०/०६/२०२२**

मुलभूत सोई सुविधांचा विकास अंतर्गत सन २०२०-२१ प्र.क्र.७ मध्ये हमारा मेडिकल ते शाहीद शाह यांचे घरापावेतो व मोगलाई क्लिनिक ते गवळी वाडा पर्यंत जमील शाह यांचे घरापासून ते गवळी आप्पा यांचे घरापर्यंत गटार व रस्ता करणे व पथदिवे व पोल बसविणे बाबतच्या कामास धुळे महानगरपालिका मे.स्थायी समिती ठराव नं.-दि / /२०अन्वये मंजुरी दिलेली आहे. तसेच मा. जिल्हाधिकारी सो.धुळे महानगरपालिका यांनी टिपणी मंजुरीने दि.१०/०३/२०२२ अन्वये उक्त कामा बाबत रक्कम रु.७३,८७,४८३/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे सुधारित पत्र क्र./ ७४५/२० दि. २८/०२/२०२२अन्वये रक्कम रु.७३,८७,४८३/-मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./ धुमपा / पा.पु.वि./१४८०/२० दि. १४/०३/२०२२ रोजी दैनिक समाज सारथी या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.०१/०४/२०२२ पर्यंत निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदे बाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेली आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदार किंवा ठेकेदाराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | श्री.व्ही.आर.पवार | अंदाजपत्रकीय दराने | सर्वात कमी दर |
| २ | मे.एकविरा कन्सट्रक्शन | शे.२% जास्त | |
| ३ | मे.हिंद कन्सट्रक्शन | शे.३.०० % जास्त | |

सदर तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता श्री.व्ही.आर.पवार यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे ७३,८७,४८३/-इतक्या रक्कमेचे असून अंदाजपत्रक दराने आहे.

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून श्री.व्ही.आर.पवार यांचे दर अंदाजपत्रकीय आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार श्री.व्ही.आर.पवार यांची अंदाजपत्रकीय दराने आलेले निविदा दर मंजुरीस्तव तसेच अन्य काम न मिळालेले ठेकेदारांना त्यांची बयाणा रक्कम परत करणे बाबत मंजुरीस्तव मे.स्थायी समिती समोर सादर झाला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी श्री. व्ही. आर. पवार यांची अंदाजपत्रकीय दराने आलेले निविदा दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनयम कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी.याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- सौ. प्रतिभाताई शिवाजीराव चौधरी

अनुमोदक:- सौ. किरण राकेश कुलेवार

**सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

# धुळे महानगरपालिका,धुळे

## नगरसचिव कार्यालय

## स्थायी समिती सभा क्रमांक १८ चे इतिवृत्त

---

**धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह, धुळे**
**गुरुवार दिनांक २१/०७/२०२२**
**वेळ सकाळी ११-०० वाजतां**

धुळे महानगरपालिकेची स्थायी समितीची साप्ताहिक सभा क्रं.१८ आज गुरुवार दिनांक **२१/०७/२०२२** रोजी सकाळी ११.०० वाजतां श्री.शितल मोहन नवले, सभापती, स्थायी समिती, मनपा धुळे यांच्याअध्यक्षतेखाली **धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह** भरली. या सभेस खालील सन्मा.सदस्य हजर होते.

| अ.क्रं. | सदस्यांचे नांव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री.नवले शितल मोहन | सभापती |
| २ | श्री. जाधव संजय सुधाकर | सदस्य |
| ३ | श्री. बोरसे नागसेन दामोदर | सदस्य |
| ४ | श्रीमती कुलेवार किरण राकेश | सदस्या |
| ५ | श्री.जाधव बन्सीलाल माणिक | सदस्या |
| ६ | श्रीमती चौधरी मंगला अर्जुन | सदस्या |
| ७ | श्री.अन्सारी फातमा नुरुल अमीन | सदस्या |
| ८ | श्री.चौधरी नरेंद्र रुपला | सदस्य |
| ९ | श्रीमती.चौधरी प्रतिभा शिवाजीराव | सदस्या |
| १० | श्री. अहिरराव किरण हरिश्चंद्र | सदस्य |
| ११ | श्री. रेलन हर्षकुमार राधेश्याम | सदस्य |
| १२ | श्रीमती अग्रवाल सारिका प्रविन | सदस्या |
| १३ | श्री.अन्सारी अब्दुल लतीफ अब्दुल हमीद | सदस्य |
| १४ | श्री.खान मोहम्मद साबीर मुहिबुल्लाह | सदस्य |
| १५ | श्रीमती पठाण नाजियाबानो नासिर खा | सदस्या |

उपस्थित अधिकारी गण

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. देविदास टेकाळे | आयुक्त |
| २ | श्री. नितीन कापडणीस | अति. आयुक्त |
| ३ | श्रीमती शिल्पा नाईक | उपायुक्त |
| ४ | श्रीमती डॉ.संगिता नांदुरकर | उपायुक्त |
| ५ | श्री. मनोज अरविंद वाघ | नगरसचिव |
| ६ | श्री. गजानन पाटील | मुख्य लेखाधिकारी |
| ७ | श्री.के.एन. शिंदे | अभियंता |
| ८ | श्री. राजेश वसावे | प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक |
| ९ | श्री. विकास साळवे | मलेरिया पर्यवेक्षक |
| १० | श्री.पी. डी. चव्हाण | ओव्हरसिअर बांधकाम विभाग |
| ११ | श्री. संजय मोरे | लिपीक आस्थापना विभाग |

| | | |
|---|---|---|
| १२ | श्री. किशोर सुडके | प्र.परवाना अधिक्षक तथा बाजार विभाग प्रमुख |
| १३ | श्री. एन.के. बागुल | विद्युत अभियंता |
| १४ | श्री. राजेश गायकवाड | लेखापाल मनपा शि. मंडळ |
| १५ | श्री. प्रसाद जाधव | अतिक्रमण विभाग प्रमुख |
| १६ | श्री. सुक्राम राऊत | वाहन विभाग |

मा. सभापती — सन्मा.सदस्य मा. आयुक्त सो. सर्व अधिकारी कर्मचारी व पत्रकार, छायाचित्रकर बांधव यांचे मी स्थायी समितीच्या बैठकीत स्वागत करतो. सभेचा कोरम पुर्ण झाला असुन नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरु करावे.

म. नगरसचिव — वंदे मातरम् या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

**सभेच्या सुरुवातीस आलेल्या श्रध्दांजलीच्या यादया**

१) धुळे शहरात रहिवास करणारे तत्कालीन धुळे नगरपालिकेचे ज्येष्ठ व अभ्यासु नगरसेवक तसेच सिंधी समाजाचे पुज्य बहावलपुरी पंचायतचे माजी अध्यक्ष नंदलाल किशनलाल तनेजा उर्फ एन.के. तनेजा यांचे नुकतेच वृध्दापकाळाने खैरतल (राजस्थान) येथे दु:खद निधन झाले. आज रोजीच्या स्थायी समिती सभेत स्व.एन. के. तनेजा यांना श्रध्दांजली वाहून तसा ठराव पारीत करण्यांत यावा.

**सुचक :- श्री. शितल मोहन नवले, सभापती, स्थायी समिती मनपा धुळे**

**२)** महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या बसला दि. १८/०७/२०२२ रोजी इंदौर अमळनेर मध्यप्रदेशातील धार येथे पुलावरुन थेट नदीमध्ये पडुन अपघात झाला होता. जळगांवच्या अमळनेरकडे निघालेली ही बस पुलावरुन खाली कोसळून झालेल्या अपघातात १३ प्रवाशांचा मृत्यू झाला आहे. यामध्ये ८ पुरुष ४ स्त्रियां व एका बालकाचा समावेश होता. यापैकी चौघे जण अमळनेरचे रहिवासी होते.अशा या दुर्दैवी अपघातात मृत्यू झालेल्या नागरीकांना आजच्या स्थायी समिती सभेत श्रध्दांजली वाहून तसा ठराव पारीत करण्यांत यावा ही विनंती.

**सुचक :- सौ. प्रतिभाताई शिवाजीराव चौधरी, नगरसेविका, मनपा धुळे**

म. सभापती — सन्मा. सदस्यांच्या यादीनुसार श्रध्दांजलीचा ठराव पारीत करण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ११६ दिनांक २१/०७/२०२२**

सन्मा. सभापती व सदस्यांच्या यादीनुसार धुळे शहरात रहिवास करणारे तत्कालीन धुळे नगरपालिकेचे ज्येष्ठ व अभ्यासु नगरसेवक तसेच सिंधी समाजाचे पुज्य बहावलपुरी पंचायतचे माजी अध्यक्ष नंदलाल किशनलाल तनेजा उर्फ एन.के. तनेजा यांचे नुकतेच वृध्दापकाळाने खैरतल (राजस्थान) येथे दु:खद निधन झाले आहे.तसेच महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या बसला दि. १८/०७/२०२२ रोजी इंदौर अमळनेर मध्यप्रदेशातील धार येथे पुलावरुन थेट नदीमध्ये पडुन अपघात झाला होता. जळगांवच्या अमळनेरकडे निघालेली ही बस पुलावरुन खाली कोसळून झालेल्या अपघातात १३ प्रवाशांचा मृत्यू झाला आहे. यामध्ये ८ पुरुष ४ स्त्रिया व एका बालकाचा समावेश होता. यापैकी चौघे जण अमळनेरचे रहिवासी होते.अशा या दुर्दैवी अपघातात मृत्यू झालेल्या नागरीकांचा समावेश आहे.

वरील मान्यवरांचे दु:खद निधनामुळे या सभेस आतीव दु:ख होत आहे ही सभा संबंधितांचे दु:खात सहभागी असून मृत आत्म्यांस चिरशांती प्रदानार्थ दोन मिनिटे मौन उभे राहून भावपूर्ण श्रध्दांजली समर्पित करीत असून त्याबाबतचा ठराव पारीत करण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**
सही/-X X X
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

**सन्मा. सभापती महोदयांकडून आलेला अभिनंदनाचा प्रस्ताव**

मा. सुप्रीम कोर्टाच्या अंतिम निकालानंतर ओबीसी समाजाच्या आरक्षणास मान्यता देण्यांत आली. भारतीय जनता पार्टीचे नेते मा.श्री.देवेंद्रजी फडणवीस साहेब तसेच ओबीसी प्रदेश अध्यक्ष योगेश अण्णाजी केळकर यांनी पूर्णपणे अभ्यास करुन याबाबत आवाज उठवून ओबीसी समाजाला राजकारणामध्ये२७ टक्के आरक्षण देणेकामी महत्वपूर्ण भूमिका बजावली. तसेच मा. सुप्रिम कोर्टाने येणा-या सर्व निवडणूका या ओबीसी आरक्षणातच घेण्यात याव्या असे आदेश दिलेत व ओबीसी समाजाला न्याय दिलेला आहे यांचे सारे श्रेय भारतीय जनता पार्टीचे आहे.

तरी आज रोजीच्या स्थायी समितीच्या सभेमध्ये भारतीय जनता पार्टीच्या अभिनंदनाचा ठराव पारीत करण्यांत यावा ही विनंती.

**सुचक :- श्री. शितल मोहन नवले, सभापती, स्थायी समिती, मनपा धुळे**

म. सभापती — आज राज्याचे मुख्यमंत्री श्री.एकनाथजी शिंदे व उपमुख्यमंत्री आदरणीय श्री. देवेंद्रजी फडणवीस यांनी सत्तेवर येवून घेतलेल्या निर्णयानुसार मा. सुप्रीम कोर्टाने ओबीसी समाजाला २७ टक्के आरक्षण कायम ठेवणेसंदर्भात अत्यंत महत्वपूर्ण निर्णय दिलेला आहे. त्याबद्दल मा. मुख्यमंत्री श्री.एकनाथजी शिंदे सो., उपमुख्यमंत्री आदरणीय श्री.देवेंद्रजी फडणवीस सो.अभिनंदनाचा ठराव पारीत करणेत येत आहे.

म. खान मोह. साबीर — सभापती महोदय,सदर निर्णय सुप्रीम कोर्टाने दिलेला आहे.तरी सुप्रीम कोर्टाचा देखील अभिनंदनाचा ठराव करावा ही विनंती.

म. सभापती — सदर अभिनंदन प्रस्तावात मा. सुप्रीम कोर्टाचे अभिनंदनाचा ठराव सर्वानुमते पारीत करण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ११७ दिनांक २१/०७/२०२२**

मा.सुप्रीम कोर्टाच्या अंतिम निकालानंतर ओबीसी समाजाच्या आरक्षणास मान्यता देण्यांत आली. भारतीय जनता पार्टीचे नेते मा.श्री.देवेंद्रजी फडणवीस साहेब तसेच ओबीसी प्रदेश अध्यक्ष योगेश अण्णाजी केळकर यांनी पूर्णपणे अभ्यास करुन याबाबत आवाज उठवून ओबीसी समाजाला राजकारणामध्ये२७ टक्के आरक्षण देणेकामी महत्वपूर्ण भूमिका बजावली. तसेच मा. सुप्रिम कोर्टाने येणा-या सर्व निवडणूका या ओबीसी आरक्षणातच घेण्यात याव्या असे आदेश दिलेत व ओबीसी समाजाला न्याय दिलेला आहे यांचे सारे श्रेय भारतीय जनता पार्टीचे आहे.

राज्याचे मुख्यमंत्री श्री.एकनाथजी शिंदे व उपमुख्यमंत्री आदरणीय श्री.देवेंद्रजी फडणवीस यांनी सत्तेवर येवून घेतलेल्या निर्णयानुसार मा. सुप्रीम कोर्टाने समाजाला २७ टक्के आरक्षण कायम ठेवणेसंदर्भात अत्यंत महत्वपूर्ण निर्णय घेतला आहे. त्याबद्दल मा. मुख्यमंत्री श्री. एकनाथजी शिंदे सो.,उपमुख्यमंत्री आदरणीय श्री.देवेंद्रजी फडणवीस सो. तसेच सुप्रीम कोर्ट व भारतीय जनता पार्टीचा अभिनंदनाचा ठराव सर्वानुमते पारीत करण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**

सही/-X X X

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- ११० — मागील स्थायी समिती सभांचे इतिवृत्त क्रमश: वाचून कायम करणे. (दि.१०/६/ २०२२)

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. नागसेन बोरसे — सभापती महोदय, मागील सभेचे इतिवृत्तामधील विषय क्रं. १०३ नंबरचा विषय आहे ॲब्युलन्स संदर्भात गेल्या मिटींगला थोडे उशिरा आलो होतो. विषय क्रं. १०५ चा विषय सुरु होता तेव्हा आलो होतो. त्यामुळे विषय क्रं. १०३ या विषयाला माझा विरोध नोंदवून घ्यावा अशी विनंती आहे. तसेच विषय क्रं. १०९ क्रमांकाचा विषयामध्ये ठराव करतांना वेगळी नोंद व इतिवृत्तात वेगळी नोंद झाली आहे. इतिवृत्तातमध्ये देवर्षी एन्टरप्राईजेस यास सर्वात कमी ६७,४८,०००/-मात्रला अधिनियम ७३ अन्वये मान्यता देण्यांत येत आहे प्रशासनाने आवश्यक त्या अटी शर्तीचा समावेश करुन करारनामा करण्यांत यावा सदर प्रस्ताव व लेखा आक्षेप होणार नाही याची दक्षता घ्यावी याबाबत जबाबदारी संबंधित विभागाची राहील. सुचक हर्षकुमार रेलन व अनुमोदक खान मोहम्मद साबीर माझ्याकडे सही शिक्क्यासहीत प्रत आहे. तुम्ही दिलेल्या ठरावात त्यात असे म्हटले आहे महाराष्ट्र मनपा अधिनियम ७३ अन्वये मान्यता देण्यांत येत आहे सदर ॲब्यूलन्ससाठी आरोग्य सेवा आयुक्तालय महाराष्ट्र राज्य यांच्या आवश्यक त्या अटी व शर्ती सह स्पेसिफिकेशनला तांत्रिक मान्यता दिली आहे म्हणजे कराराला मान्यता दिलेली नाही त्यानुसार असलेल्या अटी व शर्ती बाबत तसेच प्राप्त निविदा दराबाबत प्रशासनाने खातरजमा करावी व मनपाच्या हिताच्या दृष्टीने निर्णय घ्यावा सदर प्रसताबाबाबत आक्षेप होणार नाही यांची नोंद घ्यावी. असे नमूद आहे. इतिवृत्तात सदर बाब दिसून येत नाही तसेच या ठरावाबाबत काय निर्णय घेतला प्रशासनाने खुलासा करावा.

म. सभापती — नगरसचिव यांनी सदर बाब तपासून घ्यावी व त्याप्रमाणे आवश्यक ती सुधारणा करावी आपण नमूद केलेला ठराव बरोबर आहे. आपणास याबाबत लेखी स्वरुपात कळविण्यांत येईल. तसेच ॲब्युलन्स खरेदी बाबत झालेली पुढील कार्यवाही आपणास लेखी अवगत करण्यांत येईल.

म. नरेंद्र चौधरी — मागील सभेचे इतिवृत्त क्रमश: वाचून कायम करण्यांत यावे.

म.सभापती — सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व केलेल्या सुचनांची नोंद घेवून व आवश्यक ती इतिवृत्तांत दुरुस्ती करुन मागील स्थायी समिती सभेचे इतिवृत्त क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ११८ दिनांक २१/०७/२०२२**

मागील स्थायी समिती सभा दिनांक १०/०६/२०२२ रोजीचे स्थायी समिती ठराव नंबर १०० ते १०९ अखेर तसेच सभेत झालेली चर्चा व त्यावरील निर्णय क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

सही/-X X X

**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- १११ — मा.आयुक्त सो. यांनी त्यांचे आलेल्या अधिकारात रुपये ५ लाख ते २५ लाखापर्यत बांधकाम विभागाकडील विकास कामाची दि.२४/०५/२०२२ ते दि.२८/०६/२०२२ अखेर निर्गमित केलेल्या कार्यादेशाची यादी अवलोकनार्थ सादर.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.किरण अहिरराव — विषयाचे अवलोकन करण्यांत आले आहे.

म. सभापती — म.आयुक्त सो. यांनी त्यांचे आलेल्या अधिकारात रुपये ५ लाख ते २५ लाखापर्यत बांधकाम विभागाकडील विकास कामाची दि.२४/०५/२०२२ ते दि.२८/०६/२०२२अखेर निर्गमित केलेल्या कार्यादेश अवलोकन करण्यांत आले.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ११९ दिनांक २१/०७/२०२२**

मा.आयुक्त सो. यांना त्यांचे आलेल्या अधिकारात रुपये ५ लाख ते २५ लाखापर्यत बांधकाम विभागाकडील विकास कामाची दि.२४/०५/२०२२ ते दि.२८/०६/२०२२अखेर निर्गमित केलेल्या कार्यादेशाची यादी अवलोकनार्थ सादर.

**धुळे महानगरपालिका धुळे (बांधकाम विभाग)**

दिनांक :- दि. २४/०५/२०२२ ते दि.२८/०६/२०२२अखेर निर्गमित केलेल्या विकास कामांच्या कार्यादेशाची यादी

| अ.क्र | कार्या. कं. | दिनांक | कामाचे नाव | रक्कम | निधी |
| --- | --- | --- | --- | --- | --- |
| १ | २८ | २४/०५/२०२२ | प्र.क्र.१४ मध्ये जळगाव जनता कॉलनी भागात ड्रेनेज पाईप लाईन टाकणे. | १९९४३७० | मनपा निधी अंतर्गत सन २०२१-२२ |
| २ | २९ | २४/०५/२०२२ | प्र.क्र.२ मध्ये सर्व्हे नं.१११ व ११२ प्रभात नगर भागातील ओपनस्पेस मध्ये जॉगिंग ट्रॅक तयार करणे. | १९८९२२८ | मनपा निधी अंतर्गत सन २०२१-२२ |
| ३ | ३० | २४/०५/२०२२ | प्र.क्र.१७ मध्ये दगडी चाळ गेट पासून ते शौचालय पावेतो रस्ता डांबरीकरण करणे. | १९९३४८५ | महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान जिल्हास्तरीय योजना अंतर्गत सन २०२१-२२ |
| ४ | ३१ | २४/०५/२०२२ | प्र.क्र.१७ मध्ये विखे नगर येथील श्री.राकेश ठाकूर ते श्री.चित्ते घरापावेतो रस्ता कॉंक्रीट करणे. | १२४९६०९ | महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान जिल्हास्तरीय योजना अंतर्गत सन २०२१-२२ |
| ५ | ३२ | २४/०५/२०२२ | प्र.क्र.१७ मध्ये श्रीकृष्ण कॉलनी श्री.खैरनार ते श्री.विक्रांत शिंदे ते मारुती मंदिर ते फुल देवरे यांच्या घरापावेतो रस्ता डांबरीकरण करणे. | २४९८७२५ | महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान जिल्हास्तरीय योजना अंतर्गत सन २०२१-२२ |
| ६ | ३८ | २५/०५/२०२२ | प्र.क्र.१३ मध्ये इसाक शाह यांचे घरापासून ते इब्राहीम पठाण यांचे घरापर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | ९९६६४४ | मनपा निधी अंतर्गत सन २०२१-२२ |
| ७ | ३९ | २५/०५/२०२२ | प्र.क्र.१३ मध्ये नंदी मंदिर भागात आबिद अंडेवाले यांचे घरापासून ते सलमान अन्सारी यांचे घरापर्यंत रस्ता कॉंक्रीट करणे. | ९९७२९४ | मनपा निधी अंतर्गत सन २०२१-२२ |
| ८ | ४१ | २५/०५/२०२२ | प्र.क्र.१८ मध्ये भोले बाबा नगर भागात रस्ता डांबरीकरण करणे. | २४९८३४४ | सहा.अनुदान अंतर्गत सन २०२१-२२ |
| ९ | ४८ | ३०/०५/२०२२ | प्र.क्र.१६ मधील रमेश नगर मध्ये राहुल कुलकर्णी ते ठाकरे यांच्या घरापावेतो रस्ता कॉंक्रीट करणे.. | १९९९२२३ | जिल्हा नगरोत्थान योजने अंतर्गत सन २०२१-२२ |
| १० | ४९ | ३०/०५/२०२२ | देवपूर पुरषोत्तम नगर येथील विनोद मंडपवाले घर ते भोईराज बंगल्या पावेतो रस्ता डांबरीकरण करणे. | -२४७९१२७ | जिल्हा नगरोत्थान योजने अंतर्गत सन २०२१-२२ |
| ११ | ५० | ३०/०५/२०२२ | प्र.क्र.१६ मध्ये वसंत सखाराम घर ते दशरथ भिल घरापावेतो रस्ता कॉंक्रीट करणे. | १४९९४८९ | जिल्हा नगरोत्थान योजने अंतर्गत सन २०२१-२२ |
| १२ | ५१ | ३०/०५/२०२२ | प्र.क्र.१६ मध्ये श्री.संजय गिरी पहेलवान घर ते मराठे घरापावेतो रस्ता डांबरीकरण करणे. | १४९८०६३ | जिल्हा नगरोत्थान योजने अंतर्गत सन २०२१-२२ |
| १३ | ५२ | ३०/०५/२०२२ | प्र.क्र.१५ मधील जवाहर नगर बाळू सिसोदे घर ते संत निरंकारी भवन पावेतो रस्ता डांबरीकरण करणे. | १२४६८६७ | जिल्हा नगरोत्थान योजने अंतर्गत सन २०२१-२२ |
| १४ | ५३ | ३१/०५/२०२२ | प्र.क्र.६ मध्ये भगवान देवचंद बागुल ते प्रताप जयराम बागुल यांचे घरापावेतो नकाणे येथे आदिवासी वस्तीत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे.. | ९९१४८४ | आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत सन २०२१-२२ |
| १५ | ५६ | ०६/०६/२०२२ | प्र.क्र.१८ मध्ये श्री.शाम जिरे घर ते शितोळे घरापावेतो बंदिस्त गटार करणे. | २४८८२२५ | महाराष्ट्र सुवर्ण जयंती जिल्हास्तरीय नगरोत्थान योजने अंतर्गत सन २०२१-२२ |
| १६ | ५७ | ०६/०६/२०२२ | प्र.क्र.१८ मध्ये भोलेबाबा नगर बाळू सुडके घर ते शरद गुरव घरापावेतो रस्ता कॉंक्रीट करणे. | २४९९१४५ | महाराष्ट्र सुवर्ण जयंती जिल्हास्तरीय नगरोत्थान योजने अंतर्गत सन २०२१-२२ |
| २१ | श्री. प्रसाद जाधव | अतिक्रमण विभाग प्रमुख |
| २२ | श्री. सुक्राम राऊत | वाहन विभाग |

मा. सभापती — सन्मा.सदस्य मा. आयुक्त सो. सर्व अधिकारी कर्मचारी व पत्रकार, छायाचित्रकर बांधव यांचे मी स्थायी समितीच्या बैठकीत स्वागत करतो. सभेचा कोरम पुर्ण झाला असुन नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरु करावे.

म. नगरसचिव — वंदे् मातरम् या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

सभेच्या सुरुवातीस आलेल्या श्रध्दांजलीच्या यादया

माजी स्थायी समिती सभापती श्री. सुनिलभाऊ बैसाणे यांच्या शालक भटू देवरे राहणार झोडगे यांचा मुलगा गौरव भटू देवरे यांचे आवी जवळ झालेल्या अपघातात दु:खद निधन झाले आहे. तरी त्यांना आजच्या सभेत भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करुन तसा ठरव पारीत करावा.

म. सभापती — सन्मा. सदस्यांच्या यादीनुसार श्रध्दांजलीचा ठराव पारीत करण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १३२ दिनांक ०४/०८/२०२२**

माजी स्थायी समिती सभापती श्री.सुनिलभाऊ बैसाणे यांच्या शालक भटू देवरे राहणार झोडगे यांचा मुलगा गौरव भटू देवरे यांचे आवी जवळ झालेल्या अपघातात दु:खद निधन झाले आहे.

या दु:खद निधनामुळे या सभेस आतीव दु:ख होत आहे. ही सभा संबंधितांचे दु:खात सहभागी असून मृत आत्म्यांस चिरशांती प्रदानार्थ दोन मिनिटे मौन उभे राहून भावपूर्ण श्रध्दांजली सर्मपित करीत असून त्याबाबतचा ठराव पारीत करण्यांत येत आहे.

सुचक:- सौ.प्रतिभाताई शिवाजीराव चौधरी

अनुमोदक:- श्री.शितलकुमार मोहन नवले, सभापती, स्थायी समिती — सर्वानुमते मंजुर,

सही/- x x x<br>
सभापती,<br>
स्थायी समिती,<br>
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-१२४ — मागील स्थायी समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे. (३०/६/२०२२)

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. किरण अहिरराव — इतिवृत्त वाचून कायम करण्यांत यावे.

म.सभापती — सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने मागील स्थायी समिती सभा दि. ३०/६/२०२२ चे इतिवृत्त क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १३३ दिनांक ०४/०८/२०२२**

मागील स्थायी समिती सभा दिनांक 30/06/2022 रोजीच्या सभेचे धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर 110 ते 115 तसेच सभेत सन्मा.सदस्यांनी उपस्थित केलेली चर्चा व त्यावरील निर्णय क्रमशः वाचून कायम करण्यांत येत आहे. सही/- x x x

सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- १२५ धुळे मनपा हद्दीतील भोई सोसायटी, क्षिरे कॉलनी, पद्मश्री टॉवर्स जवळ, मयूर कॉलनी व साठ खोली भागांत क्रॉस कनेक्शन करणे व बडगुजर जलकुंभ व चंडिका हॉटेल जवळील४५० mm चा व्हॉल दुरुस्त करणेचे कामे तांतडीची बाब म्हणून करुन घेण्यांत आले. त्यासाठी झालेला खर्च रु.४,५६,१५९/- मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७ (क) अन्वये विना निविदा करण्यास मंजुरी व खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. नरेंद्र चौधरी विषय मंजूर करण्यांत यावा.

म. किरण अहिरराव विषय मंजूर करण्यांत यावा.

म.सभापती सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १३४ दिनांक ०४/०८/२०२२**

धुळे मनपा हद्दीतील पाणीपुरवठा वितरण व्यवस्थेवरील तातडीने कामे करण्यासाठी जा.क्रं. धुमपा/बां.वि/४४,६६, १५,२१, ६३ या आदेशान्वये कार्यादेश देण्यात आले होते. तसेच काही ठिकाणी नागरिकांना अशुद्ध पाणीपुरवठा होत असल्याने तसेच काही भागांत नागरिकांना पाणीपुरवठा होत नसल्याने काही ठिकाणी तातडीने पाईपलाईन जोडण्याचे काम करणे आवश्यक होते.त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव |
|---|---|
| 1) | देवपूर भागांतील भोई सोसायटी /गणेश नगर भागांत श्री.एस.एम.पाटील यांच्या घराजवळील भागांत पाणीपुरवठा होत नसल्याबाबत तक्रार होती.त्याबाबत समक्ष पाहणी करून त्याठिकाणी 300 mm च्या मुख्य पाईपलाईन वरून अस्तित्वातील पाईपलाईन जोडणी द्वारे पाणीपुरवठा सुरळीत करण्यात आला. |
| 2) | नाटेश्वर जलकुंभावरील अभय कॉलेज भागांत पाणीपुरवठा होत नसल्याबाबत तक्रारी असल्याने त्याबाबत सदर ठिकाणी पाईपलाईन जोडणी करून व्हॉल बसवून पाणीपुरवठा सुरळीत करण्यात आला. |
| 3) | वाडीभोकर रोड वरील क्षिरे कॉलनी भागांत राम नगर जलकुंभावरील वितरण व्यवस्था क्षिरे कॉलनी जलकुंभावरून 4 इंची पाईपलाईन जोडणी करून व्हॉल बसवून पाणीपुरवठा सुरळीत करण्यात आला. |
| 4) | बडगुजर जलकुंभाच्या आवारातील मुख्य वितरण व्यवस्थेवरील व्हॉल नादुरुस्त झाल्याने तातडीने दुरुस्त करून पाणीपुरवठा सुरळीत करण्यात आला. |
| 5) | राम नगर व नेहरू नगर जलकुंभावरील 8 ईची वितरण व्यवस्थेच्या पाईपलाईन वर, पद्मश्री टॉवर्स जवळ 8 ईची व्हॉल बसवून पाणीपुरवठा सुरळीत करण्यात आला. |
| 6) | नाटेश्वर जलकुंभाच्या हॉटेल चंडिका जवळील मुख्य वितरण व्यवस्थेवरील व्हॉल नादुरुस्त झाल्याने तातडीने दुरुस्त करून पाणीपुरवठा सुरळीत करण्यात आला. |

| | |
|---|---|
| 7) | मयूर कॉलनी परिसरातील जुनी वितरण वाहिनी क्षिरे कॉलनी जलकुंभाच्या मुख्य पाईपलाईनला जोडणी करून पाणीपुरवठा सुरळीत करण्यात आला. |
| 8) | सरस्वती कॉलनी परिसरातील टेलीफोन कॉलनी कडे जाणारी जुनी वितरण वाहिनी तापी पाणीपुरवठाच्या पाईपलाईनला जोडणी करून पाणीपुरवठा सुरळीत करण्यात आला. |
| 9) | नेहरू नगर जलकुंभावरील 8 ईची वितरण व्यवस्थेच्या पाईपलाईन वर, जयहिंद सिनिअर कॉलेज गेट समोर 8 ईची व्हॉल बसवून पाणीपुरवठा सुरळीत करण्यात आला. |
| 10) | वाडीभोकर रोड परिसरातील जुनी वितरण वाहिनी क्षिरे कॉलनी जलकुंभाच्या मुख्य पाईपलाईनला श्री स्वामी समर्थ पेट्रोल पंपा समोर जोडणी करून पाणीपुरवठा सुरळीत करण्यात आला. |
| 11) | वाडीभोकर रोड परिसरातील जुनी वितरण वाहिनी क्षिरे कॉलनी जलकुंभाच्या मुख्य पाईपलाईनला जानकी नगर श्री.सोनवणे यांची घराजवळ जोडणी करून पाणीपुरवठा सुरळीत करण्यात आला. |
| 12) | नवरंग कॉलनी परिसरातील 4 इंची जुनी जलवाहिनी प्रेरणा हौ.सोसायटीच्या मुख्य जलवाहिनीस जोडून पाणीपुरवठा सुरळीत करण्यात आला. |

वरील सर्व कामे हे पाणी पुरवठा वितरण व्यवस्थेशी निगडीत असल्याने व तातडीने करणे गरजेचे असल्याने वरिष्ठांच्या आदेशानुसार सदरचे काम ठेकेदार श्री. संजय दगडू गायकवाड यांच्या मार्फत पुर्ण करून पाणी पुरवठा सुरळीत करण्यात आला आहे. त्यानुसार उक्त कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून सदर कामास शासकीय दरसुची सन 2021-22 नुसार रु.4,56,159/- मात्र खर्च अपेक्षित आहे.तरी सदरचा खर्च सन 2022-23 च्या मनपा निधी अंतर्गत करण्यात येणार आहे.

तरी उक्त काम हे तातडीने करणे गरजेचे असल्याने मा. आयुक्त सो. यांच्या कडील आदेश जा.क्र./धुमपा/63 दि.08/07/2022 नुसार सदरचे काम विना निविदा श्री.संजय दगडु गायकवाड ठेकेदार यांच्या कडून करून घेण्यात आलेले असून सदरचे काम मुंबई प्रांतिक अधिनियम ६७ (क) अन्वये विना निविदा करण्यास मंजुरी व खर्चास कार्योत्तर मंजुरीसाठी मे. स्थायी समितीपुढे मंजुरीसाठी सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास अधिनियम ६७ (क) अन्वये विना निविदा करणेसाठी झालेला खर्च रु.४,५६,१५९/- मात्र खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे. तसेच सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी.याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री. चौधरी नरेंद्र रुपला

अनुमोदक:- श्री. अहिरराव किरण हरिश्चंद सर्वानुमते मंजुर,

सही/- x x x

सभापती,

स्थायी समिती,

धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक :- १२६ सन २०२१-२२ या वित्तीय वर्षाचे सुधारीत वार्षिक लेख्यास मंजुरी देणेबाबत विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.हर्षकुमार रेलन व्यक्तीगत मला असे वाटते हा महत्वपूर्ण विषय आहे ४-५ दिवस आधि अजेंडा द्यावा. ते अकाउंटचे विषय आहे याच्यावर अभ्यास करावा लागतो. बजेट बघावा लागतो. माझी अशी मागणी आहे हे दोन विषयासाठी अभ्यास करण्यासाठी वेळ मिळावा हे दोन विषय स्थगित ठेवावे.

| | |
|---|---|
| म.प्रतिभा चौधरी | मागे पत्र दिले होते गेल्या ८-१०महिन्याचे मनपाला मिळालेले उत्पन्न व खर्च तसेच अदा केलेले बिले याची माहिती अजून दिलेले नाही. त्यावर दुसरे स्मरण पत्र दिले आहे. दोन वेळा पत्र देऊन देखील अजून पर्यंत कुठली माहिती मिळाली नाही.हे जे वार्षीक लेखे मंजूरीसाठी आलेले आहे, ते स्थगित करावे विषय तहकूब करावा.आम्हाला अभ्यास करण्यासाठी वेळ मिळावा. |
| म.सभापती | आपण मागणी केलेली माहिती माझ्याकडे आली आहे.माहिती तयार आहे आज तुम्हाला देण्यासाठी सांगतो. |
| म.प्रतिभा चौधरी | स्मरण पत्र देण्याची वेळ येते इतके निष्क्रीय प्रशासन आहे. |
| म.नागसेन बोरसे | लेखे हे किती दिवसांत स्थायी समोर सादर केले पाहिजे? |
| म.मुख्यलेखाधिकारी | साधारणत: ३१ जुलै पर्यंत आपण वार्षीक लेखे सादर करतो. |
| म.नागसेन बोरसे | लेखे सादर करण्याबाबत नियमात असे म्हटले आहे की, दरमाह लेखे स्थायी समिती समोर सादर झाले पाहिजे. त्या त्या महिन्याचे आर्थिक वर्षाचे लेखे सभागृहासमोर आले पाहिजे किती खर्च झाला किती उत्पन्न आले हे सगळे अधिनियमात आहे. |
| म.मुख्यलेखाधिकारी | अधिनियम पाहून घेतो त्याप्रमाणे सादर करण्याचा प्रयत्न करतो. |
| म. नागसेन बोरसे | सादर करत असतांना सिनेमागृहे,नाटयगृहे,जत्रा यावरील खर्च शून्य दाखवला आहे म्हणजे पालिकेला यातून काहीच उत्पन्न मिळाले नाही सिनेमागृहाचे उत्पन्न भेटते कि भेटत नाही, यात्रेचे उत्पन्न शून्य दाखवले आहे.कलामंदीर हे भाडयाने दिले आहे त्याचे उत्पनन शून्य कसे दाखवले ? मांडव शुल्क म्हणजे रस्तयांवर जे मंडप टाकले जातात त्याचे उत्पन्न शून्य दाखवले आहे, नविन नळ कनेक्शन चे उत्पन्न शून्य दाखवले आहे.बागबगीचे उत्पन्न शून्य दाखवले आहे. |
| म.अभियंता | आपण जे शाहू नाटयमंदीर उभारले होते ते चालवण्यासाठी दिले होते ७/८ वर्षापासून त्याची रक्कम भरलेली नाही. त्यांना आपण नोटीस पण दिलेल्या आहे. त्यावर आपण कार्यवाही करतो आहे. हे काम श्रीकृष्ण खानसरी यांना दिले आहे. |
| म.नागसेन बोरसे | १० वर्षापासून चालवण्यासाठी दिले होते १० वर्षापासून उत्पन्न शून्य कसे? |
| म.सभापती | हे वार्षीक लेखे आहे पैसे आलेच नाही टाकतील कसे? |
| म.शिल्पा नाईक | कलामंदीर हा विषय जो आहे याची आकारणी बाजार विभागाकडून अपेक्षित होती. बांधकाम विभागाकडून वारंवार मागणी करुनही ती नस्ती बाजार विभागाकडे प्राप्त झाली नाही. त्याची भाडयाची आकारणी ही त्रिसदस्यीय समिती कडून करुन घेणे अपेक्षित असतांना कार्यवाही अद्याप झालेली नाही. आताच बांधकाम विभागाकडून खुलासा झाला मागील ८ वर्षापासून उत्पन्न आले नाही. इमारत बांधून देणे ही बांधकाम विभागाची जबाबदारी आहे. त्रिसदस्यीय समिती कडून भाडे निश्चीती करणे, भाडे वसूली करणे हा विषय बाजार विभागाशी निगडीत होता. त्यामुळे हा उत्पन्नाचा आकडा शून्य दिसतो आहे. |
| म.सभापती | ही गोष्ट अत्यंत चुकीची आहे. एक ते दोन वर्ष आपण समजू शकतो. आपण २ वर्ष घरपट्टी भरत नसतांना त्यांना शास्ती लावतो, नोटीसा देतो, घर सिल करतो तर ही इतकी मोठी वास्तु असतांना कार्यवाही अपेक्षित आहे. कुठल्याही परिस्थितीवर कार्यवाही झाली पाहिजे. |
| म.नागसेन बोरसे | पारोळारोड व मनोहर टॉकीज येथील बीओटी मार्केट पासून उत्पन्न ५५ कोटी अपेक्षित होते. शॉपिंग कॉम्प्लेक्स मधून उत्पन्न आले नाही. |
| म.सभापती | सन्मा.सदस्य सांगतात ते बरोबर आहे यावर शिरसाठ मॅडमांशी बैठकही झाली २०११ मध्ये वर्क ऑर्डर झाल्यानंतर १८ महिन्यात ते काम पूर्ण करायचे होते १९ व्या महिन्यापासून ते काम पूर्ण होवो वा न होवो आपल्या टेंडर कंडीशन प्रमाणे जेवढा त्याला २५ रु स्के.मी. प्रमाणे भाडे आकारणी अपेक्षित होते. त्या संदर्भात मिटींग झाली मी सूचना केल्या होत्या १८ महिन्यांनी |

| | |
|---|---|
| | त्याला कर आकारणी लावायची होती. त्याचे काम चालू आहे. बहुतेक त्यांचे काम झाले ही असतील. |
| म.आयुक्त | फाईल माझ्याकडे आली आहे ३-४ दिवसांत क्लीअर करणार आहोत. |
| म.नागसेन | बजेटमध्ये तरतूद केली ५५ कोटीची तसेच कलामंदीर व बायो वेस्ट मधून उत्पन्न येत होते ते या मध्ये आले पाहिजे होते. तो हेड येथे का नाही ? |
| म.शिल्पा नाईक | बायो मेडीकल संदर्भात संपूर्ण जिल्हयासाठी स्वामी समर्थ एजन्सी काम करते जिल्हयातील वेस्ट गोळा करुन प्लाँट मधे देते परंतु अद्याप मनपाच्या वतीने असे कुठलेही वेस्ट आपण गोळा करत नाही. |
| म.सभापती | जी संस्था आहे ती प्रत्येक हॉस्पिटलला त्याच्या क्षमतेनुसार त्यांच्याकडून चार्जेस वसूल करते आणि ती डायरेक्टली त्यांनी त्यांना सर्व्हीस प्रोव्हाईड करायची ती उत्पन्नाची बाब नाही आहे. बायो मेडीकल वेस्ट आणि बायो वेस्ट या दोन वेगवेगळया गोष्टी आहे. बायो मेडीकल वेस्ट ही सर्व्हीर्स आहे. आणि ती पूर्ण जिल्हयासाठी एकच संस्था असते. तिच्या वर्कींग एरिया १०० ते १२५ किलो मिटरच्या आत असतो. बायो वेस्ट हा वेगळा विषय आहे सी एनजी गॅस, मिथेन गॅस, बायो डिझेल काढणे ते बायो प्रोडक्ट मधून उत्पन्न मिळते. आपण विषय तहकूब ठेवू त्यावर एक बैठक घेऊ. तुमच्या सगळया प्रश्नांशी मी सहमत आहे. त्यातून आऊटपूट काही निघणार नाही. हा विषय पुन्हा विषय पटलावर घेऊ हा विषय आणण्या आगोदर माझ्या दालनात बैठक घेऊ. तुमच्या सगळया प्रश्नांची उत्तरे मिळाली तर सभेत आणू. सर्व सदस्यांना समिती दालनात बोलवू. तो पावेतो सदर विषय तहकूब ठेवण्यांस मान्यता देण्यांत येत आहे. |

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १३५ दिनांक ४/८/२०२२**

सन २०२१-२२ या वित्तीय वर्षाचे लेखे मुंबई प्रातिक महानगरपालिका अधीनियम १९४९ चे कलम ९४ अ नुसार व लेखासंहिता १९७१ नियम ६० नमुना २८ नुसार तयार केले आहे तरी स्वाक्षरीसाठी सादर तसेच सदर लेखा मे.स्थायी समितीपुढे मान्यतेसाठी सादर झाला असता सन्मा. सदस्यांनी चर्चेत उपस्थित केलेले मुद्दयाबाबत आवश्यक ती माहिती प्रापत न झाल्याने तसेच सदर विषयाबाबत तपशील तपासणे आवश्यक असल्याने सदर विषय तूर्त तहकूब ठेवण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

सूचक :- श्री. नागसेन दामोदर बोरसे
अनुमोदन:- श्री. हर्षकुमार राध्येश्याम रेलन सर्वानुमते मंजुर,

सही/- x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

| | |
|---|---|
| विषय क्रमांक:- १२७ | सन २०२१-२२अंदाजपत्रकातील खर्चाबाबत रक्कम प्रधान लेखाशिर्षातून दुस-या प्रधान लेखाशिर्षातवर्ग करणेबाबत विचार करणे. |
| म. नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले. |
| म. नागसेन बोरसे | सदर विषय हा देखील वरील विषय क्रं.१२६ प्रमाणे आहे. त्यामुळे सदर विषय सद्यस्थितीत तहकूब ठेवावा. |
| म. हर्षकुमार रेलन | दोन्ही विषयाबाबत पुनश्च माहिती घेवू तो पावेतो विषय तहकूब ठेवावे. |
| म.सभापती | सन्मा. सदस्यांच्या सहमतीने तूर्त सदर विषय तहकूब ठेवण्यांस मान्यता देण्यांत येत आहे. |

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १३६ दिनांक ४/८/२०२२**

सन २०२१-२२ चे वार्षिक लेखे तयार करून मे.स्थायी समितीपुढे मंजूर कार्यालयीन अहवालानुसारमंजूरीसाठी सादर करणेत आलेले आहे. तसेच सन २०२१-२२अंदाजपत्रकातील खर्चाबाबत रक्कम प्रधान लेखाशिर्षातून दुस-या प्रधान लेखाशिर्षातवर्ग करणेबाबत विचार करणे बाबत प्रस्ताव मे. स्थायी समिती समोर सादर झालेला आहे.. सन्मा.सदस्यांनी चर्चेत उपस्थित केलेले मुद्दयाबाबत आवश्यक ती माहिती प्रापत न झाल्याने तसेच सदर विषयाबाबत तपशील तपासणे आवश्यक असल्याने सदर विषय तूर्त तहकूब ठेवण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

सूचक :- श्री. नागसेन दामोदर बोरसे

अनुमोदन:- श्री. हर्षकुमार राध्येश्याम रेलन सर्वानुमते मंजुर,

सही/- x x x

सभापती,

स्थायी समिती,

धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- १२८ जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत सर्वे नं.५३५/ २/ क विमलनाथ नगर भागात मोकळ्या जागेवर संरक्षण भिंत बांधणेचे फेर निविदा दर मागविण्यांत आलेत,त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. नागसेन बोरसे विषय मंजूर करण्यांत यावा.

म. किरण अहिरराव विषय मंजूर करण्यांत यावा.

म.सभापती सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १३७ दिनांक ०४/०८/२०२२**

जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत सर्वे नं. ५३५/ २/ क विमलनाथ नगर भागात मोकळ्या जागेवर संरक्षण भिंत बांधणे बाबतच्या कामास म. जिल्हाधिकारी यांनी टिपणी मंजुरीने दि.१७/०३/२०२२अन्वये उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु. ४५,११,०००/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./५५०/२०-२०२१ दि०७/०१/२०२२अन्वये रक्कमरु.४५,११,०००/-मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत या धुळे महानगरपालिका जा.क्र./धुमपा/पापुवि/ १६० /२०२२-२३ फेर दि .१०/०६/२०२२ अन्वये दि.११/०६/२०२२ दैनिक पुण्य नगरी / जागृती पर्व या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि. २८/०६/२०२२रोजी निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे /ठेकेदराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | धीरज विसपुते | शे.५% जास्तीने | |
| २ | चैतन्य शिवकुमार अग्रवाल | शे.०.५०% कमीने | सर्वात कमी दर |
| ३ | जय कैला मा कन्सट्रक्शन | अंदाजपत्रकीय दराने | |

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **श्री/ मे.चैतन्य शिवकुमार अग्रवाल** यांचे दर **शे.०.५०% कमीने** आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा

रक्कम भरलेली आहे.सबब सदर काम **शे.०.५०% कमी दराने** आलेले असल्याने यांच्या दरास मान्यतेसाठी मे.स्थायी समिती पुढे ठेवणेस मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी **मे.चैतन्य शिवकुमार अग्रवाल** यांचे दर **शे.०.५०% कमीने** आलेले निविदा दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ अन्वये मान्यता देण्यांत येत आहे. **तसेच** सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री. बोरसे नागसेन दामोदर

अनुमोदक:- श्री. अहिरराव किरण हरिश्चंद्र सर्वानुमते मंजुर,

सही/- x x x

सभापती,

स्थायी समिती,

धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- १२९ वडजाई रस्ता ते अरिहंत भवन पर्यंत रस्ता रुंदीकरण करणे प्रस्तावित कामातील अडथळा असलेले पोल व वीज वाहिनी स्थलांतर करणेचे निविदा दर मागविण्यांत आलेत,त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. अन्सारी अब्दुल लतीफ विषय मंजूर करण्यांत यावा.

म. खान मो. साबीर विषय मंजूर करण्यांत यावा.

म.सभापती सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १३८ दिनांक ०४/०८/२०२२**

वडजाई रस्ता ते अरिहंत भवन पर्यंत रस्ता रुंदीकरण करणे प्रस्तावित कामातील अडथळाअसलेले पोल व वीजवाहिनी स्थलांतर करणेचे उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका स्थायी समिती ठरावानुसार व **मा.आयुक्त** महानगरपालिका यांचे टिप्पणी / जिल्हाधिकारी सो यांची प्रशासकीय मान्यता/दि.20-4-2022 रोजी अन्वये उक्त कामाबाबत रक्कम **रु.**29,55,669/- मात्र खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेत आली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका **जा.क्र./विवी/16 दि.21/4/2022**अन्वये व **दि.22/4/2022** च्या **दै.सकाळ/समाज सारथी** किंवा धुळे महानगपालिका / महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईट www.mahatender.gov.in वर खुल्या ई-निविदा प्रसिद्ध करणेत येवून **दि.17/5/2022** रोजी निविदा मागविणेत आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत रोखीने बयाणा रक्कम भरून/लेटर प्याड वर निविदा दर सादर केलेले आहेत.

| **अ.क्र.** | **कंत्राटदाराचे नाव** | **दिलेले निविदा दर** | **शेरा** |
|---|---|---|---|
| 1 | ओम श्री मंगलमुर्ती इले.नाशिक | 9.21 % जास्त ने | **L१** |
| 2 | पंडित इलेक्ट्रिकल धुळे | 16 % जास्त ने | |
| 3 | बिजासनी Enterprises धुळे | 13 % जास्त ने | |

वरीलप्रमाणे ओम श्री मंगलमुर्ती इले.नाशिक यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे म्हणजेच32,27,886/-इतक्या रकमेची असुन ती अंदाजपत्रकीय दराच्या 9.21% जास्तीची आहे

याबाबत निविदा समिती तसेच मा. आयुक्त सो. यांचेकडेस संबंधित ठेकेदारास वाटाघाटीसाठी बोलावून चर्चेअंती **ओम श्री मंगलमुर्ती इले.नाशिक अंदाजपत्रकीय दराप्रमाणे काम करण्यांस स्विकृती दिलेली आहे** त्यानुसार ठेकेदार **ओम श्री मंगलमुर्ती इले.नाशिक** यांचे दर तुलनेत सर्वात कमी असून त्यांनी नियमाप्रमाणे रोखीने बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार ओम श्री मंगलमुर्ती इले.नाशिक यांनी दर वाटाघाटी अंती सादर केलेले सर्वात कमी म्हणजेच **अंदाजपत्रकीय दराने आलेले निविदा दर** मंजुरीसाठी **मे.स्थायी समिती कडे सादर**.तसेच अन्य काम न मिळालेल्या ठेकेदार यांची बयाणा रक्कम परताव्यास मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी कंत्राटदार ओम श्री मंगलमुर्ती इले.नाशिक यांनी दर वाटाघाटी अंती सादर केलेले सर्वात कमी म्हणजेच**अंदाजपत्रकीय दराने आलेले निविदा दरास** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम७३नुसार मान्यता देण्यांत येत आहे. तसेच सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री. अन्सारी अब्दुल लतीफ अब्दुल हमीद

अनुमोदक:- श्री. खान मोहम्मद साबीर मुहिबुल्लाह

सर्वानुमते मंजुर,

सही/- x x x

सभापती,

स्थायी समिती,

धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- १३० — धुळे मनपा कार्यक्षेत्रातील भटकी व मोकाट कुत्र्याचे निर्बिजीकरण शस्त्रक्रीया व बंदोबस्त करण्याकामी ई-निविदा दर मागविण्यात आलेत त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.नरेंद्र चौधरी — या विषयात असे निर्दशनास येत आहे की, तिनही ठेकेदार बाहेरचे असल्याने आपण त्यांना ओळखत नाही. आपण त्यांची संयुक्त बैठक ही सभापती व आयुक्तांसमोर लावण्यात यावी. त्यानंतर कुत्रयांची संख्या १५००० ही कुठल्या आधारावर निश्चित केली आहे. निर्बीजीकरण या कामत काय-काय समाविष्ट आहे हे माहिती झाले पाहिजे. भविष्यात निर्बीजीकरण संख्या वाढू शकते. संपूर्ण माहिती घ्यावी तो पावेतो विषय तहकूब करावा अशी माझी विनंती आहे.

म.प्रतिभा चौधरी — हा जो विषय आलेला आहे यात कुत्रयांचा बंदोबस्त होईल असे मला वाटत नाही, माझे असे म्हणने आहे की, या कुत्रयांना पकडून कुठे तरी दूर सोडले तर बरे होईल. निर्बीजीकरण करुन त्यावर काही उपाय होणार नाही. असे मला वाटते. त्यांची संख्या कमी होणार आहे का? आणि हा विषय अतिशय गंभीर झालेला आहे आमच्या प्रभागात भटके कुत्रे खूप वाढले आहे. त्यामध्ये त्वचेचे रोग झालेले कुत्रे सुध्दा आहे. हा विषय तहकूब करावा.

म.किरण कुलेवार — निर्बीजीकरण नंतर कुत्रयांचा त्रास कमी होणार नाही. अनेक कुत्रे त्वचेचे आजार झालेले आहे ते चावा घेण्याचे थोडीच थांबणार आहे. शहरात बरेचशे कुत्रे हे पिसाळलेले आहे. निर्बीजीकरण करणे हा तोडगा होणार नाही.

म.अति. आयुक्त — हा महत्वाचा विषय अजेंडयावर आलेला आहे त्याच्या मागे शासनाचे धोरण आहे. त्यामुळे कुत्रयांना आपल्याला कुठे बाहेर सोडता येत नाही. त्यामुळे कुत्रयांना मारुन टाकता येत नाही, कुठे बाहेर सोडता येत नाही. आपण त्यांना पकडून शस्त्रक्रिया करु शकतो. शस्त्रक्रिया झाल्यावर त्यांना ३ दिवस खाऊ-पिऊ घालायचे आहे आणि मग त्यांना सोडू शकतो. त्यामध्ये

९०० रु पर्यत दर रिझनेबल आहे. इतर ठिकाणी हा रेट १४००-१५००पर्यंत आहे. ही वस्तुस्थिती आहे.

म. सभापती आपण जी कुत्रयांची जी संख्या मोजली तीला काही आधार नाही आहे. त्यामध्ये कुठल्याही प्रकारची वास्तुनिष्ट मोजणी दिसली नाही. हे कुत्रे जर जास्त निघाले तर त्यामुळे हे संशयाच्या भोवऱ्यात हया गोष्टी जाणार आहे. आपण ३५ लक्ष वर्षाकाठी त्यावर खर्च करणार आहोत जी काही श्वान त्वचेच्या आजाराने ग्रसीत आहे त्याबद्दलही आपण काही गृहीत धरले नाही या निविदेत ज्याप्रमाणे आपण कचऱ्या संदर्भात प्रेझेंटेशन घेतले शेवटी तो शहराच्या आरोग्याशी निगडीत विषय आहे. आपण त्याला प्रत्यक्ष बोलावले नाही. माझी व सभागृहाची अशी धारणा आहे की अजून त्यामध्ये रेट कमी होऊ शकतात. आपण तिनही ठेकेदारांना आजच मेल करावे. बुधवारी ३ वाजता आपल्या दालनात बोलवा. हे काम आपल्याला ३ वर्षासाठी दयायचे आहे. त्यांची शस्त्रक्रीया यशस्वी होते किंवा नाही हे पाहणे महत्वाचे आहे. हा प्रॉब्लेम २००८ ते२०१३ मध्ये राबवला होता त्याचे काही आऊटपुट आपल्याला मिळाले नाही. कदाचित त्यावेळी तंत्रज्ञान तेवढे विकसीत नसेल टॅगींग वैगरे नसेल.पशुवैद्यकिय क्षेत्रामध्ये गुरे-ढोरे वाटप होते त्यांना देखील इलेक्ट्रॉनिक चिप बसवता येते.त्यावर काय उपचार केले ते शासनाला कळतात. कुत्रयांवर काय केले ते कसे कळणार.

अति. आयुक्त चिप बसवणे त्याचा खर्च जास्त होता. बिल वाढवून दिले तर आपण चिप बसवू शकतो.

म. सभापती सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने याकामी आलेले दर व शहरातील कुत्र्यांच्या संख्येबाबत संभ्रम आहे. तसेच सदर बाबतीत नेमकी कशी व कोणत्या पध्दतीने कार्यवाही होणार आहे हे प्रथम पाहणे गरजेचे आहे. संबंधित निविदाधारकांनी सादर केलेल्या दर जास्तीचे असल्याची धारणा आहे. सदर काम तीन वर्षासाठी संबंधित एजन्सीला दयावयाचे आहे. मनपाच्या आर्थिक हिताच्या दृष्टीने याबाबत सखोल माहिती घेवून तसेच दराबाबत वाटाघाटी करण्यासाठी संबंधित निविदाधारकांना पुश्नच वाटाघाटीसाठी बोलविण्यात यावे व याबाबत स्थायी समितीस अवगत करावे तोपावेतो सदर प्रस्ताव तहकूब ठेवण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १३९ दिनांक ४/८/२०२२**

धुळे मनपा कार्यक्षेत्रातील भटकी व मोकाट कुत्र्याचे निर्बिजीकरण शस्त्रक्रीया व बंदोबस्त करण्याकामी ई-निविदा दर मान्यतेसाठी स्थायी समितीसमोर निर्णयार्थ सादर करण्यात आलेले आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने याकामी आलेले दर व शहरातील कुत्र्यांच्या संख्येबाबत संभ्रम आहे. तसेच सदर बाबतीत नेमकी कशी व कोणत्या पध्दतीने कार्यवाही होणार आहे हे प्रथम पाहणे गरजेचे आहे. संबंधित निविदाधारकांनी सादर केलेल्या दर जास्तीचे असल्याची धारणा आहे. सदर काम तीन वर्षासाठी संबंधित एजन्सीला दयावयाचे आहे. मनपाच्या आर्थिक हिताच्या दृष्टीने याबाबत सखोल माहिती घेवून तसेच दराबाबत वाटाघाटी करण्यासाठी संबंधित निविदाधारकांना पुन्श्:च वाटाघाटीसाठी बोलविण्यात यावे व याबाबत स्थायी समितीस अवगत करावे तोपावेतो सदर प्रस्ताव तहकूब ठेवण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सुचक :- श्री. नरेंद्र रूपला चौधरी

अनुमोदक:- सौ.प्रतिभाताई शिवाजीराव चौधरी

सर्वानुमते मंजुर,

सही/- x x x

सभापती,

स्थायी समिती,

धुळे महानगरपालिका,धुळे

# धुळे महानगरपालिका,धुळे
## नगरसचिव कार्यालय
### स्थायी समिती सभा क्रमांक २० चे इतिवृत्त

---

**धुळे मनपाचे स्व.दिलीप पायगुडे सभागृह, धुळे**
**गुरुवार दिनांक २५/०८/२०२२**
**वेळ सकाळी ११-०० वाजतां**

धुळे महानगरपालिकेची स्थायी समितीची साप्ताहिक सभा क्रं.२० आज गुरुवार दिनांक**२५/०८/२०२२** रोजी सकाळी ११.०० वाजतां **श्री.शितल मोहन नवले, सभापती**, स्थायी समिती, मनपा धुळे यांच्याअध्यक्षतेखाली **धुळे मनपा स्व.दिलीप पायगुडे सभागृह** भरली. या सभेस खालील सन्मा.सदस्य हजर होते.

| अ.क्रं. | सदस्यांचे नांव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री.नवले शितल मोहन | सभापती |
| २ | श्री. जाधव संजय सुधाकर | सदस्य |
| ३ | श्री. बोरसे नागसेन दामोदर | सदस्य |
| ४ | श्रीमती कुलेवार किरण राकेश | सदस्या |
| ५ | श्री.जाधव बन्सीलाल माणिक | सदस्या |
| ६ | श्रीमती चौधरी मंगला अर्जुन | सदस्या |
| ७ | श्री.अन्सारी फातमा नुरुल अमीन | सदस्या |
| ८ | श्रीमती.चौधरी प्रतिभा शिवाजीराव | सदस्या |
| ९ | श्री. अहिरराव किरण हरिश्चंद्र | सदस्य |
| १० | श्री. रेलन हर्षकुमार राधेश्याम | सदस्य |
| ११ | श्री.अन्सारी अब्दुल लतीफ अब्दुल हमीद | सदस्य |
| १२ | श्री.खान मोहम्मद साबीर मुहिबुल्लाह | सदस्य |
| १३ | श्रीमती पठाण नाजियाबानो नासिर खा | सदस्या |

उपस्थित अधिकारी गण

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. देविदास टेकाळे | आयुक्त |
| २ | श्री. नितीन कापडणीस | अति. आयुक्त |
| ३ | श्रीमती शिल्पा नाईक | उपायुक्त |
| ४ | श्री. मनोज अरविंद वाघ | नगरसचिव |
| ५ | श्री.के.एन. शिंदे | अभियंता |
| ६ | डॉ. एम.आर. शेख | प्र. आरोग्याधिकारी |
| ७ | श्री. विकास साळवे | मलेरिया पर्यवेक्षक |
| ८ | श्री. संजय मोरे | प्र. कार्यालय अधिक्षक |
| ९ | श्री. कमलेश सोनवणे | ओव्हरसिअर न.र. विभाग |

| | | |
|---|---|---|
| १० | श्री. किशोर सुडके | प्र.परवाना अधिक्षक तथा बाजार विभाग प्रमुख |
| ११ | श्री. एन.के. बागुल | विद्युत अभियंता |
| १२ | श्री. महेंद्र सोनवणे | लेखापाल मनपा शि. मंडळ |
| १३ | श्री. राजू माईनकर | भांडारपाल |
| १४ | श्री. प्रसाद जाधव | अतिक्रमण विभाग प्रमुख |
| १५ | श्री. सुक्राम राऊत | वाहन विभाग |

मा. सभापती — सन्मा.सदस्य मा.आयुक्त सो.सर्व अधिकारी कर्मचारी व पत्रकार, छायाचित्रकर बांधव यांचे मी स्थायी समितीच्या बैठकीत स्वागत करतो.सभेचा कोरम पुर्ण झाला असुन नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरु करावे.

म. नगरसचिव — वंदे मातरम् या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

सभेच्या सुरुवातीस — सन्मा.सदस्यांकडून आलेली श्रध्दांजलीची यादी

दि.१३/०८/२०२२ रोजी शिवसेना नेते बबन थोरात यांचे मोठे बंधू पहेलवान किशोर थोरात तसेच महानगरपालिकेतील वसुली विभागातील कर्मचारी राजु वाघारे संकटमोचकाच्या दर्शनासाठी रोकडोबा हनुमान येथे गेले असता त्यांना महामार्गावर गाडीने धडक दिल्याने त्यांचे दु:खद निधन झाले. तसेच शिवसंग्राम संघटनेचे नेते विनायक मेटे यांचे मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील अपघातात दु:खद निधन झाले.

तरी आज रोजीच्या स्थायी समिती सभेमध्ये कै.किशोर थोरात, मनपा कर्मचारी कै. राजु वाघारे तसेच शिवसंग्राम संघटनेचे नेते कै.विनायक मेटे यांना श्रध्दांजी वाहुन तसा ठराव पारीत करण्यात यावा ही विनंती.

**सुचक :-** सौ. प्रतिभाताई शिवाजीराव चौधरी

म. सभापती — सन्मा.सदस्यांच्या यादीनुसार मान्यवरांना श्रध्दांजली प्रदानार्थ दोन मिनिटे मौन उभे राहून भावपूर्ण श्रध्दांजली समर्पित करण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १४० दिनांक २५/०८/२०२२**

सन्मा. सदस्यांच्या यादीनुसार दि.१३/०८/२०२२ रोजी शिवसेना नेते बबन थोरात यांचे मोठे बंधू पहेलवान किशोर थोरात तसेच महानगरपालिकेतील वसुली विभागातील कर्मचारी राजु वाघारे संकटमोचकाच्या दर्शनासाठी रोकडोबा हनुमान येथे गेले असता त्यांना महामार्गावर गाडीने धडक दिल्याने त्यांचे दु:खद निधन झाले. तसेच शिवसंग्राम संघटनेचे नेते विनायक मेटे यांचे मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील अपघातात दु:खद निधन झाले.

वरील मान्यवरांचे दु:खद निधनामुळे या सभेस आतीव दु:ख होत आहे. ही सभा त्यांचे कुटुंबियांचे दु:खात सहभागी असून मृत आत्म्यांस चिरशांती प्रदानार्थ दोन मिनिटे मौन उभे राहून भावपूर्ण श्रध्दांजली समर्पित करीत असून त्याबाबतचा ठराव पारीत करण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

**मा.सभापती सो.यांचे मार्फत आलेला अभिनंदनाचा प्रस्ताव.**

केंद्र शासन व महाराष्ट्र शासनामार्फत स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त राबविण्यांत आलेल्या हर घर तिरंगा अभियांनाची यशस्वी अंमलबजावणी व कार्यवाही धुळे महानगरपालिकेमार्फत करण्यांत आली.या अभियानात संपूर्ण धुळेकर नागरिकांचाही उत्सर्फूत

प्रतिसाद मिळाला.यासाठी धुळे महानगरपालिकेचे सर्व अधिकारी तसेच स्वच्छता विभागाचे कार्यालयीन अधिक्षक, प्रभारी मुख्य स्वच्छता निरीक्षक, सर्व स्वच्छता निरीक्षक, वसुली निरीक्षक व कर्मचारी तसेच सफाई कामगार यांनी महत्वपूर्ण योगदान देऊन सदर अभियान अत्यंत प्रभावीपणे यशस्वी केले.याबद्दल या सर्वांचा अभिनंदनाचा ठराव बैठकीत पारीत करण्यांत यावा.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १४१ दिनांक२५/०८/२०२२**

केंद्र शासन व महाराष्ट्र शासनामार्फत स्वतंत्रयाच्या अमृत महोत्सवानिमित्त राबविण्यांत आलेल्या हर घर तिरंगा अभियांनाची यशस्वी अंमलबजावणी व कार्यवाही धुळे महानगरपालिकेमार्फत करण्यांत आली.या अभियानात संपूर्ण धुळेकर नागरिकांचाही उत्सर्फूत प्रतिसाद मिळाला. यासाठी धुळे महानगरपालिकेचे सर्व अधिकारी तसेच स्वच्छता विभागाचे कार्यालयीन अधिक्षक,प्रभारी मुख्य स्वच्छता निरीक्षक,सर्व स्वच्छता निरीक्षक,वसुली निरीक्षक व कर्मचारी तसेच सफाई कामगार यांनी महत्वपूर्ण योगदान देऊन सदर अभियान अत्यंत प्रभावीपणे यशस्वी केले. याबद्दल या सर्वांचा अभिनंदनाचा ठराव सर्वानुमते मंजुर करण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक:-१३१ | मागील स्थायी समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे. (२१/७/२०२२) |
| म.नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले. |
| म. किरण अहिरराव | इतिवृत्त वाचून कायम करण्यांत यावे. |
| म.सभापती | सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालानुसार मागील स्थायी समिती सभा दि.२१/७/२०२२ रोजीचे इतिवृत्त क्रमशः वाचन करुन कायम करण्यांत येत आहे. |

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १४२ दिनांक२५/०८/२०२२**

मागील स्थायी समिती सभा दिनांक २१/०७/२०२२ रोजीच्या सभेतील धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ११६ ते १३१ तसेच सभेत सन्मा.सदस्यांनी उपस्थित केलेली चर्चा व निर्णय क्रमशः वाचून कायम करण्यांत येत आहे.

**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक:-१३२ | मा.आयुक्त सो. यांनी त्यांचे आलेल्या अधिकारात रुपये ५ लाख ते २५ लाखापर्यंत बांधकाम विभागाकडील विकास कामाची दि. १/०७/२०२२ ते दि. २९/०७/२०२२ अखेर निर्गमित केलेल्या कार्यादेशाची यादी अवलोकनार्थ सादर. |
| म.नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले. |
| म.नागसेन बोरसे | विषयांचे अवलोकन करण्यांत आले. |
| म. सभापती | मा. आयुक्त सो. यांनी त्यांचे अधिकारात रु. ५ लाख ते २५ लाखापर्यंत मंजुरीचे दिलेल्या कार्यादेशाच्या यादीचे अवलोकन करण्यांत आले. |

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १४३ दिनांक२५/०८/२०२२**

मा.आयुक्त सो. यांनी त्यांचे आलेल्या अधिकारात रुपये ५ लाख ते २५ लाखापर्यंत बांधकाम विभागाकडील विकास कामाची यादी प्रकरण ७(ड) अन्वये दि.०१/०७/२०२२ ते दि.२९/०७/२०२२अखेर निर्गमित केलेल्या कार्यादेशाची यादी अवलोकनासाठी मे.स्थायी समिती पुढे सादर करण्यांत आले.

**(बांधकाम विभाग)**

दि.०१/०७/२०२२ ते दि.२९/०७/२०२२ अखेर निर्गमित केलेल्या विकास कामांच्या कार्यादेशची यादी

| अ.क्रं | कार्या. क्रं. | दिनांक | कामाचे नाव | रक्कम | निधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | १२१ | ०१/०७/२०२२ | संभप्पा कॉलनी येथे श्री.प्रदीप पानपाटील यांच्या घरापासून ते भरत यादबोले यांच्या घरापावेतो रस्ता डांबरीकरण करणे. | १९,९९,६०१/- | महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान जिल्हास्तरीय योजना अंतर्गत सन २०२१-२२ |
| २ | १२६ | ०७/०७/२०२२ | प्र.क्र.१९ मध्ये मस्जिद मदरसा दारूस सलाम ते अक्रम शेख यांच्या गरेज पर्यंत रस्ता व गटार करणे. | १९,९४,१८१/- | महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान जिल्हास्तरीय योजना अंतर्गत सन २०२१-२२ |
| ३ | १२७ | ०७/०७/२०२२ | प्र.क्र.६ मध्ये श्री.शंकर सैंदाणे यांचे घरापासून ते श्री.एन.पी.दादा पाटील यांचे घरापावेतो रस्ता कॉक्रीटी करण करणे. | १४,९९,३४८/- | महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान जिल्हास्तरीय योजना अंतर्गत सन २०२१-२२ |
| ४ | १२८ | ०८/०७/२०२२ | प्र.क्र.५ मध्ये इंद्रप्रस्थ नगर भागातील सर्व्हे नं.७२ ओपनस्पेसला कंपाऊंड वॉल करणे. | १८,०५,९६०/- | सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना सन २०२१-२२ अंतर्गत |
| ५ | १२९ | ०८/०७/२०२२ | प्र.क्र.१८ मध्ये राजेंद्र बागुल पुतळा ते ४० गाव रोड (बाळू आबा) यांच्या बंगल्या पावेतो रस्ता डांबरीकरण करणे. | १२,४६,९२१/- | महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान जिल्हास्तरीय योजना अंतर्गत सन २०२१-२२ |
| ६ | १३१ | ०८/०७/२०२२ | प्र.क्र.१३ मध्ये बागे मदिना मस्जिद ते इस्लाम खाटवाला पर्यंत रस्ता कॉक्रीट करणे. | ९,९४,१७१/- | (मनपा निधी अंतर्गत ) रस्ता दुरुस्ती अंतर्गत सन २०२१-२२ |
| ७ | १३२ | ०८/०७/२०२२ | प्र.क्र.१९ मध्ये गुलाब हवालदार यांच्या घरापासून ते बार मदिना मजिद पावेतो रस्ता कॉक्री करणे. | ८,११,९०४/- | (मनपा निधी अंतर्गत ) रस्ता दुरुस्ती अंतर्गत सन २०२१-२२ |
| ८ | १३३ | १३/०७/२०२२ | धुळे मनपा जलशुद्धीकरण केंद्रावर लागणारे व रसायन ब्लिचिंग पावडर सन २०२२-२३ ची निविदा प्रक्रिया होई पर्यंत तातडीचे बाब म्हणून मागणी पुरवठादार यांनी ५० मे.टन ब्लिचिंग पावडर पुरवठा करणे बाबत. | १०,७५,०००/- | रसायन खरेदी |
| ९ | १३५ | १८/०७/२०२२ | प्र.क्र.१४मध्ये पवन नगर भागात विहिरीवर टाकी बसविणे व भागात पाणीपुरवठा करण्यासाठी पाईप लाईन करणे. | २१,०१,३१९/- | नगरसेवकनिधी अंतर्गत सन २०२०-२१ |
| १० | १३६ | १९/०७/२०२२ | प्र.क्र.११ मध्ये संताजी नगर मधील श्री.सुनील चौधरी ते ईश्वर पवार यांचे घरापर्यंत रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | २४,९४,२१८/- | महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान जिल्हास्तरीय योजना अंतर्गत सन २०२१-२२ |
| ११ | १३७ | १९/०७/२०२२ | प्र.क्र.११ मध्ये रामचंद्र नगर येथील जय मल्हार इले.ते प्रवीण जोशी यांचे घरापर्यंत रस्ता कॉक्रीट करणे. | ९,८९,९२१/- | महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान जिल्हास्तरीय योजना अंतर्गत सन २०२१-२२ |
| १२ | १३८ | १९/०७/२०२२ | प्र.क्र.६ मध्ये नगरोत्थान योजने अंतर्गत नकाणे गावात निंबा बायजा यांच्या घरापासून ते हिरामण यांचे घरापावेतो रस्ता कॉक्रीट करणे. | १२,४७,७५४/- | महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान जिल्हास्तरीय योजना अंतर्गत सन २०२१-२२ |
| १३ | १४० | १९/०७/२०२२ | प्र.क्र.६ मध्ये मोराणे येथे पांझरा नदी किनारा पासून ते दामू पवार घरापावेतो रस्ता कॉक्रीट करणे. | १२,५२,२४३/- | महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान जिल्हास्तरीय योजना अंतर्गत सन २०२१-२२ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १४ | १४६ | २२/०७/२०२२ | तापी पाणीपुरवठा योजनेच्या बाभळे पंपिंग स्टेशन येथील अंतर्गत रस्ते व फिल्टर प्लॅन्ट येथील दुरुस्ती करणे. | २४,८२,४३१/- | पाणीपुरवठा पंपिंग स्टेशन निगा व दुरुस्ती |
| १५ | १४७ | २२/०७/२०२२ | प्र.क्र.२ मध्ये दोंदे कॉलनी अंतर्गत महाले यांचे घरापासून ते गोसावी ते मन्साराम माळी ते कापडे यांचे घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | २४,९५,०४५/- | महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान जिल्हास्तरीय योजना अंतर्गत सन २०२१-२२ |
| १६ | १४८ | २२/०७/२०२२ | प्र.क्र.११ मध्ये हमाल मापाडी परिसरात हर्षल चौधरी ते कार्तिक मराठे यांचे घरापावेतो आर.सी.सी. गटार करणे. | १४,९७,६२०/- | महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान जिल्हास्तरीय योजना अंतर्गत सन २०२१-२२ |
| १७ | १५० | २७/०७/२०२२ | प्र.क्र.१९ मध्ये सुल्तानिया नगर भागात अकबर खाटिक यांचे घरापासुन ते शब्बीर हवालदार यांचे घरापावेतो रस्ता कॉंक्रीट करणे. | ९,३३,२१७/- | नगरसेवक निधी अंतर्गत सन २०२१-२२ |
| १८ | १५१ | २७/०७/२०२२ | प्र.क्र.१३ मध्ये तिरंगा चौक भागात मुन्ना बर्तन यांचे घरापासून ते बाबू मेन यांचे घरापर्यंत तसेच ८० फुटी रोड ते नाल्या पावेतो साबीर फुगा गल्ली रस्ता कॉंक्रीट करणे. | ९,९७,२९४/- | नगरसेवक निधी अंतर्गत सन २०२१-२२ |
| १९ | १५२ | २७/०७/२०२२ | प्र.क्र.१३ मध्ये मौलवी गंज भागात मौलाना आझाद स्कूल मागे रेहमान भाई यांच्या घराजवळील रस्ता कॉंक्रीट करणे व पाण्याची टाकी दुरुस्त करणे. | ७,४२,६४०/- | नगरसेवक निधी अंतर्गत सन २०२१-२२ |
| २० | १५३ | २७/०७/२०२२ | हरहर महादेव व्यायाम शाळा विकसित करणे. | २४,८७,७९४/- | नगरसेवक निधी अंतर्गत सन २०२०-२१ |
| २१ | १५४ | २७/०७/२०२२ | प्र.क्र.१३ मध्ये काझी प्लॉट भागात नूर मिल मदरसा पासून ते बबलू शाह यांचे घरापावेतो रस्ता कॉंक्रीट करणे. | ९,९७,२९४/- | नगरसेवक निधी अंतर्गत सन २०२१-२२ |
| २२ | १५५ | २७/०७/२०२२ | प्र.क्र.२ मध्ये अध्यापक नगर भागात श्री.राजेंद्र पाटील यांचे घरापासून ते श्री.पावरा सर यांचे घरापावेतो रस्ता डांबरीकरण करणे. | १२,४५,८२१/- | महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान जिल्हास्तरीय योजना अंतर्गत सन २०२१-२२ |
| २३ | १५६ | २७/०७/२०२२ | नकाणे रोड एकता नगर बोर्ड पासून ते नवजीवन कॉलनी मधून विघ्नहर्ता पावेतो रस्ता डांबरीकरण करणे. | १९,९७,४५८/- | महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान जिल्हास्तरीय योजना अंतर्गत सन २०२१-२२ |
| २४ | १६० | २९/०७/२०२२ | प्र.क्र.५ मध्ये उन्नती नगर भागात श्री.सुभाष नांद्रे यांचे घरापासून ते उन्नती नगर बोर्डा पर्यंत रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे. | १२,४९,१९०/- | महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान जिल्हास्तरीय योजना अंतर्गत सन २०२१-२२ |
| २५ | १६१ | २९/०७/२०२२ | प्र.क्र.६ मध्ये नगरोत्थान योजने अंतर्गत महिंदळे इच्छापूर्ती कॉलनी परिसरात श्री.ग.त.शिंदे ते श्री.मोरे ते भूषण शिंदे यांच्या घरापावेतो रस्ता कॉंक्रीट करणे. | २४,९४,३०४/- | महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान जिल्हास्तरीय योजना अंतर्गत सन २०२१-२२ |

**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- १३३ — प्र क्र.१८ धुळे मनपा हद्दीत मोहाडी गट नं. २/२ भटाई माता रिक्षा स्टॉप जवळील मनपाच्या दवाखाना जवळील जागेत श्रीछत्रपती शिवाजी महाराज पुतळा उभारणेसाठी चबुतरा बांधणेचे निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. बन्सीलाल जाधव — विषय मंजूर करण्यांत यावा.

म. किरण अहिरराव — विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती — सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर१४४ दिनांक२५/०८/२०२२**

प्र क्र १८ धुळे मनपा हद्दीत मोहाडी गट नं. २/२ भटाई माता रिक्षा स्टॉप जवळील मनपाच्या दवाखाना जवळील जागेत श्रीछत्रपती शिवाजी महाराज पुतळा उभारणे कामिचा चबुतरा बांधणे बाबतच्या कामास धुळे महानगरपालिका ठराव नं. ३६ दि.२३/०३/२०२२ मा.आयुक्त सो. धुळे महानगरपालिका यांनी टिपणी मंजुरीने दि.०५/०५/२०२२ अन्वये उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु.३९,९९,७६३/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.उक्त कामाबाबत मजीप्रा जळगाव यांचे पत्र क्र./१२/२०२२-२३ दि.०६/०५/२०२२ अन्वये रक्कम रु.३९,९९,७६३ मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत या धुळे महानगरपालिका जा.क्र./धुमपा/पापुवि / १२९ /२०२२-२३ दि.०१/०६/२०२२ अन्वये दि. ०२/०६/२०२२ रोजी दैनिक देशदूत / समाज सारथी या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि. ३०/०६/२०२२ रोजी निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे /ठेकेदराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १. | पवन नंदलाल अजळकर | अंदाजपत्रकीय दराने | सर्वात कमी दर |
| २. | विकास जी. विभुते | शे.१% जास्तीने | |
| ३. | अक्षय धनराज माखीजा | शे.२% जास्तीने | |

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **श्री/मे पवन नंदलाल अजळकर** यांचे दर अंदाजपत्रकीय **अंदाजपत्रकिय दराने** आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑन लाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार **श्री / मे.पवन नंदलाल अजळकर** यांचे सदर काम **अंदाजपत्रकीय दराने** आलेले असल्याने यांच्या दरास मान्यतेसाठी व अन्य काम न मिळालेल्या ठेकेदारांना त्यांची बयाना रक्कम परत करणे कामी मे.स्थायी समिती पुढे मंजुरीसाठी सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी **श्री /मे.पवन नंदलाल अजळकर** यांचे **अंदाजपत्रकीय दराने** आलेल्या निविदा दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ अन्वये मान्यता देण्यांत येत आहे. **तसेच** सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी.याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री. जाधव बन्सीलाल माणिक

अनुमोदक:- श्री. अहिरराव किरण हरिश्चंद्र

**सर्वानुमते मंजुर,**

**सही/-x x x**

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- १३४ महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान जिल्हास्तर अंतर्गत सन २०२१-२२ प्रभाग क्र.२ मध्ये सर्व्हे नं.४२/१ देवपूर जी.टी.पी.स्टॉप जवळील आग्रारोड ते मंगलमुर्ती सोसा.पर्यंत निर्मल कुमार सूर्यवंशी यांचे घरापासून ते पोलीस माळी यांच्या घरापर्यंत दुतर्फा पेव्हर ब्लॉक बसविणेचे निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. मंगला चौधरी विषय मंजूर करण्यांत यावा.

म.खान मोहम्मद साबीर विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर१४५ दिनांक २५/०८/२०२२**

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान जिल्हास्तर अंतर्गत सन २०२१-२२ प्रभाग क्र.२ मध्ये सर्व्हे नं.४२/१ देवपूर जी.टी.पी.स्टॉप जवळील आग्रारोड ते मंगलमुर्ती सोसा.पर्यंत निर्मल कुमार सूर्यवंशी यांचे घरापासून ते पोलीस माळी यांच्या घरापर्यंत दुतर्फा पेव्हर ब्लॉक बसविणे बाबतच्या कामास मा.जिल्हाधिकारी सो. धुळे यांची प्रशासकीय मान्यता दि.२३/०३/२०२२ अन्वये उक्त कामाबाबत रक्कम रु.५९,९९,६१२/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे. उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./१००१/२०दि. १४/०३/२२ अन्वये रक्कम रु. ५९,९९,६१२/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./धुमपा/बां.वि./३/२० दि.१२/०४/२०२२ रोजी दैनिक आपला सकाळ/सा.खान्देश जन संग्राम या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.०६/०५/२०२२ पर्यंत निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरुन निविदा दर सादर केलेली आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदार किंवा ठेकेदाराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | श्री.ऋषिकेश बी.महाजन | शे.-९.९९%(कमी) | |
| २ | मे.समर्थ कन्सट्रक्शन | शे.-११.११%(कमी) | |
| ३ | मे.हिंद कन्सट्रक्शन | **शे.-२३.००%(कमी)** | |
| ४ | मे.गायत्री कन्सट्रक्शन | शे.२.०० % जास्त | |
| ५ | मे.एकविरा कन्सट्रक्शन | शे.३.०० % जास्त | |

सदर तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता **मे.हिंद कन्सट्रक्शन** यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे ५९,९९,६१२/-इतक्या रक्कमेचे असून **शे.-२३.००%(कमी)**दराने आहे.

सदर निविदा धारकांचे निविदा दर हे **शे.-२३.००%(कमी)** दराने असल्याने सर्व निविदा समिती सदस्यांनी सदर निविदा धारकांचे दर स्वीकारण्यास मा.आयुक्त सो. यांना शिफारस करण्यावर एकमत झाले.

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **मे.हिंद कन्सट्रक्शन** यांचे दर **शे.-२३.००%(कमी)** आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार **मे.हिंद कन्सट्रक्शन** यांची **शे.-२३.००%(कमी)** दराने आलेले निविदा दर मे.स्थायी समिती समोर मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी **मे.हिंद कन्सट्रक्शन** यांची **शे.-२३.००% (कमी)** दराने आलेले निविदा दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ अन्वये मान्यता देण्यांत येत आहे. तसेच सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी.याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्रीमती चौधरी मंगला अर्जुन

अनुमोदक:- श्री. खान मोहम्मद साबीर मुहिबुल्लाह **सर्वानुमते मंजुर,**

**सही/-x x x**

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- १३५ धुळे महानगरपालिका पाणी पुरवठा विभागाकडील अत्यावश्यक सेवेतील टाटा सुमो वाहन क्र. एम.एच.१८ एफ. १०२ वाहनांची दुरुस्ती खर्च ₹.७९४८८/- खर्च मान्यतेसाठी यापूर्वी सादर झालेला असून त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर फेर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.नागसेन बोरसे हे वाहन २००६ चे आहे १६ वर्षे झाले आहे. आर.टी.ओ. नियमानुसार १५ वर्ष झाले की स्क्रॅप होते. आपले कर्मचारी रोज ते वाहन घेऊन हायवे वर ये जा करीत असतात. जर काही अपघात झाला तर त्याला जबाबदार कोण? माझे असे मत आहे की त्यांना नविन वाहन घेऊन द्यावे. आपल्याला रोजची आवश्यकता आहे तर एक वाहन नविन वाहन घ्यायला काय हरकत आहे.

म.बन्सीलाल जाधव सदरचा विषय मंजूर करण्यात यावा.

म.मंगलाताई चौधरी विषय मंजूर करण्यात यावा.

म.सभापती सदस्यांच्या सूचना चांगल्या आहे. १५ वर्षाच्या वर स्क्रॅपींग पॉलीसी नाही. तुमच्या सूचनांची नोंद घेतो. त्यावर निश्चीत कार्यवाही करु. सदर प्रस्तावास कार्यालयीन अहवालानुसार मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १४६ दिनांक २५/०८/२०२२**

धुळे महानगरपालिका पाणी पुरवठा विभगाकडील अत्यावश्यक सेवेतील वाहन क्र. एम.एच.१८ एफ.१०२ हे टाटा सुमो वाहन सुस्थीतीत असणे आवश्यक आहे. वाहनांवर आजपावेतो झालेला खर्च येणेप्रमाणे.

| आर्थीक वर्ष | खर्च रक्कम | आर्थीक वर्ष | खर्च रक्कम |
|---|---|---|---|
| २००६--०७ | ₹.५९०५/- | २०१४-१५ | ₹.२५५१५/- |
| २००७-०८ | ₹.३१११६/- | २०१५-१६ | ₹.४७६८३/- |
| २००८-०९ | ₹.१०९७१/- | २०१६-१७ | ₹.२७२४९/- |
| २००९-१० | ₹.११३४५/- | २०१७-१८ | ₹.९४६११/- |
| २०१०-११ | ₹.५५१३५/- | २०१८-१९ | ₹.९८१६/- |
| २०११-१२ | ₹.६६४८०/- | २०१९-२० | ₹.८११७/-/- |
| २०१२-१३ | ₹.७४६१८/- | २०२०-२१ | ₹.६१२६६/- |
| २०१३-१४ | ₹.९६८१८/- | २०२१-२२ | |
| | | **२०२२-२३** आजपावेतो | |

**सन २०२२-२३ या चालु आर्थीक वर्षात खर्च** निरंक **खर्च झालेला आहे**.

सदरील वाहन हे पाणी पुरवठा अत्यावश्यक सेवेसाठी सुकवद, बाभळे जलशुध्दीकरन केंद्र येथे दररोज तपासणी व कर्मचारी ने-आण करण्यासाठी वाहनांचा वापर होत असल्याने वाहनाचे दुरूस्ती कामे करणे आवश्यक आहे.

वाहनांचे प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडुन वाहन नोंदणी नुतनीकरण करावयाचे असल्याने तसेच शासन निर्णय क्रमाक: विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, भाग-२ अ.क.१९-क नियमक्रमांक ६९ मधील रकाना ६ मधील अटीनसार शासकीय जीप प्रकारातील वाहनास २,४०,००० किंवा १० वर्ष पुर्ण झाल्यास प्रादेशिक परिवहन अधिकरी, यांचेकडुन निरूपयोगी ठरविता येते सदरील वाहनास १५ वर्ष पुर्ण् झालेले व २,५०,००० कि.मी. पेक्षा जास्त झाला असल्याने अधिकृत वितरक यांचेकडील दुरूस्ती खर्च रक्कम**₹.७९४८८**/- मात्र जास्तीचा असल्यामुळे सदर वाहनांचा तहकुब विषय नामंजूर करणे व स्थानिक बाजारातून अथवा अधिकृत वितरक यांच्याकडुन किरकोळ स्वरूपात दुरूस्ती कामे करून घेणेकामी फेर निर्णयास्तव मे.स्थायी समिती कडेस सदरील विषय ठेवणेस मंजुरी दिल्यानुसार मे.समितीकडेस

फेर विचार करणेस तहकुब विषय नामंजूर करून स्थानिक बाजारातून अथवा अधिकृत वितरक यांच्याकडुन किरकोळ स्वरूपात दुरूस्ती करणेस मे.स्थायी समितीकडेस निर्णयास्तव सविनय सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सद्यास्थितीत मनपाकडेस वाहन उपलब्ध नसल्याने व नविन वाहन खरेदीबाबत मनपाची आर्थिक परिस्थिती नसल्याने वाहनाची किरकोळ स्वरूपाची दुरूस्ती अधिकृत वितरक किंवा स्थानिक बाजारातून करून घेण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सुचक :- श्रीमती चौधरी मंगला अर्जुन

अनुमोदक:-श्री. बन्सीलाल माणिक जाधव

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय कमांक:-१३६ धुळे महानगरपालिका अग्निशामक विभागाकडील वाहन क्र.एम. एच. १८ जी. ०२५९ अत्यावश्यक सेवेतील अग्निशामक वाहन दुरूस्ती खर्च ₹.१२९४२/- मात्रच्या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील अनुसूची "ड" प्रकरण ५ (२) (२) नुसार कार्योत्तर मान्यता देणेबाबत विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. प्रतिभाताई चौधरी विषय मंजूर करण्यांत यावा.

म. नाजियाबानो पठाण विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १४७ दिनांक२५/०८/२०२२**

धुळे म.न.पा अग्निशामक (सुरक्षितता) विभागाकडील अत्यावश्यक सेवेतील अग्निशामक वाहन एम.एच. १८ जी.०२५९ वाहनांची दुरूस्ती करणेकामी टाटा अधिकृत वितरक-उज्वल ॲटोमोटिव्ह प्रा.लि. धुळे गेली असता वाहनांची दुरूस्ती करणे आवश्यक असल्याने प्रशासकीय व आर्थिक मंजुरी प्रक्रिया सुरू असताना नस्ती मंजुरीस उशीर होत असल्याने उन्हाळयाचे दिवस असल्याने वारंवार आगीच्या घटनामुळे व अग्निशामक विभाग सध्या तिनच वाहन कार्यरत असल्याने सहा.अग्निशामक अधिकारी यांनी वाहनांची दुरूस्ती टाटा अधिकृत वितरक –उज्वल ॲटोमाबाईल प्रा.लि. यांच्याकडुन तातडीने करून घेतली . यासाठी एकूण 12942/- खर्च सर्व करासहित आलेला आहे.

शासन निर्णय ३० सप्टेंबर २०११ महसूल व वन विभाग वित्तीय अधिकार नियम पुसतिका १९७८, भाग-एक उप विभाग दोन नियम ६९,पृष्ठ क्र.३० नुसार जड डिझेल वाहन ट्रक या वाहनास ₹.१,२०,०००/- पर्यंत दुरूस्ती खर्चास वार्षीक मर्यादा आहे.

| आर्थिक वर्ष | खर्च रक्कम | आर्थिक वर्ष | खर्च रक्कम |
|---|---|---|---|
| २०१५-१६ | निरंक | २०१९-२० | ₹.२४५४४/- |
| २०१६-१७ | निरंक | २०२०-२१ | ₹.४४३९/- |
| २०१७-१८ | निरंक | २०२१-२२ | ₹.४३९०९/- |
| २०१८-१९ | ₹.४६१४/- | २०२२-२३ | |

सन २०२१-२२ या मागील आर्थीक वर्षात खर्च ₹.४३९०९/- मात्र आजपावेतात खर्च झालेला आहे व या बिलातील खर्च ₹.१२९४२/- मात्र होत आहे. एकुण ₹.५५ ८५१/- मात्र चालु आर्थीक वर्षात खर्च होणार आहे.

सदरील बिजकातील खरेदी/दुरूस्ती ही चालूआर्थिक वर्षात करण्यात आलेली नाही

नविन साहित्याची नोंद प्रमाणित केली आहे. मनपा मेकॅनिक यांनी तांत्रिक अहवाल दिलेला आहे. दुरूस्ती कामे जी.एस.टी.नोंदणीकृत संस्थेकडूनच करणेत आली आहेत. दुरूस्ती कामाचे दर बाजार भावाप्रमाणे योग्य आहेत.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम नुसार सदर खर्च रक्कम ₹.१२९४२/- मात्रला मा.आयुक्त सो. यांना मंजुरीचे अधिकार आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी नुसार अग्निशामक विभागाकडील वाहन क्र. एम. एच. १८ जी. ०२५९ अत्यावश्यक सेवेतील वाहन दुरूस्ती खर्च ₹.१२९४२/- मात्रच्या खर्चास प्रशासकीय व आर्थिक तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार अनुसूची "ड" प्रकरण ५ (२) (२) नुसार मे. स्थायी समितीकडेस सदर विषय कार्योत्तर मंजुरीस्तव ठेवणेस मंजुरी दिल्यानुसार मे.स्थायी समिती कडेस मान्यता होणेस सविनय सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर वाहन दुरुस्ती कामी झालेला खर्च रु१२९४२/-मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार अनुसूची "ड" प्रकरण ५ (२) (२) नुसार कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे. **तसेच** सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी.याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्रीमती चौधरी प्रतिभाताई शिवाजीराव

अनुमोदक:- श्रीमती पठाण नाजियाबानो नासीर खा

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-१३७ मा.महापौर सो यांच्या सेवेतील मनपा वाहन क्र.एम.एच.१८ बी.आर.००१९ वाहनांची दुरुस्ती खर्च ₹.३४,३१९/- मात्रच्या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मंजुरीस्तव आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. खान मो. साबीर विषय मंजूर करण्यांत यावा.

म. बन्सीलाल जाधव विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर वाहन दुरुस्ती खर्चास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १४८ दिनांक२५/०८/२०२२**

धुळे महानगरपालिका सामान्य प्रशासन विभागाकडील म.महापौर सो यांच्या सेवेतील वाहन क्र एम.एच.१८ बी.आर.००१९ हे मनपा टाटा सफारी वाहनांचे ए.सी व्यवस्थित काम करीत नसल्याबाबतचा अहवाल वाहन चालक व मेकॅनिक/हेल्पर यांनी वाहन विभागाकडेस सादर केल्यानुसार वाहन विभागाकडुन टाटा अधिकृत वितरक, उज्वल अॅटोमोटीव्ह प्रा.लि. धुळे यांना पत्र देऊन उज्वल अॅटोमोटिव्ह, धुळे यांचे कंपनी अभियंता मार्फत वाहनांची

तपासणी केली असता त्यांचे अहवालानुसार वाहनात खालीलप्रमाणे दुरूस्ती कामे करणे आवश्यक आहे. दि.२१/०५/२०२२ अधिकृत वितरक यांचे कडून दुरूस्ती कामाचे इस्टीमेट घेण्यात आले आहे. तरी वाहनास करण्यात येणारी दुरूस्ती मजुरीसह टाटा मोटर्स अधिकृत वितरक – उज्वल अॅटोमोटिव्ह प्रा.लि. धुळे यांचे कडून करुन घेणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम नुसार सदर खर्च रक्कम ₹.३४२१९/- मात्रला मा. आयुक्त सो. यांना मंजुरीचे अधिकार आहेत.सदर प्रस्ताव मे.स्थायी समिती कडेस मान्यतेसाठी सविनय सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर वाहन दुरुस्तीसाठी येणारा खर्च रु.३४२१९/- मात्र खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यांत येत आहे.

सुचक :- श्री. खान मोहम्मद साबीर मुहिबुल्लाह
अनुमोदक:- श्री. जाधव बन्सीलाल माणिक

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक:-१३८ | लिपीक / टंकलेखक (संगणक ऑपरेटर) यांना मुदतवाढ ६ महिन्यासाठी मुदतवाढ देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे. |
| म.नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले. |
| म.सभापती | माझ्या काही सूचना आहे यावर आपल्याकडे कॉन्ट्रॅक्टवर मानधनावर किती कर्मचारी आहे? |
| म.मोरे | ११ कर्मचारी ओव्हरसिअर आहे, वाहनचालक ५ आहे, व्हॉल्वमन,पंपचालक,गाळणी ऑपरेटर,केमीस्ट असे ४६ आहे, कॉम्प्युटर ऑपरेटर २४ व बांधकाम विभागात ६ वाहन चालक आहे. वैद्यकिय अधिकारी २, सॅनिटरी इन्सपेक्टर, स्टाफ नर्स २४ आहे. |
| म. सभापती | साधारणत: १२२ लोकं आहेत मानधनावर. मी वारंवार आपल्याकडील मानधनावरील कर्मचाऱ्यांचा विषय घेत असतो मुदतवाढीसाठी आपण त्यांना मानधन देतो ते अल्प आहे मी सांगली, वसई-विरार, जळगाव या ड वर्ग मनपांची कागदपत्रे ठराव उपलब्ध आहे. मी ठरावात नोंद करुन देतो, त्यांचे काय इतर ड वर्ग मनपात मानधन आहे व आपण काय मानधन त्यांना देतो , जास्तीत जास्त १५ दिवसाच्या आत हा विषय स्थायी कडे आणायचा आहे जर नाही आला तर दफतर दिरंगाईच्या कार्यवाही साठी मी आपली शिफारस करेल. सांगली, वसई-विरार यांचे काही दर आपल्याकडे उपलबध आहे. लिपीक –टंकलेखक, लघुलेखक, ड्राफटसमन यांना २२०००/- मानधन आहे आपल्याकडे त्याच लोकांना ८ ते १२ हजार आहे. त्याचप्रमाणे शिपाई, कक्ष सेवक, वैद्यकिय विभाग मजूर यांना २००००/- मानधन आहे अभियंता यांना ३६०००/- मानधन आहे, आपल्याकडे त्यांना २००००/- आहे. कमी खर्चात काम करुन घेणे हा देखील गुन्हा आहे. ज्या वेळेस आपण कमी पगारात काम करुन घेतो तो कर्मचारी निश्चीत उत्पन्नाचे स्त्रोत शोधतो. यात लोकसंख्येचा तक्ता देखील आहे ज्यांची लोकसंख्या क्षेत्रफळ आपल्या मनपा च्या बरोबरीचे आहे. त्या मनपाचे रेट व तो प्रस्ताव आपण मनपा समोर आणायचा या स्थायीची व सत्ताधारी पक्षाची धारणा आहे की, कुठल्याही परिस्थितीत कमी पगारात काम करुन घेऊ नये. आपला जो काही अभिप्राय असेल निगेटिव्ह किंवा पॉझिटिव्ह हा १५ दिवसांत स्थायी समोर आला पाहिजे. हे विषय मी मंजूर करतो. असाच ठराव प्रशासनाकडे पाठवावा आणि पाठवतांना ज्यांच्या मुदती संपल्या त्यांच्याच नाही, १२२ |

लोकांसाठी पण हा ठराव १५ दिवसांत आमच्याकडे आला पाहिजे. त्याच प्रमाणे सन्मा. सदस्य नागसेन बोरसेंनी जी सूचना केली त्याचा शासन निर्णय व त्याची जी पदोन्नती समितीची मिटींग झाली पाहिजे. कुठल्याही परिस्थितीत ती मिटींग झाली पाहिजे व त्यांना पदोन्नती मिळाली पाहीजे. प्रशासनाला विनंती करतो. १५ दिवसाच्या आत जे-जे सांगीतले ते कुठल्याही परिस्थितीत आले पाहिजे. ज्याच्या कडून दिरंगाई होईल त्याच्यावर कार्यवाही करण्यात येईल.

म.प्रतिभा चौधरी — आपण जी मानधन कर्मचाऱ्यांबाबत अनेक मनपाकडून अहवालाची माहिती दिली त्याबद्दल आपले अभिनंदन करते, मी ४-६-२०२१ ला पत्र दिले होते. मानधन कर्मचाऱ्यांना किमान वेतन कायदयानुसार वेतन देण्यात यावे. जे कर्मचारी करतात त्यांचे मानधन कमी आहे. आणि कर्मचारी यांची नेमणूक करतांना मेरीट आणि गुणवत्ता बघीतली गेली पाहिजे. वशीलेबाजी करता कामा नये. त्यांची गुणवत्ता तपासली गेली पाहिजे. व कर्मचाऱ्यांचे मानधन वाढवण्यात यावे. व विषयाला मंजूरी द्यावी.

म.सभापती — नविन कर्मचाऱ्यांच्या भरती बाबतचा विषय नाही आहे. हा मुदवाढीचा विषय आहे. आत्ताच आपण स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा केला. मी आपल्या कर्मचाऱ्यांचे अभिनंदन करतो. आपले ए.एस.आय ,सुपरवायझर,आरोग्य कर्मचारी, वसुली विभाग उत्तमरित्या त्यांनी काम केले त्यांचे सर्वांचे अभिनंदन करतो. आणि हा अभिनंदनाचा ठराव पण पारित करतो. हे जे आपण सभागृहात बोलतो किंवा चर्चा करतो, चर्चा ही झालीच पाहिजे. कुठल्याही संस्थेचा जिवंतपणा हा चर्चेतून दिसून येतो. मी प्रशासनाचेही अभिनंदन करतो. सदस्यांचे ही अभिनंदन करतो. सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर१४९ दिनांक २५/०८/२०२२**

श्रीमती वर्षा छबिलाल माळी, लिपिक/टंकलेखक (संगणक ऑपरेटर) यांची मानधनावर 6 महिने कालावधीकरीता नियुक्ती करण्यात आली होती. त्यानुसार त्यांची 06 महिने कालावधीची नियुक्ती दि. 12/6/2022 रोजी संपुष्ठात आली आहे. तरी संदर्भाय क्र. 2 अन्वये खालील मानधनावरील संगणक ऑपरेटर यांनी पुढील 06 महिने कालावधीकरीता मुदतवाढ मिळणे बाबत विनंती अर्ज सादर केलेला आहे व त्याबाबत संबंधीत विभाग प्रमुखांनी संदर्भीय क्र 3 अन्वये त्यांना मुदतवाढ देणेबाबत शिफारस केलेली आहे.

| अ.क्र. | संगणक ऑपरेटरचे नाव | कार्यरत विभाग | मुदत संपुष्ठात आल्याचा | मानधन रु |
|---|---|---|---|---|
| 1 | वर्षा छबिलाल माळी | वृक्ष प्राधिकरण विभाग | १२/६/२०२२ | १०,०००/- |

तरी संबंधीत लिपिक/टंकलेखक (संगणक ऑपरेटर) यांच्या अहवालानुसार त्यांच्या कामाची निकड पाहता मुदत संपल्याच्या दिनांकापासून 05 दिवसाची सेवा खंडीत करून करार पध्दतीने एकत्रित मासिक मानधनानुसार पुढील 06 महिने कालावधीकरीता मुदतवाढ देणेबाबतचा विषय महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 53 (3) नुसार मे. स्थायी समितीपुढे मंजुरीस्तव सादर करण्यात आलेला आहे.

सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून उक्त मानधना वरील संगणक लिपिक यांना ०६ महिने करीता एकत्रित मानधन रु.१०,०००/- मात्र अनुसार०५ दिवसाचा सेवा खंड करुन मुदतवाढ देणेबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ (३) नुसार मान्यता देण्यांत येत आहे. तसेच सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी.याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

तसेच धुळे महानगरपालिकेमार्फमत मानधनावर असलेल्या विविध विभागातील कर्मचाऱ्यांना किमान वेतन कायदयाप्रमाणे मानधन देणे अपेक्षित आहे. सांगली व वसई विरार

या ड वर्ग महानगरपालिकामध्ये त्याप्रमाणे मानधन निश्चित केलेले आहे.सदर महानगरपालिकेच्या धर्तीवर आपल्या महानगरपालिकेकडील मानधनावरील सर्व कर्मचाऱ्यांचा मानधन निश्चितीबाबत प्रस्ताव 15 दिवसाच्या आत स्थायी समितीपुढे सादर करावा.तसेच नियमाप्रमाणे प्रशासनामार्फत पदोन्नती समितीची बैठक घेण्यात येवून कर्मचाऱ्यांना आवश्यक तो लाभ देणेबाबत तातडीने कार्यवाही करावी. सदर बाबतची कार्यवाही मुदतीत करणेबाबत दक्षता घ्यावी.

सुचक:- सौ.प्रतिभाताई शिवाजीराव चौधरी

अनुमोदक:- सौ.किरण राकेश कुलेवार

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-१३९ — पाणीपुरवठा विभागाकडील मानधनावरील १ ते ६ व्हॉलमन कर्मचा-यांना मुदतवाढ देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. खान मो. साबीर — विषय मंजूर करण्यांत यावा.

म अन्सारी अब्दुल लतीफ — विषय मंजुर करण्यांत यावा.

म. सभापती — सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर पाणीपुरवठा विभागाकडील मानधनावरील १ ते ६ व्हॉलमन कर्मचा-यांना मुदतवाढ देण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर१५० दिनांक२५/०८/२०२२**

पाणीपुरवठा विभागाकडील खालील नमुद १ ते ६ एकत्रित मानधनावरील व्हॉलमन, पंप ऑपरेटर यांना पुढील ६ महिने करीता नविन नियुक्ती देणेबाबत सदर ठरावानुसार मंजुरी देण्यात आलेली आहे. १ ते ६ व्हॉलमन, पंप ऑपरेटर यांना एकत्रित मानधनावर पुढील ६ महिनेकरीता नविन नियुक्ती देण्यात आलेली आहे. त्यानुसार त्यांची दि २५/५/२०२२ रोजी मुदत संपुष्ठात आलेली आहे.

खालील १ ते ६ एकत्रित मानधनावरील व्हॉलमन,पंप ऑपरेटर यांनी पुनश्च ६ महिने करीता नविन नियुक्ती मिळणेबाबत अभियंता यांनी अहवाल सादर केलेला आहे.

| अ क्र | कर्मचा-याचे नाव | एकत्रित मानधन दरमहा | मुदत संपुष्ठात आल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| १ | श्री. आकाश कैलास बोरसे | रु. ८०००/- | २५/५/२०२२ |
| २ | श्री. जमील पठाण | रु. ८०००/- | २५/५/२०२२ |
| ३ | श्री. शशीकांत सदाशिव घोरपडे | रु. ८०००/- | २५/५/२०२२ |
| ४ | श्री. पवार तुषार वसंत | रु. ८०००/- | २५/५/२०२२ |
| ५ | श्री. विक्रांत जगदीश वराडे | रु. ८०००/- | २५/५/२०२२ |
| ६ | श्री. शेळके कुणाल चंद्रकांत | रु. ८०००/- | २५/५/२०२२ |

दिनांक २६/७/२०२२ रोजी मा. महापौर सो यांच्या दालनात झालेल्या बैठकीमध्ये मा महापौर सो यांनी निर्देश दिले की, सदर मानधनावरील कर्मचारी अत्याआवश्यक सेवेतील असल्याने विभाग प्रमुखांच्या अहवालानुसार त्यांना पुढील ६ महिनेकरीता नवीनीकरण करुन नविन नियुक्ती देणेबाबत कार्यवाही करणेबाबत निर्देश दिलेले आहे.

तरी महानगरपालिका अधिनियम ५३ नुसार नेमणुकीचा अधिकार कोणामध्ये निहित असणे याबाबत अधिनियमात तरतुद नमुद केलेली आहे.

उपरोक्त १ ते ६ व्हॉलमन,पंप ऑपरेटर (मानधनावरील) हे जुने अनुभवी मानधना वरील कर्मचारी असल्याने तसेच त्यांना कामाचा अनुभव असल्याने विभाग प्रमुखांच्या शिफारशीनुसार उक्त १ ते ६ मानधनावरील कर्मचा-यांच्या कामाची निकड पाहता मुदत संपल्याच्या दिनांकापासून ०५ दिवसाची सेवा खंडीत करून नविन नियुक्ती एकत्रित मानधनावर पुढील ०६ महिने कालावधीकरीता नविन नियुक्ती देणेबाबतचा विषय महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३ (३) नुसार मे. स्थायी समितीपुढे मान्यतेसाठी सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून पाणीपुरवठा विभागाकडील अ.नं. १ ते ६ एकत्रित मानधनावरील व्हॉलमन, पंप ऑपरेटर कर्मचा-यांच्या कामाची निकड पाहता मुदत संपल्याच्या दिनांकापासून ०५ दिवसाची सेवा खंडीत करून नविन नियुक्ती एकत्रित मानधनावर पुढील ०६ महिने कालावधीसाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३(३) नुसार मान्यता देण्यांत येत आहे. तसेच सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी.याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री. नागसेन दामोदर बोरसे
अनुमोदक:- श्री. अहिरराव किरण हरिश्चंद

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक :-१४० | सन २०२१-२२ या वित्तीय वर्षाचे सुधारीत वार्षिक लेख्यास मंजुरी देणेबाबत फेर विचार करणे. |
| म. नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले. |
| म.नागसेन बोरसे | गेल्यावेळेस हा विषय आला होता. आम्ही काही दुरुस्तया सूचवल्या होत्या त्याची अंमलबजावणी झाली की नाही हे कुठेच दिसत नाही. |
| म.सभापती | त्यांनी दुरुस्तया केल्या आहे. तुमच्याकडे पाठविण्यात येईल. |
| म.हर्षकुमार रेलन | शिक्षण मंडळाकडून शाळा दुरुस्तीसाठी २५ लाखाची तरतुद केली पण २२-२३ मध्ये २ लाखाची केली आहे. शिक्षण विभागाकडून काय मागणी आली आहे? मी मनपाच्या शाळा पाहून आलो. सर्व शाळा दुरुस्त कराव्या लागतील. आम्ही जे बोलतो त्यावर ॲक्शन घ्यायला पाहीजे. आम्ही पोटतिडकीने बोलतो शाळा नादुरुस्त आहे, विद्यार्थी येत नाही, लहान मुलांच्या भविष्याचा विचार करायला पाहीजे. शिक्षण मंडळाने आपल्याकडे तरतुदी सूचवल्या आहेत का? लेखा विभागाला बजेट तयार करतांना? |
| म.अभियंता | हया दुरुस्ती बाबतची कार्यवाही ही मागणीनुसार होत असते. बांधकाम विभागाने मागणी केली होती ती ५० लाखाची मंजूरी केली आहे. सर्व अभियंत्यांना आपल्या क्षेत्रातील शाळा आहे. त्या दुरुस्तीसाठी किती खर्च लागेल याबाबतचे परिपत्रक दिले आहे. ८ ते १० दिवसांत अंदाज पत्रक तयार होईल. सुधारित अंदाजपत्रकात याबाबत तरतुद प्रस्तावित करण्यात येईल. |
| म.हर्षकुमार रेलन | आपण यावर तरतूद करा. |
| म. सभापती | सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे. |

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १५१ दिनांक २५/०८/२०२२**

सन २०२१-२२ या वित्तीय वर्षाचे लेखे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधीनियम १९४९ चे कलम ९४ अ नुसार व लेखासंहिता १९७१ नियम ६० नमुना २८ नुसार तयार केले आहे तरी स्वाक्षरीसाठी सादर तसेच सदर लेखा मे.स्थायी समितीपुढे मान्यतेसाठी फेर सादर झालेले आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सन २०२१-२२ या वित्तीय वर्षाचे सुधारीत वार्षिक लेख्यास मान्यता देण्यांत येत आहे.

सुचक :- श्री. खान मोहम्मद साबीर मुहिबुल्लाह

अनुमोदक:- श्री. जाधव बन्सीलाल माणिक **सर्वानुमते मंजुर,**

**सही/-x x x**

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक :-१४१ | सन २०२१-२२ अंदाजपत्रकातील खर्चाबाबत रक्कम प्रधान लेखाशिर्षातून दुस-या प्रधान लेखाशिर्षातवर्ग करणेबाबत फेर विचार करणे. |
| म. नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले. |
| म.मंगलाताई चौधरी | विषय मंजूर करण्यांत यावा. |
| म.अन्सारी अब्दुल लतीफ | विषय मंजूर करण्यांत यावा. |
| म. सभापती | सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे. |

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १५२ दिनांक२५/०८/२०२२**

सन २०२१-२२ चे वार्षिक लेखे तयार करून मे.स्थायी समितीपुढे मंजूर कार्यालयीन अहवालानुसार मंजूरीसाठी सादर करणेत आलेले आहे. सदर वार्षिक लेखे सोबत जोडलेला तक्ता नमुना क्र.१० मध्ये दर्शविल्यानुसार विविध लेखाशिर्षात एकूण रक्कम रूपये ६४.५८ लक्ष चे तरतूदीपेक्षा जास्तीचा खर्च झालेला आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम १०३ अन्वये मंजूर झालेल्या अथसंकल्पात प्रधान लेखाशिर्षाखाली व एका उपशिर्षातून व दुस:या गौण शिर्षाखाली अथवा एका गौण शिर्षातून दुसऱ्या गौणशिर्षाखाली पुढील कमला मर्यादेच्या अधिन पुर्ण नियोजन बदल करावयाच्या रकमा बदल करता येतील. त्यानुसार प्रधान लेखाशिर्षात रहिलेल्या त्क्त्यानुसार शिल्लक रक्कम रूपये १९४.६४ लक्ष मधून भागविण्याकरीता उक्त कार्यवाहीत महानगरपालिका अस्तित्वात असल्याने मे.स्थायी समितीपुढे ठराव होणेस व मंजूरीसाठी सादर करण्यात आलेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास अधिनियमातील तरतुदीनुसार मान्यता देण्यांत येत आहे.

सुचक:- सौ.मंगलाताई अर्जुन चौधरी

अनुमोदक:- श्री.अन्सारी अब्दुल लतीफ **सर्वानुमते मंजुर,**

**सही/-x x x**

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

# धुळे महानगरपालिका,धुळे

## नगरसचिव कार्यालय

## स्थायी समिती सभा क्रमांक २१ चे इतिवृत्त

---

**धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह**
**सोमवार दिनांक ०५/०९/२०२२**
**वेळ दुपारी ४-०० वाजतां**

धुळे महानगरपालिकेची स्थायी समितीची साप्ताहिक सभा क्रं.२१ आज सोमवार दिनांक **०५/०९/२०२२** रोजी दुपारी ४.०० वाजतां श्री.शितल मोहन नवले, सभापती, स्थायी समिती, मनपा धुळे यांच्याअध्यक्षतेखाली **धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृहात** भरली. या सभेस खालील सन्मा.सदस्य हजर होते.

| अ.क्रं. | सदस्यांचे नांव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री.नवले शितल मोहन | सभापती |
| २ | श्री. जाधव संजय सुधाकर | सदस्य |
| ३ | श्री. बोरसे नागसेन दामोदर | सदस्य |
| ४ | श्रीमती कुलेवार किरण राकेश | सदस्या |
| ५ | श्रीमती वराडे वैशाली भिकन | सदस्या |
| ६ | श्री.जाधव बन्सीलाल माणिक | सदस्या |
| ७ | श्रीमती चौधरी मंगला अर्जुन | सदस्या |
| ८ | श्री.अन्सारी फातमा नुरुल अमीन | सदस्या |
| ९ | श्री. चौधरी नरेंद्र रुपला | सदस्य |
| १० | श्रीमती.चौधरी प्रतिभा शिवाजीराव | सदस्या |
| ११ | श्री. अहिरराव किरण हरिश्चंद्र | सदस्य |
| १२ | श्री. रेलन हर्षकुमार राधेश्याम | सदस्य |
| १३ | श्रीमती अग्रवाल सारिका प्रवीण | सदस्या |
| १४ | श्री.अन्सारी अब्दुल लतीफ अब्दुल हमीद | सदस्य |
| १५ | श्री.खान मोहम्मद साबीर मुहिबुल्लाह | सदस्य |
| १६ | श्रीमती पठाण नाजियाबानो नासिर खा | सदस्या |

**उपस्थित अधिकारी गण**

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. नितीन कापडणीस | अति. आयुक्त |
| २ | डॉ. श्रीमती संगिता नांदुरकर | उपायुक्त |
| ३ | श्री. मनोज अरविंद वाघ | नगरसचिव |
| ४ | श्री. गजानन पाटील | मुख्य लेखाधिकारी |
| ५ | श्री. लक्ष्मण पाटील | सहा. आरोग्याधिकारी |
| ६ | श्री. राजेश वसावे | सहा. आरोग्याधिकारी |
| ७ | श्री. विकास साळवे | मलेरिया पर्यवेक्षक |
| ८ | श्री. चंद्रकांत मोरे | लेखापाल |

| | | |
|---|---|---|
| ९ | श्री. कमलेश सोनवणे | ओव्हरसिअर न.र.विभाग |
| १० | श्री. संजय मोरे | कार्यालय अधिक्षक |
| ११ | श्री. किशोर सुडके | प्र.परवाना अधिक्षक तथा बाजार विभाग प्रमुख |
| १२ | श्री. एन.के. बागुल | विद्युत अभियंता |
| १३ | श्री. महेंद्र सोनवणे | प्रशासन अधिकारी मनपा शि.मंडळ |
| १४ | श्री. राजू माईनकर | भांडारपाल तथा कार्यालय प्रमुख आरोग्य विभाग |
| १५ | श्री. सी.एम. उगले | ओव्हरसिअर पाणीपुरवठा विभाग |
| १६ | श्री. पी.डी. चव्हाण | ओव्हरसिअर बांधकाम विभाग |
| १७ | श्री. हेमंत पावटे | ओव्हरसिअर बांधकाम विभाग |
| १८ | श्री. प्रसाद जाधव | अतिक्रमण विभाग प्रमुख |
| १९ | श्री. सुक्राम राऊत | वाहन विभाग |

मा. सभापती — सन्मा.सदस्य मा.आयुक्त सो.सर्व अधिकारी कर्मचारी व पत्रकार, छायाचित्रकर बांधव यांचे मी स्थायी समितीच्या बैठकीत स्वागत करतो.सभेचा कोरम पुर्ण झाला असुन नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरु करावे.

म. नगरसचिव — वंदे मातरम् या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

विषय क्रमांक:-१४२ — मागील स्थायी समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे. (०४/०८/२०२२)

म.नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.प्रतिभाताई चौधरी — मागील स्थायी समितीसभेत मी लेखा विभागाकडील १ वर्षाचे उत्पन्न व खर्चाचा तपशील देणेबाबत मागणी केली होती.तसेच याबाबत लेखी पत्र देखील सादर केलेले होते. याबाबत आपण देखील संबंधितांना आदेशित केलेले होते. परंतू अद्याप मला माहिती मिळालेली नाही. तसेच माझ्या प्रभागात ट्रक्टर देणेबाबत ही मागणी केलेली होती. परंतू त्यावर ही अद्याप कार्यवाही झालेली नाही.

म.सभापती — मुख्यलेखाधिकारी यांनी संबंधितांना तात्काळ माहिती उपलब्ध करून देणेबाबत आदेशित करावे. तसेच ट्रक्टरबाबत विभागाची बैठक घेवून त्याप्रमाणे नियोजन करता येईल.

म.नागसेन बोरसे — मागील स्थायी समितीच्या इतिवृत्तात विषय क्रमांक १२६ व १२७ मध्ये सुचक म्हणून माझे नाव नमूद केलेले आहे. मी त्या विषयाबाबत विरोध नोंदविलेला होता.

म.नगरसचिव — सदर विषय हे त्या बैठकीत तहकुब ठेवण्यात आलेले असून त्याप्रमाणे त्यास मान्यता मिळलेली आहे. आपल्या सुचनेनुसारच सदर विषय तहकुब ठेवलेले होता म्हणून आपले नाव सुचक म्हणून नमूद केलेले आहे.

म.सभापती — सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालानुसार मागील स्थायी समिती सभा दि.२१/७/२०२२ रोजीचे इतिवृत्त क्रमश: वाचन करुन कायम करण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १५३ दिनांक ०५/०९/२०२२**

मागील स्थायी समिती सभा दिनांक ०४/०८/२०२२ रोजीच्या सभेतील धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १३२ ते १३९ तसेच सभेत सन्मा.सदस्यांनी उपस्थित केलेली चर्चा व निर्णय क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

सही/-x x x

**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- १४३ — मुलभूत सोई सुविधा योजना अंतर्गत सन २०२१-२२ प्रभाग क्र.१९ मध्ये १०० फुटी रस्त्याच्या बाजूला शब्बीर नगर येथे कॉंक्रीट रस्ता करणेचे निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबावत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. बन्सीलाल जाधव — विषय मंजूर करण्यांत यावा.

म. फातमा बी नुरूल अमिन विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १५४ दिनांक ०५/०९/२०२२**

मुलभूत सोई सुविधा योजना अंतर्गत सन २०२१-२२ प्रभाग क्र.१९ मध्ये १०० फुटी रस्त्याच्या बाजूला शब्बीर नगर येथे कॉंक्रीट रस्ता करणे बाबतच्या कामास मा.जिल्हाधिकारी सो. धुळे यांची प्रशासकीय मान्यता दि.१६/०६/२०२२अन्वये उक्त कामाबाबत रक्कम रु.२९,८९,९९३/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./५७६/२० दि.२१/०१/२०२२ अन्वये रक्कम रु.२९,८९,९९३/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./धुमपा/बां.वि./२३/२०दि.२३/६/ २०२२ रोजी दैनिक पुण्यनगरी/मर्डर या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि. १४/०७/२०२२ पर्यंत निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदे बाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेली आहेत.

| **अ.क्र.** | **कंत्राटदार किंवा ठेकेदाराचे नाव** | **दिलेले निविदा दर** | **शेरा** |
|---|---|---|---|
| १ | मे.प्रियदर्शनी कन्सट्रक्शन | शे.५.०० % जास्त | |
| २ | रिजवान अहमद युसुफ पटेल | शे.६.०० % जास्त | |
| ३ | मे.अलिना कन्सट्रक्शन | **अंदाजपत्रकीय दराने** | **सर्वात कमी दर** |

सदर तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता **मे.अलिना कन्सट्रक्शन** यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे २९,८९,९९३/- इतक्या रक्कमेचे असून **अंदाजपत्रक** दराने आहे.

सदर निविदा धारकांचे निविदा दर हे**अंदाजपत्रक**दराने असल्याने सर्व निविदा समिती सदस्यांनी सदर निविदा धारकांचे दर स्वीकारण्यास मा.आयुक्त सो. यांना शिफारस करण्यावर एकमत झाले.

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **मे.अलिना कन्सट्रक्शन** यांचे दर **अंदाजपत्रक** आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार **मे.अलिना कन्सट्रक्शन** यांची **अंदाजपत्रक** दराने आलेले निविदा दर मे.स्थायी समिती समोर सादर करणेस मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी **मे.अलिना कन्सट्रक्शन** यांचे**अंदाजपत्रकीय दराने** आलेल्या निविदा दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ अन्वये मान्यता देण्यांत येत आहे. तसेच सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी.याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री. जाधव बन्सीलाल माणिक

अनुमोदक:- श्रीमती अन्सारी फातमाबी नुरूल अमिन

**सर्वानुमते मंजुर,**
सही/-x x x
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- १४४ मुलभूत सोई सुविधा योजना अंतर्गत सन २०२१-२२ प्रभाग क्र.१९ मध्ये हाशम मॉडेल शाळेच्या पाठीमागे शादाब नगर येथे रस्ता कॉंक्रीट करणेचे निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. नाजिया बानो पठाण विषय मंजूर करण्यांत यावा.

म. फातमा बी नुरूल अमिन विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती — सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १५५ दिनांक ०५/०९/२०२२**

मुलभूत सोई सुविधा योजना अंतर्गत सन २०२१-२२ प्रभाग क्र.१९ मध्ये हाशम मॉडेल शाळेच्या पाठीमागे शादाब नगर येथे रस्ता कॉक्रीट करणे बाबतच्या कामास मा.जिल्हाधिकारी सो.धुळे यांची प्रशासकीय मान्यता दि.१६/०६/२०२२ अन्वये उक्त कामाबाबत रक्कम रु.२९,९१,३७३/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./५७५/२०दि.२१/०१/२०२२ अन्वये रक्कम रु. २९,९१,३७३/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./धुमपा/बां.वि./२३/२०दि.२३/६/२०२२ रोजी दैनिक पुण्यनगरी /मर्डर या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि. १४/०७/२०२२ पर्यंत निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदे बाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेली आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदार किंवा ठेकेदाराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | मे.अलिना कन्सट्रक्शन | शे.७.०० % जास्त | |
| २ | मे.प्रियदर्शनी कन्सट्रक्शन | शे.२.०० % जास्त | |
| ३ | मे.वैदेही कन्सट्रक्शन | **अंदाजपत्रकीय दराने** | **सर्वात कमी दर** |

सदर तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता **मे.वैदेही कन्सट्रक्शन** यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे २९,९१,३७३/- इतक्या रक्कमेचे असून **अंदाजपत्रक** दराने आहे.

सदर निविदा धारकांचे निविदा दरहे**अंदाजपत्रक** दराने असल्याने सर्व निविदा समिती सदस्यांनी सदर निविदा धारकांचे दर स्वीकारण्यास मा.आयुक्त सो.यांना शिफारस करण्यावर एकमत झाले.

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **मे. वैदेही कन्सट्रक्शन** यांचे दर **अंदाजपत्रक** आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार **मे.वैदेही कन्सट्रक्शन** यांची **अंदाजपत्रक** दराने आलेले निविदा दर मे.स्थायी समिती समोर सादर करणेस मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी **मे. वैदेही कन्सट्रक्शन** यांचे **अंदाजपत्रकीय दराने** आलेल्या निविदा दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ अन्वये मान्यता देण्यांत येत आहे. **तसेच** सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी.याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्रीमती नाजिया बानो नासीर खा पठाण

अनुमोदक:- श्रीमती अन्सारी फातमाबी नुरूल अमिन — **सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- १४५ — मुलभूत सोईसुविधांचा विकास योजने अंतर्गत सन २०२१-२२ प्र.क्र.३ मध्ये नईम शेठ यांचे घरापासून ते इक्बाल अहमद यांचे घरापर्यंत रस्ता कॉक्रीट करणेचे निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे

म.नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. नाजिया बानो पठाण — विषय मंजूर करण्यांत यावा.

म. फातमा बी नुरूल अमिन विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती — सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १५६ दिनांक ०५/०९/२०२२**

मुलभूत सोईसुविधांचा विकास योजने अंतर्गत सन २०२१-२२ प्र.क्र.३ मध्ये नईम शेठ यांचे घरापासून ते इक्बाल अहमद यांचे घरापर्यंत रस्ता कॉक्रीट करणे बाबतच्या कामास मा. जिल्हाधिकारी सो.धुळे यांची प्रशासकीय मान्यता दि.१६/०६/२०२२अन्वये उक्त कामाबाबत रक्कम रु.२९,९४,८७१/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./५८०/२०दि. २१/०१/२०२२ अन्वये रक्कम रु. २९,९४,८७१/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिकाजा.क्र./धुमपा/बां.वि./२३/२०२२दि. २३/६/२२ रोजी दैनिक पुण्यनगरी / मर्डर या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि. १४/०७/२०२२ पर्यंत निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेली आहेत.

| **अ.क्र.** | **कंत्राटदार किंवा ठेकेदाराचे नाव** | **दिलेले निविदा दर** | **शेरा** |
|---|---|---|---|
| १ | मे.प्रियदर्शनी कन्सट्रक्शन | **अंदाजपत्रकीय दराने** | **सर्वात कमी दर** |
| २ | रिजवान अहमद युसुफ पटेल | शे.४.०० % जास्त | |
| ३ | मे.अलिना कन्सट्रक्शन | शे.२.०० % जास्त | |

सदर तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता **मे.प्रियदर्शनी कन्सट्रक्शन** यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे २९,९४,८७१/-इतक्या रक्कमेचे असुन **अंदाजपत्रक** दराने आहे.

सदर निविदा धारकांचे निविदा दर हे **अंदाजपत्रक** दराने असल्याने सर्व निविदा समिती सदस्यांनी सदर निविदा धारकांचे दर स्वीकारण्यास मा.आयुक्त सो. यांना शिफारस करण्यावर एकमत झाले.

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **मे.प्रियदर्शनी कन्सट्रक्शन** यांचे दर **अंदाजपत्रक** आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार **मे.प्रियदर्शनी कन्सट्रक्शन** यांची **अंदाजपत्रक** दराने आलेले निविदा दर मे.स्थायी समिती समोर सादर तसेच अन्य काम न मिळालेले ठेकेदारांना त्यांची बयाना रक्कम परत करणे बाबत तसेच सदर प्रकरण मे.स्थायी समिती समोर दर मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी **मे. प्रियदर्शनी कन्सट्रक्शन**यांचे**अंदाजपत्रकीय दराने** आलेल्या निविदा दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ अन्वये मान्यता देण्यांत येत आहे. **तसेच** सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी.याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्रीमती नाजिया बानो नासिर खा पठाण

अनुमोदक:- श्रीमती अन्सारी फातमाबी नुरूल अमिन **सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक:- १४६ | धुळे मनपातील एकत्रित मानधनावरील कर्मचारी पंप ऑपरेटर, विजतंत्री , गाळणी निरीक्षक, गाळणी चालक इत्यादी कर्मचा-यांना मुदतवाढ देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे. |
| म.नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले. |
| म. प्रतिभाताई चौधरी | सदर कर्मचारी यांची पात्रता आहे का ? सदर कामासाठी ते नियमात बसतात का? |
| म.सभापती | सदर कर्मचारी हे अकुशल कर्मचारी आहेत. |
| म.किरण अहिरराव | विषय मंजूर करण्यांत यावा. |
| म.नरेंद्र चौधरी | विषय मंजूर करण्यांत यावा. |

म. सभापती — सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १५७ दिनांक ०५/०९/२०२२**

पंप ऑपरेटर-८,विजतंत्री -६,गाळणी निरीक्षक -३,गाळणी चालक -६ एकुण २३ मानधना वरील कर्मचारी यांना ०६ महिने करीता मानधन तत्वावर नविन नियुक्ती देणेबाबत ठराव झालेला आहे.

उक्त मानधनावरील कर्मचारी यांना ०६ महिने करीता मानधन तत्वावर नविन नियुक्ती देणेत आलेली होती.

पाणीपुरवठा विभागाकडील कनिष्ठ अभियंता यांनी खालील मानधनावरील कर्मचा-यांचे काम समाधानकार असल्याने व कर्मचा-यांची कमतरता व निकड पाहता ते जुने व अनुभवी असल्याने त्यांना ६ महिनेकरीता नविन नियुक्ती देणेबाबत अहवाल सादर केलेला आहे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचे नांव | पद | मुदत संपल्याची तारीख | मानधन रुपये |
|---|---|---|---|---|
| १. | कल्पतरु स. वाघ | पंप ऑपरेटर | २२/०७/२०२२ | ८०००/- |
| २. | अमित अनिल पोतदार | पंप ऑपरेटर | २२/०७/२०२२ | ८०००/ |
| ३. | योगेश साहेबराव देवरे | पंप ऑपरेटर | २२/०७/२०२२ | ८०००/ |
| ४. | चेतन भानुदास सुडके | पंप ऑपरेटर | २२/०७/२०२२ | ८०००/ |
| ५. | दिपक वसंत माळी | पंप ऑपरेटर | २२/०७/२०२२ | ८०००/ |
| ६. | अमोल नरेंद्र अंपळकर | पंप ऑपरेटर | २२/०७/२०२२ | ८०००/ |
| ७. | इश्वर विठ्ठल बडगुजर | पंप ऑपरेटर | २२/०७/२०२२ | ८०००/ |
| ८. | रुपेश महेंद्र खैरनार | पंप ऑपरेटर | २२/०७/२०२२ | ८०००/ |
| ९. | रोहित रंजन मराठे | विजतंत्री | २२/०७/२०२२ | ८०००/ |
| १०. | देवेंद्र नामदेव सोनवणे | विजतंत्री | २२/०७/२०२२ | ८०००/- |
| ११. | रमन भिकु पाटील | विजतंत्री | २२/०७/२०२२ | ८०००/ |
| १२. | केशव मधुकर महाजन | विजतंत्री | २२/०७/२०२२ | ८०००/ |
| १३. | विश्वजीत विजय गुर्जर | विजतंत्री | २२/०७/२०२२ | ८०००/ |
| १४. | वराडे अक्षय राजेंद्र | विजतंत्री | २२/०७/२०२२ | ८०००/ |
| १५. | अमोल मधुकर पाटील | गाळणी निरीक्षक | २२/०७/२०२२ | ८०००/ |
| १६. | गणेश दिगंबर शेलार | गाळणी निरीक्षक | २२/०७/२०२२ | ८०००/ |
| १७. | खैरनार अरुण राजाराम | गाळणी निरीक्षक | २२/०७/२०२२ | ८०००/ |
| १८. | रमेश वेडु बोरसे | गाळणी चालक | २२/०७/२०२२ | ८०००/ |
| १९. | साळुंखे विनायक जगन | गाळणी चालक | २२/०७/२०२२ | ८०००/ |
| २०. | बडगुजर राहुल अंबादास | गाळणी चालक | २२/०७/२०२२ | ८०००/ |
| २१. | महाजन उमेश रविंद्र | गाळणी चालक | २२/०७/२०२२ | ८०००/ |
| २२. | निलेश पंढरीनाथ करनाळे | गाळणी चालक | २२/०७/२०२२ | ८०००/ |
| २३. | किरण गोविंदा चव्हाण | गाळणी चालक | २२/०७/२०२२ | ८०००/ |

तरी महानगरपालिका अधिनियम ५३ नुसार नेमणुकीचा अधिकार कोणामध्ये निहित असणे याबाबत अधिनियमात तरतुद नमुद केलेली आहे.

उक्त १ते२३मानधनावरील पाणीपुरवठा विभागातील कर्मचारी यांना मुदत संपल्याच्या दिनांकापासून ०५दिवसाची सेवा खंडीत करून एकत्रित मानधनावरपुढील०६ महिने कालावधी करीता नविन नियुक्ती देणेबाबतचा विषय महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३ (३) नुसार मे. स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून पाणीपुरवठा विभागाकडील उक्त १ ते २३ एकत्रित मानधनावरील कर्मचारी पंप ऑपरेटर, विजतंत्री,गाळणी निरीक्षक,गाळणी चालक इत्यादी कर्मचा-यांना कामाची निकड पाहता मुदत संपल्याच्या दिनांका पासून

०५दिवसाची सेवाखंडीत करून नविन नियुक्ती एकत्रित मानधनावर पुढील ०६ महिने कालावधीसाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३(३) नुसार मान्यता देण्यांत येत आहे. तसेच सदर मानधनावरील कर्मचा-यांना किमान वेतन कायदयानुसार मानधन अदा करणेबाबत यापूर्वीच आदेश दिलेला असून त्याप्रमाणे मानधन वाढीबाबत प्रस्ताव प्रशासनामार्फत सदर करावा.

तसेच सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री. चौधरी नरेंद्र रूपला

अनुमोदक:- श्री. अहिरराव किरण हरिश्चंद्र **सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक:-१४७ | धुळे महानगरपालिकेतील बदली कामगार यांनी दि. १/१/२०१६ ते दि ३०/११/२०१६ याकालावधीतील रोजंदारी दरवाढीतील फरकाची रक्कम मिळणेबाबत विनंती केलेली आहे. त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे. |
| म.नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले. |
| म.नागसेन बोरसे | विषय मंजूर करण्यांत यावा. |
| म.बन्सीलाल जाधव | विषय मंजूर करण्यांत यावा. |
| म. सभापती | सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे. |

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १५८ दिनांक ०५/०९/२०२२**

बदली कामगारांना दि. १/१/२०१६ ते दि ३०/११/२०१६ पर्यंतचा रोजंदारी दरवाढीचा फरक अदा करणे १. श्री भगवान भिवसन जयराम वगैरे यांचा दि २८/१०/२०२१ रोजीचे रोजंदारी दर वाढीचा फरक मिळणे बाबतचे निवेदन दिले होते. धुळे महानगरपालिकेतील बदली कामगार यांनी दि.१/१/२०१६ ते दि ३०/११/१६याकालावधीतील रोजंदारी दरवाढीतील फरकाची रक्कम मिळणेबाबत विनंती केलेली आहे.

याबाबत सविस्तर अहवाल खालीलप्रमाणे सादर केलेला आहे. धुळे महानगरपालिके तील वर्ग ३ व वर्ग ४ रोजंदारी कर्मचारी यांना म.सरकारी कामगार अधिकारी धुळे यांचेकडील किमान वेतन आयोगाप्रमाणे रोजंदारी दर पत्रकानुसार रोजंदारी दर लागु करणयात येतो.

त्याअनुषंगाने म. सरकारी कामगार अधिकारी धुळे यांच्या कडील दि ४/७/२०१६ रोजीच्या रोजंदारी दर पत्रकानुसार धुळे महानगरपालिकेतील वर्ग३व ४कर्मचा-यांना रु.४५३/-वरुन रु. ५४४/- इतका रोजंदारी दर लागु करणेबाबत चा प्रस्ताव मे.स्थायी समितीपुढे सादर करण्यात आलेला होता.

मे.स्थायी समिती ठराव क्र ७९ दि२३/११/२०१६अन्वये रोजंदारी व बदली कामगार यांना रु ४५३/- वरुन ५४४ याप्रमाणे रोजंदारी दर वाढ करणेबाबतचा प्रसतावास मान्यता देण्यात आलेली आहे व त्यानुसार ठराव पारीत झालेला आहे. सदर ठरावामध्ये सदराचा रोजंदारी दर कोणत्या दिनांकापासून लागु करावा या बाबत नमुद नाही.

त्यामुळे जा क्र /धुमपा /आस्था/ ९ दि.३/४/२०१७ अन्वयेच्या आदेशानुसार धुळे महानगरपालिकेतील बदली व रोजंदारी कामगारांना रु. ४५३/- वरुन रु. ५४४/- इतका रोजंदारी दर ठरावाच्या दिनांकापासून म्हणजेच दि २३/११/२०१६ पासून लागू करणेत आलेला आहे.

तरी संबंधीत वेतन लिपीक यांनी म सरकारी कामगार अधिकारी यांच्या पत्रानुसार दि १/१/२०१६ ते दि ३०/११/२०१६ पर्यंतचा एकूण १७२ बदली सफाई कामगार यांचा सदर कालावधीतील रु९१/-मात्र फरकाच्या रकमेचा तपशिल सादर केलेला आहे त्यानुसार सदरची रक्कम (रु. २२,१५,४८६/-) इतकी आहे.

तरी एकुण १७२ सफाई कामगार यांना दि १/१/२०१६ ते ३०/११/२०१६ या ११ महिन्याच्या कालावधीतील रोजंदारी दरवाढीचा फरक देण्याबाबत मुख्य लेखाधिकारी यांचा अभिप्राय घेणेत आलेला आहे.

तरतुदीपेक्षा फरकाची रक्कम जास्त आहे. उपलब्ध निधी व मंजुर तरतुदीचे मर्यादेतच रोजंदारी कर्मचारी यांची फरकाची रक्कम अदा करता येईल यासाठी समान हप्ते तयार करावे असे मत म.मुख्यलेखापरिक्षक यांनी दिलेले असून सदरचा विषय निर्णयास्तव सादर केलेला आहे.

मागील फरकाबाबत ठराव नाही आदेशान्वये व ठरावाप्रमाणे (स्था.स.दि.२३/११/२०१६) मुळात अदा आहेत.फरक रक्कम ११महिने कालावधीसाठीची असलेने मनपा निधी तरतूद होणे व पुन:श्च ठराव (GB) होणे आवश्यक तथापी माहिती व पुढील आदेशार्थ सविनय सादर असे टिपणीवर निर्देश दिलेले आहेत.

तरी धुळे महानगरपालिकेचा सन २०२१—२२ या आर्थीक वर्षाचा आस्थापना खर्च सुमारे ५६ टक्के असून रोजंदारी व बदली कामगार यांना ११ महिने कालावधीचा फरक अंदाजे रु. २२ लाख पेक्षा जास्त आहे.

तसेच धुळे महानगरपालिकेतील सर्व अधिकारी कर्मचारी यांचे ७ व्या वेतन आयोगाची संपूर्ण फरकाची रक्कम अदा करणे बाकी आहे तसेच सेवा निवृत्त कर्मचारी यांचे ७ वे आयोगानुसार निवृत्ती वेतन, शिल्लक रजेचे वेतन, उपदान इत्यादी फरकाच्या रकमा अदा करणे बाकी आहे.

तरी उक्त बाबींचा विचार करुन म.मुख्य लेखाधिकारी व म.मुख्य लेखापरिक्षक व मा. उपायुक्त यांचे अभिप्रायाचे अवलोकन होवून बदली कर्मचा-यांना ११ महिने फरकाची रक्कम रु २२ लाख १५ हजार देण्याबाबतचा विषय निर्णयास्तव मे. स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून तसेच करुन म. मुख्यलेखाधिकारी व म.मुख्य लेखापरिक्षक व मा.उपायुक्त यांचे अभिप्रायानुसार धुळे महानगरपालिकेतील बदली कामगार यांनी दि. १/१/२०१६ ते दि ३०/११/२०१६ याकालावधीतील रोजंदारी दरवाढीतील फरकाची रक्कम अदा करण्यास मान्यता देण्यात येत आहे. मनपाच्या आर्थिक परिस्थितीनुसार सदर रक्कम अदा करणेबाबत प्रशासनाने कार्यवाही करावी. तसेच सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री.नागसेन दामोदर बोरसे
अनुमोदक:- श्री.बन्सीलाल माणिक जाधव

**सर्वानुमते मंजुर,**
सही/-x x x
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक:- १४८ | सन २०२२-२३ या आर्थिक वर्षासाठी जलशुद्धीकरण केंद्रावर लागणारे ब्लिचिंग पावडर पुरवठा करणे कामी निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे. |
| म.नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले. |
| म. मंगलाताई चौधरी | विषय मंजूर करण्यांत यावा. |
| म. प्रतिभाताई चौधरी | विषय मंजूर करण्यांत यावा. |
| म. सभापती | सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे. |

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १५९ दिनांक ०५/०९/२०२२**

या कामाबाबत धुळे महानगरपालिका स्थायी समितीमार्फत मान्यता प्रदान असून मा. आयुक्त महानगरपालिका यांनी उक्त कामाबाबत रक्कम **रु.५४,७७,१५०**/-मात्र खर्चास आर्थिक व **प्रशासकीय मंजुरी** देणेत आली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका **जा.क्र./विवी/ 34 दि.13/07/2022** अन्वये व **दि.13/07/2022** च्या **दै. लोकमत / पथदर्शी** किंवा धुळे महानगपालिका / महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईट www.mahatender.gov.in वर खुल्या फेर ई-निविदा कोटेशन प्रसिद्ध करणेत येवून **दि.21/07/2022** रोजी पर्यंत निविदा मागविणेत आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत रोखीने बयाणा रक्कम भरून/लेटर प्याड वर निविदा दर सादर केलेले आहेत.

| **अ.क्र.** | **कंत्राटदाराचे नाव** | **दिलेले निविदा दर** | **शेरा** |
|---|---|---|---|
| 1 | **यश केमिकल्स** | रु.21,600/-प्रति टन **ग्रेड** - 1 ,33% **क्लोरीनयुक्त ब्लिचिंग पावडर** | L १ |
| 2 | **तिरुपती केमिकल्स** | रु.23,999/-प्रति टन **ग्रेड** - 1 ,33% **क्लोरीनयुक्त ब्लिचिंग पावडर** | |

याबाबत म.अति आयुक्त तथा निविदा समिती यांच्या दालनात निविदेची वित्तीय छाननी बैठक संपन्न झाली.सदर बैठकीतील समिती सदस्यायांनी निविदेमध्ये तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता **यश केमिकल्स** यांची निविदा सर्वात न्यूनतम दाराचे म्हणजेच **रु.21,600/- प्रति टन ग्रेड-1,33% क्लोरीनयुक्त ब्लिचिंग पावडर साठी** इतक्या रकमेची आहे. सदर निविदा धारकांचे निविदा दर हे सर्वात न्यूनतम दराचे असल्याने सर्व निविदा समिती सदस्यांनी सदर निविदा धारकांचे दर स्वीकारण्यास मा. आयुक्त यांना शिफारस करण्यावर एकमत झाले.

ठेकेदार **यश केमिकल्स** यांचे दर तुलनेत सर्वात कमी असून त्यांनी नियमाप्रमाणे रोखीने बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार मे. **यश केमिकल्स** यांनी सर्वात कमी म्हणजेच **रु.21,600/-प्रति टन ग्रेड-1,33% क्लोरीनयुक्त ब्लिचिंग पावडर** निविदा दर मंजुरीस्तव मे.स्थायी समितीकडे सादर झालेला आहे.

सन्मा.सदस्यांच्या सहमतीने सन २०२२-२३ या आर्थिक वर्षासाठी जलशुद्धीकरण केंद्रावर लागणारे ब्लिचिंग पावडर पुरवठा करणे कामी कंत्राटदार मे यश केमिकल्स यांनी सर्वात कमी म्हणजेच रु.२१,६००/-प्रति टन ग्रेड - १,३३% क्लोरीनयुक्त ब्लिचिंग पावडर निविदा दरास कार्यालयीन अहवालास अधिन राहून मान्यता देण्यात येत आहे. तसेच सदर कामाची निविदा मुदत कार्यादेश दिल्यापासून एक वर्षापर्यंत कायम राहिल. तसेच सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- सौ.प्रतिभाताई शिवाजीराव चौधरी

अनुमोदक:- सौ.मंगलाताई अर्जुन चौधरी

**सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक:- १४९ | सन २०२२-२३ करिता धुळे शहर पाणी पुरवठा योजनांवरील जलशुध्दीकरणाकरिता अॅलम (तुरटी) पुरविणेकामी निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे. |
| म.नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले. |
| म. नागसेन बोरसे | विषय मंजूर करण्यांत यावा. |
| म.बन्सीलाल जाधव | विषय मंजूर करण्यांत यावा. |
| म. सभापती | सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे. |

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १६० दिनांक ०५/०९/२०२२**

मा.आयुक्त/ उपायुक्त धुळे महानगरपालिका यांनी उक्त कामाबाबत रक्कम रु. २,२०,५०,००० /- मात्र खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेत आली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./विवी/53 दि01/07/2022 अन्वये व दि.13/07/2022च्या दै.पुण्यनगरी किंवा धुळे महानगपालिका/महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईट www. mahatender. gov.in वर खुल्या फेर ई-निविदा कोटेशन प्रसिद्ध करणेत येवून दि. 22/07/2022 रोजी पर्यंत निविदा मागविणेत आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत रोखीने बयाणा रक्कम भरून / लेटर प्याड वर निविदा दर सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नाव | दिलेले निविदा दर | | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | | अलम ग्रेड १ | अलम ग्रेड ४ | |
| | **जे.के इंडस्ट्रीज** | १७,७७७/- दर प्रति टन | ३७७७७/- दर प्रति टन | |
| २ | **महालक्ष्मि टेंडिंग कंपनी** | **७,९००/-दर प्रति टन** | **९,५०० /- दर प्रति टन** | L 1 |
| ३ | **डॉल्फिन केमिकल** | ८२००/- दर प्रति टन | ९७५०/- दर प्रति टन | |

उक्त बाबत दि.26 /08/2022, 5 वाजता म.अति आयुक्त तथा निविदा समिती यांच्या दालनात निविदेची वित्तीय छाननी बैठक संपन्न झाली.सदर बैठकीतील समिती सद्स्थायांनी निविदेमध्ये तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता महालक्ष्मि टेंडिंग कंपनी यांची निविदा सर्वात न्यूनतम दाराचे म्हणजेच अलम ग्रेड 1 करिता 7,900 /- दर प्रति टन, अलम ग्रेड 4 करिता 9,500 /- दर प्रति टन इतक्या रकमेची आहे.सदर निविदा धारकांचे निविदा दर हे सर्वात न्यूनतम दराचे असल्याने तथापि महालक्ष्मि टेंडिंग कंपनी निविदा धारकांचे दर हे जास्त असल्याने दर वाटाघाटी करिता दर कमी करून देणेचे करावे किंवा लेखी पत्राव्दारे महालक्ष्मि टेंडिंग कंपनी यांना कळविण्यात यावे.L१ मक्तेदारास दि.26/08/2022 रोजी दरवाटाघाटीसाठी बोलवणे बाबत मंजुरीस्तव सादर.दि. 26/08/2022 रोजी L-१ मक्तेदार यांनी दरवाटाघाटी करून निविदेत दिलेले दर कमी करून दिले असुन दि. 26/08/2022 रोजी निविदा समितीने सदर वाटाघाटी अंती दरांना मंजुरी देण्यात आली आहे.

दरवाटाघाटी अंती खालील प्रमाणे दर कमी केले आहेत.

१ अॅलम ग्रेड १ चा दर ७९००/-प्रति टन नमुद केला आहे. या पत्रानुसार नवीन अॅलम ग्रेड -१ चा दर ७८००/-प्रति टन या दरामध्ये अॅलमचा पुरवठा करण्यास तयार आहेत.

२. अॅलम ग्रेड-४ चा दर ९५००/- प्रती टन नमुद केला आहे या पत्रानुसार नवीन अॅलम ग्रेड ४ चा दर आम्ही ९४००/- प्रती टन या दरामध्ये अॅलमचा पुरवठा करण्यास तयार आहेत. सदर दर वाटाघाटी अंती दरांना मजुंरी होणेस म.स्थायी समितीकडे मजुंरीस्तव सादर झालेला आहे.

सन्मा.सदस्यांच्या सहमतीने सन 2022-23 करिता धुळे शहर पाणी पुरवठा योजनांवरील जलशुध्दीकरणाकरिता अॅलम (तुरटी) पुरविणेकामी कंत्राटदार मे **महालक्ष्मि टेंडिंग कंपनी** याचे वाटाघाटी अंति आलेले दर ग्रेड -१ चा दर ७८००/-प्रति टन व अॅलम ग्रेड ४ चा दर आम्ही ९४००/- प्रती टन या निविदा दरास कार्यालयीन अहवालास अधिन राहून मान्यता देण्यात येत आहे. तसेच सदर कामाची निविदा मुदत कार्यादेश दिल्यापासून एक वर्षापर्यंत कायम राहिल. तसेच सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री.नागसेन दामोदर बोरसे
अनुमोदक:- श्री.बन्सीलाल माणिक जाधव

**सर्वानुमते मंजुर,**
सही/-x x x
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- १५० धुळे मनपा पाणीपुरवठा केंद्रांवरील संपूर्ण पंप सेट मोटरसह बदलून नवीन पंपसेट मोटरसह बसविण्या बाबत इस्को मॉडल / PPP पद्धतीने करणे व सदर कामाची १० वर्ष देखभाल दुरुस्ती करणे बाबत PMC नेमणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. किरण अहिरराव — विषय मंजूर करण्यांत यावा.

म.नरेंद्र चौधरी — विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती — सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १६१ दिनांक ०५/०९/२०२२**

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका स्थायी समिती ठराव क्र.70.दि27-1-2022 मा.आयुक्त/उपायुक्त धुळे महानगरपालिका यांचे टिप्पणी/जिल्हाधिकारी सो यांची प्रशासकीय मान्यता/ दि.21-12-2021 रोजी अन्वये उक्त कामाबाबत रक्कम आयटम रेट नुसार खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेत आली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./विवी/104 दि.24-6-2022 अन्वये व दि.25-6-2022 च्या दै.लोकमत व धुळे महानगपालिका / महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईट www.mahatender.gov.in वर खुल्या ई-निविदा /कोटेशन प्रसिद्ध करणेत येवून दि.11-7-2022. रोजी निविदा मागविणेत आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत रोखीने बयाणा रक्कम भरून/लेटर प्याड वर निविदा दर सादर केलेले आहेत.

| Stages | Nature of Services | Consultancy Fees | |
|---|---|---|---|
| | | मानवसेवा कन्सल्टंट | यश इन्व्होटीव सोलुशन |
| १ | Stage I – DPR | ०.६८% of the Approved Project Cost | ०.७०% of the Approved Project Cost |
| २ | Stage II - Execution | १.३०% of the Accepted tender Cost | १.२०% of the Accepted tender Cost |
| | | दर वाटाघाटी अंती L1 यांनी दिलेले दर | |
| १ | Stage I – DPR | ०.६५% of the Approved Project Cost | -- |
| २ | Stage II - Execution | ०.३५% of the Accepted tender Cost | -- |

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| 1 | मानवसेवा कन्सल्टंट,धुळे | 1.00 | L1 |
| 2 | यश इन्व्होटीव सोलुशन,औरंगाबाद | 1.98 | |

याबाबत म.अति आयुक्त तथा निविदा समिती यांच्या दालनात निविदेची वित्तीय छाननी बैठक संपन्न झाली.सदर बैठकीतील समिती सद्स्यायांनी निविदेमध्ये तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता मानवसेवा कन्सल्टंट,धुळे यांची निविदा आयटम रेट नुसार सर्वात न्यूनतम दराची आहे.

तथापि सदरचे दर जास्त असल्याने L१ मक्तेदार यांना दर वाटाघाटी साठी तसेच प्रकल्प सादरीकरणासाठी दि.17-8-2022 रोजी सकाळी 11.00 वाजता समक्ष बोलविणेत आले.त्यानुसार मक्तेदार यांच्या दि.17-8-2022 च्या पत्रानुसार वरीलप्रमाणे दर कमी करून दिलेले आहेत. तसेच सदर शुल्काचा बोजा मनपाची आर्थिक स्थिती पहाता मनपा पेलू शकणार नाही असे समितीच्या निर्दशनास

आले.सदरचे निविदा दरांप्रमाणे pmc चा होणाऱ्या देय रक्कमेचा अंतर्भाव प्रस्तावित होणाऱ्या DPR मध्ये करण्यात यावा व त्याचा खर्च मंजूर निविदाधारकाने करावा जेणेकरून pmc करिता खर्चाचा बोजा महानगरपालिकेवर असणार नाही.यावर समिती सदस्यांचे एकमत झाले.

ठेकेदार मानवसेवा कन्सल्टंट,धुळे यांचे दर तुलनेत सर्वात कमी असून त्यांनी नियमाप्रमाणे रोखीने बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार मानवसेवा कन्सल्टंट,धुळे यांनी दर वाटाघाटी अंती आयटम रेट नुसार सर्वात कमी दराची आलेले निविदा दर मंजुरीस्तव मे.स्थायी समिती कडे सादर झालेला आहे.

सर्व सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून धुळे मनपा पाणीपुरवठा केंद्रांवरील संपूर्ण पंप सेट मोटरसह बदलून नवीन पंपसेटमोटरसह बसविण्याबाबत इस्को मॉडल /PPP पद्धतीने करणे व सदर कामाची१०वर्ष देखभाल दुरुस्ती करणे बाबत PMC म्हणून मानवसेवा कन्सल्टंट,धुळे यांचे दरास मान्यता देण्यात येत आहे. सदरचे निविदा दरांप्रमाणे pmc चा होणाऱ्या देय रक्कमेचा अंतर्भाव प्रस्तावित होणाऱ्या DPR मध्ये करण्यात यावा व त्याचा खर्च मंजूर निविदाधारकाने करावा. तसेच सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री.किरण हरिशचंद्र अहिरराव

अनुमोदक:- श्री.नरेंद्र रूपला चौधरी

**सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक:- १५१ | धुळे महानगरपालिका मुख्य इमारतीच्या ट्रान्सफॉर्मरच्या केबल दुरुस्ती काम तांतडीने करण्यांत आलेत, त्यासाठी झालेल्या खर्च रु. ५१७९७/- मात्रला कार्योत्तर मान्यता देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे. |
| म.नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले. |
| म. बन्सीलाल जाधव | विषय मंजूर करण्यांत यावा. |
| म.किरण कुलेवार | विषय मंजूर करण्यांत यावा. |
| म. सभापती | सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे. |

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १६२ दिनांक ०५/०९/२०२२**

दिनांक १८/०७/२०२२रोजी धुळे महानगरपालिकेच्या मुख्य इमारतीच्या ट्रांसफॉर्मर च्या उच्च दाब वीज जोडणीच्या केबलमध्ये तांत्रिक बिघाड झाल्यामुळे पहाटेपासून मनपा कार्यालयाचा विद्युत पुरवठा खंडित होता. याबाबत मनपा वॉचमन यांनी सकाळी माहिती दिल्यानंतर महावितरण कंपनीच्या संबंधित विभागाच्या अभियंता, तसेच टेस्टिंग डिव्हिजनच्या मार्फत तपासणी केली असता, मनपा ट्रान्सफॉर्मरच्या अंतर्गत संरचनेतील केबल नादुरुस्त असल्याचे निदर्शनास आले. दिनांक १८/०७/२०२२ रोजी पासून कार्यालयाचा विद्युत पुरवठा या तांत्रिक बिघाडामुळे बंद स्थितीमध्ये होता. या कामी प्रत्यक्ष पाहणी करून H.T.cable ३ कोर ९५ स्क्वेअर M.M केबल ची आवश्यकता असल्याने सदरची केबल मागविण्यात येऊन त्याचे पूर्णत: नवीन टर्मिनेशन करून जोडणी करण्यात आली.

सदरचे काम अत्यंत तातडीचे असल्याने मक्तेदार अंबिका इलेक्ट्रिकल्स यांच्याकडून करून घेण्यात आले. दिनांक १९/७/२०२२ रोजी सदरचा विद्युत पुरवठा पूर्ववत जोडणी करून ट्रायल घेऊन कार्यान्वित करण्यात आला. सदर च्या कामांमध्ये दहा मीटर केबल व नवीन ११ kv टर्मिनेशन किट इत्यादी काम करण्यात आले. याकामी सार्वजनिक बांधकाम विद्युत विभाग यांचे सन २०२२ — २३ च्या दरसूची प्रमाणे व १८ % जीएसटी करासह ५१७९७/- मात्र खर्च आहे. सदरचे काम तातडीचे असल्याने व मनपा कार्यालयातील सर्व संगणक व अन्य व्यवस्था बंद झाल्याने तात्काळ करून घेण्यात आले.

सदरच्या कामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७(३)प्रमाणे मान्यता होण्यास तसेच सदरच्या कामी खर्च रक्कम रुपये ५१७९७/- मात्र खर्चास कार्यारत्तर मंजुरीस्तव मे स्थायी समितीपुढे ठेवण्यास मंजुरीस सविनय सादर झालेला आहे.

सर्व सदस्यांच्या सहमतीने या कामी झालेला खर्च रूपये ५१७९७/- मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७(३)प्रमाणे कार्यात्तर मान्यता देण्यात येत आहे. तसेच सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री.बन्सीलाल माणिक जाधव

अनुमोदक:- सौ.किरण राकेश कुलेवार **सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x

**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक:- १५२ | मोकाट जनावरांबाबत कार्यवाही सुरु करण्यांत आलेली असून त्यास कार्योत्तर मान्यता देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे. |
| म.नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले. |
| म. बन्सीलाल जाधव | विषय मंजूर करण्यांत यावा. |
| म.किरण कुलेवार | विषय मंजूर करण्यांत यावा. |
| म. सभापती | सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे. |

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १६३ दिनांक ०५/०९/२०२२**

सद्यस्थितीत धुळे शहरात मोकाट जनावरांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणावर वाढत असून मोकाट जनावरे मालक शहरातील पेठ भागात रस्त्यावर जनावर सोडत असल्याने सदर जनावर हे रस्त्यावर ठाण मांडून बसत असल्यामुळे येणाऱ्या जाणाऱ्या नागरिकांना रहदारीस अडथळा निर्माण करीत असतात.त्यामुळे अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे मनपाविषयी जनमाणसांत प्रतिमा मलिन होत आहे.

सदर मोकाट जनावरांवर कारवाई करणे बाबत मा.जिल्हाधिकारी सो यांच्या कार्यालयात झालेल्या बैठकीत मोकाट जनावरांवर कारवाई करणे बाबत चे निर्देश दिलेले आहेत.सदर जनावरांच्या वाढता प्रादुर्भावामुळे मा. आमदार सो. धुळे शहर व मा.महापौर सो. यांनी सुद्धा त्वरित कारवाई करण्याबाबत निर्देश दिले आहेत.

शहरातील मोकाट जनावर मालकांना मोकाट जनावरे रस्त्यावर व इतरत्र न सोडणे बाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम१९७६कलम४५अन्वये जाहिर आवाहन वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात आले असुन त्यांना सदर कलमान्वये वेळोवेळी नोटीसा देण्यात आलेल्या आहेत. परंतु उक्त बाबत कोणत्याही प्रकारची कार्यवाही झालेली नाही.

दि.२८/७/२०२२ रोजी मा.आयुक्त सो. यांच्या दालनात झालेल्या विभाग प्रमुखांच्या बैठकीत मा.आयुक्त सो. यांनी सदर मोकाट जनावर हे जागेवरून पकडून मालेगाव रोड येथील गोशाळेत जमा करणे बाबतची कारवाई दिनांक २९/७/२०२२ पासुन त्वरित करण्याबाबत आदेशित केलेले आहे.

सद्यस्थितीत मनपाचा अद्यावत कोंडवाडा नसल्याने अडचण निर्माण होत असते. तरी याबाबत खान्देश गोसेवा श्रमांतर्गत गो शाळा यांच्याशी चर्चा केली असता पकडण्यात आलेले जनावरे त्यांच्या गो शाळेत ठेवण्याबाबत धुळे मनपा मार्फत विचारणा करण्यात आलेली आहे. तरी याबाबत त्यांनी पत्रानुसार खालील प्रमाणे अटी शर्तीनुसार काम करण्यास संमती दर्शवीण्यात आलेली आहे.

तरी सदर अटी शर्तीनुसार काम केल्यास मनपामार्फत खालील प्रमाणे व्यवस्था उभारणे आवश्यक आहे.

१.स्वच्छता निरीक्षक यांच्या मार्फत प्रत्येकी ५ कर्मचारी घेवुन जनावरे पकडण्याचे पथक तयार करणे

२.तसेच जमा करण्यात आलेले जनावर मालक यांच्या ताब्यात जनावर देतेवेळी त्यांच्याकडुन मोठ्या जनावराचे प्रती दिवस रु.४४०/-व लहान जनावरासाठी रु.२२०/- दंड आकारणी करणे योग्य राहिल.

सदर कामाकरीता सन २०२२-२३ च्या अंदाजपत्रकात मोकाट जनावरे पकडणे / गोशाळा खर्च या लेखा शिर्षकाखाली रु.५ लक्ष तरतुद करण्यात आलेली आहे.

मा.आयुक्त सो.यांनी दिलेल्या आदेशानुसार सर्व स्वच्छता निरीक्षक यांच्याकडुन प्रत्येकी ५ कर्मचारी घेवुन त्यांचे पथक तयार करुन शहरातील रस्त्यावर रहदारीच्या ठिकाणी फिरणारे मोकाट जनावरे पकडुन मालेगाव रोड,धुळे येथील गोशाळेत जमा करण्याची कार्यवाही सुरु करण्यात आलेली आहे.व तसेच स्वच्छता निरीक्षक यांच्याकडुन प्रत्येकी ५ कर्मचारी घेवुन मोकाट जनावरे पकडण्याची कार्यवाही सुरु केलेली आहे.तरी मा.आयुक्त सो. यांनी सदरचे काम हे अतितातडीची बाब पाहता मे.स्थायी समितीच्या मान्यतेच्या अधिन राहुन कार्यवाही सुरु करण्याबाबत मान्यता दिली होती. त्यानुसार उक्त प्रमाणे कार्यवाही सुरु करण्यात आली असल्याने सदर कार्यवाही उक्त कार्यवाही हि मान्यतेकामी मे.स्थायी समितीच्या मान्यतेची आवश्यकता आहे.त्यानुसार सदरचा विषय मे.स्थायी समितीपुढे सादर करण्यास पुढील कार्यवाहीस्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने मोकाट जनावरांबाबत प्रशासनाने सुरू केलेल्या कार्यवाहीस अटी व शर्तीनुसार कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

सुचक :- श्री.बन्सीलाल माणिक जाधव
अनुमोदक:- सौ.किरण राकेश कुलेवार

**सर्वानुमते मंजुर,**
सही/-x x x
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक:- १५३ | धुळे मनपा कार्यक्षेत्रातील भटकी व मोकाट कुत्र्याचे निर्बिजीकरण शस्त्रक्रीया व बंदोबस्त करण्याकामी ई-निविदा दर मागविण्यात आलेत त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर फेर विचार करणे. |
| म.नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले. |
| म.किरण अहिरराव | मागील गुरूवारी हा विषय घेण्यात आलेला होता आणि आपण तात्काळ हा विषय पुश्न:च विषय पत्रिकेवर घेतला त्याबद्दल आपले आभार. परंतू सदर ठेकेदार वाटाघाटीसाठी प्रत्यक्ष येत नाही. त्यामुळे आपण दुसऱ्या L-२ निविदाधारकला दराबाबत विचारणा करावी असे वाटते. |
| म.सभापती | याबाबत प्रशासनाकडून खुलासा मागवू. |
| म.नाजिया पठाण | कुत्र्यांची हि गंभीर समस्या आहे. शहरात कुत्र्यांची संख्या वाढलेली असून निर्बिजीकरण करून सुध्दा काही होणार नाही. आमच्या भागातील मुलीला कुत्रयांने चावा घेतला कुत्र्यांचा इलाज काय करणार आहे. सकाळी मुलांना शाळेत जाणे मुश्कील झालेले आहे. त्यात पिसाळलेले कुत्रे मोठया प्रमाणावर आहेत.त्यांच्याबाबत कार्यवाही झाली पाहिजे. |
| म.सभापती | जर असे पिसाळलेले कुत्रे असतील तर त्यांना मारण्याची परवानगी आहे. |
| म.प्रतिभाताई चौधरी | सदर ठेकेदार वाटाघाटीसाठी ई-मेल केलेला होता तो प्रत्यक्ष आला पाहिजे होता.हा मोठा विषय आहे. जर आतापासून संबंधित ठेकेदार अशा प्रकारे वागणूक देत असेल तर संबंधित ठेका 3 वर्षांचा आहे. पुढे सदर ठेकेदाराच्या कार्यप्रणालीबाबत आक्षेप निर्माण होवू शकतात. त्यामुळे याबाबत फेरविचार करण्याची गरज आहे. |
सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी कंत्राटदार **श्री.भूषण एल.चौधरी** यांची **अंदाजपत्रक** दराने आलेले निविदा दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे. तसेच सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील. सुचक :- सौ. वराडे वैशाली भिकन

अनुमोदक:- श्रीमती अन्सारी फातमा बी नुरुल अमीन **सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x

**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक:- १६६ | महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजने अंतर्गत सन २०२१-२२ प्र.क्र.१० मध्ये सुपडू आप्पा कॉलनी श्री.सोमनाथ अहिरे ते श्री.शिंपी यांचे घरापावेतो रस्ता कॉंक्रीट करणेचे निविदा दर मागविण्यांत आलेत,त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे. |
| म.नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले. |
| म.वैशाली वराडे | विषय मंजूर करण्यांत यावा. |
| म.फातमाबी अन्सारी | विषय मंजूर करण्यांत यावा. |
| म. सभापती | सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे. |

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १८० दिनांक २९/०९/२०२२**

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजने अंतर्गत सन २०२१-२२ प्र.क्र.१० मध्ये सुपडू आप्पा कॉलनी श्री.सोमनाथ अहिरे ते श्री.शिंपी यांचे घरापावेतो रस्ता कॉंक्रीट करणे बाबतच्या कामास धुळे महानगरपालिका ठराव नं.७३ दि.२७/०१/२०२२ मा.जिल्हाधिकारी सो. धुळे यांची प्रशासकीय मान्यता दि.२३/०३/२०२२ अन्वये उक्त कामाबाबत रक्कम रु.२५,०४,८३८/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./९२८/२०दि.१४/०३/२२ अन्वये रक्कम रु. २५,०४,८३८/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./धुमपा/बां.वि./८/२०२२दि. २६/०४/२२ रोजी दैनिक देशदूत/श्रमराज्य या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि. १४/०५/२२ पर्यंत निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेली आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदार किंवा ठेकेदाराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | हेमंत राजाराम बागुल | श.२.०० % जास्त | |
| २ | अ.के.सैफी | श.२.०० % जास्त | |
| ३ | मे.साई प्रसाद मजूर सोसा. | **अंदाजपत्रकीय दराने** | **सर्वात कमी दर** |

सदर तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता **मे.साई प्रसाद मजूर सोसा.** यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे २५,०४,८३८/-इतक्या रक्कमेचे असून **अंदाजपत्रक** दराने आहे.

सदर निविदा धारकांचे निविदा दर हे **अंदाजपत्रक** दराने असल्याने सर्व निविदा समिती सदस्यांनी सदर निविदा धारकांचे दर स्वीकारण्यास मा.आयुक्त सो. यांना शिफारस करण्यावर एकमत झाले.

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **मे.साई प्रसाद मजूर सोसा.** यांचे दर **अंदाजपत्रक** आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार **मे.साई प्रसाद मजूर सोसा.** यांची **अंदाजपत्रक** दराने आलेले निविदा दर मंजुरीस्तव सादर तसेच अन्य काम न मिळालेले ठेकेदारांना त्यांची बयाना रक्कम परत करणे बाबत तसेच सदर प्रकरण मे.स्थायी समिती समोर दर मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी कंत्राटदार **मे.साई प्रसाद मजूर सोसा.** यांची **अंदाजपत्रक** दराने आलेले निविदा दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे. तसेच सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील. सुचक :- सौ. वराडे वैशाली भिकन

अनुमोदक:- श्रीमती अन्सारी फातमा बी नुरुल अमीन

**सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- १६७ — महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजने अंतर्गत सन २०२१-२२ प्र. क्र.१०मध्ये वरखेडी गावातून वडजाई रोड कडे जाणारा रस्ता डांबरीकरण करणेचे निविदा दर मागविण्यांत आलेत,त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.मंगला चौधरी — विषय मंजूर करण्यांत यावा

म. हर्षकुमार रेलन — विषय मंजूर करण्यांत यावा

म. सभापती — सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १८१ दिनांक २९/०९/२०२२**

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजने अंतर्गत सन २०२१-२२ प्र.क्र.१० मध्ये वरखेडी गावातून वडजाई रोड कडे जाणारा रस्ता डांबरीकरण करणे बाबतच्या कामास धुळे महानगरपालिका ठराव नं. ७३ दि.२७/०१/२०२२ मा.जिल्हाधिकारी सो. धुळे यांची प्रशासकीय मान्यता दि.२३/०३/२०२२ अन्वये उक्त कामाबाबत रक्कम रु.७९,६५,६९९/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./९८७/२०दि .१४/०३/ २२ अन्वये रक्कम रु. ७९,६५,६९९/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./धुमपा/बां.वि./६/२०२२दि.२०/०४/२२ रोजी दैनिक देशदूत/राजरंग टाईम्स या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.१७/०५/२०२२

पर्यंत निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेली आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदार किंवा ठेकेदाराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | अे.के.सैफी | श.१.०० % जास्त | |
| २ | श्री.प्रतिक केदु पवार | श.२.०० % जास्त | |
| ३ | श्री.अंकित किशोर भंडारी | **अंदाजपत्रकीय दराने** | **सर्वात कमी दर** |

सदर तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता **श्री.अंकित किशोर भंडारी** यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे ७९,६५,६९९/- इतक्या रक्कमेचे असून **अंदाजपत्रक** दराने आहे. सदर निविदा धारकांचे निविदा दर हे **अंदाजपत्रक** दराने असल्याने सर्व निविदा समिती सदस्यांनी सदर निविदा धारकांचे दर स्विकारण्यास मा.आयुक्त सो. यांना शिफारस करण्यावर एकमत झाले.

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **श्री.अंकित किशोर भंडारी** यांचे दर **अंदाजपत्रक** आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार **श्री.अंकित किशोर भंडारी** यांची **अंदाजपत्रक** दराने आलेले निविदा दर मंजुरीस्तव सादर तसेच अन्य काम न मिळालेले ठेकेदारांना त्यांची बयाना रक्कम परत करणे बाबत तसेच सदर प्रकरण मे.स्थायी समिती समोर दर मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी कंत्राटदार**श्री.अंकित किशोर भंडारी** यांची **अंदाजपत्रक**दराने आलेले निविदा दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे. तसेच सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील. सुचक :- श्रीमती चौधरी मंगला अर्जुन

अनुमोदक:- श्री.रेलन हर्षकुमार राध्येशाम

**सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- १६८ सुवर्ण जयंती नगरोत्थान योजने अंतर्गत सन २०२१-२२ प्र.क्र.११ मध्ये १)आदर्श एकता नगर भागात श्री.मसदे आप्पा ते कुंदन मोरे ते श्री.प्रदिप कावडे ते श्री.नाना पाटील ते श्री.निंबा पाटील रस्ता कॉक्रीटीकरण करणे २)शिवपार्वती कॉलनी श्री.दिलीप पाटील ते वाणी ते मदन शर्मा ते मनोहर पाटील रस्ता कॉक्रीटीकरण करणेचे निविदा दर मागविण्यांत आलेत,त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.किरण अहिरराव विषय मंजूर करण्यांत यावा

म. अन्सारी अ. लतीफ विषय मंजूर करण्यांत यावा

म. सभापती सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १८२ दिनांक २९/०९/२०२२**

सुवर्ण जयंती नगरोत्थान योजने अंतर्गत सन २०२१-२२ प्र.क्र.११ मध्ये १)आदर्श एकता नगर भागात श्री.मसदे आप्पा ते कुंदन मोरे ते श्री.प्रदिप कावडे ते श्री.नाना पाटील ते श्री. निंबा पाटील रस्ता कॉक्रीटीकरण करणे २)शिवपार्वती कॉलनी श्री.दिलीप पाटील ते वाणी ते मदन शर्मा ते मनोहर पाटील रस्ता कॉक्रीटीकरण करणे बाबतच्या कामास धुळे महानगरपालिका ठराव नं.७३ दि.२७/०१/२०२२ मा.जिल्हाधिकारी सो. धुळे यांची प्रशासकीय मान्यता दि.२३/०३/२०२२ अन्वये उक्त कामाबाबत रक्कम रु.८९,९८,६०७/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./९८०/२० दि. १४/०३/२२ अन्वये रक्कम रु. ८९,९८,६०७/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./धुमपा/बां.वि./६/२०२२दि. २०/०४/२२ रोजी दैनिक देशदूत/राजरंग टाईम्स या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि. १७/०५/२२पर्यंत निविदा दर मागविण्यात आले आहेत.पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑन लाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेली आहेत.

| **अ.क्र.** | **कंत्राटदार किंवा ठेकेदाराचे नाव** | **दिलेले निविदा दर** | **शेरा** |
|---|---|---|---|
| १ | वृषभ सतीष खिवसरा | शे.३.०० % जास्त | |
| २ | मे.हिंद कन्सट्रक्शन | **शे.-१६.०० %(कमी)** | **सर्वात कमी दर** |
| ३ | मे.एकविरा कन्सट्रक्शन | शे.२.०० % जास्त | |

सदर तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता **मे.हिंद कन्सट्रक्शन** यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे ७५,५८,८३०/- इतक्या रक्कमेचे असून **शे.-१६.००%(कमी)**दराने आहे.

सदर निविदा धारकांचे निविदा दर हे **शे.-१६.०० %(कमी)** दराने असल्याने सर्व निविदा समिती सदस्यांनी सदर निविदा धारकांचे दर स्वीकारण्यास मा.आयुक्त सो. यांना शिफारस करण्यावर एकमत झाले.

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **मे.हिंद कन्सट्रक्शन** यांचे दर **शे.-१६.०० %(कमी)** आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार **मे.हिंद कन्सट्रक्शन** यांची **शे.-१६.०० %(कमी)** दराने आलेले निविदा दर मंजुरीस्तव सादर तसेच अन्य काम न मिळालेले ठेकेदारांना त्यांची बयाना रक्कम परत करणे बाबत तसेच सदर प्रकरण मे.स्थायी समिती समोर दर मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी कंत्राटदार **मे.हिंद कन्सट्रक्शन** यांची **शे.-१६.००%(कमी)** दराने आलेले निविदा दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे. तसेच सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील. सुचक :- श्री. अहिरराव किरण हरिश्चंद्र

अनुमोदक:- श्री.अन्सारी अब्दुल लतीफ

**सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-१६९ — धुळे शहर वाढीव पाणी पुरवठा योजना ( अक्कलपाडा धरण उद्भव )अमृत अभियान अंतर्गत योजने मधील कामात झालेल्या फेर बदलास सुधारित खंड—३८ अन्वये मान्यता देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. सभापती — याबाबत अभियंता यांनी माहिती द्यावी.

म. अभियंता — अक्कलपाडा पाणीपुरवठा योजनेचे जे काम चालू आहे. त्या कामाची निविदा ५.३४% कमीने मंजूर केली असून सदरचे काम प्रगतीपथावर आहे. प्रत्यक्ष काम करतांना पी.एम.सी म्हणून महाराष्ट्र जिवन प्राधिकरण यांना आपण नेमलेले आहे. काम करतांना कामामध्ये किरकोळ फेरबदल व एक्सट्रा आयटम झालेला आहे. आणि तसेच पाईपलाईन १४२२ एम.एम ची करायची होती. त्या ठिकाणी परिस्थिती नुसार करणे आवश्यक होते. ते आपण शासनाकडे पण याचा प्रस्ताव पाठवला होता.

शासनाने पण आपल्याला या कामाची मंजूरी दिली आहे. आणि यामध्ये काही फेरबदल व अतिरिक्त बाबी यासाठीचा पस्ताव मंजूरीसाठी सभेपुढे सादर केला आहे.

म.सभापती — कितीचा प्रस्ताव आहे हा?

म.अभियंता — यामध्ये अतिरिक्त बाब जी आहे जी आपण पाईपलाईन बदलली ती १५ कोटी २० लक्ष

म.सभापती — याने काही प्रोजेक्ट कॉस्टवर काही फरक पडतो का?

मअभियंता — नाही.

म.सभापती — हा अक्कलपाडयाचा प्रोजेक्ट धुळे शहराच्या दृष्टीने महत्वाचा आहे. मी मागच्या आठवडयात सूचना दिल्या होत्या. आपल्या हया कामामध्ये आपल्याकडे तापी योजने संदर्भात वारंवार सूचना देऊन देखील एअर व्हॉल असतील, काही पाईपचे लिकेजेस असतील, व आपण त्या ठेकेदाराला वेळोवेळी प्रशासन मदत करीत असते. तापीवरील ज्या काही दुरुस्त्या आहे याचे काम का होत नाही?

म.अभियंता — एअर व्हॉल्वचे काम परवापासून सुरु केले आहे. पण पाईप बदलण्याचे जे काम आहे त्यामध्ये पाईप आपल्याला आणून ठेवावे लागतील. तो एक पाईप साधारणत: ८ मीटरचा येईल. आणि आपल्याला १० ठिकाणी म्हणजे ८० मीटर पाईप बदलवायचे आहे. आपल्याला सदरचे काम टप्प्या टप्प्याने करावे लागेल. आपली जी सुलवाडे-जामफळची जी योजना आहे. या योजनेत ती क्रॉसिंग करु साधारणत: ३ ठिकाणचे काम करता येईल. आपल्याकडून ३ ते ४ ठिकाणचे पाईप बदलले जातील. ३ ठिकाणचे पाईप आपल्याला तातडीने बदलणे गरजेचे आहे.

म.सभापती — तुमचे सुलवाडे-जामफळचे क्रास कनेक्शनचे काम कधी चालू करणार आहे?

म.अभियंता — साधारणत: ८ दिवस लागतील.

म.सभापती — येणाऱ्या पंधरवडयामध्ये डायव्हर्शन व ३ ठिकाणचे पाईप बदलण्याचे व एअर व्हॉल्व चे काम कुठल्याही परिस्थितीत झाले पाहिजे.

म.अभियंता — एम.जे.पी. चे भुजबळ सो. यांची बैठक झाली तर हे काम लवकर होऊ शकते.

म.आयुक्त — स्थायी समितीला पण माहिती असावे सुलवाडे- जामफळ पाईपलाईनचे काम होते ते दीड वर्षापासून रखडले होते. आपल्यावर व ठेकेदारावर वन विभागाने गुन्हे दाखल केले होते.आता सदर काम तांतडीने पूर्ण करण्यांत येत आहे.

म. नागसेन बोरसे — विषय मंजूर करावा.

म.सभापती — यामध्ये पुढच्या ३० वर्षाचा पाण्याचा प्रश्न सुटणार आहे. सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

## धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १८३ दिनांक २९/०९/२०२२

अमृत अभियान अंतर्गत वाढीव धुळे पाणी पुरवठा योजना ता.जि. धुळे (अक्कलपाडा धरण उद्‌भव ) या योजनेचे काम प्रगतीपथावर आहे.

धुळे शहरास सध्यस्थिती मध्ये तापी नदीवरून साधारणपणे ३० द.ल.ली. येवढा पाणी पुरवठा करण्यात येतो तथापि धुळे शहराची पाणी मागणी ही १०४ द. ल. ली. असून पाणी टंचाई जाणवत आहे. व शहरास साधारणपणे ४ ते ५ दिवसानंतर पाणी पुरवठा करण्यात येतो. पाणी मागणीतील तुट व संभाव्य लोकसंख्यावाढीमुळे लागणारे पाणी गृहीत धरून धुळे शहरासाठी अक्कलपाडा धरणावरून पाणी पुरवठा योजना आखण्यात आली. या योजनेस तांत्रिक मान्यता मा.मुख्य अभियंता , महाराष्ट्र जीवन प्राधिकरण प्रादेशिक विभाग, नाशिक यांचे पत्र क्र. मु. अ./ नाशिक/चीशा /१०४९ दि. २५/०७/२०१९ अन्वये प्राप्त असून या योजनेस प्रशासकीय मान्यता शासन निर्णय क्र. अमृत २०१९/प्र. क्र./ २२३ / नवी ३३ मंत्रालय मुंबई दि. ०९/०८/२०१९ प्राप्त झालेली आहे. या कामाची निविदा प्रक्रिया पूर्ण करून सदर काम मे.आर. ए. घुले , ठेकेदार , पालघर यांना दि.२७/११/२०१९ रोजी कार्यादेश देण्यात आलेले आहे.

सदर योजनेची मालकी मनपा, धुळे असून या योजनेसाठी मजीप्रा ही प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे. सदर योजना ही मा.पंतप्रधान कार्यालयाने नमूद

केलेल्या उद्दिष्टामध्ये नमूद असून याबाबत केंद्र व राज्य शासनामार्फत वेळोवेळी आढावा घेण्यात येत आहे. सद्यस्थितीत या योजनेची ८५% कामे पूर्ण झालेली आहेत.

सदरच्या कामाचे अंदाजपत्रक १६९.१३ कोटी प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे. धुळे मनपा मार्फत सिविल वर्क चे GST सोडून १३३.८६ कोटी चे निविदा मागविणेत आलेली होती. निविदा अंती ठेकेदार आर.ए.घुले यांनी शे.५.३७% कमीचे दरास मंजुरी मिळालेली असल्याने त्याची अवार्ड रक्कम रु.१२६.६८ कोटी मात्रची रक्कम आहे. या रक्कमेतून आत पावेतो ठेकेदारास १ ते १५ धावते देयक रु.१११.१२ कोटी मात्रचा खर्च झालेला आहे.

सदरचे काम करतांना काही अंदाजपत्रकीय बाबींमध्ये फेर बदल झालेला आहे. अनुक्रमे खोदकाम, कॉफर डॅम,बुजाई करणे,वीट काम,प्लास्टर ,अक्कलपाडा धरणा जवळील हार्ड रॉक खोदणे , WTP चे कुंपण भिंतीची अंतर वाढल्याने डबर काम , चैनलिंक फेंसिंग ई. बाबींमध्ये फेर बदल झालेला आहे. त्यामुळे वरील संदर्भ क्र. ०१ नुसार म.जी.प्रा. विभागाने सुचविलेल्या खंड ३८ (जादा परिमाण) चा प्रस्ताव रु.१२,९०,६३,९३०/- (GST सह ) चा प्रस्ताव सादर केलेला आहे.

संदर्भ क्र. ०२ अन्वये अक्कलपाडा योजनेमध्ये अंदाजपत्रकाच्या बाबी व्यतिरिक्त ट्वीन जॅकवेल चे फाउंडेशन , कॉंक्रीट वर्क , अप्रोच ब्रिजचे कॉंक्रीट वर्क , १५०० एम.एम. ची पाईप घेणे व रोड क्रॉस साठी पाईप पुश करणे त्यासाठी लागणारे मटेरियल तसेच रॉ -वॉटर , जॅकवेल ते WTP पावेतो १४२२ एम.एम.MSपाईप रद्द करून त्याएवजी १२०० एम.एम. DIK-9 चे पाईप घेणे त्यासाठी आवश्यक व्हॉल घेणे यासाठीचा अतिरिक्त बाबचा प्रस्ताव रु.१५,२०,०६,१६३/- (GST सह) सादर केलेला आहे. वरील दोन्ही प्रस्तावाची एकूण अंदाजित किमत रु.२८,१०,७०,०९३/-मात्र आहे. सदरची दोन्ही प्रस्तावास म.जी.प्रा. विभागाने वरील संदर्भ १ व २ अन्वये शिफारस करून या कार्यालयाकडे सादर केलेले आहे. अक्कलपाडा योजनेस महाराष्ट्र शासनाने प्रस्ताव रु.१६९१३.२७ लक्ष मात्रला प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे.

वरील दोन्ही प्रस्तावाची रक्कम रु.२८,१०,७०,०९३/- या रक्कमेत जरी फेर बदल झालेला असला तरी प्रशासकीय मंजुरी मिळालेल्या रक्कमेच्य आतच खर्च होणार आहे. प्रशासकीय मंजुरी रक्कम रु. १६९.१३ कोटी या रक्कमेच्या वरती कोणताही जास्तीचा खर्च होणार नाही. सदर योजनेच्या दरास मान्यता ही सक्षम प्राधिकरण म्हणून मे.स्थायी समितीने मंजुरी दिलेली असल्याने वरील प्रमाणे अतिरिक्त बाब व खंड ३८ (जादा परिमाण) कामास मंजुरीसाठी मे.स्थायी समितीपुढे सादर करणे बाबत प्रस्तावित करणेत आले आहे.

उक्त बाबत म.उप लेखापरीक्षक यांच्या कडील अभिप्राया नुसार प्रशासकीय मान्यता रक्कम मर्यादेत प्रस्तावित खर्च आहे, परंतु अतिरिक्त बाब असल्याने वाढीव खर्चास SLTC ची मान्यता आवश्यक राहील. तरी सदरचा प्रस्ताव मा.महासभा पुढे व SLTCकडे पाठविणे बाबत हरकत नाही.

मा.अतिरिक्त आयुक्त, मनपा धुळे यांच्या कडील अभिप्राय नुसार , जर एवढ्या मोठ्या प्रमाणात योजनेचा संरचनेत बदल होत असेल तर प्रकल्प सल्लागार म्हणून MJP चे मोठे अपयश समोर येत आहे. तथापि झालेली वाढ हि प्रशासकीय मान्यता मर्यादेत असल्याचे सादर केलेले असल्याचे प्रस्तावित स्वीकारण्यास हरकत नसावी असे मत आहे.

म.आयुक्त सो., धुळे मनपा यांनी सदर प्रस्ताव व MCA ने काढलेले मुद्दे यामध्ये तफावत येत आहे त्यामुळे म.जी.प्रा. कडुन खुलासा मागविणे बाबत कळविले आहे.

त्यानुसार अक्कलपाडा योजनेच्या कामामधील अंदाजपत्रकात काही बाबी अतिरिक्त बाब झालेली आहे. त्यानुसार या कार्याला मार्फत झालेल्या वाढीमध्ये मेकॅनिकल वर्क्सचे काम यात समाविष्ठ केले आहे का तसेच प्रशासकीय मंजुरी रक्कम रु.१६९.१३ कोटीच्या आतच खर्च होणार आहे का याबाबत या कार्यालया मार्फत जा.क्र./धुमपा/पापुवि / ३९७ दि. २५/०७/२०२२ रोजी म. कार्य.अभियंता ,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण , जळगाव यांना कळविले होते त्यानुसार म.कार्य.अभियंता,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण ,जळगाव यांनी जा.क्र./ ताशा / १८०० दि.२७/०७/२०२२ रोजीचा पत्राद्वारे कळविले आहे कि, धुळे शहर वाढीव पाणीपुरवठा योजना (अक्कलपाडा उद्भव ) या

योजनेमध्ये अतिरिक्त बाब क्र. १ किमंत रु.१५.२० कोटी व खंड ३८ किमंत रु.१२.९० कोटी असा एकूण रु.२८.१० कोटीचा प्रस्ताव मंजुरीसाठी महानगरपालिकेकडे सादर करणेत आलेला आहे. त्यानुसार योजनेची वरील प्रमाणे अतिरिक्त बाब व वाढीव परिणामाची किमंत व मंजूर योजनेप्रमाणे यांत्रिकी बाबींचा किमंत धरून वाढ बचत चा तक्ता तयार करून प्रस्तावा सोबत जोडण्यात आलेला आहे. त्यानुसार यांत्रिकी कामे धरून योजनेवर प्रशासकीय मंजुरी रक्कम रु.१६९.१३ कोटी रक्कमेचा आतच खर्च होणार आहे असे कळविले आहे. यापूर्वीस सदर कामाच्या निविदेस मे.स्थायी समिती ठराव नं. १०४ दि. १८/०९/२०१९ अन्वये मंजुरी प्रदान केली असल्याने सक्षम प्राधिकरण म्हणून झालेल्या फेर बदलास मे.स्थायी समितीची मंजुरी आवश्यक आहे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाचा अभिप्राय नुसार खंड – ३८ चा प्रस्ताव मंजुरीसाठी मे.स्थायी समितीची आवश्यक असल्याने मे.स्थायी समिती पुढे सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून धुळे शहर वाढीव पाणी पुरवठा योजना ( अक्कलपाडा धरण उद्भव )अमृत अभियान अंतर्गत योजने मधील कामात झालेल्या फेर बदलास सुधारित खंड–३८च्या बाबीस मान्यता देण्यांत येत आहे.

सुचक :- श्री. नवले शितल मोहन सभापती

अनुमोदक:- श्री. बोरसे नागसेन दामोदर **सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- १७० मुलभूत सोईसुविधा निधी २०२१-२२अंतर्गत एलपीजी शवदाहिनी (फरनेस) त्याचाशी सलग्न ३० मी उंचीची चिमणी व स्क्रबर तसेच इतर उपकरणे व शेडचे बांधकाम करणे (देवपूर व चित्तोड रोड अमरधाम) कामी निविदा दर मागविण्यांत आलेत,त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.नागसेन बोरसे विषय मंजुर करण्यांत यावा.

म.नरेंद्र चौधरी विषय मंजुर करण्यांत यावा.

म. सभापती सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १८४ दिनांक २९/०९/२०२२**

मुलभूत सोईसुविधा निधी 2021-22 अंतर्गत एलपीजी शवदाहिनी(फरनेस) त्याचाशी सलग्न 30 मी उंचीची चिमणी व स्क्रबर तसेच इतर उपकरणे व शेडचे बांधकाम करणे (देवपूर व चित्तोड रोड अमरधाम) वित्तीय लिफाफा उघडणे बाबत प्राप्त निवदेची तांत्रिक छाननी साठीच्या निविदा समितीच्या बैठकीचे इतिवृत्त"(३rd call).

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका स्थायी समिती ठराव क्र. दि. --/-- /२०१ मा.आयुक्त/~~उपायुक्त धुळे~~ महानगरपालिका यांचे टिप्पणी/जिल्हाधिकारी सो यांची प्रशासकीय मान्यता/ दि.१०-३-२०२२ रोजी अन्वये उक्त कामाबाबत रक्कम **रु.१,२८,७३,५३१/-** मात्र खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेत आली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका **जा.क्र./विवी/६८दि.२४-५-२०२२** अन्वये व **दि.२५-५-२०२२**च्या **दै.दिव्यमराठी** व धुळे महानगपालिका/महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईट www.mahatender.gov.inवर खुल्या ई-निविदा / ~~कोटेशन~~ प्रसिद्ध करणेत येवून **दि.६-६-२०२२** रोजी निविदा मागविणेत आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत रोखीने बयाणा रक्कम भरून/लेटर प्याड वर निविदा दर सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| १ | Alfa Equipments,Gujrat | ७ % **कमीने** | L१ |
| २ | Kalyani Enterprizes,Pune | अंदाजपत्रकीय दराने | |

उक्त बाबत दि. दु. ५ वाजता म.अति आयुक्त तथा निविदा समिती यांच्या दालनात निविदेची वित्तीय छाननी बैठक संपन्न झाली.सदर बैठकीतील समिती सद्स्थायांनी निविदेमध्ये तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता **Alfa Equipments,Gujrat** यांची निविदा सर्वात न्यूनतम दाराचे म्हणजेच **१,१९,७२,३८४/-** इतक्या रकमेची असुन ती अंदाजपत्रकीय दरापेक्षा **७% कमी** दराची आहे.

सदर निविदा धारकांचे निविदा दर हे अंदाजपत्रकीय दराने असल्याने सर्व निविदा समिती सदस्यांनी सदर निविदा धारकांचे दर स्वीकारण्यास मा. आयुक्त यांना शिफारस करण्यावर एकमत झाले.

करिता ठेकेदार **Alfa Equipments,Gujrat** यांचे दर तुलनेत सर्वात कमी असून त्यांनी नियमाप्रमाणे रोखीने बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार**Alfa Equipments,Gujrat** यांनी सर्वात कमी म्हणजेच **अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७%कमी दराची** आलेले निविदा दर मंजुरीस्तव **मे.स्थायी समिती कडे** सादर.तसेच अन्य काम न मिळालेल्या ठेकेदार यांची बयाणा रक्कम परताव्यास मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी कंत्राटदार कंत्राटदार **Alfa Equipments,Gujrat** यांनी सर्वात कमी म्हणजेच **अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७%कमी दराने** आलेले निविदा दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे. तसेच सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री. बोरसे नागसेन दामोदर
अनुमोदक:- श्री.चौधरी नरेंद्र रुपला

**सर्वानुमते मंजुर,**
सही/-x x x
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-१७१ — धुळे मनपा शाळा क्रमांक २१ व ४५ मधील आवारात नागरीकांसाठी अल्प दरात विविध् वैद्यकिय तपासण्या करण्याकरीता PPP तत्वावर अद्यावत रोग निदान तपासणी प्रयोगशाळा उभारणे कामी स्वारस्यांची अभिव्यक्ती अंतर्गत पात्र निविदा स्विकृती बाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.हर्षकुमार रेलन — याठिकाणी मला सांगायचे आहे की, सदर लॅब ही शाळेच्या जागेत करीत आहोत. सद्यस्थितीत मनपा शाळांची स्थिती अत्यंत दयनीय आहे. अशा परिस्थितीत शाळेच्या जागेत प्रयोग शाळा करणे उचित वाटत नाही त्यासाठी वेगळी जागा देण्यांचा विचार व्हावा.

म.सभापती — याबाबत सदर लॅबला शाळेची जागा देणेबाबत मे. महासभेत ठराव पारीत झालेला आहे. त्यानुसार सदर विषय स्थायी समिती समोर आलेला आहे.

म.साबीर शेठ — विषय मंजूर करावा.

म. सभापती — सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १८५ दिनांक २९/०९/२०२२**

धुळे महानगरपालिकेच्या आर.आर.पाटील व्यापारी संकुल इमारतीतील शाळेच्या जागेवर PPP तत्वावर अद्यावत रोग निदान तपासणी प्रयोग शाळा स्वारस्यांची अभिव्यक्ती प्रकाराने उभारणे करीताची माहिती खालील प्रमाणे-

धुळे महानगरपालिका शाळा क्र.21 व 45 शाळेमधील आवारात धुळे शहरातील नागरीकांना अल्पदरात विविध वैद्यकिय (रेडिओलॉजी CT-Scan व एक्सरे) तपासणी करणे करीता अद्यावत प्रयोगशाळा निर्माण करणे.

सदर लॅबमध्ये पॅथॉलॉजी वगळता इतर चाचण्याचे अहवाल टेलीरिपोर्टींग व्दारे करण्यात येईल. व रुग्णांचे रक्त, लघवी, थुंकी इत्यादीचे नमुने घेऊन लॅबच्या कर्मचाऱ्यामार्फत मनपा कार्यक्षेत्रातील मनपा दवाखान्यातूनही संकलीत केले जातील. तसेच लॅबचे कामकाज 24x7 सुरु ठेवण्यात येईल.

**कामाचे क्षेत्र-** 398.86 चौ.मि.

**जागेचा दर-** 240 प्रति चौ.मि. प्रमाणे (रेडी रेकनर दराप्रमाणे)

**एकुण मिळणारे मासिक उत्पन्न-** 95,726/- रुपये एवढे आहे

**कामाचे अटी-**

१) विजबिल व पाणिपट्टीची जबाबदारी महानगरपालिकेची राहिल. त्याबदल्यात प्रकल्पाच्या उत्पन्नातील 8% उत्पन्नाचा भाग महानगरपालिकेचा राहील.
२) Clinical Establishment Act अन्वये नोंदणी असावी.
३) National Accreditation Board for Testing And Calibration Laboratories (NABL) यांचे प्रमाणपत्र असणे आवश्यक
४) 50 कोटीची उलाढाल याचे प्रमाणपत्र असणे आवश्यक
५) 3 वर्षाचा अनुभव असावा.
६) दैनिक किमान 1000 चाचण्याचा अनुभव असावा.
७) CT scan व रक्त, लघवी व थुकी प्रयोगशाळा चालविण्याचा अनुभव असावा.
८) महाराष्ट्रात किमान एक NABH तपासणी केंद्र असावे.
९) एका महिन्यात 10,000 CT प्रतिमाचा अनुभव असावा.

तसेच सदर संस्थेने मागणी केल्यानुसार व मनपाच्या तसेच नागरिकांच्या हितासाठी खालील अटी करारनाम्यात स्थायी समिती मार्फत प्रस्तावित करीत आहेत

1. यातील Radiology हे खूप अति निष्णात स्वरुपाचे काम आहे त्यासाठी Radiology च्या CGHS NABL दरापेक्षा 10 टकके जास्त दर आकारण्यात येतील Pathology चे दर आहे तेच असतील
2. CGHS NABL चे दर हे वेळोवेळी सुधारित झालेले नसल्याने त्यांच्यातील कुंठीतावस्था घालवण्यासाठी दरवर्षी CGHS NABLच्या दरात 5 टक्के वाढ करण्यात येईल.

प्रकल्प चालु झाल्यावर प्रकल्पाचे नांव संस्था व मनपा यांचे संयुक्त विद्यमाने असे असावे .

मनपा **कडून देण्यात येणाऱ्या सोयी** - जागा उपलब्ध करुन देणे, पाण्याची सोय करुन देणे, विजबिल भरणे

NABL च्या दराप्रमाणे CTSCAN व MRI या महागड्या चाचण्या रुग्णांना अल्पदरात उपलब्ध करण्यात येतील. सदर प्रकल्प उभारणी करीता येणारा सर्व खर्च कंपनी करणार प्रकल्प कार्यान्वीत करण्यासाठी लागणारी उपकरणे व यंत्रसामग्री तसेच कर्मचारी यांची व्यवस्था व त्यावरील खर्च ही पुर्ण जबावदारी कंपनी कडून राहील.

**तसेच लॅबमध्ये खालील प्रमाणे कर्मचारी वर्ग उपलब्ध करुन दिला जाणार आहे.**

1.पॅथॉलॉजिस्ट2.रिसेप्शन स्टाफ3.लॅबटेक्निशियन 4.सिटी स्कॅन टेक्निशियन5.एक्स-रे टेक्निशियन 6. क्लिनीकल स्टाफ

सदर प्रकल्पाला धुळे मनपा धुळे व क्रिष्णा डायग्नोस्टीक यांच्या संयुक्त विद्यमाने संचलित असे नांव देण्यात येईल. प्रकल्पाव्दारे निर्गमित होणारे सर्व प्रकारचे पत्र व्यवहार व चाचण्याचे प्रमाणपत्र तसेच बील इत्यादी वर ही संयुक्त विद्यमाने असेच शिर्षकाने देण्यात येतील.

धुळे महानगरपालिकेच्या महासभेने PPP तत्वावर रेडिओलॉजी पॅथलॉजी सिटीस्कॅन व एक्सरे सुविधा विकसित करण्या करीता महासभेतील ठराव नं.83 दि.27/01/2022नुसार मंजुरी

देण्यात आली आहे. त्यानुसार प्रारुप निविदा प्रपत्र तयार करुन निविदा काढण्यास मा. आयुक्त सो, यांनी मंजुरी दिली.

पहिली निविदा दि.29/04/2022 प्रसिध्दी करण्यात आली आहे. व दि.23/05/2022 रोजी उघडण्यात आली आहे. परंतु निविदा उघडल्यानंतर दोनच निविदा धारकांनी याच्यात भाग घेतला असल्याने निविदा समितीने मुदतवाढ देण्याची शिफारस केली.

मुदतवाढ दि.24/05/2022 ते दि.09/06/2022 रोजी अशी देण्यात आली. त्यानुसार मा.आयुक्त यांनी 15 दिवसाची मुदत वाढ दिली. त्यात पुन्हा दोनच निविदा धारकांनी भाग घेतला असल्याचे निदर्शनास आले. निविदा समितीने पुन्हा मुदतवाढीची शिफारस केली..मा. आयुक्त सो, यांच्या मान्यतेने ई निविदा मुदतवाढ दि.10/06/2022 पासुन ते 20/06/2022 अशी 10 दिवसाची मुदतवाढ देण्यात आली. त्यात पुन्हा दोनच निविदा धारकांनी भाग घेतला होता तथापि तिसरी वेळ असल्याने निविदा समितीने दोन निविदा धारक असले तरी निविदा प्रक्रिया पुर्ण करण्याचा निर्णय घेतला त्यात खालील दोन संस्थानी सहभाग घेतला होता.

1.क्रष्णा डायनोस्टीक पुणे.2.लोकमान्य हॉस्पीटल मेडीलकल स्टोअर

तांत्रिक छाननी फक्त क्रष्णा डायनोस्टीक पुणे हि संस्था पात्र ठरली आहे. क्रष्णा डायनोस्टीक पुणे ही संस्था पात्र ठरलेली आहे. व निविदा समितीने सदर संस्थेची निविदा स्विकारण्याची शिफारस केली.

सदर शिफारसी नुसार सदर संस्थेस दि.23/08/2022रोजी सादरीकरन व दरस्विकृतीसाठी बोलविण्यात आले होते. त्यात सदर संस्थेने सादरीकरन केले व दर स्विकृती दिली. त्यानुसार सदर प्रस्ताव स्थायी समितीपुढे मान्यतेस्तव सादर झालेला आहे.

सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून धुळे मनपा शाळा क्रमांक २१ व४५मधील आवारात नागरीकांसाठी अल्प दरात विविध वैद्यकिय तपासण्या करण्याकरीता PPP तत्वावर अद्यावत रोग निदान तपासणी प्रयोगशाळा उभारणे कामी कृष्णा डायनोस्टीक पुणे या पात्र संस्थेची स्वारस्यांची अभिव्यक्ती अंतर्गत निविदा दर स्विकृती करणेस मान्यता देण्यांत येत आहे. याबाबत प्रस्तावात नमूद अटी शर्तीनुसार आवश्यक तो करारनामा संबंधित संस्थेकडुन करुन घेण्यांत यावा. तसेच सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री. खान मोहम्मद साबीर मुहिबुल्लाह

अनुमोदक:- श्री.चौधरी नरेंद्र रुपला

**सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- १७२ — धुळे मनपातील एकत्रित मानधनावरील १ ते १३ व्हॉलमन कर्मचा-यांना मुदतवाढ देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.सभापती — हा जो विषय आहे. या सर्व कर्मचाऱ्यांची मुदत दि. २५/०६/२०२२ रोजी संपलेली आहे. परंतु हा विषय प्रशासनाकडे प्रलंबित होता. ५ दिवसांची सेवा विखंडीत करुन त्यानुसार त्या तारखेपासून त्यांना मानधन देण्यात यावे. दुसरी गोष्ट अशी की, ८०००/- रुपयांत कोणीही काम करत नाही. सर्व प्रशासकीय अधिकाऱ्यांना सांगून झाले आहे. आपला एक दिवसाचा डी.ए. कापला तरी अधिकाऱ्यांचा जीव तळमळतो. ८०००/- रुपयांत कशी अपेक्षा करतो की या कर्मचा-यांना बाभळेला-सुकवद ला जावे त्यांना ५० रु यायला जायला खर्च होतात. त्यांचा पी.एफ कट होतो. त्यांच्या हातात ६४००-६६००/- रुपये उरतात. ६०००/- रुपयांत कसे काम करणार ८-८ तास?

म. नागसेन बोरसे — प्रस्ताव सादर करायला सांगा त्यांचा पगार वाढवला पाहीजे.

म.सभापती ५०० रुपयांत बिगारी काम करत आहेत. ५००/- रोजाच्या पुढे प्रस्ताव स्थायी पुढे आला पाहीजे. नाहीतर किमान वेतन आयोगाप्रमाणे जो-जो संबंधीत अधिकारी दोषी असेल प्रत्येकावर कार्यवाही होईल. आपण त्यांना काही आलाउन्सेस वैगरे देत नाही. दुसरे मागच्या बैठकीत कर्मचाऱ्यांचे पदोन्नतीची ३० सप्टेंबरच्या आंत बैठक घ्यायची होती. ती देखील झाली नाही. का म्हणून प्रलंबीत ठेवता या गोष्टी? तुमच्या सेवानियमावली प्रमाणे ३० सप्टेंबरला दरवर्षी ही बैठक अयोजित केली पाहिजे. २०१२ पासून ही बैठक प्रलंबीत आहे. नसेल तर आता फाईलवर सहया घ्या. मोरे हे जे मी सांगीतले ५००/- रु रोजाच्या खाली सभेपुढे प्रस्ताव आणू नये. सोमवारी कुठल्याही परिस्थितीत सर्व मानधनावरील कर्मचाऱ्यांचा प्रस्ताव आला पाहिजे.

म.नरेंद्र चौधरी विषय मंजूर करावा.

म. किरण अहिरराव विषय मंजुर करावा.

म. सभापती सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे. तसेच धुळे महानगरपालिकेत कार्यरत मानधनावरील सर्व प्रकारच्या कर्मचा-यांना किमान वेतन दर तथा आवश्यक ते मानधन वाढीबाबत प्रस्ताव प्रशासनाने तांतडीने सादर करावा.तसेच धुळे मनपातील कायम कर्मचा-यांना कालबध्द पदोन्नती व इतर अनुषंगिक लाभ देणेसाठी पदोन्नती समितीची बैंठक याच महिन्यांत घेण्यांबाबत कार्यवाही करावी.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १८६ दिनांक २९/०९/२०२२**

स्थायी समिती ठरावानुसार पाणीपुरवठा विभागाकडील खालील नमुद १ ते १३ एकत्रित मानधनावरील व्हॉलमन यांना पुढील ६ महिने करीता मुदतवाढ देणेबाबत सदर ठरावानुसार मंजुरी देण्यात आलेली आहे. १ ते १३ व्हॉलमन यांना एकत्रित मानधनावर पुढील ६ महिनेकरीता मुदतवाढ देण्यात आलेली आहे. त्यानुसार त्यांची दि २५/६/२०२२ रोजी मुदत संपुष्ठात आलेली आहे. खालील १ ते १३ एकत्रित मानधनावरील व्हॉलमन यांनी पुनश्च ६ महिने करीता मुदतवाढ मिळणेबाबत विनंती केलेली आहे.

| अ क्र | कर्मचा-याचे नाव | एकत्रितमानधन दरमहा | मुदतसंपुष्ठात आल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| १ | दिपक छगन बागुल | रु. ८०००/- | २५/६/२०२२ |
| २ | सैय्यद इमरानअली जाफर अली | रु. ८०००/- | २५/६/२०२२ |
| ३ | तुषार गिरीश चौधरी | रु. ८०००/- | २५/६/२०२२ |
| ४ | शिंदे दिनेश रामसिंग | रु. ८०००/- | २५/६/२०२२ |
| ५ | चंद्रकांत मोतीलाल फुलपगारे | रु. ८०००/- | २५/६/२०२२ |
| ६ | हेमराज भाईदास कोळी | रु. ८०००/- | २५/६/२०२२ |
| ७ | प्रमोद विठठल सोनवणे | रु. ८०००/- | २५/६/२०२२ |
| ८ | गणेश शंकर बिरारी | रु. ८०००/- | २५/६/२०२२ |
| ९ | किरण राजेंद्र फुलपगारे | रु. ८०००/- | २५/६/२०२२ |
| १० | योगेश भानुदास वाखारकर | रु. ८०००/- | २५/६/२०२२ |
| ११ | ज्ञानेश्वर तुकाराम सैंदाणे | रु. ८०००/- | २५/६/२०२२ |
| १२ | प्रणय राजेंद्र लहामगे | रु. ८०००/- | २५/६/२०२२ |
| १३ | रणदिवे राहुल अरुणराव | रु. ८०००/- | २५/६/२०२२ |

निष्ठ अभियंता पाणीपुरवठा विभाग यांनी उक्त १ ते १३ मानधनावरील व्हॉलमन यांचे कामाचे कोणतीही तक्रार नसून त्यांचे काम समाधानकारक असल्याने व कामाची निकड पाहता त्यांना पुढील ६महिने करीता मुदतवाढ देणेबाबत अहवाल सादर केलेला आहे.

उपरोक्त व्हॉलमन (मानधनावरील) १ ते १३ कर्मचा-यांना ५ दिवसाचा सेवा खंड करुन एकत्रितमानधनावर पुढील६महिने कालावधीकरीता मुदतवाढ देणेबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील ५३(३) नुसार सदरचा विषय मे.स्थायी समिती पुढे ठेवणेबाबत निर्णयास्तव सविनय सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून पाणीपुरवठा विभागाकडील उक्त व्हॉलमन (मानधनावरील) १ ते १३ कर्मचा-यांना ५ दिवसाचा सेवा खंड करुन एकत्रित मानधनावर पुढील ६ महिने कालावधीकरीता मुदतवाढ देणेबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील ५३ (३) नुसार मान्यता देण्यांत येत आहे.या व्हॉलमन कर्मचा-यांची मुदत संपल्याच्या तारखेपासून नियमाप्रमाणे ५ दिवसाचा खंड देवून त्या तारखेपासून मुदतवाढ देण्यांस मान्यता देण्यांत येत आहे. तसेच धुळे महानगरपालिकेत कार्यरत मानधनावरील सर्व प्रकारच्या कर्मचा-यांना किमान वेतन दर तथा आवश्यक ते मानधन वाढीबाबत प्रस्ताव प्रशासनाने तांतडीने सादर करावा.तसेच धुळे मनपातील कायम कर्मचा-यांना कालबध्द पदोन्नती व इतर अनुषंगिक लाभ देणेसाठी पदोन्नती समितीची बैठक याच महिन्यांत घेण्यांबाबत कार्यवाही करावी. सुचक:- श्री. चौधरी नरेंद्र रूपला

अनुमोदक:- श्री. अहिरराव किरण हरिश्चंद **सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- १७३ धुळे मनपा पाणी पुरवठा केंद्रावरील विविध पंपसेट,मोटरर्स,स्टॉर्टर पॅनल इ.दुरुस्ती कामाकरीता वार्षिक दर करणेकामी निविदा प्रसिध्द करणे व आर्थिक प्रशासकीय मंजूरी देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.हर्षकुमार रेलन विषय मंजूर करावा.

म.किरण कुलेवार विषय मंजूर करावा.

म. सभापती सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १८७ दिनांक २९/०९/२०२२**

धुळे शहर पाणीपुरवठा केंद्र येथील विविध दुरुस्ती कामे वेळोवेळी तातडीच्या स्वरुपात असतात. धुळे शहर पाणीपुरवठा व्यवस्थेमध्ये खालीलप्रमाणे पंपिंग स्टेशन असून तेथील तपशील नमूद आहे.

| अ.क्र | ठिकाण | तपशील | |
|---|---|---|---|
| १ | **हनुमान टेकडी पा.पु केंद्र व जलशुद्धीकरण केंद्र** | Raw Water पंपिंग ३०० H.P V.T पंप WASH | २ नग |
| | | WATER पंप १० H.P. clorinatorपंप सेट ५H.P | २ नग |
| | | Clariflocculator Bridge | १ नग |
| | | मोटर्सफिल्टर Gallery सिल्युस व्हाल्वinlet/ | ४नग |
| | | outlet | १२ नग |
| | | starter panel ३०० H.P. | २ नग |
| | | १० H.P | २ नग |
| | | ६०० के. व्ही.ए transformer | २ नग |
| | | ८०० amp मेन्स MCCB ब्रेकर्स | २ नग |
| २ | **कुमार नगर पा.पु केंद्र** | ६० H.P centrifugal पंप सेट | २ नग |
| | | ६० H.PA.T.S starter | २ नग |

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | **रामनगर पा.पु. केंद्र**<br>व | ६० H.P centrifugal पंप सेट<br>६० H.PA.T.S starter | २ नग<br>२ नग |
| ४ | **शनीनगरBUSTRपा. पु केंद्र** | ४० H.P centrifugal पंप सेट<br>४० H.PA.T.S starter | २ नग<br>२ नग |
| ५ | **पांझरा वॉटर वर्क्स**<br>मा<br>णे<br><br><br><br>स<br>वं | ५० H.P VERTICAL TYPE पंप सेट<br>१२५ H.P VERTICAL TYPE पंप<br>१०० H.P VERTICAL TYPE पंप सेट<br>७० H.P centrifugal पंप सेट<br>४० H.P centrifugal पंप सेट<br>२०० के. व्ही.ए transformerमेन्स सप्लाय PANAL<br>५०/१२५/१०० H.P starter मोटर्स starter PANAL | १ नग<br>१ नग<br>१ नग<br>१ नग<br>१ नग<br>१ नग<br>१ नग<br>१ नग |
| ६ | **मालेगांव रोड पा.पु केंद्र** .<br>पा<br>.<br>पु | १५० H.P VERTICAL TYPE पंप सेट<br>१२५ H.P VERTICAL TYPE पंप सेट<br>३०० के. व्ही. ए transformer<br>२५० के. व्ही.ए transformer<br>तापी व्हाल ४५० MM | २ नग<br>१ नग<br>१ नग<br>१ नग<br>१ नग |
| ७ | **बडगुजर पा.पु केंद्र** | १०० H.P centrifugal पंप सेट<br>२०० के. व्ही.ए transformer | २ नग<br>१ नग |
| ८ | **बडगुजर पा.पु केंद्र नवीन** | ७५ H.P centrifugalपंपसेट | २ नग |
| ९ | **मायक्रोजलकुंभ कबीरगंज** | ६० H.P centrifugal पंप सेट<br>१०० के. व्ही.ए transformer | २ नग<br>१ नग |
| १० | **कृष्ण मंदिर BUSTER पंपसेट** | ६० H.P centrifugal पंप सेट | २ नग |
| ११ | **डेडरगाव जलशुद्धीकरण केंद्र**<br>से | ५H.P centrifugal पंप सेट clorinatorमोटर<br>फिल्टर Gallery व्हाव | २ नग<br>२ नग<br>३ नग |
| १२ | **जामचा मळा ४० गाव रोड पंपीग स्टेशन**<br>प | ४० HP पंपसेट | २ नग |

सेट व्हाल्व starter ई.बाबची वेळोवेळी तथा तातडीचे दुरुस्ती कामे करावी लागतात या कामांसाठी स्वतंत्र अंदाजपत्रक बनविणे त्याची प्रशासकीय. मान्यता, तांत्रिक मान्यता दरमंजुरी कार्यादेश यास कार्यालयीन वेळ विलंब होत असतो.याकरीता धुमपा/विवि/१७ दि. ०६/१२/२०२० नुसार व्दिवार्षिक आयटेम रेट दरांप्रमाणे कार्यादेश देण्यात आलेला आहे. सदर दोन वर्ष करीता मक्तेदाराची कामाची मुदत कार्यादेशानुसार आयटेम रेट दरांना मंजुरी देण्यात आली असुन प्रती वर्ष करीता रक्कम रू.५२,२४,३३३/- मात्र करीता मान्यता आहे. तथापी या प्रमाणे खर्च झालेला नाही.कार्यादेशनुसार सन २०२०-२०२१ व सन २०२१-२२(माहे जानेवारी २०२२ पर्यत खालील प्रमाणे खर्च झालेला आहे.

| वर्ष | कालावधी | खर्च |
|---|---|---|
| २०२०-२०२१ | ३माहिने (मार्च २०२२ पर्यत) | रू.७,६२,८०७/- |
| २०२१-२०२२ | १०माहिने (जानेवारी २०२२ पर्यत) | रू.२६,३९,१००/- |

वरील प्रमाणे पाणी पुरवठा केंद्रावरील निगा व दुरूस्ती करीता २ वर्ष करीता आयटेम रेट दराप्रमाणे कार्यादेश असुन त्यांची मुदत कार्यादेश दिनांका पासुन माहे डिसेंबर२०२२ पर्यत आहे.

तथापी म.अति.आयुक्त सो.यांनी दिलेल्या निर्देशनुसार वार्षिक निविदा माहे एप्रिल ते माहे मार्च या आर्थिक वर्षासाठी असाव्यात व त्या अनुषंगाने पाणी पुरवठा केंद्रावरील निगा व दुरूस्ती कामी सन २०२१ च्या अंदाजपत्रकीय खर्चात वाढ न करता दोन वर्ष मुदती करीता दर करार करणे करीता प्रती वर्ष रक्कम रू.५२,२४,३३/- च्या अंदाजपत्रकीय खर्चास आर्थिक व प्रशासकिय मान्यता होवुन व्दिवार्षिक आयटेम रेट ई निविदा मागविणेस मान्यतेस सादर करण्यात आली असता १ वर्षासाठी ३४ लक्ष खर्च झाल्याने त्याप्रमाणे निविदा मागविण्यात यावी.त्याबाबत निविदा तपासुन सादर करण्याबाबत म.अति आयुक्त यांनी निर्देश केले.वरील विषयानुसार सादर करण्यात येते की,शहर पाणी पुरवठायोजने मध्ये १ ते १२ पाणीपुरवठाकेंद्रअसुनहददवाढ क्षेत्रामध्ये विहीरी वरील मोटरपंपसेटच्या दुरूस्तीसाठी सन २०२०-२१ व २०२१-२२ मध्येरक्कम रू.५२,२४,३३३/- मात्र प्रती वर्ष वार्षीक खर्चास आर्थिक व प्रशासकिय मान्यता प्राप्त आहे.सदरच्या मान्यतेप्रमाणे कार्यादेश दि.०५/१२/२०२२ पर्यत अंमलात आहे.सन २०२१-२२ याआर्थिक वर्षामध्ये जानेवारी २०२२ पर्यत २६,३९,१००/- तसेच ३१ मार्च २०२२ पर्यत ४,३४,३५२/- मात्र खर्च झाला असुन सन २०२१-२२ मध्ये सदरचा खर्च एकुण ३०,७३,४५२/- मात्र झालेला आहे.त्याप्रमाणे प्रशासकिय मान्यता व प्रत्यक्ष खर्च यामध्ये रक्कम रू.२१,५०,८८१ /- मात्र तफावत आहे.तथापी सन २०२२-२३ मध्ये वार्षीक देखभाल दुरूस्तीसाठी रक्कमरू. ५२,२४,३३३/- मात्र तरतुद नोंद केली आहे व सदरच्या कामी मोटर्स पंप सेट हे तांत्रिक दुरूस्तीचे असल्याने त्याप्रमाणे सदरच्या कामीवरीलप्रमाणे मागीलवर्षाच्या प्रत्यक्ष खर्चामध्ये १०% वाढत तसेच जी.एस.टी करा मध्ये शासन दरसुचीमध्ये झालेली ६%वाढ(१८% जी.एस.टी) च्यानुसार अॅटमरेटदराप्रमाणे निविदा मागविणे संभाव्य वार्षीक खर्च ३५,८३,६४६/- मात्र करीता वार्षीक खर्चास प्रशासकिय मान्यता होणेस व २ वर्ष मुदतीसाठी निविदा मागविणेस मान्यतेस सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या समितीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून धुळे मनपा पाणी पुरवठा केंद्रावरील विविध पंपसेट,मोटरर्स, स्टॉर्टर पॅनल इ.दुरुस्ती कामाकरीता वार्षिक दर करणेकामी 2 वर्ष मुदतीसाठी निविदा प्रसिध्द करणेस व संभाव्य वार्षिक खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यांत येत आहे. सुचक :- श्री. रेलन हर्षकुमार राध्येशाम

अनुमोदक:- सौ. कुलेवार किरण राकेश **सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x

**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक:- १७४ | धुळे तापी पाणीपुरवठा योजनेच्या मास्टर बॅलेसिंग रिझर वायर (MBR)येथे कुंपन भित बांधणे, एम.एस.पाईप बदलणेव इतर अनुषंगिक कामे करणे बाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे. |
| म.नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले. |
| म.नागसेन बोरसे | विषय मंजूर करावा. |
| म.वैशाली वराडे | विषय मंजूर करावा. |
| म. सभापती | सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे. |

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १८८ दिनांक २९/०९/२०२२**

धुळे तापी पाणीपुरवठा योजना हि सन १९९१-९२ पासून कार्यरत असून योजनेच्या मास्टर बॅलेसिंग रिझर वायर (MBR) क्षमता सुमारे ६५ लक्ष लीटर आहे. सदरील ठिकाणी पोलीस अधिक्षक कार्यालय धुळे यांचे दि.१२/१२/२०१९ व दि.१९/०५/२०२१ रोजी च्या सुरक्षा आढाव्यात आढळलेल्या त्रूटींची पुर्तता करणे बाबत पत्र दिलेले आहे.तसेच मा.स्थायी समिती सभापती यांच्या दालनात

दि.१२/०५/२०२२ रोजी झालेल्या बैठकीतील आदेशानुसार तातडीने दुरुस्त करून अंदाजपत्रक सादर करणे बाबत आदेशीत केले आहे.

त्यानुसार सदर ठिकाणी मास्टर बॅलेंसिंग रिझर वायर (MBR) येथे कुंपन भिंत बांधणे, एम. एस. पाईप बदलणे व इतर अनुषंगिक कामे करणे बाबत कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून सदर कामास शासकीय दरसूची सन २०२१-२२ नुसार रु.४९,८२,८४९/- मात्र खर्च अपेक्षित असून सदरचा खर्च सन २०२२-२३ च्या मनपा निधी अंतर्गत करण्यात येणार आहे.उक्त कामी मे.स्थायी समितीची मंजुरी आवश्यक असल्याने सदरचा विषय मे.स्थायी समिती पुढे सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून धुळे तापी पाणी पुरवठा योजनेच्या मास्टर बॅलेंसिंग रिझर वायर(MBR)येथे कुंपन भिंत बांधणे, एम. एस. पाईप बदलणे व इतर अनुषंगिक कामे करणेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यांत येत आहे.

सुचक :- श्री. बोरसे नागसेन दामोदर

अनुमोदक:- सौ. वराडे वैशाली भिकन

**सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

# धुळे महानगरपालिका,धुळे

## नगरसचिव कार्यालय

## स्थायी समिती सभा क्रमांक २३ चे इतिवृत्त

---

**धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह**
**गुरुवार दिनांक २९/०९/२०२२**
**वेळ दुपारी १२- ३० वाजतां**

धुळे महानगरपालिकेची स्थायी समितीची साप्ताहिक सभा क्रं.२३ आज गुरुवार दिनांक **२९/०९/२०२२** रोजी दुपारी १२-३० वाजतां श्री.शितल मोहन नवले, सभापती, स्थायी समिती, मनपा धुळे यांच्याअध्यक्षतेखाली **धुळे मनपा धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृहात** भरली. या सभेस खालील सन्मा.सदस्य हजर होते.

| अ.क्रं. | सदस्यांचे नांव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री.नवले शितल मोहन | सभापती |
| २ | श्री. बोरसे नागसेन दामोदर | सदस्य |
| ३ | श्रीमती कुलेवार किरण राकेश | सदस्या |
| ४ | श्रीमती वराडे वैशाली भिकन | सदस्या |
| ५ | श्री.जाधव बन्सीलाल माणिक | सदस्या |
| ६ | श्रीमती चौधरी मंगला अर्जुन | सदस्या |
| ७ | श्री.अन्सारी फातमा नुरुल अमीन | सदस्या |
| ८ | श्री. चौधरी नरेंद्र रुपला | सदस्य |
| ९ | श्रीमती चौधरी प्रतिभा शिवाजीराव | सदस्या |
| १० | श्री. अहिरराव किरण हरिश्चंद्र | सदस्य |
| ११ | श्री. रेलन हर्षकुमार राध्येशाम | सदस्य |
| १२ | श्रीमती अग्रवाल सारिका प्रवीण | सदस्या |
| १३ | श्री.अन्सारी अब्दुल लतीफ अब्दुल हमीद | सदस्य |
| १४ | श्री.खान मोहम्मद साबीर मुहिबुल्लाह | सदस्य |
| १५ | श्रीमती पठाण नाजियाबानो नासिर खा | सदस्या |

उपस्थित अधिकारी गण

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. देविदास टेकाळे | आयुक्त |
| २ | डॉ. श्रीमती संगिता नांदुरकर | उपायुक्त |
| ३ | श्रीमती पल्लवी शिरसाठ | कर मूल्य निर्धारण अधिकारी |
| ४ | श्री. मनोज अरविंद वाघ | नगरसचिव |
| ५ | श्री. गजानन पाटील | मुख्य लेखाधिकारी |

| | | |
|---|---|---|
| ६ | श्री. के.एन. शिंदे | अभियंता |
| ७ | डॉ. श्री.एम.आर. शेख | प्र. आरोग्याधिकारी |
| ८ | श्री. राजेश वसावे | सहा. आरोग्याधिकारी |
| ९ | श्री. विकास साळवे | मलेरिया पर्यवेक्षक |
| १० | श्री. चंद्रकांत मोरे | लेखापाल |
| ११ | श्री. संजय मोरे | प्र कार्यालय अधिक्षक |
| १२ | श्री. कमलेश सोनवणे | ओव्हरसिअर न.र.विभाग |
| १३ | श्री. किशोर सुडके | प्र.परवाना अधिक्षक तथा बाजार विभाग प्रमुख |
| १४ | श्री. एन.के. बागुल | विद्युत अभियंता |
| १५ | श्री. महेंद्र सोनवणे | प्रशासन अधिकारी मनपा शि.मंडळ |
| १६ | श्री. राजू माईनकर | भांडारपाल तथा कार्यालय प्रमुख आरोग्य विभाग |
| १७ | श्री. पी.डी. चव्हाण | ओव्हरसिअर बांधकाम विभाग |
| १८ | श्री. हेमंत पावटे | ओव्हरसिअर बांधकाम विभाग |
| १९ | श्री. प्रकाश सोनवणे | ओव्हरसिअर न.र.विभाग |
| २० | श्री.मधुकर निकुंभ | प्र.वसुली अधिक्षक |
| २१ | श्री. प्रसाद जाधव | अतिक्रमण विभाग प्रमुख |
| २२ | श्री. सुक्राम राऊत | वाहन विभाग |

म. सभापती — सभा क्रं. २३ चे कामकाजास सुरुवात करण्यांत यावी.

विषय क्रमांक:- १७५ — मागील स्थायी समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे. (०५/०९/२०२२)

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. नागसेन बोरसे — इतिवृत्त वाचून कायम करण्यांत यावे.

म. सभापती — सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने मागील स्थायी समिती सभेचे इतिवृत्त क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १८९ दिनांक २९/०९/२०२२**

मागील स्थायी समिती सभा दि.५/९/२०२२ रोजीच्या सभेतील धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १५३ ते १६६ अखेर तसेच सभेत सन्मा. सदस्यांनी उपस्थित केलेली चर्चा व त्यावरील निर्णय क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- १७६ — मा. आयुक्त सो. यांनी त्यांचे आलेल्या अधिकारात रुपये ५ लाख ते २५ लाखापर्यंत बांधकाम विभागाकडील विकास कामाची यादी प्रकरण ७ (ड) अन्वये दि.०२/०८/२०२२ ते दि. १२/०९/२०२२ अखेर निर्गमित केलेल्या कार्यादेशाची यादी अवलोकनासाठी मे.स्थायी समिती पुढे सादर.

म.नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.नागसेन बोरसे — विषयांचे अवलोकन करण्यांत आले.

म. सभापती — मा.आयुक्त सो.यांनी त्यांचे अधिकारात रु.५ लाख ते २५ लाखापर्यंत मंजुरीचे दिलेल्या कार्यादेशाच्या यादीचे अवलोकन करण्यांत आले.

## धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १९० दिनांक २९/०९/२०२२

मा.आयुक्त सो.यांनी त्यांचे आलेल्या अधिकारात रुपये ५ लाख ते २५ लाखापर्यंत बांधकाम विभागाकडील विकास कामाची यादी प्रकरण ७ (ड) अन्वये दि.०२/०८/२०२२ ते दि.१२/०९/२०२२ अखेर निर्गमित केलेल्या कार्यादेशाची यादी अवलोकनासाठी मे. स्थायी समिती पुढे सादर करण्यांत आली आहे.

**दिनांक :- दि.०२/०८/२२ ते दि.१२/०९/२२ अखेर निर्गमित केलेल्या विकास कामांच्या कार्यादेशाची यादी**

| अ.क्र | कार्यादेश क्रं | दिनांक | कामाचे नाव | रक्कम | निधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | १६२ | ०२/०८/२०२२ | प्र.क्र.३ मध्ये इस्लामपुरा भागात डॉ.खुर्शीद यांच्या घरापासुन तेडॉ.अन्सारी यांच्या घरापावेतो व अशरफी चौकापासून ते लॉढी नाल्यापावेतो रस्ता कॉक्रीट करणे. | १२,४६,९७३/ | महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान जिल्हास्तरीय योजना अंतर्गत सन २०२१-२२ |
| २ | १६३ | ०२/०८/२०२२ | धुळे मनपा मालकीच्या देवपूर सर्व्हे नं.१११ व ११२ या जागेवर मंजूर अभिन्यासातील८०९३.६४ चौ.मी. पैकी जागेवर कोविद हॉस्पिटल बांधकामसाठी आर्किटेक्ट व प्रकल्प सल्लागार नेमणूको बाबत. | शे.०.६० % अंदाजपत्रक रक्कम | मनपा निधी अंतर्गत सन २०२१-२२ |
| ३ | १६५ | ०२/०८/२०२२ | प्र.क्र.११ मध्ये हमालमापाडी प्लॉट भागातील प्रमोद शिंदे ते राजू पाटील यांचे घरापावेतो आर.सी.सी. गटार करणे. | १४९६९७० | महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान जिल्हास्तरीय योजना अंतर्गत सन २०२१-२२ |
| ४ | १६६ | ०२/०८/२०२२ | प्र.क्र.१५ मध्ये सुंदरच कॉलनी येथे रस्ता डांबरीकरण करणे. | ९९७२९५ | मनपा निधी अंतर्गत सन २०२१-२२ |
| ५ | १६७ | ०२/०८/२०२२ | प्र.क्र.१५ मध्ये सर्व्हे नं.४१ येथिल अरुण कुमार वैद्य नगर येथील मोकळ्या जागेवर पत्री शेड व कॉक्रीट बेंचेस बसविणे. | ९९८८४७ | मनपा निधी अंतर्गत सन २०२१-२२ |
| ६ | १६८ | ०२/०८/२०२२ | प्र.क्र.१६ मध्ये चितोड आदिवासी वस्तीत गोपाल बाघ घर ते तुळशीराम बनसिंग घर ते संजय बागले यांच्या घरापर्यंत रस्ता कॉक्रीट करणे. | १९८१८९२ | मनपा निधी अंतर्गत सन २०२१-२२ |
| ७ | १६९ | ०२/०८/२०२२ | प्र.क्र.१४ मध्ये मिरजकर नगर भागात ४० गाव रोड पासुन ते निशा फर्निचर पावेतो ४० गाव रोड पासून ते ए.वाय.मोरे यांचे घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | १९९९६३५ | मनपा निधी अंतर्गत सन २०२१-२२ |
| ८ | १७२ | ०८/०८/२०२२ | प्र.क्र.४ मध्ये भिडे बाग भागात श्री.संदीप कुलकर्णी यांच्या घरापासून ते श्री.चंदू महाजन यांचे घरापावेतो रस्ता डांबरीकरण करणे. | १२४६१३५ | महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान (जिल्हास्तरीय) योजने अंतर्गत सन २०२१-२२ |
| ९ | १७३ | ०८/०८/२०२२ | प्र.क्र.४ मध्ये नागाई कॉलनी भागात स्काउड गाईड ऑफिस पासून ते श्री.गवळी यांच्या घरापावेतो रस्ता कॉक्रीट करणे. | १२४४७१३ | महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान (जिल्हास्तरीय) योजने अंतर्गत सन २०२१-२२ |
| १० | १७४ | १०/०८/२०२२ | प्र.क्र.१९ मध्ये बोरसे कॉलनी भागात गॅरेज पासून ते अग्गाहाजी यांचेघरापावेतो मुरूम सोलिंगचा रोड करणे. | ५७७०४८ | नगरसेवक निधी अंतर्गत सन २०२१-२२ |
| ११ | १७५ | १०/०८/२०२२ | प्र.क्र.१९ मध्ये अविष्कार कॉलनी भागात गफ्फार शेख यांचे घरापासून ते इम्रान वेल्डिंग यांचे घरापर्यंत रस्ता कॉक्रीट करणे. | १९९८३३१ | नगरसेवक निधी अंतर्गत सन २०२१-२२ |
| १२ | १७७ | १०/०८/२०२२ | प्र.क्र.५ मध्ये संभाजी नगर भागात गुलाबराव भामरे यांचे घरापासून ते श्री.अहिरराव यांचे घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | ५०९९८२ | नगरसेवक निधी अंतर्गत सन २०२१-२२ |
| १३ | १७८ | १०/०८/२०२२ | प्र.क्र.५मध्ये दौलत नगर भागातील सर्व्हे नं.८३ ओपनस्पेसला कंपाऊंड वॉल करणे. | २२७१२४४ | सर्वसाधारण जिल्हावार्षिक योजने अंतर्गत सन २०२१-२२ |
| १४ | १८४ | १८/०८/२०२२ | प्रभाग क्र.१५ मध्ये यशवंत नगर भागात श्री. राजू मोरे ते वारकरते कानडेते भोपेयांचे घरापावेतो रस्ता कॉक्रीट करणे. | १९९९९३९ | नगरसेवक निधी अंतर्गत सन २०२१-२२ |
| १५ | १८७ | १८/०८/२०२२ | प्रभाग क्र०५ मध्ये मोतीराम नगर भागातील स.न. ७६/१+५ ओपेनस्पेसला कंपाऊंड वाल करणे. | १९१८३४८ | सर्वसाधारण जिल्हावार्षिक योजने अंतर्गत सन २०२१-२२ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १६ | १८९ | २४/०८/२०२२ | प्र.क्र.४ येथे सतीदेवी प्लायवुड पासुन ते पांझरा नदी पावेतो ड्रेनेज लाईन टाकणे. | ५५८०४१ | मनपा निधी(नगरसेवक निधी) अंतर्गत सन २०२१-२२ |
| १७ | १९० | २४/०८/२०२२ | प्र.क्र.२ मध्ये श्रीरंग कॉलनी भागातील सर्व्हे नं.४१/१ मधील ओपनस्पेसला विकसित करणे. | १३५५४८४ | मनपा निधी(नगरसेवक निधी) अंतर्गत सन २०२१-२२ |
| १८ | १९२ | २४/०८/२०२२ | प्र.क्र.५मध्ये अमोल नगर भागातील सर्व्हे नं.८४ / १+२ अ ओपनस्पेसला कंपाऊंड वॉल बांधणे.. | २४३७७२९ | सर्वसाधारण जिल्हावार्षिक योजने अंतर्गत सन २०२१-२२ |
| १९ | १९३ | २४/०८/२०२२ | प्र.क्र.१८मध्ये दंडेवाला बाबा नगर भागात छोटू देवरे यांचे घरापासुन ते जितू पवार यांचे घरापर्यंत रस्ता काँक्रीट करणे. | ९९९६३८ | साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत सन २०२१-२२ |
| २० | १९४ | २४/०८/२०२२ | प्र.क्र.१८ मध्ये मोहाडी संजय भाऊ नगर भागात राजेंद्र बोरसे तेथ्री.चव्हाण सर घरापर्यंत रस्ता सिमेंट काँक्रीट करणे. | २१९७६९८ | साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत सन २०२१-२२ |
| २१ | १९६ | २४/०८/२०२२ | प्र.क्र.७मध्ये नगरोत्थान योजने अंतर्गत लक्ष्मी नगर मध्ये शंकर घुगरे तेउच्चे यांचे घरापावेतो रस्ता काँक्रीट करणे. | १९९९७५१ | महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजने अंतर्गत सन २०२१-२२ |
| २२ | १९७ | २४/०८/२०२२ | प्र.क्र.७मध्ये लक्ष्मी नगर मध्ये नगरोत्थान योजने अंतर्गत उच्चे घर ते संजय यादवोले यांच्या घरा पावेतो गटार करणे | ९९०२६२ | महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजने अंतर्गत सन २०२१-२२ |
| २३ | १९८ | २४/०८/२०२२ | प्र.क्र.१८ मध्ये मनपा निधीतून मोहाडी दंडेवाले बाबा नगर भागात रघुनाथ मिस्त्री यांचे घरामागील गल्ली व मा. नगरसेविका सुलोचना पाटील यांचे घराजवळील रस्ता काँक्रीट करणे. | १९८७५८२ | मनपा निधी अंतर्गत सन २०२१-२२ (नगरसेवक निधी) |
| २४ | १९९ | २४/०८/२०२२ | प्र.क्र.७ मध्ये कुमार नगर भागात कुमार प्रोव्हिजन ते जय आंबे स्टोअर पावेतो रस्ता काँक्रीट करणे. | १९९९२५६ | मनपा निधी अंतर्गत सन २०२१-२२ (नगरसेवक निधी) |
| २५ | २०० | २४/०८/२०२२ | प्र.क्र.१५ मध्ये महावीर कॉलनी ,मित्रकुंज सोसा.,राजे संभाजी कॉलनी येथील ओपनस्पेसला पेव्हिंग ब्लॉक बसविणे व जॉगिंग ट्रॅक करणे. | ९९७२११ | मनपा निधी अंतर्गत सन २०२१-२२ (नगरसेवक निधी) |
| २६ | २०१ | २५/०८/२०२२ | प्र.क्र.१७ मध्ये धुळे मनपा हद्दीत सुरत बायपास हायवे तेअण्णासाहेबपाटील नगर पावेतो पाईपलाईन टाकणे. | १०२२४१० | मनपा निधी (नवीन पाईपलाईन टाकणे अंतर्गत) सन २०२२-२३ |
| २७ | २०२ | २५/०८/२०२२ | प्र.क्र.१३ मध्ये १०० फुटी रस्त्यापासुन ते जाहिद सर यांचे गोडावून पर्यंत रस्ता काँक्रीट करणे. | २१८३२७८ | मुलभूत सोईसुविधांचा विकास योजना सन २०२१-२२ अंतर्गत |
सदर निविदा धारकांचे निविदा दर हे**अंदाजपत्रकीय**दराने असल्याने सर्व निविदा समिती सदस्यांनी सदर निविदा धारकांचे दर स्वीकारण्यास मा.आयुक्त सो. यांना शिफारस करण्यावर एकमत झाले.

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **अे.के.सैफी** यांचे दर **अंदाजपत्रकीय** आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार **अे.के.सैफी** यांची **अंदाजपत्रकीय** दराने आलेले निविदा दर मे.स्थायी समिती समोर सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी कंत्राटदार **अे.के.सैफी** यांची **अंदाजपत्रकीय** दराने आलेले निविदा दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे. तसेच सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री. जाधव संजय सुधाकर
अनुमोदक:- श्री. जाधव बन्सीलाल माणिक

**सर्वानुमते मंजुर,**
सही/-xxx
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

**विषय क्रमांक :-१९३** , नागरी दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत सन २०२१-२२ प्र.क्र.७ मध्ये महाले नगर भागात जगदीश केशव नेरकर यांच्या घरापासून ते फुले नगर येथील सार्वजनिक शौचालयापर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण करणेचे निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.
म. प्रतिभाताई चौधरी विषय मंजूर करण्यांत यावा.
म. किरण कुलेवार विषय मंजूर करण्यांत यावा.
म. सभापती सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २०७ दिनांक ०६/१०/२०२२**

नागरी दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत सन २०२१-२२ प्र.क्र.७ मध्ये महाले नगर भागात जगदीश केशव नेरकर यांच्या घरापासून ते फुले नगर येथील सार्वजनिक शौचालयापर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे बाबतच्या कामास मा.जिल्हाधिकारी सो. धुळे यांची प्रशासकीय मान्यता दि.२५/०३/२०२२ अन्वये उक्त कामाबाबत रक्कम रु.२९,९९,२०४/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./४९३/२०दि२४/१२/२०२१ अन्वये रक्कम रु.२९,९९,२०४/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिकाजा.क्र./धुमपा/बां.वि./१२/२० दि.१३/०५/२०२२ अन्वये दैनिक पुण्यनगरी/खानदेश मैदान या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.०१/०६/२०२२ पर्यंत निविदा दर मागविण्यात आले आहेत.पात्र कंत्राटदार यांनी निविदे बाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेली आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदार किंवा ठेकेदाराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | श्री.ऋषभ सतिष खिवसरा | शे.३.०० % जास्त | |
| २ | मे.एकविरा कन्सट्रक्शन | शे.२.०० % जास्त | |
| ३ | मे.हिंद कन्सट्रक्शन | शे.-४.०० % कमी | सर्वात कमी |

सदर तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता **मे.हिंद कन्सट्रक्शन** यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे २८,७९,२३६/- इतक्या रक्कमेचे असून **शे.-४.००%कमी** दराने आहे.

सदर निविदा धारकांचे निविदा दर हे **शे.-४.०० % कमी** दराने असल्याने सर्व निविदा समिती सदस्यांनी सदर निविदा धारकांचे दर स्वीकारण्यास मा.आयुक्त सो. यांना शिफारस करण्यावर एकमत झाले.

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **मे.हिंद कन्सट्रक्शन** यांचे दर **शे.-४.००% कमी** आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार **मे.हिंद कन्सट्रक्शन** यांची **शे.-४.००% कमी** दराने आलेले निविदा दर मे.स्थायी समिती समोर सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी कंत्राटदार **मे.हिंद कन्सट्रक्शन** यांची **शे.-४.००%कमी** दराने आलेले निविदा दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे. तसेच सदर प्रस्ताव व

कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- सौ. चौधरी प्रतिभाताई शिवाजीराव

अनुमोदक:- सौ. कुलेवार किरण राकेश **सर्वानुमते मंजुर,**

सही/-xxx

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका, धुळे**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक:- १९४ | धुळे मनपा कार्यक्षेत्रातील भटकी व मोकाट कुत्र्याचे निर्बिजीकरण शस्त्रक्रीया व बंदोबस्त करण्याकामी ई-निविदा दर मागविण्यात आलेत त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर फेर विचार करणे. |
| म.नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले. |
| म. साबीर शेठ | याबाबत यापूर्वी संबंधित ठेकेदाराने प्रात्यक्षिक दिले नाही. याबाबत वस्तुस्थिती स्पष्ट करावी. |
| म. फातमा अन्सारी | निर्बजिकरणाची प्रक्रिया करण्यांत येत आहे परंतु वाढत्या कुत्रयांची संख्या लक्षांत घेता मनपा मार्फत कुत्रालय बांधून तेथे मोकाट कुत्रे जमा करावेत. |
| म.साबीर शेठ | संबंधित ठेकेदार प्रतिसाद देत नाही. सदर ठेका ३ वर्ष या दिर्घ मुदतीसाठी आहे. त्यामुळे संबंधित L१ ठेकेदार यांना शेवटची संधी द्यावी अन्यथा शहरातील कुत्रयांचा प्रचंड उपद्रव लक्षांत घेता L२ ठेकेदार यांचा तांतडीने विचार करुन कामाची सुरुवात करावी. |
| म.सभापती | या निविदेत आलेले L१ ठेकेदार यांनी समाधानकारक प्रतिसाद दिलेला नाही.तसेच त्यांनी निश्चित केल्याप्रमाणे प्रात्यक्षिक देखील दिलेले नाही.व दर वाटाघाटी करण्यांसही नकार दिलेला आहे. त्यामुळे सदर ठेकेदाराच्या कार्यक्षमतेबाबत साशंकता निर्माण होत आहे. सदर ठेका हा ३ वर्ष दीर्घ मुदतीसाठी आहे. त्यामुळे मनपाच्या आर्थिक हिताचा विचार करणेही आवश्यक आहे.L१ यांना अनेक वेळा सादरीकरणासाठी समक्ष बोलवण्यात आले. तथापि ते प्रत्येक वेळी अनुपस्थित राहिले. त्यामुळे ते काम कशा पध्दतीने करणार आहेत याबाबतची माहिती या सभागृहास प्राप्त झाली नाही. तेव्हा शासन निर्णय व शासन नियम अटीप्रमाणे एल वन ठेकेदार सर्वोदय गो शाळा वर्धा यांची आलेले निविदा दर प्रति श्वान रु.८८०/-मात्र स्वीकारण्यास सद्यस्थितीत मान्यता देण्यांत येत आहे तथापि L१ यांचे एकंदर प्रतिसाद पाहता त्यांना सात दिवसात करारनामा करुन देणे व काम सुरु करण्यांचे प्रशासनाने शासन निर्णयाप्रमाणे स्वत:च्या जबाबदारीवर संबंधितांना करारनामा करुन देण्यांचे निर्देश देण्यांत यावेत. व 7 दिवसांच्या मुदतीत L१ यांनी काम सुरु केले नाही तर सदर काम हे अत्यावश्यक सेवेतील असल्याने व शहरामध्ये कुत्रयांची प्रचंड समस्या निर्माण झालेली असल्याने सदर कामाची तात्काळ आवश्यकता पाहता 7 दिवसांत L१ यांनी करारनामा करुन काम सुरु न केल्यास प्रशासनाने कामाचे अत्यावश्यक स्वरुप पाहता पर्यायी व्यवस्था म्हणून L२ यांचा विचार करण्यासाठी स्थायी समितीपुढे तात्काळ सादर करावे. |

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २०८ दिनांक ०६/१०/२०२२**

धुळे महानगरपालिका कार्यक्षेत्रातील भटकी व मोकाट कुत्रे निर्बिजीकरण व शस्त्रक्रीया करण्याकामी ई-निविदा प्रसिध्द करण्यात आलेली होती.सदर ई-निविदेत ३ संस्थांनी सहभाग घेवुन सर्वात कमी दर प्रति श्वान रु.८८०/- वाटाघाटी अंती सादर केल्याने दर मंजुरी करीता मे.स्थायी समितीपुढे सादर करण्यात आले होते.

उक्त संदर्भ क्र.२ मे.स्थायी समिती ठराव क्र.१३९ दि २९/८/२०२२ अन्वये निविदा धारकाने सादर केलेले दर जास्तीचे असल्याने मनपाच्या आर्थिक हिताच्या दृष्टीने याबाबत सखोल माहिती घेवुन तसेच दराबाबत वाटाघाटी करण्यासाठी संबंधीत निविदाधारकाला पुनश्च वाटाघाटीसाठी बोलविण्यात यावे व याबाबत मे.स्थायी समितीला अवगत करावे तोपावेतो सदर प्रस्तावास तहकुब ठेवण्यास मान्यता दिलेली होती.

तरी स्थायी समितीने दिलेल्या निर्देशानुसार सर्वोदय गो शाळा चॅरीटेबल ट्रस्ट, वर्धा यांना सादर केलेल्या दराच्या वाटाघाटी करीता व कामाचे सादरीकरणासाठी तात्काळ उपस्थित राहणे बाबत दि.२९/८/२०२२ रोजी पत्र दिले होते.

तरी सदर पत्रानुसार सर्वोदय गो शाळा चॅरीटेबल,वर्धा यांचे दि.२९/८/२०२२ च्या पत्रानुसार दर वाटाघाटी करण्यास नकार देवुन सादरीकरण बाबत Googel Meet द्वारे ऑन लाईन सादरी करणसाठी तयार असले बाबत कळविले होते.

तरी याबाबत विभागाने दि.२९/८/२०२२रोजी मे.स्थायी समितीपुढे फेर निर्णयार्थ अहवाल सादर केलेला आहे.

मे.महासभा ठराव क्र.१०१ दि.१/९/२०२२अन्वये धुळे मनपा कार्य क्षेत्रातील भटकी व मोकाट कुत्र्याचे निर्बिजीकरण व बंदोबस्त करणेकामी खाजगी तत्वावर ३ वर्षाकरीता निविदा प्रक्रिया राबविण्या बाबत मान्यता दिलेली असुन सदर प्राप्त निविदेत आलेले दर हे जास्तीचे दिसुन येत आहे.संबंधीत निविदेत L-२ निविदाधारक यांनी दर कमी करणे बाब पत्र सादर केलेले आहे. त्यानुसार मनपाच्या आर्थिक परिस्थितीचा विचार करता प्रशासनाने दराबाबत वाटाघाटी करुन तातडीने सुरु करणे बाबत निर्देश दिलेले आहे.

स्थायी समिती ठराव क्र.१६४ दिनांक५/९/२०२२अन्वये संबंधीत ठेकेदाराला दराबाबत वाटाघाटीसाठी बोलविले होते. परंतु ते प्रत्यक्षात उपस्थित झाले नाहीत. तसेच त्यांनी गुगल मिटवर प्रात्यक्षीक देणे बाबत कळविले आहे. त्यातील L-२ निविदा धारकाने L-१ निविदा धारकाने दिलेल्या दरपेक्षा कमी दराने काम करणे बाबत कळविले आहे. मनपाच्या आर्थिक हिताचा विचार करुन सदर प्रस्ताव बाबत प्रशासनाने पुनश्च L-२ निविदा धारकाशी वाटाघाटी करुन तात्काळ स्थायी समितीपुढे सादर करावा.तो पावेतो सदर प्रस्ताव तहकुब ठेवण्यास मान्यता दिलेली आहे.

सर्वोदय गो शाळा वर्धा यांना शेवटची संधी म्हणुन नोटीस मिळाल्यापासुन २४ तासांच्या आत महानगरपालिकेत सदर कामाचे प्रेझेंटेशन व दराच्या वाटाघाटी करीता उपस्थित राहणे बाबत नोटीस देण्यात आली होती.

सन्मा.सदस्याच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालाचा विचार करता या निविदेत आलेले L१ ठेकेदार यांनी समाधानकारक प्रतिसाद दिलेला नाही.तसेच त्यांनी निश्चित केल्या प्रमाणे प्रात्यक्षिक देखील दिलेले नाही.व दर वाटाघाटी करण्यांसही नकार दिलेला आहे. त्यामुळे सदर ठेकेदाराच्या कार्यक्षमतेबाबत साशंकता निर्माण होत आहे.सदर ठेका हा ३ वर्ष दीर्घ मुदतीसाठी आहे.त्यामुळे मनपाच्या आर्थिक हिताचा विचार करणेही आवश्यक आहे. L१ यांना अनेक वेळा सादरीकरणासाठी समक्ष बोलवण्यात आले. तथापि ते प्रत्येक वेळी अनुपस्थित राहिले. त्यामुळे ते काम कशा पध्दतीने करणारआहेत याबाबतची माहिती या सभागृहास प्राप्त झाली नाही. तेव्हा शासन निर्णय व शासन नियम अटीप्रमाणे एल वन ठेकेदार सर्वोदय गो शाळा वर्धा यांची आलेले निविदा दर प्रति श्वान रु.८८०/- मात्र स्वीकारण्यास सद्यस्थितीत मान्यता देण्यांत येत आहे तथापि L १ यांचे एकंदर प्रतिसाद पाहता त्यांना सात दिवसात करारनामा करुन देणे व काम सुरु करण्यांचे प्रशासनाने शासन निर्णयाप्रमाणे स्वत:च्या जबाबदारीवर संबंधितांना करारनामा करुन देण्यांचे निर्देश देण्यांत यावेत. व 7 दिवसांच्या मुदतीत L१ यांनी काम सुरु केले नाही तर सदर काम हे अत्यावश्यक सेवेतील असल्याने व शहरामध्ये कुत्रयांची प्रचंड समस्या निर्माण झालेली असल्याने सदर कामाची तात्काळ आवश्यकता पाहता 7 दिवसांत L१ यांनी करारनामा करुन काम सुरु न केल्यास प्रशासनाने कामाचे अत्यावश्यक स्वरुप पाहता पर्यायी व्यवस्था म्हणून L२ यांचा विचार करण्यासाठी स्थायी समितीपुढे तात्काळ सादर करावे.

सुचक :- श्री. नवले शितल मोहन, सभापती, स्थायी समिती

अनुमोदक:- श्री. खान मोहम्मद साबीर मुहिबुल्लाह **सर्वानुमते मंजुर,**

सही/-xxx

**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

**विषय क्रमांक:-१९५** धुळे महानगरपालिकेतील मानधनावरील सर्व अधिकारी / कर्मचारी यांच्या मानधनात वाढ करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.प्रतिभाताई चौधरी मी ४/०६/२०२१ ला पत्र दिले आहे.मानधनावरील कर्मचाऱ्यांना किमान वेतन कायद्यानुसार वेतन अदा करण्यात यावे. धुळे मनपात वेगवेगळया पदांवर मानधन कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली आहे. सदर कर्मचाऱ्यांना मिळणारे मानधन दैनंदिन खर्च भागवणे अतिशय कठीण होत आहे. कोरोना सारखी गंभीर परिस्थिती असतांना आपण कर्मचाऱ्यांना कमी मानधनावर काम करुन घेत आहोत. कमी पगारामुळे कर्मचाऱ्यांना वेगवेगळया अडचणींना सामोरे जावे लागत असते. कर्मचारी विवाहीत असेल तर कमी मानधनात त्यांना संसार खर्च भागविणे अशक्य होत असते. आपण हा विषय घेतला त्याबद्दल तुमचे अभिनंदन करते. कर्मचाऱ्यांना किमान वेतनानुसार त्यांना १५ ते १६ हजार मिळायला हवे. असे मी आपणांस सूचविते ७ व्या वेतन अयोगानुसार कायम कर्मचाऱ्यांच्या वेतनात वाढ झाली मात्र हे मानधनावरील कर्मचाऱ्यांना कमीत कमी १५ ते १६ हजार मिळावे अशी विनंती करते.

म.नागसेन बोरसे हे जे कर्मचारी आहे. हे प्रामाणिकपणे काम करत असतात. आपल्याकडील आस्थापनावरील कर्मचारी बरेचशे रिटायर्ड झाले. व्हॉल्वमन आपल्याकडे १० ते १२ वर्षापासून काम करत आहे. त्यांना फक्त रुपये८,०००/- मानधन आहे.माझी विनंती की त्यांचे रुपये ६,०००/-मानधन वाढवावे. ज्या अंगणवाडी सेविका आहे त्या ऑफिस स्टाफ मध्ये काम करत आहे. त्यांना रुपये ४,५००/- मानधन आहे त्यांच्याही मानधनात वाढ करण्यात यावी.ज्यांचे मानधन रुपये २०,०००/-पर्यंत आहे. त्यांच्याच मानधनात वाढ करावी. ज्यांचे मानधन रुपये २०,०००/-च्या पुढे आहे त्यांच्या मानधनात वाढ करण्याची आवश्यकता नाही. आणि विषय मंजूर करण्यात यावा. दिवाळीचा सण येत आहे त्यांचे पगार लवकरात लवकर करायला सांगावे.

म.हर्षकुमार रेलन कर्मचाऱ्यांचे पगार वाढ करायलाच हवे. अल्प मानधनात ते कर्मचारी काम करत आहेत पण आपल्या उत्पन्नात किती वाढ झाली त्या अनुषंगाने विचार करावा. आपण अजूनही मालमत्ता कराच्या वसुलीत मागे आहोत.

म.सभापती आपले उत्पन्न ११० कोटी पर्यंत जाणार आहे. आपल्या हद्दवाढच्या नोटीसा वाटप झाल्या आहे. हद्दवाढ मध्ये आपले उत्पन्न ३.५ ते ३.७५ कोटी इतके होते. ते आता १७ कोटी वर जाणार आहे. तसेच आता देवपूरच्या नोटीसा काढल्या आहे. देवपूरचे १० ते १२ कोटी होते ते ४० कोटीवर गेले आहे. सन्मा. सर्व सदस्यांचे मत आपण जाणून घेतले आहे. हे सभागृह पूर्णपणे कर्मचाऱ्यांच्या बाबतीत सकारात्मक आहे.आपण मनपाची आर्थिक स्थिती पाहता किमान वेतन कायदयाप्रमाणे मानधन अदा करणे शक्य होणार नाही तथापि वाढती महागाई लक्षांत घेता कर्मचा-यांचा जिवनस्तर उंचविणेसाठी याबाबत मध्यम पर्याय म्हणून या मानधन कर्मचा-यांच्या मानधनात सन्मानजनक वाढ करणे गरजेचे आहे. आपल्या सर्वाच्या सहमतीने ज्या मानधनावरील कर्मचा-यांचे मानधन रुपये २०,०००/- च्या आंत आहे अशा मानधन कर्मचा-यांच्या मानधनात वाढ करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २०९ दिनांक ०६/१०/२०२२**

संदर्भिय क्रं.१ नुसार दि.२०/९/२०२२ रोजीच्या मे स्थायी समितीच्या सभेमध्ये मा सभापती सो. यांनी धुळे महानगरपालिकेतील मानधनावरील सर्व अधिकारी /कर्मचारी यांच्या मानधनात वाढ करणेबाबत निर्देश दिलेले आहे.

तसेच संदर्भीय क्र. २ अन्वये मा. आयुक्त सो. यांच्या दालनात मा.सभापती सो.यांनी पुनश्च: मानधनावरील कर्मचारी यांच्या मानधनात वाढ करणेबाबतचा विषय तात्काळ दि.६/१०/२०२२ रोजीच्या मे.स्थायी समितीच्या सभेमध्ये घेण्याबाबत निर्देश दिलेले आहे.

धुळे महानरगपालिकेतील कर्मचा-यांना मानधन वाढ करण्यासाठी सन २०२२-२३ च्या अंदाजपत्रकात मानधन कर्मचारी यांच्या खर्चावर रक्कम रु. ८०,००,०००/- मात्रची तरतुद केलेली आहे.तरी सदरचा विषय धोरणात्मक असल्याने मे.स्थायी समितीपुढे सादर करण्या बाबत नमुद केलेले आहे. त्यानुसार मा.आयुक्त यांनी सदर प्रस्ताव मे स्थायी समितीच्या समोर सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने मनपाची आर्थिक स्थिती पाहता किमान वेतन कायदयाप्रमाणे मानधन अदा करणे शक्य होणार नाही तथापि वाढती महागाई लक्षांत घेता कर्मचा-यांचा जिवनस्तर उंचविणेसाठी याबाबत मध्यम पर्याय म्हणून या मानधन कर्मचा-यांच्या मानधनात सन्मानजनक वाढ करणे गरजेचे आहे.सर्वांच्या सहमतीने ज्या मानधनावरील कर्मचा-यांचे मानधन रुपये २०,०००/- पर्यत आहे अशा मानधन कर्मचा-यांच्या मानधनात खालील प्रमाणे वाढ करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

| सदयस्थितीत मानधनावर कार्यरत असलेले कर्मचारी यांचा तपशिल | | | | |
|---|---|---|---|---|
| **अ क्र** | **पदाचे नाव** | **संख्या** | **सद्यस्थितीत असलेले मानधन** | **मे.स्थायी समितीने प्रस्तावित केलेली मानधन वाढ** |
| १ | कनिष्ठ अभियंता | ११ | २०,००० | ३००० |
| २ | संगणक लिपीक | २४ | १०,००० | ५००० |
| ३ | वाहन चालक | १५ | १२,००० | ३५०० |
| ४ | स्वच्छता निरीक्षक | २ | १२,००० | ३५०० |
| ५ | गाळणी चालक | ६ | ८००० | ६००० |
| ६ | गाळणी निरीक्षक | ३ | ८००० | ६००० |
| ७ | पंप ऑपरेटर | १० | ८००० | ६००० |
| ८ | फीटर | १ | ८००० | ६००० |
| ९ | विजतंत्री | ६ | ८००० | ६००० |
| १० | औषध निर्माता | ३ | १२,२०० | ३५०० |
| ११ | ए एन एम | ८ | १२,००० | ३५०० |
| १२ | स्टॉफ नर्स | ३ | १५७०० | ३३०० |
| १३ | व्हॉलमन | १७ | ८००० | ६००० |
| १४ | दाई | २ | ८००० | ५००० |
| १५ | बालवाडी शिक्षीका (मनपाकडे वर्ग) | ५ | ८००० | ५००० |
| १६ | बालवाडीमदतनीस (मनपाकडे वर्ग) | ५ | ४२५० | ५००० |
| १७ | हददवाढ गावातील कर्मचारी (वर्ग३) | २४ | १०,००० ते १०,५०० | ३५०० |
| १८ | हददवाढगावातील कर्मचारी (वर्ग४) | ४६ | ८००० | ५००० |

सदर प्रस्तावित मानधन दर वाढ दिनांक १ ऑक्टोबर, २०२२ पासून लागु करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे. याबाबत सुधारीत अंदाजपत्रकात मानधनवाढीची आवश्यक ती तरतूद संबंधित विभागाने करण्याबाबत दक्षता घ्यावी. सुचक:- श्री. बोरसे नागसेन दामोदर

अनुमोदक:- सौ. चौधरी प्रतिभाताई शिवाजीराव **सर्वानुमते मंजुर,**

सही/-xxx

**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

# धुळे महानगरपालिका,धुळे

## नगरसचिव कार्यालय

## स्थायी समिती सभा क्रमांक २५ चे इतिवृत्त

---

**धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह**
**गुरुवार दिनांक २०/१०/२०२२**
**वेळ सकाळी ११-०० वाजतां**

धुळे महानगरपालिकेची स्थायी समितीची साप्ताहिक सभा क्रं.२५ आज गुरुवार दिनांक २०/**१०/२०२२** रोजी सकाळी ११-०० वाजतां श्री.शितल मोहन नवले, सभापती, स्थायी समिती, मनपा धुळे यांच्याअध्यक्षतेखाली **धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृहात** भरली. या सभेस खालील सन्मा.सदस्य हजर होते.

| अ.क्रं. | सदस्यांचे नांव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री.नवले शितल मोहन | सभापती |
| २ | श्री. बोरसे नागसेन दामोदर | सदस्य |
| ३ | श्रीमती कुलेवार किरण राकेश | सदस्या |
| ४ | श्रीमती वराडे वैशाली भिकन | सदस्या |
| ५ | श्री.जाधव बन्सीलाल माणिक | सदस्या |
| ६ | श्रीमती चौधरी मंगला अर्जुन | सदस्या |
| ७ | श्री.अन्सारी फातमा नुरुल अमीन | सदस्या |
| ८ | श्री. चौधरी नरेंद्र रुपला | सदस्य |
| ९ | श्रीमती चौधरी प्रतिभा शिवाजीराव | सदस्या |
| १० | श्री. अहिरराव किरण हरिश्चंद्र | सदस्य |
| ११ | श्री.अन्सारी अब्दुल लतीफ अब्दुल हमीद | सदस्य |
| १२ | श्री.खान मोहम्मद साबीर मुहिबुल्लाह | सदस्य |
| १३ | श्रीमती पठाण नाजियाबानो नासिर खा | सदस्या |

**उपस्थित अधिकारी गण**

| अ.क्रं. | अधिकाऱ्यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. नितीन कापडणीस | अति.आयुक्त |
| २ | डॉ. श्रीमती संगिता नांदुरकर | उपायुक्त |
| ३ | श्री. विजय सनेर | उपायुक्त |
| ४ | श्री. मनोज अरविंद वाघ | नगरसचिव |
| ५ | श्री. गजानन पाटील | मुख्य लेखाधिकारी |
| ६ | डॉ. श्री.एम.आर. शेख | प्र.आरोग्याधिकारी |
| ७ | श्री. लक्ष्मण पाटील | सहा.आरोग्याधिकारी |
| ८ | श्री. राजेश वसावे | सहा. आरोग्याधिकारी |
| ९ | श्री. विकास साळवे | मलेरिया पर्यवेक्षक |
| १० | श्री.संजय मोरे | प्र.कार्यालय अधिक्षक |

| | | |
|---|---|---|
| ११ | श्री. किशोर सुडके | प्र.परवाना अधिक्षक तथा बाजार विभाग प्रमुख |
| १२ | श्री. एन.के. बागुल | विद्युत अभियंता |
| १३ | श्री. आर. आर.गायकवाड | लेखापाल मनपा शि.मंडळ |
| १४ | श्री. पी.डी. चव्हाण | ओव्हरसिअर बांधकाम |
| १५ | श्री. सी.एम. उगले | ओव्हरसिअर पा. पु. विभाग |
| १६ | श्री. हेमंत पावटे | ओव्हरसिअर बांधकाम |
| १७ | श्री. शिरीष जाधव | निरीक्षक, मालमत्ता कर विभाग |
| १८ | श्री. मधुकर निकुंभे | निरीक्षक, मालमत्ता कर विभाग |
| १९ | श्री. सुक्राम राऊत | वाहन विभाग |

म. सभापती — सन्मा.सदस्य मा.अति.आयुक्त सो.सर्व अधिकारी कर्मचारी व पत्रकार,छायाचित्रकर बांधव यांचे मी स्थायी समितीच्या बैठकीत स्वागत करतो.सभेचा कोरम पुर्ण झाला असुन नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरु करावे.

म. नगरसचिव — वंदे मातरम् या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

**सभेच्या सुरुवातीस सन्मा.सभापती यांचेकडून आलेली श्रध्दांजली ची यादी**

धुळे महानगरपालिकेचे शहर अभियंता श्री.कैलास नरहर शिंदे यांच्या मातोश्री तथा भोले बाबा परिवाराच्या ज्येष्ठ साधक सौ. प्रमिलाबाई नरहर शिंदे यांचे दि.१५/१०/२०२२ रोजी वृध्दापकाळारने दु:खद निधन झाले.

तसेच धुळे महानगरपालिकेच्या कर मुल्य निर्धारण व कर संकलन अधिकारी श्रीमती पल्लवी शिरसाठ यांचे पिताश्री अविनाश काशिराम शिरसाठ यांचे दि.१५/१०/२०२२ रोजी अल्पशा आजाराने दु:खद निधन झाले.

तरी स्व. सौ. प्रमिलाबाई नरहर शिंदे तसेच स्व. अविनाश काशिराम शिरसाठ यांना आज रोजीच्या स्थायी समिती सभेमध्ये श्रध्दांजली वाहून तसा ठराव पारीत करण्यांत यावा ही विनंती

सुचक :- शितलकुमार मोहन नवले, सभापती , स्थायी समिती मनपा धुळे

२) धुळे महानगरपालिकेचे शहर अभियंता श्री.कैलास नरहर शिंदे साहेब यांच्या मातोश्री. सौ. प्रमिलाबाई नरहर शिंदे यांचे दि.१५/१०/२०२२ रोजी सकाळी १०-३० वाजतां दु:खद निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, तीन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. परमेश्वर चरणी प्रार्थना त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो.

सुचक :- सौ. प्रतिभाताई शिवाजीराव चौधरी,

म. सभापती — वरील यादीनुसार मान्यवरांना श्रध्दांजली समर्पित करणेसाठी दोन मिनिटे मौन उभे रहावे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २१० दिनांक २०/१०/२०२२**

सन्मा.सभापती व सदस्या यांच्या यादीनुसार धुळे महानगरपालिकेचे शहर अभियंता श्री. कैलास नरहर शिंदे यांच्या मातोश्री तथा भोले बाबा परिवाराच्या ज्येष्ठ साधक सौ.प्रमिलाबाई नरहर शिंदे यांचे दि. १५/१०/२०२२ रोजी वृध्दापकाळारने दु:खद निधन झाले.

तसेच धुळे महानगरपालिकेच्या कर मुल्य निर्धारण व कर संकलन अधिकारी श्रीमती पल्लवी शिरसाठ यांचे पिताश्री अविनाश काशिराम शिरसाठ यांचे दि.१५/१०/२०२२ रोजी अल्पशा आजाराने दु:खद निधन झाले.

वरील मान्यवरांचे दु:खद निधनामुळे या सभेस आतीव दु:खद होत आहे ही सभा त्यांचे कुटुंबियांचे दु:खात सहभागी असून मृतआत्म्यास चिरशांती प्रदानार्थ दोन मिनिटे मौन उभे राहून भावपूर्ण श्रध्दांजली समर्पित करण्यांत येत असून तसा शोक पारीत करण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

धुळे महानगरपालिकेत श्री. विजय रघुनाथ सनेर यांची उपायुक्त पदी नियुक्ती झालेली आहे त्यांचे प्रथमच स्थायी समिती सभेत आगमन झालेले आहे. त्यांचे मा.सभापती सो.यांचे हस्ते बुके देऊन स्वागत करण्यांत आले.

विषय क्रमांक :- १९६ — मागील स्थायी समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे. (दि.८/९/२०२२ व २९/९/२०२२)

| | |
|---|---|
| म. नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले. |
| म.नागसेन बोरसे | इतिवृत्त वाचून कायम करावे. |
| म.सभापती | मागील स्थायी समिती सभेचे इतिवृत्त क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे. |

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २११ दिनांक २०/१०/२०२२**

मागील स्थायी समिती दि. ८/९/२०२२ ची तहकूब सभा व दि.२९/९/२०२२ चे धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १६७ ते १८८अखेर तसेच सभेत झालेली चर्चा व त्यावरील निर्णय क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

| | |
|---|---|
| विषय क्रमांक:- १९७ | मा.आयुक्त सो. यांनी त्यांचे आलेल्या अधिकारात रुपये ५ लाख ते २५ लाखापर्यंत बांधकाम विभागा कडील विकास कामाची यादी प्रकरण ७ (ड)अन्वये दि.२०/०९/२०२२ ते दि. १२/१०/२०२२अखेर निर्गमित केलेल्या कार्यादेशाची यादी अवलोकनासाठी मे.स्थायी समिती पुढे सादर. |
| म. नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले. |
| म.किरण अहिरराव | विषयाचे अवलोकन करण्यांत आले आहे. |
| म. सभापती | म.आयुक्त सो. यांनी त्यांचे आलेल्या अधिकारात रुपये ५ लाख ते २५ लाखापर्यत बांधकाम विभागाकडील विकास कामाची दि. २०/०९/२०२२ ते दि. १२/१०/२०२२ अखेर निर्गमित केलेल्या कार्यादेश अवलोकन करण्यांत आले. |

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २१२ दिनांक २०/१०/२०२२**

मा.आयुक्त सो. यांनी त्यांचे आलेल्या अधिकारात रुपये ५ लाख ते २५लाखापर्यंत बांधकाम विभागाकडील विकास कामाची यादी प्रकरण ७(ड)अन्वये दि.२०/०९/२०२२ते दि.१२/१०/२०२२ अखेर निर्गमित केलेल्या कार्यादेशाची यादी अवलोकनार्थ सादर.

**धुळे महानगरपालिका धुळे**

**(बांधकाम विभाग)**

**दिनांक :- दि.२०/०९/२०२२ ते दि.१२/१०/२०२२ अखेर निर्गमित केलेल्या विकास कामांच्या कार्यादेशची यादी**

| अ. क्र | कार्यादेश क्रमांक | दिनांक | कामांचे नाव | रक्कम | निधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | २५५ | २०/०९/२०२२ | स्नेह नगर भागातील डॉ.मनोज जगताप यांचे घरापासुन ते ग्रीन पार्क येथे गटारी करणे. | ११९५९९८ | महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान जिल्हास्तर योजना अंतर्गत सन २०२१-२२ |
| २ | २५६ | २०/०९/२०२२ | प्र.क्र.१४ मध्ये संतोष अग्रवाल यांचे घरापासून ते अभयनगर बोर्डा पावेतो रस्ता डांबरीकरण करणे. | १९९५२०९ | महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान जिल्हास्तर योजना अंतर्गत सन २०२१-२२ |
| ३ | २५७ | २०/०९/२०२२ | प्र.क्र.१० मध्ये जुनी भिलाटी येथील घरकुल योजनेमधील जागेत सभागृह बांधणे स.नं.३६ | १९८९८५२ | महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान जिल्हास्तर योजना अंतर्गत सन २०२१-२२ |
| ४ | २५८ | २०/०९/२०२२ | प्र.क्र.१० मध्ये सुपडू आप्पा कॉलनी येथील गुमान बाबा मन्दिर ते पश्चिम म्हसोबा मंदिर पर्यंत अंडर ग्राउंड ड्रेनेज लाईन टाकणे. | ८७८८९९ | महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान जिल्हास्तर योजना अंतर्गत सन २०२१-२२ |
| ५ | २५९ | २०/०९/२०२२ | प्र.क्र.१८ मध्ये चक्करबर्डी रोड ते शेखर फोटो स्टुडीओ पर्यंत तसेच चक्करबर्डी रोड ते प्रभाकर बाग यांचे घरापर्यंत रस्ता कॉंक्रीट करणे. | १७९८५१२ | नागरी दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत सन २०२१-२२ |
| ६ | २६१ | २०/०९/२०२२ | प्र.क्र.१८ मध्ये वरचेगाव भागात हसरत बाग यांचे घरापासून ते अशोक शिंदे यांचे घरापर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | १४९४५३२ | नागरी दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत सन २०२१-२२ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ७ | २६२ | २०/०९/२०२२ | प्र.क्र.१६ मध्ये श्री. संतोषभाऊ खताळ नगरसेवक यांचे निधीतून राहुल याज्ञिक घर ते राजू लांडगे घरापावेतो रस्ता कॉंक्रीट करणे. | ११५०२५३ | मनपा निधी (नगरसेवक निधी) अंतर्गत सन २०२१-२२ |
| ८ | २६३ | २०/०९/२०२२ | प्र.क्र.१६ मध्ये श्री. संतोषभाऊ खताळ नगरसेवक यांचे निधीतून राजू लांडगे घर ते निकम घर ते कुलकर्णी घरापावेतो बंदिस्त गटार करणे. | ५५०१४१ | मनपा निधी (नगरसेवक निधी) अंतर्गत सन २०२१-२२ |
| ९ | २६४ | २०/०९/२०२२ | प्र.क्र.१६ मध्ये साईकृपा सोसा.कृष्ण ज्वेलर्स ते धारपुर सर यांच्या घरापावेतो रस्ता कॉंक्रीट व गटार करणे.(फेर निविदा) | २४९७६४८ | महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान जिल्हास्तर योजना अंतर्गत सन २०२१-२२ |
| १० | २६५ | २०/०९/२०२२ | प्र.क्र.१० मध्ये जलाराम मंदिर श्री.गोविंद सोनी ते कनु शेठ गांधी, श्री.प्रल्हाद शेठ कापडणेकर यांचे घरापर्यंत रस्ता कॉंक्रीट करणे. | १९९९७५९ | महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान जिल्हास्तर योजना अंतर्गत सन २०२१-२२ |
| ११ | २६६ | २०/०९/२०२२ | प्र.क्र.१६ मध्ये छत्रपती राजे चौक ते वाकळे यांचे घरापर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण व गटार करणे. | १४९९८०५ | नागरी दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत सन २०२१-२२ |
| १२ | २७३ | २१/०९/२०२२ | प्र.क्र.१० मध्ये अशोक धात्रक ते रंजनाबाई चौधरी यांचे घरापावेतो रस्ता डांबरीकरण करणे. | २४९१५९३ | महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजने अंतर्गत सन २०२१-२२ |
| १३ | २७४ | २१/०९/२०२२ | प्र.क्र.१० मध्ये बडगुजर प्लॉट श्वास हॉस्पिटल ते पाटील अगरबत्ती वाले यांचे घरापावेतो रस्ता डांबरीकरण करणे. | २४९९७६९ | महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजने अंतर्गत सन २०२१-२२ |
| १४ | २७५ | २१/०९/२०२२ | प्र.क्र.१५ मध्ये साई एकता कॉलनी तील मोरे यांचे घरापासुन ते गायकवाड यांच्या घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | ९९९८१२ | भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजना सन २०२२-२३ अंतर्गत |
| १५ | २७६ | २१/०९/२०२२ | प्र.क्र.१५ मध्ये कालिका देवी नगरातील वाघ यांचे घरापासून ते पवार यांच्या घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | ९९५३७५ | भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजना सन २०२२-२३ अंतर्गत |
| १६ | २७७ | २१/०९/२०२२ | प्र.क्र.१८ मध्ये वरचे गाव दामोदर नगर भागात लोटन ठाकूर यांचे घरापासून ते युवराज शिंदे यांचे घरापर्यंत बंदिस्त गटार व रस्ता कॉंक्रीट करणे. | १९९९१८८ | नागरी दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत सन २०२१-२२ |
| १७ | २७८ | २१/०९/२०२२ | प्र.क्र.१७ मध्ये शिवशक्ती कॉलनी श्री.विठ्ठल पवार ते श्री.शांताराम पाटील ते श्री.रवी जोशी ते रंगारी चाळ पावेतो आर.सी.सी. गटार करणे. | १२४८८६६ | महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजने अंतर्गत सन २०२१-२२ |
| १८ | २८० | २१/०९/२०२२ | प्र.क्र.१० मध्ये माऊली नगर येथे लक्ष्मण बडगुजर ते दीपक माळी रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | १६५१७३३ | नागरी दलीतेत्तर वस्ती सुधार योजना अंतर्गत सन २०२१-२२ |
| १९ | २८१ | २१/०९/२०२२ | प्र.क्र.७ मध्ये नगरोत्थान योजने अंतर्गत संत गाडगेबाबा मठापासून ते राकेश परदेशी घरापावेतो रस्ता कॉंक्रीट करणे. | १९९७५१५ | महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजने अंतर्गत सन २०२१-२२ |
| २० | २८२ | २१/०९/२०२२ | प्र.क्र.१५ मध्ये अरुण कुमार वैद्य नगर येथील सैंदाणे यांच्या घरापासून ते वानखेडे यांच्या घरापर्यंत डांबरी रस्ता तयार करणे. | ९९९८१२ | भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजना सन २०२२-२३ अंतर्गत |
| २१ | २८३ | २१/०९/२०२२ | प्र.क्र.१७ मध्ये रंगारी चाळ भागात पेव्हिंग ब्लॉक बसविणे. | ५७७२१० | नगरसेवक निधी अंतर्गत सन २०२२-२३ |
| २२ | २८४ | २१/०९/२०२२ | प्र.क्र.४ मध्ये मसूद खान यांच्या घरापासून ते श्री.रवी वाघ यांच्या घरापर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | २४९३६५२ | नागरी दलित वस्ती सुधार योजना सन २०२१-२२ अंतर्गत |
| २३ | २८५ | २१/०९/२०२२ | प्र.क्र.९ मध्ये पारोळा रोड श्री.राजू पाठक यांचे घरापासुन ते नगरपट्टी जैन साडी पावेतो एक साईड बंदिस्त गटार करणे. | १९७४२४९ | महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजने अंतर्गत सन २०२१-२२ |
| २४ | २८७ | २१/०९/२०२२ | प्र.क्र.४ मध्ये संदीप पगारे यांच्या घरापासून ते विलास चत्रे यांच्या घरापर्यंत रस्ता कॉंक्रीटी करण करणे. | २४९४३०२ | नागरी दलित वस्ती सुधार योजना सन २०२१-२२ अंतर्गत |
| २५ | २८८ | २१/०९/२०२२ | प्र.क्र.४ मध्ये श्याम जगदेव यांचे घरापासुन ते उत्तर मुखी मारोती मंदिरा पावेतो ते रामराजे अप्पा यांचे घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | १९९१६३१ | नागरी दलित वस्ती सुधार योजना सन २०२१-२२ अंतर्गत |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २६ | २८९ | २१/०९/२०२२ | प्र.क्र.१७ मध्ये श्री.अमोल मासोळे नगरसेवक निधीतुन सेवादास नगर येथील श्रीकृष्ण मंदिर येथील ओपनस्पेसला पेव्हिंग ब्लॉक बसविणे. | ८७२१६६ | मनपा निधी अंतर्गत (नगरसेवक निधी) सन २०२२-२३ |
| २७ | २९० | २१/०९/२०२२ | प्र.क्र.९ मध्ये आग्रारोड मागील बोळ चत्रभुज नानजी ते नितीन बंग यांच्या घरापावेतो रस्ता कॉंक्रीट करणे. | १९९४७७० | महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजने अंतर्गत सन २०२१-२२ |
| २८ | २९१ | २३/०९/२०२२ | प्र.क्र.१२ मध्ये वडजाई रोड अतिक हार्डवेअर दुकानापासुन ते शफिक शेठ यांचे घरापर्यंत कॉंक्रीट रस्ता तयार करणे. | २३८५७८२ | मुलभुत सोईसुविधांचा विकास योजने अंतर्गत सन २०२०-२१ |
| २९ | २९२ | २९/०९/२०२२ | प्र.क्र.११ मध्ये शांती नगर येथे श्री.प्रवीण चौधरी यांच्या घरापासुन ते ५० खोली ओपन स्पेस पर्यंत रस्ता कॉंक्रीट करणे. | १४९६८६८ | आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत सन २०२२-२३ |
| ३० | २९३ | २९/०९/२०२२ | प्र.क्र.८ मध्ये माधवपुरा येथे जाकीर अन्सारी ते साजिद खानसा व नियाज यांचे घर ते जिलानी यांचे घरापर्यंत रस्ता कॉंक्रीट करणे. | १७०५१२० | मनपा निधी (नगरसेवक निधी) अंतर्गत सन २०२१-२२ |
| ३१ | २९५ | ३०/०९/२०२२ | प्र.क्र.१६ मध्ये दक्षता हौ.सो.भागात श्री.नाना महाजन यांचे घरापासुन ते श्री.नंदू देवरे यांचे घरापर्यंत तसेच श्री.मोरे ते चव्हाण श्री.सोनार ते नंदू देवरे यांचे घरापर्यंत बंदिस्त पाईप गटार करणे. | १९९९४७४ | नागरी दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत सन २०२१-२२ |
| ३२ | २९६ | ३०/०९/२०२२ | प्र.क्र.१० मध्ये इंदिरा नगर भागात श्री.बापू पाटील यांचे घरापासुन ते श्री.मोहन भिल घरापर्यंत रस्ता कॉंक्रीट करणे. | २४५००९८ | महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजने अंतर्गत सन २०२१-२२ |
| ३३ | २९७ | ३०/०९/२०२२ | प्र.क्र.१४ मध्ये पवन नगर हुडको भागात परदेशी यांच्या घरापासुन ते भूषण वाणी शेवतकर यांच्या घरापासून ते गाडे यांचे घरापावेतो अंडरग्राउंड बंदिस्त गटार करणे. | २४९९८१३ | महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजने अंतर्गत सन २०२१-२२ |
| ३४ | २९८ | ३०/०९/२०२२ | प्र.क्र.१० मध्ये गौरव वाणी यांच्या घरापासुन ते जयवंत दुसाने ते दगडो गली ते संतोष भोई घर ते सतीष घुगे यांच्या घरापावेतो रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | २००३०३१ | नागरी दलितेत्तर वस्ती सुधार योजना अंतर्गत सन २०२१-२२ |
| ३५ | २९९ | ३०/०९/२०२२ | श्री.फारूक अन्वर शाह, आमदार धुळे शहर यांचे निधीतुन पंचशील स्तंभ बोर्डा पासुन ते पारिजात कॉलनी बोर्डा पावेतो रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | १९९९१७२ | आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत सन २०२२-२३ |
| ३६ | ३०० | ३०/०९/२०२२ | श्री.फारूक अन्वर शाह, आमदार धुळे शहर यांचे निधीतुन भरत नगर भागात श्री.विकास बोरसे घर ते शिवतीर्थ बंगल्या पावेतो रस्ता कॉंक्रीट करणे. | १४९९३५९ | आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत सन २०२२-२३ |
| ३७ | ३०२ | ०६/१०/२०२२ | श्री.फारूक अन्वर शाह, आमदार धुळे शहर यांचे निधीतुन शास्त्री नगर भागात श्री.उकरे घर ते परदेशी घर तसेच मनोहर राजपूत ते आचाव घरापावेतो रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | १३९८६९१ | आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत सन २०२२-२३ |
| ३८ | ३०५ | १२/१०/२०२२ | प्र.क्र.३ मध्ये लाला सरदार नगर भागात जोगेश्वरी प्रोव्हिजन पासुन ते दातार मेडिकल पावेतो रस्ता डांबरीकरण करणे. | १२४८२७१ | महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजने अंतर्गत सन २०२१-२२ |
| ३९ | ३०७ | १२/१०/२०२२ | प्र.क्र.१४ मध्ये श्री.अनिल लाडे यांचे घरापासून ते श्री.भगवान शेळके यांचे घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | ९९६६५२ | खासदार स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रम अंतर्गत सन २०२२-२३ |
| ४० | ३०८ | १२/१०/२०२२ | प्र.क्र.१ मध्ये तिरुपती नगर भागात तिरुपती नगर बोर्डा पासुन ते श्री.हेमंत पाटील यांच्या घरापावेतो रस्ता डांबरीकरण करणे. | १२४६२९२ | महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजने अंतर्गत सन २०२१-२२ |
| ४१ | ३०९ | १२/१०/२०२२ | प्र.क्र.६ मध्ये श्रीनाथ नगर बोर्ड ते एल.के.कदम यांच्या घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | २४९०८५९ | हद्दवाढ क्षेत्र उत्पन्न निधी अंतर्गत |
| ४२ | ३१० | १२/१०/२०२२ | प्र.क्र.१३ मध्ये मोहम्मदीया मस्जिद जवळ व आसिफ सर यांच्या घराजवळील रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | १९९८७२२ | नगरसेवक निधी (मनपा निधी) अंतर्गत सन २०२२-२३ |
| ४३ | ३११ | १२/१०/२०२२ | प्र.क्र.६ मध्ये श्रीनाथ नगर बोर्ड ते एल.के.कदम यांच्या घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | २४९०८५९ | हद्दवाढ क्षेत्र उत्पन्न निधी अंतर्गत |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४४ | ३१२ | १२/१०/२०२२ | प्र.क्र.१ मध्ये देंवणकर नगर भागात गोवाजी थोरात यांच्या घरापासून ते अमृत सागर यांच्या घरापर्यंत सिमेंट काँक्रीट करणे. | १९९५२९८ | नागरी दलित वस्ती सुधार योजना सन २०२१-२२ अंतर्गत |

सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- १९८ धुळे महानगरपालिका अग्निशामक विभागाकडील वाहन क्र.एम.एच. १८जी.०२५९अत्यावश्यक सेवेतील अग्निशामक वाहन दुरूस्ती खर्च₹.१२९४२/-मात्रच्या खर्चास महाराष्ट्र मनपा अधिनियमातील अनुसूची ड प्रकरण ५(२) (२) नुसार कार्योत्तर मंजुरी देणेबाबत विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.नागसेन बोरसे सद्या दिवाळीचे दिवस सुरु आहे या दिवसांत आग लागण्याचे प्रमाण जास्त असते आणि आपल्या अग्निशामक विभागाची परिस्थिती अशी आहे की त्याला कोणी वाली नाही. आणि अग्निशामक गाडयांची परिस्थिती कोणी सांगू शकत नाही. जळगाव येथील कर्मचारी १५ दिवसांतून एकदा हजेरी लावतात. गेल्यावेळी मी बोललो होतो तेथे सी.सी. टी.व्ही. कॅमेरा बसवण्यात यावा त्यावरुन तरी लक्षात येईल कर्मचारी खरंच कामावर हजर आहेत का? तसेच आजपर्यंत फायर ऑडीट झालेले नाही. मोठी दुर्घटना झाल्यावर तुम्ही ऑडीट करणार आहात का? तसेच दुसरा विषय कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीचा होता. काही कर्मचारी सेवानिवृत्त होऊन जातील त्यांनी आपल्याला ३० ते ३५ वर्षे सेवा दिली त्यांना याचा लाभ मिळणार नाही. त्यांचे वेतनवाढ वाढले तर त्यांच्या पेन्शन मध्ये भर पडणार आहे.

म.सभापती २ दिवसांपूर्वी अति. आयुक्तांशी बोलणे झाले तेच या समितीचे प्रमुख आहे जे कर्मचारी हया महिन्यांत व पुढच्या महिन्यांत सेवानिवृत्त होत आहेत ते जरी सेवानिवृत्त झाले तरी त्यांना तो लाभ मिळणार आहे.

म.अति.आयुक्त दर २ दिवसाआड समितीची बैठक होत असतात.ही बैठक चालूच राहणार आहे.सगळयांना पदोन्नतीचा लाभ मिळणार आहे.जी तारीख निश्चीत झाली आहे,कर्मचारी सेवानिवृत्त झाले तरी त्यांना त्याचा लाभ मिळेल.

म. किरण अहिरराव विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती उपायुक्त यांनी आजच अग्नीशमन विभागातील कर्मचा-यांची बैठक लावावी. तसेच कर्मचा-यांच्या पदोननतीबाबत प्रशासनाने तात्काळ कार्यवाही करावी.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे

## धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २१३ दिनांक २०/१०/२०२२

धुळे म.न.पाअग्निशामक (सार्वजनिक सुरक्षितता) विभागाकडील अत्यावश्यक सेवेतील अग्निशामक वाहन एम.एच.१८जी.०२५९ वाहनांची दुरूस्ती करणेकामी टाटा अधिकृत वितरक-उज्वल ॲटोमोटिव्ह प्रा.लि.धुळे गेली असता वाहनांची दुरूस्ती करणे आवश्यक असल्याने प्रशासकीय व आर्थिक मंजुरी प्रक्रिया सुरू असताना नस्ती मंजुरीस उशीर होत असल्याने उन्हाळयाचे दिवस असल्याने वारंवार आगीच्या घटनामुळे व अग्निशामक विभाग सध्या तिनच वाहन कार्यरत असल्याने सहा.अग्निशामक अधिकारी यांनी वाहनांची दुरूस्ती टाटा अधिकृत वितरक उज्वल ॲटोमाबाईल प्रा.लि. यांच्याकडून तातडीने करून घेतली

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम नुसार सदर खर्च रक्कम ₹.१२९४२/-मात्रला मा.आयुक्त सो यांना मंजुरीचे अधिकार आहेत.महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी नुसार अग्निशामक विभागाकडील वाहन क्र.एम.एच. १८ जी. ०२५९ अत्यावश्यक सेवेतील वाहन दुरूस्ती खर्च ₹.१२९४२/-मात्रच्या खर्चास प्रशासकीय, आर्थिक मंजुरी दिल्यानुसार व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार अनुसूची "ड" प्रकरण ५(२)(२)नुसार मे.स्थायी समितीकडेस सदर विषय कार्योत्तर मंजुरीसाठी सादर झालेला आहे.

सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास व झालेल्या खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे. तसेच सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी.याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.तसेच अग्नीशमन विभागाची तात्काळ बैठक आमच्या दालनात आयोजित करण्यांत यावी. तसेच सद्यस्थितीत कार्यरत व सेवानिवृत्त होत असलेल्या कर्मचा-यांना पदोन्नतीचा लाभ पूर्व लक्षी प्रभावाने देण्याबाबत प्रशासनाने तांतडीने कार्यवाही करावी.

सुचक :- श्री. चौधरी नरेंद्र रुपला
अनुमोदक:- श्री. अहिरराव किरण हरिश्चंद

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक:- १९९ | अग्निशामक विभागाकरीता फोम टेंडर बांधणी करीता जीईएम-पोर्टल चेसीस खरेदी वित्तीय लिफाफा (Financial Bid) उघडण्यात येऊन चेसीस किंमत ₹२२,००,०००/-बावीस लक्ष मात्र टाटा मोटर्स लिमीटेड यांचे दर मान्य होऊन मनपा अधिनियम ६७ (क) नुसार मा.आयुक्त सो यांनी पुरवठा आदेश देणेस मंजुरी दिल्यानुसार मे.स्थायी समितीकडेस मान्यता देणेबाबत विचार करणे. |
| म. नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले. |
| म.सभापती | या मध्ये कोण कोणत्या कामाचा समावेश आहे. |
| म. वाहन वि. प्र. | या मध्ये आपले चेसीस खरेदी करत आहोत.बॉडी खरेदीचा ठराव झालेला आहे.शासनाकडून प्राप्त झालेल्या रु.१६ लाख तसेच मनपाचा हिस्सा रु.५.८० लाख राहणार आहे. |
| म. नागसेन बोरसे | विषय मंजुर करण्यांत यावा. |
| म. सभापती | सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामास मान्यता देण्यांत येत आहे. |

## धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २१४ दिनांक २०/१०/२०२२

अग्निशामक विभागाकरीता फोम टेंडर बांधणी करीता चेसीस खरेदी करणेस अनुदान व्यतीरीक्त उर्वरीत खर्च ₹.५,४८,९९३/-मात्र मनपा निधीतून खर्च भागविणेस दिनांक: ३१/६/२०२० अन्वये कार्यालयीन टिपणी मंजुर करणेत आलेली आहे. तसेच दिनांक: ११/८/२०२० अन्वये ₹२१,६८,९९३/-मात्र चेसीस खरेदी करणेस मान्यता देण्यात आली आहे.

अग्निशामक योजना (जिल्हा वार्षीक योजना) अंतर्गत नविन अग्निशमन वाहन फोम खरेदी करणे करिता ₹.१,०१,६९,०००/- (अक्षरी-एक कोटी एक लक्ष ऐकोणसत्तर हजार) मात्र प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. प्रशासकीय मान्यता अटी व शर्ती क्र.३ नुसार जिल्हा वार्षीक योजनेतुन घेण्यात येणारी कामे दोन वर्षाच्या कालावधीत पुर्ण करणे आवश्यक राहील असे नमुद आहे. सदरील अनुदान मार्च २०२२ अखेर मनपाकडेस प्राप्त आहे. प्रशासकीय मान्यतेतील अट क्र.७ नुसार जास्तीचा खर्च मनपा धुळे यांचे फंडातुन करण्यात यावा असे नमुद आहे. त्यातील फोम टेंडर बांधणी करीता मे. स्थायी समिती ठराव नं.१५२ दिनांक:१४/१०/२०२१ अन्वये निधी ईर्न्टप्राईजेस, एल-I पुवठाधारक यांना फोम टेंडर बाधणी करणेस ₹.८५,०६,२५५/- मात्रचे कार्यादेश देण्यात आलेला आहे. जीईएम-पोर्टवरील चेसीस खरेदी पात्र पुरवठाधारक यांनी ₹.२२,०००००/- मात्र किंमत आलेली आहे. चेसीस खरेदी करणे कामी अपेक्षित खर्च जिल्हाधिकारी कार्यालयाकडुन प्रशासकीय मान्यता ₹.१६,२०,०००/मात्र दर्शीविण्यात आली आहे. त्यानुसार ₹.२२,०००००/- मधुन ₹.१६,२०,०००/- वजा केल्यास = ₹.५,८०,०००/- मात्रचे फरकातील रक्कम मनपा निधीतून करावा लागणार आहे. परंतु अनुदान ₹.१,०१,६९,०००/- प्राप्त आहे व फोम टेंडर बांधणी करीता (वजा) ₹.८५,०६,२५५/- मात्रची एल-I निविदाधारक पात्र झाला आहे त्यास कार्यादेश देण्यात आला आहे. अनुदानातून उर्वरीत रक्कम = ₹.१६,६२,७४५/- मात्र चेसिस खरेदी करणे कामी वापरल्यास चेसीस किंमत ₹.२२,०००००/- मधुन

उर्वरीत निधी ₹.१६,६२,७४५/- वजा केल्यास ₹.५,३७,२५५/- मनपा निधीतुन खर्च करावा लागणार आहे. तरी वरील पैकी उर्वरीत फरकातील रक्कम ₹.५,८०,०००/- किंवा ₹.५,३७,२५५/- यापैकी कोणती रक्कम मनपा निधीतून खर्च करावी यासाठी योग्य तो निर्णय होणे आवश्यक आहे. परंतु सदरील तरतुद स्पील ओव्हर मध्ये दर्शविण्यात आलेली नसल्यामुळे चेसीस खरेदी करणेस येणारा उर्वरीत खर्च सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात नविन वाहन खरेदी या तरतुदी मधुन भागविणेस मान्यता देणे योग्य राहील, असे नमुद आहे.

महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनाय यांनी अग्निशमन सेवेचे बळकटीकरण करण्याकरीता अग्निशमन वाहन चेसीस खरेदी करणे करीता तांत्रिक मान्यता येणे प्रमाणे दिलेली आहे.

| Sr.No. | Particulars | Quantity |
|---|---|---|
| 1 | Foam Tender on 16 ton GVW-TATA 1613-TATA LPT 1618 | 1No. |

तांत्रिक मान्यता येणेप्रमाणे दिलेली आहे परंतु TATA 1613-TATA LPT 1618 हे BS-4 या मानकांचे मॉडेल होते. या ऐवजी BS-6 मानंकाप्रमाणे TATA LPT 1918 सदरील मॉडेल चे साम्य आहे.

| Sr.No. | Particulars | Quantity |
|---|---|---|
| 1 | Foam Tender on 16 ton GVW-TATA LPT 1918 | 1No. |

त्यामुळे BS-6 मानंकाप्रमाणे TATA LPT 1918 या प्रकारातील मॉडेलचे चेसीस खरेदी करण्यात येत आहे.

अग्निशामक विभागाकरीता फोम टेंडर बांधणी करीता चेसीस खरेदी करणेस जीईएम-पोर्टल पुरवठाधारक –टाटा मोटर्स लिमीटेड प्राप्त निवीदाधारकाचे तांत्रिक निवीदा उघडण्यात आली.दिनांक:२०/७/२०२२ रोजीची वित्तीय लिफाफा उघडण्यात येऊन चेसिस-०१ किंमत ₹.२२,०००००/- मात्र प्राप्त झालेली आहे.

अग्निशामक विभागाकरीता फोम टेंडर बांधणी करीता जीईएम-पोर्टल वरील चेसीस खरेदी बाबत प्राप्त निविदेची वित्तीय लिफाफ्याची छाननी साठीच्या समितीच्या बैठकीत प्राप्त चेसीस किंमत किंमत ₹.२२,०००००/- व ट्रान्सपोर्ट खर्च ४० प्रति कि.मी अदा करणेस येणाऱ्या खर्चास निविदा समिती समोर किंमत योग्य असून ती स्विकारण्यास म.आयुक्त् सो यांना शिफारस करण्यास हरकत नाही . याप्रमाणे चेसीस खरेदी करणेस म.आयुक्त सो यांनी मंजुरी दिलेली आहे.

अग्निशामक विभागाकरीता फोम टेंडर वाहनांची बांधणी करीता जीईएम-पोर्टल वरील चेसीस खरेदी बाबत प्राप्त निविदेची वित्तीय लिफाफ्याची छाननी साठीच्या समितीच्या बैठकीत प्राप्त चेसीस किंमत ₹.२२,०००००/- मात्र मान्य होऊन म. आयुक्त सो यांनी मनपा अधिनियम ६७(क) नुसार असलेल्या अधिकारात पुरवठा आदेश देणेस मंजुरी दिल्यानुसार मे.स्थायी समितीकडेस मंजुरीस्तव सविनय सादर झालेला आहे.

सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून **अग्निशामक विभागा करीता फोम टेंडर बांधणी करीता चेसीस किंमत ₹ २२,००,०००/-बावीस लक्ष मात्र टाटा मोटर्स लिमीटेड यांचे दरास मनपा अधिनियम ६७(क) नुसार मान्यता देण्यांत येत आहे.** तसेच सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी.याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील. सुचक :- श्री. बोरसे नागसेन दामोदर

अनुमोदक:- श्री. अहिरराव किरण हरिश्चंद

**सर्वानुमते मंजुर,**

**सही/-x x x**

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- २०० हर घर तिरंगा अभियान अंतर्गत तिरंगा झेंडा खरेदी करणेस झालेल्या खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. साबीर शेठ — विषय मंजूर करण्यांत यावा.

म.बन्सीलाल जाधव — विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती — सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २१५ दिनांक २०/१०/२०२२**

हर घर तिरंगा अभियान अंतर्गत तिरंगा झेंडा खरेदी करणेत आलेले असुन झालेला खर्चास खालील प्रमाणे तपशिल सादर करणेत येत आहे.

| अ. क्रं. | पुरवठादाराचे नांव | प्रती नग झेंडा दर | एकुण खरेदी झेंड्यांची संख्या | रक्कम | जीएसटी | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पुजा जनरल स्टोअर्स | २४ | १५००० | ३६०००० | १८००० | ३७८००० |
| २ | युटेक्सटाईल्स.डी.ए. | २४ | १०००० | २४०००० | १२००० | २५२००० |
| ३ | सार्थकइंडस्ट्रीज (२०x३०) | २८ | १०००० | २८०००० | १४००० | २९४००० |
| ४ | पुजा जनरल स्टोअर्स | २४ | १०००० | २४०००० | १२००० | २५२००० |
| ५ | अमृत साडी सेंटर | २४ | ५००० | १२०००० | ६००० | १२६००० |
| ६ | पुजा जनरल स्टोअर्स | २४ | ५००० | १२०००० | ६००० | १२६००० |
| ७ | रुपाली टेक्सटाईल्स | २४ | ५००० | १२०००० | ६००० | १२६००० |
| ८ | राजेंद्र मधुकर भावसार | २४ | ५००० | १२०००० | ६००० | १२६००० |
| | | **एकुण** | **६५,०००** | **१६,००,०००** | **८०,०००** | **१६,८०,०००** |

तरी शासन मार्फत प्राप्त झेंडयाचा तपशिल खालील प्रमाणे

| **अ.क्र** | **प्राप्त झेंडे** | **वापर झेंडे** | **परत करावयाचे संख्या** | **रक्कम** |
|---|---|---|---|---|
| १. | ३५,००० | २१,६७० | १३,३३० | ४,५५,०७०/- |
| | | | **एकुण रक्कम** | **२१,३५,०७०/-** |

त्याकरीता खर्च **रू. १६,८०,०००/-** मात्र तसेच शासन मार्फत प्राप्त झेंडे खर्च **रू. ४,५५,०७०/-** असा एकुण खर्च **रू. २१,३५,०७०/-** मात्र करणेत आलेला आहे. धुळे महानगरपालिका ठराव नुसार खालील प्रमाणे निधी प्राप्त झालेला आहे.

| **अ.क्र.** | **जमा रक्कमेचा तपशिल** | **जमा रक्कम** |
|---|---|---|
| १ | रोखीने जमा नगरसेवक निधी | ९१,०००/- |
| २ | नगरसेवक मानधन कपात | ३,०२,१००/- |
| ३ | खांन्देश चार्टड Of MSBIRIA | ११,०००/- |
| ४ | सेंन्ट्रल बॅंक ऑफ इंडिया | ७,५००/- |
| ५ | मनपा कर्मचारी यांच्या पगारातुन कपात | ३,२६,०८४/- |
| ६ | मनपा अधिकारी यांच्या पगारातुन कपात | १४,००३/- |
| | **एकुण जमा रक्कम** | **७,५१,६८७/-** |

तरी वरील प्रमाणे एकुण **रू. ७,५१,६८७/-** मात्र निधी जमा झालेला आहे. तरी एकुण खर्च **रू. २१,३५,०७०/-** मात्र झालेला आहे. निधी स्वरूपात जमा रक्कम **रू. ७,५१,६८७/-** प्राप्त झालेली आहे. तरी उर्वरीत रक्कम **रू. १३,८३,३८३/-** मात्र धुळे म.न.पा. मधुन खर्च करणेत आलेला आहे.सदरचा प्रस्ताव कार्योत्तर मान्यतेसाठी मे.स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून हर घर तिरंगा अभियान अंतर्गत तिरंगा झेंडा खरेदी करणेस झालेल्या खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे. तसेच सदर

प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील. सुचक :- श्री. खान मोहम्मद साबीर मुहिबुल्लाह

अनुमोदक:- श्री. जाधव बन्सीलाल माणिक **सर्वानुमते मंजुर,**

**सही/-x x x**

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- २०१ प्र.क्र.०६ मधील सुयोग हौ.सोसा, व सुरज हौ. सोसा.,येथील वसावे घर ते तुळशीराम शिंदे घरापावेतो कॉक्रीट रस्ता व ड्रेनेज लाईन टाकणेचे एस्टीमेट रु. ७६,२५,९६७/- मात्र खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. किरण अहिरराव विषय मंजूर करण्यांत यावा.

म. नागसेन बोरसे विषय मंजूर करण्यांत यावा.

म. नरेंद्र चौधरी विषय मंजूर करण्यांत यावा. मात्र आमच्या प्रभाग क्रं. १ चे कामाचे प्रस्ताव सादर केलेले आहे. त्यावर अधिकारी स्वाक्षरी करीत नाही. आमच्या प्रभागातही विकास कामांचा बॅकलॉग आहे. याबाबत आपण संबंधितांना आदेशीत करावे.

म. सभापती आपल्या समस्येबाबत संबंधितांकडून माहिती घेवून कार्यवाही करण्यांत येईल. सदर प्रसतावास कार्यालयीन अहवालास अधिन राहून मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २१६ दिनांक २०/१०/२०२२**

प्र.क्र.०६मधील सुयोग हौ.सोसा., व सुरज हौ. सोसा., येथील वसावे घर ते तुळशीराम शिंदे घरापावेतो रस्त्यांची अत्यंत दुर्दश झालेली असल्याने नागरिकांची रहदारी संदर्भात गैरसोय होत आहे तसेच सदर भागात गटार ही अत्यंत जीर्ण झालेली असल्याने पाण्याचा निचरा योग्य रीतीने होत नाही त्यामुळे रस्ता व ड्रेनेज लाईन करणे आवश्यक आहे.

तरी समक्ष पाहणी नुसार अंदाजपत्रक तयार केले असता उक्त कामी अंदाजपत्रकीय खर्च रु.७६,२५,९६७/- मात्र येणार आहे.

तरी सदर रस्ता व ड्रेनेज लाईन टाकणे कामाचा खर्च रु.७६,२५,९६७/-मात्रचा खर्च सन २०२२-२३ मधील हद्दवाढ निधी अंतर्गत आर्थिक व प्रशासकीय मंजुरीस्तव मे.स्थायी समितीच्या मंजुरीची आवश्यक्यता असल्याने मे.स्थायी समिती पुढे सादर झालेला आहे..

सन्मा. सदस्यांनी केलेली चर्चा व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्र.क्र.०६मधील सुयोग हौ.सोसा., व सुरज हौ. सोसा., येथे रस्ता व ड्रेनेज लाईन टाकणेचा खर्च रु.७६,२५,९६७/- मात्र सन २०२२-२३ मधील हद्दवाढ निधी अंतर्गत आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यांत येत आहे.

सुचक :- श्री. बोरसे नागसेन दामोदर

अनुमोदक:- श्री. अहिरराव किरण हरिश्चंद **सर्वानुमते मंजुर,**

**सही/-x x x**

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- २०२ धुळे मनपातील मानधन तत्वावरील डाटा एंन्ट्री ऑपरेटर, संगणक टंकलेखक लिपीक, दवाखान्यातील वैद्यकीय कर्मचारी यांना पुढील ६ महिन्यांसाठी नवीन नियुक्ती देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.सभापती यातील काही कर्मचा-यांची मुदत १२-८-२०२२ ला संपलेली आहे. ३-३ महिन्यांपासून त्यांना पगार मिळालेला नाही.मुख्य लेखाधिकारी सो.यांनी याबाबत सर्व माहिती घ्यावी आस्थापना विभागाने सर्व

विभागातील मानधन कर्मचा-यांची यादी समक्ष लेखाधिकारी यांचेकडेस सादर करावी. मानधन कर्मचा-यांचे मानधन दिवाळी पूर्वी अदा करण्यांत यावे.

म. नागसेन बोरसे विषय मंजुर करण्यांत यावा.

म.बन्सीलाल जाधव विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २१७ दिनांक २०/१०/२०२२**

धुळे मनपातील डाटा एंट्री ऑपरेटर अ.क्र.१ ते ३ यांना पुढील ६ महिने करीता नवीन नियुक्ती देणेबाबतच्या विषयावर मे.स्थायी समितीपुढे ठेवण्याबाबत मा आयुक्त सो यांनी मंजूरी दिलेली आहे.

तसेच अ क्र ४ ते २४ लिपीक टंकलेखक (संगणक ऑपरेटर ) यांना पुढील ६ महिने करीता नवीन नियुक्ती देणेबाबतच्या विषयावर मे स्थायी समितीपुढे ठेवण्याबाबत मा आयुक्त सो यांनी मंजूरी दिलेली आहे.

तसेच अ क्र २५ते ३८ नंदी रोड दवाखान्यातील वैदयकीय कर्मचारी यांना पुढील ६ महिने करीता नवीन नियुक्ती देणेबाबतच्या विषयावर मे स्थायी समितीपुढे ठेवण्याबाबत मा आयुक्त सो यांनी मंजूरी दिलेली आहे.

| अ.क्र. | संगणक ऑपरेटरचे नाव | कार्यरत विभाग | मुदत संपुष्ठात आल्याचा दिनांक | मानधन रु |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. पवन किशोर कानडे | अभिलेख विभाग | १२/८/२०२२ | १०,०००/- |
| २ | श्री. मिलींद रविन्द्र नगराळे | कुटुंब कल्याण | १२/८/२०२२ | १०,०००/ |
| ३ | श्री. भाग्यश्री प्रकाश मोरे | एलबीटी विभाग | १२/८/२०२२ | १०,०००/ |
| ४ | नितीन ज्ञानेश्वर महाले | महापौर कार्यालय | १७/१०/२०२२ | १०,०००/ |
| ५ | लतेश सुरेश चौधरी | कंपोस्ट डेपो | १७/१०/२०२२ | १०,०००/ |
| ६ | राहुल सुभाष भावसार | आस्थापना | १७/१०/२०२२ | १०,०००/ |
| ७ | शोएब रजा आदिल शेख | आरोग्य | १७/१०/२०२२ | १०,०००/ |
| ८ | कुणाल संजय दरगुडे | उपायुक्त कार्यालय | १७/१०/२०२२ | १०,०००/ |
| ९ | पुजा विठ्ठलसिंग परदेशी | विरोधी पक्ष नेता | १७/१०/२०२२ | १०,०००/ |
| १० | अंजना प्रल्हाद गायकवाड | बांधकाम | १७/१०/२०२२ | १०,०००/ |
| ११ | दिलीप खुशाल शिवदे | उपमहापौर कार्या. | १७/१०/२०२२ | १०,०००/ |
| १२ | ज्योती मोहन पुकळे | आरोग्य विभाग | २६/१०/२०२२ | १०,०००/ |
| १३ | उमाकांत दगडु बारी | आरोग्य विभाग | २६/१०/२०२२ | १०,०००/ |
| १४ | कैलास सत्तु गलांडे | नगरसचिव कार्या | २६/१०/२०२२ | १०,०००/ |
| १५ | पल्लवी जयराम सावरकर | लाईट विभाग | १७/१०/२०२२ | १०,०००/ |
| १६ | सचिन विनायक शिंदे | कंपोस्ट डेपो | १७/१०/२०२२ | १०,०००/ |
| १७ | निखिल रविंद्र देशमुख | मालमत्ता कर | १७/१०/२०२२ | १०,०००/ |
| १८ | सरिता गंभिरराव चव्हाण | मालमत्ता कर | १७/१०/२०२२ | १०,०००/ |
| १९ | सुनिता दत्तात्रय आव्हाड | मालमत्ता कर | १७/१०/२०२२ | १०,०००/ |
| २० | शरद दामु मोहिते | मालमत्ता कर | १७/१०/२०२२ | १०,०००/ |
| २१ | जितेंद्र सुभाष शिंदे | बाजार विभाग | १७/१०/२०२२ | १०,०००/ |
| २२ | वर्षा छबीलाल माळी | वृक्ष समिती | १७/१२/२०२२ | १०,०००/ |
| २३ | निलेश भिला सोनवणे | लेखा परिक्षण | २६/१०/२०२२ | १०,०००/ |
| २४ | विकास संतोष खलाणे | आरोग्य विभाग | २६/१०/२०२२ | १०,०००/- |
| २५ | श्रीअन्सरी अन्वरुल फारकान हुसैन | औषध निर्माता | २१/१०/२०२२ | १२,२००/- |
| २६ | प्रियंका वैभवकुमार जगताप | औषधनिर्माता | २१/१०/२०२२ | १२,२००/- |
| २७ | रिबीका गोविंद वळवी | स्टाफ नर्स | २१/१०/२०२२ | १५,७५०/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २८ | कुनिका संजय वाघमारे | स्टाफ नर्स | २१/१०/२०२२ | १५,७५०/- |
| २९ | दिपाली हिलाल गर्दे | स्टाफ नर्स | २१/१०/२०२२ | १५,७५०/- |
| ३० | मिरा माकल्या राहसे | ए एन एम | २१/१०/२०२२ | १२,०००/- |
| ३१ | वंदना पुरुषोत्तम निकम | ए एन एम | २१/१०/२०२२ | १२,०००/- |
| ३२ | प्रतिभा किशोर सोनवणे | ए एन एम | २१/१०/२०२२ | १२,०००/- |
| ३३ | शारदा दिपक वाघ | ए एन एम | २१/१०/२०२२ | १२,०००/- |
| ३४ | कविता युवराज भोई | ए एन एम | २१/१०/२०२२ | १२,०००/- |
| ३५ | सोनिया अशोक तपासे | ए एन एम | २१/१०/२०२२ | १२,०००/- |
| ३६ | मनिषा दिलीप गायकवाड | ए एन एम | २१/१०/२०२२ | १२,०००/- |
| ३७ | लता किसन गवळी | दाई | २१/१०/२०२२ | ८०००/- |
| ३८ | सुरेखा रविंद्र वाडेकर | दाई | २१/१०/२०२२ | ८०००/- |

तरी उक्त मानधनावरील एकुण १ ते ३८कर्मचारी यांना मुदत संपल्याच्या दिनांकापासून ०५ दिवसाचा सेवा खंड देवून पुढील ०६ महिने कालावधीकरीता एकत्रित मानधनावर नवीन नियुक्ती देणेकरीता महानगरपालिका अधिनियम ५३ नुसार नेमणुकीचा अधिकार कोणामध्ये निहित असणे याबाबत खालीलप्रमाणे अधिनियमात तरतुद नमुद केलेली आहे.

तरी उक्त संदर्भीय क्र १ ते ३अन्वये मंजूर कार्यालयीन टिपणीनुसार अ क्र १ ते ३८ मानधनावरील कर्मचारी यांना मुदत संपल्याच्या दिनांकापासून०५दिवसाची सेवा खंडीत करून एकत्रित मानधनावर पुढील०६महिने कालावधीकरीता नविन नियुक्ती देणेबाबतचा विषय महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३(३)नुसार मे.स्थायी समिती पुढे सविनय सादर करण्यांत आलेला आहे.

सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून प्रस्तावातील अ क्र १ ते ३८ मानधनावरील कर्मचारी यांना मुदत संपल्याच्या दिनांकापासून०५दिवसाची सेवा खंडीत करून एकत्रित मानधनावर पुढील ०६महिने कालावधीकरीता नविन नियुक्ती देणेबाबतचा विषय महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३ (३) नुसार मान्यता देण्यांत येत आहे.तसेच सदर प्रस्ताव व कार्यवाही बाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

तसेच प्रशासनाने मानधनावरील कर्मचा-यांचा मुदतवाढीचा प्रस्ताव मुदत संपण्यापूर्वी मान्यतेसाठी सभेपुढे सादर करावा. तसेच मनपाच्या सर्व विभागातील मानधन कर्मचा-यांना दिवाळी पूर्वी मानधन अदा करणेबाबत प्रशासनाने कार्यवाही करावी.

सुचक :- श्री. बोरसे नागसेन दामोदर

अनुमोदक:- श्री. जाधव बन्सीलाल माणिक

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

# धुळे महानगरपालिका,धुळे
## नगरसचिव कार्यालय
## स्थायी समिती सभा क्रमांक २६ चे इतिवृत्त

---

**धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह**
**गुरुवार दिनांक १०/११/२०२२**
**वेळ सकाळी ११-०० वाजतां**

धुळे महानगरपालिकेची स्थायी समितीची साप्ताहिक सभा क्रं.२६ आज गुरुवार दिनांक **१०/११/२०२२** रोजी सकाळी ११-०० वाजतां श्री.शितल मोहन नवले, सभापती, स्थायी समिती, मनपा धुळे यांच्याअध्यक्षतेखाली **धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृहात** भरली. या सभेस खालील सन्मा.सदस्य हजर होते.

| अ.क्रं. | सदस्यांचे नांव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री.नवले शितल मोहन | सभापती |
| २ | श्री. जाधव संजय सुधाकर | सदस्य |
| ३ | श्री. बोरसे नागसेन दामोदर | सदस्य |
| ४ | श्रीमती कुलेवार किरण राकेश | सदस्या |
| ५ | श्रीमती वराडे वैशाली भिकन | सदस्या |
| ६ | श्री.जाधव बन्सीलाल माणिक | सदस्या |
| ७ | श्रीमती चौधरी मंगला अर्जुन | सदस्या |
| ८ | श्री.अन्सारी फातमा नुरुल अमीन | सदस्या |
| ९ | श्री. चौधरी नरेंद्र रुपला | सदस्य |
| १० | श्रीमती चौधरी प्रतिभा शिवाजीराव | सदस्या |
| ११ | श्री. अहिरराव किरण हरिश्चंद्र | सदस्य |
| १२ | श्री. रेलन हर्षकुमार राधेश्याम | सदस्य |
| १३ | श्री.अन्सारी अब्दुल लतीफ अब्दुल हमीद | सदस्य |
| १४ | श्रीमती पठाण नाजियाबानो नासिर खा | सदस्या |

**उपस्थित अधिकारी गण**

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. नितीन कापडणीस | अति.आयुक्त |
| २ | डॉ. श्रीमती संगिता नांदुरकर | उपायुक्त |
| ३ | श्री. विजय सनेर | उपायुक्त |
| ४ | श्री. मनोज अरविंद वाघ | नगरसचिव |
| ५ | श्री. गजानन पाटील | मुख्य लेखाधिकारी |
| ६ | श्री. के.एन. शिंदे | अभियंता |
| ७ | डॉ. श्री.एम.आर. शेख | प्र.आरोग्याधिकारी |
| ८ | श्री. संजय मोरे | प्र.कार्यालय अधिक्षक |
| ९ | श्री. किशोर सुडके | प्र.परवाना अधिक्षक तथा बाजार विभाग प्रमुख |
| १० | श्री. एन.के. बागुल | विद्युत अभियंता |

| | | |
|---|---|---|
| ११ | श्री. महेंद्र सोनवणे | प्रशासन अधिकारी मनपा शि.मंडळ |
| १२ | श्री. राजू माईनकर | भांडारपाल तथा आरोग्य विभाग प्रमुख |
| १३ | श्री. पी.डी. चव्हाण | ओव्हरसिअर बांधकाम |
| १४ | श्री. प्रकाश सोनवणे | ओव्हरसिअर नगररचना विभाग |
| १५ | श्री. शिरीष जाधव | निरीक्षक, मालमत्ता कर विभाग |
| १६ | श्री. मधुकर निकुंभे | निरीक्षक, मालमत्ता कर विभाग |
| | श्री. दुष्यंत महाजन | अग्नीशमन विभाग |

म. सभापती — सन्मा.सदस्य मा.अति.आयुक्त सो.सर्व अधिकारी कर्मचारी व पत्रकार,छायाचित्रकर बांधव यांचे मी स्थायी समितीच्या बैठकीत स्वागत करतो.सभेचा कोरम पुर्ण झाला असुन नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरु करावे.

म. नगरसचिव — वंदे मातरम् या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

म.सभापती — आजच्या बैठकीस बैठकीच्या संबंधीत अनेक अधिकारी अनुपस्थितीत असल्याचे दिसत आहे. आपणास बैठकीचा अजेंडा यापूर्वीच देण्यांत येतो त्यावर वेळ व दिनांक नमूद केलेली असते.तरीही आपण वेळेवर सभागृहात उपस्थित राहत नाहीत. सभापती व सदस्य सभागृहात आल्यानंतर अधिकारी सभागृहात येतात सदर बाब अतिशय गंभीर स्वरुपाची व कार्यालयीन शिस्ती विरुध्द आहे. याबाबत अति.आयुक्त यांनी अनुपस्थित व उशिरा आलेल्या अधिकारी व कर्मचारी यांना तात्काळ कारणे दाखवा नोटीस देण्यांत यावी. व यापुढे अशी गैरशिस्त होणार नाही याची दक्षता घ्यावी.

सही/- x x x
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक :- २०३ — मागील स्थायी समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे. (दि.२९/९/२०२२)

म. नगरसचिव — म. नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. नागसेन बोरसे — इतिवृत्त वाचून कायम करण्यांत यावे.

म.बन्सीलाल जाधव — इतिवृत्त वाचून कायम करण्यांत यावे.

म. सभापती — मागील स्थायी समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २१८ दिनांक १०/११/२०२२**

मागील स्थायी समिती सभा दिनांक २९/९/२०२२रोजीच्या सभेतील धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १८९ ते १९६ अखेर तसेच मे.स्थायी समिती सभेत सन्मा.सदस्यांनी केलेली चर्चा व त्यावरील निर्णय क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

सही/- x x x
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक :- २०४ — मा.आयुक्त सो.यांनी त्यांचे आलेल्या अधिकारात रुपये ५ लाख ते २५ लाखापर्यंत बांधकाम विभागाकडील विकास कामाची यादी प्रकरण७(ड)अन्वयेदि.१०/१०/२०२२ ते दि. २८/१०/२०२२ अखेर निर्गमित केलेल्या कार्यादेशाची यादी अवलोकनासाठी मे.स्थायी समिती पुढे सादर.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.किरण अहिरराव — विषयाचे अवलोकन करण्यांत आले आहे.

म. सभापती — म.आयुक्त सो. यांनी त्यांचे आलेल्या अधिकारात रुपये ५ लाख ते २५ लाखापर्यत बांधकाम विभागाकडील विकास कामाची दि.१४/१०/२०२२ ते दि.२८/१०/२०२२ अखेर निर्गमित केलेल्या कार्यादेश अवलोकन करण्यांत आले.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २१९ दिनांक १०/११/२०२२**

मा.आयुक्त सो. यांनी त्यांचे आलेल्या अधिकारात रुपये ५ लाख ते २५ लाखापर्यंत बांधकाम विभागाकडील विकास कामाची यादी प्रकरण ७ (ड) अन्वये दि.१४/१०/२०२२ ते दि. २८/१०/२०२२ अखेर निर्गमित केलेल्या कार्यादेशाची यादी अवलोकनासाठी मे.स्थायी समिती पुढे अवलोकनार्थ सादर.

**धुळे महानगरपालिका धुळे**

**(बांधकाम विभाग)**

**दिनांक :- दि.१४/१०/२०२२ ते दि.२८/१०/२०२२ अखेर निर्गमित केलेल्या विकास कामांच्या कार्यादेशची यादी**

| अ.क्रं | कार्या. क्र. | दिनांक | कामांचे नाव | रक्कम | निधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | ३१८ | १४/१०/२०२२ | प्र.क्र.१७ मध्ये दक्षिण मुखी हनुमान मंदिर ते व्दारकाधीश अपार्टमेंट पावेतो रस्ता कॉक्रीट करणे. | १०६३६२५ | नगरसेवक निधी अंतर्गत सन २०२२-२३ |
| २ | ३१९ | १४/१०/२०२२ | प्र.क्र.१७ मध्ये सौ.सुरेखाताई चंद्रकांत उगले नगरसेविका यांचे निधीतून शेखर बडगुजर घर ते सार्व.शौचालय व अग्रवाल शॉप ते महेंद्र पाटीलघरापावेतोआर.सी.सी.पाईपगटार करणे. | ६२७६७६ | नगरसेवक निधी अंतर्गत सन २०२२-२३ |
| ३ | ३२० | २१/१०/२०२२ | प्र.क्र.१८ मध्ये गोलू बोरसे यांचे घरापासून ते गजानन मंदिर पावेतो ते हायवे पावेतो रस्ता डांबरीकरण करणे. | १४९८०७२ | नागरी दलित वस्ती सुधार योजना सन २०२१-२२ अंतर्गत |
| ४ | ३२२ | २१/१०/२०२२ | प्र.क्र.२ मध्ये दिगंबर पाडवी सोसा.देवपूर येथे अशोक पाटील ते धर्मेंद्र वाणी व देसले यांचे गहर ते बारी यांचे घरापर्यंत सिमेंट कॉक्रीट रस्ता करणे. | १९९८७२४ | मनपा निधी (नगरसेवक निधी ) अंतर्गत सन २०२२-२३ |
| ५ | ३२४ | २१/१०/२०२२ | प्र.क्र.४ मध्ये सर्व्हे नं.२०/१ गीता नगर येथे रस्ता डांबरीकरण करणे. | ९९९४५८ | खासदार स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रम अंतर्गत सन २०२२-२३ |
| ६ | ३३४ | २८/१०/२०२२ | प्र.क्र.२ मध्ये पुजा प्रोव्हिजन पासून ते श्रीकृष्ण कॉलनी पावेतो रस्ता डांबरीकरण करणे. | १२४८६३७ | महाराष्ट्र सुवर्ण जयंत नगरोत्थान(जिल्हास्तर) योजना सन २०२१-२२ अंतर्गत |
| ७ | ३३८ | २८/१०/२०२२ | प्र.क्र.१९ मध्ये रेहबर बाग भागात हैदर आली यांचे घरापासून ते सलीम वायरमन यांच्या घरापावेतो रस्ता कॉक्रीट करणे. | ९९९५९१ | नगरसेवक निधी अंतर्गत सन २०२२-२३ |

सही/- x x x
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- २०५ — होर्डींग मॅनेजमेंट सॉफ्टवेअर महाराष्ट्रातील महानगरपालिका मध्ये लावण्याबाबत तातडीचे बाब म्हणून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७ (क) ड नुसार आर्थिक मंजुरी, प्र.मा. व कार्यादेश होणेबाबत मान्यतेस्तव व मे. स्थायी समिती पुढे कार्योत्तर मान्यता देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.हर्षकुमार रेलन — हा जो होर्डीग्जचा विषय आहे. आपण सॉफटवेअर खरेदी करतो आहोत फारच चांगली गोष्ट आहे. यात आपण भाडे घेतो. तो ४ रु स्के. फुट आहे. दर दिवसाला १०*२० चे होर्डिग्ज जर असेल तर ८०० रु दर दिवसाला आहे. ४ दिवस जर कोणाला लावायचे असेल तर त्याला ३२०० भाडे द्यावे लागते. त्यानंतर जाहीरात शुल्क आपण लावतो. जी.एस.टी जेव्हा सुरु झाला होता त्यात जाहिरात शुल्क समाविष्ट होते. आपण त्याची पावती जाहिरात कर म्हणून द्यावी. जाहिरात शुल्क म्हणजेच जाहिरात करच आहे. जाहिरात शुल्क आपल्याला आकारता येणार नाही. आपण जी.एस.टी. आगोदर भरतो. त्यात १८% जीएसटी आहे. हे जाहिरात शुल्क आकारले जाऊ नये ही विनंती आहे.

| | |
|---|---|
| म.सभापती | जी.एस.टी चे कायदेशिर तरतूद तपासून घेऊ. हा महासभेचा ठरावच आहे. |
| म.हर्षकुमार रेलन | त्यात आपण वाढदिवसाचे होर्डीग्ज लावतो आपले नेते व मंत्री महोदय येतात त्यांचे होर्डीग्ज लावतो. त्यातुन उत्पन्न बुडते. |
| म.सभापती | हा विषय महासभे समोर आणू हया विषयासंबंधी माहिती सांगतो. हया संस्थेचे काम अकोल्याला चालू आहे. ते आपल्याकडे सॉफटवेअर इन्स्टॉल करुन देतील. त्यामध्ये क्युआर कोड असतील त्या क्युआर कोड मध्ये तो कोड स्कॅन केला की आपल्याला सर्व माहिती प्राप्त होईल. होर्डिग्ज किती इंच साठी लावला आहे, किती स्के. मी. ची परवानगी दिली आहे. जाहिरातीचा नमुना आपल्याकडे ऑनलाईन येईल. यामध्ये जे बॅनर बनवणारे लोक त्यांना सुध्दा यात समाविष्ट केले जाईल. त्याची एक कॉपी पोलिस अधिक्षक कार्यालयाला पण जाईल. जेणे करुन आक्षेपार्ह असेल तर पोलिस डिपार्टमेंट पण कळवेल की परवानगी द्यावी की नाही. जे प्रिंटींगवाले आहे त्यांनाही आपण यात जोडतो आहे. जेणेकरुन ते स्वत:च अनधिकृत बॅनर करणार नाही. आपल्याकडे ही अधिकार असतील त्याची परवानगी नाकारण्याचे. हे सॉफटवेअर स्वतात ८ लाख रुपयात घेत आहोत. ८ लाखात ती संस्था आजन्म सर्व्हीस देईल. वर्षाला एक रुपयाही शुल्क आकारले जाणार नाही. विचारपूर्वक हा विषय आणला आहे. सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे. |

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २२० दिनांक १०/११/२०२२**

कार्यालयीन अहवाल सादर करण्यात येतो की, संदर्भीय क्र. ५ च्या याचिकेवर मे. उच्च न्यायालयाने दिलेल्या अनुषंगाने अनधिकृत जाहिरात फलकांवर कारवाई करण्याबाबत निर्देश दिलेले आहे. जाहिरात छपाई करतांना महानगरपालिकेने दिलेला परवानगी क्रमांक, QR कोड जाहिरातीवर छपाई करणे बंधनकारक आहे.

उपरोक्त संदर्भीय क्र. ५ अन्वये मा. सह आयुक्त, नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांनी दिलेल्या निर्देशाप्रमाणे महानगरपालिका यांचे कडून परवानग्या देतांना QR कोड होर्डिंग / बॅनरवर फ्लॅश करणे बंधनकारक करणे बाबत नमूद केलेले आहे.

होर्डींग मॅनेजमेंट सॉप्टवेअर मध्ये खालीलप्रमाणे सेवा पुरविण्यात येणार.

१. हे सॉफ्टवेअर वेब बेस ॲप्लिकेशन आहे, होर्डिंग मालक त्याच्या कार्यालयातून किंवा कॉर्पोरेशन किंवा कौन्सिलपासून दूर बसून ऑनलाईन अर्ज दाखल करू शकतात.

२. सॉफ्टवेअर नगरपरिषद किंवा महानगरपालिकेत, स्वतःच्या आवारात किंवा सरकारी जागेत बसवलेले होर्डिंग वेगळे करू शकते.

३. सॉफ्टवेअरचा वापरकर्ता इंटरफेस अतिशय सोपा आहे.

४. सॉफ्टवेअर होर्डिंग मालकाला स्वयं नूतनीकरण संदेश पाठवते आणि त्यांना पैसे देण्यास मदत करते त्यांचे शुल्क ऑनलाईन पेमेंटद्वारे मिळू शकते.

५. सॉफ्टवेअर त्यांच्या अधिकारक्षेत्रातील बेकायदेशीर होर्डिंग ओळखण्यास मदत करते. संमतीसाठी आवश्यक असलेले सर्व दस्तऐवज थेट वेब पोर्टलद्वारे प्राप्त होतात आणि स्वयंचलित क्वेरी तयार करतात, जी नंतर वेब पोर्टलद्वारे पाठविली जातात. नगरपरिषद किंवा कॉर्पोरेशनचे प्रतिनिधी आणि होर्डिंग मालक दोघेही सर्वेक्षणासाठी एकदा होर्डिंगच्या ठिकाणी भेटू शकतात, त्यांचा मौल्यवान वेळ वाचतो.

६. होर्डिंगवर कोणतेही बॅनर छापण्यापूर्वी त्याची माहिती या सॉफ्टवेअरद्वारे नगरपरिषद किंवा महापालिकेला उपलब्ध होऊ शकते.

७. ही प्रक्रिया अधिकृत करण्यासाठी कोणत्याही अतिरिक्त मनुष्यबळाची आवश्यकता नाही सर्व क्लिअर केल्यानंतर ऑनलाइन प्रक्रियेद्वारे प्रमाणपत्र त्वरित उपलब्ध केले जाऊ शकते अनुपालन

८. होर्डिंग मालक त्यांचे सर्व व्यवहार त्यांच्या डॅशबोर्डवर पाहू शकतात.

९. या सॉफ्टवेअरचा मोठा फायदा असा आहे की, ते होर्डिंगच्या स्ट्रक्चर ऑडिटसाठी वेळोवेळी अलर्ट मेसेज पाठवते, म्हणजे होर्डिंग गंजून किंवा इतर कोणत्याही प्रकारे कोसळण्याची शक्यता कमी असते आणि त्यामुळे अपघात टाळता येतो.

१०. होर्डिंग संमती थेट पोर्टलद्वारे प्राप्त होते. परवाना बाबत संबंधिताला QR CODE पुरविला जातो. (कंत्राटदारा मार्फत ७५QR CODE विनामूल्य उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. तदनंतर अतिरीक्त शुल्क लागणार आहे याबाबत निर्णय होणे आवश्यक आहे.)

११. सर्व महसूल सॉफ्टवेअरद्वारे राखला जाऊ शकतो त्यामुळे ऑडिट करणे सोपे आहे.

१२. सॉप्टवेअर बाबत कंत्राटदाराकडून ५ वर्षाचा टेकनिकल सपोर्ट राहील.

१३. एक वेळ खरेदी व कंपनीकडून भविष्यातील अपडेट सह आहे.

उक्त प्रमाणे अटी व शर्ती संबंधित कंत्राटदाराकडून करारनामा मध्ये लिहून घेण्यात येईल. तसेच ३% सुरक्षा अनामत रक्कम देयकातून कपात करणे आवश्यक आहे.

त्याअनुषंगाने होर्डिंग मॅनेजमेंट सॉप्टवेअर महानगरपालिकेमध्ये लावणे अत्यंत आवश्यक आहे. उक्त संदर्भीय क्र.२अन्वये मा. उपसचिव, नगरविकास विभाग यांनी संदर्भीय क्र. २ अन्वये कार्यवाही करणेबाबत निर्देश दिलेले आहेत. संदर्भीय क्र. १ अन्वये श्री. महेश रा. श्रीरामे, व्यवस्थापक न्यु ईरा बीरबी प्रा. लि. यांचे होर्डीग मॅनेजमेंट सॉप्टवेअर महाराष्ट्रातील महानगरपालिका, नगरपरिषद व नगरपंचायत मध्ये लावण्याबाबत मा. मुख्यमंत्री सो यांना पत्र दिले असता सदर पत्रावर उचित कार्यवाही करण्यासाठी महाराष्ट्रातील नगरपालिका / महानगरपालिका संदर्भीय क्र.२ अन्वये पत्र दिले आहे. तसेच ही संगणक कार्यप्रणाली हिंगणघाट नगरपरीषद व राजुरा नगरपरिषद येथे कार्यन्वित आहे. त्याबाबतचा कार्यादेश सोबत जोडला आहे. याबाबत संदर्भ क्र. ३ अन्वये मा. अति. आयुक्त यांच्या दालनात श्री महेश श्रीरामे, व्यवस्थापक न्यू इरा बीरबी यांच्या समवेत झालेल्या चर्चेनुसार न्यायालयीन बाब असल्यामुळे तातडीने कार्यवाही करणे आवश्यक असल्याने मा.सभापती सो व मा. आयुक्त सो यांचेशी झालेली चर्चेप्रमाणे विनानिविदा ६७(क) नुसार मंजूरी घेण्यात यावी येणेप्रमाणे सूचना दिलेल्या आहे.

उक्त बाबत संदर्भीय क्र. ७ अन्वये मे. न्यु ईरा बी २ बी प्रा. लि. यांनी खालीलप्रमाणे कामाचे ईस्टीमेट सादर केलेले आहे.

| अ.क्र. | पुरवठादाराचे नाव | कामाचे नाव | एकूण खर्चजीएसटी सह |
|---|---|---|---|
| १ | New Eraa B२B Trading Pvt. Ltd. Chandrapur. | Supplying and installation of Hoarding management system software for Dhule Municipal Corporation | **८,३५,०००/-** |
| | | **GST १८%** | **१,५०,३००/-** |
| | | **एकूण खर्च** | **९,८५,३००/-** |
| | | **सदरचे दर सर्व करासोबत सादर करण्यात आले आहे** | **९,८५,३००/-** |

मे. न्यु ईरा बीरबी प्रा. लि. यांनी नगर परिषद हिंगणघाट येथे उक्त दराप्रमाणे काम केलेले आहे. याबाबतचा कार्यादेश सोबत जोडला आहे.

उपरोक्त संदर्भ क्र.६ अन्वये मा.सहआयुक्त, नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांनी दिलेल्या निर्देशाप्रमाणे महानगरपालिका यांचे कडून परवानग्या देतांना QR कोड होर्डिंग / बॅनरवर फ्लॅश करणे बंधनकारक करणे बाबत नमूद केलेले आहे. आता अतिशय कमी कालावधी शेष असून सदर काम अतितात्काळ परिस्थीतीत करणेबाबत आवश्यक आहे. व अशा अतितात्काळ परिस्थितीत काम करून घेण्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९च्या कलत६७(३)(क) अन्वये आयुक्त महानगरपालिकांना यांना विशेष अधिकार प्रदान केलेले आहे.

त्याअनुषंगाने महानगरपालिका, धुळे मला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ६७(३)(क) नुसार प्राप्त अधिकारान्वये धुळे महानगरपालिका कडील जाहिरात विभागाकरीता होर्डीग मॅनेजमेंट सॉप्टवेअर संगणक आज्ञावलीचा पुरवठा करुन प्रणाली कार्यन्वित करणेबाबत व

त्यासाठी येणारा खर्चास **ई-गव्हर्नस** या लेखाशिर्षातून खर्चास आर्थिक मंजुरी, प्र.मा. व कार्यादेश होणेबाबत मान्यतेस्तव व मे.स्थायी समिती पुढे कार्योत्तर मंजूरीस्तव प्रस्ताव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे. तसेच सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री. हर्षकुमार राधेश्याम रेलन

अनुमोदक :- सौ. प्रतिभाताई शिवाजीराव चौधरी **सर्वानुमते मंजुर,**

सही/- x x x

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक :- २०६ धुळे महानगरपालिकेच्या नवीन प्रशासकीय इमारतीमध्ये महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना २००६ नुसार महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियान (जिल्हास्तर २०२१-२२) आग प्रतिबंधक उपाययोजना (हायड्रंट सिस्टिम,स्मोक डिटेक्टर,फायर अलार्म,फायर एक्सटीन्यूशर इ.बसविणे व फायर पंप हाऊस बांधणे इत्यादी कामाचे निविदा दर मागविण्यांत आलेत.त्याबाबत आलेल्या कायालयीन अहवालावर विचार करणे..

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.नागसेन बोरसे हा विषय तांत्रिकदृष्टया फार महत्वाचा आहे. यात तज्ञ सल्लागारांची नेमणूक करावी. तोपर्यंत हा विषय तहकूब ठेवावा सर्व माहिती आल्यावरच हा विषय घेण्यात यावा.

म. हर्षकुमार रेलन हा विषय सुरक्षे संबंधी आहे. तहकूब करत असाल तर तातडीने पुढच्या सभेमध्ये ठेवावा. यापूर्वीही पाचकंदील येथील शंकर मार्केट व शिवाजी मार्केटला आग लागली होती. त्या दोन्ही मार्केट मनपाच्या मालकीच्या आहे. त्यानंतर जे दुसरे ही शॉपिंग कॉम्प्लेक्स आहे तेथे ही सुरक्षेच्या दृष्टीने ही जी आग प्रतिबंधक योजना ती तेथे ही लावावी अशी विनंती करतो. हे मोठे व्यापारी केंद्र आहे. येथे कोटयावधी रुपयांचे नुकसान होऊ शकते. ही आपली जबाबदारी आहे.ही सुविधा तेथे द्यावी. आपण जे सल्लागार नेमणार आहोत तेथे या सर्वांचाही या अनुषंगाने विचार करावा.

म. सभापती याचे इस्टीमेट बांधकाम विभागाने केले आहे का?

म.अभियंता सदरचा विषय अग्नीशमन विभागाकडून आला आहे.

म.सभापती सर्व माहिती तयार करुन माझ्याकडे सादर करावी. सर्व सन्मा. सदस्यांनी केलेली चर्चा लक्षांत घेता सदर विषयाबाबत परिपूर्ण अहवाल पुढील बैठकीत सादर करावा तोपावेतो सदर प्रस्ताव तहकूब ठेवण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २२१ दिनांक १०/११/२०२२**

धुळे महानगरपालिकेच्या नवीन प्रशासकीय इमारतीमध्ये महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना २००६ नुसार महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियान (जिल्हास्तर २०२१-२२) आग प्रतिबंधक उपाययोजना (हायड्रंट सिस्टिम,स्मोक डिटेक्टर,फायर अलार्म,फायर एक्सटीन्यूशर इ.बसविणे व फायर पंप हाऊस बांधणे इत्यादी कामाचे निविदा दर मागविण्यांत आलेत.त्याबाबत आलेल्या कायालयीन अहवालावर विचार करणेसाठी मे. स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांनी केलेली चर्चा लक्षांत घेता सदर प्रसतावा परिपूर्ण अहवाल पुढील सभेत सादर करावा तो पावेतो सदर पसताव तहकूब ठेवण्यास मान्यता देण्यांत येत आहे.

सुचक :- श्री. नागसेन दामोदर बोरसे

अनुमोदक :- श्री. हर्षकुमार राधेश्याम रेलन **सर्वानुमते मंजुर,**

सही/- x x x

**सभापती,**

**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-२०७ PIL 71/2013 व अवमान याचिका 6/2019 मधील मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयावर धुळे शहर मनपा हद्दीतील रस्त्यांवरील खड्डे बुजविणे बाबत यथोचित कार्यवाही करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.
म.किरण अहिरराव विषय मंजूर करण्यांत यावा.
म..नरेंद्र चौधरी विषय मंजूर करण्यांत यावा.
म. सभापती सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २२२ दिनांक १०/११/२०२२**

मा. मुंबई उच्च न्यायालय PIL ७१/२०१३ मधील अवमान याचिका ६/२०१९ मधील मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयावर धुळे मनपा हद्दीतील रस्त्यांच्या दुर्दशा बाबत धुळे महानगरपालिकेद्वारे उक्त प्रकरणी दर ३ महिन्याला मे. न्यायालयास व शासनास त्रैमासिक अहवाल सादर करावचे निर्देश दिले आहे. मे.न्यायालयाच्या PIL ७१/२०१३ मधील निकालाच्या अनुषंगाने दर ३ महिन्यात रस्त्यांच्या तक्रारी संदर्भातील तक्रार निवारण यंत्रणेबाबत स्थानिक वृत्तपत्रातून व इतर मध्यमातून व्यापक प्रसिद्धी देण्यात यावे असे कळविले आहे .धुळे शहराची लोकसंख्या ही ५ लाख हून अधिक आहे. तसेच धुळे शहराचे क्षेत्रफळ एकूण १०१.०८ चौ.किमी एवढे आहे. शहरात एकूण ५९४.८६२ किमी हून अधिक रस्ते आहेत.

सदर रस्ते दुरुस्ती संबंधी प्राप्त तक्रारी चे निवारण करण्यासाठी समन्वय अधिकारी म्हणून शहर अभियंता श्री. कैलाश शिंदे (मो.न. ९४२२२९६२०५) यांची नेमणूक केली असून तसेच कार्यवाही साठी प्रभाग निहाय अधिकाऱ्यांची नेमणूक केली आहे. प्र.क्र. १ते५, ९ व १० साठी श्री.पी.डी. चव्हाण (मो.न.९४२२२९६२१८)प्र.क्र.६,७,१५,१६,१७,१८साठीश्री.सी.एम.उगले(मो.न.९४२२२९६२०९) प्र.क्र ८,११,१२,१३,१४,१९ साठी श्रीएच.पी.पावटे(मो.न ९४२२२९६२०८).

खड्डे बुजविण्या संदर्भात धुळे मनपाच्या अर्थसंकल्पात सुमारे २ कोटी रुपयांची तरतूद करून ई निविदा प्रक्रिया राबवून ठेकेदाराची नेमणूक करण्यात यावी. त्या अनुषंगाने राज्य दरसूची २०२२-२३ नुसार रस्त्यांवरील खड्डे बुजविण्यासाठी आयटम रेटनुसार कामाचे इस्टीमेट / अंदाजपत्रक बनविण्यात आले आहे.त्यात खालील बाबींचा समावेश करण्यात आला आहे. Site Cleaning,Pot Holes Repair,Excavation,Rumble Strip,GSB 1,Cats Eye,M P M, BM, BC,NP300 mm, NP2450mm,M20,Fe500,Aggregates40mm,Aggregate63mm,Hard Murum, Static Road Roller, Paving Block इ.

तरी उक्त कामाचा खर्च सन२०२२-२३ मधील रस्ता दुरुस्ती या लेखाशीर्षकात सुधारित अंदाजपत्रकात समावेश करणेकामी सदरचा विषय मे.स्थायी समिती समोर मान्यतेसाठी सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून खड्डे बुजविणे संदर्भात धुळे मनपाच्या अर्थसंकल्पात सुमारे २ कोटी रुपयांची तरतूद करून ई निविदा प्रक्रिया राबवून ठेकेदाराची नेमणूक करणे तसेच उक्त कामाचा खर्च सन२०२२-२३ मधील रस्ता दुरुस्ती या लेखाशीर्षकात सुधारित अंदाजपत्रकात समावेश करणेस मान्यता देण्यांत येत आहे.

सुचक :- श्री. नागसेन दामोदर बोरसे
अनुमोदक :- श्री. बन्सीलाल माणिक जाधव **सर्वानुमते मंजुर,**

सही/- x x x
**सभापती,**
**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक:- २०८ | कृषी महाविद्यालय पारोळा रोड येथे ९०० एम एम पाईप लाईन वरचे लीकेज काढणेकामी झालेला खर्च रु२,९९,६७९/-मात्र खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे. |
| म. नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले. |
| म. अब्दुल अन्सारी | विषय मंजूर करण्यांत यावा. |
| म..नाजियाबानो पठाण | विषय मंजूर करण्यांत यावा. |
| म. सभापती | सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे. शहरात पाणी परिस्थिती खराब आहे. लिकेजेसचे काम करणारा ठेकेदाराला वारंवार कामासाठी सांगावे लागते.त्यांना काही प्रमाणात देयके अदा करणेबाबत लेखाधिकारी यांनी प्राधान्याने कार्यवाही करावी . |

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २२३ दिनांक १०/११/२०२२**

कृषी महाविद्यालय पारोळा रोड येथे ९०० एम एम पाईप लाईन फुटले असून लीकेज झाले आहे सदर ठिकाणी लीकेज असल्याने पाणी वाहत असल्याबाबत मा प्राचार्य कृषी महाविद्यालय पारोळा रोड यांची तक्रार आहे

सदर ठिकाणी समक्ष पाहणी केली असता कृषी महाविद्यालय पारोळा रोड येथे ३ ठिकाणी लीकेज आढळून आले.त्यानुसार सदरकामाचे अंदाजपत्रक MJP २१-२२ च्या दर सूचीनुसार तयार केले असताउक्त कामीअंदाजपत्रकीय खर्च रु.२,९९,६७९/-मात्र येणार आहे.

सदरचे काम विना निविदा मे संजय गायकवाड, ठेकेदार, धुळे यांचे कडुन मुंबई प्रांतिक अधिनियम नियम ६७(३) (क) अन्वये त्वरित काम करण्यास व ५ (२) (२) अन्वये विना निविदा करण्यास मंजुरीसाठी व अंदाजपत्रकीय खर्च रु. २,९९,६७९/- मात्र खर्चास सन २०२२-२३ च्या आकस्मित निधी अंतर्गत कार्योत्तर मान्यतेसाठी प्रस्ताव सादर झालेला आहे.

सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे. तसेच सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री.अब्दुल लतीफ अन्सारी
अनुमोदक :- श्रीमती नाजियाबानो नासिर पठाण **सर्वानुमते मंजुर,**

सही/- x x x
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक:- २०९ | धुळे महानगरपालिकेतील मानधनावरील कनिष्ठ अभियंता, वाहन चालक,पंप ऑपरेटर व व्हॉलमन कर्मचारी यांची मुदत संपुष्टात येत असल्याने पुढील ६ महिन्यांसाठी नवीन नियुक्ती देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे . |
| म. नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले. |
| म.सभापती | मागचे जे वाहन चालक होते ठराव दिवाळीच्या आधी केला होता त्यांच्या आर्डर झाल्या का? |
| म.कार्यालय अधिक्षक | जे.सी.बी वाहन चालकांची ऑर्डर झाली आहे. |
| म.सभापती | वेतनवाढच्या फाईल चे काय झाले? |
| म.कार्यालय अधिक्षक | प्रस्ताव तयार करण्यांत येवून वरिष्ठांकडे स्वाक्षरीसाठी सादर करण्यांत आलेला आहे. |
| म.सभापती | आजच्या फाईलवर सहया घ्या. पदोन्तीचे काय झाले? किती कर्मचा-यांना लाभ दिला याची आकडेवारी सांगा |

म.अति.आयुक्त १ महिन्यापासून काम चालू आहे.आतापर्यंत ५ मिटींग घेतल्या आहे. बऱ्याच अडचणी आल्या होत्या त्यातून मार्ग काढून काम चालू आहे.जे लोक रिटायर्ड झाले त्यांनाही पदोन्नतीचा लाभ मिळणार आहे. मध्ये उपायुक्त मॅडमही रजेवर असलयामुळे काम बंद होते.

म.सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २२४ दिनांक १०/११/२०२२**

कनिष्ठ अभियंता अ क्र १ ते ११ यांना पुढील ६ महिने करीता नवीन नियुक्ती देणे बाबतच्या विषयावर मे. स्थायी समितीपुढे ठेवण्याबाबत मा आयुक्त सो यांनी मंजूरी दिलेली आहे.

तसेच अ क्र १२ ते २३वाहन चालक यांना पुढील ६महिने करीता नवीन नियुक्ती देणे बाबतच्या विषयावर मे स्थायी समितीपुढे ठेवण्याबाबत आयुक्त सो यांनी मंजूरी दिलेली आहे.

तसेच अ क्र २५ ते ३० व्हॉलमन व पंप ऑपरेटर यांना पुढील ६ महिने करीता नवीन नियुक्ती देणेबाबतच्या विषयावर मे स्थायी समितीपुढे ठेवण्याबाबत मा आयुक्त सो यांनी मंजूरी दिलेली आहे.

| अ क्र | उमेदवाराचे नाव | पदाचे नाव | मानधन रु | नेमुण दिलेल्या विभागाचे नाव | मुदत संपल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | पाटील वर्षा गंगाधर | कनिष्ठ अभियंता | २०,०००/- | बांधकाम / पा पु विभाग | २०/९/२०२२ |
| २ | कु चंदाबी शेख जाफर शेख | कनिष्ठ अभियंता | २०,०००/- | बांधकाम / पा पु विभाग | २०/९/२०२२ |
| ३ | शिंदे प्रणव किशोर | कनिष्ठ अभियंता | २०,०००/- | बांधकाम / पा पु विभाग | २०/९/२०२२ |
| ४ | मयुर राजेंद्र निकम | कनिष्ठ अभियंता | २०,०००/- | बांधकाम / पा पु विभाग | २०/९/२०२२ |
| ५ | भुषण मनोज ढवळे | कनिष्ठ अभियंता | २०,०००/- | बांधकाम / पा पु विभाग | २०/९/२०२२ |
| ६ | मोहनीश दिलीप पाटील | कनिष्ठ अभियंता | २०,०००/- | बांधकाम / पा पु विभाग | २०/९/२०२२ |
| ७ | स्वप्नील सुनिल थोरात | कनिष्ठ अभियंता | २०,०००/- | बांधकाम / पा पु विभाग | २०/९/२०२२ |
| ८ | पाटील अक्षय राजेंद्र | कनिष्ठ अभियंता | २०,०००/- | नगररचना विभाग | २०/९/२०२२ |
| ९ | ठाकरे पराग प्रदिप | कनिष्ठ अभियंता | २०,०००/- | विदयुत विभाग | २०/९/२०२२ |
| १० | गितेश दिलीप सोनार | कनिष्ठ अभियंता | २०,०००/- | विदयुत विभाग | २०/९/२०२२ |
| ११ | श्री निखील टकले | कनिष्ठ अभियंता | २०,०००/- | बांधकाम / पा पु विभाग | २०/९/२०२२ |
| १२ | प्रशांत नामदेव मुर्तडक | वाहन चालक | १२०००/- | अग्नीशमन विभाग | २६/११/२०२२ |
| १३ | प्रशांत राजेंद्र बाबर | वाहन चालक | १२०००/- | पा पु विभाग | २६/११/२०२२ |
| १४ | शाम भटू खंदरकर | वाहन चालक | १२०००/- | आरोग्य विभाग | २६/११/२०२२ |
| १५ | प्रदिप श्रीकिसन कांबळे | वाहन चालक | १२०००/- | आरोग्य विभाग | २६/११/२०२२ |
| १६ | गोपाल सिताराम माळी | वाहन चालक | १२०००/- | अग्नीशमन विभाग | २६/११/२०२२ |
| १७ | सिध्दार्थ महेशराव खैरनार | वाहन चालक | १२०००/- | अग्नीशमन विभाग | २६/११/२०२२ |
| १८ | आबासाहेब रमेश नेरकर | वाहन चालक | १२०००/- | आरोग्य विभाग | २६/११/२०२२ |
| १९ | निलेश रामभाऊ सोनवणे | वाहन चालक | १२०००/- | अग्नीशमन विभाग | १६/११/२०२२ |
| २० | विजय दिलीप माळी | वाहन चालक | १२०००/- | अग्नीशमन विभाग | १६/११/२०२२ |
| २१ | राहुल जिजाबराव पाटील | वाहन चालक | १२०००/- | अग्नीशमन विभाग | १६/११/२०२२ |
| २२ | विनोद प्रल्हाद थोरात | वाहन चालक | १२०००/- | आरोग्य विभाग | १६/११/२०२२ |
| २३ | चित्ते ईश्वर राजेश | वाहन चालक | १२०००/- | विदयुत विभाग | १६/११/२०२२ |
| २४ | अविनाश दाजी कुवर | वाहन चालक | १२०००/- | आरोग्य विभाग | १६/११/२०२२ |
| २५ | श्री. आकाश कैलास बोरसे | पंप ऑपरेटर | ८०००/- | पा पु विभाग | ३०/११/२०२२ |
| २६ | श्री. जमील पठाण | पंप ऑपरेटर | ८०००/- | पा पु विभाग | ३०/११/२०२२ |
| २७ | श्री.शशीकांत सदाशिव घोरपडे | व्हॉलमन | ८०००/- | पा पु विभाग | ३०/११/२०२२ |
| २८ | श्री. पवार तुषार वसंत | व्हॉलमन | ८०००/- | पा पु विभाग | ३०/११/२०२२ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २९ | श्री. वराडे विक्रांत जगदीश | व्हॉलमन | ८०००/- | पा पु विभाग | ३०/११/२०२२ |
| ३० | श्री. शेळके कुणाल चंद्रकांत | व्हॉलमन | ८०००/- | पा पु विभाग | ३०/११/२०२२ |

तरी उक्त मानधनावरील एकुण १ ते ३० कर्मचारी यांना मुदत संपल्याच्या दिनांकापासून ०५ दिवसाचा सेवा खंड देवून पुढील ०६ महिने कालावधीकरीता एकत्रित मानधनावर नवीन नियुक्ती देणेकरीता महानगरपालिका अधिनियम ५३ नुसार नेमणुकीचा अधिकार कोणामध्ये निहित असणे याबाबत खालीलप्रमाणे अधिनियमात तरतुद नमुद केलेली आहे.

तरी मंजूर कारर्यालयीन टिपणीनुसार अ क्र १ ते ३० मानधनावरील कर्मचारी यांना मुदत संपल्याच्या दिनांकापासून ०५ दिवसाची सेवा खंडीत करून एकत्रित मानधनावर पुढील ०६ महिने कालावधीकरीता नविन नियुक्ती देणेबाबतचा विषय महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३ (३) नुसार मे. स्थायी समित्ती पुढे ठेवणेबाबत निर्णयास्तव सविनय सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून उक्त अ क्र १ ते ३० मानधनावरील कर्मचारी यांना मुदत संपल्याच्या दिनांकापासून ०५ दिवसाची सेवा खंडीत करून एकत्रित मानधनावर पुढील ०६ महिने कालावधीकरीता नविन नियुक्ती देणेबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम५३ (३) नुसार मान्यता देण्यांत येत आहे. तसेच सदर प्रस्ताव व कार्यवाही बाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील. तसेच यापूर्वी मानधनावरील कर्मचा-यांचा मानधनवाढीचा प्रस्ताव मंजुर करण्यांत आलेला आहे.याबाबतही प्रशासनाने तात्काळ कार्यवाही करुन मानधन वाढ लागू करण्यांत यावी.

सुचक :- सौ. प्रतिभाताई शिवाजीराव चौधरी

अनुमोदक :- सौ. किरण राकेश कुलेवार

**सर्वानुमते मंजुर,**

सही/- x x x

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक:- २१० | धुळे मनपा नविन इमारतीमध्ये १०० के.व्ही.ए यु.पी.एस दुरूस्तीसाठी तातडीची बाब असल्याने रक्कम रू.८९०६३/- मात्र करण्यात आलेल्या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ४९ चे प्रकरण ६७(३) (क) प्रमाणे कार्योत्तर मान्यता देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे. |
| म. नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले. |
| म.सभापती | या विषयाची माहिती द्यावी. |
| म. विद्युत अभियंता | आपल्या इमारतीमध्ये १०० केव्हीए चा युपीएस बसवण्यात आला होता. २०१७ मध्ये प्रस्तापित केला होता. नासिकच्या ठेकेदाराकडे देखभाल दुरुस्ती होती. जे स्पेअर पार्ट होते हे त्यांच्या कंपनीच्या इंजिनिअरने भेट देऊन तपासले व दुरुस्त करुन घेतले. वैयक्तीक पेमेंट करुन ते काम तातडीने केले होते. |
| म.सभापती | अजूनपण विज गेल्यावर लाईट बंद पडत आहे. लोड जास्त आहे का आपला? |
| म. विद्युत अभियंता | काही संगणक, काही दिवे, काही पंखे असे सेपरेट केले आहे. बाकीची सिस्टीम बंद होते. |
| म.सभापती | परत एकदा सर्व लोड कॅल्क्युलेट करा. सभागृहात ही बऱ्याच वेळा अडचण येते. आपल्याकडे ३-४ सेट आहे. काही ऑटो सिस्टीम चालू होईल असे करा. |
| म. विद्युत अभियंता | २ जनरेटर सेट आहे एक ६५० केव्ही ए चे व एक २५० केव्ही ए चे आहे. |
| म.सभापती | येथे लावून घ्यावे. यातून तुमचेच काम सुरळीत होईल. बऱ्याचशा युपीएस कंपन्या आहे, ज्या महिन्याच्या महिन्याला बॅटऱ्यांचे पाणी चेक करतात. ५-५ वर्ष वॉरंटी मिळते. आपल्याला अभ्यास करा यावर व जनरेटरचे ही बघावे. |
| म. हर्षकुमार रेलन | विषय मंजूर करण्यांत यावा. |
| म..किरण अहिरराव | विषय मंजूर करण्यांत यावा. |

म. सभापती

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २२५ दिनांक १०/११/२०२२**

धुळे महानगपालिका नविन प्रशासकिय इमारत येथील १०० के.व्ही.ए चे यु.पी.एस दि.२९/०३/२०२२ रोजी नादुरूस्त झाले असुन म.न.पा धुळे महानगरपालिका नविन प्रशासकिय इमारत अंतर्गत व बाहय विदयुत व्यवस्था अंतर्गत ३ फेज १०० के.व्ही.ए.चे यु.पी.एस कामी दि.०६/०७/२०१७ नुसार कार्यादेश प्रमाणे२ वर्ष निगा दुरूस्ती कार्यकाळ संपण्यात आला आहे.

सदर १०० के.व्ही.ए चे यु.पी.एस सर्व्हिसिंग करण्यासाठीNovateur Electrical and Digital Systems pvt.limited,नागपुर कंपनी ला कोटेशन मागविण्यात आले होते.

यापुर्वी सदरची कंपनीकडुन १०० के.व्ही.ए यु.पी.एस च्या दुरूस्तीसाठी त्याचे सर्विसिंग ईंजिनियर यांच्याकडुन पाहणी करण्यात आली. परतु सदर यु.पी.एस चा डीस्प्ले व डीस्प्ले पॅनल नादुरूस्त असल्याने ते बदलणे करीता रक्कम रू.६०,८३२/-मात्र या कंपनीस महाराष्ट्र नगरपालिका अधिनिनियम ५(२)(२) नुसार तथा मनपा स्थायी समिती ठराव क्र.६३ दि.०२/०५/२०२२ नुसार खर्चास मान्यता घेऊन खर्चास मान्यता देण्यात आली.कंपनीचे प्रतिनिधी यांनी सदर यु.पी.एसचे डीस्प्ले व कन्टोल पॅलन बदलवुन यु.पी.एस. ची चाचणी घेतली.

सदर १०० के.व्ही.ए यु.पी.एस मध्ये ओव्हर हीटींग झाल्याने यु.पी.एस मध्ये १०० के इन्व्हर्टल कन्ट्रोल सर्किट शॉर्ट झाल्याचे सदरील बिघाड इनब्लिड २०० व्होल्ट ॲम्पीअर फॅन नादुरूस्त झाल्याचे निर्देशनास आले.त्याबाबत कंपनी ईंजिनिअर श्री.अनंत अय्यर यांनी सदर कामाबाबत दि. ०८/०६/२०२२ रोजी १०० के.व्ही यु.पी.एस करीता Contactor ३p १३० A २ No२NC AC-९८०८४९ बदलणे करीता १८ % जी.एस.टी करासह ३४५७९/- चे कोटेशन दिले. दि.३०/०८/२०२२ रोजी खर्चाचे अंदाजपत्रक दिले.सदरील १०० के.व्ही.ए यु.पी.एस कार्यान्वीत करणे करीता सदरचे काम करणे गरजेचे असल्याने सदरील खर्च १८% करासह मे. म्युरीक कंपनी,चैन्नई यांना तातडीने श्री.नरेंद्र बागुल यांचे वैयक्तीक खात्यातुन ४२,६८४/- मात्र देण्यात आले. त्यांच प्रमाणे दि.१८ ऑगस्ट २०२२ रोजी सर्विस चार्जेस १८% जी.एस.टी करासह ११,८००/- मात्र देण्यात आले.

मे.न्युरीक कंपनी,चैन्नई यांचे ईंजिनिअर सुबिगराज राजमणी यांनी दि.०८/०९/२०२२ रोजी संपुर्ण स्पेअर्स रिप्लेसमेन्ट करून दुरूस्तीसह १०० के.व्ही.ए यु.पी.एस कार्यान्वीत केला आहे.सोबत वरील प्रमाणे दुरूस्ती कामी बाबत मे.न्युरीक यु.पी.एस कंपनी चैन्नई यांच्याकडील ई-मेल पत्र कोटेशन पेमेन्ट केल्याची प्रत व कंपनीचा सर्विस रिपोर्टची कागदपत्रे सादर आहे.

करीता धुळे मनपा नविन इमारतीमध्ये १०० के.व्ही.ए यु.पी.एस दुरूस्तीसाठी तातडीची बाब असल्याने रक्कम रू.८९०६३/- मात्र करण्यात आलेल्या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ४९ चे प्रकरण ६७(३) (क) प्रमाणे कार्यात्तर मंजुरी होणेस मान्यतेस सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून धुळे मनपा नविन इमारतीमध्ये १००के.व्ही.ए यु.पी.एस दुरूस्तीसाठी तातडीची बाब असल्याने रक्कम रू. ८९०६३/- मात्र करण्यात आलेल्या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ४९ चे प्रकरण ६७(३)(क)प्रमाणे कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.तसेच सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील. तसेंच मनपा इमारतीमध्ये अद्ययावत जनरेटर व यंत्रणा बसविण्या बाबत कार्यवाही करावी.

सुचक :- श्री. हर्षकुमार राधेश्याम रेलन

अनुमोदक :- श्री. किरण हरिश्चंद्र अहिरराव

**सर्वानुमते मंजुर,**

सही/- x x x

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक:- २११ | धुळे महानगरपालिका नविन बडगुजर पाणी पुरवठा केंद्र येथील ट्रान्सफॉर्मर एल.टी च्या केबल दुरुस्ती काम तांतडीने मे. साई इले. धुळे यांच्याकडून करुन घेण्यांत आलेत त्यासाठी झालेला खर्च रु.५७८०८/- मात्र खर्चास मनपा अधिनियम ६७(३) अन्वये कार्योत्तर मान्यता देणेबाबत विचार करणे. |
| म. नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले. |
| म.सभापती | केबलला काय झाले होते? |
| म. विद्युत अभियंता | ती अंडरग्राउंड केबल होती.त्या ठिकाणी पाणी साचल्यामुळे केबल शॉर्ट झाली होती. आपण केबल नविन बदलली आहे. |
| म.सभापती | केबलला कोटींग करुन घेण्यांत यावे. सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे. |

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २२६ दिनांक १०/११/२०२२**

दिनांक ११/०८/२०२२ रोजी धुळे महानगरपालिका नविन बडगुजर जलकुंभ येथे केबलमध्ये ब्रेक झाल्यामुळे नविन बडगुजर जलकुंभ येथे विद्युत पुरवठा खंडित होता. याबाबत बडगुजर जलकुंभ येथील कर्मचारी यांनी दि.११/०८/२०२२ रोजी रिपोर्ट दिल्यानंतर संबंधित समक्ष पाहणी केली असताबडगुजर जलकुंभ येथे ट्रान्सफॉर्मर पासुन नविन पंप हाऊस पर्यतची केबल ९५ स्क्वेअर एम.एम केबल शॉर्ट झाल्याचे निदेर्शनास आले. दिनांक ११/०८/२०२२ रोजी पासून बडगुजर जलकुंभ येथील विद्युत पुरवठा या तांत्रिक बिघाडामुळे बंद स्थितीमध्ये होता. या कामी प्रत्यक्ष पाहणी करून L.T.cable ३ कोर १२० स्क्वेअर M.M केबल ची आवश्यकता असल्याने सदरची केबल मागविण्यात येऊन त्याचे पूर्णतः नवीन टर्मिनेशन करून जोडणी करण्यात आली.

सदरचे काम अत्यंत तातडीचे असल्याने मक्तेदार मे.साईइलेक्ट्रिक,धुळे यांच्याकडून करून घेण्यात आले. दिनांक १५/०८/२०२२ रोजी सदरचा विद्युत पुरवठा पूर्ववत जोडणी करून ट्रायल घेऊन कार्यान्वित करण्यात आला. याकामी सार्वजनिक बांधकाम विद्युत विभाग यांचे सन २०२२ — २३ च्या दरसूची प्रमाणे व १८ % जीएसटी करासह ५७८०८/- मात्र खर्च आहे. सदरचे काम तातडीचे असल्याने व मनपा पाणी पुरवठा केंद्र येथील अत्यवश्यक सेवेतील असल्याने तात्काळ करून घेण्यात आले.

सदरच्या कामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७ (३) प्रमाणे मान्यता होण्यास तसेच सदरच्या कामी खर्च रक्कम रुपये ५७८०८/-मात्र खर्चास कार्योत्तर मंजुरी स्तव मे.स्थायी समिती पुढे सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून धुळे महानगरपालिका नविन बडगुजर पाणी पुरवठा केंद्र येथील ट्रान्सफॉर्मर एल.टी च्या केबल दुरुस्ती काम तांतडीने मे. साई इले. धुळे यांच्याकडून करुन घेण्यांत आलेत त्यासाठी झालेला खर्च रु.५७८०८/- मात्र खर्चास मनपा अधिनियम ६७(३) अन्वये कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे. तसेच सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील. सुचक :- श्री. हर्षकुमार राधेश्याम रेलन

अनुमोदक :- श्री. किरण हरिश्चंद अहिरराव **सर्वानुमते मंजुर,**

सही/- x x x

**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक:- २१२ | धुळे मनपा कार्यक्षेत्रातील भटकी व मोकाट कुत्र्याचे निर्बिजीकरण शस्त्रक्रीया व बंदोबस्त करण्याकामी ई-निविदा दर मागविण्यात आलेत.त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर फेर विचार करणे. |
| म. नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले. |
| म. सभापती | अति.आयुक्त यांनी याबाबत माहिती द्यावी. |
| म. अति.आयुक्त | आजच्या सभेत मोकाट कुत्र्यांचे निर्बीर्जीकरणाचा विषय आला आहे. मागच्या वेळेस आपण हा विषय केला होता.जे संबंधित L1 ठेकेदार आहे त्यांनी काम करण्यांस असमर्थता दर्शीवली आहे. अत्यावश्यक |

सेवेचे काम आहे. नविन निविदा ठेवण्यापेक्षा मागच्या वेळेस स्थायी समितीत निवेदन दिले होते. L 1 जर काम करत नसेल L2 साठी विषय ठेवा. स्थायी समितीच्या निर्णयाचा अधिकारात तो प्रस्ताव पाठविला आहे,त्या अनुषंगाने हा विषय आणला आहे.

म. नाजियाबानो पठाण — कुत्र्यांचा विषय ब-याच दिवसापासून सुरु आहे.प्रत्यक्ष काम कधी सुरु होणार आहे. याबाबत खुलासा करावा.

किरण राकेश कुलेवार — विषय मंजुर करण्यांत यावा.

म. सभापती — त्याअनुषंगाने L 1 यांनी काम करण्यांस दाखविलेली असमर्थता व त्यांचा नकारात्मक प्रतिसाद तसेच कामाची अतितात्काळ स्वरुप लक्षांत घेता सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने प्रशासनाने तांतडीने या निविदेतील L2 धारकांना वाटाघाटीसाठी बोलविण्यास व त्यानुसार पुढील कार्यवाही तात्काळ करण्यास मान्यता देण्यांत येत आहे

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २२७ दिनांक १०/११/२०२२**

धुळे महानगरपालिका कार्यक्षेत्रातील भटकी व मोकाट कुत्रे निर्बिजीकरण व शस्त्रक्रीया करण्याकामी ई-निविदा प्रसिध्द करण्यात आलेली होती. सदर ई-निविदेत ३ संस्थांनी सहभाग घेवुन सर्वात कमी दर प्रति श्वान रु.८८०/-वाटाघाटी अंती सादर केल्याने दर मंजुरी करीता मे.स्थायी समितीपुढे सादर करण्यात आले होते.

उक्त बाबत मे.स्थायी समिती ठराव क्र.१३९ दि.२९/८/२०२२ अन्वये निविदाधारकाने सादर केलेले दर जास्तीचे असल्याने मनपाच्या आर्थिक हिताच्या दृष्टीने याबाबत सखोल माहिती घेवुन तसेच दराबाबत वाटाघाटी करण्यासाठी संबंधीत निविदाधारकाला पुनश्च वाटाघाटीसाठी बोलविण्यात यावे व याबाबत मे.स्थायी समितीला अवगत करावे तोपावेतो सदर प्रस्तावास तहकुब ठेवण्यास मान्यता दिलेली होती.

तरी स्थायी समितीने दिलेल्या निर्देशानुसार सर्वोदय गो शाळा चॅरीटेबल ट्रस्ट, वर्धा यांना सादर केलेल्या दराच्या वाटाघाटी करीता व कामाचे सादरीकरणासाठी तात्काळ उपस्थित राहणे बाबत दि.२९/८/२०२२ रोजी पत्र दिले होते.

तरी सदर पत्रानुसार सर्वोदय गो शाळा चॅरीटेबल, वर्धा यांचे दि.२९/८/२०२२ च्या पत्रानुसार दर वाटाघाटी करण्यास नकार देवुन सादरीकरण बाबत Googel Meet द्वारे ऑनलाईन सादरीकरणसाठी तयार असले बाबत कळविले होते.

तरी याबाबत विभागाने दि.२९/८/२०२२ रोजी मे.स्थायी समितीपुढे फेर निर्णयार्थ अहवाल सादर केलेला आहे.

उक्त बाबत मे. महासभा ठराव क्र.१०१ दि.१/९/२०२२ अन्वये धुळे मनपा कार्यक्षेत्रातील भटकी व मोकाट कुत्र्याचे निर्बिजीकरण व बंदोबस्त करणेकामी खाजगी तत्वावर ३ वर्षाकरीता निविदा प्रक्रिया राबविण्याबाबत मान्यता दिलेली असुन सदर प्राप्त निविदेत आलेले दर हे जास्तीचे दिसुन येत आहे. संबंधीत निविदेत L-२ निविदाधारक यांनी दर कमी करणे बाब पत्र सादर केलेले आहे. त्यानुसार मनपाच्या आर्थिक परिस्थितीचा विचार करता प्रशासनाने दराबाबत वाटाघाटी करुन तातडीने सुरु करणे बाबत निर्देश दिलेले आहे.

याबाबत स्थायी समिती ठराव क्र.१६४ दिनांक ५/९/२०२२ अन्वये संबंधीत ठेकेदाराला दराबाबत वाटाघाटीसाठी बोलविले होते. परंतु ते प्रत्यक्षात उपस्थित झाले नाहीत. तसेच त्यांनी गुगल मिटवर प्रात्यक्षीक देणे बाबत कळविले आहे. त्यातील L-२ निविदाधारकाने L-१ निविदाधारकाने दिलेल्या दरपेक्षा कमी दराने काम करणे बाबत कळविले आहे. मनपाच्या आर्थिक हिताचा विचार करुन सदर प्रस्ताव बाबत प्रशासनाने पुनश्च L-२ निविदाधारकाशी वाटाघाटी करुन तात्काळ स्थायी समितीपुढे सादर करावा. तो पावेतो सदर प्रस्ताव तहकुब ठेवण्यास मान्यता दिलेली आहे.

परंतु नियमानुसार L-१ निविदाधारक सर्वोदय गो शाळा वर्धा हे काम करण्यास असमर्थता दर्शवीत नाही तो पर्यत L-२ निविदाधारक यांना काम देता येवु शकत नाही. तसे केल्यास भविष्यात कायदेशीर अडचण येवु शकते.

उक्त बाबत सर्वोदय गो शाळा वर्धा यांना शेवटची संधी म्हणुन नोटीस मिळाल्यापासुन २४ तासांच्या आत महानगरपालिकेत सदर कामाचे प्रेझेंटेशन व दराच्या वाटाघाटी करीता उपस्थित राहणे बाबत नोटीस देण्यात आली होती.

उक्त बाबत सर्वोदय गो शाळा यांनी दि.१५/९/२०२२ रोजी कामाचे सादरीकरण साठी उपस्थित राहणार असल्याबाबत ई-मेलद्वारे पत्र सादर केले होते. त्यानुसार संस्थेचे प्रतिनिधी कार्यालयात उपस्थित राहुन कामाची माहिती दिली असुन दर वाटाघाटी करण्यास नकार दिला आहे.

तरी सर्वोदय गो शाळा वर्धा यांनी उक्त निविदेत सादर केलेले वाटाघाटी अंती प्रति श्वान रु.८८०/- या दरास मंजुरी करीता मे.स्थायी समितीपुढे सादर करण्याबाबत अहवाल ठेवण्यात आला होता.

उक्त बाबत मे.स्थायी समिती ठराव क्र.२०८ दि.६/१०/२०२२ अन्वये या निविदेत आलेले L-१ ठेकेदार यांनी समाधानकारक प्रतिसाद दिलेला नाही तसेच त्यांनी निश्चित केल्या प्रमाणे प्रात्यक्षिक देखील दिलेले नाहीत. व दर वाटाघाटी करण्यांसही नकार दिलेला आहे त्यामुळे सदर ठेकेदारच्या कार्यक्षमतेबाबत साशंकता निर्माण होत आहे. सदर ठेका हा ३ वर्ष दीर्घ मुदतीसाठी आहे. त्यामुळे मनपाच्या आर्थिक हिताचा विचार करणेही आवश्यक आहे. L-१ यांना अनेक वेळा सादरीकरणासाठी समक्ष बोलविण्यात आले. तथापि ते प्रत्येक वेळी अनुपस्थित राहिले. त्यामुळे ते काम कशा पध्दतीने करणार आहेत याबाबतची माहिती या सभागृहास प्राप्त झाली नाही. तेव्हा शासन निर्णय व शासन नियम अटी प्रमाणे L-१ ठेकेदार सर्वोदय गो शाळा वर्धा यांची आलेले निविदा दर प्रती श्वान रु.८८०/- मात्र स्वीकारण्यास सद्यस्थितीत मान्यता देण्यात येत आले. तथापी L-१ यांचे एकंदर प्रतिसाद पाहता त्यांना सात दिवसात करारनामा करुन देणे व काम सुरु करण्याचे प्रशासनाने शासन निर्णयाप्रमाणे स्वत:च्या जबाबदारीवर संबंधीतांना करारनामा करुन देण्याचे निर्देश देण्यात यावेत. व ७ दिवसांच्या मुदतीत L-१ यांनी काम सुरु केले नाही तर सदर काम हे अत्यावश्यक सेवेतील असल्याने व शहरामध्ये कुत्र्यांची प्रचंड समस्या निर्माण झालेली असल्याने सदर कामाची तात्काळ आवश्यकता पाहता ७ दिवसात L-१ यांनी करारनामा करुन काम सुरु न केल्यास प्रशासनाने कामाचे अत्यावश्यक स्वरुप पाहता पर्यायी व्यवस्था म्हणुन L-२ यांचा विचार करण्यासाठी स्थायी समितीपुढे तात्काळ सादर करणे बाबत निर्देश दिले आहेत.

उक्त सर्वोदय गो शाळा, वर्धा यांना सदरचे काम सुरु करावयाचे असल्याने करारनामा करण्याकरीता ७ दिवसाच्या आत धुळे मनपा आरोग्य विभागात योग्य तो मुद्रांकासहीत समक्ष उपस्थित राहण्याबाबत पत्र देण्यात आले होते.

L-१ सर्वोदय गो शाळा यांना वारंवार मनपा मार्फत योग्य ती संधी देवुनही उक्त पत्रानुसार काम करण्यास इच्छुक नसल्याचे दिसुन येत आहे. तरी शहरात मोकाट व भटक्या कुत्र्यांचा प्रादुर्भाव वाढत असल्याने व याबाबतची समस्या पाहता काम तात्काळ सुरु करणे आवश्यक आहे.मे.स्थायी समिती ठराव क्र.२०८ दि.६/१०/२०२२ अन्वये ७ दिवसाच्या मुदतीत L-१ यांनी करारनामा करुन काम सुरु न केल्यास प्रशासनाने कामाचे अत्यावश्यक स्वरुप पाहता पर्यायी व्यवस्था म्हणुन L-२ यांचा विचार करण्यासाठी स्थायी समितीपुढे तात्काळ सादर करणे बाबत निर्देश दिलेले आहेत.तरी सदर प्राप्त निविदेत एकुण ३ निविदाधारक यांनी भाग घेतला असता L-२ म्हणुन दोन संस्थांनी समान दर दिलेले आहेत.

L 1 यांनी काम करण्यास असमर्थता व्यक्त केलेली आहे. तथापी प्रस्तुत काम अति तात्काळ स्वरुपाचे झालेले आहे.

शहरात कुत्र्यांची स्थिती (संख्यात्मक) धोकेदायक स्वरुपाची झालेली आहे.

मा.जिल्हाधिकारी धुळे यांनी आज दि.७/११/२०२२ च्या दुपारी १२.३० वाजेच्या बैठकीत विशेष बैठक घेऊन त्यात कोणत्याही परिस्थितीत गुरुवात पर्यंतच्या स्थायी समिती बैठकीपर्यंत निर्णय अंतीम करण्याचे निर्देश दिलेले आहेत.

स्थायी समितीनेही ठराव क्र.२०८ दि.६/१०/२०२२ अन्वये ४ करारनामा करीत नसल्यास L-२ यांचा विचार करण्यासाठी स्थायी समितीसमोर सादर करण्याचे निर्देश दिलेले आहेत.

च्तरी उक्त वस्तुस्थितीचे अवलोकन करता सक्षम प्राधिकरण म्हणुन स्थायी समितीपुढे सादर करण्याच्या निर्णयार्थ सादर असे निर्देश दिले आहे. त्यानुसार सदर प्रस्ताव मे.स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

त्याअनुषंगाने L1यांनी काम करण्यांस दाखविलेली असमर्थता व त्यांचा नकारात्मक प्रतिसाद तसेच कामाची अतितात्काळ स्वरुप लक्षांत घेता सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने प्रशासनाने तांतडीने या निविदेतील L2 धारकांना वाटाघाटीसाठी बोलविण्यास व त्यानुसार पुढील कार्यवाही तात्काळ करण्यास मान्यता देण्यांत येत आहे.

सुचक :- श्रीमती नाजियाबानो नासिर पठाण

अनुमोदक :- सौ. किरण राकेश कुलेवार

**सर्वानुमते मंजुर,**

सही/- x x x

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

# धुळे महानगरपालिका,धुळे

## नगरसचिव कार्यालय

### स्थायी समिती सभा क्रमांक २७ चे इतिवृत्त

---

**धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह**
**गुरुवार दिनांक २४/११/२०२२**
**वेळ सकाळी ११-०० वाजतां**

धुळे महानगरपालिकेची स्थायी समितीची साप्ताहिक सभा क्रं.२७ आज गुरुवार दिनांक **२४/११/२०२२** रोजी सकाळी ११-०० वाजतां श्री.शितल मोहन नवले, सभापती, स्थायी समिती, मनपा धुळे यांच्याअध्यक्षतेखाली **धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृहात** भरली. या सभेस खालील सन्मा.सदस्य हजर होते.

| अ.क्रं. | सदस्यांचे नांव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री.नवले शितल मोहन | सभापती |
| २ | श्री. जाधव संजय सुधाकर | सदस्य |
| ३ | श्री. बोरसे नागसेन दामोदर | सदस्य |
| ४ | श्रीमती कुलेवार किरण राकेश | सदस्या |
| ५ | श्रीमती वराडे वैशाली भिकन | सदस्या |
| ६ | श्री.जाधव बन्सीलाल माणिक | सदस्या |
| ७ | श्रीमती चौधरी मंगला अर्जुन | सदस्या |
| ८ | श्री.अन्सारी फातमा नुरुल अमीन | सदस्या |
| ९ | श्री. चौधरी नरेंद्र रुपला | सदस्य |
| १० | श्रीमती चौधरी प्रतिभा शिवाजीराव | सदस्या |
| ११ | श्री. अहिरराव किरण हरिश्चंद्र | सदस्य |
| १२ | श्री. रेलन हर्षकुमार राधेश्याम | सदस्य |
| १३ | श्री.अन्सारी अब्दुल लतीफ अब्दुल हमीद | सदस्य |
| १४ | श्रीमती पठाण नाजियाबानो नासिर खा | सदस्या |
| १५ | श्रीमती अग्रवाल सारिका प्रवीण | सदस्या |

**उपस्थित अधिकारी गण**

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. नितीन कापडणीस | अति.आयुक्त |
| २ | श्रीमती पल्लवी शिरसाठ | कर मुल्य निर्धारण अधिकारी |
| ३ | श्री. मनोज अरविंद वाघ | नगरसचिव |
| ४ | श्री. गजानन पाटील | मुख्य लेखाधिकारी |
| ५ | श्री. के.एन. शिंदे | अभियंता |
| ६ | डॉ. श्री.एम.आर. शेख | प्र.आरोग्याधिकारी |
| ७ | श्री. लक्ष्मण पाटील | सहा.आरोग्याधिकारी |

| | | |
|---|---|---|
| ८ | श्री. राजेश वसावे | सहा. आरोग्याधिकारी |
| ९ | श्री. विकास साळवे | मलेरिया पर्यवेक्षक |
| १० | श्री. संजय मोरे | प्र.कार्यालय अधिक्षक |
| ११ | श्री. किशोर सुडके | प्र.परवाना अधिक्षक तथा बाजार विभाग प्रमुख |
| १२ | श्री. एन.के. बागुल | विद्युत अभियंता |
| १३ | श्री. महेंद्र सोनवणे | प्रशासन अधिकारी मनपा शि.मंडळ |
| १४ | श्री. राजू माईनकर | भांडारपाल तथा आरोग्य विभाग प्रमुख |
| १५ | श्री. पी.डी. चव्हाण | ओव्हरसिअर बांधकाम |
| १६ | श्री. कमलेश सोनवणे | ओव्हरसिअर नगररचना विभाग |
| १७ | श्री. हेमत पावटे | ओव्हरसिअर बांधकाम |
| १८ | श्री. मधुकर निकुंभे | निरीक्षक, मालमत्ता कर विभाग |
| १९ | श्री. दुष्यंत महाजन | अग्नीशमन विभाग |
| २० | श्री..एस.एस. घटी | अतिक्रमण विभाग |
| २१ | श्री. बासीत पठाण | सिस्टीम मॅनेजर |

म. सभापती — सन्मा.सदस्य मा.अति.आयुक्त सो.सर्व अधिकारी कर्मचारी व पत्रकार,छायाचित्रकर बांधव यांचे मी स्थायी समितीच्या बैठकीत स्वागत करतो.सभेचा कोरम पुर्ण झाला असुन नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरु करावे.

म. नगरसचिव — वंदे मातरम् या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

विषय क्रमांक :- २१३ — मागील स्थायी समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे. (दि.०६/१०/२०२२)

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. नागसेन बोरसे — इतिवृत्त वाचून कायम करण्यांत यावे.

म. बन्सीलाल जाधव — इतिवृत्त वाचून कायम करण्यांत यावे.

म. सभापती — मागील स्थायी समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर२२८ दिनांक २४/११/२०२२**

मागील स्थायी समिती सभा दिनांक ०६/१०/२०२२ रोजीच्या सभेतील धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १९७ ते २०९ अखेर तसेच मे.स्थायी समिती सभेत सन्मा.सदस्यांनी केलेली चर्चा व त्यावरील निर्णय क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

सही/-x x x

**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- २१४ — मा.आयुक्त सो.यांनी त्यांचे आलेल्या अधिकारात रुपये ५ लाख ते २५ लाखापर्यंत बांधकाम विभागा कडील विकास कामाची यादी प्रकरण ७ (ड) अन्वये दि.३१/१०/२०२२ ते दि.११/११/२०२२अखेर निर्गमित केलेल्या कार्यादेशाची यादी अवलोकनासाठी मे.स्थायी समिती पुढे सादर.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.किरण अहिरराव — विषयाचे अवलोकन करण्यांत आले आहे.

म. सभापती — मा.आयुक्त सो.यांनी त्यांचे आलेल्या अधिकारात रुपये ५ लाख ते २५ लाखापर्यंत बांधकाम विभागा कडील विकास कामाची यादी प्रकरण ७ (ड) अन्वये दि.३१/१०/२०२२ ते दि.११/११/२०२२ अखेर निर्गमित केलेल्या कार्यादेश अवलोकन करण्यांत आले.

## धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २२९ दिनांक २४/११/२०२२

मा.आयुक्त सो. यांनी त्यांचे आलेल्या अधिकारात रुपये ५ लाख ते २५ लाखापर्यंत बांधकाम विभागाकडील विकास कामाची यादी प्रकरण ७ (ड) अन्वये दि.३१/१०/२०२२ ते दि.११/११/२०२२ अखेर निर्गमित केलेल्या कार्यादेशाची यादी अवलोकनासाठी मे.स्थायी समिती पुढे सादर केली आहे. त्याचे अवलोकन करुन सर्वांना माहिती देण्यांत आली.

**दिनांक :- दि.३१/१०/२०२२ ते दि.११/११/२०२२ अखेर निर्गमित केलेल्या विकास कामांच्या कार्यादेशची यादी**

| अ.क्र | कार्यादेश क्रमांक | दिनांक | कामांचे नाव | रक्कम | निधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | ३४० | ३१/१०/२०२२ | प्र.क्र.०१मध्ये ओमनगर येथे ठाकरे यांच्या घरा पासुन ते श्री.कोळी यांच्या घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | २३११९२५ | नागरी दलित वस्ती सुधार योजना सन २०२१-२२ अंतर्गत |
| २ | ३४१ | ३१/१०/२०२२ | प्र.क्र.०१मध्ये श्रमसाफल्य कॉलनी भागात ॲड. देशमुख ते जगदेव यांच्या घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | ११९७८७३ | नागरी दलित वस्ती सुधार योजना सन २०२१-२२ अंतर्गत |
| ३ | ३४२ | ३१/१०/२०२२ | प्र.क्र.०१मध्ये मयुरी थोरात यांच्या घरापासुन ते मुन्ना ठाकुर यांच्या घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | २३९७७१४ | नागरी दलित वस्ती सुधार योजना सन २०२१-२२ अंतर्गत |
| ४ | ३४४ | ०१/११/२०२२ | प्र.क्र.१७ मध्ये श्री.शितलभाऊ नवले सभापती यांचे निधीतुन सीताराम माळी चाळ येथील ओपनस्पेसला पेव्हिंग ब्लॉक बसविणे. | २३०५७६० | मनपा निधी (नगरसेवक निधी) अंतर्गत सन २०२२-२३ |
| ५ | ३५१ | ०३/११/२०२२ | प्र.क्र.११ मध्ये स्वामी नारायण कॉलनी येथे रघुनाथ चौधरी ते गोविंद चौधरी यांचे घरापर्यंत आर.सी.सी. पाईप गटार करणे. | ५०७००० | नगरसेवक निधी अंतर्गत सन २०२१-२२ |
| ६ | ३५४ | ०३/११/२०२२ | प्र.क्र.२मध्ये अजय नगर भागात सर्व्हे नं.४४ /१/२ येथे ओपनस्पेसला संरक्षण भिंत बांधणे. | २४९३३९६ | मनपा निधी(ओपन स्पेस विकसित करणे)अंतर्गत सन २०२१-२२ |
| ७ | ३५६ | ०३/११/२०२२ | प्र.क्र.११ मध्ये लक्ष्मी नगर श्री.धनगर यांचे घरापासुन ते विजय यांचे घरापावेतो रस्ता काँक्रीटीकरण करणे. | ९९६३३७ | महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान(जिल्हास्तर) योजना सन २०२१-२२अंतर्गत |
| ८ | ३५९ | ०३/११/२०२२ | प्र.क्र.२मध्ये मंगलमूर्ती कॉलनी भागात डॉ. ठाकुरयांच्याघरापासुन तेश्री. आर.एस. कुलकर्णी यांचे घरापावेतो रस्ता काँक्रीटीकरण करणे. | ९९६७८९ | महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान(जिल्हास्तर) योजना सन २०२१-२२ अंतर्गत |
| ९ | ३६० | ०३/११/२०२२ | देवपुर भागातील सुयोग कॉलनी आग्रारोड श्री.प्रदीप भदाणे ते टागोर कॉलनी ते किशोर कानुगो यांचे घरापावेतो रस्ता डांबरीकरण करणे. | १४९७३४१ | महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान(जिल्हास्तर) योजना सन २०२१-२२ अंतर्गत |
| १० | ३६१ | ०४/११/२०२२ | प्र.क्र.१३ मध्ये स.नं.३६४ भागातील ओपन स्पेसला विकसित करणे. | ८८१९७३ | नगरसेवक निधी अंतर्गत सन २०२०-२१ |
| ११ | ३६५ | ०४/११/२०२२ | प्र.क्र.११ मध्ये नवनाथ नगर मधु चौधरी यांच्या घरापासुनते भोई प्लंबर यांच्या घरापर्यंत रस्ता काँक्रीट करणे. | ९९६३३७ | महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान(जिल्हास्तर) योजना सन २०२१-२२ अंतर्गत |
| १२ | ३७० | ०९/११/२०२२ | प्र.क्र.१२ मध्ये मिल्लत नगर भागात खलिल ड्रायव्हरयांच्या घराजवळीलरस्ता काँक्रीट करणे. | ७२८६०६ | नगरसेवक निधी अंतर्गत सन २०२१-२२ |
| १३ | ३७४ | ०९/११/२०२२ | प्र.क्र.१९ मध्ये शाह बावा यांचे घरापासुन ते सुल्तानिया गार्डन पावेतो काँक्रीट गटार करणे. | ९६०५११ | नगरसेवक निधी अंतर्गत सन २०२१-२२ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १४ | ३७७ | ०९/११/२०२२ | प्र.क्र.१८ मध्ये संतोषी माता नगर भागात भटू सोनवणे यांच्या घरापासून ते साहेबराव जाधव यांचे घरापर्यंत रस्ता कॉक्रीट करणे. | ९९८९८८ | नागरी दलित वस्ती सुधार योजना सन २०२१-२२ अंतर्गत |
| १५ | ३७८ | ०९/११/२०२२ | प्र.क्र.१९ मध्ये १०० फुटी रोड वरील शेतकरी ॲग्रो ॲण्ड फेब्रीकेशन व वर्कशॉप ते हिदायत मस्जिद पावेतो रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | ९९९८१४ | नगरसेवक निधी अंतर्गत सन २०२२-२३ |
| १६ | ३७९ | ०९/११/२०२२ | प्र.क्र.१९ मध्ये १०० फुटी रस्ता सुमैय्या हॉल मागे बेकरी तेअन्सारी मुकादम,वकील सर ते अ. वायरमन, मेहमुद पहेलवान ते आतिफ भंगार वाले ते पुर्व हुडको, हिदायत मस्जिद समोर इ.ठिकाणी गटार करणे. | ९९९८५६ | नगरसेवक निधी अंतर्गत सन २०२२-२३ |
| १७ | ३८० | १०/११/२०२२ | प्र.क्र.१७मध्ये हरिओम कॉलनी येथील ओपन स्पेसला वॉल कंपाऊंड सुशोभिकरण करणे. | १९२९४५३ | मनपा निधी अंतर्गत सन २०२०-२१ |
| १८ | ३८१ | १०/११/२०२२ | प्र.क्र.१७मध्ये मुलभुत सोयी सुविधांचा विकास योजने अंतर्गत गाळणकर नगर भागात रस्ता कॉक्रीटीकरण करणे व बंदिस्त गटार करणे. | २२२०३१७ | मुलभुत सोईसुविधांचा विकास योजने अंतर्गत सन २०२०-२१ |
| १९ | ३८४ | ११/११/२०२२ | तापी पाणीपुरवठा योजनेच्या सुखवद पंपिंग स्टेशन येथीलपंप हाउस दुरुस्ती कामेवअन्य दुरुस्ती करणे. | २४१२२१७ | पाणीपुरवठा पंपिंग स्टेशन निगा व दुरुस्ती सन २०२१-२२ |
| २० | ३८५ | ११/११/२०२२ | प्र.क्र.१७मध्ये धुळे मनपा हद्दीतील मिल परिसरा तील अहिल्यादेवी नगर भागात श्री.पिंटू करणे घर ते श्री.अशोक टकले ते श्री.ठाकूर ते मनोज पाटील यांच्या घरापावेतो रस्ता कॉक्रीट करणे | २४८२८८७ | सहाय्यक अनुदान अंतर्गत सन २०२१-२२ |
| २१ | ३८६ | ११/११/२०२२ | प्र.क्र.१७मध्ये धुळे मनपा हद्दीतील मिल परिसरा तील शिवशक्ती कॉलनी श्री.राजपुत घर ते श्री. अरविंदसदरे यांच्या घरापावेतो रस्ताकॉक्रीट करणे. | २४८२८८७ | सहाय्यक अनुदान अंतर्गत सन २०२१-२२ |
| २२ | ३८७ | ११/११/२०२२ | प्र.क्र.१७ मध्ये धुळे मनपा हद्दीतील मिल परिसरात हरिओम कॉलनी श्री.गणेश देशपांडे ते श्री.चारुदत्त राजपूत ते शरद दिवसे ते चक्कीवाले सोनार यांच्या घरापावेतो रस्ता कॉक्रीट करणे. | २४९४७०३ | सहाय्यक अनुदान अंतर्गत सन २०२१-२२ |
| २३ | ३८८ | ११/११/२०२२ | प्र.क्र.१७ मध्ये धुळे मनपा हद्दीतील मिल परिसरातील शिवशक्ती कॉलनी श्री.गोविंद लोहार घर ते श्री.वच्छाव यांच्या घरापावेतो रस्ता कॉक्रीट करणे. | २४९४७०३ | सहाय्यक अनुदान अंतर्गत सन २०२१-२२ |
| २४ | ३९० | ११/११/२०२२ | प्र.क्र.९ मध्ये पारोळा रोड किशोर मुंदडा ते नगरपट्टी गावकरी ऑफिस पावेतो बंदिस्त गटार करणे. | १९८०८७४ | महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान (जिल्हास्तर) योजना सन २०२१-२२ अंतर्गत |
| २५ | ३९२ | ११/११/२०२२ | प्र.क्र.६ मध्ये समृद्धी नगर ते निंबा झोपा यांच्या घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | २४९७६०१ | हद्दवाढ क्षेत्र उत्पन्न निधी अंतर्गत |

सही/-x x x

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- २१५ धुळे मनपातील एकत्रित मानधनावरील स्वच्छता निरीक्षक यांना मुदतवाढ देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.
म.प्रतिभाताई चौधरी — सदरचा विषय मंजूर करण्यात यावा.
म.किरण अहिरराव — विषय मंजूर करण्यात यावा.
म.सभापती — सर्व सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २३० दिनांक २४/११/२०२२**

उक्त मानधनावरील स्वच्छता निरीक्षक यांना पुढील ६ महिने कालावधीकरीता एकत्रित मानधनावर जा क्र /धुमपा /आस्था /१०५४ दि.२३/१२/२०२१ अन्वये नियुक्ती आदेश देण्यात आले होते.

त्याअनुषंगाने खालील स्वच्छता निरीक्षक यांनी पुनश्च ६ महिने कालावधीकरीता मुदतवाढ मिळणेबाबत विनंती अर्ज सादर केलेला आहे.

खालील नमुद स्वच्छता निरीक्षक यांच्या नियुक्तीचा कालावधी दि.२१/१०/२०२२ रोजी संपुष्ठात येत आहे.

| अ क्र | उमेदवारचे नाव | पदाचे नाव | मानधन रुपये | संपुष्ठात आलेली दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | श्री गौरव अशोक माळी | स्वच्छता निरीक्षक | १२,०००/- | दि २१/१०/२०२२ |
| २ | श्री मनिष अशोक आघाव | स्वच्छता निरीक्षक | १२,०००/- | |

सदर प्रकरणी स्वच्छता आरोग्य विभाग यांनी आरोग्य विभागात स्वच्छता निरीक्षक यांच्या कामाची निकड पाहता उक्त दोन्ही स्वच्छता निरीक्षक यांना पुढील ६ महिनेकरीता मुदतवाढ देणेबाबत अहवाल सादर केलेला आहे.

उक्त मानधनावरील स्वच्छता निरीक्षक यांना मुदत संपल्याच्या दिनांकापासून ०५ दिवसाचा सेवा खंड देवून पुढील ०६ महिने कालावधीकरीता एकत्रित मानधन रु.१२,०००/- मात्र मानधनावर नवीन नियुक्ती देणेकरीता महानगरपालिका अधिनियम ५३ नुसार नेमणुकीचा अधिकार कोणामध्ये निहित असणे याबाबत खालीलप्रमाणे अधिनियमात तरतुद नमुद केलेली आहे.

उक्त मानधनावरील स्वच्छता निरीक्षक यांना मुदत संपल्याच्या दिनांकापासून ०५ दिवसाची सेवा खंडीत करून एकत्रित मानधनावर पुढील ०६ महिने कालावधीकरीता नविन नियुक्ती देणेबाबतचा विषय महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३ (३) नुसार मे. स्थायी समिती पुढे ठेवणेबाबत निर्णयास्तव सविनय सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून उक्त अ क्र १ ते २ मानधनावरील कर्मचारी यांना मुदत संपल्याच्या दिनांकापासून ०५ दिवसाची सेवा खंडीत करून एकत्रित मानधनावर (नविन प्रस्तावित मानधनवाढीनुसार) पुढील ०६ महिने कालावधीकरीता नविन नियुक्ती देणेबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३ (३) नुसार मान्यता देण्यांत येत आहे. तसेच सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील. तसेच यापूर्वी मानधनावरील कर्मचा-यांचा मानधनवाढीचा प्रस्ताव मंजुर करण्यांत आलेला आहे. याबाबतही प्रशासनाने तात्काळ कार्यवाही करुन मानधन वाढ लागू करण्यांत यावी.

सुचक :- सौ. प्रतिभाताई शिवाजीराव चौधरी
अनुमोदक :- श्री.किरण हरिशचंद्र अहिरराव

**सर्वानुमते मंजुर,**
सही/-x x x
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक:- २१६ | सुवर्ण जयंती नगरोत्थान योजना अंतर्गत सन २०२१-२२ प्र.क्र.१० मध्ये रवी माळी यांचे घरापासून ते शालिक यांचे घरापर्यंत ते उमेश शिंपी यांच्या घरापावेतो रस्ता कॉंक्रीट करणेचे निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे. |
| म.नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले. |
| म. वैशाली वराडे | विषय मंजूर करण्यांत यावा. |
| म. किरण कुलेवार | विषय मंजूर करण्यांत यावा. |
| म. सभापती | सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे. |

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २३१ दिनांक २४/११/२०२२**

सुवर्ण जयंती नगरोत्थान योजना अंतर्गत सन २०२१-२२ प्र.क्र.१० मध्ये रवी माळी यांचे घरापासून ते शालिक यांचे घरापर्यंत ते उमेश शिंपी यांच्या घरापावेतो रस्ता कॉंक्रीट करणे बाबतच्या कामास मा.जिल्हाधिकारी सो. धुळे यांची प्रशासकीय मान्यता दि.२३/०३/२०२२ अन्वये उक्त कामाबाबत रक्कम रु.२५,१८,९९७/-मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./९३१/२० दि.१४/०३/२०२२ अन्वये रक्कम रु. २५,१८,९९७/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./धुमपा/बां.वि./८/२०अन्वये दि. २६/०४/२०२२रोजी दैनिक देशदूत/श्रमराज्य या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.१४/०५/२०२२ पर्यंत निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेली आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदार किंवा ठेकेदाराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | श्री.अक्षय धनराज माखिजा | **शे.-३.५०% (कमी)** | **सर्वात कमी दर** |
| २ | श्री.वृषभ सतिष खिवसरा | शे.३.०० % जास्त | |
| ३ | श्री.अे.के.सैफी | शे.-३.०० % (कमी) | |
| ४ | इंजी.कौस्तुभ सचिन दिक्षित | अंदाजपत्रकदर | |
| ५ | मे.हिंद कन्सट्रक्शन | शे.२.०० % जास्त | |
| ६ | मे.समर्थ कन्सट्रक्शन | शे.-.९९ % (कमी) | |
| ७ | मे.एकविरा कन्सट्रक्शन | अंदाजपत्रकदर | |
| ८ | श्री.सचिन नानाभाऊ आखाडे | शे.-२.५०% (कमी) | |
| ९ | श्री.ऋषिकेश व्ही.पाटील | शे.१.०० % जास्त | |

सदर तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता **श्री.अक्षय धनराज माखिजा** यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे२४,३०,८३२/- इतक्या रक्कमेचे असून **शे.-३.५०%(कमी)** दराने आहे.

सदर निविदा धारकांचे निविदा दर हे **शे.-३.५०%(कमी)**दराने असल्याने सर्व निविदा समिती सदस्यांनी सदर निविदा धारकांचे दर स्वीकारण्यास मा.आयुक्त सो. यांना शिफारस करण्यावर एकमत झाले.

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **श्री.अक्षय धनराज माखिजा** यांचे दर **शे.-३.५०%(कमी)**आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार **श्री.अक्षय धनराज माखिजा** यांची **शे.-३.५०%(कमी)** दराने आलेले निविदा दर मे.स्थायी समिती समोर दर मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी कंत्राटदार **श्री.अक्षय धनराज माखिजा** यांची **शे.-३.५०%(कमी)** दराने आलेले निविदा दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे. तसेच सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- सौ.वैशाली भिकन वराडे
अनुमोदक:- सौ. कुलेवार किरण राकेश

**सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x

**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक:- २१७ | सुवर्ण जयंती नगरोत्थान योजना अंतर्गत सन २०२१-२२प्र.क्र.१० मध्ये वरखेडी रोड साईग्राम कॉलनी मधील विनोद गुलाबराव यांच्या घरापासून ते सुरेश खैरनार यांचे घरापर्यंत रस्ता कॉक्रीट करणेचे निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे. |
| म.नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले. |
| म. नागसेन बोरसे | विषय मंजूर करण्यांत यावा. |
| म.वैशाली वराडे | विषय मंजूर करण्यांत यावा. |
| म. सभापती | सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे. |

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २३२ दिनांक २४/११/२०२२**

सुवर्ण जयंती नगरोत्थान योजना अंतर्गत सन २०२१-२२ प्र.क्र.१० मध्ये वरखेडी रोड साईग्राम कॉलनी मधील विनोद गुलाबराव यांच्या घरापासून ते सुरेश खैरनार यांचे घरापर्यंत रस्ता कॉक्रीट करणे बाबतच्या कामास मा.जिल्हाधिकारी सो. धुळे यांची प्रशासकीय मान्यता दि.२३/०३/२०२२ अन्वये उक्त कामाबाबत रक्कम रु.२५,१५,०५३/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./९५१/२० दि.१४/०३/२०२२ अन्वये रक्कम रु.२५,१५,०५३/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिकाजा.क्र./धुमपा/बां.वि./११/२०अन्वये दि. १०/०५/२०२२ रोजी दैनिकआ.महाराष्ट्र/समाज सारथी या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.२७/०५/२०२२ पर्यंत निविदा दर मागविण्यात आले आहेत.पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेली आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदार किंवा ठेकेदाराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | श्री.अक्षय धनराज माखिजा | **शे.-१४.०० % (कमी)** | **सर्वात कमी दर** |
| २ | मे.आस्था एस.एस.एस.एस.धुळे | शे.-१२.०० % (कमी) | |
| ३ | मे.प्रियदर्शनी कन्सट्रक्शन | शे.१.८० % जास्त | |
| ४ | मे.समर्थ कन्सट्रक्शन | शे.-.९९ % (कमी ) | |
| ५ | फहाद मिर्झा | शे.२.०० % जास्त | |
| ६ | इंजी.कौस्तुभ सचिन दिक्षित | अंदाजपत्रकदर | |
| स ७ द | श्री.ऋषिकेश व्ही.पाटील | शे.१.०० %जास्त | |
| र ८ | मे.गायत्री कन्सट्रक्शन | शे.-१०.०० % (कमी) | |
| ९ तु | श्री.सचिन नानाभाऊ आखाडे | शे.-११.०० % (कमी ) | |

तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता **श्री.अक्षय धनराज माखिजा** यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे २१,६२,९४६/-इतक्या रक्कमेचेअसून **शे.-१४.००%(कमी)**दराने आहे.

सदर निविदा धारकांचे निविदा दर हे **शे.-१४.००% (कमी)** दराने असल्याने सर्व निविदा समिती सदस्यांनी सदर निविदा धारकांचे दर स्वीकारण्यास मा.आयुक्त सो. यांना शिफारस करण्यावर एकमत झाले.

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **श्री.अक्षय धनराज माखिजा** यांचे दर **शे.-१४.००%(कमी)**आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार **श्री.अक्षय धनराज माखिजा** यांची **शे.-१४.००%(कमी)** दराने आलेले निविदा दर मे. स्थायी समिती समोर दर मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी कंत्राटदार **श्री.अक्षय धनराज माखिजा** यांची **शे.-१४.००%(कमी)** दराने आलेले निविदा दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७२ नुसार मान्यता देण्यांत येत आहे. तसेच सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- सौ. वैशाली भिकन वराडे
अनुमोदक:- श्री.नागसेन दामोदर बोरसे

**सर्वानुमते मंजुर,**
सही/-x x x
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

| | |
|---|---|
| विषय क्रमांकः- २१८ | महिला बाल कल्याण निधी अंतर्गत प्र.क्र.७ मध्ये सर्व्हे नं.३५४९/ब निरंजन हौ.सोसा.मागे अंधशाळे जवळ अपंग व्यक्तीसाठी गार्डन करणेचे निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे. |
| म.नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले. |
| म. हर्षकुमार रेलन | विषय मंजूर करण्यांत यावा. |
| म. किरण कुलेवार | विषय मंजूर करण्यांत यावा. |
| म. सभापती | सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे. |

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर२३३ दिनांक २४/११/२०२२**

महिला बाल कल्याण निधी अंतर्गत प्र.क्र.७ मध्ये सर्व्हे नं.३५४९/ब निरंजन हौ.सोसा.मागे अंधशाळे जवळ अपंग व्यक्तीसाठी गार्डन करणे बाबतच्या कामास धुळे महानगरपालिका ठराव नं.१६५ दि.२५/०५/२०२२ मा.आयुक्त सोधुळे महानगरपालिका यांनी टिपणी मंजुरीने दि.१७/०५/२०२१ अन्वये उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु.३८,१०,१८२/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./३९९ दि.०७/१२/२०२१ अन्वये रक्कम रु. ३५,९४,९९८/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./धुमपा/पा.पु.वि./१२३९/२०२२दि. २०/०१/२०२२ अन्वये दि.२१/०१/२०२२ रोजी दैनिक देशदूत/मर्डर या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.१४/०२/२०२२ रोजी निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेली आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदार किंवा ठेकेदाराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | अे.के.सैफी | शे.१.०० % जास्तीने | |
| २ | **श्री.आनंद अहिरराव** | **अंदाजपत्रकीय दराने** | **सर्वात कमी दर** |
| ३ | मे.गायत्री कन्सट्रक्शन | शे.२.०० % जास्तीने | |

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **श्री.आनंद अहिरराव** यांचे दर **अंदाजपत्रकीय दराने** आहे व त्यांनी नियमा प्रमाणे रोखीने बयाणा रक्कम भरलेली आहे.

सबब कंत्राटदार **श्री.आनंद अहिरराव** यांची **अंदाजपत्रकीय दराने** आलेले निविदा दर मंजुरीस्तव सादर तसेच अन्य काम न मिळालेले ठेकेदारांना त्यांची बयाना रक्कम परत करणे बाबत तसेच सदर प्रकरण मे.स्थायी समिती समोर दर मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी कंत्राटदार **श्री.आनंद अहिरराव** यांची **अंदाजपत्रकीय दराने** दराने आलेले निविदा दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे. तसेच

सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- सौ. कुलेवार किरण राकेश
अनुमोदक:- श्री.हर्षकुमार राधेश्याम रेलन **सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x

**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:- २१९ नागरी दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत प्र.क्र.७ मध्ये सुभाष सपकाळे यांचे घरापासून ते मोगलाई पोलीस स्टेशन पर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण करणेचे निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. हर्षकुमार रेलन विषय मंजूर करण्यांत यावा.

म. किरण कुलेवार विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २३४ दिनांक २४/११/२०२२**

नागरी दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत प्र.क्र.७ मध्ये सुभाष सपकाळे यांचे घरापासून ते मोगलाई पोलीस स्टेशन पर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे बाबतच्या कामास मा.जिल्हाधिकारी सो. धुळे यांची प्रशासकीय मान्यता दि.२३/०३/२०२२ अन्वये उक्त कामाबाबत रक्कम रु.९८,९९,३०३/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./४९१ दि.२४/१२/२०२१ अन्वये रक्कम रु. ९८,९९,३०३/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिकाजा.क्र./धुमपा/बां.वि./१७/२०दि. ७/६/२०२२ रोजी दैनिक देशदूत / आपल नवराज्य या बृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.०५/०७/२०२२ रोजी निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेली आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदार किंवा ठेकेदाराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | अे.के.सैफी | शे.२.०० % जास्तीने | |
| २ | श्री.सौरभ संजय कदमबांडे | शे.५.०० % जास्तीने | |
| ३ | **श्री.भूषण एल.चौधरी** | **अंदाजपत्रकीय दराने** | **सर्वात कमी दर** |

सदर तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता **श्री.भूषण एल.चौधरी** यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे ९८,९९,३०३/- इतक्या रक्कमेचे असून **अंदाजपत्रक** दराने आहे.

सदर निविदा धारकांचे निविदा दर हे **अंदाजपत्रक** दराने असल्याने सर्व निविदा समिती सदस्यांनी सदर निविदा धारकांचे दर स्वीकारण्यास मा.आयुक्त सो. यांना शिफारस करण्यावर एकमत झाले.

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **श्री.भूषण एल.चौधरी** यांचे दर **अंदाजपत्रकीय**आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार **श्री.भूषण एल.चौधरी** यांची **अंदाजपत्रक** दराने आलेले निविदा दर मे.स्थायी समिती समोर दर मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी कंत्राटदार **श्री.भूषण एल.चौधरी** यांची **अंदाजपत्रकीय** दराने आलेले निविदा दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे. तसेच सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री.हर्षकुमार राधेश्याम रेलन
अनुमोदक:- सौ. कुलेवार किरण राकेश **सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक :- २२० मुलभूत सोई सुविधांच्या विकास अंतर्गत सन २०२२-२३ अंतर्गत मनपा वार्ड क्र. २ मधील सुयोग नगर, दोंदे कॉलनीत , विघ्नहर्ता कॉलनी परिसारत रस्ते व गटार बांधकाम करणे. प्र.क्र. ३ संत गाडगे बाबा उद्यान परिसर , स्वामी नारायण रस्ता , ध्रुव अपार्टमेंट परिसर रस्ते व गटार बांधकाम करणे. प्र.क्र. ४ नेहरू नगर , एकविरा देवी मंदिर परिसर सोलर सिस्टीम बनविणे , म.गांधी पूल शिवाजी रोड सेल्फी पॉईंट तयार करणे , प्र.क्र. ५ मध्ये विनायक नगर वाडीभोकर रोड येथील अपूर्ण संरक्षण भिंत बांधणे व नवीन जॉगिंग ट्रॅक करणे, प्र.क्र.६मध्ये पुरुषोत्तम नगर भागातील प्रमुख रस्ता व परिसरातील रस्ते डांबरीकरण करणे /पुरुषोत्तमनगर ते नकाणे रोड पर्यंत कॉक्रीटकरण करणे. प्र.क्र.७ मधील कॉलनी मधील ओपनस्पेस महादेव टेकडी लगत जमीन सपाटीकरण करून बगीचा (गार्डन ) सुशोभिकरण,जॉगिंग ट्रॅक,खेळणी व हायमास्ट लावणे. प्र.क्र.१४ मध्ये जळगाव जनता कॉलनी अंतर्गत रस्ता कॉक्रीटकरण करणे व मनपा वार्ड क्र १८अवधान येथे ओपनस्पेसला संरक्षण भिंत प्रवेशद्वार बांधणे,उद्यान बगीचा विकास करणे व हायमास्ट बसविणे इत्यादी कामाचे निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. हर्षकुमार रेलन विषय मंजूर करण्यांत यावा.

म. किरण कुलेवार विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून शासन निर्णयानुसार त्या अनुषंगाने याकामातील कामाचा वाव (Scope of work) कमी करुन वस्तु व सेवा कर अदा करण्यांस व याकामीकंत्राटदार **श्री.**अे.बी.वाघ **ठेकेदार,धुळे**यांच्या वाटाघाटी अंती निश्चित झाल्यानुसार अंदाज पत्रकीय निविदा दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २३५ दिनांक २४/११/२०२२**

मुलभूत सोई सुविधांच्या विकास अंतर्गत सन २०२२-२३ अंतर्गत मनपा वार्ड क्र. २ मधील सुयोग नगर ,दोंदे कॉलनीत , विघ्नहर्ता कॉलनी परिसारत रस्ते व गटार बांधकाम करणे. प्र.क्र. ३ संत गाडगे बाबा उद्यान परिसर , स्वामी नारायण रस्ता , ध्रुव अपार्टमेंट परिसर रस्ते व गटार बांधकाम करणे. प्र.क्र. ४ नेहरू नगर , एकविरा देवी मंदिर परिसर सोलर सिस्टीम बनविणे , म.गांधी पूल शिवाजी रोड सेल्फी पॉईंट तयार करणे , प्र.क्र. ५ मध्ये विनायक नगर वाडीभोकर रोड येथील अपूर्ण संरक्षण भिंत बांधणे व नवीन जॉगिंग ट्रॅक करणे , प्र.क्र. ६ मध्ये पुरषोत्तम नगर भागातील प्रमुख रस्ता व परिसरातील

रस्ते डांबरीकरण करणे / पुशोत्तम नगर ते नकाणे रोड पर्यंत कॉंक्रीटकरण करणे. प्र.क्र. ७ मधील कॉलनी मधील ओपनस्पेस महादेव टेकडी लगत जमीन सपाटीकरण करून बगीचा (गार्डन ) सुशोभिकरण , जॉगिंग ट्रॅक,खेळणी व हायमास्ट लावणे. प्र.क्र.१४मध्ये जळगाव जनता कॉलनी अंतर्गत रस्ता कॉंक्रीटकरण करणे व मनपा वार्ड क्र १८अवधान येथे ओपनस्पेसला संरक्षण भिंत प्रवेशद्वार बांधणे, उद्यान बगीचा विकास करणे व हायमास्ट बसविणे बाबतच्या कामास मा.आयुक्त सो. धुळे महानगरपालिका यांनी टिपणी मंजुरीने दि.०७/०६/२०२२अन्वये उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु.४,९९,७४,५१०/-(GST सह)मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./६२४दि.२४/०१/२०२२,६२५ दि. २४/०१/२०२२,६३६ दि.२८/०१/२०२२, ६२६ दि.२४/०१/२०२२,६७४दि.०४/०२/२०२२,६२७ दि. २४/०१/२०२२ अन्वये रक्कम रु.४,९९,७४,५१०/-(GST सह)मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत या धुळे महानगरपालिकाजा.क्र./धुमपा/पापुवि/४७८/२०२२-२३ दि. ०२/०९/२०२२अन्वये दि.०३/०९/२०२२ रोजी दैनिक मिड-डे (राज्यस्तरीय ) , आपला महाराष्ट्र या वृत्तपत्रात रु.४,५२,९३,०६२/- मात्रची ( GST वगळून ) जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि. ०७/१०/२०२२ रोजी निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे /ठेकेदराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | मे. अ. बी. वाघ | शे.५% जास्तीने | सर्वात कमी दर |
| २ | मे. एस.बी. देशमुख | शे.१०% जास्तीने | |
| ३ | मे.बी.आर. भदाणे | शे.१२% जास्तीने | |
| ४ | मे.स्मित कन्सट्रक्शन | शे.१५% जास्तीने | |

ववरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **मे.अे.बी. वाघ , ठेकेदार , धुळे** यांचे दर **शे.५% जास्तीने** आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार **मे.अे.बी. वाघ,ठेकेदार,धुळे** यांची **शे.५% जास्तीचे** असल्याने इकडील जा.क्र./ धुमपा / पापुवि /७४९ दि.१९/१०/२०२२ रोजी दर वाटा घाटीसाठी बोलविले असता **अे.बी. वाघ, ठेकेदार** यांनी दर वाटाघाटी अंती **अे.बी.वाघ ,ठेकेदार,धुळे** यांनी दि.२०/१०/२०२२ रोजी लेखी पत्र देवून सदरील कामाचे दर हे मागील वर्षाच्या राज्य दर सूची नुसार आहे. शासनाच्या नवीन SSR आला असून त्यामध्ये १०% दर वाढ झालेली आहे. तसेच सध्यस्थिती GST १८% लागू करण्यात आला आहे. निविदेत १२% प्रमाणे धरलेला आहे.त्यामुळे नवीन SSR नुसार व १८% GST प्रमाणे ५% दराने करणे बाबत अे.बी. वाघ , ठेकेदार यांनी पत्र दिले आहे.

त्यावर विभागाने खालील प्रमाणे दर विश्लेषण केले , सदर कामाचे अंदाजपत्रक सन २०२१-२२वर्षाच्या राज्य दर सूची (SSR)नुसार करण्यात आले असून अंदाजपत्रकीय खर्च खालील प्रमाणे
१) कामाची मूळ किमंत (SSR 2021-22) :- ४,५२,९३,०६२/-
२) १२% GST धरून किमंत :- ४,९९,७४,५१०/-

सध्यस्थितीत सन २०२२-२३ च्या राज्य दर सूची नुसार (SSR 2022-23) प्राप्त झाली आहे. तसेच शासन परिपत्रक क्र. संकीर्ण २०१७/ प्र.क्र. १२/ भाग -२/इमारती- २ दि. २७/०९/२०२२ रोजीच्या परीपत्रकानुसार १२% GST वरून १८% GST झालेल आहे. याप्रमाणे कामाची एकुण किमंत खालील प्रमाणे :-

**१)SSR २०२२-२३ प्रमाणे मूळ किमंत :- ४,५९,४१,५३७/-**
**२)१८% GST धरून किमंत :- ५,२९,६३,८६५/-**

उक्त दर विश्लेषणानुसार मूळ किमंत पाहता SSR नुसार ०.९८% वाढ झालेली आहे. तथापि ठेकेदाराने निविदा दर हे ५% जास्तीने (ABOVE) भरलेले दिसतात. निविदा धारकाची मागणी मान्य करता येणार नाही,असे विभाग प्रमुख श्री.कैलास शिंदे यांनी मांडले होते. त्यावर अ.बी.वाघ,ठेकेदार यांनी त्यांचे कडील दि.१०/११/२०२२रोजीच्या पत्रानुसार सदरील काम अंदाजपत्रकीय दराने करण्यास तयार आहे. परंतु १२% GST एवजी १८%GST महानगरपालिकेने पूर्ण पणे द्यावा असे कळविले आहे.

त्यावर सर्व निविदा सदस्यांनी एकत्रित चर्चा केली व महानगरपालिकेची आर्थिक स्थिती अत्यंत नाजूक आहे. महानगरपालिका कोणताही अधिकच आर्थिक भार सोसू शकणार नाही.त्यापेक्षा निविदा रद्द करून फेर निविदा करणे योग्य होईल अशी एकत्रित भावना पुढे आली.तेव्हा सबंधित ठेकेदाराने अंदाजपत्रकीय दरानेच काम करावे व महानगरपालिकेने कोणतेही अधिकचे उत्तरदायित्व सोसू नये यावर सदस्यांचे एकमत झाले. त्यासाठी ठेकेदाराला पुनश्च: एकदा GST सह निविदा दरात काम करण्यास तयार आहे का? याबाबत पत्रान्वये विचारणा करण्याबाबतचा निर्णय एकमताने घेण्यात आला.

त्यानुसार दि.१५/११/२०२२ रोजी मे.अ.बी.वाघ,ठेकेदार धुळे यांना पत्रान्वये दर अंदाज पत्रकीय दराने काम करण्याबाबत पुनश्च: कळविण्यात आले होते. तथापि त्यांनी यासोबतच्या दि. १७/११/२०२२ च्या पत्रान्वये GST कर हा निविदा निर्गमित करणाऱ्या संस्थेनेच द्यावयास हवा तो कर आहे व तो कामाचा भाग नाही. निविदा दाखल करावयाच्या अंतिम दिनांकापूर्वीच शासनाचे परिपत्रक आलेले होते. म्हणूनच आम्हाला अधिकची निविदा भरावी लागली. तरी कामांची अंदाजपत्रके ज्या दारात आहेत. त्यादरात मी काम करावयास तयार आहे. तथापि कराचा अधिकचा भर स्विकारणे शक्य नाही असे कळविले आहे.

यावर निविदा समिती बैठकीत साधक बाधक चर्चा होवून कर वाढविण्यात निविदा धारकाचा दोष नाही हे सदस्यांनी स्विकारले. तेव्हा महानगरपालिकेची ढासळलेली आर्थिक स्थिती पाहता अधिकचा भार कसा सोसावा याचा निर्णय सक्षम प्राधिकरण म्हणून मे.स्थायी समितीने करणे कामी अंदाजपत्रकिय दराने मान्यतेसाठी मे.स्थायी समिती पुढे ठेवणेस मंजुरीस्तव सादर करण्यात आलेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून तसेच शासन निर्णय परिपत्रक क्रमांक संकिर्ण २०१७/ प्र क्र १२१(भाग-०२)/इमारती ०२ दिनांक २७/०९/२०२२ अन्वये ब नुसार सद्यस्थितीत चालू असलेल्या ज्या कामांच्या निविदा व वस्तू व सेवा कर वगळून मागविण्यात आलेल्या आहेत, अशा कामांची देयके १२% वस्तू व सेवा कर परिगणीत करुन अदा करण्यात येतात आता अशा कामांची देयके निविदा व अटी शर्तीच्या अधिन राहून बदललेल्या १८% वस्तू व सेवा करा नुसार देयके पारीत करावी ज्या चालू कामांच्या निविदा वस्तू व सेवा करा सह मागवण्यात आलेल्या आहे अशा कामांसाठी देयके पारीत करीत असतांना बदललेल्या १८% वास्तू व सेवाकर विचारात घेऊन निविदा व अटी शर्तीनुसार आवश्यक ती कार्यवाही करावी असे नमूद आहे. त्याअनुषंगाने निविदा समितीने नमूद केल्याप्रमाणे महानगरपालिकेची ढासळलेली आर्थिक स्थिती पाहता अधिकचा भार महानगरपालिका सोसू शकणार नाही. त्यामुळे प्रस्तुत कामाचा वाढीव रकमे इतका, कामाचा वाव (Scope of work) कामाच्या गुणवत्तेवर परिणाम न होता कमी करुन वस्तु व सेवा कराची वाढीव रक्कम अदा करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे व त्यानुसार कंत्राटदार श्री. अे.बी. वाघ यांचे अंदाजपत्रकीय निविदा दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे. तसेच सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री.हर्षकुमार राधेश्याम रेलन

अनुमोदक:- सौ. कुलेवार किरण राकेश

**सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक :- २२१ — प्र.क्र.०७ मध्ये मनपा निधीतून मोगलाई नेहरू चौकात साक्रीरोड येथे प्रवेशद्वार बांधणेचे निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. हर्षकुमार रेलन — विषय मंजूर करण्यांत यावा.

म. किरण कुलेवार — विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती — सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २३६ दिनांक २४/११/२०२२**

प्र.क्र.०७ मध्ये मनपा निधीतून मोगलाई नेहरू चौकात साक्रीरोड येथे प्रवेशद्वार बांधणे बाबतच्या कामास धुळे महानगरपालिका स्थायी समिती ठराव नं.४६ दि. ०१/०३/२०२२ मा.आयुक्त सो.,धुळे महानगरपालिका यांनी टिपणी मंजुरीने दि.२४/०८/२०२२ अन्वये उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु.२९,९९,६६६/-मात्रस रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./९६९ /२०२२-२३ दि. २२/०८/२०२२अन्वये रक्कम रु.२८,४९,२८३/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत या धुळे महानगरपालिका जा.क्र./धुमपा/पापुवि/५२७/२०२२-२३ दि. २०/०९/२०२२ अन्वये दि.२१/०९/२०२२ रोजी दैनिक देशदूत / पोलीस शोध या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.११/१०/२०२२ रोजी निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदे बाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे /ठेकेदराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| **१.** | **अे. के. सैफी** | **अंदाजपत्रकीय दराने** | **सर्वात कमी दर** |
| **२.** | भूषण एन. चोधरी | श.२% जास्तीने | |
| **३.** | उमेश राजेंद्र चौधरी | श.१% जास्तीने | |

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून मे.अे. के. सैफी धुळे यांचे दर अंदाजपत्रकीय दराने आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार मे.अे. के. सैफी , ठेकेदार यांची अंदाजपत्रकीय दराने आलेले निविदा दर मंजुरीस्तव मे.स्थायी समितीपुढे ठेवणेस मंजुरीस्तव सादर तसेच अन्य काम न मिळालेले ठेकेदारांना त्यांची बयाणा रक्कम परत करणे कामी मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी कंत्राटदार **श्री.अे. के. सैफी** यांची **अंदाजपत्रकीय** दराने आलेले निविदा दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे. तसेच सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री.हर्षकुमार राधेश्याम रेलन

अनुमोदक:- सौ. कुलेवार किरण राकेश

**सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक :- २२२ धुळे मनपा निधी अंतर्गत अवधान येथील बजरंग विजय व्यायाम शाळा बांधणे (पार्ट १ व पार्ट २) चे निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. सारिका अग्रवाल — विषय मंजूर करण्यांत यावा.

म. बन्सीलाल जाधव — विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती — सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २३७ दिनांक २४/११/२०२२**

धुळे मनपा निधी अंतर्गत अवधान येथील बजरंग विजय व्यायाम शाळा बांधणे (पार्ट १ व पार्ट २) बाबतच्या कामास मा.आयुक्त सो., धुळे महानगरपालिका यांनी टिपणी मंजुरीने दि.०१/०८/२०२२ अन्वये उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु.५९,६३,९८२/- मात्रस रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र अन्वये रक्कम रु.५९,६३,९८२/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत या धुळे महानगरपालिका जा.क्र./धुमपा/पापुवि/५२७ /२०२२-२३ दि.२०/०९/२०२२ अन्वये दि.२१/०९/२०२२ रोजी दैनिक नवराष्ट्र / साफ शिंदखेडा टाईम्स या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.११/१०/२०२२ रोजी निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे /ठेकेदराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | हिंद कन्सट्रक्शन | श.२% जास्तीने | |
| २ | अंकित किशोर भंडारी | अंदाजपत्रकीय दराने | सर्वात कमी दर |
| ३ व | एकविरा कन्सट्रक्शन | श.३% जास्तीने | |

री

ल प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून मे. अंकित किशोर भंडारी, धुळे यांचे दर अंदाजपत्रकीय दराने आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार मे. अंकित किशोर भंडारी, ठेकेदार यांची अंदाजपत्रकीय दराने आलेले निविदा दर मंजुरीस्तव मे.स्थायी समितीपुढे ठेवणेस मंजुरीस्तव सादर तसेच अन्य काम न मिळालेले ठेकेदारांना त्यांची बयाणा रक्कम परत करणे कामी मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी कंत्राटदार **श्री. अंकित किशोर भंडारी** यांची **अंदाजपत्रकीय** दराने आलेले निविदा दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे. तसेच सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील. सुचक :- सौ. सारिका प्रविण अग्रवाल

अनुमोदक:- श्री.बन्सीलाल माणिक जाधव **सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक :- २२३ IWBP प्रणालीचे मोड्यूल्सचा किंवा Legacy Software Ascentech (NAGARKARYAVALI) संगणक ई प्रणालीचा वापर करणे याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. नागसेन बोरसे हा विषय कशासाठी आहे. त्याची माहिती सभागृहाला द्यावी.

म.सिस्टीम मॅनेजर शासनाने IWBP पोर्टलच्या अनुषंगाने लेगसी सॉफटवेअर जे अस्तित्वात असलेले सॉफटवेअर व त्याचे मॉडयुल असून सदरची अॅसेनटेक संगणकीय प्रणाली ४ वर्षापासून मनपात सुरळीत पणे कार्यरत आहे. सदर प्रणाली मार्फत यापुढे शासन आदेशानुसार फायर एनओसी. देणे, मार्केट लायसन्स देणे तसेच इतर नाहरकत प्रमाणपत्र देणे द्वीनोंद पध्दत प्रमाणे अकौंट माडयुल तयार करणे व तसेच इतर ५३ ऑनलाईन सेवा नागरिकांना उपलब्ध करुन देणे. हे शासनाच्या आदेशानुसार करणे आवश्यक आहे. नागरिकांनी मनपात न येता ते घर बसल्या हया सुविधा ऑनलाईन उपलब्ध होतील.त्या अनुषंगाने ही प्रणाली शासनाकडून राबवण्यासाठी निर्णय घेण्यात आला होता.

म.नागसेन बोरसे यापूर्वी हे कामकाज चालू होते की नाही ? आता कोणते कोणते काम चालू आहे?

म.सभापती यातले अंशत: कामे चालू आहे.

म.नागसेन बोरसे द्वीनोंद पध्दतीचे काय झाले ?

म.सभापती केंद्र शासनाने जेवढया नगरपालिका, महानगरपालिका यांना सर्व सुविधा म्हणजे राईट टु सर्विसेस हे सगळे ऑनलाईन करणार आहे. हे आपल्याकडे मंजूरीसाठी आला आहे. व्दिनोंद अकौंट संगणकीय प्रणाली सह ५३ सेवा आहे.आपण त्या कंपनीकडून मोफत करुन घेणार आहोत. त्यात आपल्याला १ रुपयाही खर्च करावा लागणार नाही.एच.डी.एफ.सी. बँक ते पैसे पेड करेल. सदरच्या सर्व सेवा अॅसेन्टेक कंपनी शासनाच्या सर्व पोर्टलला इंटीग्रेशन करेल.तसेच यात धुळे मनपा अंतर्गत येणा-या सर्व संगणकीय सेवाची काय स्थिती आहे ही माहिती ऑनलाईन कळू शकेल. तसेच शासनाच्या महायुएलबी पोर्टलला एकाच डॅशबोर्डवर संपूर्ण महाराष्ट्राची माहिती उपलब्ध होणार आहे. आपल्याला माहिती द्यावी लागणार नाही. प्रत्येक नागरिकाला पोर्टलवर जाऊन स्टेटस चेक करता येईल. हे सॉफटवेअर चालू करण्यासाठी आपल्याकडे मंजूरीसाठी विषय आला आहे. यापूर्वी आपण त्याला घरपट्टीचे काम दिले होते. द्वीनोंद पध्दतीचा पार्ट पण यात येणार आहे. सदरची संगणकीय प्रणाली १३ महानगरपालिकेत कार्यरत आहे.शासनाने विचारले आहे स्थानिक स्वराज्य संस्थांना IWBP (Innowave company) सोबत किंवा दुस-या कंपनीला काम द्यावयाचे आहे का? दुस-या कंपनीला (Innowave company) काम द्यायचे असेल तर सद्यस्थितीत मनपात स्थापत्य कंपनी सोबत GIS मॅपिंग तसेच पाणी पट्टी संगणकीय प्रणालीचा ५वर्षाचा करारनामा झालेला आहे.जर IWBP (Innowavecompany)सोबत मनपाला जावयाचे असेल तर सदरच्या कंपनीसोबत झालेला करारनामा रदद करावा लागेल .

म.नागसेन बोरसे ज्या महानगरपालिकेत यांचे काम चालू आहे तेथील रिपोर्ट काय आहे? तेथील नागरिक, अधिकारी, कर्मचारी ते समाधानी आहेत का ? याचे प्रेझेंटेशन दिले तर बरे होईल.

म.सभापती माझ्याकडे याबाबत रिपोर्ट आहे. ते पाहून घ्यावे. प्रॉपर्टी टॅक्स चे काम याच कंपनीच्या सॉफटवेअर मार्फत होत आहे.

म.नागसेन बोरसे त्या रिपोर्टवर सही व शिक्का असलेले रिपोर्ट द्यावे.

म.सभापती याचे प्रेझेंटेशन घेऊ.कारण हे आपल्याला केंद्र शासनाच्या पोर्टलशी पण जोडावे लागणार. याबाबत तुम्हाला कॉन्टॅक्ट नंबरही देतो. यात शासनाच्या निधीला कोड दिलेला आहे. त्यात हेडपण निर्माण करता येणार आहे.

म.प्रतिभा चौधरी यात ५३ सुविधा देणार आहे त्या कोणकोणत्या आणि त्या विनामूल्य असतील का ?

म. सभापती ज्या आपल्या सुविधा आहे. जन्म दाखला, विवाह नोंदणी दाखला, फायरची एन.ओ.सी. असेल त्याचे जे रेट ठरवून दिले आहे. ते चार्जेस ऑनलाईन पेड करावे लागतील.

म.हर्षकुमार रेलन या सॉफटवेअरची कॉस्ट किती आहे.

म. सभापती हे मोफत आहे मनपाला पैसे द्यावे लागणार नाही.

म. किरण कुलेवार — विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती — सर्व सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदरचे काम तांतडीने करणे आवश्यक असल्याने सदर संगणकीय प्रणाली विना निविदा स्विकारण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २३८ दिनांक २४/११/२०२२**

धुळे महानगरपालिकेत Property Tax Legacy Software Ascentech, Mumbai या कंपनी कडुन मागील 4 वर्षापासून कोणत्याही अडचणी शिवाय नियमित सुरु आहे. तसेच Water Module स्थापत्य कंपनीकडून सुरु आहे.स्थापत्य कंपनीचा सेवापुर्वीणेकामी धुळे मनपाशी ५ वर्षांचा करारनामा झालेला आहे. IWBP(Innowave company) सोबत गेल्यास सदरचा करारनामा रद्द करावा लागेल. शासनाने Account Module, Property Tax Module, NOC, Trade, Marriage हे मोड्यूल्स दि. 03/10/2022 पासुन Legacy Software किंवा Integrated Web Based Portal (IWBP) संगणक प्रणाली Go Live करणे बाबत आदेशीत केलेले आहे. तसेच उर्वरित ५३ सेवा टप्प्या टप्प्याने शासन निर्देशानुसार Ease of Doing Business आणि Ease of Living अंतर्गत नागरिकांना उपलब्ध करूणे आवश्यक असल्याने राज्यशासनाचे आपले सरकार आणि मैत्री पोर्टल तसेच केंद्र शासनाचे IGR पोर्टलशी सदरचे Legacy Software इंटीग्रेट करणे अनिवार्य करणेत आले आहे.

Integrated Web Based Portal (IWBP) **(Innowave company)** संगणकीय प्रणालीत Account Module मध्ये बजेट कोर्डीग हे महाराष्ट्र नगरपालिका /नगरपरिषद लेखासंहिता नुसार लेखाशिर्षाची कोर्डीग करण्यात आलेली आहे.तथापि धुळे महानगरपालिकेचे अंदाजपत्रक लेखाशिर्षांची कोर्डींग Municipal Account Code नुसार तयार करण्यात आलेली आहे.बजेट ओपनिंग बॅलेंस एन्ट्री मध्ये नेमके जमा बाबीचे ओपनिंग बॅलेंस घ्यावयाचे आहेत का खर्च बाजूचे बजेट तरतुदीचे ओपनिंग बॅलेंस घ्यावयाचे आहे याची माहिती होत नाही.तसेच बँक ओपनिंग बॅलेंस मध्ये एका बँक खात्याकरिता एकच सब लेजर कोड समाविष्ट करता येते.परंतु महानगरपालिकेच्या काही बँक खाते हे विविध कर,शुल्क ,भाडे इ.साठी वापर करण्यात येते.एका बँक खात्यामध्ये विविध विभागाकडून तसेच विविध लेखाशिर्षामधून जमा होणारी रक्कमेसाठी बँक मास्टर मध्ये Add (समावेशन)करण्याची सुविध देण्यात आलेली नाही.एक बँक खाते एकापेक्षा जास्त FUNCTION साठी वापरण्यात येत असल्यास तो कशा पद्धतीने ADD (समावेश) करावचा याची माहिती होत नाही.बँक ओपनिंग बॅलेंससमाविष्ट करतांना यामध्ये स्वतंत्र CASH BOOK प्रमाणे ओपनिंग बॅलेंस आहे अथवा एकत्रितरित्या मनपा निधीचे ओपनिंग बॅलेंस ADD करावयाचे आहे याची माहिती होत नाही.

वरीलप्रमाणे Account Module मध्ये Budget Coding,Budget Opening Balance Account Opening Balance ,चलन रिपोर्ट जनरेशन इ.अडचणी आहेत.सद्यस्थिती धुळे मनपाचे बजेट शासनाने निर्धारित,निर्देशित केलेल्या २५५ ACCOUNT CODE प्रमाणे लेखाशीर्ष नुसार नसल्याने Legacy Softwar (Ascentech,NAGARKARYAVALI) प्रत्येक बाबींचा विचार करून सदरचे Software धुळे महानगरपालिकेच्या गरजेनुसार व शासनाच्या निर्देशानुसार परिपूर्ण बनविण्यात आलेले आहे. Legacy Softwar (Ascentech ,NAGARKARYAVALI) संगणकीय प्रणालीत Property Tax,Fire, Marriage Registration, Birth & Death,Trade License or Market, Double Entry Accounts,RTS-RightTo Services,Payment Gateway,SMS Gateway, Mobile Application, Website(Web Portal) धुळे मनपासाठी बनविण्यात आले आहे.

Property Module: यामध्ये ७८,८९९ Property आहेत. त्यांची Ratable Value नुसार आकारणी होते. सदर आकारणी Ascentech या संस्थेमार्फत चालु आहे. त्यामध्ये 1) मुख्य कार्यालय येथे भरणा घरपट्टी/पाणीपट्टी स्विकारला जातो. 2) HDFC Bank Gateway द्वारे ऑनलाईन पद्धतीने भरणा स्विकारला जातो. 3) Mobile App द्वारे भरणा स्विकारला जातो. 4) QR Code द्वारे भरणा स्विकारला जातो. 5) वसुली लिपिक देखील मोबाईल द्वारे भरणा स्विकारतात. सदर Module चा स्वतंत्र Dash board असून त्यावर दैनंदिन, प्रभाग निहाय अधिकृत / अनधिकृत वसुली टक्केवारी

थकबाकीदार यादी, वापरानुसार डिमांड इ. गोष्टी पाहता येतात. तरी सदर Software हे अत्यंत सुटसुटीत व फास्ट आहे. शास्ती माफ करणे, लोकअदालत भरवून त्यामध्ये सुट देणे, संकलित करामध्ये एप्रिल महिन्यामध्ये 10% व मे.जुन महिन्यामध्ये 8% सवलत देणे, जुलैपासून 2% शास्ती लावणे इ गोष्टी अत्यंत व्यवस्थिरित्या व बिनचुक चालू आहे. त्याकरीता संस्थेतर्फे दोन प्रतिनिधी पूर्णवेळ महानगरपालिका क्षेत्रात उपस्थित असतात तसेच रोज येणा-या दैनंदिन अडचणीचे निरसन करतात. सदर Software तावडतोब बंद करुन IWBP वर Shift होणे अशक्य आहे. सर्व Data IWBP वर Port करणे. सदर Software User Friendly असलेबाबत संबंधित लिपिकाकडून UAT करुन घेणे, त्यांना Training देणे, Port झालेला Data 100% Port झाले असलेबाबत संबंधित लिपिकाची खात्री करून घेणे या सर्व बाबी परिपुर्ण झालेशिवाय सदर IWBP चे Software Implement करणे शक्य नाही. अन्यथा पदाधिका-याच्या व नागरिकांच्या रोषास सामोरे जावे लागेल. तसेच अद्ययावत Software ला मुकावे लागेल.

Trade Module: Trade License हे सध्या धुळे महानगरपालिकेमार्फत देण्यात येत नाही. Ascentech (NAGARKARYAVALI) संस्थेचे सदर Module तयार असून ते अत्यंत सुटसुटीत व सोपे असून ते वापरणे जास्त संयुक्तिक वाटते. Marriage Module: सन 2012-13 पासून YASH COMPUTERS, BARSHI यांनी पुरविलेल्या संगणक प्रणालीद्वारे Marriage Certificate देण्यात येतात.सदरची संगणक प्रणाली जुनी झाली असल्याने सदर संगणकीय प्रणालीचेBACKUPबाबत कोणतीच व्यवस्था नसल्याने तसेच संगणक प्रणाली बाबत सपोर्ट सिस्टीम उपलब्ध नसल्याने सदर प्रणाली बंद करून शासनाच्या निर्देशानुसारAscentech (NAGARKARYAVALI) संस्थेचे तयार केलेली संगणकीय प्रणाली तयार असून ते अत्यंत सुटसुटीत व सोपे असून ते वापरणे जास्त संयुक्तिक वाटते.

NOC Module: सध्या MAINet Software मार्फत परवाना विभाग सदरचा संगणक प्रणालीद्वारेऑफलाईन देण्यात येतात.नगररचना विभागामार्फत देण्यात येणारी कोणतीही NOC संगणकीय प्रणाली द्वारे ऑनलाईन दिली जात नाही.सर्व प्रकारच्या NOC MANUALLY देण्यात येतात. Ascentech (NAGARKARYAVALI) संस्थेचे सदर Module तयार असून ते अत्यंत सुटसुटीत व सोपे असून ते वापरणे जास्त संयुक्तिक वाटते.

IWBP (Innowave company) प्रणाली प्रस्थापित करणेबाबत शासनस्तरावर कोणत्याही प्रकारचे सहाय्य मिळत नाही. IWBPसंगणकीय प्रणाली INNOWAVE कंपनीमार्फत सुरु करण्यात आली आहे.त्यांचे प्रतिनिधीही कोणत्याच प्रकारचे सहाय्य करत नाहीत.ते असे सांगतात की नगर परिषद संचालनालय,मुंबई यांना पत्राद्वारे INNOWAVE कंपनीचे प्रतिनिधी मागणी बाबत पत्र पाठवावे, तदनंतर इतर बाबींचा विचार केला जाईल.IWBP (Innowave company) सॉफ्टवेअरचे अद्याप Successfully Implementationकोणत्याही महानगरपालिके मध्ये झालेले नाही. त्यांचे दोन प्रतिनिधी जिल्हास्तरावर असणार आहेत जिल्हयामधील सर्व नगरपालिका व महानगरपालिका यांना Support करणार आहेत. सदरचे प्रतिनिधी महानगरपालिका स्तरावर उपलब्ध होणे बाबत MAHAIT यांना पत्राद्वारे कळवावे लागणार तसेच त्यांचे वेतन व इतर भत्ते MAHAIT ने ठरविलेल्या दरानुसार महानगरपालिकाला अदा करावे लागणार. तथापि Ascentech चे दोन प्रतिनिधी support करिता धुळे महानगरपालिकेमध्ये उपलब्ध आहेत. तसेच Ascentech (NAGARKARYAVALI) संगणकीय प्रणाली HDFC बँक मार्फत धुळे महानगरपालिकेस विनामुल्य उपलब्ध होणार आहे.तसा प्रस्ताव HDFC बँक मार्फत सादर करण्यात आला आहे.

DMA(IWBP) (Innowave company) कडे असलेल्या कोणत्याही module चे SRS तसेच Test Documents मिळणार नाही. जर DMA (IWBP) (Innowave company) कडील Modules घेतले आणि त्यामध्ये काही बदल करायचे असतील तर सर्व महापालिकेकडून तोच बदल करण्यास सांगितला तरच करण्यात येईल, केवळ एका महापालिकेसाठी बदल करून दिला जाणार नाही. तसेच२८महानगरपालिकां पैकी फक्त सोलापूर महानगरपालिकाने IWBP प्रणाली घेतली आहे

उर्वरित महानगरपालिका त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या Legacy Softwareचा वापर करीत असल्याचे शासनास कळविले असून सदरचा Legacy Software शासनाच्या मैत्री पोर्टल,आपले सरकार पोर्टल आणि केंद्र शासनाचा IGR पोर्टलशी इंटिग्रेशन करणेबाबत कळविले आहे.

वरील सर्व बाबींचा विचार करता सर्व Module ERP द्वारे एकत्रित असल्यास त्याचे Integration व Implementation करणे सोपे आहे. त्यामुळे वरील सर्व Module Ascentech (NAGARKARYAVALI) संस्थेच्या संगणक प्रणालीद्वारे चालू ठेवणे उचित वाटते, तरी Ascentech (NAGARKARYAVALI) संगणकीय प्रणाली विना निविदा असल्याने मे.स्थायी समितीत मंजुरीस्तव पाठविण्यास व पुढील योग्य आदेशार्थ सविनय सादर झालेला आहे.

Legacy Software Ascentech (NAGARKARYAVALI) संगणक ई प्रणाली प्रशासकीय बाबींसाठी महत्वपूर्ण असून धुळे महानगरपालिकेवर कोणताही आर्थिक भार पडणार नाही.त्यामुळे सर्व सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदरचे काम तांतडीने करणे आवश्यक असल्याने सदर संगणकीय प्रणाली विना निविदा स्विकारण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

सुचक :- श्री. बोरसे नागसेन दामोदर

अनुमोदक:- सौ. कुलेवार किरण राकेश

**सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका, धुळे**

# धुळे महानगरपालिका,धुळे
## नगरसचिव कार्यालय
## स्थायी समिती सभा क्रमांक २८ चे इतिवृत्त

---

**धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह**
**शुक्रवार दिनांक ०९/१२/२०२२**
**वेळ :- दुपारी ४-०० वाजतां**

धुळे महानगरपालिकेची स्थायी समितीची साप्ताहिक सभा क्रं.२८ आज शुक्रवार दिनांक**०९/१२/२०२२** रोजी दुपारी ४-०० वाजतां **श्री.शितल मोहन नवले, सभापती,** स्थायी समिती, मनपा धुळे यांच्याअध्यक्षतेखाली **धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृहात** भरली. या सभेस खालील सन्मा.सदस्य हजर होते.

| अ.क्रं. | सदस्यांचे नांव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री.नवले शितल मोहन | सभापती |
| २ | श्री. जाधव संजय सुधाकर | सदस्य |
| ३ | श्री. बोरसे नागसेन दामोदर | सदस्य |
| ४ | श्रीमती कुलेवार किरण राकेश | सदस्या |
| ५ | श्रीमती वराडे वैशाली भिकन | सदस्या |
| ६ | श्री.जाधव बन्सीलाल माणिक | सदस्या |
| ७ | श्रीमती चौधरी मंगला अर्जुन | सदस्या |
| ८ | श्री.अन्सारी फातमा नुरुल अमीन | सदस्या |
| ९ | श्री. चौधरी नरेंद्र रुपला | सदस्य |
| १० | श्रीमती चौधरी प्रतिभा शिवाजीराव | सदस्या |
| ११ | श्री. अहिरराव किरण हरिश्चंद्र | सदस्य |
| १२ | श्री. रेलन हर्षकुमार राधेश्याम | सदस्य |
| १३ | श्रीमती अग्रवाल सारिका प्रवीण | सदस्या |
| १४ | श्री.अन्सारी अब्दुल लतीफ अब्दुल हमीद | सदस्य |
| १५ | श्री.खान मोहम्मद साबीर मुहिबुल्लाह | सदस्य |
| १६ | श्रीमती पठाण नाजियाबानो नासिर खा | सदस्या |

**उपस्थित अधिकारी गण**

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. नितीन कापडणीस | अति.आयुक्त |
| २ | डॉ. श्रीमती संगिता नांदुरकर | उपायुक्त |
| ३ | श्री. विजय सनेर | उपायुक्त |
| ४ | श्रीमती पल्लवी शिरसाठ | कर मूल्य निर्धारण अधिकारी |
| ५ | श्री. मनोज अरविंद वाघ | नगरसचिव |
| ६ | श्री. लक्ष्मण पाटील | सहा. आरोग्याधिकारी |
| ७ | श्री. संजय मोरे | प्र.कार्यालय अधिक्षक |
| ८ | श्री. किशोर सुडके | प्र.परवाना अधिक्षक तथा बाजार विभाग प्रमुख |
| ९ | श्री. कमलेश सोनवणे | ओव्हरसिअर न.र. विभाग |

| | | |
|---|---|---|
| १० | श्री. हेमंत पावटे | ओव्हरसिअर पा पु. विभाग |
| ११ | श्री. गितेश सोनार | ओव्हरसिअर विद्युत विभाग |
| १२ | श्री. राजू माईनकर | भांडारपाल तथा आरोग्य विभाग प्रमुख |
| १३ | श्री. प्रकाश सोनवणे | ओव्हरसिअर नगररचना विभाग |
| १४ | श्री. मधुकर निकुंभे | निरीक्षक, मालमत्ता कर विभाग |
| १५ | श्री. दुष्यंत महाजन | अग्नीशमन विभाग |
| १६ | श्री. विकास साळवे | मलेरिया विभाग |
| १७ | श्री. सुक्राम राऊत | वाहन विभाग |

म. सभापती — सन्मा.सदस्य मा.अति.आयुक्त सो.सर्व अधिकारी कर्मचारी व पत्रकार,छायाचित्रकर बांधव यांचे मी स्थायी समितीच्या बैठकीत स्वागत करतो.सभेचा कोरम पुर्ण झाला असुन नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरु करावे.

म. नगरसचिव — वंदे मातरम् या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

**सभेच्या सुरुवातीस सन्मा.सदस्यांकडून आलेली श्रध्दांजलीची यादी**

धुळे महानगरपालिकेचे माजी उपमहापौर श्री. भगवानअप्पा गवळी यांच्या मोतोश्री लिलाताई शंकर गवळी यांचे नुकतेच वृध्दापकाळाने दु:खद निधन झाले आहे. तसेच धुळे महानगरपालिकेचे अभियंता श्री. प्रदीप दत्तात्रण चव्हाण यांचे पिताश्री कै.दत्तात्रय शंकर चव्हाण यांचे वृध्दापकाळाने दु:खद निधन झाले आहे.

तरी आजच्या सभेत कै. लिलाताई शंकर गवळी व कै.दत्तात्राय चव्हाण यांना भावपूर्ण श्रध्दाजली अर्पण करुन तसा ठराव पारीत करण्यांत यावा ही विनंती.

**सुचक :- श्री. नरेश रुपला चौधरी**
**अनुमोदक:- सौ. प्रतिभाताई शिवाजीराव चौधरी**

म. सभापती — सन्मा. सदस्यांच्या यादीनुसार दोन्ही मान्यवरांना श्रध्दांजली समर्पित करणेसाठी दोन मिनिटे मौन उभे रहावे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २३९ दिनांक ०९/१२/२०२२**

सन्मा. सदस्यांच्या यादीनुसार धुळे महानगरपालिकेचे माजी उपमहापौर श्री. भगवानअप्पा गवळी यांच्या मोतोश्री लिलाताई शंकर गवळी यांचे नुकतेच वृध्दापकाळाने दु:खद निधन झाले आहे. तसेच धुळे महानगरपालिकेचे अभियंता श्री. प्रदीप दत्तात्रण चव्हाण यांचे पिताश्री कै.दत्तात्रय शंकर चव्हाण यांचे वृध्दापकाळाने दु:खद निधन झाले आहे.
दोन्ही मान्यवरांचे दु:खद निधनामुळे या सभेस आतीव दु:ख होत आहे ही सभा त्तयांचे कुटुंबियांचे दु:खात सहभागी असून मान्यवरांचे आत्मयास चिरशांती प्रदानार्थ दोन मिनिटे मौन उभे राहून त्यांना भावपूर्ण श्रध्दाजली समर्पित करण्यांत येत असून तसा शोक ठराव पारीत करण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**
सही/-x x x
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

**सन्मा. सदस्यांकडून आलेला अभिनंदनाचा प्रस्ताव**

गुजरात विधान सभा निवडणूकीत भारतीय जनता पार्टीचे १५६ सीट निवडून येवून पक्षाने दणदणीत विजय संपादन करुन ७ व्यादा सत्ता स्थापन केल्याबद्दल आदरणीय पंतप्रधान मा. श्री. नरेंद्रजी मोदी साहेब व भारतीय जनता पार्टी पक्षाचा अभिनंदनाचा ठराव आजच्या सभेत पारीत करण्यांत यावा. **सुचक:- सौ. प्रतिभाताई शिवाजीराव चौधरी**

मा. सभापती — सर्व सन्मा. सदस्यांच्या यादीनुसार अभिनंदनाचा ठराव मंजुर करण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २४० दिनांक ०९/१२/२०२२**

सन्मा. सदस्याच्या यादीनुसार गुजरात विधान सभा निवडणूकीत भारतीय जनता पार्टीचे १५६ येवून दणदणीत विजय संपादन करुन ७ व्यादा सत्ता स्थापन केल्याबद्दल आदरणीय पंतप्रधान मा. श्री.

नरेंद्रजी मोदी साहेब व भारतीय जनता पार्टी पक्षाचा अभिनंदनाचा ठराव पारीत करण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:- २२४ मागील स्थायी समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे. ( दि.२०/१०/२०२२)

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. नागसेन बोरसे इतिवृत्त वाचून कायम करण्यांत यावे.

म. बन्सीलाल जाधव इतिवृत्त वाचून कायम करण्यांत यावे.

म. सभापती मागील स्थायी समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २४१ दिनांक ०९/१२/२०२२**

मागील स्थायी समिती सभा दिनांक २०/१०/२०२२ रोजीच्या सभेतील धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २१० ते २१७ अखेर तसेच मे.स्थायी समिती सभेत सन्मा.सदस्यांनी केलेली चर्चा व त्यावरील निर्णय क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे. सही/-x x x

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- २२५ मनपा निधी सन २०२२-२३ अंतर्गत प्र.क्र.४ मध्ये पटेल इंडस्ट्रीज पासून ते जुने M.S.E.B. ऑफिस पावेतो रस्ता डांबरीकरण करणेचे निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. हर्षकुमार रेलन विषय मंजूर करण्यांत यावा.

म. किरण कुलेवार विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर२४२ दिनांक ०९/१२/२०२२**

मनपा निधी सन २०२२-२३ अंतर्गत प्र.क्र.४ मध्ये पटेल इंडस्ट्रीज पासून ते जुने M.S. E.B.ऑफिस पावेतो रस्ता डांबरीकरण करणे बाबतच्या कामास मा.आयुक्त सो. धुळे महानगरपालिका यांनी टिपणी मंजुरीने दि.१७/०८/२०२२ अन्वये उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु. ३९,९५,२१८/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./१५५ दि.१८/०८/२०२२ अन्वये रक्कम रु. ३९,७८,०१०/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळेमहानगरपालिका जा.क्र./धुमपा/बां.वि./५६/२०दि. १९/०८/२०२२ रोजी दैनिक देशदूत/समाज सारथी या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि. ०७/०९/२०२२ रोजी निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदे बाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेली आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदार किंवा ठेकेदाराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | श्री.ऋषभ सतिष खिवसरा | शे.३.०० % जास्त | |
| २ | मे.एकविरा कन्सट्रक्शन | **अंदाजपत्रकीय दराने** | **सर्वात कमी दर** |
| ३ | मे.हिंद कन्सट्रक्शन | शे.२.०० % जास्त | |

सदर तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता **मे.एकविरा कन्सट्रक्शन** यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे ३९,७८,०१०/- इतक्या रक्कमेचे असून **अंदाजपत्रक** दराने आहे.

सदर निविदा धारकांचे निविदा दर हे **अंदाजपत्रक** दराने असल्याने सर्व निविदा समिती सदस्यांनी सदर निविदा धारकांचे दर स्वीकारण्यास मा.आयुक्त सो. यांना शिफारस करण्यावर एकमत झाले.

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **मे.एकविरा कन्सट्रक्शन** यांचे दर **अंदाजपत्रकीय** आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार **मे. एकविरा कन्सट्रक्शन** यांची **अंदाजपत्रक** दराने आलेले निविदा दर मे. स्थायी समिती समोर दर मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी कंत्राटदार **मे. एकविरा कन्सट्रक्शन** यांची अंदाजपत्रकीय दराने आलेले निविदा दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे. तसेच सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- सौ. सारिका प्रविण अग्रवाल

अनुमोदक:- श्री.बन्सीलाल माणिक जाधव **सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका, धुळे**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक :-२२६ | धुळे मनपाच्या नविन प्रशासकिय इमारतीमध्ये महाराष्ट्र आग प्रतिबंध जिव संरक्षक उपाययोजना २००६ नुसार महाराष्ट्र अग्नीसुरक्षा अभियान जिल्हास्तर २०२१-२०२२ आग प्रतिबंधक उपाययोजना हायड्रंट सिस्टीम स्मोक डिरेक्टर, फायर अलार्म, फायर इक्स्टीग्युशर, इत्यादी बसविणे व फायर पंप हाऊस बांधणे इत्यादी कामाचे निविदा दर मागवण्यात आले त्या बाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर फेरविचार करणे. |
| म.नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले. |
| म. हर्षकुमार रेलन | विषय मंजूर करण्यांत यावा. |
| म.नागसेन बोरसे | विषय मंजूर करण्यांत यावा. |
| म. सभापती | सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे. |

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २४३ दिनांक ०९/१२/२०२२**

धुळे महानगरपालिकेच्या नवीन प्रशासकीय इमारतीमध्ये महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना २००६ नुसार महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियान (जिल्हास्तर २०२१-२२) आग प्रतिबंधक उपाययोजना (हायड्रंट सिस्टिम, स्मोक डिटेक्टर, फायर अलार्म, फायर एक्सटीन्यूशर इ.बसविणे व फायर पंप हाऊस बांधणे बाबत कामास मा. जिल्हाधिकारी सो. यांनी दि.०३/०२/२०२२ अन्वये उक्त कामास खर्चास रक्कम रु.१,३५,०७,३२४/-मात्र रक्कमेस आर्थिक प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत मुख्य अभियंता, सा. बा. विभाग, मुंबई यांचे पत्रक्र.५८१दि. ३०/०३/२०२१ व मा.अभियता, मनपा धुळे यांचे जा.क्र.१३७८ दि. ३१/०३/२०२२ रुपये १,३५,०७,३२४/- मात्र खर्चास तांत्रिक मंजूरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका निविदा सुचना क्र ७१ जा.क्र.धुमपा/रेकॉर्ड विभाग/१११/२०२२-२३ अन्वये दि.०८/०२/२०२२ अन्वये २ री वेळा मनपा संकेतस्थळावर जाहिर निविदा प्रसिध्द करणेत येऊन दि.३०/०८/२०२२ पर्यंत निविदा दर मागविण्यात आले आहेत.पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पध्दतीने बयाना रक्कम भरुन निविदा सादर केलेली आहे.

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | **फायर प्राटेक्स इंटरप्राईजसे** | **अंदाजपत्रकीय** | **सर्वात कमी** |
| २ | धनश्री फायर सर्व्हिसेस | २२.००% | जास्तीने |
| ३ | एस. क्युब इन्फ्राक्ट्रचर | १९.००% | जास्तीने |

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **फायर प्राटेक्स इंटरप्राईजसे** यांचे अंदाजपत्रकीय दराने आहे व त्यांनी नियमाप्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार फायर प्राटेक्स इंटरप्राईजसे यांची अंदाजपत्रकीय दराने आलेले निविदा दर मंजुरीस्तव सादर केले असता सदर प्रस्ताव स्थायी समिती ठराव क्रमांक २२१ दिनांक १०/११/२०२२ अन्वये तहकूब करण्यात आला होता सदर प्रस्ताव फेर निर्णयास्तव मंजूरीसाठी मे. स्थायी समिती समोर सादर झालेला आहे.

सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी कंत्राटदार **मे. फायर प्राटेक्स इंटरप्राईजसे** यांची अंदाजपत्रकीय दराने आलेले निविदा दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मान्यता देण्यांत येत आहे. तसेच सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री.हर्षकुमार राधेश्याम रेलन
अनुमोदक:- श्री.नागसेन दामोदर बोरसे

**सर्वानुमते मंजुर,**
सही/-x x x
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:- २२७ धुळे महानगरपालिका सामान्य प्रशासन विभागाकडील म.महापौर सो यांच्या सेवतील मनपा वाहन क्र.एम.एच.१८ बी.आर.००१९ वाहनांची दुरुस्ती खर्च रु.२१०११/- मात्रच्या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मंजुरी देणेबाबत विचार करणे.

म.नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. प्रतिभाताई चौधरी — विषय मंजूर करण्यांत यावा.

म.नरेंद्र चौधरी — विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती — सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २४४ दिनांक ०९/१२/२०२२**

धुळे महानगरपालिका सामान्य प्रशासन विभागाकडील म.महापौर सो यांच्या सेवेतील वाहन क्र एम.एच.१८ बी.आर.००१९ हे मनपा टाटा सफारी वाहनांचे किलोमीटर १,००,००० कि.मी झालेले आहे तरी सदरील वाहनाचे सर्व्हीसींग करणे गरजेचे आहे असा अहवाल वाहन चालक व हेल्पर यांनी वाहन विभागाकडेस सादर केल्यानुसार वाहन विभागाकडून टाटा अधिकृत वितरक, उज्वल ॲटोमोटीव्ह प्रा.लि. धुळे यांना पत्र देऊन उज्वल ॲटोमोटिव्ह, धुळे

यांचे कंपनी अभियंता मार्फत वाहनांची तपासणी केली असता त्यांचे अहवालानुसार वाहनात खालीलप्रमाणे दुरूस्ती कामे करणे आवश्यक आहे. दि.३१/१०/२०२२ अधिकृत वितरक यांचे कडून दुरूस्ती कामाचे इस्टीमेट घेण्यात आले आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम नुसार सदर खर्च रक्कम ₹.२१०११/- मात्रला मा.आयुक्त सो.यांना मंजुरीचे अधिकार आहेत. त्यानुसार म.आयुक्त सो. यांनी मनपा अधि नियम कलम ६६ (२) व ६९ नुसार रक्कम ₹.५,०००००/-(पाच लक्ष) पर्यंत खर्चाचे अधिकार जा.क्र./धुमपा/आस्था/७७९/दि.१९/०७/२०२१ अन्वये म.उपायुक्त सो यांना परावर्तीत केलेले आहे.सदरील खर्च ₹.२१०११/-(अक्षरी-एकवीस हजार अकरा रुपये) मात्रच्या खर्चास प्रशासकीय व आर्थिक तसेच वित्तीय अधिकार नियम पुसतिका १९७८, भाग-एक उप विभाग दोन नियम ६९,पृष्ठ क्र.३० नुसार आर्थिक वर्ष खर्च मर्यादा ओलांडत असल्याने मे.स्थायी समिती कडेस मान्यतेसाठी ठेवणेस मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून म.महापौर सो यांच्या सेवतील मनपा वाहन क्र.एम.एच.१८ बी.आर.००१९ वाहनांची दुरुस्ती खर्च ₹.२१०११/- मात्रला खर्चास प्रशासकीय व आर्थिक कार्योत्तर मंजुरी देण्यात येत आहे. तसेच सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- सौ.प्रतिभाताई शिवाजीराव चौधरी
अनुमोदक:- श्री.नरेंद्र रुपला चौधरी

**सर्वानुमते मंजुर,**
सही/-x x x
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:- २२८ — धुळे महानगरपालिका अतिक्रमन विभागाकडील वाहन क्र एम.एच. १८एफ.१०३ वाहनांचे टाटा अधिकृत वितरक उज्वलअॅटोमोटिव्ह प्रा.लि,धुळे यांचेकडील दुरूस्ती बिल/देयक ₹.१३७९८/- मात्रला कार्योत्तर मंजुरी देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म.नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.
म. अब्दुल लतीफ — विषय मंजूर करण्यांत यावा.
म. मंगलाताई चौधरी — विषय मंजूर करण्यांत यावा.
म. सभापती — सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २४५ दिनांक ०९/१२/२०२२**

धुळे महानगरपालिका अतिक्रमन त्यावश्यक सेवेतील वाहन क्र. एम.एच.१८ एफ. १०३ टाटा सुमो वाहन सध्या अतिक्रमन विभागाकडेस आहे. वाहनांचे वॉटर कुलंट लिकेज होत असल्याने व वाहांचे आपत्तकालीन कामांसाठी पांझरा नदी किनारी पुरआल्याने लाऊडस्पिकरने सूचना देणे पुरपातळीजवळील घरांना विस्थापीत करणेकामी तातडीने मदतकार्य करण्यासाठी वाहनांचे तातडीने अधिकृत वितरक तपासणी करून वाहनात खालीलप्रमाणे दुरूस्ती कामे संदर्भ क्र.१ अन्वये कार्यादेश देण्यात येऊन उज्वल अॅटोमोटिव्ह प्रा.लि, टाटा अधिकृत वितरक धुळे यांचेकडुन दुरूस्ती करण्यात आली. वाहन अतिक्रमण विभागाकडेस कार्यरत असल्याने वाहनांची तातडीने दुरूस्ती करणे आवश्यक होते. त्यानुसार दुरूस्ती करून देयक सादर कण्यात आले आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम नुसार देयक रक्कम ₹.१३७९८/- मात्रला मा. आयुक्त सो.यांना देयक अदायगीचे अधिकार आहेत. त्यानुसार म.आयुक्त सो. यांनी मनपा अधिनियम कलम ६६ (२)व ६९ नुसार रक्कम ₹.५,०००००/-(पाच लक्ष) पर्यंत खर्चाचे अधिकारजा.क्र./धुमपा/आस्था/ ७७९/दि.१९/०७/२०२१अन्वये म.उपायुक्त सो यांना परावर्तीत केलेले आहे. परंतु जा.क्र./धुमपा/ आस्था/ ७७७ दिनांक:२९/०९/२०२१ नुसार आर्थिक बाब प्रदानापुर्वी म.आयुक्त सो यांची पुर्व मान्यता घेण्यात येऊनच पुढील कार्यवाही करावी. असे नमदआहे.टाटा अधिकृत वितरक- उज्वल ॲटोमोटिव्ह प्रा.लि.,धुळे यांना बिल /देयक ₹.१३७९८/- मात्र अदायगीकामी मे.स्थायी समिती कडेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची ड प्रकरण ५ (२) (२) कार्योत्तर मंजुरीसाठी ठेवणेस मंजुरीस्तव सविनय सादर झालेला आहे..

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून अतिक्रमन विभागाकडील वाहन क्र एम.एच. १८एफ.१०३ वाहनांचे टाटा अधिकृत वितरक उज्वल ॲटोमोटिव्ह प्रा.लि,धुळे यांचेकडील दुरूस्ती बिल/देयक ₹.१३७९८/- मात्रला कार्योत्तर मंजुरी देण्यात येत आहे. तसेच सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री अन्सारी अब्दुल लतीफ अब्दुल हमीद

अनुमोदक:- श्रीमती मंगलाताई अर्जून चौधरी **सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका, धुळे**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक:-२२९ | धुळे महानगरपालिका अग्निशामक विभागाकडील अत्यावश्यक सेवेतील वाहन क्र.एम. एच. १८ जी. २५९ वाहनांची पुढील नविन टायर खरेदी खर्च रक्कम ₹.४८,१००/-मात्र खर्चास कार्योत्तर मंजुरी देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे. |
| म.नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले. |
| म.नागसेन बोरसे | विषय मंजूर करण्यांत यावा. |
| म. बन्सीलाल जाधव | विषय मंजूर करण्यांत यावा. |
| म. सभापती | सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे. |

## धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २४६ दिनांक ०९/१२/२०२२

धुळे महानगरपालिका अग्निशामक विभागा कडील वाहन क्र. एम.एच.१८ जी.२५९ वाहनाचे दिनांक३/९/२०२२ टायर फुटल्याने टायर तातळीने बदलने आवश्यक आहे त्यानुसार वाहन चालक, सहा.अग्निशामक अधिकारी यांनी अहवाल सादर केल्यानुसार म.आयुक्त सो यांनी श्री बन्सल टायर हाऊस, धुळे यांना फोन संदेशाव्दारे दसरा व दिवाळीचे दिवस असल्याने अत्यावश्यक सेवेतील वाहनास तातडीने पुढील नग-२ टायर पुरविणे कळविले.

अत्यावश्यक सेवेतील अग्निशामक वाहनांस पुढील नविन टायर नग-२महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७ (३) क, ७२ (ड) व अनुसूची ड प्रकरण ५(२) (२) नुसार विना निविदा खरेदी करण्यास मंजुरी मिळणेकामी प्रस्तावित केलेले आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम नुसार खर्च रक्कम ₹.४८,१००/- मात्रला मा. आयुक्त सो. यांना मंजुरीचे अधिकार आहेत. त्यानुसार अग्निशामक (सार्वजनिक सुरक्षितता) विभागाकडील अत्यावश्यक सेवेतील अग्निशामक वाहन एम.एच.१८ जी.०२५९ वाहनांस

नविन पुढील टायर नग-२ विना निविदा करावयाची असल्याने खरेदी खर्च सर्व करासहित रक्कम **₹.४८,१००/- (अक्षरी अठ्ठेचाळीस हजार शंभर रूपये)** मात्रच्या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७ (३) क, ७२ (क) (ड) व अनुसूची ड प्रकरण ५ (२) (२) नुसार मान्यता मिळणेस व खरेदी नंतर मे.स्थायी समिती कडेस कार्योत्तर मंजुरी ठेवणेस मंजुरी मिळणेस सविनय सादर झालेला आहे

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून अग्निशामक विभागाकडील अत्यावश्यक सेवेतील वाहन क्र.एम. एच.१८ जी. २५९ वाहनांची पुढील नविन टायर खरेदी खर्च रक्कम ₹.४८,१००/-मात्र खर्चास कार्योत्तर मंजुरी देण्यात येत आहे. . तसेच सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री नागसेन दामोदर बोरसे

अनुमोदक:- श्री बन्सीलाल माणिक जाधव **सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:- २३० स्वच्छ भारत अभियान अंतर्गत धुळे मनपा हद्दीतील वरखेडीरोड येथे ३० TPD क्षमतेचा बायोगॅस प्रकल्प उभारणे तसेच एक वर्षापर्यत चालविणे व तदनंतर ५ वर्षापर्यत देखभाल दुरुस्ती करणेच्या कामाचे निविदा दर मागविण्यांत आलेत. त्या बाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर फेरविचार करणे.

| | |
|---|---|
| म.नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले. |
| म.संजय जाधव | सदर विषयाबाबत माहिती देण्यात यावी. |
| म.प्रतिभाताई चौधरी | सदर प्रस्ताव नेमका काय आहे? |
| म. सभापती | सदर प्रस्तावाची कार्यवाही करणारे अभियंता व कनिष्ठ अभियंता आज बाहेरगावी आहेत.त्यामुळे सदर प्रस्ताव सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने तहकुब करण्यास मान्यता देण्यांत येत आहे. |

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २४७ दिनांक ०९/१२/२०२२**

सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने धुळे मनपा हद्दीतील वरखेडी रोड येथे ३० TPD क्षमतेचा बायोगॅस प्रकल्प उभारणे तसेच एक वर्षापर्यत चालविणे व तदनंतर ५ वर्षापर्यत देखभाल दुरुस्ती करणेच्या कामाबाबत सभागृहास माहिती देणारे अधिकारी अनुपस्थितीत असल्याने सदर प्रस्ताव सद्यस्थितीत तहकुब ठेवण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सुचक :- श्री. संजय सुधाकर जाधव

अनुमोदक:- सौ.प्रतिभाताई शिवाजीराव चौधरी

**सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका, धुळे**

# धुळे महानगरपालिका,धुळे
## नगरसचिव कार्यालय
## स्थायी समिती सभा क्रमांक २९ चे इतिवृत्त

---

**धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह**
**मंगळवार दिनांक २७/१२/२०२२**
**वेळ :- सकाळी ११-०० वाजतां**

धुळे महानगरपालिकेची स्थायी समितीची साप्ताहिक सभा क्रं.२९ आज **मंगळवार दिनांक २७/१२/२०२२** रोजी सकाळी ११-००वाजतां श्री.शितल मोहन नवले, सभापती, स्थायी समिती, मनपा धुळे यांच्याअध्यक्षतेखाली **धुळे मनपा भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृहात** भरली. या सभेस खालील सन्मा.सदस्य हजर होते.

| अ.क्रं. | सदस्यांचे नांव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री.नवले शितल मोहन | सभापती |
| २ | श्री. जाधव संजय सुधाकर | सदस्य |
| ३ | श्री. बोरसे नागसेन दामोदर | सदस्य |
| ४ | श्री.जाधव बन्सीलाल माणिक | सदस्या |
| ५ | श्रीमती चौधरी मंगला अर्जुन | सदस्या |
| ६ | श्री.अन्सारी फातमा नुरुल अमीन | सदस्या |
| ७ | श्रीमती चौधरी प्रतिभा शिवाजीराव | सदस्या |
| ८ | श्री. अहिरराव किरण हरिश्चंद्र | सदस्य |
| ९ | श्री. रेलन हर्षकुमार राधेश्याम | सदस्य |
| १० | श्रीमती अग्रवाल सारिका प्रवीण | सदस्या |
| ११ | श्री.अन्सारी अब्दुल लतीफ अब्दुल हमीद | सदस्य |
| १२ | श्री.खान मोहम्मद साबीर मुहिबुल्लाह | सदस्य |
| १३ | श्रीमती पठाण नाजियाबानो नासिर खा | सदस्या |

**उपस्थित अधिकारी गण**

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. नितीन कापडणीस | अति.आयुक्त |
| २ | डॉ. श्रीमती संगिता नांदुरकर | उपायुक्त |
| ३ | श्री. विजय सनेर | उपायुक्त |
| ४ | श्री. गजानन पाटील | मुख्य लेखाधिकारी |
| ५ | श्री. मनोज अरविंद वाघ | नगरसचिव |
| ६ | श्री.के. एन. शिंदे | अभियंता |
| ७ | श्री. एम.आर. शेख | प्र.आरोग्याधिकारी |
| ८ | श्री. लक्ष्मण पाटील | सहा. आरोग्याधिकारी |
| ९ | श्री. संजय मोरे | प्र.कार्यालय अधिक्षक |
| १० | श्री. किशोर सुडके | प्र.परवाना अधिक्षक तथा बाजार विभाग प्रमुख |
| ११ | श्री. एन.के. बागुल | विद्युत अभियंता |
| १२ | श्री. प्रदीप चव्हाण | ओव्हरसिअर बांधकाम विभाग |

| | | |
|---|---|---|
| १३ | श्री. हेमंत पावटे | ओव्हरसिअर पा.पु. विभाग |
| १४ | श्री. महेंद्र सोनवणे | प्रशासन अधिकारी मनपा शिक्षण मंडळ |
| १५ | श्री. राजू माईनकर | भांडारपाल तथा आरोग्य विभाग प्रमुख |
| १६ | श्री. कमलेश सोनवणे | ओव्हरसिअर नगररचना विभाग |
| १७ | श्री. मधुकर निकुंभे | निरीक्षक, मालमत्ता कर विभाग |
| १८ | श्री. विकास साळवे | मलेरिया विभाग |
| १९ | श्री. सुक्राम राऊत | वाहन विभाग |
| २० | श्री. अनिल भडागे | लिपीक मु. ले. विभाग |

म. सभापती — सन्मा.सदस्य मा.अति.आयुक्त सो.सर्व अधिकारी कर्मचारी व पत्रकार,छायाचित्रकार बांधव यांचे मी स्थायी समितीच्या बैठकीत स्वागत करतो.सभेचा कोरम पुर्ण झाला असुन नगरसचिव यांनी सभेचे कामकाज सुरु करावे.

म. नगरसचिव — वंदे मातरम् या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

**सभेच्या सुरुवातीस सन्मा.सदस्यांकडून आलेली श्रध्दांजलीची यादी**

धुळे महानगरपालिकेचे कर्मचारी श्री.कैलास गुलाबराव चौधरी यांची आई विमलबाई गुलाबराव चौधरी यांचे आज रोजी दु:खद निधन झाले आहे.त्यांना आजच्या सभेत भावपूर्ण श्रध्दाजली अर्पण करुन तसा ठराव पारीत करण्यांत यावा ही विनंती.

**सुचक :- श्री. बोरसे नागसेन दामोदर,उपमहापौर**

**अनुमोदक:- सौ. प्रतिभाताई शिवाजीराव चौधरी**

म. सभापती — सन्मा.सदस्यांच्या यादीनुसार दोन्ही मान्यवरांना श्रध्दांजली समर्पित करणेसाठी दोन मिनिटे मौन उभे रहावे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २४८ दिनांक २७/१२/२०२२**

सन्मा.सदस्यांच्या यादीनुसार धुळे महानगरपालिकेचे कर्मचारी श्री.कैलास गुलाबराव चौधरी यांची आई विमलबाई गुलाबराव चौधरी यांचे आज रोजी दु:खद निधन झाले आहे.

मान्यवरांचे दु:खद निधनामुळे या सभेस आतीव दु:ख होत आहे ही सभा त्यांचे कुटुंबियांचे दु:खात सहभागी असून मान्यवरांचे आत्म्यास चिरशांती प्रदानार्थ दोन मिनिटे मौन उभे राहून त्यांना भावपूर्ण श्रध्दाजली समर्पित करण्यांत येत असून तसा शोक ठराव पारीत करण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

**सन्मा. सभापती महोदय यांचेकडून आलेला प्रस्ताव**

आपल्या स्थायी समितीचे सन्मा.सदस्य श्री. नागसेन दामोदर बोरसे यांची धुळे मनपाच्या उपमहापौर पदी निवड झाली आहे. त्यांचे आजच्या स्थायी समितीच्या सभेत स्वागत करण्यांत येत आहे.

तसेच नगरसचिव विभागातील कर्मचारी श्री.चंद्रशेखर रमाकांत बनछोडे हे विहीत वयोमानानुसार ३१ डिसेंबर २०२२ रोजी सेवानिवृत्त होत आहे त्यांची ही शेवटची सभा असल्याने स्थायी समितीच्या वतीने पुष्पबुके देऊन त्यांच्या पुढील सेवानिवृत्त कालावधीसाठी शुभेच्छा देण्यांत आल्या.

सही/-x x x

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- २३१ — मागील स्थायी समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे. (दि.१०/११/२०२२ व २४/११/२०२२)

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.प्रतिभाताई चौधरी — दि.२४.११.२०२२ चे इतिवृत्त यामध्ये मी लेखी पत्र दिले होते. मनपात चांगले काम करणारे कर्मचारी आहे. या कर्मचाऱ्यांना पदोन्नती व अश्वासित योजना लागू करण्या संदर्भात पत्र दिले होते. दर १२ वर्षांनी अश्वासित योजनेचा विषय येत असतो. कापडणीस साहेब यांनी आदेश दिले होते आस्थापना तर्फे लेखी पत्र देण्यात यावे. आता पर्यंत ७ मिटींग झाल्या आहे. जास्त कर्मचारी असल्यामुळे विलंब होत आहे. पण

अजूनपर्यंत लेखी उत्तर मला आस्थापनातर्फे मिळाले नाही. तसेच जे स्वच्छता मुकादम आहे यांचे संदर्भात ही एक लेखी पत्र दिले होते. याचे ही लेखी उत्तर मला मिळालेले नाही. कापडणीस साहेबांनी सभागृहात आदेशित करुन देखील लेखी उत्तर मिळाले नाही.

म.अति. आयुक्त आपण उपस्थित केलेल्या मुद्दाबाबत लेखी उत्तर सविस्तर माहिती देण्यांत येईल.

म. सभापती सन्मा.सदस्यांच्या सहमतीने मागील स्थायी समिती सभांचे इतिवृत्त क्रमश:वाचून कायम करण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २४९ दिनांक २७/१२/२०२२**

मागील स्थायी समिती सभा दि.१०/११/२०२२ च्या सभेतील धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २१८ ते २२७ अखेर तसेच सभेत सन्मा.सदस्यांनी उपस्थित केलेली चर्चा व त्यावरील निर्णय क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे. तसेच दिनांक २४/११/२०२२ च्या सभेतील धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २२८ ते २३८ अखेर तसेच सभेत सन्मा.सदस्यांनी उपस्थित केलेली चर्चा व त्यावरील निर्णय क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे. सही/-x

x x

**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- २३२ सुखवद पाणी पुरवठा केंद्र येथील ४७५ एच.पी/ व्ही. टी पंपसेट क्र. ५ ची तात्काळ दुरूस्ती करुन घेण्यांत आली त्यासाठी झालेला खर्च रु.५०६२०५/- मात्र खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ६७ (३) प्रमाणे कार्यात्तर मंजुरी देणेबाबत विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.नागसेन बोरसे विषय मंजुर करण्यांत यावा.

म. किरण अहिरराव विषय मंजुर करण्यांत यावा.

म.सभापती सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे. लेखाधिकारी साहेब मी तुम्हाला बोललो होते थोडे फार पेमेंट दुरुस्तीसाठी द्यावे हे जे लिकेजेसचे प्रश्न उपस्थित होतात याचे कारण असे की ठेकेदाराचे पेमेंट दिले गेलेले नाही. त्याचे पेमेंट १० लाख असेल तर त्याचे किमान १ ते २ लाख दिले गेले पाहिजे. शिंदे साहेबांकडून यादी घ्या. जे इर्मजन्सी वर्क आहे त्यांना प्राधान्याने देयके अदा करण्याबाबत दक्षता घ्यावी.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २५०दिनांक २७/१२/२०२२**

तापी पाणी पुरवठा योजना येथील सुखवद पाणी पुरवठा केंद्र येथील रॉ वॉटर पंप सेट क्र.५दि. २२/०९/२०२२ रोजी आकस्मीक रीत्या बंद झाल्याने सदर पंपाचा डिस्चार्ज कमी झाल्याने शहरातील पाणी पुरवठा विस्कळीत होऊन आणीबाणीची परिस्थिती निर्माण झालेली आहे व ज्या अर्थी सदर पंप जनतेच्या सेवेसाठी व सुरक्षिततेसाठी अति तात्काळ परिस्थितीत दुरूस्त करून घेणे आवश्यक झालेले आहे, अशा अति तात्काळ परिस्थितीत काम करुन घेण्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ६७ (३) आयुक्त, महानगरपालिका यांना काही अधिकार प्रदान केलेले आहेत.

धुळे मला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ६७ (३) नुसार प्राप्त अधिकारान्वये धुळे महानगरपालिकेच्या सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात पाणी पुरवठा केंद्र निगा व दुरुस्ती या लेखाशिर्षातून उक्त काम **न्यु साई इलेक्ट्रीक,धुळे** यांच्या कडुन अंदाजपत्रकिय दराने तात्काळ करून घेण्यास रु. ५०६२०५/ -खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम ६७ (३) प्रमाणे कार्यात्तर मंजुरी होण्यासाठी मे.स्थायी समिती पुढे सादर झाला आहे.

सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून तापी पाणी पुरवठा योजना येथील सुखवद पाणी पुरवठा केंद्र येथील रॉ वॉटर पंप सेट क्र.५ची तातडीने दुरुस्ती करणेसाठी झालेला रु.५०६२०५/-मात्र खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम ६७(३) प्रमाणे कार्यात्तर मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.लेखा विभागाने अत्यावश्यक असलेल्या कामाची देयके अदा करणेबाबत प्राधान्याने कार्यवाही करावी.

सुचक :- श्री. बोरसे नागसेन दामोदर, उपमहापौर

अनुमोदक:- श्री. अहिरराव किरण हरिश्चंद्र **सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:- २३३ महानगरपालिका सामान्य प्रशासन विभागाकडील म.महापौर सो. यांच्या सेवेतील मनपा वाहन क्र.एम. एच.१८बी.आर.००१९ वाहनांची दुरुस्ती खर्च ₹.१९१२७/- मात्रच्या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मंजुरी देणेबाबत विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. बन्सीलाल जाधव विषय मंजुर करण्यांत यावा.

म.हर्षकुमार रेलन विषय मंजुर करण्यांत यावा.

म. सभापती सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २५१ दिनांक २७/१२/२०२२**

धुळे महानगरपालिका सामान्य प्रशासन विभागाकडील म.महापौर सो यांच्या सेवेतील वाहन क्र एम.एच.१८ बी.आर.००१९ हे मनपा टाटा सफारी वाहनांचे स्टेअरींग ऑईल पंप खराब झाल्यामुळे, बल्ब उडाल्यामुळे, कुलंट बॉक्स लिंक,ब्रेक लागत नसल्याने अहवाल वाहन चालक व मेकॅनिक/हेल्पर यांनी वाहन विभागाकडेस सादर केल्यानुसार वाहन विभागाकडुन टाटा अधिकृत वितरक, उज्वल ॲटोमोटीव्ह प्रा.लि.धुळे यांना पत्र देऊन उज्वल ॲटोमोटिव्ह,धुळे यांचे कंपनी अभियंता मार्फत वाहनांची तपासणी केली असता त्यांचे अहवालानुसार वाहनात खालीलप्रमाणे दुरूस्ती कामे करणे आवश्यक आहे. दि.१५/०९/२०२२ अधिकृत वितरक यांचे कडुन दुरूस्ती कामाचे इस्टीमेट घेण्यात आले आहे.

तरी वाहनास करण्यात येणारी दुरुस्ती मजुरीसह टाटा मोटर्स अधिकृत वितरक – उज्वल ॲटोमोटिव्ह प्रा.लि.धुळे यांचे कडून करुन घेणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम नुसार सदर खर्च रक्कम ₹.१९२२७/-मात्रला मा. आयुक्त सो. यांना मंजुरीचे अधिकार आहेत.त्यानुसार म.आयुक्त सो. यांनी मनपा अधिनियम कलम ६६ (२) व ६९ नुसार रक्कम₹.५,०००००/-(पाच लक्ष) पर्यंत खर्चाचे अधिकार जा.क्र. / धुमपा/ आस्था / ७७९ दि.१९/०७/२०२१ अन्वये म.उपायुक्त सो यांना परावर्तीत केलेले आहे.सदरील खर्च ₹.१९१२७- (अक्षरी-एकोणवीस हजार एकशे सतावीस रुपये) मात्रच्या खर्चास प्रशासकीय व आर्थिक तसेच वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८,भाग-एक उप विभाग दोन नियम ६९,पृष्ठ क्र.३०नुसार आर्थिक वर्ष खर्च मर्यादा ओलांडत असल्याने मे.स्थायी समिती कडेस मान्यतेसाठी ठेवणेस मंजुरी दिल्यानुसार मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर महानगरपालिका सामान्य प्रशासन विभागाकडीलम.महापौर सो.यांच्या सेवेतील मनपा वाहन क्र.एम.एच.१८बीआर.००१९ वाहनांची दुरुस्ती खर्च ₹.१९१२७/-मात्रच्या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मंजुरी देण्यांत येत आहे.

सुचक :- श्री. जाधव बन्सीलाल माणिक

अनुमोदक:- श्री. रेलन हर्षकुमार राध्येशाम **सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:-२३४ धुळे मनपा हद्दीत १) मोती नाल्या मधील ६इंची एच.डी.पी.ई.पाईप लाईन २) डेडरगाव जलशुद्धीकरण केंद्र येथून आलेल्या १२ इंची मालेगाव सम्प पावेतो येणारी पाईप लाईन तसेच ३)डी- मार्ट समोर १०० फुटीरोड वर तापी पाणीपुरवठा योजनेची ९०० एम.एम.व्यासाची पी.एस.सी. लाईनला गळती दुरुस्ती कामी झालेला खर्च रु.६,२९,६८१/-मात्रला खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम ६७(३)प्रमाणे कार्योत्तर मंजुरी देणेबाबत विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.हर्षकुमार रेलन विषय मंजुर करण्यांत यावा.

म.सारिका अग्रवाल विषय मंजुर करण्यांत यावा.

म.सभापती सन्मा.सदस्यांच्यासहमतीने व कार्यालयीन अहवालासअधिन राहून सदर प्रस्तावास कार्यात्तर मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २५२ दिनांक २७/१२/२०२२**

धुळे मनपा हद्दीत १) मोती नाल्या मधील नागरिकांच्या पिण्यासाठी टाकणेत आलेली ६ इंची एच.डी.पी.ई. पाईप लाईन २) डेडरगाव जलशुद्धीकरण केंद्र येथून आलेल्या १२ इंची मालेगाव सम्प पावेतो येणारी पाईप लाईन अश्या वरील दोन्ही ठिकाणील आलेल्या पुरामुळे पाईप लाईन तुटून पाईप वाहून गेलेली आहे तसेच ३) डी- मार्ट समोर १०० फुटी रोडवर तापी पाणीपुरवठा योजनेची ९०० एम.एम. व्यासाची पी.एस.सी. लाईनला गळती लागलेली असल्याने त्या भागातील नागरिकांना पाणीपुरवठा करणेस अडचण निर्माण झालेली आहे. त्यामुळे पाईप लाईन जोडणे आवश्यक असल्याने अंदाजपत्रक तयार केले असता उक्त कामी अंदाजपत्रकीय खर्च रु. ६,२९,६८१/- मात्र येणार आहे

तरी उक्त काम हे नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याशी निगडीत असल्याने सदर काम विना निविदा मे.संजय दगडू गायकवाड, ठेकेदार, धुळे यांचे कडुन मुंबई प्रांतिक अधिनियम नियम ६७ (३) (क) अन्वये त्वरित काम करण्यास व ५ (२) (२) अन्वये विना निविदा करण्यास मंजुरीसाठी व अंदाजपत्रकीय खर्च रु.६,२९,६८१/- मात्र खर्चास कार्योत्तर मंजुरीस्तव मे. स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून धुळे मनपा हद्दीत १) मोती नाल्या मधील ६ इंची एच.डी.पी.ई.पाईप लाईन २) डेडरगाव जलशुद्धीकरण केंद्र येथून आलेल्या १२ इंची मालेगाव सम्प पावेतो येणारी पाईप लाईन तसेच ३)डी- मार्ट समोर १०० फुटीरोड वर तापी पाणीपुरवठा योजनेची ९००एम.एम.व्यासाची पी.एस.सी. लाईनला लागलेली गळती दुरुस्ती कामे विना निविदा मे.संजय दगडू गायकवाड, ठेकेदार, धुळे यांचे कडुन करुन घेण्यांत आलेली असल्याने त्यासाठी झालेला खर्च रु.६,२९,६८१/- मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम ६७(३) प्रमाणे कार्यात्तर मंजुरी देण्यांत येत आहे.सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री. रेलन हर्षकुमार राध्येशाम

अनुमोदक:- सौ. अग्रवाल सारिका प्रवीण

**सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- २३५ प्र.क्र. १७ मधील मनपा निधी अंतर्गत अहिल्यादेवी नगर व दिपलक्ष्मी कॉलनी मधील जितेंद्र मोरे ते कदम पवार ते शालीग्राम पाटील ते भट ते रोहित सोनार ते बाळा मराठे ते नागणे घरापावेतो रस्ता कॉंक्रीट करणेचे निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.खान मोहम्मद साबीर विषय मंजुर करण्यांत यावा.

म. बन्सीलाल जाधव विषय मंजुर करण्यांत यावा.

म. सभापती सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २५३ दिनांक २७/१२/२०२२**

प्र.क्र. १७ मधील मनपा निधी अंतर्गत अहिल्यादेवी नगर व दिपलक्ष्मी कॉलनी मधील जितेंद्र मोरे ते कदम पवार ते शालीग्राम पाटील ते भट ते रोहित सोनार ते बाळा मराठे ते नागणे घरापावेतो रस्ता कॉंक्रीट करणे बाबतच्या कामास धुळे महानगरपालिका मे. महासभा ठराव नं. ७५ दि.२७/०१/२०२२ मा.आयुक्त सो. धुळे महानगरपालिका यांनी टिपणी मंजुरीने दि.०७/११/२०२२ अन्वये उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु. ७४,९६,८६३/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./३७१ /२०२२-२३ दि. ९/११/२०२२ अन्वये रक्कम रु.७४,९६,८६३/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत या धुळे महानगरपालिकाजा.क्र./धुमपा/पापुवि/९४६/२०२२-२३ दि. १०/११/२०२२ अन्वये दि.११/११/२०२२ दैनिक नवभारत / राजरंग टाईम्स या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.०५/१२/२०२२रोजी निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे /ठेकेदराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | ऋषभ सतिष खिवसरा | शे.३% जास्तीने | |
| २ | सौरभ संजय कदमबांडे | अंदाजपत्रकीय दराने | सर्वात कमी दर |
| ३ | अ.के.सैफी | शे.१% जास्तीने | |
| ४ | अभिषेख विजय चिंचोळे | शे.२% जास्तीने | |
| ५. | हिंद कन्सट्रक्शन | अंदाजपत्रकीय दराने | सर्वात कमी दर |
| ६. | एकविरा कन्सट्रक्शन | शे.२% जास्तीने | |

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून सदर सौरभ संजय कदमबांडे व हिंद कन्सट्रक्शन यांचे सारखेच अंदाजपत्रकीय दराने कमी दर आलेले आहे. त्यांनी नियमाप्रमाणे ऑनलाईन बयाना रक्कम भरलेली आहे. सदर दोन्ही निविदा धारकाचे निविदा दर हे अंदाजपत्रकीय दराने असल्याने दर वाटाघाटीसाठी दोन्ही निविदा धारकांना पत्र देणेबाबत सर्व निविदा समिती सदस्यांचे एकमत झाले. त्यानुसार सबंधित दोन्ही निविदा धारकास दरवाटाघाटीस या कार्यालयाकडील जा. क्र./ पापुवि/१००५ व जा.क्र./ पापुवि /१००६ दि. १५/१२/२०२२ रोजी पत्र देवून दि.१६/१२/२०२२ रोजी दु. ४.०० वा. निविदा समितीपुढे उपस्थिती राहणे बाबत कळविले.

त्यानुसार सबंधित ठेकेदार यांनी निविदा समितीपुढे दि. १६/१२/२०२२ रोजी बंद पाकिटात दर दिले असून १) मे. हिंद कन्सट्रक्शन ठेकेदार यांनी अंदाजपत्रकीय दरापेक्षा शे.०.९९% कमीने या दराने सादर केले आहे२) मे.सौरभ कदमबांडे,ठेकेदार यांनी सदरचे काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा शे. .०.५०% कमीने या दराने करणे बाबत सादर केलेले आहे.

उक्त बाबत वरील दोन्ही निविदा धारकांचे दर वाटाघाटी अंती सर्वात कमी दर **मे.हिंद कन्सट्रक्शन, ठेकेदार यांचे शे.०.९९% कमी दराने** असल्याने सदरचे दरास मे.स्थायी समिती पुढे मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सन्मा. सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी निगोसिएशन अंती **मे. हिंद कन्सट्रक्शन, ठेकेदार यांचे शे.०.९९% कमी दराने आलेल्या दरांस मान्यता देण्यांत येत आहे.** सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री. खान मोहम्मद साबीर मुहिबुल्लाह

अनुमोदक:- श्री. जाधव बन्सीलाल माणिक

**सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- २३६ प्र.क्र.०७मध्ये विकास शुल्क निधी अंतर्गत भिम चौक ते फुले नगर पावेतो रस्ता कॉक्रीट करणेचे निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.हर्षकुमार रेलन विषय मंजुर करण्यांत यावा.

म.बन्सीलाल जाधव विषय मंजुर करण्यांत यावा.

म. सभापती सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २५४ दिनांक २७/१२/२०२२**

प्र.क्र.०७ मध्ये विकास शुल्क निधी अंतर्गत भिम चौक ते फुले नगर पावेतो रस्ता कॉक्रीट करणे बावतच्या कामास धुळे महानगरपालिका ठराव नं.७५दि.२७/०१/२०२२ अन्वये मा.आयुक्त सो., धुळे मनपा यांनी टिपणी मंजुरीने दि.२१/१०/२०२२ अन्वये उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु. ७८,२९,८५४/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबावत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./१५१ /२०२२-२३ दि.१०/८/२०२२ अन्वये रक्कम रु.७८,२९,८५४/-मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबावत या धुळे महानगरपालिका जा.क्र./धुमपा/ पापुवि/९६/२०२२-२३ दि.२७/१०/२०२२ अन्वये दि.२८/१०/२०२२ रोजी दैनिक देशदूत / समाज सारथी या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.२९/११/२०२२ रोजी निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबावत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे /ठेकेदराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | ऋषभ सतिष खिवसरा | शे.३% जास्तीने | |
| २ | हिंद कन्सट्रक्शन | अंदाजपत्रकीय दराने | सर्वात कमी दर |
| ३ | एकविरा कन्सट्रक्शन | शे.२% जास्तीने | |

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **मे.हिंद कन्सट्रक्शन** यांचे दर **अंदाजपत्रकिय दराने** आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे, सबब कंत्राटदार **मे.हिंद कन्सट्रक्शन** यांची अंदाजपत्रकीय दराने आलेले निविदा दरास मंजुरीस्तव मे.स्थायी समिती पुढे मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी निगोसिएशन अंती **मे.हिंद कन्सट्रक्शन, ठेकेदार यांचे अंदाजपत्रकीय दराने आलेल्या दरांस मान्यता देण्यांत येत आहे.**सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी.याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री. रेलन हर्षकुमार राध्येशाम

अनुमोदक:- श्री. जाधव बन्सीलाल माणिक

**सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x

**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- २३७ विकास शुल्क अंतर्गत देवपूर सर्वे नं.१३/ १ येथे उद्यान विकसित करणेचे निविदा दर मागविण्यांत आलेत, त्यावावत आलेल्या कार्यालयीन अहवालावर विचार करणे.

म. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.नागसेन बोरसे — विषय मंजुर करण्यांत यावा.

म.साबिर खान — सदर काम काय आहे? व कोणत्या निधीतून प्रस्तावित आहे यासाठी किती निधी शासनाने दिलेला आहे सदर काम कशातून प्रस्तावित आहे याबाबत माहिती द्यावी.

म.अभियंता — देवपूर सर्व्हे नं १३/१येथे उद्यान विकसीत करण्यासाठी जे निविदा दर मागवण्यात आले त्या संदर्भात हा विषय आला आहे. यामध्ये यापूर्वी मा.उच्च न्यायालयाने धुळे मनपाकडे सदर जागा विनामूल्य हस्तांतरीत करावी असे मा.जिल्हाधिकारी यांना आदेशित केले होते.त्या ठिकाणी उद्यानाचे आरक्षण असल्याने ते तातडीने करावे म्हणून शासनाने ती जागा मनपाला हस्तांतरीत केली व त्यासाठी ५ कोटी रुपये शासनाने अनुदान दिले त्यामध्ये वॉल कंपाउंड भिंत व इतर कामे झाली आहे.त्याठिकाणी विद्युत व्यवस्था व इतर सुविधा करावयाचे असल्याने सदर काम प्रस्तावित केलेले आहे त्यानुसार सदर प्रस्ताव स्थायी समिती पुढे मान्यतेसाठी आला आहे.

म.प्रतिभाताई चौधरी — विषय मंजुर करण्यांत यावा.

म. सभापती — सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २५५ दिनांक २७/१२/२०२२**

विकास शुल्क अंतर्गत देवपूर सर्वे नं. १३/१ येथे उद्यान विकसित करणे बाबतच्या कामास मा. आयुक्त सो.धुळे महानगरपालिका यांनी टिपणी मंजुरीने दि. ०६/१२/२०२२ अन्वये उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु.१,९९,९९,६४८/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबावत शहर अभियंता,मनपा धुळे यांचे मार्फत रक्कम रु.१,९९,९९,६४८/-मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत या धुळे महानगरपालिका जा.क्र./धुमपा/पापुवि/९७१/२०२२दि.२३/११/२०२२ अन्वये रोजी दैनिक हिंदुस्तान टाईम्स + मिंट, एच.टी. वेस्ट + मिंट स्टेट लेवल या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.१६/१२/२०२२ रोजी निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे /ठेकेदराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | मे.गायत्री कन्सट्रक्शन | अंदाजपत्रकीय दराने | सर्वात कमी दर |
| २ | मे. अे.बी. वाघ | शे.८.००% जास्तीने | |
| ३ | मे. एस.बी.देशमुख | शे.२.००% जास्तीने | |

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून मे.गायत्री कन्सट्रक्शन यांचे दर अंदाजपत्रकीय दराने आलेले आहे. व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार मे.गायत्री कन्सट्रक्शन याची अंदाजपत्रकीय दराने आलेले निविदा दरास मंजुरीस्तव मे.स्थायी समिती पुढे ठेवणेस तसेच अन्य काम न मिळालेले ठेकेदार त्यांची बयाना रक्कम परत करणे बाबत मे.स्थायी समिती पुढे मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी मे.गायत्री कन्सट्रक्शन **यांचे अंदाजपत्रकीय दराने आलेल्या दरांस मान्यता देण्यांत येत आहे.** सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील. सुचक :- श्री. बोरसे नागसेन दामोदर,उपमहापौर

अनुमोदक:- सौ. चौधरी प्रतिभाताई शिवाजीराव **सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- २३८ स्वच्छ भारत अभियान अंतर्गत धुळे मनपा हद्दीतील वरखेडीरोड येथे ३०TPD क्षमतेचा बायोगॅस प्रकल्प उभारणे तसेच एक वर्षापर्यंत चालविणे व तदनंतर ५ वर्षापर्यंत देखभाल दुरुस्ती करणेच्या कामाचे निविदा दर मागविण्यांत आलेत.त्या बाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर फेर विचार करणे.

म.सभापती मागच्या स्थायीत हा विषय तहकूब ठेवला होता. हा शहराच्या दृष्टीने महत्वपूर्ण प्रकल्प आहे या प्रकल्पात उपायुक्त सनेर साहेब व अभियंता चव्हाण साहेब हे काम बघत आहे.सनेर साहेब याद्दल सभागृहाला थोडक्यात माहिती द्यावी.

म.उपायुक्त महाराष्ट्र सरकारने स्वच्छ भारत अभियान अंतर्गत धुळे शहरासाठी २६ कोटीचा डी.पी.आर मंजूर केला होता. या २६ कोटीची ४ ते ५ कंम्पोनंट वेगवेगळे करुन त्यात हा एक कंम्पोनंट होता. त्यात बायोगॅस, बायोमाईनिंग,मशिनरी व प्रोसेसिंग करणे इत्यादी बाबी होत्या त्यात बायोगॅस हा जो प्रकल्प आहे. शहरातील निघणारा ओला कचरा आणि मार्केट मधील निघणारा ओला कचरा विशेषत: कृषी उत्पन्न बाजार समितीतील ओला कचरा त्याचा पुढील २५ वर्षाच्या दृष्टीकोन ठेवून जो प्रोजेक्ट तयार केला त्यातून गॅस व विज उत्पन्न होईल. मनपाला त्याचा भूर्दंड बसणार नाही. त्याचा मनपाला फायदाच होणार आहे. बायोगॅस, बायोमाईनिंग या गोष्टी करणे गरजेचे आहे. व तातडीने होणे गरजेचे आहे. मार्च २०२३ पूर्वी जर काम पूर्ण नाही झाले तो निधी सरकारला परत जाईल. ही शेवटची संधी आहे. हे प्रकल्प पूर्ण करणे गरजेचे आहे सभागृहाला विनंती हे प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण करावे.

म.किरण अहिरराव विषय मंजुर करण्यांत यावा.

म.अन्सारी अब्दुल लतीफ विषय मंजुर करण्यांत यावा.

म.सभापती सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालीयीन अहवालास अधिन राहून सदर प्रसतावास मान्यता देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २५६ दिनांक २७/१२/२०२२**

स्वच्छ भारत अभियान अंतर्गत धुळे महानगरपालिका हद्दीतील वरखेडी रोड येथे ३० TPD क्षमतेचा बायोगॅस प्रकल्प उभारणे १ वर्षा पावेतो चालविणे तदनंतर ५ वर्ष पर्यंत देखभाल व दुरुस्ती करणे बाबतच्या कामास धुळे महानगरपालिका स्थायी समिती क्र.१०७ दि. १०/०६/२०२२ म.आयुक्त सो. धुळे महानगरपालिका यांनी टिपणी मंजुरीने दि.०१/०७/२०२२ अन्वये उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु. **११,८४,८८,५८७/-** मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./७६२/२०२१ दि. १३/०५/२०२१ अन्वये रक्कम रु.**११,८४,८८,५८७/-** (जीएसटी सह) मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत या धुळे महानगरपालिका जा.क्र./धुमपा/बांवि/३२/२०२२अन्वये दि. ०५/०७/२०२२ रोजी दैनिक **हिंदुस्थान टाईम्स/पुण्य नगरी** या वृत्तपत्रात जाहिर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.८/८/२०२२पर्यंत निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाना रक्कम भरून निविदा दर सादर केलेली आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदारा/ठेकेदराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | Superb Hygenic Disposals India Pvt.Ltd | १.४९% कमी दराने | |
| २ | Avni Enterprises | **१.८० % कमी दराने** | सर्वात कमी दर |
| ३ | Enprotech Solutions | ६.४५% जास्ती दराने | |

सदर तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता **मे.Avni Enterprises** यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे **११,८४,८८,७९२/-** इतक्या रक्कमेचे असून **१.८०% कमी** दराने आहे.

सदर निविदा धारकांचे निविदा दर हे.**१.८०%कमी** दराने असल्याने सर्व निविदा समिती सदस्यांनी सदर निविदा धारकांचे दर स्वीकारण्यास मा.आयुक्त सो.यांना शिफारस करण्यावर एकमत झाले. वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **मे.Avni Enterprises** यांचे **दर १.८०% कमी** आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे.सबब कंत्राटदार **मे. Avni Enterprises** यांची **१.८०%कमी** दराने आलेले निविदा दर मंजुरीस्तव मे.स्थायी समिती समोर सादर करण्यास तसेच अन्य काम न मिळालेले ठेकेदारांना त्यांची बयाणा रक्कम परत करणे बाबत मंजुरीस्तव सादर .याबाबत L3 ठेकेदार यांनी केलेला तक्रारी अर्ज निकाली काढण्यांत आलेला असून L1 ठेकेदार यांचेकडून याबाबत लेखी खुलासा मागविण्यांत आलेला आहे. सबब सदर प्रस्ताव फेर निर्णयास्तव मे.स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

सन्मा.सदस्यांच्या सहमतीने व कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामी **मे.Avni Enterprises** यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे **११,८४,८८,७९२/-** इतक्या रक्कमेचे असून **१.८०% कमीने आलेल्या निविदा दरास मान्यता देण्यांत येत आहे.**सदर प्रस्ताव व कार्यवाहीबाबत लेखा आक्षेप निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सुचक :- श्री. अहिरराव किरण हरिश्चंद्र

अनुमोदक:- श्री.अन्सारी अब्दुल लतीफ अब्दुल हमीद **सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**